
फ्योदर दस्तोयेवस्की

श्वेतरात्री



जगप्रसिद्ध रशियन लेखक फ्योदर दस्तोयेवस्की (१८२१-१८८१) यांना प्रतिभावंत म्हणून संबोधले जाते. शेक्सपीयर, दान्ते, ग्योते, तल्स्तोय यांच्या मालिकेत त्यांच्या नांवाचा समावेश होतो. 'अपराध आणि शासन', 'वेडा', 'कारामाझोव बंधू' अशा खंडप्राय कादंबऱ्यांमुळे कीर्ती प्राप्त झालेला हा लेखक, मानसशास्त्रीय लघुकादंबऱ्या व कथा लिहिणारा कसबी म्हणूनही साहित्यिक इतिहासात नमूद झाला आहे.

"मी पाहिलंय आणि मला माहीत आहे की, पृथ्वीवर राहण्याची क्षमता न गमावता माणसं सुंदर आणि सुखी असू शकतात. दुष्टपणा हा माणसाचा स्थायी भाव आहे यावर मी विश्वास ठेवू शकत नाही आणि इच्छित नाही," हे शब्द दस्तोयेवस्कींच्या 'एका विचित्र वल्लीचे स्वप्न' कथेमधील आहेत.

ISBN 5-05-001054-3



फ्योदर दस्तोयेवस्की

श्वेतरात्री

रादुगा प्रकाशन
मास्को

अनुवाद – अनिल हवालदार
सजावट – म. आ. त्रुबेत्स्कोय

Ф. М. Достоевский

ПОВЕСТИ И РАССКАЗЫ

На языке маратхи

Dostoyevsky F.

STORIES

In Marathi

सोविएत संघात मुद्रित

ISBN 5-05-001051-3

अनुक्रमणिका

दरिद्री माणसे

कादंबरी [1]

छे :, ह्या कथाकथनकारांनी मला अगदी वैताग आणलाय ! [२] काही विधायक, प्रसन्न, मनोरंजक लिहिण्याऐवजी जगातली सगळी घाण पायांखाली तुडवत बसतात ! .. त्यांना लेखन करायला बंदी केली पाहिजे ! नाहीतर घडते काय : तुम्ही वाचता ... नकळत मनात विचारचक्र सुरू होते – आणि भलभलत्या गोष्टी टाळक्यात येतात ; खरेच त्यांना लेखनाला मी बंदी केली असती, अगदी पूर्ण मनाई केली असती !

प्रिन्स व्ला. फ्यो. ओदोयेवस्की

८ एप्रिल

माझ्या बहुमोल वार्वारा अलेक्सेयेवना!

काल मी सुखी होतो, अमाप सुखी होतो, अशक्यप्राय सुखी होतो ! तुमच्यासारखी हट्टी निदान आयुष्यात एकदा तरी माझ्या मनाप्रमाणे वागली ! संध्याकाळी आठ वाजता मी जागा झालो (तुम्हाला माहीत आहे की, नोकरीवरून आल्यानंतर एखाद-दुसरा तास डुलकी घ्यायला मला आवडते), मेणबत्ती पेटवली, कागदांची चळत मांडली, लेखणी तासू लागलो आणि अचानक नकळतपणे नजर वरती उचलली – खरेच माझे काळीज थाडदिशी उडाले ! म्हणजे माझी काय इच्छा होती, माझ्या काळजाची काय इच्छा होती, तुम्हाला समजले ! पाहतो तर तुमच्या खिडकीच्या पडद्याचे एक टोक त्यावेळी मी तुम्हाला सांगितले होते त्याप्रमाणे फरच्या झाडाच्या कुंडीला बांधलेले होते ; मला असेही भासले की, तुमचा लाडका चेहरा खिडकीत अवतरला, तुम्ही माझ्याकडे तुमच्या खोलीतून पहात होतात, माझ्याबद्दल विचार करत होतात. आणि माझ्या लाडक्या कबूतरा, मला एकदम खेद वाटला की, तुमचा प्रसन्न चेहरा मी स्पष्टपणे पाहू शकत नव्हतो ! एक काळ असा होता जेव्हा आपण स्पष्ट पाहू शकत होतो. लाडके, म्हातारपण आनंदी नसते ग ! आताशा डोळयांना सगळे धूसर दिसू लागलेय ; जरा कुठे संध्याकाळी काम केले, काहीतरी लेखन केले, तर सकाळी डोळे लालभडक होतात, त्यांच्यातून पाणी वाहू लागते आणि परक्यांसमोर तोंड दाखवायची

लाज वाटते. पण तुमचे स्मित माझ्या कल्पनाशक्तीमधून मनासमोर उजळले, माझ्या देवदूता, तुमचे प्रेमळ, स्वागतपर स्मित; आणि माझ्या काळजात नेमकी तशीच संवेदना उमटली, जेव्हा मी तुमचे चुंबन घेतले होते, वारेन्का– आठवते का, माझ्या लाडक्या देवदूता? तुम्हाला माहीत आहे का, माझ्या कबूतरा, मला भाससुद्धा झाला की, तुम्ही मला बोटाने दरडावलेत? तसे केलेस ना वात्रट मुली? तुम्ही हे सर्व तपशीलवारपणे तुमच्या पत्रातून मला लिहा.

तुमच्या पडद्याविषयी आपण शोधलेल्या युक्तीबद्दल तुमचे काय मत आहे, वारेन्का? मस्त आहे ना? मी काम करत असलो, अथवा झोपायला निघालो, किंवा जागा झालो, तरी सतत मला माहीत आहे की, तुम्ही माझ्याबद्दल विचार करत आहात, माझी आठवण काढत आहात, तुम्ही निकोप आणि आनंदी आहात. पडदा खाली सोडला – म्हणजे, अच्छा मकार अलेक्सेयेविच, झोपायची वेळ झाली! पडदा वर उचलला – म्हणजे, सुप्रभात मकार अलेक्सेयेविच, झोप कशी लागली अथवा तुमची प्रकृती कशी आहे, मकार अलेक्सेयेविच? माझ्या बाबतीत सांगायचे तर देवाच्या कृपेने छान आहे! माझ्या लाडके, ही किती उत्तम युक्ती सुचलीय; पत्रांची गरज नाही! चतुर आहे ना? पण युक्ती तर माझी आहे! ह्या बाबतीत मी हुषार आहे ना, वार्वारा अलेक्सेयेवना?

माझ्या जिवलगा, वार्वारा अलेक्सेयेवना, मी तुम्हाला सांगतो की, अपेक्षेच्या अगदी विरुद्ध सबंध रात्र मी गाढ झोपलो आणि ह्याचे मला खूप समाधान वाटतेय. वस्तुतः नव्या जागी सहसा झोप लागत नाही. काही ना काही कारणाने झोप लागत नाही! आज सकाळी मी जागा झालो तेव्हा पक्षोलासारखा उल्हासी आणि ताजातवाना होतो! आज सकाळ किती प्रसन्न होती, लाडके! आमच्या खिडक्या सताड उघडचा होत्या; सूर्य तळपत होता, पक्षी कलकलत होते, हवेत वसंताचा गंध दरवळत होता आणि सारा निसर्ग सजग बनत होता – आणि इतर गोष्टीसुद्धा वसंताच्या मोसमाशी सुसंगत होत्या. आज मी छान छान कल्पनारंजनात खूप वेळ रंगून गेलो आणि माझ्या सगळ्या कल्पना तुमच्याविषयीच्या होत्या, वारेन्का! लोकांना शांतता देण्यासाठी आणि निसर्गाला नटविण्यासाठी निर्माण केलेल्या आकाशातील छोटचा पक्ष्याशी तुमची मी तुलना केली. त्याचवेळी माझ्या मनात विचार आला, वारेन्का, की चिंता आणि काळज्यांनी ग्रस्त बनलेल्या आपल्यासारख्या माणसांनी बिनधास्त आणि निष्पाप अशा आकाशातील पक्ष्यांचा हेवा केला

पाहिजे. इतर कल्पनाही अशाच, अमूर्त आणि प्रसन्न तुलनांच्या. माझ्यापाशी एक पुस्तक आहे, वारेन्का, त्यातही अशाच गोष्टी आहेत, तपशीलवार लिहिलेल्या. मी एवढ्याचसाठी लिहितोय, कारण कल्पना वेगवेगळ्या असतात, लाडके. आता वसंताचा मोसम आहे, त्यामुळे विचारही तसेच उत्तेजक, प्रसन्न, रंगीबेरंगी आणि हळुवार; सगळे गुलाबी रंगात. म्हणूनच मी हे असे लिहितोय. पण खरे सांगायचे तर मी हे सर्व त्या पुस्तकामधून घेतलेय. तेथे लेखक अशाच इच्छा कवितांमधून व्यक्त करतो आणि लिहितो:

का नाही मी पक्षी, हिंस्र पक्षी![3]

इत्यादी, इत्यादी. तेथे आणखीही वेगवेगळे विचार आहेत, पण असो! आज सकाळी तुम्ही कुठे गेला होतात, वार्वारा अलेक्सेयेवना? मी अजून कामावर जायला तयार झालो नव्हतो, तोवर तुम्ही तुमच्या खोलीतून पाखरासारख्या फडफडत बाहेर आलात आणि अंगणामधून उल्हसित मनाने गेलात. तुम्हाला तसे पाहताना मला किती उल्हसित वाटले म्हणून सांगू! आह्, वारेन्का, वारेन्का, तुम्ही खंत करू नका. दुःखाला अश्रूंची मदत होत नाही. मला हे ठाऊक आहे, लाडके, स्वानुभवातून माहीत आहे. तुम्हाला आता मनःशांती लाभलीय आणि तुमची प्रकृतीही थोडी सुधारलीय. तुमची फेदोरा कशी आहे? किती प्रेमळ बाई! वारेन्का, तुम्ही तेथे तिच्यासह कशा राहताय ते मला लिहून कळवा आणि तुम्ही पूर्ण समाधानी आहात का? फेदोरा थोडीशी वाचाळ आहे, पण तुम्ही तिकडे विशेष लक्ष देऊ नका, वारेन्का. देव तिचे भले करो! ती खूप प्रेमळ आहे.

एव्हाना मी तुम्हाला आमच्या थेरेसाबद्दल लिहिलेय—तीसुद्धा प्रेमळ आणि विश्वासू बाई आहे. आपल्या पत्रांबद्दल मी किती अस्वस्थ झालो होतो! आपण पत्रांची देवघेव तर कशी करायची? तेवढ्यात परमेश्वराने आपल्या मदतीसाठी थेरेसा धाडली. ती प्रेमळ, दीन, अबोल बाई आहे. पण आमची घरमालकीण मात्र निष्ठुर आहे. पाठ मोडेपर्यंत ती थेरेसाला राबायला लावते.

कुठल्या गलिच्छ वस्तीत मी येऊन पडलोय, वार्वारा अलेक्सेयेवना! काय हे घर! पूर्वी मी इतक्या निवांत जागी रहात होतो: अगदी शांत, निःस्तब्ध! माशी उडत आली तर तिचा आवाज ऐकू यायचा. पण इथे गोंगाट, आरडाओरडा, गहजब! इथे जागा कशी आहे ते अजून तुम्हाला माहीत नाही. कल्पना करा: पूर्णतया अंधारा आणि अस्वच्छ असा लांबच-

लांब कॉरीडॉर. त्याच्या उजव्या हाताला कोरी भिंत आणि डाव्या हाताला हॉटेलाप्रमाणे दारांची रांग. प्रत्येक खोलीत एक ते तीन माणसे राहतात. अव्यवस्था बेसुमार – अगदी नोव्हाची होडी! पण तरीही माणसे चांगली भासतात, सुशिक्षित, सुसंस्कृत. एक अंमलदार आहे (तो कुठेतरी साहित्याशी संबंधित आहे), माणूस भरपूर वाचन केलेला: होमरविषयी, ब्रामबेऊससंबंधी[4] आणि इतर अनेक लेखकांविषयी बोलतो, सर्व गोष्टींविषयी बोलतो – मोठा बुद्धिमान गृहस्थ! दोन लष्करी अधिकारी राहतात, सतत पत्ते कुटतात. एक नाविक अधिकारी राहतो, इंग्रज शिक्षक राहतो. जरा थांबा, लाडके, माझ्या पुढील पत्रात मी त्यांची उपहासात्मक वर्णने करीन, ते कसे आहेत त्याचे तपशीलवार चित्रण करीन. आमची घरमालकीण – खूप बुटकी आणि अस्वच्छ म्हातारी. आख्खा दिवस गाऊन घालून सपातांमध्ये फिरत असते आणि आख्खा दिवस थेरेसावर ओरडत असते. मी स्वयंपाकघरात राहतो, अथवा त्याहून नेमके सांगायचे तर असे: इथे स्वयंपाकघरापाशी एक खोली आहे (तुम्हाला सांगितले पाहिजे की, आमचे स्वयंपाकघर स्वच्छ, प्रकाशित, खूप छान आहे), खोली फारशी मोठी नाही, छोटासा निवाऱ्याचा कोपरा आहे... किंवा त्याहून चांगले सांगायचे तर स्वयंपाकघर प्रशस्त आहे, त्याला तीन खिडक्या आहेत आणि स्वयंपाकघराच्या एका भागात पार्टीशन घालून राहण्यासाठी जादा खोली बनविण्यात आली आहे. ह्या खोलीत सर्व सोयी आहेत, तिला एक खिडकी आहे – थोडक्यात म्हणजे समाधानकारक आहे. तर असा आहे माझा निवारा. ह्यामागे काही गुप्त अर्थ लपलाय असे मानू नका, लाडके, स्वयंपाकघरात राहतो ह्यात धक्कादायी असे काही नाही! मी पार्टीशनआड राहतो हे खरे, पण त्यात विशेष काही नाही. मला माझे खाजगीपण लाभते, मी शांतपणे आणि एकटा राहतो. स्वतःसाठी मी एक पलंग, टेबल, खणांचे कपाट, दोन खुर्च्या एवढे सामान मांडलेय आणि भिंतीवर एक तसबीर टांगलीय. खरे आहे, माझ्यापेक्षा चांगल्या खोल्या असतील, खूप चांगल्या असतील, पण सोय सर्वांत महत्त्वाची! मी हे सर्व सोयीदाखल केले आहे आणि माझा त्यामागे दुसरा काही हेतू आहे असे तुम्ही मनातसुद्धा आणू नका. तुमची खिडकी माझ्यासमोर, अंगणापलिकडे; आणि अंगण अगदी अरुंद आहे, तुम्ही त्यातून जात असताना मी पाहू शकतो – माझ्यासारख्या दुःखी माणसाला आनंद लाभतो व तोसुद्धा स्वस्तात! आमच्याइथे सर्वांत स्वस्त खोली जेवून-खाऊन पस्तीस रूबल[5] पडते. माझ्या खिशाला परवडणारी

माझी! आणि माझी खोली मला जेवून-खाऊन साडेचोवीस रूबलला पडते. पूर्वी [illegible] देत होतो आणि स्वत:ला अनेक गोष्टी नाकारत होतो. [illegible] पीत नव्हतो, पण आता चहा आणि साखरेलासुद्धा पैसे [illegible] येतात. तुम्हाला माहीत आहे, माझ्या जिवलगा, चहा न पिणे मला शरमिंदेपणाचे वाटते. इथे सगळी माणसे सुस्थित आहेत आणि त्यामुळे शरम वाटते. दुसऱ्यांखातर चहा प्यावा लागतो, वारेन्का, दाखविण्यासाठी, सुसंवाद राखण्यासाठी. माझ्या स्वतःच्या बाबतीत म्हणाल तर मुळीच पर्वा नाही, मी चोखंदळ नाही. आणि आणीबाणीसाठी म्हणून, बुटांसाठी अथवा कपड्यांसाठी, चार पैसे राखून ठेवले, तर मग काय उरणार? ह्यातच माझा सारा पगार संपतो. मी तक्रार करत नाही, तसा मी समाधानी आहे. माझा पगार पुरेसा आहे. गेली कित्येक वर्षे पुरेसे पैसे मी मिळवतोय. बोनससुद्धा मिळतात. अच्छा, माझ्या देवदूता. फरच्या झाडाच्या आणि जेरानियमच्या दोन कुंड्या मी तुमच्यासाठी विकत घेतल्यात. फार महाग नाहीत. कदाचित तुम्हाला पांढरट हिरवी फुले आवडतात? तीसुद्धा मिळतात, तुम्ही मला लिहून कळवा. पण सर्व नीट तपशीलवार लिहा. मात्र मी अशा प्रकारची खोली भाड्याने घेतलीय म्हणून माझ्याबद्दल गैरसमज अथवा शंका मनात आणू नका. असे मी केवळ सोयीखातर केलेय, केवळ सोयच माझ्या मनात आहे. लाडके, तसा मी पैसे साठवतोय, बाजूला काढून ठेवतोय. माझ्याजवळ पैसे वाढताहेत: मी खूप भित्रा आहे आणि माशी नुसत्या पंखाच्या धक्क्याने मला खाली पाडेल, असे वाटून घेऊ नका. लाडके, मी खरोखरीच तसा नाही, माझा स्वभाव जसा असावा तसा खंबीर आहे आणि माझे मन नितळ आहे. अच्छा, माझ्या देवदूता, तुमचा निरोप घेतो! तुम्हाला जेमतेम दोन पाने मी लिहिलीत, पण कामावर जाण्याची वेळ केव्हाच टळून गेलीय. लाडके, तुमच्या बोटांची चुंबने घेतो आणि राहतो.

तुमचा नम्र सेवक व विश्वासू स्नेही

मकार देवूष्कीन.

ता. क. एक विनंती: माझ्या देवदूता, जास्तीत जास्त तपशीलवारपणे मला उत्तर द्या. वारेन्का, मी तुम्हाला पौंडभर टॉफी पाठवतोय. तुम्ही त्यांची मजा लुटा आणि देवाशपथ माझी चिंता करू नका, काही शंका आणू नका. अच्छा, माझ्या प्रिये!

प्रिय महाशय, मकार अलेक्सेयेविच!

अखेर तुमच्याशी मला जोरदार भांडण करावे लागणार हे ठाऊक आहे का? उदार मकार अलेक्सेयेविच, तुम्हाला शपथपूर्वक सांगत्ये की, तुमच्या भेटवस्तू स्वीकारणे मला फार अवघड जातेय. तुम्हाला त्यांची केवढी किंमत मोजावी लागतेय, त्यामुळे तुम्हाला किती त्याग करावे लागताहेत, स्वतःला किती गोष्टी नाकाराव्या लागताहेत, ह्याची मला कल्पना आहे. किती वेळा मी तुम्हाला सांगितलेय की, मला कशाचीही गरज नाही, अगदी मुळीच काही नको! तुम्ही माझ्यावर शिंपण करत असलेल्या उपकारांची फेड करायची माझ्यात ताकद नाही. कशाला मला ह्या कुंड्या? फरची झाडे एकवेळ ठीक, पण जेरानियम आणखी कशाला? चुकून बेसावधपणे तोंडून एखादा शब्द जातो, उदाहरणार्थ ह्या जेरानियमबाबत, तर तुम्ही ताबडतोब विकत घेता! खरे सांगा, महाग आहेत ना? पण फुले फार सुरेख आहेत! छोटे किरमिजी क्रूस. एवढी सुंदर जेरानियम तुम्ही कुठे पैदा केलीत? त्यांना मी खिडकीच्या मध्यभागी ठेवलेय, ठळक दिसतील अशा जागी! फरशीवर एक बाकडे ठेवणार आहे आणि त्या बाकड्यावर आणखी फुले ठेवीन. श्रीमंत व्हायला मला जरा अवसर द्या! फेदोरा त्यांच्याकडे पहायला कंटाळत नाही. आमच्या खोलीत आता स्वर्ग निर्माण झालाय – स्वच्छ, भरपूर उजेड! पण टॉफी कशाला? आणि तुमचे पत्र वाचताच मला तात्काळ उमजले की, तुमच्याकडे तसे काही नाही – म्हणजे स्वर्ग, वसंताचा मोसम, सुगंध दरवळतोय, पक्षी कलकलताहेत. तुमच्याकडे कवितासुद्धा नाहीत काय? खरेच, तुमच्या पत्रात कवितांची तेवढी उणीव जाणवतेय, मकार अलेक्सेयेविच! नाजुक भावना आणि गुलाबी रंगाची स्वप्ने – ते सर्व काही इथे आहे! पडद्याबाबत मी सहेतुक काही केले नव्हते. कदाचित तो आपोआप अडकला असावा मी कुंड्या मांडत होते तेव्हा. समजलं?

आह्, मकार अलेक्सेयेविच! तुम्ही काहीही सांगितलेत अथवा तुमचे सर्व पैसे तुमच्या स्वतःच्या गरजांसाठीच खर्च होतात अशी माझी खात्री पटविण्याचे कितीही प्रयत्न केलेत, तरी तुम्ही माझ्यापासून काहीच लपवू शकणार नाही! माझ्यासाठी तुम्ही तुमच्या किमान गरजासुद्धा नाकारता हे मला दिसतेय. उदाहरणार्थ, अशी खोली भाड्याने घेण्याचा विचार तुमच्या मनात का आला? वस्तुतः तेथे तुम्हाला त्रास देतात, धमक्या घालतात;

तुम्हाला तेथे अडचण होते, गैरसोय होते. तुम्हाला एकांत प्रिय वाटतो, पण [illegible] तुमच्याबाबती काय काय नाही! तुमचा पगार लक्षात घेता तुम्ही याहून खूप चांगल्या जागी राहू शकला असतात! फेदोरा म्हणते की, आजच्यापेक्षा पूर्वी तुम्ही खूप चांगले जगत होतात. खरेच काय तुम्ही सबंध आयुष्य तसे एकाकी, गरजवंत, आनंदहीन, स्नेहाच्या एका शब्दाविना, दुसऱ्यांच्या खोल्या भाड्याने घेऊन जगलात? हाय, भल्या माणसा, तुमची मला फार दया येते! निदान तुमच्या आरोग्याची नीट काळजी घ्या, मकार अलेक्सेयेविच! तुम्ही म्हणताय, तुमचे डोळे क्षीण झालेत, तर मेणबत्त्यांच्या उजेडात लिहू नका; कशाला लिहायचे? नोकरीबाबतची तुमची निष्ठा तुमच्या मालकांना नक्कीच माहीत असेल.

पुन्हा एकदा विनवते, माझ्यासाठी एवढे पैसे खर्च करू नका. तुम्ही माझ्यावर प्रेम करताय हे मला माहीत आहे, पण तुम्ही स्वतः तर श्रीमंत नाही... आज मीसुद्धा उल्हसित मनाने जागी झाले. मला खूप छान वाटत होते. फेदोरा केव्हाची कामाला लागली होती आणि तिने माझ्यासाठीही काम पैदा केलेय. किती खूष झाले मी! रेशमी कापड विकत आणले आणि कामाला बसले. आख्खी सकाळ मन हलके हलके वाटत होते, मी खूप मजेत होते! पण आता परत काळे विचार, दुःख, काळीज जड झालेय.

हाय, माझे काय होणार? माझ्या नशीबात पुढे काय वाढून ठेवलेय? माझी अवस्था अशी अनिश्चित आहे, माझा भविष्यकाळ नाही, माझे पुढे काय होणार ह्याचा मी अंदाज बांधू शकत नाही, ह्याचा अतीव त्रास होतो. पाठीमागे नुसती नजर टाकायचीही भीती वाटते! तेथे एवढे दुःख दाटलेले आहे की, नुसत्या आठवणींनी काळजाची दोन शकले होतील. माझा सर्वनाश करणाऱ्या माणसांविरुद्ध माझ्या जीवनाच्या अखेरीपर्यंत कडवट भावना राहतील!

काळोख दाटायला लागलाय. कामाला बसले पाहिजे. तुम्हाला आणखी खूप लिहायची माझी इच्छा आहे, पण सवडच नाही, काम मुदतीत पूर्ण करून द्यायचे आहे. घाई केली पाहिजे. अर्थात पत्रे लिहिणे छान; त्यामुळे कंटाळवाणे वाटत नाही. पण तुम्ही स्वतः आमच्याकडे कधीही येत का नाही? असे का बरे, मकार अलेक्सेयेविच? वस्तुतः तुम्हाला आम्ही आता अगदी जवळ आहोत आणि कधी कधी तुम्हाला मोकळी सवड सापडेल. कृपया या! मी तुमची थेरेसा पाहिली. ती आजारी दिसते, मला तिची दया आली. मी तिला वीस कोपेक दिले. हो! मी विसरायच्या बेतात

होते, तुमच्या जगण्याच्या तऱ्हेबद्दल सगळे अगदी तपशीलवार लिहून मला कळवा. तुमच्याभोवतालची माणसे कशी आहेत आणि तुम्ही त्यांच्याबरोबर कसे जुळवून घेता? हे सर्व जाणून घ्यायची माझी फार फार इच्छा आहे. बघा, नक्की लिहा! आज मी मुद्दाम पडद्याचा कोपरा बांधून ठेवीन. लौकर झोपा. काल मध्यरात्रीपर्यंत तुमच्या खोलीत मेणबत्ती जळत असल्याचे मी पाहिले. अच्छा! आज मन विषण्ण आहे, उदास वाटतेय, दुःख दाटलेय! दिवसच तसा आहे! अच्छा.

तुमची,

वार्वारा दोब्रोस्योलोवा.

८ एप्रिल

प्रिय बाईसाहेब, वार्वारा अलेक्सेयेवना!

होय, लाडके, होय, माझ्या नशिबी तसा वाईट दिवस वाट्याला आला! होय, माझी म्हाताऱ्याची तुम्ही थट्टा केलीत, वार्वारा अलेक्सेयेवना! वस्तुतः मीच दोषी आहे, सर्वार्थाने अपराधी आहे! टकलावर केसांचा एक पुंजका असलेल्या म्हातारवयात प्रेमाचे चाळे सुचलेत... आणखी सांगतो, प्रियतमे, माणूस कधी कधी विचित्र वागतो, अगदी विचित्र. काय काय बोलेल, कुठपर्यंत त्याची तार तुटेल ह्याचा नेम नाही! त्यातून काय निर्माण होते, पुढे काय निष्पन्न होते? काहीही निष्पन्न होत नाही! उलट असली गदळ-घाण निघते, जिच्यापासून देव आपले रक्षण करो! लाडके, मी रागावलो नाही, पण एकूण आठवण झाली म्हणजे मला खूप खेद वाटतो की, मी तुम्हाला तसले अलंकारिक आणि मूर्ख पत्र लिहिले. आणि नोकरीवर तर आज मी अगदी ऐटीत नाक वर करून गेलो. काळजात प्रकाश उजळला होता. मनात सणाचा आनंद दाटला होता. खूप उल्हास वाटत होता! आरंभी मोठ्या उत्साहाने कागदपत्र हाती घेतले—पण नंतर काय झाले! त्या कागदांवर नजर टाकल्यानंतर परत पूर्वीसारखे वाटू लागले—रटाळ आणि भकास. तेच शाईचे डाग, तीच टेबले, तेच कागद आणि मीसुद्धा तोच नेहमीचा! जसा पूर्वी होतो, अगदी तसाच राहिलेला—तर मग उडत्या घोड्यावरून जायला कारण काय घडले होते? कशापायी असा वगलो होतो? कारण सूर्य माझ्यावर प्रकाशला होता आणि त्याने आकाश निळे बनविले

होते म्हणून? आणि आमच्या आवारात खिडक्यांखाली उकीरड्यांवर जगातली सगळी घाण येऊन पडत असताना हे सुगंध कुठून आले? म्हणजे माझ्या मूर्ख कल्पनेपायी मला हा भास घडला. केवळ अतिउत्साहापायी माणूस स्वत:ला विसरण्याइतपत भरकटत जाऊ शकतो. संध्याकाळी मी घरी चालत आलो नाही, पाय फरफटत आलो. काही ना काही कारणामुळे माझे डोके दुखू लागले होते. गोष्टी एकापाठी एक येतात. (माझी पाठ कदाचित गारठली होती!) वसंताच्या आगमनाने मी हुरळून गेलो होतो आणि मूर्खासारखा फक्त पातळ कोट अंगात घालून कामावर गेलो होतो. माझ्या भावना समजून घेण्यात तुम्ही सपशेल चुकलात, जिवलगा! अगदी विरुद्ध दिशेने तुम्ही त्यांचा अर्थ लावलात. माझे ते पितृवत प्रेम होते, केवळ शुद्ध पित्याचे वात्सल्य, वार्वारा अलेक्सेयेवना! तुमच्या एकाकी पोरकेपणात मी तुमच्या पित्याची जागा घेतलीय. अस्सल नातेवाईकाप्रमाणे मी हे पूर्ण कळकळीने बोलतोय. सरतेशेवटी मी तुमचा दूरचा नातेवाईक आहे हे तर खरे ना? खूप लांबचा नातेवाईक असलो तरी अखेर नातेवाईकच – आणि आता तर तुमचा सर्वांत जवळचा नातेवाईक व रक्षणकर्ता, कारण जिथे तुम्हाला मदत आणि निवारा मिळायला हवा होता, तिथे विश्वासघात आणि अपमान पदरी पडला. कवितांबाबत सांगायचे तर, माझ्या लाडके, ह्या म्हातारवयात कवितांच्या फंदात पडणे मला शोभत नाही. कविता म्हणजे फालतूपणा! कवितांबद्दल मुलांना आजकाल शाळेत ढुंगणांवर फटके मिळतात... समजले, प्रियतमे!

वार्वारा अलेक्सेयेवना, सोयींबद्दल, शांततेबद्दल आणि तत्सम गोष्टींबद्दल तुम्ही मला काय लिहिता आहात? प्राणप्रिये, मी नखरेबाज नाही, माझ्या मागण्या फारशा नाहीत आणि सध्यापेक्षा जास्त चांगले यापूर्वी कधीही जगलो नव्हतो. वृद्धापकाळी एवढे चोखंदळ असायचे कारण काय? मी खाऊनलेऊन सुखी आहे. छानछोकी आम्हाला काय करायच्या? मी काही सरदार कुळातला नव्हे! माझा बाप उमराव घराण्यातला नव्हता आणि माझ्यापेक्षा कमी मिळकतीत कुटुंब चालवत होता. मी लाडावलेला दुबळा नाही! उलट खरे सांगायचे तर माझी जुनी जागा अधिक चांगली होती. तेथे घरच्यासारखे वाटायचे, लाडके. अर्थात सध्याची माझी जागा छान आहे, काही बाबतीत तर उल्हासी आहे, रंगीबेरंगी म्हणायलाही हरकत नाही; मला याविरुद्ध काहीही म्हणायचे नाही, पण तरीही पूर्वीच्या जागेबाबत हळहळ वाटते. आम्ही म्हातारी माणसे, म्हणजे वयस्क माणसे, जुन्या

गोष्टींशी रक्ताच्या नात्याच्या माणसांप्रमाणे जीव जडवून बसतो. खोली तर अगदी छोटी होती. भिंती... काय बोलायचे! भिंतींसारख्या भिंती होत्या, मुद्दा तो नव्हे. पण माझ्या पूर्वीच्या गोष्टींबद्दलच्या आठवणी मला दुःखी करतात... त्या मला कष्टी बनवतात हे फार चमत्कारिक आहे, कारण आठवणी तर सुखद आहेत. एकेकाळी वाईट आणि त्रासदायक वाटणाऱ्या गोष्टीसुद्धा आता चांगल्या आणि प्रिय वाटतात. आम्ही निवांत जगत होतो, वारेन्का. मी आणि माझी म्हातारी घरमालकीण. आता ती जिवंत नाही. आता म्हातारीची आठवण झाली म्हणजे मन दुःखी होते. छान बाई होती आणि माझ्याकडून भाडे फार घेत नव्हती. वेगवेगळ्या कापडांच्या पट्ट्यांपासून वारभर सुयांच्या साह्याने नेहमी ती पलंगपोस विणत असायची. फक्त एवढे एकच काम ती करायची. एकाच मेणबत्तीच्या उजेडात एकाच टेबलाशी बसून आम्ही दोघे काम करीत असू. तिची नात होती माशा. अजून ती लहानपणीची मला आठवते. आता तेरा वर्षांची मुलगी असणार. महावात्रट कारटी होती, खूप आनंदी. आम्हाला सतत हसवायची. असे आम्ही तिघे एकत्र रहात होतो. प्रदीर्घ हिवाळी रात्री गोल टेबलाभोवती बसत असू, चहा पीत असू आणि नंतर आपापल्या कामांना सुरुवात करत असू. माशाला कंटाळा येऊ नये, तिने खोड्या करू नयेत, म्हणून म्हातारी तिला परीकथा सांगू लागायची. काय गोष्टी असायच्या! केवळ लहान मूलच नव्हे, तर शहाणासुरता मोठा माणूसही त्या गोष्टी ऐकताना भान हरपून जायचा. एवढेच काय! खुद्द मीसुद्धा तंबाखू ओढत त्या गोष्टी ऐकण्यात तल्लीन व्हायचा आणि स्वतःचे काम विसरून जायचा. आमची ती खट्याळ मुलगी देहभान हरपायची. स्वतःच्या गुलाबी गालावर हात टेकवून बसायची, सुंदर मुख अर्धवट उघडे ठेवायची आणि जर गोष्ट थोडी भयानक असली तर सारखी आजीच्या अंगाला बिलगायची. तिच्याकडे पहायला आम्हाला खूप आवडायचे. मेणबत्ती जळून संपत आली तरी आमचे तिकडे ध्यान नसायचे, घराबाहेर आवारात घोंघावणाऱ्या वाऱ्याचे आणि उसळणाऱ्या बर्फाच्या वादळाचे आम्हाला भान नसायचे. आम्ही फार छान जगत होतो, वारेन्का. तसे आम्ही जवळ जवळ वीस वर्षे एकत्र राहिलो. आरेच्चा, मी भलताच वाहवत गेलो! असा विषय कदाचित तुम्हाला आवडत नसेल आणि मलाही अशा आठवणी पेलत नाहीत, विशेषतः सध्या! संध्याछाया पसरताहेत. थेरेसा खुडबूडतेय. माझे डोके दुखतेय, पाठही थोडी दुखतेय आणि मनातले विचारही असे विचित्र, जणू तेसुद्धा दुखताहेत. आज मला

फार कष्टी वाटतेय, वारेन्का! तुम्ही हे काय लिहिता, जिवलगा? कसा येऊ मी तुमच्याकडे? माझ्या कबूतरा, लोक काय म्हणतील? अंगण ओलांडून पलीकडे आलो तर प्रश्न विचारू लागतील, कुचाळक्या चालू होतील, चर्चा घडतील, प्रकरणाचा भलताच अर्थ लावतील. नाही, माझ्या देवदूता, त्यापेक्षा तुम्हाला उद्या चर्चमध्ये प्रार्थनेच्या वेळी पाहीन. आपल्या दोघांच्या दृष्टीने ते अधिक शहाणपणाचे आणि इष्ट ठरेल. माझ्या प्राणप्रिये, असे पत्र लिहितोय म्हणून माफ करा. परत वाचल्यावर माझ्या ध्यानात आलेय की, त्यात काही सुसंगतता नाही, वारेन्का, मी एक म्हातारा, अडाणी माणूस! तरुणपणी शिकलो नाही आणि आता डोक्यात काही अक्कल शिरत नाही. नव्याने शिकायला आरंभ करून काही उपयोग नाही. लाडके, मान्य करतो की, लेखनात मी तरबेज नाही आणि कुणी दुसऱ्याने सांगण्याविना अथवा हसण्याविना मला माहीत आहे की, जेव्हा अधिक अलंकारिक रीतीने वर्णने करण्याचा मी प्रयत्न करतो, तेव्हा साक्षात मूर्खासारखा लिहितो. आज तुम्हाला खिडकीपाशी मी पाहिले, पडदा खाली सोडत होतात तेव्हा पाहिले. अच्छा, तुमचा निरोप घेतो, देव तुमचे रक्षण करो! अच्छा, वार्वारा अलेक्सेयेवना.

तुमचा निष्ठावंत मित्र,

मकार देवूष्कीन.

ता. क. माझ्या लाडके, आता कुणाबद्दल उपहासाने लिहिणे मला शक्य नाही. दातांनी चावे घ्यायला मी आता तरुण राहिलो नाही, वार्वारा अलेक्सेयेवना! लोक मला हसतील आणि एक रशियन म्हण त्यांना आठवेल: जो दुसऱ्यासाठी खड्डा खणतो, तो स्वतःच त्यात पडतो!

९ एप्रिल

प्रिय महाशय, मकार अलेक्सेयेविच!

भावनांना आणि लहरींना अशा रीतीने वाट मोकळी करून द्यायला तुम्हाला लाज नाही वाटत, माझ्या मित्रा, उपकारकर्त्या, मकार अलेक्सेयेविच? खरेच मी तुमचा अपमान केला? हाय, मी वारंवार बेसावध राहते, पण माझे शब्द तुमच्या जिव्हारी टोचतील असे वाटले नव्हते. खात्री बाळगा की, तुमच्या वयाबाबत आणि स्वभावाबाबत मी कधीही टवाळी करणार

नाही. माझ्या अविचारीपणापायी तसे घडले, त्याचे कारण मी विलक्षण कंटाळले आहे आणि कंटाळ्यापायी माणसाच्या हातून काय घडत नाही? माझी समजूत झाली की, स्वतःच्या पत्रामधून तुमची स्वतःचीच थट्टा करण्याची इच्छा होती. पण तुम्ही माझ्यावर नाराज झालात असे जेव्हा माझ्या लक्षात आले, तेव्हा माझा जीव कासावीस बनला. माझ्या मित्रा आणि उपकारकर्त्या, मी तुमच्या बाबतीत उदासीन आणि निर्घृण आहे अशी मुळीच शंका घेऊ नका. तुम्ही माझ्यासाठी काय काय केले आहे, दुष्ट माणसांपासून माझे कसे रक्षण केले आहे, त्यांच्या दुष्टपणापासून आणि छळापासून मला कसे वाचविले आहे, ह्याची मला पूर्ण जाणीव आहे. मी कायम तुमच्यासाठी देवापाशी प्रार्थना करीन आणि जर माझी प्रार्थना देवापाशी पोहोचली, तर तुम्ही नक्की सुखी व्हाल.

आज मला अजिबात बरे वाटत नाही. क्षणात मी तापाने फणफणते, तर क्षणात मला थंडीने हुडहुडी भरते. फेदोरा माझ्यापायी खूप काळजीत पडलीय. मकार अलेक्सेयेविच, आमच्याकडे येण्याबाबत तुम्ही निष्कारण लाजता! दुसऱ्यांचा इथे संबंध काय? तुम्ही आमच्या ओळखीचे आहात आणि मामला संपला!.. अच्छा, मकार अलेक्सेयेविच. आणखी लिहिण्यासारखे काही नाही आणि लिहिणे अशक्य झालेय: प्रकृती खूप बिघडलीय. माझ्यावर रागावू नका अशी परत एकदा विनंती करते. तुमच्याबद्दल मला सतत आदर आणि जवळीक वाटते अशी खात्री बाळगा,

तुमची अत्यंत निष्ठावान आणि नम्र दासी,

वार्वारा दोब्रोस्योलोवा.

१२ एप्रिल

प्रिय बाईसाहेब, वार्वारा अलेक्सेयेवना!

हाय, माझ्या लाडके, तुम्हाला काय झालेय? दरवेळी तुम्ही माझी घाबरगुंडी उडवता. प्रत्येक पत्रात मी तुम्हाला लिहितो की, तुम्ही स्वतःला सांभाळा, नीट गरम कपडे घाला, वाईट हवेत बाहेर पडू नका, स्वतःची संपूर्ण काळजी घ्या—पण तुम्ही, माझ्या देवदूता, माझे मुळीच ऐकत नाही. हाय, माझ्या कबूतरा, तुम्ही खरोखरीच लहान मुलाप्रमाणे वागता! तुमची प्रकृती खरे म्हणजे अगदी तोळा-मासा नाजुक आहे. मला हे माहीत आहे. जरासा वारा लागला तर तुम्ही खोकू लागता. तुम्ही काळजी घेतली पाहिजे,

स्वतःची जपणूक केली पाहिजे, धोके टाळले पाहिजेत, तुमच्या मित्रांना दुःख आणि चिंता देण्याचे टाळले पाहिजे.

माझ्या एकूण दैनंदिन जीवनाबद्दल आणि माझ्या भोवतालच्या लोकांबद्दल तपशीलवार जाणून घेण्याची तुमची इच्छा आहे असे तुम्ही कळवता आहात. माझ्या लाडके, अत्यंत आनंदाने मी तुमची इच्छा पूर्ण करतो. प्रियतमे, आरंभापासून सुरुवात करतो : ते ठीक ठरेल. आमच्या घराच्या प्रथमदर्शनी जिना खूप झोकदार आहे. विशेषतः मुख्य जिना : स्वच्छ, भरपूर उजेड, रुंद, कठडे बीडाचे आणि महागनी लाकडाचे. पण चोरजिन्याबाबत विचारू नका : वाकडा, ओलसर, घाणीने माखलेला. पायऱ्या तुटलेल्या, भिंती एवढ्या तेलकट की, त्यांना हाताचा स्पर्श होताच हात चिकटतो. प्रत्येक सपाट जागेवर पेट्या, मोडक्या खुर्च्या आणि कपाटांची दाटी ; कपडे वाळत घातलेले, फुटक्या खिडक्या. टबांमध्ये घाण, कचरा, अंड्यांची टरफले आणि माशांच्या आतडी विपुल. दर्प महाभयानक... थोडक्यात, घाण.

खोल्यांची रचना कशी आहे त्याबद्दल याआधी मी तुम्हाला सांगितलेच आहे. ती रचना सोयीस्कर आहे, पण खोल्या काहीशा कोंदट आहेत. म्हणजे त्यांच्यात वाईट वास येतो असे नव्हे, पण मळमळणारा गोडूस दर्प येतो. पहिल्यांदा मत फारसे चांगले होत नाही, पण पुढे सवय होते. दोन मिनिटे आमच्या जागेत माणूस थांबला की नंतर त्याला स्वतःलाच वास येऊ लागतो, कपड्यांना, हातांना वास येऊ लागतो. मग सवय होते. आमच्याकडे पिवळ्या रंगाचे गाणारे पक्षी पटकन मरतात. आमच्या इथे राहणाऱ्या नौदल अधिकाऱ्याने एव्हाना पाचवा पक्षी विकत आणला. इथल्या हवेत ते पक्षी जिवंतच राहू शकत नाहीत. आमचे स्वयंपाकघर खूप मोठे, प्रशस्त, भरपूर उजेडाचे आहे. पण सकाळी मासे अथवा मांस तळतात तेव्हा जरा आंबूस वास येतो. शिवाय जिकडे तिकडे पाणी सांडलेले असते. पण संध्याकाळी मात्र तेथे स्वर्ग. आमच्या स्वयंपाकघरात दोऱ्यांवर नेहमी जुने कपडे वाळत असतात. माझी खोली स्वयंपाकघराला जोडूनच असल्यामुळे कपड्यांच्या वासाचा मला किंचित त्रास होतो. पण ते असो. इथे काही काळ राहिल्यानंतर सगळ्या गोष्टींची सवय होते.

वारेन्का, भल्या सकाळपासूनच आमच्याकडे हालचाली सुरू होतात : माणसे झोपेतून उठतात, इकडे-तिकडे फिरतात, दारे ठोठावतात. कुणाला नोकरीवर जायचे असते, कुणाला दुसरे काही काम असते. सगळे चहा प्यायला आरंभ करतात. आमच्याकडे बहुतेक समोवार मालकिणीचे आहेत,

ते पुरेसे नाहीत, म्हणून आम्ही त्यांच्यासाठी रांग लावतो. स्वतःची किटली घेऊन रांगेशिवाय कुणी जर पुढे जाऊ लागला, तर बाकीचे लोक ताबडतोब त्याच्यावर तुटून पडतात. पहिल्यांदा मी तसा सापडलो होतो... कशाला वर्णन करायचे! त्यावेळी सगळ्यांशी माझी ओळख झाली. सर्वांत प्रथम नोंदल अधिकाऱ्याशी ओळख झाली. मोकळ्या स्वभावाचा आहे. स्वतः-बद्दलची सर्व हकीकत त्याने मला सांगितली: त्याच्या आई-बापाबद्दल, तूला-मधील एका अंमलदाराशी लग्न झालेल्या बहिणीबद्दल आणि क्रोन्श्ताद शहरा-बद्दल. माझे रक्षण करण्याचे त्याने मला वचन दिले आणि ताबडतोब चहाचे आमंत्रण दिले. ज्या खोलीत सतत पत्ते खेळतात त्या ठिकाणी मी त्याला शोधून काढला. तेथे मला त्यांनी चहा पाजला आणि त्यांच्याबरोबर पत्ते खेळायचा आग्रह केला. माझी ते थट्टा करीत होते अथवा नाही, मला ठाऊक नाही. मात्र सबंध रात्रभर ते पत्ते खेळत होते व मी तेथे गेलो, तेव्हाही खेळत होते. खडूची भुकटी सांडलेली, खोलीत धूर कोंदलेला. डोळे चुर-चुरत होते. मी पत्ते खेळायला नकार दिला, तेव्हा तत्त्वज्ञान पाजळू नको असा त्यांनी मला दम दिला. मग माझ्याशी एकहीजण बोलला नाही. आणि खरे सांगायचे तर मला त्या गोष्टीचा आनंदच झाला. आता मी त्यांच्या-कडे मुळीच जात नाही. ते अट्टल जुगारी आहेत! त्या साहित्यिक खात्या-मधील अंमलदाराकडेसुद्धा संध्याकाळच्या अशा बैठकी झडतात. पण तेथे सगळे काही छान, निष्पाप, नाजुकपणे आणि वरच्या पातळीवर.

वारेन्का, जाता जाता तुम्हाला हेही सांगतो की, आमची मालकीण महादुष्ट बाई आहे, अगदी चेटकीण. तुम्ही थेरेसाला पाहिलेय आणि ती कशी आहे ते तुम्हाला माहीत आहे. अगदी लुकडी, पिसे उपटलेल्या कोंबडी-च्या पिलासारखी. घरात अवघी दोन नोकरमाणसे: थेरेसा आणि फाल्दोनी.[6] कदाचित फाल्दोनीचे खरे नांव दुसरे असेल, मला माहीत नाही. पण सगळे त्याला फाल्दोनी म्हणून हाक मारतात आणि तो ओ देतो. तो तांबडकेशा आहे, चकणा आहे, फेंगडा आहे, आखूड पसरट नाकाचा आहे, उर्मट आहे. थेरेसाशी सतत वाद घालत असतो. त्यांची अगदी मारामारीपर्यंत मजल जाते. एकूण सांगायचे तर इथे राहणे मला फारसे सुखाचे नाही... रात्री एकाच वेळी सारे झोपलेत आणि शांतता नांदतेय असे कधीच घडत नाही. कुठे ना कुठे पत्ते खेळणे चालूच असते आणि कधी कधी अशा काही गोष्टी घडतात, ज्यांचे वर्णन करायला शरम वाटते. आता मला तशी सर्व गोष्टींची सवय झाली आहे, पण अशा गोंधळात कौटुंबिक माणसे कशी राहू

शकतात ह्याचे मला आश्चर्य वाटते. एक आख्खे गरीब कुटुंब आमच्या मालकिणीकडे एक खोली भाड्याने घेऊन राहते आहे. मात्र इतर खोल्यांशेजारी नव्हे. त्यांची खोली दुसऱ्या बाजूला, एका कोपऱ्यात, वेगळी आहे. माणसे शांत आहेत! त्यांचा कसलाही आवाज कधी ऐकू येत नाही. एका खोलीत पार्टीशन घालून ती राहतात. माणसाचे आडनाव गोश्कोंव. तो बेकार कारकून आहे. सात वर्षांपूर्वी कसल्यातरी कारणापायी त्याची नोकरी गेली. डोक्यावरचे केस पांढरे, बुटका; कपडे एवढे घाणेरडे आणि फाटके, त्यांच्याकडे बघितले तर मनाला वेदना होतात. माझ्या कोटापेक्षा वाईट! केविलवाणा, लुकडा माणूस! (कधी कधी कॉरीडॉरमध्ये आमची भेट घडते); त्याचे गुडघे थरथरत असतात, हात कापतात, डोके लटलटते. त्याला असे कसल्या आजारापायी झालेय अथवा नाही, देव जाणे! तो घाबरट आहे. सर्वांना भितो, दुरून चालतो. काहीवेळा मीही बुजरा वाटतो, पण तो माझ्यापेक्षाही वाईट! त्याच्या कुटुंबात बायको आणि तीन मुले. थोरला मुलगा हुबेहूब बापासारखा. खिमडा. बायको एकेकाळी सुंदर असावी — आतासुद्धा ध्यानात येते. फाटक्या लक्तरांमध्ये वावरते. मी ऐकले की, त्यांचे भाडे बरेच थकलेय. घरमालकीण त्यांच्याशी फटकून वागते. असेही ऐकले की, खुद्द गोश्कोंव कसल्यातरी लफड्यात अडकला आणि त्यातच त्याची नोकरी गेली. त्याच्यावर काहीतरी आरोप आला, अथवा खटला भरला, किंवा त्याची चौकशी चाललीय — नक्की काय ते मी तुम्हाला सांगू शकत नाही. पण अठरा विश्वे दारिद्र्य नांदतेय त्यांच्या घरात! नेहमी त्यांच्या खोलीत शांतता. जणू तेथे कुणी रहातच नाही! मुलांचासुद्धा आवाज नाही. कधी धावताना, खेळताना मी पाहिले नाही. वाईट चिन्ह! एका संध्याकाळी त्यांच्या दाराजवळून जाण्याचा प्रसंग आला: घरात विलक्षण शांतता होती. एक हुंदका मी ऐकला, मग अस्पष्ट उद्गार आणि परत हुंदका. कुणीतरी केविलवाणे रडत होते. माझे काळीज पिळवटले. नंतर सबंध रात्रभर त्या दरिद्री कुटुंबाबद्दलचे विचार मला छळत राहिले आणि झोपेचे खोबरे झाले.

अच्छा, माझ्या अमूल्य मित्रा, वारेन्का! जसे जमले तसे वर्णन मी केले आहे. आज सबंध दिवस सतत फक्त तुमचाच विचार करतोय. माझ्या जिवलगा, तुमच्यापायी माझे काळीज पिळवटतेय. माझ्या लाडके, मला माहीत आहे, तुम्हाला गरम कोटाची गरज आहे. ह्या पीटरबुर्गमधले वासंतिक वारेपाऊस आणि हिमवर्षाव! ह्या गोष्टी म्हणजे माझा साक्षात मृत्यू वारेन्का! अशा हवेपासून देव माझे रक्षण करो! माझ्या अशा लिहिण्याबद्दल

माझ्यावर राग धरू नका. मला मुळीच शैली नाही. काहीतरी असायला हवी होती! मनात येते त्याप्रमाणे लिहितो, तुम्हाला थोडे उल्हसित करावे एवढ्याच हेतूने. जर मला चांगले शिक्षण मिळाले असते, तर गोष्ट वेगळी घडली असती. पण कसले माझे शिक्षण? तांब्याच्या नाण्याच्या मोलाचे नाही!

तुमचा सततचा आणि विश्वासू स्नेही,

मकार देवूष्कीन.

२५ एप्रिल

प्रिय महाशय, मकार अलेक्सेयेविच!

आज माझ्या मावसबहिणीची, साशाची, भेट घडली! भयानक! त्या बिचारीचा सर्वनाश होणार! माझ्या कानांवर असेही आले की, आन्ना फ्योदरोवना माझी चौकशी करत होती. असे भासते की, ती माझा पाठलाग कधीही सोडणार नाही. ती म्हणे **मला क्षमा करू** इच्छिते, पूर्वीचे सगळे विसरून जाऊ म्हणते आणि माझी भेट घेण्याचा तिचा इरादा आहे. तिचे म्हणणे आहे की, तुम्ही माझे मुळीच नातेवाईक नाहीत, तीच माझी सर्वांत जवळची नातेवाईक आहे, आमच्या कौटुंबिक भानगडींमध्ये ढवळाढवळ करण्याचा तुम्हाला काही अधिकार नाही आणि तुमच्या मदतीवर व आधारावर जगण्याची मला शरम वाटायला पाहिजे. ती माझ्यावर कृतघ्नपणाचा आरोप करतेय... म्हणते, मी तिची मीठ-भाकरी विसरले, मला आणि माझ्या आईला म्हणे तिने उपाशी मरण्यापासून वाचविले, अडीच वर्षे तिने आम्हाला खाऊ-पिऊ घातले, एवढेच नव्हे तर आमची कर्जे तिने माफ केली. माझ्या आईलाही तिने सोडले नाही! त्यांनी माझी काय दैना केली हे बिचाऱ्या आईला समजले असते तर! देव पाहतोय!.. आन्ना फ्योदरोवना म्हणते की, माझ्या मूर्खपणापायी मी स्वतःचे सुख हरवून बसले. देवा रे, कोण अपराधी! ती म्हणते की, श्रीयुत बीकोव यांचे अगदी योग्य वागणे आहे की, अशा बाईबरोबर ते लग्न करत नाहीत... काय लिहू! असे असत्य ऐकायला विलक्षण त्रास होतो, मकार अलेक्सेयेविच! कसे वागावे मला समजत नाही. माझा थरकाप उडतोय, मी रडतेय, विव्हळतेय. हे पत्र तुम्हाला लिहायला मला दोन तास लागले. मला वाटले होते, अखेरीस तिने माझ्या बाबतीत केलेल्या अपराधाची तिला जाणीव होईल. पण आता

ती अशी वागतेय! देवाशपथ, माझ्या मित्रा, एकमेव उपकारकर्त्या, चिंता करू नका! फेदोरा नेहमी अतिशयोक्ती करते. मी आजारी नाही. काल थोडी थंडी बाधली, वोल्कोवाला मेरी मातेच्या प्रार्थनेसाठी गेले होते तेव्हा. तुम्ही माझ्याबरोबर का नाही आलात? मी तुमची किती मनधरणी केली. हाय, गरीब बिच्चारी माझी आई! जर ती थडग्यातून उठली, माझी त्यांनी काय दैना केलीय हे जर तिला समजले, हे जर तिने पाहिले!..

वा. दो.

२० मे

माझ्या कबूतरा, वारेन्का!

थोडी द्राक्षे पाठवतोय, माझ्या प्राणा! प्रकृती सुधारायला उपयोगी पडतात म्हणे. तहान लागू नये म्हणून डॉक्टर त्यांची शिफारस करतात, म्हणून केवळ तहानेवरच्या उपायासाठी पाठवतोय. काल तुम्हाला गोडे पाव खायची इच्छा झाली होती, तेव्हा आज ते पाठवतोय. तुम्हाला नीट भूक लागते का, माझ्या प्राणा? ते सर्वांत महत्त्वाचे आहे. देवाची कृपा, सर्व काही पार पडले आणि आपले दुर्भाग्यसुद्धा नष्ट होत आले आहे. वरच्याचे आभार मानू! पुस्तके मात्र अद्याप मी प्राप्त करू शकलो नाही. असे म्हणतात, एक फार छान पुस्तक आहे व अत्यंत सुरेख भाषेत लिहिलेले आहे. उत्तम आहे म्हणे, मी स्वतः वाचले नाही, पण सगळे वाखाणणी करतात. मी त्याची मागणी केली आहे; उसने देण्याची आश्वासने दिलीत. तुम्ही वाचणार का? ह्या बाबतीत तुम्ही अतिचोखंदळ आहात. तुमची आवड समजून घेणे अवघड आहे. माझ्या कबूतरा, एव्हाना मी तुम्हाला ओळखलेय. बहुधा तुम्हाला काव्यात्मक, उसासे-सुस्कारे यांनी भरलेले, प्रेमाने ओथंबलेले साहित्य आवडते. कविता तुम्हाला मिळवून देतो, सारे काही मिळवून देतो. उतरवून काढलेल्या कवितांची एक आख्खी वही आहे.

माझे आयुष्य छान चालले आहे. लाडके, कृपया तुम्ही माझी चिंता करू नका. फेदोराने माझ्याबाबत तुम्हाला सांगितलेल्या सगळ्या गोष्टी खोट्या आहेत. तुम्ही तिला सांगा, ती थापाडी आहे. न चुकता सांगा. चहाडखोर!.. मी नवा गणवेष मुळीच विकला नाही. कशाला विकू? तुम्हीच सांगा, कशाला विकू? मला म्हणे चाळीस चांदीचे रूबल बोनस

म्हणून मिळणार आहेत. तर मग कशाला विकू? तुम्ही मुळीच चिंता करू नका. ती फेदोरा अगदी मनस्वी आहे. माझ्या कबूतरा, आपले चांगले दिवस येत आहेत. तुम्ही लौकर बऱ्या व्हा, माझ्या देवदूता. देवाखातर बऱ्या व्हा, म्हाताऱ्याला खिन्न करू नका. मी खंगलोय असे तुम्हाला कोण सांगतो? खोटे, धादांत खोटे! एवढा ठणठणीत आहे आणि असा फुगलोय, की स्वतःची स्वतःलाच लाज वाटतेय. तृप्त जगतोय. तुम्ही मात्र लौकर बऱ्या व्हा! अच्छा, माझ्या देवदूता; तुमच्या सर्व बोटांचे चुंबन घेतो.

तुमचा सदैव विश्वासू मित्र,

मकार देवूष्कीन.

ता. क. हाय, माझ्या प्राणा, हे काय परत तुम्ही मला लिहू लागलात?.. हा काय लहरीपणा! असा वारंवार कसा येऊ मी तुमच्याकडे? सांगा तुम्हीच. रात्रीच्या अंधारात सरपटत येऊ? आता तर रात्रीच होत नाहीत: हा काळच असला. माझ्या देवदूता, तुम्ही आजारी होतात आणि तुमचे मन भरकटत होते, तेव्हा क्षणभरही तुमच्यापासून दूर जात नव्हतो. ते कसे काय मी निभवले, माझे मलाच ठाऊक नाही. पण नंतर मात्र येण्याचे बंद केले, कारण लोक कुतूहल दाखवू लागले, नसत्या चौकशा करू लागले. इथे तर निष्कारण गावगप्पा उठल्यात. मी थेरेसावर भरवसा ठेवून आहे, ती कुचाळखोर नाही. पण लाडके, जर लोकांना आपल्याबाबत समजले, तर केवढा गदारोळ माजेल? त्यांना काय वाटेल आणि ते काय म्हणतील? तेव्हा तुम्ही मन घट्ट करा आणि प्रकृती बरी होईपर्यंत धीर धरा. मग आपण घराबाहेर कुठेतरी संकेतभेट ठरवू.

१ जून

आदरणीय मकार अलेक्सेयेविच!

माझ्याबद्दल तुम्ही केलेल्या सर्व खटपटींबद्दल, धडपडींबद्दल आणि तुम्हाला माझ्याविषयी वाटणाऱ्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, तुम्हाला प्रिय वाटेल असे काहीतरी करण्याची माझी फार इच्छा आहे. अखेरीस माझे कपाट धुंडाळल्यानंतर मला माझी जुनी वही मिळाली व ती तुमच्यापाशी मी पाठवतेय. तिचे लेखन मी माझ्या आयुष्याच्या सुखी काळात सुरू केले होते! माझ्या पूर्वजीवनाबद्दल, माझ्या आईबद्दल, पक्रोवस्कीबद्दल, आन्ना फ्योदरोवनाबरोबरच्या माझ्या आयुष्याबद्दल आणि सरतेशेवटी, अलीकडील काळातील माझ्या दुर्भाग्यांबद्दल तुम्ही सतत कुतूहलाने मला प्रश्न वि-

चारत होतात. ही वही वाचायला तुम्ही अगदी अधीर झाला होतात. तिच्यात मी सवड होईल तेव्हा माझ्या पूर्वजीवनातील वेगवेगळ्या क्षणांची टिपणे करून ठेवलीत, का केली ते देवच जाणे! मला खात्री आहे की, मी पाठवलेल्या ह्या पार्सलामुळे तुम्हाला खूप आनंद लाभेल. पण ही वही परत वाचताना माझे मन मात्र विषण्ण झाले. मला भास होतोय की, ह्या वहीतील शेवटचे वाक्य लिहिल्यानंतर माझे वय दुपटीने वाढलेय. वेगवेगळ्या काळात हे लेखन घडलेय. अच्छा, मकार अलेक्सेयेविच! आता मला फार भयंकर उदास वाटतेय आणि निद्रानाशाचा विकार मला वारंवार छळतो. आजारातून बरे होणे कंटाळवाणे आहे!

वा. दो.

१

माझे वडील जेव्हा वारले, तेव्हा मी अवघी चौदा वर्षांची होते. बालपण हा माझ्या जीवनातील सर्वांत सुखाचा काळ. त्या बालपणाचा आरंभ इथे नव्हे, तर इथून खूप दूर, प्रांतिक गावापासून आतमधील खेड्यात झाला. माझे वडील प्रिन्स प. ह्यांच्या त. प्रांतामधील प्रचंड इस्टेटीचे कारभारी होते. प्रिन्स ह्यांच्या एका खेड्यात आम्ही शांतपणे, सुखाने रहात होतो... मी लहान असताना कमालीची चळवळी होते. कधी मैदानात धावत असायची, तर कधी राईत, तर कधी बागेत. माझी खास काळजी कुणीही घेत नव्हते. बाबा अखंड कामात गुंतलेले असत. आई घरकामात गढलेली असायची. मला शिकवायला कुणीच नव्हते आणि म्हणून मी खूष होते. भल्या सकाळीच मी तळ्यावर धावायची, अथवा राईत जायची, किंवा गवतकापणीच्या स्थळी वा पीककापणी करणाऱ्यांपाशी जायची. सूर्य तळपत असला तरी त्याची मला पर्वा नसायची, घरापासून दूर भटकताना मनात चिंता नसायची; झाडाझुडूपांमध्ये हाता-पायांना ओरखडे निघाले अथवा कपडे फाटले तर फिकीर नसायची. भटकंतीनंतर घरी खरडपट्टी निघायची, पण मला त्याचे विशेष काही वाटत नसे.

मला वाटते की, जर त्याच खेड्यात, एकाच जागी सबंध आयुष्य काढावे लागले असते, तर कदाचित मी सुखी झाले असते. पण अद्याप बालवय असतानाच मला जन्मगाव सोडावे लागले. मला बारावे वर्ष चालू असतानाच आम्ही पीटरबुर्गला आलो. आमच्या त्या प्रवासाच्या दुःखद आठवणी मला विषण्ण करतात! मला प्रिय असलेल्या सर्व गोष्टींचा निरोप

घेताना मी किती धाय मोकलून रडले! मला आठवते, माझ्या बाबांच्या गळ्याला मी मिठी घातली होती आणि खेड्यात आणखी थोडा काळ तरी राहू अशी आसूभरल्या डोळ्यांनी त्यांनी विनवणी केली होती. बाबा माझ्यावर खेकसले, आई रडली. खेडे सोडून जाणे भाग होते असे मला सांगण्यात आले. म्हातारे प्रिन्स प. वारले होते. त्यांच्या वारसांनी माझ्या बाबांना नोकरीवरून काढून टाकले होते. बाबांनी पीटरबुर्गमध्ये काही लोकांपाशी खाजगीरीत्या पैसे गुंतविले होते. स्वतःची परिस्थिती सावरण्यासाठी खुद्द पीटरबुर्गमध्ये राहणे इष्ट ठरेल असा त्यांनी विचार केला. ही सर्व हकीकत मला पुढे आईकडून समजली. आम्ही इथे पीटरबुर्गच्या विभागात स्थायिक झालो आणि वडिलांच्या मृत्यूपर्यंत तेथेच राहिलो.

नव्या आयुष्याशी जुळवून घेणे मला खूप जड गेले. आम्ही शरदात पीटरबुर्गला आलो. जेव्हा आम्ही खेडे सोडले, तेव्हा सूर्य छान झळाळत होता. शेतीची कामे एव्हाना संपली होती. खळ्यांवर गव्हाच्या राशी रचलेल्या होत्या आणि पक्ष्यांचे थवे त्यांच्यावर कलकलत होते. सारे काही झकास, मजेचे वातावरण होते. पण इथे शहरात आम्ही प्रवेश केला, तेव्हा पाऊस कोसळत होता, शारदीय बर्फ-चिखलाचा राडा होता, हवा वाईट होती. अनोळखी, नव्या, आदरातिथ्य नसलेल्या, दुर्मुखलेल्या, चिडलेल्या लोकांची गर्दी! आम्ही कशीबशी आमची घडी बसविली. मला आठवते, नवे घर लावताना आम्ही सगळे खूप धांदल-धावपळ करीत होतो. बाबा घरात जवळजवळ नसत आणि आईला क्षणाची उसंत नव्हती. माझे अस्तित्व पूर्ण विसरण्यात आले होते. आमच्या स्थलांतरानंतरच्या पहिल्या रात्रीनंतरची सकाळ फार विषण्ण होती. आमच्या खिडक्या कुठल्यातरी पिवळ्या कुंपणाच्या दिशेला होत्या. रस्त्यावर सतत चिखल होता. माणसांची वर्दळ तुरळक होती आणि थंडी वाजत असल्यामुळे सगळे कोटांमध्ये गुरफटून जात होते.

सबंध दिवसभर आमचे घर कमालीचे भयाण व उदास असायचे. आमचे नातेवाईक अगर निकट परिचयाचे लोक विशेष कुणी नव्हतेच. आन्ना फ्योदरोवनाशी बाबांचे भांडण होते. (ते तिला काही देणे होते.) कामानिमित्त काही माणसे आमच्याकडे वारंवार येत असत. ती नेहमी वाद घालत, गोंगाट करत, ओरडत. अशा प्रत्येक भेटीनंतर बाबा कमालीचे नाराज बनत, संतापत. कपाळाला आठ्या घालून तास-तासभर ह्या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत खोलीत येरझाऱ्या घालत. कुणाशी अक्षराने न बोलता मुकाट रहात. अशा वेळी त्यांच्याशी बोलण्याचा आईला धीर होत नसे.

मी हाती पुस्तक धरून एका कोपऱ्यात बसून रहायची – अगदी चिडीचूप. किंचितसुद्धा हालचाल करायला घाबरायची.

पीटरबुर्गमध्ये आमचे आगमन झाल्यापासून तीन महिन्यांनंतर माझी वसतीगृहाच्या शाळेत पाठवणी करण्यात आली. परक्या माणसांमध्ये प्रथम मला खिन्न वाटायचे. अगदी कोरडे, अप्रिय वातावरण होते. गव्हर्नेस वसा-वसा खेकसायच्या, मुली माझी टवाळी करायच्या आणि मी तशी जंगली. फार कडक आणि निष्ठुर वातावरण! प्रत्येक गोष्टीसाठी ठराविक वेळ नेमून दिलेली, जेवण सामुदायिक, कंटाळवाणे मास्तर – आरंभी ह्या सर्व गोष्टींनी मला छळले. मला तेथे झोप येईना. सबंध रात्रभर रडायची. प्रदीर्घ, कंटाळवाण्या, थंडगार रात्री. संध्याकाळच्या वेळांना सगळेजण घोकं-पट्टी करत अथवा गृहपाठ करत. मी क्रियापद-विशेषणांशी झटापट करत बसायची, किंचित हालचाल करायला घाबरायची, डोक्यात घराविषयी, आई-बाबांविषयी, माझ्या म्हाताऱ्या दाईविषयी, त्या दाईने सांगितलेल्या परीकथांविषयी विचार घोळत असायचे... हाय, किती किती दुःख व्हायचे! घरातील अत्यंत क्षुल्लक गोष्टीची आठवणसुद्धा आनंदित करायची. सतत विचार यायचा: आता घरी असते तर किती मजा आली असती! आमच्या छोट्याशा खोलीत मी बसले असते घरच्यांबरोबर समोवारपाशी. सर्व परि-चित उबदार वातावरण. आईला घट्ट घट्ट मिठी मारली असती. असे विचार करत दुःखापायी चोरून मुळूमुळू रडायची आणि अभ्यास विसरून जायची. उद्याचा गृहपाठ केलेला नसला म्हणजे सबंध रात्र मास्तर, हेडमास्तरीणबाई आणि मुली स्वप्नात दिसत. सबंध रात्रभर धडे स्वप्नात घोकायची, पण दुसऱ्या दिवशी मात्र परत कोरी पाटी. शिक्षा म्हणून गुडघ्यांवर उभे करत आणि एकच वेळ जेवण मिळे. मी अगदी दुर्मुखली, उदास बनले होते. आरंभी सगळ्या मुली मला हसत, मला चिडवत. वर्गात मास्तरांच्या प्रश्नांना उत्तर देत असताना मला अडथळे आणत, जेवणाला अगर चहाला जात असताना मला चिमटे काढत, काही कारण नसताना गव्हर्नेसकडे माझ्या-विरुद्ध तक्रारी करत. पण शनिवारी संध्याकाळी दाई यायची तेव्हा मला स्वर्ग वाटायचा. अत्यानंदाने मी म्हातारीला मिठी घालायची. ती मला व्यवस्थित कपडे घालायची, गरम कोट पांघरायची आणि आम्ही निघायच्या माझ्या चालण्याच्या गतीशी जुळवून घेणे तिला अवघड व्हायचे. आणि माझी अखंड बडबड चालू असायची. घरात प्रवेश करताना मी खूप खुषीत, आनंदात असायची, जणू दहा वर्षांच्या अवधीनंतर भेट व्हावी अशा तऱ्हेने

घरच्यांना घट्ट मिठ्या मारायची. मग धांदल, वटवट, गोष्टी सांगणे वगैरे सुरू व्हायचे. मी सगळ्यांना नमस्कार करायची, हसायची, बागडायची, धावायची, उड्या मारायची. वडिलांबरोबर गंभीर विषयांवर चर्चा सुरू व्हायच्या: शास्त्रांबद्दल, आमच्या शिक्षकांबद्दल, फ्रेंच भाषेबद्दल, लोमोन्दच्या[7] व्याकरणाबद्दल. आम्ही सगळे खूप उल्हसित, खूप समाधानी बनत असू. ह्या क्षणांच्या आठवणी करताना आतासुद्धा मला खूप उल्हास वाटतो. माझ्या वडिलांखातर मी कसून अभ्यास करायचा प्रयत्न करीत होते. मी पहात होते की, त्यांच्याजवळचा अखेरचा कोपेक ते माझ्यासाठी खर्च करीत होते. स्वतःचा खर्च ते कसा भागवीत होते हे देवच जाणे! दर दिवसागणिक ते अधिकाधिक दुर्मुख, असमाधानी, संतापी बनत होते. त्यांचा स्वभाव पूर्ण बिघडून गेला होता. त्यांच्या कामांमध्ये त्यांना यश येत नव्हते आणि कर्जांमध्ये ते जास्त जास्त बुडत चालले होते. वडिलांचा संताप वाढू नये म्हणून त्यांच्यासमोर डोळ्यातून पाणी काढायला, अगर एखादा शब्द उच्चारण्याससुद्धा आई घाबरायची. ती आजारी असायची. तिची प्रकृती खंगत चालली आणि तिला खोकल्याचा भयानक विकार जडला. मी वसतीगृहातून घरी यायची, तर सर्वांचे चेहरे दुःखी-कष्टी. आई गुपचूप रडतेय आणि बाबा सारखे संतापताहेत. आरोप-प्रत्यारोप सुरू व्हायचे. बाबा म्हणू लागायचे की, मी त्यांना कोणताही आनंद देत नव्हते, त्यांचे कोणतेही सांत्वन करीत नव्हते. माझ्यासाठी ते शेवटचा कोपेक खर्चत होते, पण माझ्या तोंडून अद्यापपर्यंत एक फ्रेंच शब्द नीट उच्चारला जात नव्हता. थोडक्यात म्हणजे सर्व अपयशांचे, सर्व दुर्भाग्यांचे खापर माझ्या व आईच्या माथी फोडण्यात येत होते. बिचाऱ्या आईचा छळ त्यांना कसा करवायचा? तिच्याकडे पाहताना काळीज पिळवटून निघायचे. तिची गालफडे बसली, डोळे खोल गेले आणि चेहऱ्यावर क्षयी कांती दिसू लागली. माझ्या वाट्याला सर्वात अधिक वाईट भाग यायचा. नेहमी सुरुवात क्षुल्लक गोष्टीतून व्हायची, पण अखेर मात्र कशी व्हायची ते देवच जाणे! एकूण कशापायी तो गोंधळ चाललाय हेच मला अनेकदा समजत नसे. हरतऱ्हेच्या उणीवा मला दाखवून देण्यात येत: माझे फ्रेंच भाषेचे ज्ञान भिकार होते, मी अतिमूर्ख होते, आमच्या वसतीगृहाच्या मुख्य बाई कामात दुर्लक्ष करीत होत्या आणि मूर्ख होत्या; आमच्या नैतिक शिक्षणाची काळजी घेत नव्हत्या; माझ्या वडिलांना अजूनपर्यंत नोकरी न मिळण्याला मीच कारणीभूत होते; लोमोन्दचे व्याकरण सर्वात भुक्कड होते आणि झापोल्स्कीचे[8] व्याकरण त्याहून कितीतरी पटींनी

चांगले होते ; माझ्यावर निष्कारण खूप पैसे खर्च करण्यात आले होते ; मी निर्विकार, दगडाच्या अंत:करणाची होते — थोडक्यात म्हणजे, माझ्या क्रियापद — विशेषणांबरोबर मी कितीही झटापट केली, तरी सर्व गोष्टींना मीच दोषी होते, मीच जबाबदार होते! आणि बाबांचे माझ्यावर प्रेम नव्हते म्हणून असे घडत नव्हते. उलट माझ्यावर आणि आईवर त्यांची अपार माया होती. केवळ त्यांचा स्वभावच तसा बनला होता.

चिंता, दु:ख, अपयश ह्यांनी बिचाऱ्या बाबांना अतिरेकी टोकापर्यंत छळले. ते संशयी, तापट बनले. वारंवार निराश होऊ लागले. त्यांचे स्वत:च्या प्रकृतीकडे दुर्लक्ष होऊ लागले. एकदा त्यांना थंडी बाधली आणि अगदी थोडचा आजारपणानंतर एवढचा अचानकपणे ते वारले, की काही दिवसपर्यंत आम्ही मूढ बनलो होतो व ते मरण पावले होते, ह्यावर आमचा विश्वासच बसत नव्हता. आई अर्धवट बेशुद्ध पडली होती आणि तिला बुद्धीभ्रम होतो की काय, अशी मला चिंता लागली होती. बाबांच्या मृत्यूनंतर चारही दिशांनी त्यांच्या सावकारांचा आमच्यामागे ससेमीरा लागला. आमच्यापाशी होते-नव्हते तेवढे सारे आम्ही देऊन टाकले. आम्ही पीटरबुर्गमध्ये आल्यानंतर अवघ्या अर्ध्या वर्षाच्या काळात बाबांनी विकत घेतलेले पीटरबुर्ग प्रदेशातील आमचे घरही आम्ही फुंकले. बाकीची कर्जे कशी निस्तरली मला माहीत नाही, पण आम्ही मात्र निवाऱ्याला वंचित झालो, कंगाल बनलो. आईला भयानक आजार जडला होता. आम्ही आमचा उदरनिर्वाह करू शकत नव्हतो, जगण्यासाठी आमच्यापाशी काहीही नव्हते, समोर सर्वनाश उभा होता. तेव्हा मला अवघी चौदा वर्षे पूर्ण झाली होती. तेव्हा आन्ना फ्योदरोवना प्रथम आमच्याकडे आली. ती आम्हाला म्हणाली की, ती कुठलीतरी जमीनदारीण आहे आणि आमची नातेवाईक आहे. आईही म्हणाली की, ती नातेवाईक आहे, पण खूप दूरची. बाबा जिवंत असेपर्यंत ती आमच्याकडे एकदाही आली नव्हती. आमच्याकडे ती अश्रुभरल्या डोळयांनी आली, आमच्या दु:खात सहभागी आहे असे म्हणाली. आमच्या हानीबद्दल, आमच्या दरिद्री परिस्थितीबद्दल तिने सहानुभूती व्यक्त केली, पण पुढे असेही म्हणाली की, माझे बाबाच ह्या सर्व गोष्टींना कारणीभूत होते; स्वत:च्या ऐपतीबाहेर ते जगत होते, त्यांची हाव फार मोठी होती आणि स्वत:च्या कुवतीवर त्यांचा फाजील विश्वास होता. आमच्याशी स्नेह राखण्याची इच्छा तिने व्यक्त केली, पूर्वीचा अप्रियपणा विसरून जा असे म्हणाली आणि तिच्याबद्दल आपल्या मनात कधी वैरभावना नव्हती असे आईने सांगितले, तेव्हा रडली.

मग ती आईला घेऊन चर्चमध्ये गेली आणि लाडक्यासाठी (बाबांना ती ह्या नावाने संबोधत होती) तिने खास प्रार्थना घडवून आणली. ह्यानंतर तिने आईशी समझोत्याचा शानदार सोहळा केला.

मग आमच्या भिकार परिस्थितीबद्दल, आमच्या विलक्षण एकाकीपणा-बद्दल, अगतिकतेबद्दल, असहायतेबद्दल, निराशाजनक भवितव्याबद्दल लांबल-चक व्याख्यान ठोकल्यानंतर, तिच्या भाषेत सांगायचे म्हणजे तिने आम्हाला तिच्या निवाऱ्याला जाण्याचे निमंत्रण दिले. आईने तिचे आभार मानले, पण बराच वेळपर्यंत तिचा निश्चय होत नव्हता. पण दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध नव्हता आणि आम्ही काही करणेही शक्य नव्हते ह्याची जाणीव झाल्यावर, अखेरीस तिने आन्ना फ्योदरोवनाचे निमंत्रण कृतज्ञतापूर्वक स्वी-कारले. पीटरबुर्ग प्रदेशातून वासील्येवस्की बेटावर आम्ही मुक्काम हल-विला ती सकाळ माझ्या पूर्ण स्मरणात आहे. ती स्वच्छ, कोरडी, चुरचुरीत थंडीची शारदीय सकाळ होती. आई रडत होती, मी खूप कष्टी झाले होते. कसल्यातरी अंधुक, भयावह अपशकुनांच्या भीतींनी ऊर दाटला होता... तो काळ फार खडतर होता.

२

आरंभी, जोवर आमच्या नव्या निवाऱ्याची आम्हाला सवय झाली नव्हती, तोवर मला आणि आईला अशा दोघींनाही काहीतरी विचित्र, भीतीची भावना भेडसावीत होती. आन्ना फ्योदरोवनाचे सहाव्या आळीत स्वत:चे घर होते. घरात पाच खोल्या होत्या. पैकी तीन खोल्यांमध्ये आन्ना फ्योदरोवना आणि माझी मावसबहीण साशा रहात होत्या. साशा पोरकी होती व आन्ना फ्योदरोवनाने तिचा प्रतिपाळ केला होता. एका खोलीत मी आणि आई राहू लागलो व आमच्याशेजारील शेवटच्या खोलीत पक्रोवस्की नांवाचा एक गरीब विद्यार्थी आन्ना फ्योदरोवनाचा भाडेकरू म्हणून रहात होता. आन्ना फ्योदरोवना प्रथमदर्शनी भासली होती त्यापेक्षा खूपच अधिक चांगले, ऐषआरामी आयुष्य जगत होती. पण तिच्या उत्पन्नाचा उगम मात्र गूढ होता. त्याचप्रमाणे तिचा उद्योग. ती सतत धांदलीत असायची, नेहमी चिंतांमध्ये गढलेली असायची, दिवसभरात अनेकदा घरामधून बाहेर जायची. पण ती नेमके काय करीत होती, कसल्या आणि कुणाबद्दल चिंता करीत होती, त्याबद्दल मात्र मी कोणताही तर्क करू शकले नाही. तिच्या ओळ-खीची अनेक आणि विविध माणसे होती. तिच्याकडे सतत माणसे येत,

ती कसल्या प्रकारची माणसे होती हे देवच जाणे, पण त्यांचे नेहमी तिच्याकडे काहीतरी काम असे व अवघ्या दोन-तीन मिनिटांपुरती ती थांबत. दारावरची घंटी वाजली म्हणजे आई नेहमी मला खोलीत बोलवायची. आन्ना फ्योदरोवनाला ह्याचा विलक्षण राग यायचा आणि ती आईला सतत टोचायची की, आम्ही फार मानी होतो, आम्हाला परवडेल त्यापेक्षा जास्त मानी होतो आणि असे मानी वागण्याचे आम्हाला मुळीच कारण नव्हते. अशा प्रकारे तासचे तास ती बोलत रहायची. तेव्हा मला तिचे मानीपणाबद्दलचे टपके समजले नव्हते. त्याचप्रमाणे आई आन्ना फ्योदरोवनापाशी रहायचा पक्का निर्णय का घेऊ शकत नव्हती त्याचे कारण केवळ आत्ता मला समजले, किंवा निदान तर्क करू शकते. फार दुष्ट बाई होती आन्ना फ्योदरोवना. आम्हाला अखंड छळायची. कशासाठी तिने आम्हाला बोलावून घेतले ह्याचे आजतागायत मला कोडे आहे. प्रथम आमच्याशी ती खूप गोड वागायची. पण आम्ही अगदी असहाय होतो आणि कुठेही जाणे आम्हाला शक्य नव्हते असे तिच्या जेव्हा ध्यानात आले, तेव्हा मात्र तिने स्वतःचे खरे रूप दाखविले. नंतर ती परत माझ्याशी गोड वागू लागली होती, अत्यंत जवळीक दाखवू लागली होती. पण त्याआधी आईइतकाच मीही तिचा छळ सोसला होता. दर मिनिटाला ती आम्हाला आमच्यावरील तिच्या उपकारांची जाणीव करून द्यायची. अनोळखी माणसांसमोर ती आमची दरिद्री नातेवाईक म्हणून ओळख करून द्यायची. ख्रिश्चन धर्मातील दयेच्या शिकवणीनुसार तिने आमच्यासारख्या अनाथांना निवारा दिला होता, असे सांगायची. टेबलापाशी आम्ही उचललेल्या प्रत्येक घासावर नजर ठेवायची आणि जर आम्ही खाल्ले नाही, तर परत तमाशा सुरू व्हायचा : म्हणजे आम्ही अतिचोखंदळ होतो, तिचे जेवण आमच्यासारख्यांना योग्य नव्हते, ह्यापेक्षा अधिक चांगले आम्ही कधी खाल्ले तरी होते का? माझ्या बाबांचा सतत उद्धार करायची. इतरांपेक्षा जास्त उंच उडी मारायचा त्यांनी प्रयत्न केला, पण प्रत्यक्षात विपरीतच घडले असे म्हणायची. त्यांनी कुटुंबाला भिकेला लावले आणि ख्रिश्चन धर्माला जागणारी तिच्यासारखी कनवाळू नातेवाईक नसती, तर त्यांच्या बायकोला आणि मुलीला रस्त्याच्या कडेला भुकेपायी मरण्याची पाळी आली असती, असे म्हणायची. तिने काय काय बोलून घेतले! तिचे बोलणे ऐकताना दुःखापेक्षा मनात किळस अधिक यायची. आई सारखी रडायची. दर दिवसागणिक तिची प्रकृती आणखी वाईट होत होती. ती खंगत होती, पण दरम्यान आम्ही सकाळपासून रात्री-

पर्यंत काम करीत होतो, शिवणाच्या ऑर्डरी पुऱ्या करीत होतो. आन्ना फ्योदरोवनाला हे आवडत नव्हते. तिचे घर म्हणजे फॅशन-हाऊस नव्हे असे सारखे म्हणायची. पण आम्हाला स्वतःसाठी कपडे आवश्यक होते, अनपेक्षित खर्चासाठी चार पैसे साठविणे भाग होते. स्वतःचे पैसे असणे अत्यावश्यक होते. शिवाय, कधी ना कधी, कुठेतरी दुसरीकडे जाऊन राहता येईल अशा आशेनेही आम्ही पैशांची बचत करीत होतो. पण कामापायी आईची प्रकृती पुरती ढासळली. दर दिवसागणिक तिचा आजार बळावत होता. एखाद्या किडीप्रमाणे आजार तिचे आयुष्य गिळत होता आणि तिला थडग्याच्या जास्त जास्त जवळ नेत होता. मी ते सर्व पहात होते, सर्व मला जाणवत होते, सर्वांचा मला त्रास होत होता, सर्व माझ्या डोळ्यांसमोर घडत होते!

दिवसांमागून दिवस उलटत होते आणि प्रत्येक दिवस त्या आधीच्या दिवसासारखाच होता. आम्ही जणू शहरात नव्हतोच अशा रीतीने गुपचूप, शांत जगत होतो. आमच्यावर आता पूर्ण सत्ता गाजविता येते ह्याची जाणीव झाल्यानंतर आन्ना फ्योदरोवना हळू हळू निवली. खरे म्हणजे तिला उलट विचारण्याची कल्पनासुद्धा कधी कुणाच्या मनाला शिवली नव्हती. कॉरीडॉरमुळे आमची खोली तिच्या खोल्यांपासून अलग होती व मी आधी म्हटल्याप्रमाणे आमच्या शेजारी पक्रोवस्की रहात होता. साशाला तो फ्रेंच आणि जर्मन भाषा शिकवायचा, इतिहास आणि भूगोल शिकवायचा. आन्ना फ्योदरोवनाच्या भाषेत म्हणजे सर्व शास्त्रे शिकवायचा व त्या मोबदल्यात त्याला रहायला खोली आणि जेवण मिळत होते. साशा चतुर मुलगी होती, पण खेळकर व खटचाळ होती. तेव्हा ती तेरा वर्षांची होती. आन्ना फ्योदरोवनाने एकदा आईच्या ध्यानात आणून दिले होते की, माझे शालेय शिक्षण अपुरे राहिले होते, तेव्हा मीसुद्धा शिकवणीला बसले तर काही बिघडणार नाही. आईने आनंदाने संमती दिली आणि साशाबरोबर आख्खे वर्ष मी पक्रोवस्कीकडून शिकले.

पक्रोवस्की अत्यंत दरिद्री असा तरुण होता. प्रकृतीअस्वास्थ्यापायी तो नियमितपणे शिक्षण घेऊ शकत नव्हता, पण आम्ही केवळ सवयीपायी त्याला विद्यार्थी म्हणत होतो. तो अगदी साधे, शांत जीवन जगायचा. आमच्या खोलीपर्यंत त्याची कधी चाहूलसुद्धा ऐकू यायची नाही. तो दिसायचा विचित्र. अवघडल्याप्रमाणे चालायचा, अवघडून वाकून अभिवादन करायचा, चमत्कारिक रीतीने बोलायचा. आरंभी मी त्याला नुसते पाहिले तरी मला हसू फुटायचे. साशा अखंडपणे त्याच्या खोड्या काढायची, विशेषतः तो

आम्हाला शिकवत असे त्यावेळी. आणि त्याला राग पटकन यायचा. क्षुल्लक गोष्टीवरून त्याचा पारा चढायचा. तो खेकसायचा आणि धडा पूर्ण होण्याच्या आधीच खोलीमधून तरातरा बाहेर जाऊन आन्ना फ्योदरोवनाकडे तक्रार करायचा. मग स्वतःच्या खोलीत तो पुस्तकांबरोबर अनेक दिवस बसून रहायचा. त्याच्यापाशी खूप पुस्तके होती, सर्व दुर्मिळ आणि महागडी पुस्तके. तो आणखी कुठेतरी शिकवण्या करीत होता. त्या शिकवण्यांचे कधी पैसे मिळाले, म्हणजे ताबडतोब जाऊन पुस्तके खरेदी करायचा.

कालांतराने मला त्याची अधिक चांगली ओळख पटली. तो खूप प्रेमळ, खूप लायक माणूस होता. मला भेटलेल्या माणसांमध्ये सर्वात उत्तम माणूस होता. आई त्याचा अत्यंत आदर करायची. नंतर तो माझा सगळ्यात जवळचा मित्र बनला. अर्थात आईचा क्रमांक पहिला होता.

आरंभी माझ्यासारखी मोठी मुलगीसुद्धा साशाच्या जोडीने त्याच्या खोड्या काढायची. त्याला चिडवावे कसे आणि त्याच्या सहनशीलतेचा अंत कसा करावा, ह्याबाबत युक्त्या योजण्यात आम्ही दोघी तासचे तास डोकी लढवीत असू. त्याचे संतापणे फार हास्यास्पद असे व आम्हाला अशावेळी खूप गंमत वाटायची. (ही आठवणसुद्धा मला लाज आणते.) एकदा तर आम्ही त्याला रडे आणीपर्यंत चिडविले आणि त्याचे पुटपुटणे मी स्पष्ट ऐकले : "दुष्ट मुलं!" अचानक माझ्यात फरक पडला. मला शरम वाटली, दुःख झाले व त्याची दया आली. मला आठवते, माझे कानसुद्धा शरमेने लाल झाले होते. आमच्या मूर्ख खोड्या त्याने मनावर घेऊ नयेत आणि शांत व्हावे, अशी मी रडवेल्या आवाजात त्याची विनवणी केली. पण त्याने पुस्तक मिटले, आमचा धडा तसाच अपुरा ठेवला व स्वतःच्या खोलीत तो निघून गेला. मला सबंध दिवसभर पश्चात्ताप वाटत होता. आम्ही मुलींनी स्वतःच्या दुष्टपणापायी त्याला रडविले हा विचार माझ्या मनाला सहन होत नव्हता. जणू आम्ही त्याच्या अश्रूंची वाट पहात होतो. जणू त्याने अश्रू ढाळावे अशी आमची इच्छा होती. जणू आम्ही त्याच्या सहनशीलतेचा अंत पाहिला होता. जणू त्या अभागी, दरिद्री माणसाला त्याच्या दुर्दैवाची आम्ही बळजबरीने आठवण करून दिली होती! पश्चात्तापापायी, दुःखापायी, स्वतःवरील चिडीपायी मी सबंध रात्र झोपू शकले नाही. पश्चात्ताप मन हलके करतो म्हणतात – खोटे! माझ्या दुःखात अहंकार कसा मिसळला कोण जाणे! त्याने मला लहान मूल मानावे अशी माझी इच्छा नव्हती. तेव्हा माझे वय एव्हाना पंधरा होते.

पक्रोवस्कीचे माझ्याविषयीचे मत कसे बदलावे ह्याबाबत त्या दिवसापासून माझ्या कल्पनाशक्तीला ताण द्यायला मी आरंभ केला. पण मी भित्री होते, लाजाळू होते. माझ्या प्रत्यक्ष स्थितीत मी काहीही करू शकले नाही आणि सर्व गोष्टी केवळ स्वप्नांमध्येच राहिल्या (देवच जाणे, कसली कसली स्वप्ने होती तो!). फक्त मी साशाबरोबर खोड्या करणे थांबविले. तो आमच्यावर रागवेनासा झाला. पण माझ्या अहंकाराला तेवढे पुरेसे नव्हते.

आता मला भेटलेल्या एका अत्यंत विचित्र, अत्यंत कुतूहलजनक आणि अत्यंत दुर्दैवी माणसाबद्दल मी चार शब्द सांगते. त्याच्याबद्दल आता बोलण्याचे, म्हणजे माझ्या टिपणांमध्ये नेमक्या ह्या स्थळी, कारण इथपर्यंत मी त्याच्याकडे मुळीच लक्ष दिले नव्हते. तर पक्रोवस्कीच्या संदर्भातील सर्व गोष्टी माझ्या दृष्टीने अचानक स्वारस्याच्या ठरल्या!

आमच्या घरी कधी कधी एक म्हातारा येत असे. अत्यंत घाणेरडे कपडे, पांढरे केस, बुटका, विचित्र हालचाली करणारा. थोडक्यात अगदी वल्ली. पहिल्याच दृष्टिक्षेपात समजायचे की, तो कशालातरी लाजतोय, जणू त्याला स्वतःचीच लाज वाटतेय. त्यामुळे तो नेहमी चुळबुळत असायचा, अंगाला आळोखेपिळोखे द्यायचा आणि असा मूर्खासारखा वागायचा, की त्याचे डोके फिरले आहे असे पाहणाऱ्याला वाटावे. आमच्याकडे आल्यानंतर काचेच्या दाराबाहेर उभा रहायचा, पण घरात यायचा त्याला धीर होत नसे. आमच्यापैकी कुणी त्यावेळी तेथून जात असेल – मी अथवा साशा, किंवा नोकरांपैकी कुणी, त्याच्याशी प्रेमळपणे वागणाऱ्या त्याच्या माहितीच्या माणसांपैकी कुणी – तर मग तो खाणाखुणा करून आम्हाला जवळ बोलावून घ्यायचा. उलट खुणा करून त्याची खात्री पटविली की, घरात कुणी पाहुणे नाहीत, त्याने आत यायला हरकत नाही, की मग तो म्हातारा हळूच दार उघडायचा, आनंदाने स्मित करायचा व समाधानाने हात चोळत चोरपावलांनी पक्रोवस्कीच्या खोलीकडे जायचा. तो पक्रोवस्कीचा बाप होता.

ह्या गरीब म्हाताऱ्याची सर्व हकीकत पुढे मला तपशीलवार समजली. कोणे एके काळी त्याने कुठेतरी कारकुनी केली होती, स्वतःची लायकी तो सिद्ध करू शकला नव्हता व त्यामुळे अत्यंत नगण्य पदावर त्याला काम करावे लागले होते. जेव्हा त्याची पहिली बायको (विद्यार्थी पक्रोवस्कीची आई) वारली, तेव्हा त्याने दुसरे लग्न करण्याचे ठरविले व एका कनिष्ठ मध्यमवर्गीय बाईशी त्याने लग्न केले. नव्या बायकोच्या आगमनानंतर घरात पूर्ण उलथापालथ घडली. तिच्याबरोबर राहणे सर्वांना अशक्य ठरले. सर्वांना

तिने तिच्या धाकात ठेवले. विद्यार्थी पत्रोवस्की तेव्हा अजून लहान होता, दहा वर्षांचा होता. सावत्र आई त्याचा विलक्षण तिटकारा करायची. पण छोट्या पत्रोवस्कीचे नशीब बलवत्तर निघाले. जमीनदार बीकोव – कारकून पत्रोवस्कीचे परिचित आणि हितकर्ते – यांनी मुलाला आपल्या पंखाखाली घेतले व कुठल्यातरी शाळेत त्याची रवानगी केली. त्यांनी असे करण्याचे कारण, मुलाची मयत आई त्यांच्या ओळखीची होती, तरुणपणी आन्ना फ्योदरोवनाने तिचा कारकून पत्रोवस्कीशी विवाह करून दिला होता. श्रीमान बीकोव आन्ना फ्योदरोवनाचे निकट स्नेही होते आणि त्यांनी उदारपणे नववधूला हुंडा म्हणून पाच हजार रूबल लग्नात दिले होते. ते पैसे कुठे गेले – कोण जाणे! ही हकीकत मला आन्ना फ्योदरोवनापासून समजली. विद्यार्थी पत्रोवस्कीला त्याच्या कौटुंबिक हकीकती सांगायला कधीही आवडत नसे. असे म्हणतात की, त्याची आई खूप सुंदर होती आणि मला आश्चर्य वाटते की, तिने अशा क्षुल्लक माणसाशी विवाह करायला संमती कशी दिली... ती तरुणपणीच वारली, लग्नानंतर अवघ्या चार वर्षांच्या काळात.

तरुण पत्रोवस्की शाळेमधून एका जिम्नाशियममध्ये व नंतर विद्यापीठात दाखल झाला. श्रीमान बीकोव वारंवार पीटरबुर्गमध्ये येत आणि त्यांनी पत्रोवस्कीला आश्रय देणे पुढे चालू ठेवले. पण वाईट प्रकृतीपायी पत्रोवस्की विद्यापीठीय शिक्षण पूर्ण करू शकला नाही. श्रीमान बीकोव यांनी त्याची आन्ना फ्योदरोवनाशी ओळख करून दिली, खुद्द त्याची तिच्यापाशी शिफारस केली व अशा रीतीने तरुण पत्रोवस्कीला साशाला सर्व विषय शिकविण्याच्या मोबदल्यात खोली व जेवण मिळाले.

म्हातारा पत्रोवस्की त्याच्या बायकोच्या त्रासापायी दुर्व्यसनाच्या आहारी गेला. तो सदैव झिंगलेला असायचा. त्याची बायको त्याला मारायची, स्वयंपाकघरात रहायला भाग पाडायची. वाईट वागणूक मिळण्याची त्याला पुढे एवढी सवय लागली की, तक्रार करण्याचे त्याने थांबविले. अद्याप त्याचे तेवढे म्हातारे वय झाले नव्हते, पण त्याच्या व्यसनांपायी त्याची विवेकबुद्धी नष्ट झाली होती. त्याच्यात मानवी भावनेची एकमेव उरलेली खूण म्हणजे त्याच्या मुलाबद्दल त्याला वाटणारी ममता. असे म्हणत की, तरुण पत्रोवस्की हुबेहूब त्याच्या मयत आईसारखा दिसत होता. कदाचित पहिल्या प्रेमळ बायकोच्या आठवणींपायी हा दुभंगलेला म्हातारा मुलावर एवढा जीव टाकत होता? म्हाताऱ्याला त्याच्या मुलाविना बोलायला अथवा चिंतनाला दुसरा विषय नव्हता. नेहमी आठवड्यातून दोनदा तो मुलाला भेटायला यायचा.

त्याहून जास्त वेळा येण्याचा त्याला धीर होत नव्हता, कारण तरुण पत्रो-वस्कीला बापाचे येणे मुळीच सहन होत नव्हते. त्याच्यातील सर्व उणीवांपैकी सर्वांत मोठी उणीव म्हणजे बापाबद्दल त्याला वाटणारा अनादर. पण म्हातारा काहीवेळा जगातील सर्वांत किळसवाणा प्राणी असायचा. तो कमालीचा चौकस होता व अत्यंत क्षुल्लक विषयांवरील त्याची वटवट आणि त्याचे प्रश्न तरुण पत्रोवस्कीच्या अभ्यासात अडथळा आणत. सरतेशेवटी, तो नेहमी शुद्धीवर नसे. मुलाने म्हाताऱ्याला चौकसपणा, वटवटेपणा आणि दारुडेपणा थोडा कमी करायला लावला. परिणामी म्हातारा त्याच्या मुलाला गुरु मानू लागला होता व खास परवानगीविना नुसते तोंड उघडण्याचासुद्धा तो धीर करत नव्हता.

बिचारा म्हातारा स्वतःच्या पेतेन्काला (तो मुलाला ह्या नावाने हाक मारायचा) पुरेसा पाहू अथवा ऐकू शकत नव्हता. तो जेव्हा जेव्हा मुलाला भेटायला येई, तेव्हा तेव्हा त्याच्या मुद्रेवर घाबरट भाव असे. मुलगा त्याचे स्वागत कशा प्रकारे करील ह्याबद्दल त्याला खात्री नसायची. खूप वेळपर्यंत तो दाराबाहेरच घुटमळत रहायचा आणि जर योगायोगाने मी तेथे दिसले, तर किमान वीस मिनिटेपर्यंत मला प्रश्न विचारीत रहायचा – पेतेन्का कसा आहे, त्याचे कसे चाललेय? त्याची प्रकृती ठीक आहे ना? त्याची मनःस्थिती कशी आहे आणि काही महत्त्वाच्या अभ्यासात तो गुंतलाय का? तो नेमके काय करतोय? लिहितोय का, अथवा वाचतोय का, अथवा चिंतनात गढलाय? जेव्हा मी म्हाताऱ्याला पुरेसा धीर द्यायची आणि त्याची खात्री पटवायची, तेव्हा अखेरीस म्हातारा आत येण्याचा निर्णय घ्यायचा. अगदी हळू हळू, खूप खूप सावधपणे, दार उघडायचा. प्रथम दारातून फक्त डोके आत खुपसायचा आणि मुलगा त्याच्यावर रागवत नाही व मानेने खूण करून त्याला आत बोलावतोय असे पाहिल्यानंतरच केवळ हळुवार पावलांनी खोलीत शिरायचा. सदैव चुरगळलेल्या, छिद्रे पडलेल्या, कडा फाटलेल्या त्याच्या कोटाला व टोपीला खुंटीवर अडकवायचा. ह्या सर्व गोष्टी अगदी हळुवार-पणे, आवाज न करता घडत. मग कुठेतरी खुर्चीवर तसाच सावधपणे बसा-यचा. हा सारा वेळ त्याची नजर मुलावर खिळलेली असायची. पेतेन्काची मनःस्थिती जाणून घेण्यासाठी त्याच्या सर्व हालचालींवर म्हाताऱ्याचे बारीक लक्ष असायचे. जर मुलाची मनःस्थिती किंचित थाऱ्यावर नसली, तर म्हाताऱ्याच्या ते तात्काळ ध्यानात यायचे व चटकन खुर्चीवरून उठत तो पुट-पुटायचा: "पेतेन्का, मी उगीच मिनिटभरासाठी सहज आलो होतो. खूप

लांब चालत गेलो होतो, इथून जवळून जात होतो आणि क्षणभर विसावा घ्यायला आत आलो." मग नम्रपणे परत स्वतःची कोट-टोपी घ्यायचा, पूर्वीप्रमाणेच हलक्या पावलांनी दारापर्यंत जायचा व दार उघडून बाहेर पडायचा. मनातील दाटलेले दुःख आवरून धरीत, मुलाला ते दिसू नये असा प्रयत्न करीत, तोंडावर वळेच स्मित आणून तो बाहेर पडायचा.

पण जेव्हा मुलगा बापाचे छान स्वागत करायचा, तेव्हा म्हाताऱ्याच्या आनंदाला पारावार उरायचा नाही. त्याच्या मुद्रेवरून, त्याच्या हातवाऱ्यांमधून, त्याच्या सर्व हालचालींमधून समाधान ओसंडताना दिसायचे. जर मुलगा त्याच्याशी बोलू लागला, तर म्हातारा नेहमी खुर्चीवरून किंचित उठायचा आणि नम्रपणे, आज्ञाधारकपणे, आदरपूर्वक भीती बाळगून उत्तरे द्यायचा. अशा वेळी तो नेहमी उत्तम शब्दांची – म्हणजेच अत्यंत हास्यास्पद – निवड करायचा. त्याला शब्दांची देणगी नव्हती. नेहमी गोंधळलेला आणि लाजलेला, हातांचे काय करावे ते न समजलेला व जणू स्वतःच्या उत्तरांमधील चुका दुरुस्त करण्यासाठी सतत काहीतरी पुटपुटणारा. पण जर अचूक उत्तर देणे त्याला जमले, तर त्याचे खांदे ताठ व्हायचे; तो स्वतःची बंडी, टाय व फ्रॉककोट ठाकठीक करायचा. त्याच्या मुद्रेवर प्रतिष्ठित भाव उमटायचा. काहीवेळा तर त्याच्यात एवढी धिटाई यायची, की तो खुर्चीवरून उठून पुस्तकांच्या कपाटापर्यंत चालत जायचा, हाती लागेल ते पुस्तक सहजपणे उचलून त्यातील काही ओळी वाचायचा. हे सर्व तो बेफिकीरपणाचा आव आणून करायचा. जणू मुलाची पुस्तके हाताळायची त्याला सवय होती, जणू मुलाचे प्रेम त्याला सतत लाभत होते. पण पुस्तकांना स्पर्श करू नको असे पक्रोवस्कीने दटावताच तो किती घाबरला होता ते पाहण्याचा प्रसंग एकदा मला लाभला होता. तो लटपटला, घाईघाईने त्याने पुस्तक फडताळावर उलटे ठेवले, मग चुकीची दुरुस्ती करण्याच्या प्रयत्नात मुखपृष्ठाची बाजू आत कोंबली. असे करताना तो स्मित करीत होता, लाजत होता व स्वतःच्या अपराधाचे क्षालन कसे करावे हे त्याला समजत नव्हते. आपल्या बापाच्या वाईट सवयी थोड्याशा बदलण्याच्या इराद्याने, म्हातारा जर ओळीने तीनदा न झिंगलेल्या अवस्थेत आला, तर पक्रोवस्की त्याला पंचवीस, पन्नास कोपेक अथवा त्याहून जास्त पैसे निरोपाच्या वेळी हातावर ठेवायचा. कधी कधी तो म्हाताऱ्याला बूट, टाय अथवा बंडी विकत घेऊन द्यायचा. म्हातारा त्या नव्या वस्तू वापरताना एखाद्या तुरेवाल्या कोंबड्याच्या ऐटीत फिरायचा. क्वचित तो आमच्याकडे यायचा. माझ्यासाठी आणि

साशासाठी चित्रांची बिस्कीटे व सफरचंदे आणायचा, स्वतःच्या पेतेन्काबद्दल आमच्याशी गप्पा मारीत रहायचा. लक्षपूर्वक, अवधानपूर्वक शिका असा आम्हाला उपदेश करायचा. पेतेन्का खूप प्रेमळ मुलगा आहे, आदर्श मुलगा आहे, एवढेच नव्हे तर तो विद्वान मुलगा आहे, असे म्हणायचा. अशा वेळी तो खूप मजेशीरपणे डावा डोळा मिचकावायचा, चेहरे वेडेवाकडे करायचा आणि आम्हाला हसू आवरायचे नाही. आम्ही मनापासून खो खो हसत असू. आई त्याच्यावर खूप माया करायची. पण म्हातारा आन्ना फ्योदरोवनाचा मात्र विलक्षण तिटकारा करायचा. असे असले तरी तिच्या उपस्थितीत अगदी चिडीचूप मान खाली घालून बसायचा.

लौकरच मी पक्रोवस्कीपाशी शिकणे बंद केले. साशाप्रमाणेच तो मला लहान मूल समजायचा, खट्याळ कारटी मानायचा. मला ह्या गोष्टीचे अतीव दुःख होई, कारण माझ्या पूर्वीच्या प्रतिमेला पुसून टाकण्याचे मी आटोकाट प्रयत्न केले होते. पण माझी दखल घेण्यात आली नाही. त्याची मला अधिकाधिक चीड येत होती. वर्गाबाहेर मी कधीही पक्रोवस्कीशी बोलले नव्हते आणि तसे बोलणे मला शक्यही झाले नव्हते. मी लाजायची, गोंधळायची व नंतर एखाद्या कोपऱ्यात बसून संतापाने रडायची.

एका विचित्र प्रसंगापायी आम्ही एकमेकांच्या अधिक जवळ येण्यास मदत झाली नसती, तर ह्या सर्वाची अखेर कशी झाली असती कोण जाणे! एका संध्याकाळी आई जेव्हा आन्ना फ्योदरोवनाकडे बसली होती, तेव्हा मी हळूच पक्रोवस्कीच्या खोलीत गेले. तो घरात नव्हता हे मला माहीत होते आणि कशापायी त्याच्याकडे जाण्याचा विचार माझ्या मनात आला हे खरेच माहीत नाही. आम्ही एक वर्षापेक्षा जास्त काळ शेजारी-शेजारी रहात होतो, तरी त्या वेळेपर्यंत मी कधीही त्याच्या खोलीत डोकावले नव्हते. माझ्या काळजाचे ठोके धाड धाड पडत होते. कोणत्याही क्षणी घशातून ते उडी मारून बाहेर पडेल अशी भीती मला वाटत होती. खास कुतूहलाने मी चौफेर नजर टाकली. पक्रोवस्कीच्या खोलीत सामान विशेष नव्हतेच. अस्ताव्यस्तपणा तेथे नांदत होता. भिंतीपाशी पुस्तकांची पाच लांबलचक फडताळे ठोकलेली होती. मेजावर आणि खुर्च्यांवर कागद पडले होते. पुस्तके आणि कागद! माझ्या मनात विचित्र विचार आला व त्याचबरोबर खेदाच्या जाणीवेने मला घेरले. मला भासले की, माझी मैत्री, माझे प्रेम त्याला अपुरे पडत होते. तो विद्वान होता, पण मी मूर्ख होते, मला काहीही ज्ञान नव्हते, मी काहीही वाचले नव्हते, अगदी एकही पुस्तक... पुस्तकांनी

भरलेल्या त्या फडताळांकडे मी असूयेने पाहिले. कसल्यातरी चिडीने, तिटकाऱ्याने, वेडाने मला झपाटले. तेथल्या तेथे सर्व पुस्तके ताबडतोब वाचण्याचा मी निर्णय घेतला. कदाचित त्याला माहीत होते तेवढे ज्ञान प्राप्त केल्यावर निदान मी त्याच्या मैत्रीला लायक ठरीन असा माझा हेतू असावा. पहिल्या फडताळावर मी हल्ला केला. कसलाही विचार न करता, मुळीच न थबकता, प्रथम हाती लागला तो धुळीने माखलेला एक जुना खंड उचलला व एकदा लाल मुद्रेने, एकदा फिकट चेहऱ्याने, मानसिक अस्वस्थतेपायी आणि भीतीपायी थरथर कापत, ते चोरलेले पुस्तक मी स्वतःच्या खोलीत आणले. रात्री आई झोपी गेल्यानंतर रात्रीच्या दिव्यापाशी बसून सकाळच्या आत ते पुस्तक सबंध वाचून काढण्याचा मी निर्धार केला.

पण माझ्या खोलीत आल्यानंतर अधीरपणे मी जेव्हा ते पुस्तक उघडले, तेव्हा माझी अत्यंत निराशा झाली. फाटून चिंध्या झालेले, कसरींनी खाल्लेले ते पुस्तक म्हणजे प्राचीन लॅटिन निबंधांचा संग्रह होते. वेळ न दवडता मी मागे फिरले. फडताळात पुस्तक ठेवण्याच्या मी बेतात होते, तोच कॉरीडॉरमध्ये कुणाची तरी पावले वाजली. मी घाई केली, लगबग केली, पण पूर्वी ते अगदी घट्ट कोंबून त्याच्या जागी बसविलेले होते व आता त्या पुस्तकाला तेथून बाहेर काढल्यानंतर त्याच्या शेजाऱ्यांनी त्याची जागा पटकावली होती. पुस्तक परत कोंबण्यास मला बळ पुरे पडले नाही. अखेरीस सर्व ताकद पणाला लावून मी पुस्तके रेटली. फडताळ ज्याच्या आधारावर टिकून होते तो गंजलेला खिळा जणू ह्याच प्रसंगाची वाट पहात होता—तो निखळला. फडताळ एका टोकाने खाली कोसळले. पुस्तके धाडकन आवाज करीत फरशीवर विखुरली. दार उघडले गेले आणि पक्रोवस्की खोलीत प्रवेशला.

नमूद करणे आवश्यक आहे की, त्याच्या वस्तूंची कुणी ढवळाढवळ केलेली त्याला अजिबात खपत नसे. आणि त्याच्या पुस्तकांना जो हात लावील, त्याची कंबक्ती भरलीच! आता माझी अवस्था तेव्हा किती भयानक झाली असेल त्याची कल्पना करा! छोटी-मोठी, सर्व प्रकारच्या आकारांची, जाड आणि पातळ अशी पुस्तके फडताळावरून उडाली, टेबलाखाली, खुर्च्यांखाली, सबंध खोलीत विखुरली होती. पळून जायची माझी इच्छा होती, पण एव्हाना उशीर झाला होता. माझ्या मनात आले: "संपले सारे! मी मुद्देमालासकट सापडले! माझी शंभर वर्षे भरली! दहा वर्षांच्या मुलाप्रमाणे मी खटचाळपणा केला. मी अगदी महामूर्ख मुलगी आहे! मी अत्यंत गाढव आहे!!" पक्रोवस्की कमालीचा संतापला होता. "एवढंच घडायचं बाकी

होतं!" तो ओरडला. "असा वात्रटपणा करायला तुम्हाला शरम नाही वाटत! कधीतरी अक्कल येईल का तुम्हाला?" आणि पुस्तके गोळा करायला तो खाली वाकला. मी त्याला मदत करायला खाली झुकले. "गरज नाही, गरज नाही," तो ओरडला. "जिथं तुम्हाला बोलावत नाहीत, तिथं न आलात, तर ते जास्त बरं झालं असतं!" पण माझ्या नम्र वागणुकीमुळे त्याचा स्वर थोडा मऊ बनला. खरडपट्टी काढणाऱ्या शिक्षकाच्या स्वरात, अलीकडील काळातील आमच्या धड्यांच्या वेळेच्या स्वरात, तो म्हणाला: "केव्हा तुम्ही ताळ्यावर येणार? केव्हा विचारानं वागायला लागणार? जरा स्वत:कडं पहा, तुम्ही आता लहान बाळ नव्हेत, छोटी मुलगी नव्हेत, तुम्ही आता चक्क पंधरा वर्षांच्या आहात!" आणि मी खरोखरीच लहान नाही ह्याची जणू स्वत:शी खात्री पटविण्यासाठी त्याने माझ्याकडे दृष्टिक्षेप टाकला व तो एकदम लाजला. मला काही समजले नाही. त्याच्यासमोर डोळे विस्फारून मी उभी होते. तो उठून उभा राहिला, काहीशा शरमिंद्या चर्येने माझ्यापाशी आला, खूप गोंधळून त्याने माझी क्षमा मागितली. कदाचित केवळ आत्ताच त्याच्या लक्षात आले होते की, मी तेवढी मोठी मुलगी होते. अखेरीस मला उमजले. माझी अवस्था तेव्हा काय झाली ते मला आठवत नाही. मी बावरले, हरवले, पत्रोवस्कीपेक्षा जास्त लाजले, हातांनी माझा चेहरा झाकून घेतला आणि खोलीबाहेर पळाले.

शरमेपायी मला काय करावे ते सुचत नव्हते. त्याने मला त्याच्या खोलीत पाहिले होते! आख्खे तीन दिवस मी त्याच्याकडे नुसती नजर टाकायला शरमत होते. अगदी रडू येईपर्यंत मला लाज वाटत होती. अत्यंत हास्यास्पद, अत्यंत विचित्र विचार माझ्या डोक्यात भिरभिरत होते. त्यांपैकी एक सर्वांत विचित्र विचार असा होता की, त्याच्याकडे जाऊन सगळा खुलासा करावा, त्याच्यापाशी सगळी कबुली द्यावी, उघडपणे त्याला सगळे सांगावे आणि त्याची खात्री पटवावी की मी मूर्ख मुलीप्रमाणे वागले नव्हते, तर माझा हेतू चांगला होता. त्याच्याकडे जाण्याचा माझा पूर्ण निर्धार झाला होता, पण देवाची कृपा, तेवढा मला धीर झाला नाही! मी काय केले असते त्याची कल्पना करू शकते! आत्तासुद्धा ही आठवण मला शरमिंदी करते.

त्यानंतर काही दिवसातच आई गंभीर आजारी झाली. दोन दिवस ती अंथरुणातून अजिबात उठली नाही आणि तिसऱ्या दिवशी ताप चढून तिला भ्रम झाला. मी रात्रभर झोपले नव्हते, आईची सेवा करीत होते,

तिच्या पलंगापाशी बसून होते, प्यायला पाणी देत होते, ठराविक वेळी औषधे देत होते. दुसऱ्या रात्री मी पुरती थकून गेले. मधून मधून मला डुलकी लागायची, डोळ्यांसमोर हिरवे ठिपके नाचायचे, डोके भिरभिरायचे. थकव्यापायी कोणत्याही क्षणी मी खाली कोसळले असते. पण आईचे क्षीण कण्हणे-विव्हळणे मला जागे ठेवत होते. मी दचकायची, क्षणात जागी व्हायची, पण नंतर झोप परत मला घेरायची. माझे खूप हाल झाले. मला माहीत नाही, मला आठवत नाही, पण झोप आणि जागे राहण्याची खटपट यांच्या संघर्षादरम्यान एक विचित्र स्वप्न, एक भयानक आभास, माझ्या थकल्या मनाला घेरून टाकत होते. खूप दचकून मी जागी झाले. खोलीत अंधार होता, रात्रीचा दिवा विझत होता, प्रकाशाचे पट्टे क्षणात सबंध खोलीभर पसरत होते, क्षणात पूर्ण नाहीसे होत होते. मला कसलीतरी भीती वाटू लागली, कसल्यातरी धास्तीने मला घेरले. माझ्या कल्पनाशक्तीला भयानक स्वप्नाने झपाटले. माझ्या काळजाला विषण्णतेने वेढले... मी खुर्ची-वरून झटकन उठले आणि कुठल्यातरी अतिभयानक जाणीवेपायी नकळत किंचाळले. त्याच क्षणाला दार उघडले गेले आणि पत्रोवस्की खोलीत आला.

मला एवढेच आठवते की, मी शुद्धीवर आले तेव्हा त्याच्या बाहुपाशात होते. त्याने हळुवारपणे मला आरामखुर्चीत बसविले, पेलाभर पाणी प्यायला दिले व भराभरा प्रश्न विचारले. त्याला मी काय उत्तरे दिली ते आठवत नाही. "तुम्ही आजारी आहात, तुम्ही स्वतःच खूप आजारी आहात," माझा हात धरून तो म्हणाला. "तुम्हाला ताप आहे, तुम्ही स्वतःच स्वतःचा नाश करून घेताय, स्वतःच्या प्रकृतीची तुम्ही पर्वा करत नाही. शांत व्हा, आडव्या पडा, झोपा. दोन तासांनंतर मी तुम्हाला जागं करीन. शांत व्हा थोडं... आडव्या पडा, निजा!" तो सतत बोलत होता, नकाराचा एकही शब्द मला बोलू देत नव्हता. थकव्यापायी माझे बळ संपले होते. अशक्तप-णामुळे माझे डोळे मिटत होते. फक्त अर्धा तास झोप काढण्याच्या निर्णयाने मी आरामखुर्चीत आडवी झाले, पण थेट सकाळपर्यंत झोपले. आईला जेव्हा औषध देण्याची वेळ झाली, तेव्हाच पत्रोवस्कीने मला झोपेतून उठविले.

दिवसभराच्या दरम्यान थोडी विश्रांती घेऊन परत आईच्या पलंगा-पाशी जेव्हा मी दुसऱ्या दिवशी बसले, तेव्हा अजिबात न पेंगण्याचा निर्धार केला होता. अकरा वाजता पत्रोवस्कीने आमच्या खोलीचे दार ठोठावले. मी दार उघडले. "तुम्हाला एकटीला बसणं कंटाळवाणं होतं," तो मला म्हणाला, "हे घ्या पुस्तक. मग तेवढा कंटाळा यायचा नाही." मी पुस्तक

घेतले. ते कोणते पुस्तक होते मला आठवत नाही अथवा त्या रात्री मी त्यातील एकही पान वाचले नाही, पण त्या सबंध रात्री मी झोपले नाही. मनातील विचित्र खळबळीमुळे झोप आली नाही. एका जागी बसून राहणे मला अशक्य ठरले. अनेकदा आरामखुर्चीतून उठले व खोलीत फेऱ्या मारल्या. कुठल्यातरी आंतरिक समाधानाची जाणीव माझ्या अंगअंगात भिनत होती. पत्रोवस्कीने माझ्याकडे लक्ष दिले ह्याचा मला विलक्षण आनंद झाला होता. माझ्याबद्दल तो अस्वस्थ झाला, माझी तो काळजी करीत होता, ह्याचा मला अभिमान वाटत होता. सारी रात्र मी विचार करीत होते आणि स्वप्न पहात होते. पत्रोवस्की परत आला नाही. आणि तो येणार नाही हे मला माहीत होते. पुढील संध्याकाळी तो येईल अथवा नाही याबद्दल मनाशी नवल करीत होते.

पुढील संध्याकाळी, घरातील सर्व माणसे निजल्यानंतर, पत्रोवस्कीने स्वतःचे दार उघडले व स्वतःच्या खोलीच्या उंबरठ्याशी उभा राहून तो माझ्याशी गप्पा मारू लागला. तेव्हा आम्ही एकमेकांशी काय बोललो, त्यातील एकही शब्द आता मला आठवत नाही. एवढेच आठवते की, मी घाबरले होते, बावरले होते, स्वतःवर चिडले होते आणि आमचे संभाषण कधी संपते त्याची अधीरपणे वाट पहात होते. वस्तुतः त्या संभाषणाची मी आतुरतेने प्रतीक्षा केली होती, सबंध दिवसभर त्याचे मी स्वप्न पहात होते, मनाशी प्रश्नोत्तरे जुळवीत होते... ह्या सायंकाळीपासून आमच्या मैत्रीचा आरंभ झाला. आईच्या पुढील आजारपणात आम्ही प्रत्येक रात्र काही तास एकमेकांच्या सहवासात घालवीत होतो. माझ्या लाजरेपणावर मी हळूहळू मात केली, पण तरीही प्रत्येक संभाषणानंतर मी स्वतःवर थोडी संतापत असे. पण मला मनातून आनंद होत होता आणि अभिमान वाटत होता की, माझ्या सहवासापायी तो त्या नतद्रष्ट पुस्तकांना विसरत होता. एकदा, संभाषणाची गाडी गंमतीने पुस्तके फडताळावरून पडण्याच्या विषयाकडे वळली. त्या क्षणाला माझी मनःस्थिती विचित्र होती, मी **फारच** प्रांजल आणि प्रामाणिक बनले होते. विलक्षण उन्मादाने मला झपाटले व मी त्याच्यापाशी सर्व कबुली दिली... मी सांगितले की, माझी शिकण्याची इच्छा होती, मला लहान मूल समजतात हे आवडत नाही... पुन्हा सांगत्ये की, मी माझ्या मनाची काही आगळीच अवस्था बनली होती. माझे काळीज मऊ बनले होते, डोळ्यांमध्ये आसवे उभी होती. मी काहीही गुप्तता न राखता सर्व सांगून टाकले—त्याच्याशी मैत्री जोड-

ण्याची, त्याच्यावर प्रेम करण्याची, त्याच्याबरोबर एकदिलाने राहण्याची, त्याचे सांत्वन करण्याची, त्याला शांत करण्याची, माझी इच्छा! तो माझ्याकडे विचित्रपणे, आश्चर्याने आणि काहीशा शरमिंदेपणाने पहात राहिला; पण एकही शब्द बोलला नाही. मला एकदम वेदना होऊ लागल्या, खिन्न वाटू लागले. मला भासले की, तो माझे मन समजून घेत नाही. कदाचित मला तो हसत होता. लहान मुलाप्रमाणे मी एकाएकी रडू लागले, विव्हळू लागले, स्वतःवर मला ताबा ठेवता आला नाही. अक्षरशः मला झटका आला होता. त्याने माझे हात धरले, त्यांचे चुंबन घेतले, स्वतःच्या छातीवर त्यांना दाबले, समजुतीचे चार शब्द बोलून मला शांत केले. तो कमालीचा हेलावला होता. तो मला काय म्हणाला हे आठवत नाही. मी केवळ रडत होते आणि हसत होते; परत रडले, लाजले, आनंदापायी एकही शब्द उच्चारू शकले नाही. मी थाऱ्यावर नव्हते तरी माझ्या ध्यानात आले की, पक्रोवस्की काहीसा शरमिंदा आणि अस्वस्थ होता. कदाचित माझ्या उत्तेजितपणामुळे, माझ्या उत्साहामुळे, माझ्या मनस्वी धगधगीत स्नेहभावनेमुळे त्याला वाटलेल्या आश्चर्यावर अद्याप तो स्वतःचा ताबा मिळवू शकला नव्हता. कदाचित त्याला आरंभी केवळ कुतूहल वाटले होते. पुढे त्याचा डळमळीतपणा नाहीसा झाला व माझ्याप्रमाणेच सरळ-साध्या प्रामाणिक भावनेने त्याने माझी मैत्री स्वीकारली; माझी निष्ठा, माझे प्रेमळ शब्द स्वीकारले. आणि तेवढ्याच निष्ठेने, प्रेमाने, स्नेहाने प्रतिसाद दिला. अस्सल मित्राप्रमाणे, सख्ख्या भावाप्रमाणे माझ्याशी तो वागला. माझ्या काळजाला खूप ऊब वाटत होती, खूप छान वाटत होते!.. मी काहीही लपविले नाही, काहीही गुप्त ठेवले नाही. त्याला हे सगळे दिसले व दर दिवसागणिक तो माझ्या जास्त जास्त जवळ येऊ लागला.

त्या छळवादी आणि त्याचवेळी मधुर भासणाऱ्या आमच्या रात्रीच्या भेटींमध्ये, थरथरणाऱ्या दिव्याच्या प्रकाशात, माझ्या बिचाऱ्या आजारी आईच्या शय्येपाशी आम्ही कोणकोणत्या विषयांवर बोललो ते मला खरेच आठवत नाही. डोक्यात जे काही आले, काळजातून जे काही उमाळून आले, त्या सर्व गोष्टींवर बोललो... आम्ही खूप सुखी होतो असा भास होत होता... हाय, तो काळ सुखाचा होता आणि दुःखाचाही होता. सगळे एकत्र मिसळले होते. आणि आतासुद्धा त्या आठवणी काढताना मी सुख-दुःख एकत्र अनुभवते. आठवणी सुखद असोत वा दुःखद असोत, त्या

नेहमी छळवादी असतात. निदान माझ्या बाबतीत तसे आहे. पण हा छळवाद गोड वाटतो. जेव्हा काळीज जडावते, त्यात वेदना होतात, ते कासावीस होते, विषण्ण बनते, तेव्हा दिवसभराच्या उन्हाच्या तापाने कोमेजलेल्या फुलावर सायंकालीन दंवाचा शिडकावा होताच ते जसे ताजेतवाने बनते, तशा आठवणी काळजाला ताज्यातवान्या बनवितात.

आईची प्रकृती सुधारली, पण तरीही मी तिच्यापाशी अजूनही रात्रीची बसून रहात होते. पक्रोवस्की वारंवार मला पुस्तके आणून देत होता. झोप लागू नये म्हणून मी प्रथम पुस्तके वाचू लागले, मग लक्षपूर्वक वाचू लागले आणि नंतर तर आधाशीपणे वाचन करू लागले. माझ्यासमोर अनपेक्षितपणे नवे जग खुले झाले. मला अनोळखी अशा कित्येक गोष्टी सामोऱ्या आल्या. माझ्या काळजात नव्या विचारांनी, नव्या ठशांनी खूप दाटी केली. आणि त्यांचे आकलन करणे मला जेवढे कठीण, तेवढे ते मला अधिक प्रिय, अधिक मधुर वाटत होते. अखंडपणे माझ्या काळजात दाटी करून ते मला विश्रांती घेऊ देत नव्हते. माझ्या सर्वांगात कसलातरी अराजकी गोंधळ माजला होता. पण ह्या आत्मिक आक्रमणापायी माझा तोल मात्र गेला नाही. मी फार स्वप्नाळू होते व त्यामुळेच बचावले.

आईचा आजार जेव्हा संपला, तेव्हा आमच्या सायंकालीन भेटी आणि लांबलचक गप्पाही संपल्या. काही वेळा आम्ही थोड्या शब्दांची देवघेव करीत असू, ते बहुधा निरर्थक असत, पण त्यांचा माझ्या पद्धतीने अर्थ लावायला मला आवडत असे. माझे आयुष्य पूर्ण होते, मी सुखी होते, शांत होते, समाधानी होते. असे काही आठवडे लोटले...

एकदा आमच्याकडे म्हातारा पक्रोवस्की आला. तो खूप वेळ वटवट करीत होता, नेहमीपेक्षा जास्त मजेत होता, धीट होता, बडबड्या होता. खूप हसला, स्वतःच्या पद्धतीने त्याने विनोद केले आणि शेवटी त्याच्या आनंदाचे रहस्य उलगडून सांगितले: बरोब्बर एक आठवड्यानंतर पेतेन्काचा वाढदिवस होणार व तो कोणत्याही परिस्थितीत मुलाला भेटायला येणार. येतेवेळी तो नवी बंडी घालणार आणि बायकोने त्याला नवी बुटांची जोडी विकत घेऊन देण्याचे आश्वासन दिले होते. थोडक्यात, म्हातारा पूर्ण सुखात होता आणि डोक्यात येतील ते सर्व विचार तोंडावाटे व्यक्त करीत होता.

त्याचा वाढदिवस! ह्या वाढदिवसाने मला दिवस-रात्र बेचैन केले होते. आमच्या मैत्रीची आठवण म्हणून पक्रोवस्कीला काहीतरी भेटवस्तू देण्याचा मी निश्चय केला होता. पण काय द्यायचे? अखेरीस मी त्याला

पुस्तके देण्याचे ठरविले. पुष्कीनच्या सपूर्ण साहित्यखंडांची नवी आवृत्ती[9] पदरी बाळगण्याची त्याची इच्छा मला ठाऊक होती, म्हणून मी ती नवी आवृत्ती विकत घ्यायचे ठरविले. माझ्यापाशी शिवणकामातून कमावलेले स्वतःचे तीस रूबल होते. नवा फ्रॉक घेण्यासाठी हे पैसे मी बाजूला ठेवलेले होते. पुष्कीनच्या संपूर्ण खंडांची किंमत जाणून घ्यायला आमची म्हातारी स्वयंपाकीण मात्र्योना हिला मी तात्काळ पिटाळले. पण हाय! अकरा पुस्तके आणि बांधणी मिळून किंमत साठ रूबलच्या घरात जात होती. कुठून आणायचे पैसे? मी खूप डोकेफोड केली, पण मनाचा निर्णय होईना. आईपाशी पैसे मागायची इच्छा नव्हती. अर्थात आईने मला नक्की मदत केली असती. पण मग आमच्या भेटवस्तूबद्दल सबंध घराला माहीत झाले असते. पक्रोवस्कीच्या सबंध वर्षाच्या शिकवणीचा कृतज्ञतापूर्वक मोबदला, एवढाच त्या भेटीचा अर्थ झाला असता. पण मी एकटी, गुपचूप भेटवस्तू देऊ इच्छित होते. आणि त्याने मला शिकविण्यासाठी घेतलेल्या श्रमांबद्दल मी त्याची कायम ऋणी राहू इच्छित होते, फक्त माझ्या मैत्रीमार्फत परतफेड करू इच्छित होते. अखेरीस त्या पेचातून बाहेर पडण्याचा मार्ग मला सुचला.

'गोस्तीनी द्वोर' येथे जुन्या पुस्तकांच्या दुकानात काहीवेळा किंमतीबाबत घासाघीस केली तर जवळजवळ न वापरलेली अशी कोरी पुस्तके निम्म्या पैशात मिळतात हे मला ठाऊक होते. मी तेथे जाण्याचे निश्चित ठरविले. तसे घडलेसुद्धा. दुसऱ्याच दिवशी आमच्या घरात आणि आन्ना फ्योदरोवनाकडेही काही जरूरीची खरेदी निघाली व 'गोस्तीनी द्वोर' विभागात जावे लागले. आईची प्रकृती ठीक नव्हती आणि आन्ना फ्योदरोवनाला योग्य वेळी आळशीपणाचा झटका आला व अर्थातच कामगिरी माझ्यावर पडली. मी मात्र्योनासह तिकडे निघाले.

माझ्या सुदैवाने मला लौकरच पुष्कीनचा संच सापडला आणि त्याची बांधणीही सुरेख होती. मी किंमतीबाबत घासाघीस सुरू केली. प्रथम दुकानांपेक्षा जास्त किंमत मागत होते, पण मग खूप प्रयत्नांती, अनेकवेळा निघून जाण्याचे नाटक करून, व्यापाऱ्याला किंमत कमी करण्यास मी भाग पाडले व अखेरीस चांदीच्या* दहा रूबलवर किंमत आणली. सौदा करायला किती मजा वाटली मला!.. बिचाऱ्या मात्र्योनाला समजेना मला

---

* चांदीचा १ रूबल-नोटांमध्ये साडेतीन रूबल.

असे काय झाले होते आणि एवढी पुस्तके मी एकदम कशाला विकत घेत होते! पण हाय! माझे संपूर्ण भांडवल तीस रूबलच्या नोटांमध्ये सामावले होते आणि दुकानदार किंमत आणखी खाली आणायला मुळीच तयार नव्हता. मी त्याची खूप खूप विनवणी केली. त्याने माघार घेतली, पण फक्त अडीच रूबल कमी केले. देवाची साक्ष देऊन तो म्हणाला की, केवळ माझ्यासाठी त्याने ही किंमत कमी केली होती, मी छान तरुणी होते म्हणून तो असे वागला होता व दुसऱ्या कुणासाठीही त्याने अशी माघार घेतली नसती. आता मला अडीच रूबल कमी पडत होते! चिडीपायी मला रडू फुटण्याच्या बेतात होते. पण एका अनपेक्षित घटनेने माझी त्या संकटातून मुक्तता केली.

माझ्यापासून जवळच, पुस्तकांच्या दुसऱ्या मेजापाशी, म्हातारा पक्रोवस्की माझ्या दृष्टीला पडला. त्याच्याभोवती चार-पाच जुन्या पुस्तकांच्या विक्रेत्यांचा गराडा पडला होता. प्रत्येकजण त्याला आकर्षित करीत होता, स्वस्तात स्वस्त किंमती सांगत होता व त्याला त्या सगळयांचीच भुरळ पडत होती. बिचारा म्हातारा हताशपणे त्या विक्रेत्यांच्या कोंडाळ्यात उभा होता व नेमके काय खरेदी करावे हे त्याला सुचत नव्हते. मी त्याच्यापाशी गेले आणि तो तेथे काय करीत होता असे विचारले. मला पाहताच म्हाताऱ्याला अत्यानंद झाला. त्याचे जेवढे पेतेन्कावर प्रेम होते, तेवढेच कदाचित माझ्यावरही प्रेम होते. "पुस्तकं विकत घेतोय, वार्वारा अलेक्सेयेवना," तो उत्तरला, "पेतेन्कासाठी. लौकरच त्याचा वाढदिवस आहे, त्याला पुस्तकं आवडतात, म्हणून त्याच्यासाठी विकत घेतोय..." म्हातारा नेहमीच हास्यास्पद रीतीने खुलासे करायचा आणि आता तर त्याची पूर्ण भंबेरी उडाली होती. त्याने काहीही निवडले तरी किंमत— चांदीचा एक रूबल, दोन रूबल, चांदीचे तीन रूबल! मोठ्या पुस्तकांच्या तर तो किंमतीच विचारत नव्हता. नुसता आशाळभूतपणे त्यांच्याकडे पहायचा, चार पाने चाळायचा आणि परत जागच्या जागी ठेवून द्यायचा. "नाही, नाही, हे फार महाग," अस्पष्ट आवाजात तो म्हणाला, "कदाचित ही दुसरी?" आणि त्याने काही स्वस्त मासिके, गाण्यांची पुस्तके व पंचांगे पहायला आरंभ केला. "ही पुस्तकं कशाला विकत घेताय तुम्ही," मी त्याला विचारले, "ही भयंकर फालतू आहेत." तो म्हणाला: "नाही हो, किती छान पुस्तकं आहेत पहा! फार फार छान!" त्याच्या शेवटच्या शब्दांमध्ये रडवा सूर उमटलेला मला जाणवला. अधिक

चांगली पुस्तके फार महाग का आणि कोणत्याही क्षणी त्याच्या फिकट गालावरून लाल नाकावर टपोरा अश्रू टपकणार असे मला भासले. त्याच्यापाशी किती पैसे होते अशी मी पृच्छा केली. "हे पहा," चुरगळलेल्या वर्तमानपत्राच्या कागदातील पुरचुंडी खिशातून बाहेर काढत बिचारा म्हातारा म्हणाला, "हा अर्धा रूबल, वीस कोपेकचं नाणं, तांब्याचे कोपेक वीस." मी त्याला तावडतोब माझ्या विक्रेत्यापाशी ओढून नेले. "ही सर्व अकरा पुस्तकं फक्त साडेबत्तीस रूबलना मिळताहेत. माझ्यापाशी तीस आहेत. तुम्ही अडीच रूबल द्या आणि आपण ही सर्व पुस्तकं विकत घेऊन एकत्र भेट देऊ!" म्हातारा आनंदाने वेडा झाला. त्याने स्वत:जवळचे सर्व पैसे विक्रेत्याच्या हातांवर ठेवले व विक्रेत्याने आमच्या पुस्तकांचा बोजा म्हाताऱ्याच्या हाती दिला. म्हाताऱ्याने सर्व पुस्तके त्याच्या खिशांमध्ये कोंबली, बकोटींखाली धरली, दोन्ही हातांमध्ये पकडली व मला वचन दिले की, दुसऱ्या दिवशी ती सर्व पुस्तके तो मला गुपचूप घरी आणून देईल.

दुसऱ्या दिवशी म्हातारा मुलाकडे आला, तासभर त्याच्याकडे बसला, मग नेहमीप्रमाणे आमच्याकडे आला. अत्यंत मजेदार आणि गूढ मुद्रा करून तो माझ्यापाशी बसला. काहीतरी रहस्य स्वत:पाशी असल्याच्या अभिमानापायी आरंभी त्याने हसऱ्या मुद्रेने हात चोळले व नंतर मला सांगितले की, सर्व पुस्तके गुपचुपपणे आमच्या घरी आणण्यात आली होती, स्वयंपाकघरातील एका कोपऱ्यात रचून ठेवण्यात आली होती आणि मात्र्योना त्यांच्यावर देखरेख करीत आहे. मग संभाषणाचा ओघ स्वाभाविकपणे आगामी वाढदिवसाकडे वळला. आम्ही भेटवस्तू कशी देऊ याबाबत अत्यंत तपशीलवारपणे म्हातारा वर्णन करू लागला व जसजसा तो अधिक बोलू लागला, तसतसे मला जाणवू लागले की त्याच्या मनात काहीतरी सलत होते, पण ते उघडपणे बोलण्याचा अथवा नुसता त्याचा उल्लेख करण्याचाही त्याला धीर होत नव्हता. मी गप्प राहून वाट पहात होते. त्याच्या हातवाऱ्यांमधील, वेड्यावाकड्या मुद्रांमधील सुप्त समाधान, सुप्त आनंद, त्याच्या स्मितामधील चमक, त्याच्या डाव्या डोळ्याचे मिचकावणे, ह्या गोष्टी आता अदृश्य झाल्या होत्या. दर मिनिटागणिक तो अधिकाधिक अस्वस्थ आणि चिंताक्रांत बनत होता.

"बरं का," भीत भीत अस्फुट आवाजात तो बोलू लागला, "ऐका, वार्वारा अलेक्सेयेवना... तुम्हाला माहीत आहे का, वार्वारा अलेक्सेयेवना?"

म्हातारा कमालीचा भांबावला होता. "त्याच्या वाढदिवसाच्या वेळी तुम्ही दहा पुस्तकं घ्या आणि स्वत: त्याला भेट द्या, म्हणजे तुमच्या वतीनं! अकरावं पुस्तक मी घेईन आणि खुद्द माझ्या वतीनं त्याला भेट देईन! म्हणजे तुम्ही काही भेट दिली असं होईल आणि मीसुद्धा काहीतरी दिल्या-सारखं दिसेल. आपण दोघांनीही भेट दिली असं होईल." म्हातारा खूप गोंधळला व गप्प झाला. मी त्याच्याकडे नजर टाकली. माझ्या निर्णयाची तो भित्र्या अधीरेपणाने वाट पहात होता. "आपण एकत्रपणं भेट देऊ नये असं तुम्हाला का वाटतं, झखार पेत्रोविच?" मी विचारले. "अं... वार्वारा अलेक्सेयेवना, त्याचं असं आहे..." थोडक्यात म्हातारा बावरला, शरमला, शब्दांमध्ये घुटमळू लागला व जागचा हलू शकेना.

"त्याचं असं आहे," अखेरीस त्याने खुलासा केला. "वार्वारा अले-क्सेयेवना, अधूनमधून मी छंद करतो... म्हणजे मी तुमच्यापाशी कबूल करतो की, नेहमीच मी छंदात असतो... वागू नये असं वागतो... म्हणजे बाहेर काहीवेळा कमालीचा गारठा असतो, किंवा काहीतरी अप्रिय गोष्टी घडतात, अथवा कसलंतरी दु:ख होतं, काही वाईट घडतं आणि मग माझा संयम सुटतो आणि मग जरा जास्तच पिणं होतं. पेतेन्काला ही गोष्ट मुळीच आवडत नाही. तो माझ्यावर रागावतो, माझी खरडपट्टी काढतो आणि मला व्याख्यानं झोडतो. तर माझ्या भेटवस्तूमार्फत मी त्याला असं दाखवू इच्छितो की, मी सुधारतोय. पुस्तक विकत घेण्यासाठी मी खूप दिवसांपासून पैसे साठवतोय असं त्याला दिसेल, कारण त्याला माहीत आहे की माझ्यापाशी पैसे कधीही नसतात आणि कधीमधी तोच मला किरकोळ खर्चाला पैसे देतो. तर मी अशा रीतीनं पैसे खर्च केले, त्याच्या एकट्यासाठी मी पैसे साठवले, हे त्याला समजेल."

मला म्हाताऱ्याची विलक्षण दया आली. मी फार वेळ विचार केला नाही. म्हातारा माझ्याकडे चिंतायुक्त नजरेने पहात होता. "ऐका, झखार पेत्रोविच," मी म्हणाले, "तुम्हीच सगळी त्याला भेट द्या." "काय, सगळी? म्हणजे सगळी पुस्तकं?" "होय, सगळी पुस्तकं!" "माझ्या वतीनं?" "तुमच्या वतीनं!" "फक्त माझ्या एकट्याच्या वतीनं? म्हणजे माझ्या नावानं?" "होय, तुमच्या नावानं!" खरे म्हणजे मी अगदी स्पष्टपणे सांगितले, पण म्हातारा खूप वेळपर्यंत माझे बोलणे समजू शकला नाही.

"खरंच," विचारमग्न होत तो म्हणाला, "हे असं फार छान होईल,

फारच सुरेख! पण तुमचं काय वार्वारा अलेक्सेयेवना?" "माझं काय? मी काहीही भेट देत नाही." "असं कसं?" म्हातारा घाबरून ओरडला. "म्हणजे तुम्ही पेतेन्काला काहीही भेट देत नाही, म्हणजे त्याला काहीही भेट देण्याची तुमची इच्छा नाही?" म्हातारा पुरता हबकला होता. ह्या क्षणाला तो स्वत:चा प्रस्ताव माघारी घ्यायला तयार झाला होता, म्हणजे मी त्याच्या मुलाला काहीतरी भेट देऊ शकले असते. म्हातारा अत्यंत भला होता! मी त्याची खात्री पटविली की, त्याच्या मुलाला काहीतरी भेट द्यायला मला आनंदच वाटला असता, पण त्याच्या आनंदावर विरजण घालायची माझी इच्छा नव्हती. "जर तुमच्या मुलाचं समाधान होणार असेल," मी पुढे म्हणाले, "आणि तुम्हाला आनंद होणार असेल, तर मलाही आनंद होईल, कारण मनातल्या मनात, गुप्तपणानं, मला जाणीव होत राहील की, जणू मीच त्याला भेट दिली!" ह्यावर मात्र म्हातारा पूर्ण शांत झाला. त्यानंतर आणखी दोन तास तो आमच्याकडे होता, पण त्या काळात एका जागी स्वस्थ बसणे त्याला शक्य झाले नाही. सारखा उठत होता, वटवटत होता, गोंगाट करत होता, साशाच्या खोड्या काढत होता, माझ्या हळूच पाप्या घेत होता आणि माझ्या हाताला चिमटे काढत होता व आन्ना फ्योदरोवनाचे लक्ष नसे तेव्हा तिला वाकुल्या दाखवत होता. आन्ना फ्योदरोवनाने अखेर त्याला घरातून पिटाळून लावले. थोड-क्यात, म्हातारा आनंदाने एवढा कधीच फुलला नव्हता.

प्रत्यक्ष वाढदिवसावेळी तो बरोब्बर अकरा वाजता अवतीर्ण झाला. चर्चमधील प्रार्थनेनंतर तो थेट आला होता. व्यवस्थित रफू केलेला फ्रॉक-कोट त्याने घातला होता व खरोखरीच नवी बंडी आणि नवे बूट परिधान केले होते. त्याच्या दोन्ही हातांमध्ये पुस्तकांची पार्सले होती. त्यावेळी आम्ही आन्ना फ्योदरोवनाच्या दिवाणखान्यात बसून कॉफी पीत होतो (तो रविवार होता). पूष्कीन फार थोर कवी होता अशी म्हाताऱ्याने बोल-ण्याची सुरुवात केली. पण मग त्याचा एकदम गोंधळ झाला आणि माणसाने चांगले वागले पाहिजे व माणूस जर चांगला वागला नाही, तर तो व्यसनी बनतो, ती व्यसने त्याचा नाश करतात, माणसाचा अध:पात करतात, ह्या विषयावर त्याने प्रवचन चालू केले. अविचारापायी नाश पावलेल्या लोकांची त्याने काही उदाहरणे दाखल केली व अखेरीस सांगितले की, गेल्या काही काळात त्याने आपले वर्तन पूर्ण सुधारले होते आणि आता तो व्यवस्थित आदर्श वागत होता. त्याच्या मुलाच्या शब्दांचे महत्त्व त्याला

नेहमी उमजत होते, ते शब्द त्याच्या काळजाला भिडत होते, पण आता त्यांना तो खरोखरीच कृतीत आणत होता, असे तो म्हणाला. त्याचा पुरावा म्हणून, दीर्घ काळ त्याने साठवलेल्या पैशामधून विकत घेतलेली पुस्तके त्याच्या मुलाने वाढदिवसाची भेट म्हणून स्वीकारावीत, अशी त्याने विनंती केली.

बिचाऱ्या म्हाताऱ्याचे बोलणे ऐकून मला हसू आणि आसू आवरेनात. गरज पडली तेव्हा मस्त खोटे बोलला होता! पुस्तके पक्रोवस्कीच्या खोलीत फडताळावर नेऊन ठेवण्यात आली. खरा प्रकार पक्रोवस्कीच्या तात्काळ ध्यानात आला. म्हाताऱ्याला जेवणाचे निमंत्रण देण्यात आले. ह्या दिवशी आम्ही सगळे खूप मजेत होतो. जेवणानंतर आम्ही पेनल्टीचा खेळ खेळलो, पत्ते खेळलो. साशा खूप खट्याळपणा करत होती आणि मीही खट्याळपणात कसूर ठेवत नव्हते. पक्रोवस्की माझ्याकडे सतत ध्यान देत होता आणि चार शब्द माझ्याशी एकांतात बोलण्यासाठी धडपडत होता, पण मी त्याला तशी संधी देत नव्हते. चार वर्षांच्या काळात माझ्या आयुष्यातील तो सर्वांत आनंदी दिवस होता.

आता यापुढील सर्व आठवणी दुःखद, कष्टदायी आहेत. माझ्या काळ्या दिवसांची कहाणी सुरू होतेय. म्हणूनच कदाचित माझी लेखणी हळू चालू लागलीय; जणू पुढे लिहायला ती नकार देतेय. त्यामुळेच कदाचित माझ्या सुखी काळामधील बारीक-सारीक आठवणीसुद्धा मी एवढ्या आवडीने तपशीलवार वर्णन केल्या. ते दिवस फार थोडे होते. त्यांच्या जागी दुःख आले, अतीव कटु दुःख आले आणि ते कधी सरणार केवळ देवच जाणे!

पक्रोवस्कीच्या आजारापासून आणि मरणापासून माझे दुर्भाग्य सुरू झाले.

या ठिकाणी मी वर्णन केलेल्या घटनांनंतर दोन महिन्यांनी तो आजारी पडला. ह्या दोन महिन्यांमध्ये अर्थप्राप्तीसाठी त्याने अपार कष्ट केले, कारण अद्याप त्याच्या जीवनात आर्थिक स्थैर्य नव्हते. सर्व क्षयी माणसां-प्रमाणे, दीर्घ काळ जगण्याची आशा मृत्यू समीप येईपर्यंत त्याने सोडली नव्हती. त्याला मास्तरकी कुठेतरी मिळाली असती. पण त्याला त्या व्यवसायाचा मनस्वी तिटकारा होता. वाईट प्रकृतीपायी सरकारी नोकरी करणे त्याला शक्य नव्हते. शिवाय तेथे पहिल्या पगारासाठी प्रदीर्घ काळ वाट पहावी लागली असती. थोडक्यात, पक्रोवस्की सर्वत्र अपयश अनुभवीत होता. त्याचा स्वभाव विचित्र बनला होता. त्याची प्रकृती बिघडली. त्याच्या हे ध्यानात आले नाही. शरदाचा मोसम सुरू झाला, स्वतःच्या

नोकरीसाठी प्रयत्न करायला, लोकांच्या विनवण्या करायला, त्यांना विनंत्या करायला – ज्याचा त्याला मनातून खूप त्रास होत होता – रोजच्या रोज तो केवळ एका पातळ कोटात बाहेर जात होता. पावसात तो भिजत होता, त्याचे पाय ओले बनत होते आणि अखेरीस त्याने जे अंथरूण धरले ते परत कधी सोडलेच नाही... ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीला, शरदाच्या मोसमाने ऐन जोर धरला होता तेव्हा तो मेला.

त्याच्या आजाराच्या सर्व काळात त्याला एकट्याला त्याच्या खोलीत मी कधीही सोडले नव्हते, सतत त्याची सेवा-शुश्रूषा करीत होते. अनेकदा रात्र रात्र जागून काढत होते. तो क्वचित शुद्धीवर असायचा. वारंवार त्याला भ्रम व्हायचा. काय काय बरळायचा देवच जाणे! स्वतःच्या नोकऱ्यांबद्दल, पुस्तकांबद्दल, माझ्याबद्दल, वडिलांबद्दल... त्यातून मला यापूर्वी माहीत नसलेली अथवा ज्याबद्दल मी कधी तर्कसुद्धा केले नव्हते अशी खूप माहिती समजली. त्याच्या आजाराच्या आरंभी घरातील सर्व माणसे माझ्याकडे विचित्र नजरेने पहात होती. आन्ना फ्योदरोवना मानेला झटके द्यायची... पण मी सर्वांच्या नजरेला थेट नजर भिडवायची आणि हळूहळू मी करीत असलेल्या पक्रोवस्कीच्या शुश्रूषेबद्दल चर्चा करणे त्यांनी थांबविले. निदान माझी आई त्या विषयावर बोलायची थांबली.

कधी कधी पक्रोवस्की मला ओळखायचा, पण असे क्वचित घडायचे. तो जवळ जवळ सतत भ्रमात असायचा. कधी कधी सबंध रात्रभर तो कुणाशी तरी संदिग्ध, अस्पष्ट शब्दांमध्ये बोलत रहायचा. त्याचा घोगरा आवाज त्या छोट्या खोलीत एखाद्या पोकळीत घुमावा तसा घुमायचा. अशा वेळी मला खूप भीती वाटायची. विशेषतः अखेरच्या रात्री तो अनावर बनला होता. त्याची तळमळ चालली होती, तो तगमगत होता. त्याचे कण्हणे माझे काळीज विदीर्ण करीत होते. घरातील सर्वजण घाबरले होते. देवाने त्याला लौकर स्वतःपाशी न्यावे म्हणून आन्ना फ्योदरोवना सतत देवाची आळवणी करीत होती. डॉक्टरना बोलाविण्यात आले. डॉक्टर म्हणाले की, रोगी सकाळपर्यंत नक्की मरणार.

म्हाताऱ्या पक्रोवस्कीने सबंध रात्र मुलाच्या खोलीच्या दाराशी कॉरी-डॉरमध्ये जागून काढली. तेथे त्याला एक जाजम घालून दिले होते. तो वारंवार खोलीत यायचा. त्याच्याकडे पहायला भीती वाटत होती. दुःखा-पायी तो पूर्णतया बधीर बनला होता. भीतीपायी त्याचे डोके लटलटत होते. त्याचे सर्वांग थरथर कापत होते, तो सतत स्वतःशी पुटपुटत होता, कशा-

बद्दल तरी स्वतःशीच वाद घालत होता. मला भासले की, दुःखापायी तो वेडा होणार!

मानसिक वेदनांपायी थकलेला म्हातारा पहाटेपूर्वी त्याच्या जाजमावर मेल्यागत झोपी गेला. आठ वाजायच्या सुमाराला त्याच्या मुलाची मरणवेळा सुरू झाली. मी म्हाताऱ्याला जागे केले. पक्रोवस्की पूर्ण शुद्धीवर होता आणि त्याने आम्हा सर्वांचा निरोप घेतला. आश्चर्य! मी रडू शकले नाही, पण माझ्या मनाच्या चिंध्या झाल्या.

त्याच्या अखेरच्या क्षणांनी माझी अत्यंत घालमेल केली. अडखळत्या जिभेने तो खूप खूप वेळ काहीतरी विनवीत होता, पण मला त्याचा एकही शब्द समजत नव्हता. माझे काळीज वेदनेने फुटत होते. सबंध तास तो अस्वस्थ होता, त्याला काहीतरी खुपत होते. आपल्या थंडगार हातांनी खुणा करून दाखवीत होता, मग परत घोगऱ्या आवाजात विनवू लागला. पण त्याचे शब्द म्हणजे केवळ संदिग्ध ध्वनी उमटत होते व परत मी काहीही समजू शकले नाही. घरातील सर्वांना मी त्याच्यापाशी घेऊन गेले, त्याला पाणी प्यायला दिले. पण तो सतत खेदाने डोके हलवीत होता. त्याला काय पाहिजे होते ते शेवटी मला समजले. खिडकीवरील पडदा बाजूला सारा आणि दिवसाचा उजेड दाखवा, असे तो मला सांगत होता. दिवसाचे, सूर्यदेवाचे अखेरचे दर्शन घ्यायची त्याची इच्छा होती. मी पडदा बाजूला सारला. पण सुरू होणारा दिवस शोकपूर्ण आणि दुःखी होता. मरणाऱ्याच्या गरीब बिचाऱ्या विझणाऱ्या जीवनासारखा! सूर्यप्रकाश नव्हता. मेघांनी आकाशावर धुक्याचे आवरण घातले होते. आकाश पावसाळी, खिन्न, दुःखी होते. झिमझिम पावसाची खिडकीच्या काचेच्या तावदानावर पिरपिर ऐकू येत होती. थंड, घाण पाण्याचे ओघळ काचेवरून वाहात होते. वातावरण अंधुक आणि अंधारे होते. फिकट दिवसाच्या उजेडाचे किरण खोलीत घुसत होते व तसबिरीसमोरील दिव्याच्या थरथरणाऱ्या ज्योतीशी क्षीण स्पर्धा करीत होते. मरणशय्येवरील पक्रोवस्कीने माझ्याकडे दीन केविलवाण्या नजरेने पाहिले व डोके हलविले. एक मिनिटानंतर तो मेला.

दफनाची व्यवस्था खुद्द आन्ना फ्योदरोवनाने केली होती. अत्यंत साधी दफनपेटी विकत घेतलेली होती व सामान्य गाडी भाड्याने आणली होती. त्या खर्चाच्या भरपाईखातर आन्ना फ्योदरोवनाने मयताची सर्व पुस्तके व त्याच्या इतर वस्तू ताब्यात घेतल्या. म्हातारा तिच्याशी खूप भांडला,

जेवढी पुस्तके तिच्यापासून परत घेता येतील तेवढी त्याने घेतली, त्या पुस्तकांना त्याने स्वतःच्या खिशांमध्ये कोंबले, टोपीखाली कोंबले. सतत तीन दिवस ती पुस्तके तो जवळ बाळगून होता आणि चर्चमध्येसुद्धा त्याने ती पुस्तके बरोबर नेली. ते सगळे दिवस जणू तो भानावर नव्हता, त्याचा विवेक सुटल्यासारखा वाटत होता, शवपेटीभोवती तो सतत घुटमळत होता. कधी मयताच्या अंगावरील देवाच्या तसबिरींची फीत सरळ करीत होता, तर कधी मेणबत्त्या पेटवत होता अथवा विझवत होता. त्याचे विचार एका जागी स्थिरावू शकत नव्हते हे स्पष्ट दिसत होते. ना आई, ना आन्ना फ्योदरोवना चर्चमधल्या अंत्यविधींना हजर राहू शकल्या. आई आजारी होती आणि आन्ना फ्योदरोवनाने चर्चमध्ये जायची तयारी केली होती, पण तेवढ्यात तिचे म्हाताऱ्याशी परत भांडण झाले व ती घरातच थांबली. फक्त एकटी मी व म्हातारा, असे दोघेच गेलो. धार्मिक विधींच्या वेळी मला कुठल्यातरी भीतीने घेरले. जणू भावी संकटांची चाहूल लागली. चर्चमध्ये मी कशीबशी उभी राहू शकले. अखेरीस शवपेटी झाकण्यात आली, तिला खिळे ठोकण्यात आले व गाडीवर ठेवून स्मशानात नेण्यात आले. रस्त्याच्या टोकापर्यंतच फक्त मी तिची सोबत केली. गाडीवानाने गाडी पिटाळली. म्हातारा तिच्यामागे धावत होता आणि मोठ्यांदा आक्रोश करीत होता. धावण्यापायी त्याच्या रडण्यात कंप उमटत होता, खंड पडत होता. बिचाऱ्याची टोपी खाली पडली, पण ती उचलायला तो थांबला नाही. पावसामुळे त्याचे डोके भिजत होते, वाऱ्याचा जोर चढत होता, तोंडाला गारठा झोंबत होता. पण म्हाताऱ्याचे वाईट हवेकडे लक्ष नव्हते असे दिसत होते. गाडीच्या एका बाजूपासून दुसऱ्या बाजूकडे तो रडत रडत धावत होता. त्याच्या कोटाची टोके पंखांप्रमाणे वाऱ्यावर फडफडत होती. सगळ्या खिशांमधून पुस्तके डोकावत होती. त्याच्या हातांमध्ये एक भलामोठा ग्रंथ होता व त्याने त्याला गच्च धरले होते. जवळून जाणारी माणसे टोप्या उतरवून क्रूस-चिन्हे करीत होती. काही लोक थांबून म्हाताऱ्याकडे विस्मयाने पहात होते. त्याच्या खिशांमधील पुस्तके मधून-मधून खाली चिखलात पडत होती. लोक त्याला थांबवून त्या पुस्तकांकडे त्याचे लक्ष वेधत होते. तो पुस्तके उचलायचा आणि परत शवपेटीमागे धावू लागायचा. रस्त्याच्या कोपऱ्याशी एक म्हातारी भिकारीण शवपेटीमागे त्याची सोबत करू लागली. अखेरीस गाडी कोपऱ्यावर वळली आणि रस्त्याआड दिसेनाशी झाली. मी घरी गेले. आईच्या छातीवर मी विव्हळत

कोसळले. मी तिला माझ्या हातांनी घट्ट घट्ट मिठी मारली, तिची चुंबने घेतली व हुंदकून हुंदकून रडू लागले. मृत्यूच्या पंजापासून माझा अखेरचा उरलेला स्नेही सुरक्षित रहावा म्हणून जणू मी तिला बाहुपाशात घट्ट धरून ठेवले... पण बिचाऱ्या आईवर एव्हाना मृत्यू घोटाळत होता!

. . . .

११ जून

बेटांवरच्या कालच्या सहलीबद्दल मी तुमची खूप आभारी आहे, मकार अलेक्सेयेविच! तिथे फार ताजी, छान हवा होती. मस्त हिरवेगारं दिसत होते! अशी हिरवळ आणि झाडी फारा दिवसात मी पाहिली नव्हती. जेव्हा मी आजारी होते, तेव्हा मला वाटले होते की, मी मरणार आणि अगदी नक्की मरणार! त्यामुळे काल मला काय वाटले असेल त्याची जरा कल्पना करा! काल मी तशी कष्टी होते म्हणून माझ्यावर रागावू नका. मला खूप छान, खूप हलके वाटत होते. पण माझ्या अत्यंत छान क्षणांना का कुणास ठाऊक, मी दुःखी बनते. जर मी रडले तर त्यामागे काही विशेष कारण नसते. मी का रडते ते माझे मलाच ठाऊक नसते. प्रत्येक गोष्ट मला मनस्वीपणे जाणवते. माझे अनुभव वेदनादायी असतात. निरभ्र, फिकट आकाश, मावळतीचा सूर्य, सायंकालीन स्तब्धता – ह्या सर्व गोष्टी, मला माहीत नाही, पण काल मी अगदी सहज हेलावून जाण्याच्या मनःस्थितीत होते, माझे काळीज भारावले होते आणि मन अश्रूंची मागणी करीत होते. पण हे सारे कशाला लिहितेय मी? माझ्या काळजात हे सर्व अस्पष्ट आहे आणि त्याचे कथन करणे जास्तच अवघड आहे. पण तुम्ही कदाचित मला समजून घ्याल. आसू आणि हसू! खरेच, तुम्ही किती प्रेमळ आहात, मकार अलेक्सेयेविच! माझ्या डोळ्यांमध्ये काय होते, मला काय जाणवत होते, ते वाचण्यासाठी काल तुम्ही माझ्याकडे पहात होतात आणि माझ्या उल्हासात आनंद मानीत होतात. झुडूपे असोत, झाडांच्या दुतर्फा रांगा असोत, पाणथळी जागा असोत, तुम्ही तेथे होतात. माझ्यासमोर आनंदी मुद्रेने उभे होतात, माझ्या डोळ्यांमध्ये पहात होतात, जणू स्वतःची इस्टेट दाखविल्याच्या थाटात फिरत होतात. तुमचे अंतःकरण प्रेमळ आहे हेच त्यातून दिसते, मकार अलेक्सेयेविच! ह्याचसाठी तुम्ही

मला आवडता. आता तुमचा निरोप घेते. आज मी परत आजारी पडलेय. काल माझे पाय भिजले आणि त्यामुळे थंडीची बाधा झालीय. फेदोरासुद्धा आजारी आहे. तेव्हा आता आम्ही दोघीही अपंग आहोत. मला विसरू नका, वारंवार आमच्याकडे या.

तुमची,

वा. दो.

१२ जून

माझ्या कबूतरा, वार्वारा अलेक्सेयेवना!

लाडके, मला वाटले होते की, कालच्या संध्याकाळबद्दलचे तुमच्या मनातील पडसाद तुम्ही काव्यरूपाने लिहाल, पण तुम्ही एक साधा कागद धाडलात. मला असे म्हणायचे आहे की, तुम्ही त्या एका कागदात अगदी कमी मजकूर लिहिला असला, तरी तो खूप छान आणि गोड आहे. निसर्ग, वेगवेगळी निसर्गदृश्ये आणि मनात उमटलेले पडसाद—थोडक्यात, ह्या सर्व गोष्टी छान वर्णन केल्यात. माझ्या ठायी हा गुण नाही. दहा पाने खरडली तरी त्यातून काहीही उमटत नाही. एव्हाना मी प्रयत्न करून पाहिलेत. माझ्या जिवलगा, तुम्ही मला लिहिता की, मी प्रेमळ माणूस आहे, दुष्ट नाही, जवळच्या माणसाचे वाईट करू शकणार नाही आणि निसर्गात प्रकट होणाऱ्या देवाच्या भलेपणाला प्रतिसाद देतो. आणखीही तुम्ही माझे खूप गुण गायलेत. हे सर्व खरे आहे, लाडके, अगदी पूर्ण खरे आहे. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे खरेच मी तसा आहे आणि मला ते माहीत आहे. पण तुमचे तसे लिहिणे वाचले म्हणजे काळीज विरघळू लागते, मग मन कुढू लागते. माझ्या प्राणप्रिये, आता माझी हकीकत तुम्हाला सांगतो.

मी नोकरीवर प्रथम दाखल झालो तेव्हा अवघा सतरा वर्षांचा होतो आणि लौकरच आता माझ्या नोकरीला तीस वर्षे पूर्ण होतील. ह्या काळात अनेक गणवेष मी झिजवले असे म्हणायला हरकत नाही. वयाने वाढलो, अधिक शहाणा बनलो, वेगवेगळी माणसे पाहिली. मी आयुष्य जगलो आणि एकदा तर सन्मानपदक देण्याच्या बेतात होते. कदाचित ह्यावर तुमचा विश्वास बसणार नाही, पण खरेच मी तुम्हाला थापा मारत नाही. काय करणार लाडके, काही दुष्ट माणसांनी त्यात खो घातला! मी जरी अडाणी आणि मूर्ख माणूस असलो, तरी इतरांप्रमाणेच मलाही काळीज

आहे. तुम्हाला ठाऊक आहे वारेन्का, त्या दुष्ट माणसांनी माझे काय केले? सांगायला लाज वाटते — कशासाठी त्यांनी असे केले? कारण मी नम्र आहे, कारण मी शांत आहे, कारण मी भला आहे! त्यांना मी आवडलो नाही, म्हणून तसे घडले. आरंभ झाला: "मकार अलेक्सेयेविच असा आहे — तसा आहे"; मग सुरू झाले: "त्या मकार अलेक्सेयेविचपाशी विचारूच नका!" आता शेवटी निष्कर्ष असा: "अर्थातच, मकार अलेक्सेये-विच कारणीभूत!" पाहिलेत, गोष्टी कोणत्या थराला गेल्या? सगळे खापर मकार अलेक्सेयेविचच्या टाळक्यावर फोडायचे. आमच्या सबंध कचेरीत माझे नाव कुप्रसिद्ध बनवले आहे त्या लोकांनी! पण एवढ्यावर त्यांचे समाधान झाले नाही. माझ्या बुटांबद्दल, माझ्या गणवेषाबद्दल, माझ्या केसांबद्दल आणि माझ्या आकृतीबद्दलही शेरे मारण्यात येऊ लागले. माझ्या सर्व गोष्टी चुकीच्या होत्या आणि त्यांच्यात सुधारणा करणे आवश्यक होते! असा प्रकार वर्षानुवर्षे, रोजच्या रोज, माझ्या आठवणीत असलेल्या दिवसांपासून चालत आला आहे. एव्हाना ह्या गोष्टींची मला सवय झाली आहे, कोणत्याही गोष्टीची सवय मी करून घेऊ शकतो, कारण मी एक छोटा, नगण्य माणूस आहे. पण तरीही, हे सर्व कशासाठी? मी कुणाचे वाईट केले होते? कुणाची बढती हिरावून घेतली? वरिष्ठां-समोर कुणाची नालस्ती केली? बक्षिसी मागितली? कुठले कारस्थान रचले? अशा गोष्टी नुसत्या मनात आणणेदेखील पाप आहे! काय गरज आहे मला ह्या सगळ्याची? माझ्या प्राणप्रिये, तुम्हीच पहा, महत्त्वाकांक्षी आणि कपटी बनायला मी पुरेसा चतुर आहे का? मग माझ्यावर ही लांच्छने का लादतात? तुम्ही मला लायक माणूस समजता आणि तुम्ही त्या सर्वांपेक्षा अधिक उत्तम आहात, लाडके. शेवटी सर्वांत मोठा नागरी गुण कोणता? येवस्ताफी इवानोविच काल खाजगी चर्चेत म्हणाले की, पैसा करणे हाच सर्वांत मोठा नागरी गुण. अर्थात ते विनोदाने तसे म्हणाले (ते विनोदी आहेत हे मला माहीत आहे), पण त्यावरून घ्यायचा बोध म्हणजे कुणी कुणावर स्वतःचे ओझे लादू नये आणि मी कुणावरही माझा बोजा टाकलेला नाही. माझी भाकरी मी मिळवतो, अर्थात ती साधी असेल, कदाचित शिळी असेल, पण आहे. श्रमांनी मिळविलेली आणि कायदेशीरपणे खाल्लेली. पण काय करणार! मला माहीत आहे की, मी नकला लिहितो म्हणजे काही मोठा पराक्रम गाजवत नाही. पण तरीही मला माझ्या कामाचा अभिमान वाटतो, मी निढळाचा घाम गाळतो.

आणि नकला लिहिण्यात वाईट काय आहे? ते पाप आहे? "तो नकला लिहितोय!" "हा कचेरीतला उंदीर नकला खरडतोय!" पण ह्यात अप्रामाणिकपणा कुठे आहे? माझे लेखन व्यवस्थित आणि पहायला छान असते व महामहीम त्यावर खूष आहेत. त्यांच्या सर्व महत्त्वाच्या कागदपत्रांच्या मी नकला करतो. पण शैली नाही, मला स्वतःला माहीत आहे, नाही माझ्यापाशी ती नतद्रष्ट शैली! म्हणूनच मला नोकरीत कधी बढती मिळाली नाही. माझ्या वारेन्का, आत्ता मी तुम्हाला लिहितोय तेसुद्धा अगदी सामान्य रीतीने, डोक्यात विचार येतात तसे लिहितोय... मला हे सर्व ठाऊक आहे. पण जर प्रत्येकजण सुरेख लिहू लागला, तर नकला कोण करणार? मी तुम्हाला हा प्रश्न विचारतोय आणि तुम्ही त्याचे मला उत्तर द्या. मला आता जाणीव आहे की, माझी गरज आहे, माझी आवश्यकता आहे आणि त्यांनी मला बोचकारणे बंद करावे. मी तसा दिसत असेन तर खुशाल मला "कचेरीतला उंदीर" म्हणोत. पण हा उंदीर आवश्यक आहे ना? हा उंदीर उपयुक्त आहे ना? आणि ह्या उंदराला पगार द्यावा लागतो ना? हा बघा कसा आहे उंदीर! मला वाटते, हा विषय आता पुरे. वस्तुतः त्याबाबत लिहिण्याचा माझा इरादा नव्हता, पण मनाचा थोडा तोल सुटला. अधूनमधून असा हिशेब चुकता करणे चांगले असते. अच्छा, माझ्या प्राणप्रिये, माझ्या कबूतरा, माझ्या प्रेमळ सांत्वनकर्त्री! येईन, तुमच्याकडे नक्की येईन, माझ्या देवदूता! तोवर उदास राहू नका. तुमच्यासाठी पुस्तक आणीन. अच्छा, वारेन्का.

तुमचा मनःपूर्वक हितेच्छु,

मकार देवूष्कीन.

२० जून

माननीय महाशय, मकार अलेक्सेयेविच!

मी घाईघाईने तुम्हाला लिहितेय, कारण मला काम लौकर संपवायचे आहे. काम असे आहे: चांगला सौदा पटविण्याची संधी आली आहे. फेदोरा म्हणतेय की, संपूर्ण गणवेष – विजार, बंडी, टोपीसकट – अगदी नवाकोरा, कुणी स्वस्तात विकू इच्छितोय. तुम्ही विकत घेता का? सध्या तुमची परिस्थिती वाईट नाही, तुमच्यापाशी पैसेही आहेत. तुम्हीच म्हणता की पैसे आहेत. आता कृपया चिकूपणा करू नका, ह्या सगळ्या गरजेच्या वस्तू

आहेत. जरा स्वतःकडे बघा – कसल्या जुनाट कोटात वावरता! शरम वाटते! सगळीकडे ठिगळे लावलेली. नवे कपडे तुमच्यापाशी नाहीत. मला हे माहीत आहे, पण तरीही तुम्ही खात्री पटवू पाहता की नवे कपडे आहेत. त्या नव्या कपड्यांचे तुम्ही काय केलेत ते देवच जाणे! तर माझे ऐका आणि कृपया हा गणवेष खरेदी करा. माझ्यासाठी एवढे करा. जर माझ्यावर प्रेम असेल, तर कपडे विकत घ्या.

तुम्ही मला भेट म्हणून काही कापड पाठवलेत. अहो मकार अलेक्सेयेविच, तुम्ही स्वतःचा नाश करून घेत आहात. माझ्यासाठी केवढी रक्कम खर्चलीत! उधळेपणा करायला फार आवडतो तुम्हाला! मला काही गरज नव्हती. अगदी निष्कारण हे सारे केलेत. मला ठाऊक आहे, माझी खात्री आहे की तुम्ही माझ्यावर प्रेम करता. अशा भेटवस्तू देऊन त्या प्रेमाची मला आठवण करून देण्याची गरज नाही. तुमच्याकडून त्यांचा स्वीकार करताना मला जड जाते. तुम्हाला त्यांची किती किंमत मोजावी लागते ते मला माहीत आहे. एकदाच आणि कायमचे सांगते, पुन्हा असे कधीही वागू नका. समजले? तुम्हाला विनंती करते, तुमची विनवणी करते. मकार अलेक्सेयेविच, तुम्ही माझ्याकडे माझ्या टिपणांच्या पुढील भागाची मागणी केली आहे व मी त्यांचे लेखन पूर्ण करावे असे लिहिले आहे. इथवरचे लेखन माझ्याकडून कसे झाले ते माझे मलाच ठाऊक! पण माझ्या भूतकाळाबद्दल बोलायला माझ्यापाशी आता बळ नाही. आणि त्या-बद्दल विचार करायची माझी इच्छा नाही. भूतकाळाचा उल्लेख करायला अथवा त्याचा नुसता विचार करायलाही मी घाबरते. त्या आठवणी मला घाम फोडतात. आणि ह्या राक्षसांच्या तावडीत आपले मूल सोडून गेलेल्या माझ्या गरीब बिचाऱ्या आईबद्दल बोलणे तर मला सर्वांत कठीण जाते. एका आठवणीने माझ्या काळजातून भळभळा रक्त वाहू लागते. ती आठवण अजून ताजी आहे. त्या घटनेला वर्ष उलटून गेले तरी अजून मी पूर्णपणे स्वतःला सावरू शकलेली नाही, मग शांत होणे तर दूरच. पण तुम्हाला सर्व माहीतच आहे!

आन्ना फ्योदरोवनाच्या मनात सध्या काय चालले आहे त्याबद्दल मी तुम्हाला सांगितलेच आहे. माझ्यावर ती कृतघ्नपणाचा आरोप करते आणि श्रीयुत बीकोव यांच्या कृतीशी तिचा मुळीच संबंध नाही असे म्हणते! ती मला स्वतःकडे बोलावतेय. ती म्हणते, मी भिकेवर जगतेय आणि मी वाईट मार्गाला लागलेय. म्हणते, जर मी तिच्याकडे परत गेले, तर

श्रीयुत बीकोव यांच्याबरोबरील सर्व भानगडी ती मिटवील आणि त्यांनी माझ्याबाबत केलेल्या अपराधांची भरपाई करायला त्यांना भाग पाडील. ती म्हणते की, श्रीयुत बीकोव मला हुंडा देऊ इच्छितात. मरोत ते! इथे तुमच्याबरोबर मला छान वाटते आणि प्रेमळ फेदोरा मला माझ्या मयत दाईची आठवण करून देते. तुम्ही माझे जरी दूरचे नातेवाईक असलात, तरी तुमचे नाव माझ्या रक्षणाला पुरेसे आहे. त्यांना मी जाणू इच्छित नाही. शक्य झाले तर त्यांना विसरून जाईन. आणखी काय पाहिजे त्यांना माझ्यापासून? फेदोरा म्हणते की, ह्या सगळ्या गावगप्पा आहेत आणि शेवटी ते माझा नाद सोडतील! देव तशी कृपा करो!

वा. दो.

२१ जून

माझ्या कबूतरा, लाडके!

लिहायची इच्छा आहे, पण आरंभ कुठून करावा समजत नाही. लाडके, किती विचित्र रीतीने आपण रहात आहोत. मला म्हणायचे आहे की, असे आनंदाचे दिवस यापूर्वी मी कधीही अनुभवले नव्हते. देवाने मला घराचा आणि कुटुंबाचा जणू लाभ करून दिला आहे! माझ्या मुली, तू फार छान आहेस! मी तुम्हाला पाठवलेल्या त्या चार सदऱ्यांबाबत एवढ्या कासावीस कशाला बनता? तुम्हाला त्यांची गरज होती असे मला फेदोराकडून समजले होते. तुम्हाला आनंद देण्यात मला विशेष सुख होते, लाडके. आणि माझ्या ह्या सुखात तुम्ही विघ्न आणू नका, माझ्याशी ह्याबाबत वाद घालू नका. यापूर्वी माझ्या आयुष्यात असे कधीही घडले नव्हते. आता मी समाजात मिसळू लागलोय. सर्वप्रथम, मी दुप्पट जगतोय, कारण माझे आयुष्य अधिक तेजस्वी बनवायला तुम्ही रस्त्यापलिकडेच रहात आहात. दुसरी गोष्ट म्हणजे आज माझ्या एका शेजाऱ्याने मला चहाला बोलाविले आहे. तोच अंमलदार राताझ्यायेव, ज्याच्याकडे साहित्यिक संध्याकाळी साजऱ्या होतात. आज मैफल भरणार आहे. साहित्यवाचन करणार आहोत. लाडके, पाहिलेत आम्ही कसे आहोत! अच्छा. कोणताही खास हेतू मनी न धरता मी लिहिले. केवळ माझी खुशाली कळविण्यासाठी. माझ्या प्राणा, तुम्हाला कशीदाकामासाठी रंगीत रेशमाच्या लडींची गरज आहे असे थेरेसाकडून तुम्ही मला कळवलेय. लाडके, मी नक्की विकत घेईन. उद्याच

तुमची मागणी पूर्ण केल्याचा आनंद मी अनुभवीन. कुठे विकत घ्यायचे हेसुद्धा माहीत आहे.

तुमचा हार्दिक स्नेही,

मकार देवूष्कीन.

२२ जून

माननीय बाईसाहेब, वार्वारा अलेक्सेयेवना!

माझ्या प्राणप्रिये, तुम्हाला कळविण्यास वाईट वाटते की, आमच्या घरात एक अत्यंत दु:खद घटना घडली! फार फार शोकदायी! आज पहाटे चारनंतर गोर्श्कोवचा मुलगा मेला. मात्र कशामुळे तो मेला ते मला माहीत नाही. लोहितांग ज्वराने अथवा दुसऱ्या कशामुळे, देव जाणे! गोर्श्कोवांकडे सांत्वनासाठी मी गेलो होतो. लाडके, त्यांच्याकडील दारिद्र्याचे कसे वर्णन करू! आणि किती पसारा! आश्चर्य नाही: सगळे एकाच खोलीत राहतात. फक्त लज्जेखातर पडद्यांचे आडोसे ठेवलेत. एव्हाना त्यांच्याकडे शवपेटी ठेवलीय; अगदी साधी आहे, पण सुबक. आयती बनविलेली त्यांनी विकत घेतली. मुलगा अवघा नऊ वर्षांचा होता. खूप आशादायी होता असे म्हणतात. वारेन्का, त्यांच्याकडे नजर टाकली म्हणजे दया येते! मुलाची आई रडत नाही, पण खूप दु:खी-कष्टी चेहऱ्याने बसून आहे बिचारी. कदाचित खाणारे एक तोंड कमी झाले म्हणून त्यांना हलकेही वाटत असेल. आणखी दोन घरात उरलीत. अद्याप अंगावर पिणारे एक बाळ आणि सुमारे सहा वर्षांची एक छोटी मुलगी. मूल तडफडतेय, पोटचे पोर तळमळतेय आणि त्याला तुम्ही मदत करू शकत नाही, तेव्हा कसला आलाय आनंद! मुलाचा बाप जुना गुळगुळीत कोट अंगात घालून मोडक्या खुर्चीत बसला होता. त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहात होते, पण ते कदाचित दु:खापायी नसावेत, सवयीपायी असावेत, त्याच्या डोळ्यांना काहीतरी झाले आहे. अगदी विचित्र आहे तो! कुणी त्याच्याशी बोलू लागला तर खूप लाजतो, बावरतो आणि उत्तर काय द्यावे ते त्याला समजत नाही. छोटी मुलगी, त्याची कन्या, शवपेटीशेजारी उभी होती. बिच्चारी! अगदी उदास आणि विचारात गढलेली! वारेन्का, लहान मूल असे विचारात गढलेले पहायला मला आवडत नाही. अगदी अप्रिय दृश्य! एक चिंध्यांची बाहुली तिच्याशेजारी फरशीवर पडली होती, पण ती बाहुलीशी

खेळत नव्हती. ओठांवर बोट दाबून अगदी खांबासारखी स्तब्ध उभी होती. घरमालकीणीने तिला टॉफी दिली, तिने घेतली, पण खाल्ली नाही. किती दुःखद, होय ना वारेन्का?

मकार देवूष्कीन.

२५ जून

प्रिय मकार अलेक्सेयेविच!

तुमचे पुस्तक परत पाठवीत आहे. फार वाह्यात पुस्तक! हातात धरायची सोय नाही. कुठे खणलात हा अलंकार? थट्टा बाजूला ठेवा, पण खरेच तुम्हाला असली पुस्तके आवडतात, मकार अलेक्सेयेविच? कुणीतरी मला पुस्तके द्यायचे कबूल केले आहे. जर इच्छा असेल मी तुमच्यासाठी काही पुस्तके पाठवीन. पण आता निरोप घेते. खरेच, आणखी लिहायला मुळीच सवड नाही.

वा. दो.

२६ जून

लाडक्या वारेन्का! मी खरोखरीच ते पुस्तक वाचलेले नव्हते. फक्त काही पाने वाचली आणि मला वाटले की, केवळ लोकांना हसविण्यासाठी तसे चावट लिहिले होते. मला खरेच वाटले की पुस्तक मजेदार असेल. कोण जाणे, वारेन्कालासुद्धा आवडेल आणि म्हणून मी ते पाठविले.

राताझ्यायेवने मला काहीतरी अस्सल साहित्य वाचायला द्यायचे कबूल केले आहे. तेव्हा लाडके, तुला भरपूर पुस्तके मिळतील. राताझ्यायेव फार खोल माणूस आहे. स्वतःसुद्धा सुरेख लिहितो! त्याची लेखणी धारदार आहे आणि शैली छान आहे. प्रत्येक शब्द डौलदारपणे वापरण्याचे कसब त्याच्यापाशी आहे. फाल्दोनीला अगर थेरेसाला उद्देशून मी जे काही अर्थहीन, क्षुल्लक शब्द वापरतो, तशा शब्दांनासुद्धा तो शैलीदार बनवितो. त्याच्या सायंकालीन साहित्यिक बैठकींना मी जातो. आम्ही धूम्रपान करतो आणि तो वाचतो. तब्बल पाच पाच तासपर्यंत वाचन करतो व आम्ही सगळे ऐकतो. मस्त साहित्यिक मेजवानी! अगदी सुरेख फुले जणू!

पानांचा गुच्छ बनविता येईल! तो माणूस खूप प्रेमळ, समजूतदार आणि मदत करणारा आहे. त्याच्या तुलनेने मी कोण? – कुणीही नव्हे! तो ख्यातनाम माणूस आहे! पण मी? अक्षरश: अस्तित्वहीन. तरीही तो माझ्याशी चांगला वागतो. मी त्याच्या लेखनाच्या काही नकला करून देतो. वारेन्का, तुम्ही असे मुळीच मानू नका की, त्यात काही कपट आहे; मी नकला करून देतो म्हणून केवळ तो माझ्याशी चांगला वागतो असे मुळीच नव्हे. कुचाळखोरांवर तुम्ही अजिबात विश्वास ठेवू नका, अगदी मुळीच विश्वास ठेवू नका! ते काम मी स्वत:च अंगावर घेतले, अगदी स्वेच्छेने घेतले, त्याला सुख वाटावे म्हणून. आणि तो माझ्याशी चांगला वागतो, मला सुख वाटावे म्हणून. माणसाच्या वागण्यातील हळुवारपणा मला समजतो, लाडके. तो खूप भला माणूस आहे आणि झकास लेखक आहे.

वारेन्का, साहित्य ही चीज फार नामी आहे. परवा त्यांच्यापासून ही गोष्ट मला समजली. फार गहन चीज! माणसांचे काळीज भक्कम करते, त्याला शिकविते – आणखी खूप वेगवेगळ्या गोष्टी त्यांच्या पुस्तकात लिहिलेल्या होत्या. फार छान लिहिल्या आहेत. साहित्य म्हणजे चित्र. एक प्रकारचे चित्र आणि आरसा. त्यातून आवेग व्यक्त होतात, सूक्ष्म टीका मिळते, सूचना मिळतात आणि जीवनाची नोंदही मिळते. हे सर्व मला त्यांच्याकडे समजले. प्रांजलपणे सांगतो तुम्हाला, लाडके, त्यांच्यात बसून मी ऐकत असतो (त्यांच्याप्रमाणेच धूम्रपानही करीत असतो), पण वेगवेगळ्या विषयांवर त्यांचा वाद सुरू झाला म्हणजे मात्र मी त्यांच्यापासून अगदी वेगळा पडतो. आपल्या डोक्यावरून जाते सगळे! मी अत्यंत मठ्ठ टोंब्या आहे असे भासते. स्वत:ची स्वत:ला लाज वाटते. एखादा योग्य शब्द बोलण्यासाठी सबंध संध्याकाळभर डोके खाजवितो, पण धड अर्धा शब्दसुद्धा सुचत नाही! वारेन्का, अशा वेळी स्वत:चीच दया येते, आपली लायकी नाही म्हणून. एक म्हण आहे: उंच वाढला एरंड! माझ्या फावल्या वेळात सध्या मी काय करतो? – झोपतो. अगदी महामूर्खासारखा. वस्तुत: झोपण्याऐवजी दुसरी काही चांगली गोष्ट करता आली असती – लेखन केले असते. स्वत:ला उपयुक्त आणि दुसऱ्यांच्या दृष्टीने छान. लाडके, ते किती पैसे घेतात ठाऊक आहे? देव त्यांना क्षमा करो! राताझ्यायेवचेच उदाहरण घ्या – खूप पैसे घेतो! एक कागद लिहायला त्याला किती वेळ? दिवसाला पाच ताव तो सहज लिहितो आणि दर तावाला तीनशे रूबल घेतो म्हणे! जर एखादी विनोदी कथा असेल अगर लोकांना स्वारस्य

वाटणारा विषय असेल, तर ठोक पाचशे! त्याला नकार द्यायची त्यांची हिंमत नाही. पुढच्या वेळी आपण हजार खिशात घालू! काय वार्वारा अलेक्सेयेवना? त्याच्यापाशी कवितांची एक चोपडी आहे, कविता काही फारशा मोठ्या नाहीत, लाडके, सात हजार मागतोय—सात हजार! विचार करा! ही रक्कम इस्टेटीएवढी, एका घराएवढी! म्हणतो, पाच हजार द्यायला कबूल आहेत, पण तो कबूल नाही. मी त्याला पटवायचा प्रयत्न केला. म्हणालो, घ्या पाच हजार आणि मरोत ते! पाच हजार ही काही लहान रक्कम नव्हे! पण म्हणतो—नाही, ते सात देतीलच. फार धूर्त आहे!

लाडके, आता हा विषय निघालाच आहे तर 'इटालीचे तीव्र मनोविकार'[10] मधील काही उतारे सादर करतो. त्याच्या पुस्तकाचे हे नाव आहे. वारेन्का, तुम्ही वाचा आणि निर्णय द्या:

"व्लादीमिर दचकला, आणि त्याच्या नसांमधून विषयवासना उसळून उत्कट बिंदूपर्यंत पोहोचल्या.

"'काउंटेस!' तो ओरडला. 'माझ्या भावना किती तीव्र आहेत, हा वेडेपणा किती अमर्याद आहे, ह्याची तुम्हाला कल्पना तरी आहे का? नाही, माझ्या स्वप्नांनी माझी फसगत केली नाही! माझं प्रेम आहे तुमच्यावर, बेभान प्रेम आहे, वेडं प्रेम आहे! तुझ्या नवऱ्याच्या देहातलं सारं रक्त माझ्या काळजातल्या बेफाम उन्मादाला शांत करायला पुरं पडणार नाही! माझ्या छातीत धगधगणाऱ्या सर्वभक्षी अमानुष ज्वालेला कोणताही अडथळा थोपवू शकणार नाही. ओह्, झिनायदा, झिनायदा!..'

"'व्लादीमिर!..' भान हरपून त्याच्या खांद्यावर टेकत काउंटेस अस्फुट उद्गारली.

"'झिनायदा!' अत्यानंदित स्मेल्स्की ओरडला.

"त्याच्या छातीमधून उष्ण श्वास उमटत होते. वासनांच्या वेदीवर प्रेमाची ज्वाला भडकली होती आणि त्या अभागी प्रेमिकांच्या हृदयांना भाजून काढत होती.

"'व्लादीमिर!' उन्मादाने भारलेली काउंटेस पुटपुटली. तिचा ऊर धपापत होता, तिचे गाल आरक्त बनले होते, डोळे धगधगत होते...

"नवे, भयानक मीलन घडले होते! . . . .
. . . .

"अर्ध्या तासानंतर म्हातारा काउंट त्याच्या बायकोच्या खाजगी खोलीत गेला.

"'माझ्या लाडके, आपल्या प्रिय पाहुण्यासाठी समोवार तापवायला सांगायचा का?' बायकोच्या गालावर थोपटत त्याने विचारले."

आता ह्यानंतर तुमचे काय मत आहे, लाडके? थोडे चावट आहे खरे, त्याबाबत वाद नाही, पण तरीही छान आहे. जे चांगले ते चांगले म्हटलेच पाहिजे! आता 'येर्माक आणि जूलेखा'[11] ह्या कथेमधील एक उतारा देतो.

स्वतःशी कल्पना करा, लाडके, हा कझाक येर्माक[12], सैबेरियाचा जंगली आणि महाभयानक विजेता, सैबेरियाचा झार कूचूम ह्याची मुलगी जूलेखावर मोहित झालाय. जूलेखाला त्यांनी बंदिवान केले आहे. ह्या घटना महाभयंकर इवानच्या[13] काळातील आहेत हे तुमच्या ध्यानात आले असेलच, येर्माक आणि जूलेखा यांच्यात पुढील संवाद घडतो.

"'तुझं माझ्यावर प्रेम आहे जूलेखा! बोल पुन्हा, बोल पुन्हा!'

"'मी तुझ्यावर प्रेम करते, येर्माक', जूलेखा अस्फुटपणे म्हणाली.

"'हे नभा, हे पृथ्वी, तुमचा मी आभारी आहे! मी सुखी आहे!.. तुम्ही मला सारे सारे दिले, ज्याची माझ्या छळल्या गेलेल्या मनाने जन्मापासून आस धरली होती. माझ्या पथदर्शक तारके, एवढ्यासाठी तू मला इथवर आणलंस, ह्याचसाठी तू मला पाषाणपट्ट्यापलिकडं आणलंस! सगळ्या जगाला मी माझी जूलेखा दाखवीन आणि मग माणसं, ते पिसाट राक्षस, मला दोष देणार नाहीत! तिच्या नाजुक मनाच्या गुप्त यातना त्यांना समजू शकल्या, माझ्या जूलेखाच्या एका अश्रूच्या थेंबात आख्खी कविता पाहण्याची त्यांची जर क्षमता असती, तर!.. हा अश्रू चुंबनाने टिपून घेण्याची मला परवानगी दे, हा स्वर्गीय... हा दिव्य अश्रू मला पिऊ दे!'

"'येर्माक', जूलेखा म्हणाली, 'जग क्रूर आहे, माणसं अन्यायी आहेत! ती आपल्याला त्यांच्यामधून दूर पळवून लावतील, ती आपल्याला अपराधी ठरवतील, माझ्या लाडक्या येर्माक! तेव्हा सैबेरियातल्या बर्फाळ परिसरात, बापाच्या राहुट्यांमध्ये लहानाची मोठी झालेली ही गरीब बिचारी कुमारी तुमच्या कठोर, थंडचा काळजाच्या, अहंकारी जगात काय करील? माणसं मला समजून घेणार नाहीत; माझ्या इच्छा, माझ्या आवडी त्यांना कळणार नाहीत!'

"'तर मग कझाकाची तलवार त्यांच्या डोक्यांवर सपासप चालेल!' डोळयांमध्ये अंगार फुलवीत येर्माक ओरडला."

वारेन्का, जेव्हा जूलेखावर मरणांतिक वार करण्यात आला आहे असे येर्माकला समजते, तेव्हा त्याची किती शोकाकुल अवस्था बनते! रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन आंधळा म्हातारा कूचूम येर्माकच्या तंबूत चोरून शिरतो व त्याचा राजदंड आणि सिंहासन लुबाडणाऱ्या येर्माकवर मरणांतिक प्रहार करण्याच्या हेतूने स्वतःच्या पोटच्या मुलीला भोसकतो.

"'पाषाणावर पोलाद घासण्याचा आवाज मला आवडतो!' मंत्रभारीत पाषाणावर सुऱ्याला धार काढताना संतापून येर्माक ओरडला. 'मला त्यांचं रक्त पाहिजे, रक्त! त्यांचे तुकडे तुकडे केले पाहिजेत!!!'"

ह्यानंतर, जूलेखाचा वियोग सहन न होऊन इर्तिशमध्ये उडी टाकतो व कथा संपते.

आता एक विनोदी धाटणीचा छोटा तुकडा[14] सादर करतो. केवळ वाचकांना हसविणे एवढाच त्यामागील हेतू:

"इवान प्रोकोफ्येविच झेल्तोपूझ तुम्हाला माहीत आहे का? होय, तोच तो, जो प्रोकोफी इवानोविचच्या पायाला चावला होता. इवान प्रोकोफ्येविच तापट स्वभावाचा माणूस आहे, पण त्याच्यापाशी दुर्मिळ गुण आहेत. त्याउलट प्रोकोफी इवानोविचला सतत मधाबरोबर मुळा खायला आवडतो. जेव्हा पेलागेया आन्तोनोवना त्याची मैत्रीण होती... तुम्हाला माहीत आहे पेलागेया आन्तोनोवना? होय, तीच ती, जी परकर नेहमी उलटा नेसते!"

वारेन्का, आहे की नाही निखळ विनोद? जेव्हा त्याने आम्हाला हे वाचून दाखविले तेव्हा आम्ही पोट धरधरून हसलो. असला माणूस आहे तो, देव त्याला क्षमा करो! लाडके, कदाचित हे थोडे काल्पनिक आणि अतिचावट आहे, पण त्यात निष्पापता आहे. मुक्त विचार आणि जहाल कल्पनांचा लवलेश नाही. मी नमूद केले पाहिजे की, राताझ्यायेव भला माणूस आहे आणि म्हणून उत्तम लेखक आहे. इतर लेखकांसारखा नाही!

कधी कधी खरेच डोक्यात वेडा विचार येतो... जर मी काही लिहिले, तर काय होईल? कल्पना करू की, 'मकार देवूष्कीनच्या कविता' अशा शीर्षकाचे पुस्तक प्रसिद्ध झाले! अशा वेळी तुम्ही काय म्हणाला असतात, माझ्या देवदूता? तुम्हाला काय वाटले असते? पण माझ्या बाबतीत सांगतो लाडके, जर माझे पुस्तक प्रसिद्ध झाले असते, तर

नेवस्कीवर तोंड दाखविण्याची माझी हिंमत झाली नसती. कुणीतरी म्हणाला असता की, तो पहा चाललाय लेखक आणि कवी मकार देवूष्कीन, तोच तो दस्तुरखुद्द देवूष्कीन! अशा वेळी माझ्या बुटांचे मी काय करणार? जाता जाता मी तुम्हाला सांगतो की, त्यांना नेहमी ठिगळे जोडलेली असतात आणि त्यांच्या तळव्यांचा जबडा कधीतरी अप्रियपणे "आ" वासतो! साहित्यिक देवूष्कीनच्या बुटांना ठिगळे आहेत असे सर्वांना माहीत झाले तर काय होईल? एखाद्या काउंटेसला अथवा डचेसला समजले, तर ती काय म्हणेल बरे? मला वाटते, तिच्या ते लक्षातच आले नसते, कारण काउंटेस कधी कुणाचे बूट पहात नाहीत व एखाद्या कारकूनाचे बूट तर मुळीच पाहणार नाहीत, (बुटाबुटांमध्ये फरक असतो) पण माझ्या मित्रांनी तिला हे सांगितले असते. सर्वांत प्रथम राताझ्यायेवने सांगितले असते. तो काउंटेस व. कडे जातो. म्हणतो की, तिच्याकडच्या समारंभांना तो नेहमी हजर असतो आणि सहज भेटीलासुद्धा नेहमी जातो. ती फार छान साहित्यिक बाई आहे म्हणे. हा राताझ्यायेव मोठा चतुर माणूस आहे!

आता हा विषय पुरे झाला. केवळ गंमत म्हणून आणि तुमच्या मनोरंजनासाठी मी हे सगळे लिहीत आहे. अच्छा, माझ्या कबूतरा! आज मी भरपूर मूर्खपणा केलाय, कारण माझी मनःस्थिती फार छान आहे. आम्ही सगळे आज राताझ्यायेवकडे जेवलो (महाडांबीस आहेत लेकाचे!) आणि मद्यही प्यायलो... तुम्हाला याबद्दल लिहिणे बरे नव्हे! वारेन्का, माझ्याबद्दल काही गैरसमज मात्र करून घेऊ नका. मी आपला सहज कधीतरी! तुम्हाला पुस्तके धाडतो, अगदी नक्की... पोल-दे-कोक[15] ह्याचे एक पुस्तक सध्या इथे फिरते आहे, पण तुमच्यासारखीसाठी ते योग्य नाही! असे म्हणतात की, पीटरबुर्गच्या टीकाकारांचा नैतिक संताप त्याने जागा केलाय. पौंडभर मिठाई तुम्हाला पाठवतोय–मुद्दाम तुमच्यासाठी खरीदली. माझ्या प्राणा, प्रत्येक टॉफीबरोबर माझी आठवण काढा. मात्र गोळ्या चावू नका, फक्त चोखा, नाहीतर दात दुखू लागतील. कदाचित तुम्हाला साखरेची मिठाई आवडते? लिहून कळवा. आता द्या निरोप मला! माझ्या कबूतरा, ख्रिस्त तुमचे कल्याण करो. तुमचा सदैव

विश्वासू मित्र,

मकार देवूष्कीन.

माननीय महाशय, मकार अलेक्सेयेविच!

फेदोरा म्हणते की, जर माझी इच्छा असेल, तर एका घरात गव्हर्नेस म्हणून माझी नेमणूक करायला काही माणसे आनंदाने मदत करतील. माझ्या मित्रा, तुमचे काय मत आहे–मी जावे अथवा नाही? अर्थात, तेव्हा मी तुम्हाला ओझे ठरणार नाही आणि ती नोकरी फायद्याची दिसतेय. पण दुसऱ्या बाजूने विचार केला, तर अनोळखी घरात जायला कसेतरीच वाटते. ती कुठलीतरी जमीनदार मंडळी आहेत. माझ्याबद्दल चौकशा करू लागतील, मला प्रश्न विचारू लागतील, कुतूहल दाखवू लागतील–
तेव्हा मी काय सांगू? शिवाय मी ही अशी एकलकोंडी, जंगली! सवयीच्या जागी खूप काळ रहायला मला आवडते. जेथे सवय होते, तेथेच जास्त छान वाटते. जरी खडतर जगावे लागले, तरीही तेथेच आवडते. ती जागा दूर आहे आणि काम कोणते करावे लागेल, देव जाणे! कदाचित फक्त लहान मुलांचा सांभाळ करायला सांगतील. शिवाय ती माणसे जरा वेगळीच दिसतात: दोन वर्षांच्या काळात तिसऱ्यांदा गव्हर्नेस बदलताहेत. मला सल्ला द्या बाई, मकार अलेक्सेयेविच, देवाशपथ सांगा, जाऊ अथवा नको? कधीतरी तुम्हीच माझ्याकडे येत का नाही? क्वचित दर्शन देता. फक्त रविवारच्या दिवशी चर्चमध्ये एकमेकांना पाहतो. तुम्हीसुद्धा एकलकोंडे आहात! अगदी माझ्यासारखेच! पण खरे तर मी तुमची जवळजवळ नात्यातली आहे. तुमचे माझ्यावर प्रेम नाही, मकार अलेक्सेयेविच, आणि कधी कधी मला एकटीला खूप उदास वाटते. काही वेळांना, विशेषतः संध्याकाळच्या वेळांना, एकटीच उदास बसून राहते. फेदोरा कुठेतरी गेलेली असते. मग मी एकटीच बसून खूप खूप विचार करते, जुन्या आठवणी काढते–आनंदी आणि दुःखद–सगळे डोळ्यांसमोर येते, धुक्यातून दिसावे तसे अंधुक तरळते. ओळखीचे चेहरे येतात (मला ठळक दिसू लागतात). सर्वांत अधिक आई वारंवार दिसते... मला विलक्षण स्वप्ने पडतात! माझी प्रकृती खालावलीय असे मला वाटते. मी खूप अशक्त झालेय. आज सकाळी अंथरुणामधून उठले तेव्हा मला घेरी आली. शिवाय मला महावाईट खोकला झालाय! मला जाणवतेय, मला माहीत आहे की, लौकरच मी मरणार. माझे कुणी दफन करील? कुणी माझ्या शवपेटीबरोबर स्मशानात जाईल? कुणी माझ्यासाठी शोक करील?.. कदाचित अनोळखी जागी, अनोळखी घरात, अनोळखी कोपऱ्यात मरण

येईल! .. देवा रे, जगणे किती उदास आहे, मकार अलेक्सेयेविच! माझ्या मित्रा, तुम्ही सतत मला टॉफी काय खाऊ घालता? खरेच, एवढे पैसे तुम्ही कुठून आणता, मला समजत नाही! माझ्या स्नेह्या, पैसे सांभाळा, देवाशपथ, जपा पैसे. मी विणलेला गालीचा फेदोरा विकतेय. पन्नास रूबल नोटांमधून देत आहेत. हे फार छान. मला वाटले होते, त्याहून कमी देतील. फेदोराला तीन सवंध रूबल देईन आणि माझ्यासाठी साधाच, पण गरम कापडाचा फ्रॉक शिवीन. तुमच्यासाठी चांगल्या कापडाची बंडी मी स्वतः शिवीन.

फेदोराने माझ्यासाठी एक पुस्तक आणले: 'बेल्कीनच्या कथा.'[16] तुमची वाचायची इच्छा असेल तर धाडीन. कृपया त्यावर डाग मात्र पाडू नका आणि फार काळ जवळ ठेवू नका. पुस्तक दुसऱ्यांचे आहे. पूष्कीनचे लेखन आहे. दोन वर्षांपूर्वी हे पुस्तक मी आणि आईने एकत्र वाचले होते. आता परत वाचताना मला खूप उदास वाटले. तुमच्याकडे काही पुस्तके असल्यास मला पाठवा – मात्र राताझ्यायेवची नकोत. कदाचित तो स्वतः-चीच देईल, जर खरोखरीच कुणी छापलेली असतील! तुम्हाला त्याचे लेखन कसे काय आवडते, मकार अलेक्सेयेविच? किती फुटकळ... अच्छा! मी फार वटवट केली! जेव्हा मी दुःखी असते, तेव्हा कसल्यातरी विषयावर बडबडायला मला आवडते. ते औषध आहे: ताबडतोब हलके वाटते, विशेषतः काळजात दडून राहिलेल्या सर्व गोष्टी बोलून टाकल्या म्हणजे! तुमचा निरोप घेते, माझ्या मित्रा!

तुमची,

वा. दो.

२८ जून

लाडक्या, वार्वारा अलेक्सेयेवना!

पुरे झाले दुःख करणे! तुम्हाला शरम वाटली पाहिजे! माझ्या देवदूता, पुरे झाले! असे विचार तुमच्या मनात येतात तरी कसे? तुम्ही आजारी नाही, माझ्या प्राणा, तुम्ही मुळीच आजारी नाही! तुम्ही फुलता आहात, खरेच, तुम्हाला बहर येतोय. थोडचा फिकुटला आहात, पण तरीही फुलता आहात. आणि काय ही तुमची स्वप्ने आणि तुमचे भास! माझ्या कबूतरा, हे लज्जास्पद आहे आणि थांबविले पाहिजे.

त्या स्वप्नांवर तुम्ही थुंका, अक्षरशः थुंका. मी का बरे छान झोपतो? मला का बरे काही होत नाही? लाडके, तुम्ही जरा माझे उदाहरण घ्या. मस्त जगतो, शांत झोपतो, प्रकृती खणखणीत, तरुणासारखा बळकट, दिसतो छान! पुरे, पुरे, प्राणा, हे लज्जास्पद आहे. चूक सुधारा. लाडके, तुमचे डोके मला माहीत आहे, जरा निमित्त सापडले की कल्पनांचा खेळ सुरू झालाच! झुरणे सुरू झालेच! निदान माझ्याखातर हे थांबवा, माझ्या प्राणा! दुसऱ्या माणसांकडे काम करण्याबद्दल? – कधीही नाही! नाही, त्रिवार नाही! असा विचार तरी कसा आला मनात? शिवाय दूर जायचे! नाही, लाडके, मला मुळीच मान्य नाही. माझा पूर्ण विरोध आहे. माझा जुना फ्रॉक-कोट विकून टाकणार, फक्त सदऱ्यावर फिरत राहीन, पण तुम्हाला काही कमी पडू देणार नाही. नाही, वारेन्का, नाही, एव्हाना मी तुम्हाला चांगलाच ओळखतोय! हा मूर्खपणा आहे, निव्वळ मूर्खपणा! माझी खात्री आहे की, हा सगळा त्या फेदोराचा दोष. ती बावळट बाई आहे, बाष्कळ बडबड करते. लाडके, तुम्ही तिच्यावर विश्वास ठेवू नका. कदाचित, तुम्ही अजून सगळे जाणत नाही, माझ्या प्राणा? ती एक महामूर्ख, कुचाळखोर, भांडकुदळ बाई आहे. तिने तिच्या नवऱ्याला मरेपर्यंत छळले. किंवा तुम्हाला तिने कशाबद्दल चीड आणली? नाही, लाडके, असे मुळीच करू नका! मग मी काय करू? मला काय करायचे उरणार? नाही, वारेन्का, माझ्या प्राणा, हा विचार तुम्ही डोक्यातून काढून टाका. तुम्हाला इथे कशाची उणीव भासते? तुम्ही आम्हाला किती आनंद देता–तुम्हालाही आमचा लळा आहे. तर जगा शांतपणे, शिवणकाम करा अथवा वाचन करा–त्यापेक्षा शिवण करूच नका, नुसत्या आमच्याबरोबर रहा. तुम्ही स्वतःच विचार करा, तसे तुम्ही वागलात तर काय होईल?... मी तुमच्यासाठी पुस्तके पैदा करतो आणि नंतर आपण परत कुठेतरी सहलीला जाऊ. फक्त, माझ्या लाडके, क्षुल्लक गोष्टींपायी मूर्खपणाने वागणे सोडून द्या! पुरे झाले! मी तुमच्याकडे येईन, अगदी लौकर येईन. मात्र माझे सरळ आणि स्पष्ट मत ऐका: तुमचा विचार मुळीच चांगला नाही, माझ्या प्राणा, अगदी वाईट आहे! अर्थात मी मोठा विद्वान माणूस नाही, मला ते माहीत आहे. तांब्याच्या नाण्यांवर माझे शिक्षण झालेय. पण इथे माझ्याबद्दल नव्हे, तर राताझ्यायेवबद्दल मला बोलायचे आहे. तो माझा मित्र आहे म्हणून मी त्याचा कैवार घेतो. तो फार छान लिहितो, खरेच खूप छान लिहितो. तुमचे मत मला

मान्य नाही आणि मान्य होणे शक्य नाही. त्याची शैली अलंकारिक आहे, बहारदार आहे, वेगवेगळे विचार त्याच्या लेखनात आहेत. फारच छान! वारेन्का, कदाचित तुम्ही निर्विकारपणे वाचन केलेत, किंवा वाचताना तुमचे मन ताळ्यावर नव्हते, फेदोरावर काही कारणाने चिडला असाल अथवा तुमचे तेव्हा काहीतरी बिनसले असेल. आता जेव्हा तुमची मनःस्थिती छान असेल, आनंदी असेल, उल्हसित असेल, तोंडात टॉफी धरली असेल – तेव्हा मनःपूर्वक परत वाचा. मी शंका धरत नाही (कोण धरतो?), राताझ्यायेवपेक्षा चांगले लेखक आहेत, खूप चांगले लेखक आहेत, पण ते जसे चांगले आहेत, तसा राताझ्यायेवही चांगला आहे. ते छान लिहितात आणि तोही छान लिहितो. तो स्वतःसाठी लिहितो आणि तसे लिहितो हे छानच! आता निरोप घेतो, लाडके. अधिक लिहिणे शक्य नाही. काम आहे, घाई केली पाहिजे. माझ्या छोट्या पाखरा, इतःपर वाईट विचारांपायी स्वतःला त्रास करून घेऊ नका. मन शांत ठेवा आणि देव तुमचे रक्षण करील. सदैव

तुमचा विश्वासू मित्र,

मकार देवूष्कीन.

ता. क. माझ्या प्राणप्रिये, पुस्तकाबद्दल धन्यवाद. पूष्कीनलाही वाचतो. आज संध्याकाळी तुमच्याकडे नक्की येईन.

१ जुलै

प्रिय मकार अलेक्सेयेविच!

नाही, माझ्या मित्रा, तुमच्यात जगणे मला शक्य नाही. मी परत विचार केला तेव्हा मला आढळले की, तशी फायद्याची नोकरी नाकारण्यात मी मूर्खपणा केला. तेथे मला निदानपक्षी हमखास भाकरी मिळाली असती. परक्या माणसांची मर्जी संपादन करायला मी धडपडले असते, एवढेच नव्हे तर वेळ पडल्यास स्वतःच्या स्वभावाला मुरड घातली असती. अर्थात परक्यांमध्ये राहणे, परक्यांची मर्जी संपादन करणे, स्वतःचे विचार आणि स्वतःच्या भावना दडपून टाकणे फार वेदनादायी व अवघड आहे. देव मला मदत करील. सारे आयुष्य असे एकलकोंडे काढणे खरे नव्हे. यापूर्वी माझ्या जीवनात तसे घडलेय. मी लहान असताना वसतीगृहात राहिले होते ते मला आठवते. सारा रविवार घरात उड्या मारायची. एखादेवेळी

आई रागे भरायची, पण त्याचे मनाला काही वाटायचे नाही. मी मजेत असायची. मात्र संध्याकाळ जशी जवळ येऊ लागे, तशी मनाला मरणप्राय दु:ख झपाटायचे. नऊ वाजता वसतीगृहात पोहोचणे आवश्यक असे. तेथे सारी परकी माणसे, थंड आणि कडक. सोमवारी गव्हर्नेस कमालीच्या चिडलेल्या. मला अगदी रडू कोसळायचे. एका कोपऱ्यात जाऊन मुकाट एकटीच रडायची. आसवे लपवावी लागत. नाहीतर आळशीपणाचा ठपका यायचा. शिक्षण कठीण होते म्हणून मी रडत नव्हते. पण काय? मला सवय झाली आणि पुढे वसतीगृहातून बाहेर पडताना मैत्रिणींचे निरोप घेताना मला रडू यायचे. तुम्हा दोघांवर मी बोजा म्हणून राहते हे चांगले नाही. हा विचार मला छळतो. मी तुम्हाला हे मोकळेपणाने सांगतेय, कारण तुमच्याबरोबर मोकळेपणाने वागायची मला सवय झालीय. फेदोरा भल्या पहाटेपासून उशीरा रात्रीपर्यंत धुणी बडवते हे काय मला दिसत नाही? म्हाताऱ्या हाडांना खरे तर विश्रांती आवडते. आणि तुम्ही माझ्या-साठी तुमचा अखेरचा कोपेक खर्च करता हे काय मला दिसत नाही? माझ्या मित्रा, तुमच्या परिस्थितीला हे परवडण्यासारखे नाही. तुम्ही लिहिता की, शेवटचा कोट विकाल, पण माझ्या गरजा भागवाल. माझा विश्वास आहे, मित्रा, तुमच्या भल्या अंत:करणावर विश्वास आहे – पण आत्ता तुम्ही असे म्हणताय. आत्ता तुमच्यापाशी अनपेक्षित पैसे आहेत, तुम्हाला बोनस मिळालाय. पण नंतर काय होईल, नंतर? तुम्ही स्वत:च जाणता – मी सतत आजारी असते. तुमच्याप्रमाणे नेहमी काम करणे मला शक्य होत नाही. वस्तुत: तसे काम करायला आनंद वाटला असता. शिवाय नेहमी काम मिळतेच असे नाही. मग काय उरले माझ्यापाशी? तुम्हा बापड्या दोघांकडे पहात दु:खाने झुरायचे? निदान थोडीशी तरी मी कशी उपयोगी पडू शकेन तुमच्यासाठी? आणि माझ्या मित्रा, तुमच्या दृष्टीने मी एवढी अत्यावश्यक का आहे? काय मी तुमच्यासाठी चांगले केले? फक्त माझे मन सर्वस्वाने तुमच्याशी गुंतले आहे, तुमच्यावर माझे खूप खूप प्रेम आहे, पण माझे नशीब फुटके! प्रेम करणे मला जमते, मी प्रेम करू शकते, पण त्या प्रेमाचे भल्या कृत्यांमध्ये रूपांतर करू शकत नाही, तुमच्या उपकारांची फेड करू शकत नाही. नका ना, मला आणखी अडवून धरू नका. विचार करा आणि तुमचे अंतिम मत सांगा. वाट पाहतेय

तुमची आवडती,

वा. दो.

१ जुलै

मूर्खपणा, शुद्ध मूर्खपणा, वारेन्का! जरा तुम्हाला एकटीला सोडले की तुमच्या डोक्यात भलभलत्या कल्पनांचा धुमाकूळ सुरू होतो. हे आवडत नाही आणि ते आवडत नाही! पण हा सगळा मूर्खपणा आहे असे आता मला दिसतेय. लाडके, तुम्ही सांगा बरे, कोणती उणीव भासतेय आमच्याकडे? तुमच्यावर प्रेम करतात, तुम्ही आमच्यावर प्रेम करता, आपण सगळे सुखी-समाधानी आहोत – याहून अधिक काय पाहिजे? काय? परक्या माणसांकडे तुम्ही काय करणार आहात? परका माणूस म्हणजे काय, कदाचित अजून तुम्हाला माहीत नसेल! तुम्ही मला विचारा आणि मी सांगतो तुम्हाला – परका माणूस म्हणजे काय! लाडके, त्याला मी ओळखतो, फार छान ओळखतो. त्याची भाकरी खायचा माझ्यावर प्रसंग आला होता. वारेन्का, तो दुष्ट आहे, अतिदुष्ट आहे. तिरस्काराच्या शब्दांनी आणि कुत्सित नजरांनी तो तुमच्या अंत:करणाच्या चिंध्या उडवितो. आमच्याकडे तुम्हाला ऊब आहे, छान आहे – अगदी आरामशीर घरट्यात तुम्हाला बसविले आहे. आणि तुम्ही निघून गेलात तर आमचे काय होईल? तुमच्याशिवाय आम्ही काय करणार? मी म्हातारा तेव्हा काय करू? तुमची आम्हाला गरज नाही? तुम्ही उपयुक्त नाही? असे कसे म्हणता? नाही, लाडके, तुम्हीच विचार करा, कशा काय तुम्ही उपयुक्त नाही? तुम्ही मला खूप उपयोगी पडता, वारेन्का. तुम्ही माझ्यावर हितकर प्रभाव पाडता... आत्ता तुमच्याबद्दल मी विचार करतोय आणि माझे मन तात्काळ उल्हसित बनले... काहीवेळा माझ्या सर्व भावना ओतून मी तुम्हाला पत्रे लिहितो आणि तुमच्याकडून तपशीलवार उत्तर मिळते... तुम्हाला कपडे विकत घेतले, टोपी घेतली... तुम्ही मला एखादी कामगिरी सांगता आणि मी ती पार पाडतो... मग तुम्ही उपयुक्त नाही कशा? म्हातारपणी मी काय करू, कसल्या आधारावर जगू? वारेन्का, तुम्ही कदाचित ह्याबाबत विचार केला नाही. तुम्ही खरेच जरा विचार करा की, माझ्याविना तो काय करील? माझ्या जिवलगा, तुमची

मला सवय झालीय. तुम्ही मला सोडून गेलात तर काय होईल? नेवा नदीत उडी मारून मी जीव देईन. वारेन्का, खरेच तसे घडेल. तुमच्याविना मी दुसरे काय करणार? हाय माझ्या प्राणा, वारेन्का! तुमची अशी इच्छा आहे की, माझी एकाकी शवपेटी गाडीवर टाकून वोल्कोवो स्मशानात नेण्यात यावी? कुठल्यातरी म्हाताऱ्या भिकारणीने माझ्या शवपेटीची सोबत करावी? मला वाळूत पुरून एकट्याला टाकून द्यावे? हे पाप ठरेल, लाडके, पाप ठरेल! खरेच, देवाशपथ पाप ठरेल! माझ्या सखे, तुमचे पुस्तक परत पाठवतोय. वारेन्का, तुमच्या पुस्तकाबाबत माझे मत विचारत असाल, तर सांगतो की, इतके चांगले पुस्तक यापूर्वी मी कधीही वाचले नव्हते. आता मी स्वतःला प्रश्न विचारतोय: असा कसा मी अडाण्यासारखा जगलो? देवा, माफ कर! मी काय केले? कोणत्या जंगलांमधून मी आलो? लाडके, मला अक्षरशः काहीही माहीत नाही. अगदी मुळीच माहीत नाही! वारेन्का, मी तुम्हाला सरळ सांगतो – मी अडाणी माणूस आहे. आजवर माझे वाचन फारसे झालेले नाही, मी अगदी कमी वाचलेय. जवळजवळ काहीच वाचलेले नाही. 'माणसाचे चित्र'[17] नावाचे एक विद्वत्तापर पुस्तक वाचले; 'घंटेवर वेगवेगळे नाद काढणारा मुलगा'[18] वाचले; 'इविकचे सारस'[19] वाचले. बस्स! याहून अधिक काहीही कधीही वाचले नाही. आता तुमच्या पुस्तकात 'स्टेशन मास्तर' कथा वाचली. तुम्हाला मी सांगतो, लाडके, माणूस जगत असतो आणि त्याला माहीत नसते की, त्याच्या अगदी हातापाशी पुस्तक असते आणि त्यात त्याच्या आयुष्याचीच कहाणी सरळ सांगितलेली असते. पूर्वी न दिसणाऱ्या गोष्टी वाचनाबरोबर स्पष्ट दिसू लागतात, तुम्हाला आठवू लागतात, समजू लागतात, तुम्ही तर्काने जाणू शकता. तुमचे पुस्तक मला आवडण्याचे आणखी एक कारण म्हणजे इतर काही पुस्तकांमध्ये खूप खूप वाचूनही काही समजत नाही. मी एवढा मठ्ठ स्वभावाचा आहे की, फार महत्त्वाची पुस्तके वाचणे मला जमत नाही. पण हे पुस्तक मात्र वाचले तेव्हा मीच लिहिलेय असे भासले. जणू माझे स्वतःचे हृदय – जसे कसे आहे तसे – उघड करून लोकांसमोर वाचायला ठेवलेय! अगदी तस्से! खरेच, अगदी साधे आहे. मी हुबेहूब असेच लिहिले असते. का नाही? पुस्तकात-ल्याप्रमाणेच सध्या माझ्या भावना आहेत. बिचाऱ्या साम्सोन वीरीनप्रमाणेच मीसुद्धा त्या अनुभवांमधून नुकताच पार पडलोय. असले दुःखी हृदयाचे किती साम्सोन वीरीन आपल्यात आहेत! किती छान वर्णन केले आहे!

तो मद्याच्या व्यसनाच्या कसा आहारी गेला, भान हरपेपर्यंत पिऊन मेंढकातडी कोटावर दिवसभर कसा निजू लागला अथवा त्याची वाट चुकलेली मुलगी दून्याशा हिच्या आठवणीने रडू कोसळल्यावर कोटाच्या मळक्या किनारीने डोळे कसे पुसू लागला, हे वाचताना तर मला आसवे आवरून धरणे अवघड झाले. फार स्वाभाविक वर्णन आहे! तुम्ही वाचा. फार जिवंत आहे. मी स्वतः पाहिलेय – अगदी माझ्या शेजारी असे आयुष्य जगले जातेय. थेरेसाचेच उदाहरण घ्या – दूर कशाला जायचे? अथवा आमचा बिचारा कारकून. तोसुद्धा साम्सोन वीरीनच, फक्त त्याचे आडनाव वेगळे – **गोर्श्कोव.** ही सामायिक बाब आहे आणि तुमच्या-माझ्या बाबतीतही घडू शकते. नेवस्कीवर अथवा नदीतीरावर राहणाऱ्या काउंटच्या बाबतीतही असे घडू शकेल, फक्त त्यांच्या उच्च पातळीमुळे ते वेगळे भासेल. पण मूळ गोष्ट तीच असणार. काहीही होऊ शकेल. माझ्या बाबतीतही घडू शकेल. तर हे असे आहे, लाडके, आणि तुम्ही आम्हाला सोडून जाणार म्हणताय! वारेन्का, वीरीनचे व्यसन मला जडू शकेल आणि आपल्या दोघांचाही नाश होईल. माझ्या पाखरा, असले दुराग्रही विचार डोक्यातून काढून टाका आणि मला निष्कारण छळू नका. माझ्या छोट्या पाखरा, तुम्ही उदरनिर्वाह कसा कराल, अपायांपासून स्वतःला सुरक्षित कसे राखाल, दुष्ट माणसांपासून स्वतःचे रक्षण कसे कराल? पुरे, वारेन्का, तुमची चूक सुधारा. चुकीचे सल्ले ऐकू नका. तुमचे पुस्तक परत वाचा, लक्षपूर्वक वाचा. तुमचे त्यात हित आहे.

'स्टेशन मास्तर' बाबत मी राताझ्यायेवपाशी बोललो. तो म्हणाला की, ते जुनाट झाले आणि आता चांगल्या पुस्तकांमध्ये चित्रे व विविध वर्णने असतात. खरे सांगायचे तर मला त्याचे बोलणे नीट समजले नाही. फक्त अखेरीस तो म्हणाला की, पूष्कीन चांगला होता, रूसच्या कीर्तीमध्ये त्याने भर घातली. आणखी बरेच काही तो पूष्कीनबद्दल बोलला. फार छान, वारेन्का, फार छान. पुन्हा एकदा लक्षपूर्वक ते पुस्तक वाचा, माझ्या सल्ल्यांप्रमाणे वागा आणि आज्ञापालन करून मला म्हाताऱ्याला सुखी करा. तेव्हा खुद्द देव तुमचे कल्याण करील, माझ्या प्राणा, नक्की देव तुम्हाला बक्षिस देईल!

तुमचा विश्वासू मित्र,

मकार देवूष्कीन.

६ जुलै

माननीय महाशय, मकार अलेक्सेयेविच!

फेदोराने आज मला चांदीचे पंधरा रूबल आणून दिले. जेव्हा मी तिला तीन रूबल दिले तेव्हा किती खूष झाली, बिच्चारी! मी तुम्हाला घाईत लिहिते आहे. तुमची बंडी कापतेय, कापड फार सुरेख आहे– पिवळ्या रंगाचे, फुला-फुलांचे. एक पुस्तक तुम्हाला पाठवतेय[20]. त्यात वेगवेगळया कथा आहेत. काही कथा मी वाचल्यात. 'ओव्हरकोट' नावाची कथा वाचा. तुमच्याबरोबर नाटकाला येण्याचे तुम्ही मला निमंत्रण देत आहात. पण ही खर्चिक बाब होणार नाही का? तिकीटे घेतलीच तर गॅलरीतली घ्या. फारा दिवसात नाटकाला मी गेलेली नाही आणि शेवटची केव्हा गेले होते ते आठवतसुद्धा नाही. फक्त परत भीती वाटते, हा मामला फार महागाचा तर पडणार नाही? फेदोरा फक्त डोके हलवतेय. ती म्हणते, तुम्ही तुमच्या आवाक्याच्या बाहेर जगू लागला आहात. मलाही ते दिसतेय. माझ्या एकटीसाठी किती खर्च केलात! सांभाळा, माझ्या मित्रा, संकटात पडू नका. तुमच्या घरमालकिणीशी भाड्यावरून तुमचा वाद झाला अशा अफवा कानांवर आल्याबद्दल फेदोरा सांगत होती. तुमच्याबद्दल मला फार भीती वाटते. आता निरोप घेते, मी घाईत आहे. एक छोटे काम आहे. टोपीवरची फीत मी बदलतेय.

वा. दो.

ता. क. आपण जर नाटकाला गेलो, तर मी माझी नवी टोपी घालीन आणि काळा सैल झगा. छान दिसेल ना?

७ जुलै

माननीय बाईसाहेब, वार्वारा अलेक्सेयेवना!

...मी कालच्याबद्दल बोलतोय. लाडके, एकेकाळी मीसुद्धा मूर्खपणा केला होता. एका नटीपायी मी ठार वेडा बनलो होतो, तिच्या पुरता नादी लागलो होतो. पण सर्वांत आश्चर्य म्हणजे मी तिला कधीही भेटलो नव्हतो. फक्त एकदा नाटकात तिला पाहिले होते आणि आकंठ प्रेमात पडलो. माझ्या शेजारी तेव्हा पाच तरुण टगे पुरुष रहात होते. माझ्या इच्छेविरुद्ध त्यांच्याशी मी मैत्री जोडली होती. मात्र नेहमी अंतर राखून वागायचा. पण त्यांच्या मागे पडू नये म्हणून मीच थट्टा-विनोद करायचा.

ह्या नटीबद्दल त्यांनीच प्रथम मला सांगितले! रोज संध्याकाळी त्यांचा कंपू नाटकाला जायचा – त्यांच्यापाशी रोजच्या गरजा भागवायला एक छदाम कधी नसायचा – गॅलरीची तिकीटे काढून बसायचा आणि ह्या नटीला सारख्या टाळया द्यायचा – अगदी वेड्याप्रमाणे भान हरपून! मग रात्री झोपेचे खोबरे! सबंध रात्र तिच्याबद्दल गप्पा! लाडक्या ग्लाशाबद्दल! सगळे तिच्या प्रेमात! प्रत्येकाच्या हृदयात प्रेमपाखरू गातेय! माझ्यासारख्या गरीब बिचाऱ्यालाही त्यांनी वेडे केले! तेव्हा मी तरुण होतो. त्यांच्या-बरोबर गॅलरीत चौथ्या रांगेत केव्हा जाऊन बसलो ते माझे मलाच कळले नाही. माझ्या जागेवरून पडद्याचा फक्त एक कोपरा दिसत होता, मात्र ऐकू सगळे येत होते. नटीचा आवाज फार छान होता – नादमय, कोकीळे-सारखा, मधुर! आम्ही कडकडून टाळया वाजवीत होतो, ओरडत होतो – आमच्यातील एकाला बाहेर नेण्यात आले. मी घरी परतलो एका वेगळया धुंदीत. खिशात अवघा एक रूबल उरला होता आणि पगाराला तर अद्याप दहा दिवसांचा अवधी. तुम्हाला काय वाटते, लाडके? दुसऱ्या दिवशी नोकरीवर जाण्यापूर्वी एका फ्रेंच अत्तर-विक्रेत्याकडे गेलो आणि माझ्यापाशी असलेल्या संपूर्ण भांडवलातून अत्तर व साबण खरेदी केले. कशाला त्यावेळी मी ही खरेदी केली, माझे मलाच माहीत नाही. शिवाय त्या दिवशी घरी जेवलो नाही, सारा वेळ तिच्या खिडकीपाशी चकरा मारत होतो. नेवस्कीवर चौथ्या मजल्यावर ती रहात होती. घरी परतून तासभर विश्रांती घेतली आणि पुन्हा नेवस्कीवर गेलो – तिच्या खिडकीपाशी घोटाळायला. दीड महिना मी तसा घुटमळत होतो, तिच्यापायी वेडा-पिसा बनलो होतो. घोडागाडी भाड्याने घ्यायचा आणि तिच्या खिडकीखालून दिमाखात जायचा. पुरता गुरफटून गेलो, कर्जात अडकलो, शेवटी तिचा नाद मी सोडला! मला कंटाळा आला! पाहिलेत, लाडके, एका सभ्य माणसाची एक नटी कशी वाताहत लावते! पण तेव्हा मी तरुण होतो!..

म. दे.

८ जुलै

माझ्या आदरणीय बाईसाहेब, वार्वारा अलेक्सेयेवना!

ह्या महिन्याच्या ६ तारखेला तुमच्याकडून मिळालेले पुस्तक घाईने परत करत आहे आणि ह्याच पत्रात माझ्या वतीने खुलासा करण्याची

घाई करत आहे. लाडके, असे पुस्तक माझ्याकडे धाडण्याचा दुष्टपणा तुम्ही कसा केला? परमेश्वर प्रत्येक माणसाला त्याच्या लायकीनुसार स्थान देत असतो. काहींच्या नशिबी सेनापतींच्या फिती खांद्यांवर मिरविणे असते, काही सल्लागार म्हणून काम करतात. काही आज्ञा देण्याचे काम करतात, तर दुसरे त्यांच्या आज्ञा घाबरल्या मनाने निमूटपणे पाळण्याचे काम करतात. माणसाच्या क्षमतेनुसार हे सगळे ठरत असते. काही एका गोष्टीला लायक असतात, दुसरे दुसऱ्या गोष्टीला लायक असतात आणि हे सर्व खुद्द देवाच्या हुकुमानुसार चालत असते. गेली तीस वर्षे मी कचेरीत काम करतोय. माझ्या सेवेत कोणतीही उणीव नाही, माझे वर्तन सभ्य आहे आणि अव्यवस्थितपणाचा ठपका माझ्यावर कधीही बसलेला नाही. एक नागरिक ह्या नात्याने मला पूर्ण जाणीव आहे की, माझ्यात काही उणीवा आहेत, पण त्याचबरोबर माझ्यात काही गुणही आहेत. माझे वरिष्ठ माझा आदर करतात आणि महामहीम माझ्यावर खूष आहेत. आजवर त्यांनी खुषीदर्शक कोणताही अनुग्रह माझ्यावर जरी केला नसला, तरी ते माझ्यावर खूष आहेत हे मला ठाऊक आहे. पांढरे केस होईपर्यंत आयुष्य जगलोय. अद्याप एकही महापातक माझ्या हातून घडलेले नाही. अर्थात छोटी पापे कुणाकडून घडत नाहीत? सर्व पापी आहेत आणि तुम्हीसुद्धा पापी आहात, लाडके! पण मोठ्या गुन्ह्यांचा अथवा अनादराचा आरोप माझ्यावर कधी आलेला नाही. नियमभंग केल्याचा अथवा शांतताभंग केल्याचा दोष मला कुणी लावलेला नाही. एकदा तर माझी सन्मानपदकासाठी शिफारस झाली होती. पण त्याबद्दल कशाला बोलू! लाडके, हे सर्व तुम्हाला निदान ठाऊक असायला हवे होते आणि त्या लेखकालासुद्धा ठाऊक असायला हवे होते. नाही, तुमच्याकडून मी अशी अपेक्षा केली नव्हती. नाही, वारेन्का, निदान तुमच्याकडून मी असे अपेक्षिले नव्हते.

म्हणजे ह्यानंतर माणसाने एका कोपऱ्यात निवांत जगायचे नाही? तो जर चिडीचूप जगत असेल, देवाची भीती बाळगत असेल, कुणाचा अपमान करत नसेल, दुसऱ्यांनी त्याच्या भानगडीत नाक खुपसू नये, त्याच्या खोपटात डोकावू नये, त्याच्या खाजगी जीवनात चोरून पाहू नये, त्याची बंडी, त्याची अंतर्वस्त्रे चाचपून पाहू नयेत, त्याच्याकडे जादा बुटांची जोडी आहे अथवा नाही, त्यांना नवे तळवे मारलेत अथवा नाही, तो काय खातो, काय पितो, कसल्या नकला करतो, ह्याबाबत इतरांनी चौकशा करू नयेत, अशी न्याय्य अपेक्षा त्याने बाळगायची नाही? खड-

बडीत फूटपाथवर माझे बूट खराब होऊ नयेत म्हणून मी चवड्यांवर चालतो तर बिघडले कुठे? दुसऱ्यापाशी चहा प्यायलासुद्धा पैसे नाहीत हे लेखकाने लिहायची गरज काय? जणू सर्वांनी चहा प्यायलाच पाहिजे का? प्रत्येकजण कोणता घास गिळतोय हे पाहण्यासाठी मी प्रत्येकाच्या तोंडात डोकावून पाहतो का? असा अपमान कुणाचा केलाय मी? नाही, लाडके, जेव्हा तुला कुणी धक्का लावत नाही, तेव्हा दुसऱ्या कुणाचा कशाला अपमान करायचा? वार्वारा अलेक्सेयेवना, तुम्हाला एक उदाहरण सांगतो : एखादा माणूस मानेचे तुकडे पडेपर्यंत मन लावून चाकरी बजावत असतो, त्याचे वरिष्ठ त्याचा मान राखत असतात (काहीही म्हणा तुम्ही, पण आदर करतात), आणि अचानक कुणी उपटसुंभ लेखक त्याला बावळट बनवून त्याची टर उडवतो! अर्थात खरे आहे की, कधीतरी तो नवे कपडे शिवतो. आनंदापायी एखादी रात्र त्याला झोप येत नाही. उदाहरणार्थ, नवे बूट पायात चढवले तेव्हा मला तसे जाणवले होते. स्वतःच्या पायांवर तसा सुरेख बूट पाहताना मन आनंदाने खरेच हरखून गेले होते. लेखकाने हे वर्णन अगदी योग्य केले आहे! पण तरीही मला नवल वाटते की, फ्योदर फ्योदरोविचनी ह्या पुस्तकाविरुद्ध निषेध कसा नोंदविला नाही? खरे आहे, अजून ते तरुण अधिकारी आहेत आणि लोकांवर ओरडायला त्यांना आवडते. आणि का ओरडू नये? आम्हाला त्यांनी भाजून का काढू नये? उलट आमच्या बंधूंना भाजून काढणे आवश्यक आहे. आम्हाला आमच्या जागी बसविण्यासाठी ते आवश्यक आहे. आम्हाला दहशत घालणे आवश्यक आहे. वारेन्का, आपल्या-आपल्यात सांगायचे तर आपले बंधू दहशतीशिवाय काही करीत नाहीत, आमच्यातील प्रत्येकजण फक्त स्वतःसाठी जागा शोधत असतो; काम करणे त्याला महत्त्वाचे वाटत नाही, फक्त खुर्ची प्राप्त करण्यासाठी त्याची धडपड चालू असते. चाकरीत वेगवेगळी पदे असतात आणि प्रत्येक पदाला त्याच्या लायकीनुसार भाजून काढणे आवश्यक असते. त्यामुळे भिन्न पदानुसार स्वाभाविकच भिन्न भाजणे असते. जगाची ही रीत आहे. आपण सगळे एकमेकांवर कुरघोडी करायला पहात असतो, आपल्यातले काही दुसऱ्यांना भाजून काढत असतात. अशी सावधगिरी घेतली नाही, तर जगाचा अंत होईल, सुव्यवस्थेचा अंत होईल. फ्योदर फ्योदरोविच यांनी असा अपमान दुर्लक्षित केला ह्याचे मला खरोखरीच आश्चर्य वाटते!

कशासाठी असे लिहायचे? काय गरज आहे अशा साहित्याची? कुणी

वाचक मला नवा ओव्हरकोट देणार आहे का? नवे बूट विकत घेऊन देणार का? नाही, वारेन्का, तसे मुळीच घडणार नाही. तो सगळे वाचून काढील आणि आणखी मागणी करील. माणूस स्वतःच्या उणीवा लपविण्याची फार काळजी घेतो, बोभाटा होईल म्हणून जपत असतो. साध्या राईचा पर्वत होण्याची शक्यता असते आणि काही कळायच्या आत तुमचे संपूर्ण नागरी व वैयक्तिक जीवन पुस्तकामधून सताड उघडे पडते. त्याची थट्टा उडविण्यात येते; त्यानंतर रस्त्यावर तोंड दाखविणे अशक्य ठरेल. कारण त्या पुस्तकात एवढे ठळक वर्णन असेल की, नुसत्या चालण्यावरून माणूस पटकन ओळखला जाईल! पुस्तकाच्या अखेरी लेखक जर ताळ्यावर आला असता आणि किंचित मऊपणाने त्याने वर्णन केले असते, त्याच्या डोक्यावर कागदाचे तुकडे उधळले अशा अर्थाचे काही लिहिले असते, तर कदाचित बरे झाले असते. कारण सरतेशेवटी कथानायक एक भला माणूस होता, गुणी होता, त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला अशी दुष्ट वागणूक देण्यालायक नव्हता, त्याच्या वरिष्ठांच्या आज्ञा तो पाळत होता (इथे एखादे उदाहरण द्यायला पाहिजे होते), कुणाचे वाईट त्याने केले नव्हते, देवावर त्याचा विश्वास होता आणि मेला (तो मरावाच अशी लेखकाची इच्छा असेल तर) – त्याच्या सग्यासोयऱ्यांनी त्याबद्दल शोक केला. त्याला मरू न देणे अधिक चांगले ठरले असते, बिचारा, पण निदान त्याला त्याचा ओव्हरकोट परत मिळायला पाहिजे होता, योग्य चौकशा केल्यानंतर त्याला बढती देण्यासाठी आणि त्याच्या पगारात वाढ केल्याचे जाहीर करण्यासाठी त्याच्या महामहीमांनी त्याला बोलावून घेतले असे दाखवायला पाहिजे होते – म्हणजे चांगल्याचा विजय झाला आणि त्याच्या वाईट मित्रांना शिक्षा मिळाली, असे दाखवायला पाहिजे होते. मी असे लिहिले असते. पण आत्ता त्या गोष्टीत विशेष काय आहे? चांगले काय आहे? आमच्या दैनंदिन जीवनातील एका क्षुल्लक प्रसंगाचे पाल्हाळ! माझ्या प्राणा, असले पुस्तक माझ्याकडे धाडण्याचा विचार तुमच्या मनात आलाच कसा? वारेन्का, हे फार अपायकारक पुस्तक आहे. हे सगळे खोटे आहे, कारण असा कारकून असूच शकत नाही. वारेन्का, ह्या पुस्तकाविरुद्ध रीतसर तक्रार नोंदवली पाहिजे.

तुमचा आज्ञाधारक सेवक,

मकार देवूष्कीन.

२७ जुलै

माननीय महाशय, मकार अलेक्सेयेविच!

अलीकडच्या काळातील घटनांनी आणि तुमच्या पत्राने मी घाबरून गेले, मी चकित झाले आणि गोंधळून गेले. पण फेदोराने मला सगळा खुलासा केला. कशाला असे निराश व्हायचे आणि एवढ्या खोल दरीत खाली कोसळायचे, मकार अलेक्सेयेविच? तुमच्या खुलाशांनी माझे मुळीच समाधान झाले नाही. आता तुम्हाला मान्य केले पाहिजे की, ती फायदेशीर नोकरी मी स्वीकारायला पाहिजे होती. शिवाय, माझे शेवटचे साहस मला खरेच घाबरवते आहे. तुम्ही म्हणताय की, माझ्यावरील प्रेमाखातर तुम्ही गोष्टी लपवून ठेवल्यात. मी नेहमीच तुमच्या ऋणात आहे, पण मला वाटत होते की, तुम्ही बँकेत बचत म्हणून ठेवलेल्या रकमेमधून माझ्यासाठी पैसे खर्च करीत आहात. पण तुमच्यापाशी कधीही पैसे नव्हते, माझी दया येत होती म्हणून केवळ तुमच्या पगारातून तुम्ही आगाऊ पैसे काढत होतात, मी आजारी होते तेव्हा तुमचा कोट तुम्ही विकलात, हे आता मला समजल्यानंतर माझ्या मनाची काय अवस्था झाली असेल बरे? आता मी काय करू? अरेरे, मकार अलेक्सेयेविच! सहानुभूतीपायी आणि आपुलकीपायी माझ्यावर दयेचे पहिले अनुग्रह केल्यानंतर तुम्ही थांबायला हवे होते. चैनीवर पैसे उधळायला नको होते. तुम्ही खरे मित्र नाही, तुम्ही माझ्याशी प्रांजळ राहिला नाहीत, मकार अलेक्सेयेविच, आणि तुमचे शेवटचे कोपेक कपड्यांवर, मिठाईवर, नाटकाच्या तिकीटांवर, पुस्तकांवर, करमणुकीवर खर्च झालेत हे आता मला ठाऊक झाल्यानंतर माझ्या अक्षम्य अविचारीपणाबद्दल मी जबरदस्त शिक्षा भोगतेय. (तुमच्या गरजांचा विचार न करता सगळ्या वस्तू मी स्वीकारल्या ना?); मला आनंद देण्याच्या हेतूने तुम्ही केलेल्या सगळ्या गोष्टींनी उलट मला दुःख दिले, खंत दिली. अलीकडे तुमची निराश मनःस्थिती माझ्या ध्यानात आली होती आणि मला अस्वस्थही वाटले होते, पण प्रत्यक्षात जे घडले आहे ते माझ्या अत्यंत वाईट अपेक्षांच्याही पलीकडचे आहे. कमाल आहे! एवढ्या थरापर्यंत तुमचा स्वतःवरचा ताबा कसा सुटला, मकार अलेक्सेयेविच? तुम्हाला ओळखणारे लोक आता तुमच्याबद्दल काय मत बनवतील, काय म्हणतील? उदार मनाचा, नम्र आणि विचारी माणूस म्हणून तुमचा मी व इतर सर्व लोक आदर करीत होतो; पण अचानक तुम्ही किळसवाण्या व्यसनाच्या अशा खोल गर्तेत कोसळला आहात, ज्या-

बद्दल कधी कुणाला शंकासुद्धा वाटली नव्हती. रस्त्यावर झिंगलेल्या अवस्थेत तुम्ही आढळलात आणि पोलीसांनी तुम्हाला घरी आणले, असे फेदोराने सांगितले तेव्हा माझी काय स्थिती झाली? आश्चर्याने मी स्तंभित झाले, जरी काहीतरी अनपेक्षिताची मी अपेक्षा केली होती, कारण गेले चार दिवस तुम्ही बेपत्ता होतात. मकार अलेक्सेयेविच, तुमच्या गैरहजेरीचे खरे कारण तुमच्या वरिष्ठांना माहीत होईल, तेव्हा ते काय म्हणतील याबद्दल तुम्ही विचार केला होता? तुम्ही म्हणता की, सगळे तुमची टिंगल करतात; आपल्या संबंधांबद्दल लोकांना समजलेय आणि तुमचे शेजारी त्यांच्या टोमण्यांमध्ये माझा उल्लेख करतात. तिकडे लक्ष देऊ नका, मकार अलेक्सेयेविच, देवाशपथ शांत व्हा! त्या ऑफीसरांबरोबर घडलेला तुमचा प्रसंग मला आणखी धडकी भरवतोय. त्याबद्दल काही अंधुक अफवा मी ऐकल्या. कृपया ह्या सर्व गोष्टींचा मला खुलासा करा. तुम्ही लिहिताय की, पूर्ण सत्य मला सांगायला घाबरलात, माझी मैत्री गमावून बसाल अशी तुम्हाला धास्ती वाटली, माझ्या आजारात मला कशी मदत करावी आणि इस्पितळाबाहेर मला कसे ठेवावे हे न सुचल्याने तुम्ही निराश बनला होतात, तुम्ही सर्व काही विकून टाकलेत, शक्य तेवढे पैसे उसने घेतलेत आणि तुमची घरमालकीण तुम्हाला रोज सतावत होती. माझ्यापासून हे सर्व लपवून ठेवण्याइतका महाघोर गुन्हा दुसरा कोणताही नव्हे! आणि आता तर मला सर्व ठाऊक झाले आहे. तुमच्या संकटांचे कारण मी होते हे माझ्याकडून वदवून घ्यायला तुम्हाला शरम वाटत होती, पण तुमच्या वर्तनाने तुम्ही प्रत्यक्षात मला दुप्पट दुःख दिले आहे. मी पुरती हबकून गेलेय, मकार अलेक्सेयेविच! माझ्या मित्रा, दुर्भाग्य हा सांसर्गिक आजार आहे. अभागी आणि दरिद्री माणसांनी एकमेकांपासून दूर राहिले पाहिजे, म्हणजे आणखी संसर्गबाधा होणार नाही. तुमच्या माफक आणि एकाकी जीवनात यापूर्वी तुम्ही कधीही अनुभवले नव्हते असे दुर्भाग्य मी तुम्हाला दिले. ह्या सर्व गोष्टी मला छळताहेत, ठार मारताहेत!

तुमच्या बाबतीत काय काय घडले आणि असा अपराध तुम्ही कसा केलात, ह्याबाबत आता मला मोकळेपणाने लिहा. शक्य असेल तर माझे सांत्वन करा. माझ्या स्वार्थापायी मी अशी मागणी करीत नाही, तर तुमच्याविषयीचे माझे प्रेम आणि माझी मैत्री — ज्यांना माझ्या हृदयातून कुणीही व काहीही घालवू शकत नाही — ही मागणी करताहेत. अच्छा! तुमच्या उत्तराची अधीरपणे वाट पाहतेय. मकार अलेक्सेयेविच, तुम्ही माझ्याबद्दल चुकीचे मत केलेत.

तुमची स्नेहांकिता,

वार्वारा दोब्रोस्योलोवा.

२८ जुलै

माझ्या अमोल वार्वारा अलेक्सेयेवना!

आता सर्व काही पार पडून गेले आहे आणि परिस्थिती हळूहळू पूर्व-पदावर येत आहे, तेव्हा, लाडके, तुम्हाला मी सांगतो: माझ्याबद्दल लोक काय विचार करतील म्हणून तुम्हाला चिंता वाटतेय, पण मी तुम्हाला लगबगीने जाहीर करतो, वार्वारा अलेक्सेयेवना, की माझा अभिमान मला सर्वांत जास्त मोलाचा वाटतो. त्याच्या परिणामी माझ्यावर कोसळलेल्या संकटांची मी तुम्हाला माहिती देतो, पण माझ्या वरिष्ठांना त्याबाबत काहीही कल्पना नाही आणि त्यांना कधीही ते ठाऊक होणार नाही. तेव्हा ते पूर्वीप्रमाणेच माझा आदर करतील. फक्त एकाच गोष्टीची मला चिंता वाटते: कुचाळक्या! तुम्ही दिलेल्या दहा रूबलमधून मी थकलेल्या भाड्यातील काही हिस्सा फेडल्यामुळे माझ्या घरमालकिणीच्या आरोळ्यांचे आता बारीक कुरबुरीत रूपांतर झाले आहे. इतरांची काळजी करण्याचे कारण नाही. फक्त त्यांच्याकडून इतःपर उसने पैसे घ्यायचे नाहीत, म्हणजे मग काही त्रास नाही. माझ्या खुलाशांच्या समारोपादाखल एक विधान करतो: तुम्हाला माझ्याविषयी वाटणारा आदर जगात मला सर्वांत मोलाचा वाटतो आणि माझ्या तात्पुरत्या अडचणींची त्यामुळे मला फारशी फिकीर वाटत नाही. देवाची कृपा, वादळाचा पहिला तडाखा ओसरून गेला आहे आणि तुम्ही मला खोटा मित्र व स्वार्थी माणूस समजत नाही, कारण तुम्हाला दूर जाऊ देणे मला असह्य होते, म्हणून मी तुमची फसवणूक केली, तुमच्यावरील प्रेमापायी तसे वागलो माझ्या छोट्या देवदूता! दुप्पट उत्साहाने मी कामावर परतलोय आणि माझी कामे मी छान पार पाडतोय. काल येवस्ताफी इवानोविच यांच्या अगदी जवळून मी गेलो, तरी त्यांनी एका शब्दाने विचारणा केली नाही. लाडके, मी कर्जापायी आणि माझ्या कपड्यांच्या दयनीय अवस्थेपायी खचून गेलोय हे लपवीत नाही. पण ते विशेष महत्त्वाचे नाही आणि तुम्ही कृपया चिंता करू नका. तुम्ही मला अर्धा रूबल धाडलात आणि ह्या अर्ध्या रूबलने माझे काळीज चिरले. परिस्थिती ह्या थरापर्यंत आली! म्हणजे मी मूर्ख म्हातारा तुम्हाला मदत

करीत नाही, तर तुम्ही, माझी अनाथ-गरीब, मला मदत करतेय! फेदोराने ते पैसे आणले हे फार छान केले. सध्या मला कुठूनही पैसे मिळण्याची आशा नाही, लाडके, पण किंचित शक्यता निर्माण झाल्यास ताबडतोब कळवीन. पण कुचाळक्यांबद्दल मी फार अस्वस्थ होतोय. अच्छा, माझ्या छोट्या देवदूता. तुमच्या हाताचे चुंबन घेतो आणि लौकर बऱ्या व्हा अशी प्रार्थना करतो. कचेरीत जायची घाई असल्यामुळे अधिक तपशीलवार लिहिणे जमले नाही. माझ्या हलगर्जीपणाची भरपाई केली पाहिजे. इतर गोष्टींबाबत आणि त्या ऑफीसरांबरोबर घडलेल्या प्रसंगाबाबत आज संध्याकाळी लिहून कळवीन.

तुमचा आदर करणारा आणि स्नेहांकित,

मकार देवूष्कीन.

२८ जुलै

काय हे, वारेन्का! आता तुम्हाला शरम वाटली पाहिजे आणि ह्या पापाचा कलंक तुमच्या विवेकावर कायम राहणार. तुमच्या पत्राने मी पूर्ण भांबावून गेलो. पण स्वतःच्या काळजात डोकावून पहिल्यानंतर माझी खात्री पटली की, माझे बरोबर होते, पूर्ण बरोबर होते. अर्थात माझ्या त्या भांडणाबद्दल मी म्हणत नाही (पुरे त्याबद्दल, लाडके, पुरे!), पण तुमचा मला लळा आहे ह्या वस्तुस्थितीबद्दल आणि तुमचा लळा असणे ह्यात काहीही गैर नाही. लाडके, तुम्हाला काहीही माहीत नाही. कशापायी असे सगळे घडते, का मी तुमच्यावर प्रेम करतो, हे तुम्हाला समजले असते, तर तुम्ही तसे बोलला नसतात. केवळ तुमचा विवेक तुम्हाला असे बोलायला लावतो, पण माझी खात्री आहे की, तुमच्या काळजात वेगळेच काहीतरी आहे.

माझ्या लाडके, त्या ऑफीसरांबरोबर नेमके काय घडले हे मला स्वतःला नक्की माहीत नाही आणि आठवत नाही. माझ्या छोट्या देवदूता, मी कबूल करतो की, तेव्हा मी अत्यंत लज्जास्पद अवस्थेत होतो. सबंध महिनाभर अवघ्या एका धाग्यावर टांगून आहे. अगदी वाईट प्रसंग होता. तुमच्यापासून आणि माझ्या शेजाऱ्यांपासूनही त्या गोष्टी मी लपवून ठेवल्या. माझ्या घरमालकिणीने प्रचंड गहजब केला, पण अर्थात मी पर्वा केली

नाही. म्हातारी चेटकीण खुशाल बोंबलो! पण सर्वप्रथम ती बाब शरमेची होती आणि दुसरी गोष्ट म्हणजे घरमालकिणीला कसे कोण जाणे, आपल्या पत्रांबाबत समजले आणि मग तिने घरभर अशा भयानक शब्दांचे उच्चार ओरडायला सुरुवात केली, की मला कान बंद करून घ्यावे लागले. पण दुसऱ्यांनी मात्र स्वतःचे कान झाकले नाहीत, उलट टवकारले! लाडके, आता मी कुठे तोंड लपवू, मला समजत नाही...

माझ्या छोट्या देवदूता, एकामागून एक माझ्यावर कोसळणाऱ्या ह्या वेगवेगळ्या संकटांनी माझा पुरता निकाल लावलाय. तेवढ्यात अचानक फेदोराकडून एक विचित्र बातमी समजली की, कुणी एक नालायक तुमच्या घरात अवतरला आणि तुम्हाला लग्नाची मागणी घालून त्याने तुमचा अपमान केला. किती खोल जखम झाली असणार तुम्हाला, लाडके, मला होणाऱ्या वेदनांवरून मी कल्पना करू शकतो. तेव्हा मात्र माझे डोके फिरले, तेव्हा माझा तोल गेला आणि मी पराकोटीला पोहोचलो! माझ्या वारेन्का, मी भणाणत्या डोक्याने वेगात बाहेर पडलो, त्या नतद्रष्टाकडे थेट जाण्याचा माझा इरादा होता, मी नेमका काय करणार होतो हे मला माहीत नव्हते, पण तुमचा अपमान घडणे मला असह्य झाले होते! फार उदास वाटत होते! शिवाय पाऊस कोसळत होता, सगळीकडे चिखल, भयानक खिन्न वाटत होते!.. मी परतायच्या बेतात होतो... तेवढ्यात माझा अधःपात घडला. लाडके, मला येमेल्या भेटला, येमेल्यान इल्यिच, तो कारकून आहे, म्हणजे कारकून होता, त्याला आमच्याकडून नोकरी-वरून काढून टाकण्यात आलेय. आता उदरनिर्वाह तो कसा चालवतो हे मला माहीत नाही. तर आम्ही दोघे गेलो! आणि मग–पण तुमच्या मित्राच्या दुर्दैवाची आणि अभिलाषांची कहाणी वाचण्यात तुम्हाला कोणते सुख लाभेल वारेन्का? तिसऱ्या दिवशी संध्याकाळी, त्या ऑफीसरकडे जाण्याची मला चिथावणी देण्यात येमेल्या यशस्वी झाला. आमच्या घराची स्वच्छता पाहणाऱ्या माणसाला मी पत्ता विचारला. त्या ऑफीसरबद्दल बोलायचे तर, लाडके, त्याची काहीतरी भानगड होती असे केव्हाच माझ्या ध्यानात आले होते. आमच्या घरात तो रहात होता तेव्हा मी त्याला पहात होतो. पण अविचारीपणाचा अपराध माझ्याकडून घडला असे आता मला आढळते, कारण त्याच्याकडे मी गेलो तेव्हा पूर्ण शुद्धीवर नव्हतो. वारेन्का, मला नक्की काहीच आठवत नाही, पण खोलीत खूप ऑफीसर होते, अथवा मला सर्व गोष्टी दुहेरी दिसत होत्या–देवाला ठाऊक! मी काय बोललो

हेसुद्धा मला आठवत नाही, फक्त आठवते की संतापाने खूप बोललो. मग त्यांनी मला खोलीतून हाकलले, जिन्यावरून खाली फेकले. म्हणजे नेमके फेकले नाही, धक्के मारले. वारेन्का, पुढे मी घरी कसा परतलो हे तुम्हाला माहीतच आहे. बस्स, हकीकत संपली. अर्थात माझा अभिमान दुखावला, पण त्याबाबत कुणाला माहीत नाही, म्हणजे कुणा परक्याला! फक्त तुम्हालाच ती गोष्ट माहीत आहे, म्हणजे ती गोष्ट कधी घडलीच नाही असे मानायला हरकत नाही. काय वारेन्का, तुम्हाला काय वाटते? मला एवढेच खात्रीपूर्वक माहीत आहे की, गेल्या वर्षी आमच्याकडे आक्सेन्ती ओसीपोविचने ह्याच रीतीने प्योत्र पेत्रोविचचा अपमान केला होता. मात्र गुप्तपणे, अगदी गुपचूप. त्याने त्याला प्रथम द्वारपालाच्या खोलीत बोलविले—मी दाराच्या फटीतून तो प्रसंग पाहिला—मग हिशब चुकता केला, मात्र सभ्यपणे. कारण माझ्याविना तो प्रसंग कुणीही पाहिला नव्हता. पण माझे विशेष काही नाही, कारण मी त्याबाबत कुणापाशीही बोललो नाही. त्यानंतर प्योत्र पेत्रोविच आणि आक्सेन्ती ओसीपोविच जणू काही विशेष घडलेच नाही अशा थाटात वावरू लागले. प्योत्र पेत्रोविच फार मानी माणूस आहे, तो कुणापाशी काहीही बोलला नाही. आता ते दोघे एकमेकांना झुकून अभिवादन करतात, हस्तांदोलन करतात. मी तुमच्याशी वाद घालत नाही, वारेन्का, माझी हिंमत नाही. माझा फार खोल अध:पात झाला. सर्वांत वाईट म्हणजे माझ्या नजरेत मी अध:पतित ठरलोय. नियतीनेच तसे ठरविले असावे. आणि दैवाच्या तडाख्यातून कोण सुटतो? वारेन्का, आता माझ्या संकटांची आणि दुर्दैवांची तपशीलवार हकीकत तुम्हाला समजली. ती खरे तर वाचण्याच्या लायकीची नाही. माझ्या लाडके, माझी प्रकृती थोडी बरी नाही. माझा सगळा आनंद मावळलाय. तुमच्याबद्दल माझ्या मनात अतीव आदर आणि प्रेम आहे ह्याची खात्री बाळगा. माझ्या प्रिय वार्वारा अलेक्सेयेवना,

तुमचा आज्ञाधारक सेवक,

मकार देवूष्कीन.

२९ जुलै

प्रिय महाशय, मकार अलेक्सेयेविच!

मी तुमची दोन्ही पत्रे वाचली आणि माझा श्वास घुसमटला! माझ्या मित्रा, एक तर तुम्ही माझ्यापासून काहीतरी लपवून ठेवत आहात, अथवा

तुम्ही अनुभवलेल्या अप्रिय गोष्टींचा फक्त काही भाग लिहून कळवला आहे, किंवा... खरेच, मकार अलेक्सेयेविच, तुमची पत्रे अजून काहीतरी संकट लपवू पहात आहेत... माझ्याकडे या, देवाशपथ, आजच या. त्यापेक्षा सरळ आमच्याकडे जेवायलाच या. तुम्ही तिथे कसे राहता आणि तुमच्या घरमालकिणीबरोबर तुमचा समझोता कितपत झाला ते मला माहीत नाही. याबद्दल तुम्ही काहीच लिहीत नाही आणि मुद्दाम मौन बाळगता आहात. माझ्या मित्रा, लौकरच भेटू. आज नक्की या. नेहमीच आमच्याकडे जेवायला आला असतात तर जास्त बरे झाले असते. फेदोरा छान स्वयंपाक करते. अच्छा.

तुमची,

वार्वारा दोब्रोस्योलोवा.

१ ऑगस्ट

लाडके, वार्वारा अलेक्सेयेवना!

तुम्ही आनंदात आहात, लाडके, की देवाने तुम्हाला उपकारांची फेड उपकारांनीच करण्याची संधी दिली. माझा ह्यावर विश्वास आहे वारेन्का, तुमच्या देवदूतासमान हृदयाच्या चांगुलपणावर विश्वास आहे, मी रागावून असे बोलत नाही. मात्र म्हातारपणात मी भलते थेर सुरू केले अशी त्यावेळेप्रमाणे मला दूषणे देऊ नका. आता घडले पाप हातून, तर काय करणार! पण तुमचा आग्रहच असेल तर महापाप घडल्याचे मी कबूल करतो. मात्र माझ्या जिवलगा, तुमच्याकडून तसे ऐकणे मला फार जड जाते! आणि मी असे बोलतो म्हणून माझ्यावर रागावू नका. माझ्या काळजात फार जखमा झाल्यात. गरीब माणसे तऱ्हेवाईक असतात. जन्मत:च ती तशी असतात. पूर्वी मला तसे वाटायचे आणि आता तर जास्तच जाणवते. गरीब माणूस सतत शोधक नजर ठेवून असतो. जगाकडे पाहण्याची त्याची दृष्टीच संशयी असते. जाणाऱ्या-येणाऱ्या प्रत्येकाकडे तो तिरप्या डोळ्याने पाहतो. स्वत:भोवती गोंधळून पहात असतो, प्रत्येक शब्द कान टवकारून ऐकत असतो – त्याच्याबद्दल तर काही बोलत नाहीत ना? असा कसा तो गरीब बिचारा? त्याला नेमके काय जाणवतेय? ह्या बाजूने अथवा त्या बाजूने तो किती केविलवाणा दिसतो? वारेन्का, प्रत्येकाला माहीत असते की, गरीब माणूस उकीरड्यापेक्षाही वाईट असतो आणि

कुणाचाही आदर तो प्राप्त करू शकत नाही, मग कुणीही खर्डेघाशे कितीही लिहोत! गरीब माणसाबाबत सर्व काही पूर्वीप्रमाणेच घडेल. तसे का बरे घडेल? कारण त्यांच्या मते गरीब माणसाने सर्वांना दिसण्यासाठी उफराटे कपडे घातले पाहिजेत. त्याने आत काहीही दडवून ठेवायचे नाही, त्याने कसलाही अभिमान बाळगायचा नाही, अगदी मुळ्ळी मुळ्ळी नाही! त्यादिवशी येमेल्या म्हणाला की, त्याच्यासाठी मदतनिधी उभारण्यात आला होता आणि त्याला मिळणाऱ्या प्रत्येक दहा कोपेकच्या नाण्याबद्दल अधिकृत तपासणीसमान काहीतरी त्याला सहन करावे लागत होते. त्यांना वाटत होते की, स्वतःचे दहा कोपेक अगदी फुकट ते देत होते – पण नाही! गरीब माणसाला पाहण्यासाठी त्यांनी ते पैसे खर्च केले होते. लाडके, आजकाल धर्मादाय फार विचित्र रीतीने करण्यात येतो... कदाचित नेहमीच तसा होत आला असेल, कुणास ठाऊक! किंवा तो कसा करावा त्यांना माहीत नसेल अथवा त्यात ते तरबेज असतील – दोन्हीपैकी एक निश्चित! कदाचित तुम्हाला हे माहीत नसेल, तर हे असे आहे! इतर बाबतीत आपण अज्ञ असू, पण ही बाब मात्र उत्तम माहीत! गरीब माणसाला हे सर्व का माहीत असते आणि तो सगळा तसाच विचार का करतो? का? – कारण, अनुभव! उदाहरणार्थ, त्याला माहीत असते की, त्याच्या जवळून जाणारा गृहस्थ कुठल्यातरी रेस्तराँमध्ये चाललेला आहे आणि मनाशी तो म्हणतोय: "आज हा कळकट कारकून काय खाईल? मी सोते-पापीलीयोत खाणार आहे, पण तो बहुधा लोण्याविना नुसती लापशी खाईल!" मी काय खाणार ह्याच्याशी त्याचा काय संबंध? वारेन्का, केवळ असाच विचार करणारा माणूस अस्तित्वात असतो, खरेच असतो. हे नाठाळ लेखकू सतत तुमच्यावर नजर ठेवून असतात – तुम्ही जपून पाऊल टाकता अथवा नाही; किंवा अमूक अमूक खात्यातल्या कारकुनाच्या फाटक्या बुटांमधून त्याचे उघडे अंगठे डोकावत आहेत, त्याच्या फाटक्या सदऱ्यातून कोपर बाहेर आलेत – मग घरी जाऊन हे सर्व वर्णन खरडतात आणि असल्या भिकार गोष्टी छापतात... माझ्या फाटक्या कोपरांशी तुला काय करायचेय? माझ्या रांगडेपणाबद्दल मला क्षमा करा, वारेन्का, पण ह्या बाबतीत गरीब माणसाला एखाद्या कुमारिकेएवढीच शरम वाटत असते. परक्यांसमोर तुम्ही अंगावरचे कपडे उतरवणार नाही – माझ्या अशिष्ट शब्दांबद्दल माफ करा – आणि त्याचप्रमाणे गरीब माणसाला त्याच्या खोपटचात परक्यांनी डोकावलेले आवडत नाही, त्याच्या कौटुंबिक भान-

गडीमध्ये कुणी नाक खुपसलेले आवडत नाही. हीच पीडा आहे! आणि आता तुमच्याकडून माझा अपमान केला जाणे म्हणजे, वारेन्का, जणू तुम्ही माझ्या वैऱ्यांशी संगनमत करता आहात, ज्यांनी माझ्या प्रतिष्ठेला आणि अभिमानाला काळोखी फासली!

आणि आज कचेरीतसुद्धा एखाद्या लूतभऱ्या अस्वलाप्रमाणे, पिसे झडलेल्या चिमण्याप्रमाणे, अंग चोरून बसून होतो. शरमेपायी लाही होत होती. फार लाज वाटली मला, वारेन्का! फाटक्या सदऱ्यातून कोपर बाहेर डोकावत असताना आणि बटणे एकाकी धाग्यांवर लोंबत असताना शरम नाही वाटणार तर काय? जणू आज मुद्दामच माझी अशी गबाळी अवस्था होती! इच्छा नसतानाही मन खचले. स्तेपान कार्लोविचच्यासुद्धा ध्यानात आले. कामाबद्दल माझ्याशी काही बोलता बोलता अचानक थबकला आणि उद्‌गारला: "बिच्चारे मकार अलेक्सेयेविच!" पण त्याच्या मनात काय होते त्याबद्दल पुढे बोलला नाही. मीच तर्काने जाणून घेतले आणि एवढा शरमलो की, शरमेपायी माझे टक्कलसुद्धा लाल झाले! तसे काही विशेष नाही ह्यात, पण तरीसुद्धा मनाला त्रास होतो. तऱ्हेतऱ्हेचे विचार छळू लागतात. त्यांना काही दिसले तर नाही ना? देवा सांभाळ रे बाबा, जर त्यांच्या काही ध्यानात आले असेल तर! मी कबूल करतो, एका माणसाविषयी मला संशय आहे, फार जोरदार संशय आहे. ह्या लेखकूंना काही लाज नाही! अवघ्या कोपेकला तुमचे खाजगी आयुष्य विकून टाकतील हरामखोर! त्यांना कशाचेच पावित्र्य वाटत नाही!

ही कुणाची करामत, आता मला माहीत आहे. राताझ्यायेवचा हा उद्योग! आमच्या कचेरीमधल्या कुणाशीतरी त्याची ओळख आहे आणि बहुधा गप्पांच्या ओघात मूळ घटनेला मीठमसाला लावून सांगितले असणार. अथवा स्वतःच्या कचेरीत बोलला असेल आणि कर्णोपकर्णी ती हकीकत आमच्या कचेरीपर्यंत येऊन पोहोचली असावी. आमच्या घरात एकूण एक माणसाला सर्व काही माहीत आहे आणि तुमच्या खिडकीकडे बोट करूनही दाखवतात. अशी बोटे ते दाखवतात हे मला एव्हाना माहीत झालेय. काल जेव्हा मी तुमच्याकडे जेवायला आलो, तेव्हा खिडक्यांमधून सर्वांची मुंडकी डोकावत होती. घरमालकीण म्हणाली की, तो पहा थेरडा सैतान त्या लहान बाळीशी संधान बांधतोय आणि मग तुमच्याबद्दल काही गलिच्छ उद्‌गार काढले. पण काहीच नव्हे. सूक्ष्म उपहासपर शैलीत आपल्यावर पुस्तक लिहिण्याचा त्या राताझ्यायेवचा दुष्ट इरादा आहे. तो स्वतःच

असे म्हणाला आणि आमच्याकडील भल्या माणसांनी मला सांगितले. लाडके, आता मला काही सुचेनासे झालेय, काही निर्णय करणे अशक्य बनलेय! माझ्या छोटचा देवदूता, आपल्या पापाबद्दल देव शिक्षा करतोय. लाडके, मला कंटाळा येऊ नये म्हणून तुम्ही कुठलेतरी पुस्तक धाडणार होतात. पुस्तकाचे विशेष नाही. पण कशाबद्दल आहे ते? भरपूर वटवट? कादंबरी हा प्रकार भिकार मूर्खपणा असतो, रिकामटेकडयांच्या मनोरंजनासाठी खरडलेला! माझ्या अनेक वर्षांच्या अनुभवातून मी हे सांगतोय, माझ्यावर विश्वास ठेवा. आणि जर शेक्सपीयरबद्दल तुमच्याशी बोलताना ते म्हणाले: "साहित्यात शेक्सपीयर आहे पहा," तर खात्रीने समजावे की, भुक्कड कचरा आहे. ते केवळ हलकट लेखकांसाठी आहे!

तुमचा,

मकार देवूष्कीन.

२ ऑगस्ट

प्रिय महाशय, मकार अलेक्सेयेविच!

कशाबद्दलही चिंता करू नका. देवाची कृपा असेल तर सारे ठीक होईल. फेदोराने स्वतःसाठी आणि माझ्यासाठी ढीगभर काम मिळवले आहे व आम्ही उत्साहाने कामाला सुरुवात केली आहे. कदाचित परत व्यवस्थित घडी बसवू. तिला शंका वाटतेय की, माझ्या अलीकडील सर्व त्रासांना आन्ना फ्योदरोवना कारणीभूत आहे. पण आता मला कशाचीच पर्वा वाटत नाही. आज मला विलक्षण उत्साह वाटतोय. तुम्ही पैसे उसने घेऊ इच्छिता असे ऐकले. देव तुमचे रक्षण करो! कर्ज फेडायची वेळ येईल तेव्हा नाकी नऊ येतील तुमच्या! त्यापेक्षा आमच्याबरोबर रहा, आमच्याकडे नेहमी येत रहा आणि तुमच्या घरमालकिणीकडे मुळीच लक्ष देऊ नका. तुमच्या बाकीच्या वैऱ्यांबाबत आणि हितशत्रूंबाबत बोलायचे तर, तुम्ही निष्कारण स्वतःचा मानसिक छळ करून घेता, मकार अलेक्सेयेविच! मागच्या वेळी मी तुम्हाला म्हटले होते की, तुमची शैली चांगली नाही. अच्छा, परत भेटू. तुमच्या येण्याची आतुरतेने वाट पाहते.

तुमची,

वा. दो.

माझ्या छोटचा देवदूता, वार्वारा अलेक्सेयेवना!

माझ्या प्राणा, मी तातडीने तुम्हाला कळवतोय की, माझ्या मनात काही आशा पालवल्यात. माझ्या छोटचा देवदूता, तुम्ही लिहिता की, मी उसने पैसे घेऊ नयेत? माझ्या कबूतरा, त्याशिवाय दुसरा उपाय नाही. माझी तर वाईट स्थिती आहेच, पण तुमच्या बाबतीत तसेच घडले तर! तुम्ही नाजुक आहात. म्हणून तर कर्ज काढणे आवश्यक आहे. तर मी पुढे लिहितो:

वार्वारा अलेक्सेयेवना, प्रथम मी नोंद करतो की, कचेरीत येमेल्यान इवानोविचशेजारी मी बसतो. हा येमेल्यान दुसरा, तुमच्या माहितीचा नव्हे. हा माझ्यासारखाच सर्वांत कनिष्ठ श्रेणीचा नामधारी सल्लागार आहे. तो आणि मी इथले बहुधा सर्वांत जुने कर्मचारी. तो फार भल्या मनाचा माणूस आहे, अबोल आहे, निःस्वार्थ आहे आणि अस्सल अस्वला-सारखा दिसतो. पण कामात पटाईत. त्याची लेखणी म्हणजे—अगदी स्वच्छ दाणेदार हस्ताक्षर. खरे सांगायचे तर माझ्यापेक्षा वाईट लिहीत नाही. लायक माणूस! त्याची आणि माझी जवळीक कधी घडली नाही. केवळ औपचारिक नमस्कार-चमत्कार. एखादेवेळी मला चाकूची गरज भासली तर मी मागायचा: "येमेल्यान इवानोविच, कृपा करून चाकू द्या!.." थोडक्यात, फक्त कामापुरता संवाद. पण आज तो मला म्हणाला: "मकार अलेक्सेयेविच, तुम्ही एवढे कसल्या विचारात गुरफटला आहात?" मला दिसले की, माणूस भलेपणाने विचारत होता, म्हणून मी त्याच्यापाशी मन मोकळे केले. अर्थात सर्व हकीकत नाही सांगितली, देव रक्षण करो, कधीही सांगणार नाही, कारण तेवढी हिंमत नाही. फक्त मी अडचणीच्या परिस्थितीत सापडलोय, एवढेच बोललो. "तर मग तुम्ही," येमेल्यान इवानोविच म्हणाला, "तुम्ही कर्जाऊ पैसे घ्या. प्योत्र पेत्रोविचकडून घ्या. तो व्याजावर देतो. मी घ्यायचा त्याच्याकडून कर्ज. आणि व्याज माफक घेतो—बेसुमार लुटत नाही!" वारेन्का, माझ्या काळजाने अक्षरशः टुणकन उडी मारली. मनात विचार आला: देव करो आणि मला कर्ज देण्याबाबत प्योत्र पेत्रोविचच्या काळजात इच्छा निर्माण करो. एव्हाना माझ्या मनात हिशेब सुरू झाला होता—घरमालकिणीला किती भाडे द्यायचे, तुम्हाला किती मदत करायची आणि स्वतःच्या गरजा भागवायला किती खर्च करायचा! माझा अवतार अगदी लज्जास्पद आहे.

कचेरीत बसायला शरम वाटते. शिवाय आमचे टवाळखोर दात विचकत असतात. कधी कधी आमचे महामहीम आमच्या टेबलाजवळून जातात. देव माझे रक्षण करो, पण माझा फाटका अवतार त्यांच्या ध्यानात आला तर! स्वच्छता आणि नीटनेटकेपणाबाबत ते फार कडक आहेत. कदाचित ते एकही शब्द उच्चारणार नाहीत, पण मी शरमेपायी मरून जाईन. शेवटी माझ्या फाटक्या खिशांमध्ये माझी शरम गुंडाळून, भीतीने अर्धमेल्या अवस्थेत, पण खूप अपेक्षा बाळगून, मी प्योत्र पेत्रोविचकडे गेलो. पण वारेन्का, सगळेच फसले! तो फेदोसीय इवानोविचशी बोलण्यात गुंतला होता. मी त्याच्या एका बाजूला जवळ जाऊन लक्ष वेधण्यासाठी हळूच त्याची बाही खेचली. त्याने माझ्याकडे एक नजर टाकली, तेव्हा मी त्याला सगळा खुलासा केला व तीस रूबल कर्जाऊ मागितले. प्रथम बहुधा त्याला माझे बोलणे समजले नसावे, पण जेव्हा मी परत सर्व खुलासा केला, तेव्हा तो फक्त जोरात हसला. काहीही बोलला नाही. मी परत विनवणी करू लागलो. त्याने विचारले: "तुमच्यापाशी विसार आहे?" मग समोरच्या कागदात त्याने डोके खुपसले व माझ्याकडे न पाहता तो लिहू लागला. मी त्यामुळे थोडा वरमलो. म्हणालो: "नाही, प्योत्र पेत्रोविच, माझ्यापाशी विसार नाही." आणि त्याला समजावून सांगू लागलो की, पगार होताच सर्वप्रथम मी त्याचे कर्ज फेडून टाकीन. तेवढ्यात त्याला कुणीतरी बोलावून घेतले आणि मी त्याची वाट पहात थांबून राहिलो. तो परत आला आणि माझी दखल न घेता लेखणी तासू लागला. मी माझे घोडे पुढे दामटतोय: "प्योत्र पेत्रोविच, काही करता येणार नाही का?" तो ढिम्म गप्प. जणू त्याला माझे बोलणे ऐकू येत नव्हते. मी बराच वेळ उभा राहिलो आणि शेवटचा प्रयत्न करण्याच्या इराद्याने त्याची बाही खेचली. पण चकार शब्द न बोलता लेखणी तासून तो परत लिहू लागला. मी निघून गेलो. लाडके, ती माणसे कदाचित खूप लायक आहेत, फार मानी आहेत — माझा त्यांच्यापुढे काय पाड! आपण त्यांच्यापासून फार दूर आहोत, वारेन्का! कशाला लिहितोय मी हे सगळे? येमेल्यान इवानोविचसुद्धा डोके हलवीत हसला. पण निदान त्याने मला आशा दाखवली होती. तो लायक माणूस आहे. एका माणसापाशी माझी शिफारस करण्याबाबत त्याने आश्वासन दिले आहे. तो माणूस म्हणे वीबोर्गमध्ये राहतो आणि व्याजाने पैसे कर्जाऊ देतो. येमेल्यान इवानोविच म्हणतो की, तो माणूस नक्की कर्ज देईल. माझ्या देवदूता, उद्या

मी तिकडे जाईन – काय? तुमचे काय मत आहे? कर्ज न मिळाले तर पंचाईत आहे! घरमालकीण मला खोलीतून बाहेर काढील आणि जेवण मिळणार नाही. माझ्या बुटांची दैना उडालीय आणि गुंड्या बेपत्ता आहेत... आणखी कित्येक गोष्टी माझ्यापाशी नाहीत! साहेबमंडळींपैकी कुणाच्या लक्षात माझा अवतार आला तर? वारेन्का, महासंकट कोसळेल, महासंकट!

मकार देवूष्कीन.

४ ऑगस्ट

प्रिय मकार अलेक्सेयेविच!

लौकरात लौकर मिळतील तेवढे पैसे कर्जाऊ घ्या, मकार अलेक्सेयेविच! सध्याच्या परिस्थितीत मी तुमच्याकडे मुळीच मदत मागितली नसती, पण माझी अवस्था काय आहे हे तुम्हाला समजले तर! ह्या घरात आम्हाला राहणे अशक्य आहे. माझ्याकडे एक भयानक अप्रिय प्रसंग घडला आणि सध्या मी मनःक्षोभक अवस्थेत आहे. माझ्या मित्रा, तुम्हाला कल्पना आहे, आज सकाळी आमच्याकडे एक म्हाताऱ्या वयाचा, छातीवर पदके लटकावलेला, अनोळखी गृहस्थ आला. आमच्यापाशी त्याचे काय काम, ह्या विचाराने मी नवल करत होते. फेदोरा त्यावेळी दुकानात गेली होती. मी कशी राहते, काय करते, इत्यादी चौकशा तो माणूस करू लागला आणि उत्तरांची वाट न पाहता त्याने जाहीर केले की, त्या ऑफीसरचा तो काका आहे. त्याने मला सांगितले की, त्याच्या पुतण्याच्या मूर्ख वर्तनाचा त्याला फार राग आला आहे, कारण त्याने आपल्याला सबंध घराच्या चर्चेचा विषय बनविले. तो पुढे म्हणाला की, त्याचा पुतण्या पोरकट आहे, त्याच्या डोक्यात वारे शिरले आहे. म्हाताऱ्याने मला त्याच्या संरक्षणाखाली घेण्याची तयारी दाखविली. तरुण माणसांकडे दुर्लक्ष करण्याचा त्याने मला सल्ला दिला व पुढे म्हणाला की, माझ्याबद्दल त्याला पितृवत प्रेम वाटते आणि मला सर्व प्रकारची मदत करण्यास तो तयार आहे. मी लाजून चूर झाले, मला काही सुचेना, पण त्याचे आभार मानायची मी घाई मात्र केली नाही. त्याने बळजबरीने माझा हात धरला, माझ्या गालांवर थोपटले आणि म्हणाला की, मी फार सुरेख आहे व माझ्या गालांवरच्या खळ्या त्याला खूप आवडल्या (तो काय बोलत होता, देव

जाणे!) आणि अखेरीस तो केवळ म्हातारा आहे असे म्हणून त्याने माझे चुंबन घेण्याचा प्रयत्न केला (नालायक मेला!). तेवढ्यात फेदोरा आली. तो थोडासा शरमला, पण परत म्हणाला की, माझ्या नम्रतेबद्दल आणि भल्या जाणीवेबद्दल त्याला खूप आदर वाटतो व मी त्याला परका मानू नये अशी त्याची फार इच्छा आहे. मग त्याने फेदोराला बाजूला बोलावून घेतले व कुठल्यातरी विचित्र बहाण्याखाली तिला काही पैसे देण्याचा प्रयत्न केला. अर्थात फेदोराने पैसे घेतले नाहीत. अखेरीस तो जायला निघाला, परत त्याने मला आश्वासने दिली आणि म्हणाला की, माझ्या भेटीला तो परत येईल, माझ्यासाठी कर्णभूषणे घेऊन येईल (तो स्वतःच खूप शरमलेला दिसत होता) ; घर बदलण्याचा त्याने मला सल्ला दिला, तशी एक जागा म्हणे त्याच्या माहितीची आहे आणि मला काहीही भाडे द्यावे लागणार नाही, असे तो म्हणाला. मी खूप प्रामाणिक आणि समजूतदार मुलगी आहे म्हणून त्याला आवडले, असे तो म्हणाला आणि भ्रष्टाचारी तरुणां-पासून सावध राहण्याचा त्याने इशारा दिला. शेवटी त्याने सांगितले की, आन्ना फ्योदरोवनाला तो ओळखतो आणि ती मला लौकरच स्वतः भेटायला येईल, असा तिचा निरोप त्याने मला दिला. मला तात्काळ सगळा उलगडा झाला. मला काय वाटले ते वर्णन करून सांगणे अवघड आहे. आयुष्यात प्रथमच मी अशा प्रसंगात सापडले होते. माझा तोल सुटला. मी त्याची चांगली खरडपट्टी काढली. फेदोराने मला मदत केली आणि त्याला घरातून अक्षरशः हाकलून लावले. हा सारा उद्योग आन्ना फ्योदरोवनाचा, अशी आमची खात्री पटलीय. नाही तर आमच्याबद्दलची माहिती त्याला कशी मिळाली?

आता मी तुमची मदत मागतेय, मकार अलेक्सेयेविच, तुमच्याकडे भीक मागतेय. देवाशपथ, अशा परिस्थितीत मला एकटी सोडू नका! निदान काहीतरी रक्कम कर्जाऊ घ्या. आम्हाला इथून जागा सोडून जाण्यास पैशांची गरज आहे. इतःपर इथे राहणे शक्य नाही. फेदोराचा तोच सल्ला आहे. आम्हाला किमान पंचवीस रूबल हवे आहेत. मी हे पैसे तुम्हाला परत करीन. काम करून मी पैसे मिळवीन. एक-दोन दिवसात फेदोरा माझ्यासाठी काम आणील, तेव्हा जादा व्याज द्यावे लागले तरी मान्य करा. मी तुम्हाला सगळे पैसे परत करीन, पण देवाशपथ मला मदत करा. तुम-च्या सध्याच्या परिस्थितीत तुम्हाला असा त्रास देताना माझ्या मनाला फार वेदना होत आहेत, पण तुमच्या एकट्यावरच माझ्या सगळ्या आशा!

अच्छा, मकार अलेक्सेयेविच, मला विसरू नका आणि देव तुम्हाला यश देवो!

वा. दो.

४ ऑगस्ट

माझ्या कबूतरा, वार्वारा अलेक्सेयेवना!

ह्या सगळ्या अनपेक्षित प्रहारांनी मी हादरून गेलोय! ह्या भयानक आपत्तींनी माझे मन मारून टाकलेय! माझ्या देवदूता, हे लाळघोटे आणि नालायक थेरडे तुम्हाला सतावून आजारी पाडतील, मरणशय्येवर धाडतील आणि त्या लाळघोट्यांना माझाही मृत्यू घडायला हवा आहे. आणि शपथेवर सांगतो, त्यांचे उद्दिष्ट ते साध्य करतील! आता तुम्हाला मदत करू शकलो नाही, तर लौकरात लौकर मरणे मी पत्करीन! जर तुम्हाला मी मदत केली नाही, वारेन्का, तर ते माझे मरण आहे, अगदी साक्षात तो माझा मृत्यू आहे; आणि मदत केली, तर तुम्ही उडून जाल, हिंस्र पक्ष्यांनी हल्ला चढवलेल्या घरट्यातून उडून जाणाऱ्या पाखराप्रमाणे! लाडके, हाच विचार मला छळतोय. आणि वारेन्का, तुम्ही किती निष्ठुर आहात! अशा कशा वागता तुम्ही? तुम्हाला छळताहेत, तुमचा अपमान करताहेत, माझ्या बाळा, आणि मला त्रास द्यावा लागतोय ह्या विचाराने तुम्ही तळमळता, कर्ज फेडण्यासाठी मेहनत करीन असे वचन देता, म्हणजे खरे सांगायचे तर मुदतीत कर्ज फेडण्यासाठी स्वतःच्या नाजुक प्रकृतीचा बळी द्यायला तयार होता! अशा गोष्टींचा उच्चार करण्यापूर्वी जरा नीट विचार करा, वारेन्का! कशाला तुम्ही शिवणकाम केले पाहिजे, कशाला काम करायचे, स्वतःच्या बिचाऱ्या डोक्याला चिंता करून शिणवायचे, स्वतःचे सुरेख डोळे बिघडवून घ्यायचे आणि प्रकृती ढासळून घ्यायची? हाय, वारेन्का, वारेन्का! माझ्या कबूतरा, मला ठाऊक आहे की, मी कुठेच लायक नाही, पण तरीही कुठेतरी लायक बनायचा मी आटोकाट प्रयत्न करीन! मी जादा काम करीन. लेखकांच्या साहित्याच्या नकला करीन, स्वतः त्यांच्याकडे जाऊन कामाची याचना करीन. चांगल्या लेखनिकांची त्यांना गरज असतेच, मला माहीत आहे. पण तुम्हाला श्रमांपायी आजारी पडू देणार नाही. असले अपायकारक इरादे तुम्हाला अंमलात आणू देणार नाही. माझ्या देवदूता, मी नक्की पैसे उसने आणतो, जर

आणू शकलो नाही तर मरण पत्करीन. माझ्या कबूतरा, तुम्ही लिहिताय की, मी व्याजाच्या दराला घाबरू नये – लाडके, नाही घाबरत, आता मी कशालाही घाबरत नाही. लाडके, मी चाळीस रूबल नोटांमध्ये मागणार आहे; ही रक्कम काही फार नाही, वारेन्का, तुमचे काय मत आहे? माझ्या शब्दावर विश्वास ठेवून चाळीस रूबल द्यायला काय हरकत आहे? म्हणजे मी तुम्हाला विचारतो की, माझ्याकडे एकदा पाहिल्यानंतर कुणी मला चाळीस रूबल उसने देईल एवढी माझी पत आहे ना? माझ्याकडे पाहताक्षणी मी दुसऱ्याच्या मनात विश्वास उत्पन्न करू शकतो का? माझ्या देवदूता, माझ्या ठायी अशी क्षमता आहे का? तुम्हाला काय वाटते? सध्या मी फार घाबरलेला आहे – ह्याच्या फार वेदना होतात. चाळीसपैकी तुम्हाला पंचवीस देईन, वारेन्का, दोन रूबल घरमालकिणीला देईन आणि उरलेले माझ्या खर्चासाठी ठेवीन. वस्तुत: घरमालकिणीला आणखी देणे आवश्यक आहे. पण माझ्या गरजासुद्धा किती अत्यावश्यक आहेत हे तुम्हाला माहीत आहे. ह्या विषयावर अधिक खुलासा करण्याची जरूरी नाही. चांदीच्या एका रूबलचे बूट विकत घेईन. माझ्या जुन्या बुटांमध्ये उद्या कचेरीपर्यंत जाणे तरी शक्य होईल का, अशी मला शंका आहे. स्कार्फ-सुद्धा आवश्यक आहे. माझ्याजवळच्याला एक वर्ष झालेय. पण तुम्ही तुमच्या एप्रनला कापून माझ्यासाठी स्कार्फ बनवायचे वचन दिले आहे, तेव्हा स्कार्फबाबत अधिक विचार करत नाही. तर बूट आणि स्कार्फ आहेत. आता गुंड्या, माझ्या सखी! गुंड्यांशिवाय माझे चालणार नाही हे तुम्ही मान्य कराल, पण माझ्या कोटाच्या निम्म्या गुंड्या तुटून गेल्या आहेत. जर महामहीमांच्या ध्यानात ही अवस्था आली तर काय घडेल, अशा नुसत्या विचाराने मनाचा थरकाप उडतो. ते काय म्हणतील हे ऐकण्याच्या आतच मी मरीन, अगदी जागच्या जागी मरीन! केवळ शरमेपायी! हाय, लाडके! तर बाकी सर्व गरजांसाठी तीन रूबल उरतील – जगायला आणि अर्धा पौंड तंबाखूसाठी. कारण, माझ्या देवदूता, तंबाखूविना मी जगू शकत नाही. आज पाईप तोंडात न धरल्याचा नववा दिवस. मी तंबाखू विकत घेऊ शकलो असतो आणि तुम्हाला त्याबाबत काहीच बोललो नसतो, पण तसे वागायला मला शरम वाटेल. तुम्ही तिकडे संकटात आहात आणि इकडे मी वेगवेगळ्या चैनीत गुरफटलोय. माझ्या विवेकाने मनाला छळू नये म्हणून तुम्हाला मी हे सर्व सांगून टाकतोय. वारेन्का, आता मी प्रांजलपणे तुम्हाला सांगतो की, माझ्या दारिद्र्याने परीसीमा

गाठलीय. अशी निर्णायक अवस्था यापूर्वी कधीही अनुभवली नव्हती. घरमालकीण माझा तिटकारा करते, कुणालाही माझ्याबद्दल आदर उरला नाही. उणीवा महाभयंकर आणि अफाट कर्जे. कचेरीतील कारकून तर पूर्वीपासूनच मला सहन होत नव्हते; आता विचारायलाच नको. मी लपवतोय, सर्वांपासून सर्व लपवू पाहतोय आणि स्वतः लपतोय. कचेरीत-सुद्धा बाजू-बाजूने जातो, सर्वांपासून दूर राहतो. फक्त तुमच्यापाशी बोलण्याचा मी धीर करतो... जर पैसे कर्जाऊ मिळाले नाहीत, तर? मला वाटते वारेन्का, ह्याबाबत विचार न करणे उत्तम आणि अशा विचारांनी स्वतःच्या मनाला आधीच ठार मारू नये. मी एवढ्याचसाठी लिहितोय की, तुम्ही चिंता करू नये आणि वाईट विचारांनी स्वतःचा छळ करू नये. देवा रे, तेव्हा तुमचे काय होईल! तुम्ही हे घर सोडून जाऊ शकणार नाही आणि माझ्यापाशी रहाल—पण तेव्हा मी परतणार नाही, मी कुठेतरी अदृश्य होईन, विरून जाईन. मला वाटते, आता लिहिणे पुरे. मला दाढी केली पाहिजे, कदाचित मी अधिक चांगला दिसेन आणि चांगले दिसणारे लोक नेहमी विश्वास संपादन करतात. देव कृपा करो! प्रार्थना करतो आणि मार्गाला लागतो!

म. देवूष्कीन.

५ ऑगस्ट

प्रिय मकार अलेक्सेयेविच!

तुम्ही निदान निराशेच्या आहारी जाऊ नका! आधीच भरपूर दुःख आहे. तुम्हाला चांदीचे तीस कोपेक धाडतेय. त्याहून जास्त देणे शक्य नाही. तुम्हाला आवश्यक असलेल्या गोष्टी त्यातून विकत घ्या, निदान उद्यापर्यंत जगण्यापुरत्या! आमच्यापाशी जवळजवळ काहीही उरलेले नाही. उद्या काय होईल, मला माहीत नाही. फार वाईट वाटतेय, मकार अलेक्सेयेविच! पण तुम्ही दुःख करत बसू नका. नाही यश आले, तर काय करणार! फेदोरा म्हणते, अजून काही आकाश कोसळले नाही, आणखी काही काळ ह्याच घरात राहता येईल. कारण जरी आम्ही दुसरीकडे रहायला गेलो, तरी शोधणारे शोधत येणारच! फक्त आता इथे राहणे मनाला प्रशस्त वाटत नाही. जर मन उदास नसते, तर तुम्हाला आणखी काही लिहिले असते.

किती विचित्र स्वभाव तुमचा, मकार अलेक्सेयेविच! सगळ्या गोष्टी तुम्ही मनाला फार लावून घेता. त्यामुळे तुम्ही नेहमी दु:खी माणूस रहाल. तुमची सर्व पत्रे मी काळजीपूर्वक वाचते आहे आणि मला आढळतेय की, प्रत्येक पत्रातून तुमची माझ्याबद्दलची चिंता आणि आस्था प्रकट होतेय. तुम्ही स्वत:चीसुद्धा एवढी चिंता कधी केली नसेल. अर्थात सगळे म्हणतील की, तुम्ही दयाळू अंत:करणाचे आहात, पण मी म्हणेन की, तुम्ही अतिदयाळू आहात. तुम्हाला मी मैत्रीचा सल्ला देते, मकार अलेक्सेयेविच! माझ्यासाठी तुम्ही जे काही केलेय, त्याबद्दल खूप खूप धन्यवाद. मला तुम्ही केलेल्या उपकारांची जाण आहे. पण तुमच्यावर कोसळलेल्या संकटांना नकळतपणे मी जबाबदार ठरलेली असूनही तुम्ही अजून माझ्या सुख-दु:खांमध्ये सहभागी होता, केवळ माझ्या प्रेमासाठी जगता, हे पाहताना माझी अवस्था काय बरे होत असेल! दुसऱ्यांची संकटे स्वत:वर ओढवून घेऊन, जगणारा माणूस निश्चितच दु:खी राहणार! आज तुम्ही कचेरीतून परतल्यावर माझ्याकडे आलात, तेव्हा तुमचा अवतार पाहून मी भ्यायले. तुमची मुद्रा पांढरीफटक पडली होती, भेदरलेली होती, अत्यंत निराश होती. कारण स्वत:चे अपयश माझ्यापाशी सांगायला तुम्ही भीत होतात; मला दु:ख द्यायला, मला घाबरवायला भीत होतात. पण मी हसायच्या बेतात होते हे पाहताच तुमचे काळीज एकदम हलके झाले. मकार अलेक्सेयेविच, तुम्ही कष्टी होऊ नका, निराश बनू नका, डोके ताळ्यावर ठेवा, मी तुमची विनवणी करते. सारे काही ठीक होईल, सगळे बदल चांगल्यासाठी घडतील, तुम्ही पहाल! अन्यथा दुसऱ्यांच्या दु:खांना स्वत:च्या जिव्हारी लावून सतत खंत करीत जगणे तुम्हाला फार जड जाईल. अच्छा, माझ्या मित्रा. माझ्याबद्दल अतिचिंता करू नका अशी मी तुमची विनवणी करते.

वा. दो.

५ ऑगस्ट

माझ्या कबूतरा, वारेन्का!

ठीक आहे, माझ्या देवदूता, ठीक आहे! कर्जाऊ पैसे मिळविण्यात मला अपयश आले हा काही महाअनर्थ नव्हे असे तुम्ही म्हणताय. ठीक आहे, तुमच्या अशा निर्णयामुळे मी शांत आणि सुखी झालोय! उलट अत्यानंद झालाय की, तुम्ही मला म्हाताऱ्याला टाकून जात नाही आणि इथेच राहताय. खरे सांगायचे तर तुमचे पत्र वाचल्यावर माझे अंत:करण आनंदाने

उचंबळून आले. माझ्या भावनांची तुम्ही कदर करताय हे पाहून छान वाटले. मी हे अभिमानापायी बोलत नाही, तर तुम्ही माझ्यावर प्रेम करताय आणि माझ्या हृदयातील भावनांची कदर करताय म्हणूनच केवळ. पण माझ्या हृदयाबद्दल कशाला बोलायचे? ते स्वत:च्या जागी आहे. लाडके, तुम्ही मला सांगता की, मी कमकुवत मनाचा राहू नये. होय, माझ्या देवदूता, मी स्वत:च म्हणतो की, माणसाने कमकुवत मन ठेवू नये. पण तुम्हीच सांगा, उद्या कोणत्या बुटांमध्ये कचेरीत जाऊ? ही समस्या आहे. असली चिंता माणसाला नष्ट करू शकते, त्याचा पूर्ण नाश करू शकते. माझ्या प्राणा, मुख्य म्हणजे माझ्या स्वत:साठी मी झुरत नाही. माझ्यापुरते म्हणाल तर ऐन हिवाळी थंडीत मी खुशाल ओव्हरकोटाशिवाय आणि बुटांशिवाय बाहेर जाईन. मी ते सहन करीन, मला त्याचे विशेष वाटणार नाही. मी एक साधा, छोटा माणूस–पण लोक काय म्हणतील? माझे शत्रू, दुष्ट जिभांची ही माणसे, मी ओव्हरकोटाविना गेलो तर काय म्हणतील? खरे तर ओव्हरकोट लोकांसाठी घालावा लागतो आणि बूटसुद्धा त्यांच्याचसाठी. माझ्या लाडके, माझ्या प्रतिष्ठेला आणि भल्या नावाला राखण्यासाठी मला बुटांची गरज आहे. फाटक्या बुटात दोन्ही गोष्टी गमावतात. माझ्यावर विश्वास ठेवा, लाडके, माझ्या अनेक वर्षांच्या अनुभवावर विश्वास ठेवा. जगाचे आणि माणसांचे ज्ञान झालेल्या माझ्यासारख्या म्हाताऱ्याचे ऐका, त्या खर्डेघाशी करणाऱ्या लेखकूंचे ऐकू नका.

आज प्रत्यक्षात काय काय घडले, आज मला काय काय सहन करावे लागले, त्याबद्दल अजून तपशीलवारपणे तुम्हाला कथन केलेले नाही. आज एका सकाळच्या प्रहरात ज्या काही मानसिक यातनांमधून मला जावे लागले, तेवढ्या यातना दुसऱ्या माणसाला संपूर्ण वर्षभरातसुद्धा सोसणार नाहीत. तर असे घडले: त्याला घरीच गाठावे आणि मला कचेरीला उशीर होऊ नये म्हणून अगदी भल्या सकाळीच घरातून बाहेर पडलो. आज पाऊस मुसळधार कोसळत होता, सगळीकडे डबकी साचली होती! माझ्या पाखरा, मी स्वत:ला ओव्हरकोटात गुंडाळून घेतले होते आणि चालता चालता विचार करत होतो: "देवा! माझ्या पापांना क्षमा कर आणि माझ्या आत्ताच्या इच्छा पूर्ण कर!" एका चर्चजवळून जाताना क्रूस-चिन्ह केले, सर्व पापांच्या क्षालनार्थ देवाची विनवणी केली आणि मला आठवण झाली की, देवाशी संवाद करण्यास मी लायक नाही. मी विचारात गढलो आणि कुठेही नजर टाकण्याची इच्छा नव्हती. रस्त्यांवर-

1744

च्या चिखलाकडे दुर्लक्ष करून चालत होतो. रस्त्यांवर माणसांची फारशी वर्दळ नव्हती आणि जे लोक भेटत होते ते सगळे असेच विचारांमध्ये गढलेले, चिडलेले, चिंताग्रस्त. आणि त्यात आश्चर्य नव्हे. एवढ्या सकाळी तसल्या भयानक हवेत केवळ मजेखातर फिरायला कोण बाहेर पडेल? कारागीर संघामधले कळकट कामगार भेटले. चालताना मला धक्के मारून गेले! भीतीने मला घेरले, कसेतरीच वाटू लागले आणि आता पैशाविषयी विचार करण्याची इच्छा होईना. वस्क्रेसेन्स्की पुलापाशी माझ्या बुटाच्या तळव्याने जबडा उघडला व चालणे अवघड बनले. तेवढ्यात आमचा लेखनिक येर्मो-लायेव तेथे भेटला. मला पाहताच एकदम थबकला, ताठ उभा राहिला आणि डोळ्यांनी माझा पाठलाग करू लागला. त्याची नजर जणू वोदकासाठी पैसे मागत होती. माझ्या मनात विचार आला: "अरे बंधू, आता कुठली वोदका?" मला कमालीचा थकवा जाणवला, विश्रांतीसाठी मी थोडा थांब-लो आणि मग पुढे निघालो. कशावर तरी विचार केंद्रित करण्यासाठी, लक्ष दुसरीकडे वळविण्यासाठी, मनाला धीर आणण्यासाठी, मी सभोवती नजर टाकली. पण एकही वेगळा विचार मनात आला नाही आणि एका डबक्यात पाय पडल्यामुळे अंगावर एवढी घाण उडाली की, स्वतःची स्वतःला लाज वाटू लागली. अखेरीस दूरवर मला ते पिवळे लाकडी घर दिसले. त्या घराला चांदईचा पोटमाळा होता. मनात आले: "येमेल्यान इवानोविचने वर्णन केलेले हेच ते मार्कोवचे घर." (हाच तो मार्कोव, जो व्याजावर पैसे देतो.) मला स्वतःचे भान राहिले नाही. वस्तुतः तेच मार्कोवचे घर हे मला माहीत होते, पण तरीही दरवानाला विचारले: "बंधू, हे कुणाचं घर?" दरवान उर्मट होता. दात करकरा चावत अनिच्छेने म्हणाला: "होय, तुम्हाला माहिती पाहिजे असली तर हेच मार्कोवचं घर!" हे सगळे दरवान अगदी निगरगट्ट असतात. वस्तुतः दरवानाबद्दल कशाला मी विचार करू? पण त्याच्या तशा वागण्यामुळे मनात एक प्रकारची अप्रियता निर्माण झाली. पण अशा एकामागून एक क्षुल्लक गोष्टी घडत जातात आणि त्यांचे ओझे बनते. घराजवळून मी तीनदा चकरा मारल्या व दरवेळी मनाची अवस्था अधिकाधिक वाईट होत गेली. विचार आला: "नाही, देणार नाही तो पैसे, मुळीच देणार नाही! मी त्याला पूर्ण अनोळखी माणूस. शिवाय माझे दर्शन तेवढे प्रिय नव्हे आणि मामला नाजुक आहे. काय नशी-बात असेल तसे घडो! केवळ प्रयत्न केला नाही अशी मागाहून खंत वाटू नये म्हणून विचारायचे; आणि नुसते विचारले म्हणून काही मला खाणार

नाहीत!" मी हळूच फाटकाची कडी काढली. तेथे दुसरे संकट वाढून ठेवलेले – अंगणातील मूर्ख, लूतभरा कुत्रा घसा फुटेपर्यंत माझ्यावर भुंकू लागला. अशा क्षुल्लक गोष्टी माणसाचा नेहमी तोल ढळवतात, त्याने आधी मनाशी ठरवून ठेवलेल्या सर्व गोष्टी एकदम विसरल्या जातात. अर्धमेल्या अवस्थेतच मी घरात प्रवेश केला आणि आणखी एका संकटात सापडलो. उंबरठ्याशी एका म्हातारीवर मी अडखळलो. म्हातारी मडक्यांमध्ये दूध गाळत होती. माझ्या धक्क्यामुळे अर्थात मडकी उलटली आणि सगळे दूध सांडले. ती मूर्ख म्हातारी कर्कश्यपणे ओरडली: "अरे बाप्या, तू कुठं चाललास? तुला काय पाहिजे?" आणि तिची माझ्यावर सरबत्ती चालू झाली. लाडके, मी ह्या प्रसंगाची एवढ्याचसाठी नोंद करतोय, कारण अशा कामांवेळी माझ्या बाबतीत नेहमी असेच काहीतरी घडत आले आहे. कायम मी स्वतः-वर अडचणी ओढवून घेत असतो. गोंगाटापायी तेथे भयानक हडळीप्रमाणे दिसणारी म्हातारी घरमालकीण हजर झाली. मी तिला थेट विचारले: "इथे मार्कोव राहतात?" ती नाही म्हणाली आणि अप्रिय नजरेने मला न्याहाळू लागली. मग तिने विचारले: "त्याच्याकडे तुमचे काय काम आहे?" मी तिला सगळा खुलासा केला, येमेल्यान इवानोविचने पाठवले असे सांगितले व काम आहे असे म्हणालो, म्हातारीने तिच्या मुलीला हाक मारली. उंच, अनवाणी मुलगी तेथे आली. म्हातारी तिला म्हणाली: "तुझ्या वडलांना हाक मार. ते वरती भाडेकरूपाशी आहेत." आणि मला तिने आत बोलाविले. मी आत गेलो. खोली ठीक होती, भिंतींवर चित्रे लटकत होती, कुठल्यातरी जनरलांची; एक दिवाण होता, गोल मेज होते, फुलझाडांच्या कुंड्या होत्या. मनात सारखा विचार येत होता – लौकरात लौकर तेथून काढता पाय घ्यावा काय? लाडके, मी अक्षरशः पळ काढायच्या बेतात होतो. दुसऱ्या दिवशी येणे जास्त इष्ट, असा मी विचार केला. उद्या हवा जास्त चांगली असेल, आज माझ्याकडून दूध सांडवले गेले होते आणि भिंतींवरचे जनरलही काहीशा रागीट नजरांनी माझ्याकडे पहात होते असे भासत होते... मी एव्हाना दारापर्यंत पोहोचलो होतो, तेवढ्यात तो आला. पांढरे केस, भिरभिरती नजर, मेणचट अंगरखा आणि कमरेभोवती दोरी बांधलेली. त्याने मला येण्याचे कारण विचारले आणि मी त्याला सांगितले की, येमेल्यान इवानोविचने धाडले, मला चाळीस रूबल उसने पाहिजे होते, वगैरे. पण माझे बोलणे पूर्ण झाले नाही. त्याच्या डोळ्यांवरून मला समजले की, माझी कामगिरी फसली होती. तो म्हणाला: "आत्ता माझ्यापाशी

पैसे नाहीत. आणि तुमच्यापाशी तारण काय?" मी त्याला सांगितले की, माझ्यापाशी तारण काही नाही आणि येमेल्यान इवानोविचचा परत उल्लेख करून म्हणालो की, माझे काम तातडीचे आहे. तो म्हणाला: "येमेल्यान इवानोविचचा इथे संबंध काय? माझ्यापाशी पैसे नाहीत." अर्थात असे घडणार ह्याची मला आधीच जाणीव होती. वारेन्का, त्यावेळी वाटले की, पायांखालची जमीन दुभंगली तर किती छान होईल! थंडीपायी पाय गारठले होते, पाठीवर शहारे उमटत होते. मी त्याच्याकडे पहात होतो आणि तो माझ्याकडे पहात होता. त्याचे डोळे जणू म्हणत होते: "बंधू, आता जा! तुझे इथे काही काम नाही!" जर ही दुसरी बाब असती, तर मी भलताच शरमलो असतो. "तुम्हाला कशासाठी पैसे हवे आहेत?" (लाडके, त्याने मला असे चक्क विचारले!) केवळ काहीतरी बोलायचे म्हणून मी बोलू लागलो, पण एव्हाना तो ऐकत नव्हता. म्हणाला: "नाही, माझ्यापाशी पैसे नाहीत. असते तर आनंदाने दिले असते." पण मी त्याची विनवणी करीत राहिलो, वेळेत पैसे परत करीन, मुदतीच्या आधीसुद्धा परत करीन, त्याला हवे तेवढे व्याज देईन, अशी आश्वासने देत राहिलो. लाडके, त्या क्षणी तुमच्या सगळ्या संकटांची आणि गरजांची मी आठवण केली, तुम्ही मला दिलेला अर्धा रूबल आठवला. पण तो म्हणाला: "व्याजाचं बोलू नका. तारण काय ते सांगा! नाही तर माझ्यापाशी पैसे नाहीत, देवाशपथ पैसे नाहीत. असते तर आनंदाने दिले असते!"—दरोडेखोर लेकाचा! वरती देवाचे नाव घेतो!!

माझ्या लाडके, मी त्या घरातून बाहेर कसा पडलो, वीबोर्ग भाग ओलांडून वस्क्रेसेन्स्की पुलापर्यंत कसा गेलो, काही आठवत नाही. कमालीचा थकलो होतो, हाडांपर्यंत थंडी घुसली होती आणि केवळ दहा वाजता कचेरीत पोहोचलो. कपड्यांवरची घाण स्वच्छ करायची इच्छा होती, पण पहारेकरी स्नेगीऱ्योव म्हणाला की, नाही—ब्रश खराब होईल. आणि ब्रश कचेरीच्या मालकीचा. तर आता ते असे वागतात, लाडके, ह्या मंडळींच्या दृष्टीने माझी पाय पुसण्याएवढीसुद्धा लायकी नाही. वारेन्का, मला कशाचा त्रास होतो? पैसे नाहीत ह्याचा त्रास होत नाही; पण जीवनातील हे दारिद्र्य, ह्या कुजबुजी, ती हास्ये आणि ते विनोद, मला ठार मारताहेत! महामहीमांनी चुकून त्या गोष्टी ऐकल्या तर? लाडके, माझे सोन्याचे दिवस सरले! आज तुमची सगळी पत्रे परत वाचली. लाडके, खूप कष्टी झालो! माझ्या प्राणा, अच्छा, देव तुमचे रक्षण करो!

म. देवूष्कीन.

ता. क. माझ्या दु:खांचे वर्णन अर्धवट थट्टेत करण्याचा माझा इरादा होता, वारेन्का, पण तसे करणे जमलेले नाही. तुमचे मनोरंजन करावे अशी इच्छा होती. लाडके, मी तुमच्याकडे येईन, नक्की येईन, उद्या येईन.

११ ऑगस्ट

वार्वारा अलेक्सेयेवना! माझ्या लाडक्या कबूतरा!

खलास झालो मी, आपण दोघे खलास झालो, एकत्र संपलो, कायमचे नष्ट झालो. माझा लौकिक, माझा अभिमान रसातळाला गेले! सगळे गमावले! मी ठार झालो आणि, लाडके, तुम्हीही मेलात, माझ्यासह तुम्ही कायमच्या मेलात! तुमच्या सर्वनाशाला मी कारणीभूत ठरलो! ते माझी पारध करताहेत, माझी टवाळी करताहेत, मला शिव्या देताहेत आणि घरमालकीण तर साक्षात शाप देते आहे. आज माझ्यावर खूप खूप ओरडली, एखाद्या लाकडी ढलप्यापेक्षा हीन तऱ्हेने तिने मला वागविले. संध्याकाळी राताझ्यायेवकडे कुणीतरी मी तुम्हाला लिहिलेल्या पत्राचा कच्चा तर्जुमा मोठ्यांदा वाचून दाखविला. माझ्या खिशातून ते पत्र कुठेतरी पडून गहाळ झाले होते. माझ्या लाडके, केवढ्या मोठ्यांदा ते हसत होते! आपली त्यांनी टवाळी केली, पोट धरधरून हसले, द्रोही! मी राताझ्यायेवकडे गेलो आणि तो विश्वासघातकी आहे असे म्हणालो. तो द्रोही आहे असेही म्हटले! त्यावर राताझ्यायेव उत्तरला की, मीच द्रोही होतो, वेगवेगळ्या गोष्टी जिंकण्यात मी गुंतलो आहे. म्हणाला की, मी त्यांच्यापासून लपवून ठेवले आणि मी मिस्टर लव्हलेस आहे. आता मला सगळे मिस्टर लव्हलेस [21] म्हणतात! माझ्या देवदूता, आता त्यांना सगळे माहीत झाले आहे, तुमच्या-माझ्याबद्दलच्या सर्व गोष्टी त्यांना ठाऊक आहेत! एवढेच नव्हे तर फाल्दोनी त्यांना सामील आहे. आज त्याला दुकानातून काही वस्तू विकत घेऊन यायला मी सांगितले, तर त्याने चक्क नकार दिला, कामात आहे म्हणाला! मी त्याला बोललो: "माझं ऐकणं तुझं कर्तव्य आहे!" तर उलट म्हणतो: "मुळीच बांधलेला नाही तुम्हाला! तुम्ही माझ्या मालकिणीला पैसे देत नाही, तर तुमचं काम करायला मी बांधलेला नाही!" त्याच्याकडून, त्या अडाण्याकडून, झालेला अपमान मला सहन झाला नाही आणि त्याला मूर्ख म्हणालो. तर तो मला म्हणाला–

"हे मूर्खाकडून ऐकलं!" मला वाटले की, तो दारूच्या नशेत असे उर्मट वागला, म्हणून मी त्याला नशेबाज म्हणालो. तर तो विचारतो: "तुम्ही थोडीच दारू पाजलीत मला? काल रात्रीच्या नशेची डोकेदुखी उतरवायला परत दारूसाठी पैसे आहेत का? स्वतः नेहमी त्यासाठी दहा कोपेकची भीक मागत फिरता!" आणखी पुढे म्हणाला: "हात् तुमची! आणि स्वतःला सभ्य गृहस्थ म्हणवता!" लाडके, गोष्टी ह्या थराला येऊन पोहोचल्यात! वारेन्का, मला जगण्याची शरम वाटतेय! मला जणू वाळीत टाकलाय. पासपोर्ट नसलेल्या भटक्यापेक्षा वाईट वागवतात. भयानक, महाभयानक! मी खलास झालो, पुरता नष्ट झालो! कायमचा संपलो!

म. दे.

१३ ऑगस्ट

प्रिय मकार अलेक्सेयेविच!

आपल्यावर संकटांमागून संकटे कोसळताहेत आणि काय करावे हे आता मला स्वतःलाच समजेनासे झाले आहे! आता तुमचे काय होईल? माझ्यावर आशा धरणे व्यर्थ. आज माझ्या डाव्या हाताला गरम इस्त्रीचा चटका बसला. चुकून हातून निसटली, मला भाजले आणि इजाही झाली. काम करणे शक्य नाही आणि फेदोरा गेले तीन दिवस आजारी आहे. मी कमालीची अस्वस्थ आहे. तुम्हाला चांदीचे तीस कोपेक पाठवतेय. आमच्यापाशी असलेली ही शेवटची रक्कम. तुमच्या सध्याच्या गरजेच्या काळात तुम्हाला मदत करण्याची माझी किती तीव्र इच्छा आहे हे एक देवच जाणे! रडू कोसळे-पर्यंत दुःख होतेय! अच्छा, माझ्या मित्रा! आज जर आमच्याकडे आला असतात, तर माझे खूप सांत्वन झाले असते.

वा. दो.

१४ ऑगस्ट

मकार अलेक्सेयेविच! तुम्हाला काय झालेय? बहुधा तुम्ही देवाची भीती टाकलीय! तुम्ही मला अक्षरशः वेडी करणार. तुम्हाला शरम नाही वाटत? तुम्ही स्वतःचा नाश करता आहात, तुम्ही केवळ स्वतःच्या लौकि-

ाचा विचार करा! तुम्ही प्रामाणिक, सुस्वभावी, अभिमानी माणूस आहात – आता तुमच्याबद्दल सर्वांना समजले तर? केवळ शरमेपायी तुम्हाला मरण येईल! अथवा तुमच्या पांढऱ्या केसांची तुम्हाला दया वाटत नाही? देवाची जरा भीती बाळगा! फेदोरा म्हणाली की, इतःपर तुम्हाला मदत करणार नाही आणि मीसुद्धा तुम्हाला पैसे देणार नाही. तुम्ही मला कुठल्या दशेला नेलेत, मकार अलेक्सेयेविच? तुम्ही असे वाईट वागता, ह्याबद्दल मला काहीच त्रास होत नाही असे वाटते? तुमच्यापायी मी काय काय सहन करते हे तुम्हाला माहीत नाही. आमच्या जिन्यावरून जाणे मला अशक्य बनलेय. सगळे माझ्याकडे टक लावून बघतात, बोटे दाखवतात आणि भयानक शब्दांचा उच्चार करतात. अगदी तोंडासमोर म्हणतात: **दारुड्याशी मी संगत बांधलीय!** ऐकायला कसे वाटते? जेव्हा तुम्हाला झिंगलेल्या अवस्थेत घरी आणतात तेव्हा सगळे भाडेकरू कुत्सितपणे बोटे दाखवून म्हणतात: "बघा, त्या कारकुनाला परत वाहून आणलं!" मला तुमच्यापायी उजळ माथ्याने वावरणे अशक्य झालेय. शपथपूर्वक तुम्हाला सांगत्ये की, इथून मी निघून जाणार. कुठेही मोलकरीण म्हणून, धुणी धुवायला म्हणून निघून जाईन, पण इथे थांबणार नाही. तुम्ही माझ्याकडे या असे मी लिहिले होते, पण आला नाहीत. म्हणजे माझ्या अश्रूंची आणि विनंत्यांची तुम्हाला मुळीच पर्वा नाही, मकार अलेक्सेयेविच! आणि पैसे कुठून पैदा केलेत? देवाखातर, स्वतःला सांभाळा! नाही तर नाश पावाल, हकनाक नाश पावाल! केवढी लज्जा, केवढी शरम! काल तुमच्या घरमालकिणीने तुम्हाला म्हणे घरात येऊ दिले नाही आणि मधल्या बोळकंडीत तुम्ही रात्र काढलीत. मला सगळे ठाऊक आहे. जेव्हा हे सर्व मला समजले, तेव्हा मला किती वाईट वाटले त्याची तुम्हाला कल्पना नाही. माझ्याकडे या, आमच्यापाशी तुम्हाला उल्हसित वाटेल. आपण एकत्र वाचन करू, जुन्या आठवणी सांगू. फेदोरा धर्मक्षेत्रांच्या यात्रांची वर्णने सांगील. माझ्या कबूतरा, निदान माझ्याखातर स्वतःचा आणि माझा नाश करू नका. तुमच्या एकट्यासाठीच तर मी जगतेय, तुमच्यासाठीच इथे राहतेय, प्रतिष्ठित माणसासारखे वागा, संकटांना खंबीरपणे तोंड द्या आणि गरीब असणे गुन्हा नव्हे हे लक्षात ठेवा. एवढे निराश का व्हायचे? हे सर्व तात्पुरते आहे. देवाची कृपा असेल तर सर्व ठीक होईल. फक्त सध्या तुम्ही चिकाटी धरा. तुम्हाला वीस कोपेकचे नाणे पाठवतेय. त्याची तंबाखू विकत घ्या अथवा तुम्हाला दुसरे काय पाहिजे असेल ते घ्या, मात्र वाईट गोष्टीसाठी खर्च करू नका. आमच्याकडे या,

नक्की या. पूर्वीप्रमाणे कदाचित तुम्हाला लाज वाटेल, पण लाजू नका. ही खोटी लाज आहे. त्यापेक्षा प्रामाणिक पश्चात्ताप करा. देवावर श्रद्धा ठेवा. तो सगळयांचे कल्याण करतो.

वा. दो.

१९ ऑगस्ट

वार्वारा अलेक्सेयेवना, लाडके!

मला शरम वाटते, वार्वारा अलेक्सेयेवना, विलक्षण शरमिंदा झालोय मी! पण लाडके, ह्यात विशेष काय घडले? कधीतरी हृदयाला आनंद का देऊ नये? तेव्हा मला विसर पडतो की, माझ्या बुटांचे तळवे झिजलेले नाहीत, कारण बुटांचे तळवे ही एक क्षुल्लक बाब आहे आणि बुटांचे तळवे नेहमी सामान्य, गचाळ, घाणेरडेच राहणार. बूटसुद्धा क्षुल्लकच! ग्रीक पंडित बूट न वापरता फिरत, तर मग आपणच असल्या क्षुल्लक वस्तूंची चिंता का करावी? अशा परिस्थितीत माझा अपमान का करावा, माझी टिंगल का करावी? अरेरे, लाडके, तुम्हाला दुसरा विषय नाही मिळाला लिहायला? फेदोराला सांगा की, ती मूर्ख, त्रासदायक, भांडखोर बाई आहे, महामठ्ठ आहे! माझ्या पांढऱ्या केसांबाबत म्हणाल तर तुमची चूक होते आहे, माझ्या जिवलगा, कारण तुम्हाला वाटतो तेवढा मी म्हातारा नाही. येमेल्या तुम्हाला नमस्कार धाडतोय. तुम्ही लिहिता की, माझ्यापायी तुमच्या मनाचा चुराडा झाला आणि रडलात. मी तुम्हाला लिहितो की, माझ्याही मनाचा चुराडा झालाय आणि मी रडलो. सरतेशेवटी तुम्हाला आरोग्य आणि सुख लाभो अशा इच्छा व्यक्त करतो. माझ्याबाबतीत म्हणाल तर माझे आरोग्य छान आहे आणि मी सुखी आहे. माझ्या देवदूता, तुमचा सदैव स्नेही

मकार देवूष्कीन.

२१ ऑगस्ट

माननीय बाईसाहेब आणि प्रिय सखी, वार्वारा अलेक्सेयेवना!

मला जाणीव आहे की मी दोषी आहे, तुमचा मी अपराध केला हे

मला समजतेय. पण लाडके, हे सारे समजले-उमजले तरी त्याचा काही उपयोग नाही. अपराध करण्यापूर्वीही मला त्याची जाणीव होती, तरीही मन खचले, चुकीची जाणीव होत असूनही अधःपात घडला. मी दुष्ट नाही आणि कठोर हृदयाचाही नाही. माझ्या कबूतरा, तुमच्या काळजाला जखम करायला एखादा रक्तपिपासू वाघ पाहिजे, पण माझे काळीज तर कोकराचे आहे. तुम्हाला माहीतच आहे की, माझी वृत्ती रक्तपिपासू नाही. परिणामी, माझ्या देवदूता, माझ्या अपराधाबद्दल मी मुळीच दोषी नाही, ना माझे हृदय ना माझे मन. खरोखर नेमका दोष कुणाला द्यायचा हे मला माहीत नाही. लाडके, ही बाब फार गोंधळाची आहे! तुम्ही मला चांदीचे तीस कोपेक धाडलेत आणि नंतर वीस कोपेकचे एक नाणे. तुमच्यासारख्या पोर-कीच्या त्या पैशांकडे पाहताना माझे काळीज पिळवटले. स्वतःचा हात भाजून घेतलात, लौकरच उपास घडतील आणि लिहिता की, मी तंबाखू विकत घ्यावी. अशा प्रसंगी मी कसे वागायचे? निलाजरेपणाने तुमच्यासारख्या पोरक्या मुलीला लुटायचे? माझे मनच खचले. प्रथम मला वाटले की, मी अगदी कुचकामी आहे, माझ्या बुटांच्या तळव्यांपेक्षा माझी जास्त लायकी नाही. मी काही महत्त्वाचा आहे असे मानणे मला मूर्खपणाचे वाटू लागले. उलट मी अगदी बिनमहत्त्वाचा आहे, काही प्रमाणात अशिष्ट आहे, असे मी ठरविले. ज्या क्षणी मी स्वतःबद्दलचा आदर गमावला, त्याच क्षणी माझ्या ठायी असलेल्या गुणांना आणि लायकीला मी मूठमाती दिली. अर्थातच अपरिहार्यपणे माझा अधःपात घडला. नशीबात तसे घडायचे होते. माझ्याकडे त्याचा दोष नाही. मी प्रथम ताजी हवा खायला बाहेर पडलो. पुढे एकापा-ठोपाठ एक गोष्टी घडत गेल्या. निसर्ग उदास होता, हवेत गारठा होता, पाऊस कोसळत होता आणि येमेल्या तेवढ्यात भेटला. वारेन्का, त्याने स्वतःजवळच्या सर्व वस्तू गहाण टाकल्या होत्या. माझ्याशी त्याची भेट झाली तेव्हा दोन दिवसात त्याच्या तोंडात अन्न पडले नव्हते. आता त्याला जे गहाण टाकायचे, ते गहाण टाकता येत नाही. वारेन्का, स्वतःच्या इच्छापूर्तीपेक्षा दुसऱ्या माणसाचे दुःख बघून माझ्या हातून तसे घडले. अशा रीतीने मी पाप केले. आम्ही दोघे एकत्र रडलो! तुमच्या आठवणी काढल्या. तो खूप चांगल्या मनाचा माणूस आहे, फार संवेदनाशील माणूस आहे. लाडके, ह्या सर्व गोष्टी मला स्वतःला जाणवतात. माझ्या बाबतीत तसे घडते ह्याचे कारण मला तीव्रतेने सगळ्या गोष्टी जाणवतात. माझ्या कबू-तरा, मी तुम्हाला कोणते देणे लागतो हे माहीत आहे! तुमची ओळख

झाल्यानंतर सर्वप्रथम मी स्वतःला अधिक चांगला ओळखू लागलो आणि तुमच्यावर प्रेम करू लागलो. तुम्ही भेटेपर्यंत, माझ्या देवदूता, मी एकाकी होतो, जणू झोपलो होतो, ह्या जगात रहात नव्हतो. माझे वैरी म्हणत की, माझी आकृतीसुद्धा वाईट होती. माझा ते तिरस्कार करीत. शेवटी मी माझाच तिरस्कार करू लागलो. मी मठ्ठ आहे असे म्हणत आणि खरोखरीच मी स्वतःला मठ्ठ समजू लागलो. पण तुम्ही माझ्या आयुष्यात आलात आणि माझे अंधारे जीवन प्रकाशाने उजळून टाकलेत, माझे काळीज आणि मन उजळून निघाले, माझ्या मनाला शांती लाभली आणि दुसऱ्यांपेक्षा मी अधिक वाईट नाही असे मला समजले. फक्त मला चमक नाही, चकाकी नाही, पण मी माणूस आहे, काळजाने आणि मनाने मी माणूस आहे. आता मला जाणवले की, नशीबाने माझा छळ केला, माझी अवहेलना केली, स्वतःच्या प्रतिष्ठेला मी कःपदार्थ मानू लागलो आणि माझ्या दुर्भाग्यांपायी दडपून माझे मन खचले. आता तुम्हाला सगळे माहीत झाले आहे लाडके, तेव्हा ह्या विषयाचा पुन्हा कधी उल्लेख करू नका असे डोळ्यात पाणी आणून मी विनवितो. कारण मी खूप दुःखी, खूप उदास आहे आणि माझे काळीज विदीर्ण होतेय.

लाडके, माझे सादर प्रणाम.

तुमचा विश्वासू,

मकार देवूष्कीन.

३ सप्टेंबर

मागील पत्र मी पूर्ण केले नाही, मकार अलेक्सेयेविच, कारण मला लिहिणे अवघड झाले होते. कधी कधी असे क्षण येतात जेव्हा एकटी राहणे, एकटीने दुःख करणे, कुणालाही सहभागी न करता एकटीने झुरणे मला आवडते आणि अशी मनःस्थिती वारंवार घडू लागली आहे. माझ्या आठवणींमध्ये असे काही आहे, ज्याचा मला स्वतःलाच उलगडा होत नाही. पण त्यामुळे अनिवारपणे मी दूर वाहवत जाते आणि तासचे तास मला भोवतालच्या गोष्टींचा विसर पडतो. माझ्या सध्याच्या जीवनात प्रिय अथवा अप्रिय असा एकही ठसा नाही, जो मला भूतकाळातील तत्सम घटनेची आठवण करून देईल, विशेषतः माझ्या बालपणीच्या सोनेरी काळातील! पण

अशा क्षणांनंतर मला नेहमी विषण्ण वाटते. अचानक मला क्षीण वाटू लागते, माझी स्वप्ने मला थकवा आणतात आणि माझी प्रकृती अधिकाधिक वाईट होत चालली आहे.

पण आज अगदी ताजी, सूर्यप्रकाशित, चकचकीत सकाळ उजाडली — अशा सकाळी शरदात फार क्वचित उगवतात — आणि मी तिचे खूप आनंदाने स्वागत केले. तर आता शरदाचा मोसम सुरू झाला! खेड्यात हा मोसम मला किती आवडायचा! मी तेव्हा लहान होते, तरीही मला ह्या भावना जाणवायच्या. शारदीय सकाळीपेक्षा संध्याकाळ मला जास्त आवडायची. मला आठवते, आमच्या घरापासून दोन पावलांच्या अंतरावर टेकडीच्या पायथ्याशी तळे होते. ते तळे आत्ता जणू माझ्या नजरेसमोर उभे आहे — त्याचा विस्तार विशाल होता, पाणी स्फटिकाप्रमाणे नितळ, स्वच्छ होते. जर संध्याकाळ शांत असली, तर तळे स्तब्ध असायचे. किनाऱ्यावरील झाडे मुळीच सळसळायची नाहीत, पाणी हलायचे नाही, जणू आरसा भासायचे! हवा ताजी, थंडगार! गवतावर दंवाचा शिडकावा व्हायचा, किनाऱ्यानजीकच्या झोपड्यांच्या खिडक्या प्रकाशाने उजळायच्या, गुरांचे कळप घरी परतायचे. अशा वेळी मी हळूच घराबाहेर निसटायची व देहभान हरपून माझे तळे निरखत रहायची. मच्छीमार पाण्यापाशी सुक्या काटक्यांची शेकोटी पेटवीत आणि पाण्यात दूरपर्यंत त्या शेकोटीचा उजेड चमकत रहायचा. आकाश थंड आणि निळे दिसायचे, त्याच्या कडा मात्र आगीच्या पट्ट्यांनी लालभडक व्हायच्या. मग ते पट्टे हळूहळू फिकट होत जात. चंद्राची कोर उगवायची. नितळ वातावरणात सर्व ध्वनी खणखणीत उमटत: पाखराच्या पंखांचा आवाज, लव्हाळयांची कुजबूज अथवा माशाने पाण्यात मारलेली सुळकांडी — सगळे ऐकू यायचे. निळ्या पाण्यावर पांढरी, पातळ, पारदर्शी वाफ ओठंगायची. दूरवर अंधार पसरायचा. सगळ्या गोष्टी जणू धुक्यात बुडून जायच्या. पण जवळच्या गोष्टी मात्र फार ठळक व्हायच्या, अगदी कोरून काढल्याप्रमाणे भासायच्या — होडी, किनारा, बेट; कुणीतरी फेकून दिलेले अथवा विसरलेले, किनाऱ्यानजीकच्या पाण्यात हिंदकळणारे लाकडी पिंप; लव्हाळयांमध्ये घुटमळणारी पिवळ्या पानांची डहाळी, उशीरा आलेला सागरपक्षी क्षणात थंड पाण्यात बुडी मारतो, तर क्षणात वर झेपावून धुक्यात बुडून जातो. मी टक लावून पहायची, कान टवकारून ऐकायची. फार छान, अद्भुत वाटायचे मला! तेव्हा मी खूप लहान होते वयाने!

शरदाचा मोसम मला फार फार आवडायचा, विशेषत: शरदाच्या

मोसमातील अखेरीचे दिवस. तेव्हा पीककापणी झालेली असते, सगळी कामे संपलेली असतात, लाकडी झोपड्यांमध्ये माणसांच्या मैफली जमत असतात, तेव्हा सगळेजण हिवाळ्याची वाट पहात असतात. त्यावेळी सर्वत्र उदासीनता पसरते, आकाशात ढगांची दाटी होऊ लागते, बोडक्या रायांच्या कडांना पाऊलवाटांवर पिवळ्या पानांचे ढीग साचत असतात. जंगल निळे-काळे दिसू लागते, विशेषतः सायंकाळी ओले धुके पसरते तेव्हा, आणि झाडे राक्षसांप्रमाणे, भयानक पिशाच्चांप्रमाणे त्या धुक्यात तरंगू लागतात. एखादेवेळी फिरून परत येताना उशीर व्हायचा, इतरांपासून मी मागे पडायची, एकटी झपाझपा पावले टाकीत चालायची, तेव्हा पोटात भीतीचा गोळा उठलेला असायचा. एखाद्या पानाप्रमाणे सर्वांग थरथरायचे. झाडाच्या ढोलीतून एखादा भयानक चेहरा माझ्याकडे रोखून पाहतोय असा विचार मनात यायचा. मग अचानक जंगलातून वाऱ्याची वावटळ उठायची आणि बोडक्या फांद्यांवरची उरलीसुरली पाने भिरकावून लावताना घूं घूं आवाज करायची. पाठोपाठ पक्ष्यांचे प्रचंड थवे कलकलाट करीत आकाश झाकोळून टाकायचे. मी पुरती भेदरून जायची, कुणीतरी कानात पुटपुटून सांगतेय असा भास व्हायचा: "धाव, पळ, मुली, उशीर करू नको. आता इथं फार भयानक वाटेल. पळ, पोरी!" काळजात जोरदार धडकी भरायची आणि श्वास घुसमटेपर्यंत मी धूम ठोकायची. घरी धापा टाकीत यायची, तर तेथे आनंदी वातावरण असायचे. आम्हा मुलांना वाटाणे सोलायचे अगर पॉपीच्या बिया फोडायचे काम देण्यात येई. चुलाण्यात ओलसर लाकडे कडकडत पेटत असत. आई आमच्या कामगिरीवर आनंदाने अधूनमधून कटाक्ष टाकायची. आमची म्हातारी दाई उल्याना जुन्या काळातील आठवणी सांगायची अथवा मांत्रिक व भुतांच्या भयानक गोष्टी सांगायची. आम्ही मुले एकमेकांना घट्ट बिलगून बसायचो, पण सर्वांच्या ओठांवर स्मित खेळत असायचे. अचानक चिडीचूप शांतता पसरायची!.. कुणी दार ठोठावले काय? खरे तर काहीही घडलेले नसे... म्हाताऱ्या फ्रोलोवनाच्या चरख्याचा तो आवाज असायचा. मग हसण्याचा कल्लोळ! मग रात्री भीतीपायी झोप यायची नाही. भयानक स्वप्ने पडायची. दचकून जाग आली तर कूस वळवायचीसुद्धा हिंमत होत नसे व पहाट फुटेपर्यंत दुलईखाली थरथरत पडून रहायची. सकाळी मात्र ताज्या फुलाप्रमाणे टवटवीत जागी व्हायची. खिडकीमधून बाहेर नजर टाकायची: सबंध मैदानात गोठलेले वातावरण असे. पर्णविहीन फांद्यांवर शारदीय गोठलेल्या धुक्याचे पातळ थर चिकटलेले दिसत. पानासारख्या

पातळ बर्फाचा थर तळ्याच्या पृष्ठभागावर जमलेला असायचा. तळ्यावर पांढरी वाफ ओठंगलेली असायची. पक्ष्यांचा कलकलाट चालू असायचा. सूर्याचे तेजस्वी किरण तळपत असायचे आणि ते किरण काचेप्रमाणे पातळ बर्फाचा चुरा करायचे, सगळीकडे चकचकीत, ठसठशीत, आनंदी वातावरण! चुलाण्यात परत आग कडकडतेय, आम्ही सारेजण समोवारभोवती बसलोय आणि रात्रीच्या थंडीपायी थरथरणारा आमचा कुत्रा पोल्कान खिडकीकडे पाहतोय व आशेने शेपूट हलवतोय. रानात सर्पण गोळा करण्यासाठी चाललेल्या शेतकऱ्याच्या घोडागाडीचा खडखडाट खिडकीखाली ऐकू येतो. सारे समाधानी, आनंदी दिसतात! .. अहाहा, माझ्या बालपणीचा काळ खरोखरीच सोन्याचा होता! ..

ह्या आठवणींपायी आता मी अक्षरशः लहान मुलीप्रमाणे ढसढसा रडले. सगळ्या आठवणी अगदी ठळक आठवल्या आणि त्या तेजस्वी पार्श्वभूमीवर वर्तमानकाळ अगदी भयाण काळोखा जाणवला! .. ह्या सगळ्याची अखेर कशात होणार? मला अंतरातून असे जाणवतेय, अशी खात्री वाटतेय, की यंदाच्या शरदात मी मरणार. मी खूप खूप आजारी आहे. मरणाचे विचार माझ्या मनात वारंवार येतात, पण असे मरण्याची माझी इच्छा नाही, इथल्या जमिनीत चिरविश्रांती घ्यावी असे वाटत नाही. कदाचित वसंताच्या मोसमात मी अंथरूण धरले होते, त्याप्रमाणे परत अंथरूण धरीन. खरे तर मी पूर्ण बरी झालेच नाही त्या आजारातून! आत्ता मला फार त्रास होतोय. आज फेदोरा सबंध दिवसभर कुठेतरी बाहेर गेलीय आणि मी एकटी बसून आहे. काहीवेळा एकट्याने बसायला मला भीती वाटते. कुणीतरी दुसरी व्यक्ती खोलीत वावरतेय, ती माझ्याशी बोलतेय, असा मला भास होत राहतो. विशेषतः मी जेव्हा कसल्यातरी विचारात गढून जाते आणि एकदम दचकून भानावर येते, तेव्हा मला भीती घेरते. म्हणून आज मी तुम्हाला एवढे मोठे पत्र लिहिले. जेव्हा लिहीत बसते, तेव्हा ही भीती नाहीशी होते. आता निरोप घेते, पत्राची अखेर करते, कारण कागद व वेळ, दोन्ही नाहीत. माझ्या पोषाखाबद्दल आणि टोपीबद्दल मिळालेल्या पैशांमधून अवघा एक चांदीचा रूबल माझ्यापाशी शिल्लक आहे. तुम्ही घरमालकिणीला चांदीचे दोन रूबल दिलेत हे छान केलेत. आता ती तात्पुरती गप्प राहील.

स्वतःचा पोषाख ठाकठीक करा. अच्छा! मी खूप थकलेय. एवढा अशक्तपणा कशापायी आलाय ते समजत नाही. छोटीशी कामेसुद्धा मला

दमवतात. जर काम मिळाले, तर मला ते कसे निभणार? हा विचार मला छळतोय.

वा. दो.

५ सप्टेंबर

माझ्या कबूतरा, वारेन्का!

आज, माझ्या देवदूता, मी अनेक मानसिक अनुभव घेतले. सर्वप्रथम, आख्खा दिवस माझे डोके दुखत होते. ताजी हवा खाण्यासाठी मी फोन्तान्कावर चालत गेलो. संध्याकाळ अंधारी, दमट होती. पाच वाजून गेले की, सध्या अंधार पडायला लागतो. पाऊस नव्हता, पण धुके दाटले होते आणि ते पावसाइतकेच वाईट होते. आकाशात मेघांचे लांब-रुंद पट्टे सरकत होते. नदीकिनारीच्या रस्त्याने माणसे लगबगीने जात-येत होती. विचित्र कळकट जमाव होता, त्या लोकांना पाहिल्यावर मन खचून जात होते. त्या गर्दीत झिंगलेले शेतगडी होते, अपऱ्या नाकांच्या आणि डोक्यांवर रुमाल न बांधलेल्या, गुडघ्यांपर्यंत बूट घातलेल्या फिन्निश बाया होत्या, कारागीर संघातले कामगार होते, गाडीवान होते, आमच्यासारखे कारकून होते, वंगणाने चेहरा माखलेला, हातात मोठ्ठे कुलूप धरलेला, पट्टेदार उपवस्त्र अंगात घातलेला एक क्षयी, रोड उमेदवार होता व लष्करातून मुक्त झालेला एक खूप लंबू सैनिक होता — त्या गर्दीत लोकांचे असे नमुने होते. ती वेळच अशी होती, की दुसऱ्या प्रकारचे लोक दिसणे शक्यच नव्हते. फोन्तान्कावरील जहाजांच्या वाहतुकीचा कालवा! इतके पडाव तेथे कसे मावतात कुणास ठाऊक! पुलांवर बायका मधाची बिस्कीटे आणि सडकी सफरचंदे विकतात. फार घाणेरड्या, कळकट बाया! फोन्तान्कावर फिरायला उदास वाटते! पायांखाली ओली फरसबंदी, दोन्ही बाजूंना उंच, काजळी माखलेली घरे. पायांखाली धुके आणि डोक्यावरसुद्धा धुके. आज संध्याकाळ फार फार उदास, अंधारलेली होती.

जेव्हा मी गोरोखोवायावर वळलो, तेव्हा पूर्ण अंधार झाला होता व गॅसचे दिवे रस्त्यांवर पेटवू लागले होते. खूप काळात मी गोरोखोवायावर गेलो नव्हतो, तसा प्रसंगच आला नव्हता! फार गोंगाटी रस्ता! छोट्यामोठ्या दुकानांच्या रांगाच रांगा. सगळीकडे चकचकाट — वस्तू, काचांमागील फुले, फिती लावलेल्या वेगवेगळ्या टोप्या. केवळ देखाव्यासाठी ती सारी

रस्त्यांना असे एखाद्याच्या मनात येईल, पण तसे नाही. स्वतःच्या अर्धांगींना भेट म्हणून द्यायला माणसे त्या वस्तू विकत घेतात. फार श्रीमंत रस्ता! गोरोखोवायावर खूप जर्मन बेकरीवाले राहतात आणि तेसुद्धा बरेच श्रीमंत असावेत. दर मिनिटाला किती बग्गी धावतात! रस्ता कसे सोसू शकतो! सुरेख बग्गी असतात – चमकत्या खिडक्या, रेशमी आणि मखमली आवरणाची आसने, खांद्यांवर फिती आणि कमरांना तलवारी लटकावलेले चाकर. मी प्रत्येक बग्गी निरखून पहात होतो – प्रत्येक बग्गीत सुरेख पोषाखातील स्त्रिया बसल्या होत्या. कदाचित उमराव अथवा सरदार घराण्यांमधील असाव्यात. बॉलनृत्यांना अगर सायंकालीन मैफलींना सगळ्या घाईने जात असाव्यात. एखाद्या उमरावणीला अथवा उच्च कुळातील स्त्रीला जवळून पाहण्याची माझी इच्छा आहे. त्या नक्कीच छान असणार. यापूर्वी मी कधीही त्यांना पाहिलेले नाही – केवळ आत्ता बग्गींमध्ये डोकावून पाहतो तेवढेच! तेथे मला तुमची आठवण झाली. अहाहा, माझ्या कबूतरा, माझ्या प्राणा! तुमची आठवण झाली म्हणजे काळीज पिळवटते. तुमच्या वाट्याला असे दुर्भाग्य का आले, वारेन्का? माझ्या देवदूता! त्या सर्वांपेक्षा तुमच्यात काय वाईट आहे? तुम्ही प्रेमळ आहात, सुंदर आहात, सुशिक्षित आहात. मग तुमच्या कपाळी असे फुटके दैव का? भल्या माणसाला रखरखीत वाळवंटाप्रमाणे आयुष्य भोगावे लागते, तर दुसऱ्याकडे भाग्य स्वतःहून चालत जाते, असे का? ठाऊक आहे मला, लाडके, असा विचार करणे चांगले नाही, ह्याला स्वैरविचार म्हणतात. पण तरीही, प्रामाणिकपणे आणि खरेपणाने विचार केला, तर एकाला आईच्या गर्भात असतानाच दैवाचा कृपाप्रसाद का लाभतो आणि दुसरा गरीब घरात जन्मला म्हणून त्याचे नशीब डोंबकावळ्याप्रमाणे का बोंबलते. आणि परीकथेप्रमाणे खरोखरीच अनेकदा मूर्ख इवानचे भाग्य फळफळते. मूर्ख इवान पूर्वजांच्या संपत्तीत लोळतो, खाऊन-पिऊन चैन करतो आणि दुसरा नुसता आशाळभूताप्रमाणे जिभल्या चाटत बसतो. त्याच्या नशिबी फक्त तेवढेच! लाडके, असा विचार करणे महापाप आहे, पण असे पापी विचार नकळत येतात. माझ्या प्राणा, तुम्ही तशा बग्गींमधून हिंडायला पाहिजे. तुमच्या एका कृपाकटाक्षासाठी सेनापती तळमळले पाहि-जेत – माझ्यासारखे नतद्रष्ट नव्हेत! तुम्ही सामान्य सुती कपड्यांमध्ये नव्हे, तर भरजरी रेशमी पोषाखांमध्ये वावरायला पाहिजे. आत्ता जशा फिकट आणि क्षयी दिसता आहात, त्याऐवजी तुमची आकृती मधुर, टवटवीत, गुलाबी आणि पुष्ट दिसायला पाहिजे. तेव्हा तुमच्या झगझगीत प्रकाशित

खिडकीत केवळ तुमची सावली पाहून मी धन्यता वाटून घेतली असती. माझ्या पाखरा, तुम्ही सुखी आणि आनंदी आहात ह्या एकाच विचारापायी मी हर्षभरित झालो असतो. पण सध्या काय? दुष्ट माणसांनी तुमचा सर्वनाश केलाय आणि त्यात भर म्हणून त्या कल्लेवाल्या भुक्कडाने तुमचा अपमान केला. केवळ तो फ्रॉक-कोटांमधून वावरतो, सोनेरी चापाच्या चष्म्यातून तुमच्याकडे निरखून पाहतो, म्हणून त्या शिष्टाला वाटते की, तो कसेही वागू शकतो आणि त्याचा मूर्खपणा तुम्ही मुकाट ऐकावा! कशापायी हे सगळे? कारण तुम्ही अनाथ आहात, असहाय आहात, तुम्हाला खंबीर आधार देऊ शकेल असा मित्र तुमच्या रक्षणाला नाही! अनाथ मुलीचा निष्कारण अपमान करणारा हा माणूस, ही माणसे आहेत तरी कसल्या प्रकारची? निव्वळ गदळ-घाण, ती माणसे नव्हेत! केवळ माणसासारखी दिसतात, पण कृती माणसाची नव्हे! ह्याबाबत माझी खात्री आहे. अशी आहेत ही माणसे! गोरोखोवाया रस्त्यावर मला आज भेटलेला पेटीवालासुद्धा त्यांच्यापेक्षा जास्त आदरणीय आहे. सबंध दिवसभर थोड्या अधिक पैशाच्या आशेने तो भटकतो हे खरे, पण तो स्वतःचा मालक! स्वतःचे पोट स्वतः भरतो. तो भीक मागत नाही, पण लोकांच्या मनोरंजनासाठी पेटी वाजवत राहतो, त्याच्या कुवतीप्रमाणे लोकरंजन करतो. खरे तर तो अगदी कंगाल आहे, खूप दरिद्री आहे. पण भल्या मनाचा भिकारी आहे. तो थकलाय, भुकेला आहे, पण तरीही श्रमत राहतो, स्वतःच्या परीने काम करत राहतो. लाडके, अनेक अशी प्रामाणिक माणसे आहेत, जी माफक काम करतात, थोडी कमाई करतात, पण कुणाहीसमोर वाकत नाहीत, कुणापाशी घासभर अन्नाची भीक मागत नाहीत. मीसुद्धा तसाच आहे, त्या पेटीवाल्यासारखा. म्हणजे मी अगदी तस्साच नव्हे, पण शिष्टसंमत, सन्माननीय अर्थाने. जेवढे श्रमता येईल, तेवढे श्रमतो. त्याहून माझ्यापाशी अधिक काही नाही.

लाडके, त्या पेटीवाल्याबद्दल मी बोललो ह्याचे कारण आज माझ्या दारिद्र्याची मला दुपटीने जाणीव झाली. पेटीवाल्याला पहायला मी रस्त्यात थांबलो. डोक्यात असे काही विचार घुसले — त्यांना पिटाळून लावायला मी थांबलो. मी उभा होतो, गाडीवान उभे होते, एक तरुणी आणि एक मळकट अवतारातील छोटी मुलगी उभी होती. पेटीवाल्याने कुणाच्यातरी खिडकीखाली बस्तान ठोकले. मग माझे लक्ष एका मुलाकडे गेले. त्याचे वय सुमारे दहा वर्षांचे असावे. मूळ रूप चांगले असावे, पण खप्पड आणि

आजारी दिसत होता. त्याच्या अंगात फक्त सदरा होता, तो अनवाणी होता आणि तोंडाचा आ वासून संगीत ऐकत होता. बालवय! जर्मनाच्या बाहुल्या कशा नाचत होत्या ते टक लावून पहात होता, थंडीने त्याचे हात-पाय थरथरत होते व सदऱ्याच्या बाहीचे टोक दातात धरून चघळत होता. त्याच्या हातात कसलातरी कागद असल्याचे माझ्या ध्यानात आले. एका गृहस्थाने पेटीवाल्याकडे एक छोटे नाणे फेकले. पेटीच्या कप्प्यात फ्रेंच बाहुला व त्याच्या सख्या नाचत होत्या, त्याच ठिकाणी नेमके ते नाणे पडले. नाण्याच्या खण्ण आवाजामुळे तो मुलगा दचकला आणि त्याने भेदरून सभोवार पाहिले. मीच ते नाणे टाकले असावे असा त्याने तर्क केला व तो माझ्यापाशी धावत आला. थरथरत्या बोटांनी त्याने तो कागद माझ्यासमोर धरला व कापऱ्या आवाजात कागदावरील मजकूर वाचण्याची विनंती केली. मी कागद उलगडला: अर्थात त्यातील मजकूर ओळखीचा होता—मायबापहो, तीन मुलांसह आई उपासमारीने मरते आहे, तेव्हा आम्हाला मदत करा. आई जेव्हा मरेल तेव्हा तिच्या पिलांना तुम्ही विसरू नये, म्हणून दुसऱ्या जगात ती तुमची आठवण ठेवील. मामला स्पष्ट होता, जगण्याचा प्रश्न होता, पण मी त्यांना काय देणार? त्या पोराला मी काहीही दिले नाही. फार वाईट वाटले! बिचारा पोरगा थंडीपायी निळा पडला होता, बहुधा भुकेला होता आणि खोटे सांगत नव्हता. खरोखरीच खोटे सांगत नव्हता. मला हे चांगले ठाऊक आहे. पण ह्यात वाईट म्हणजे त्या नतद्रष्ट माता आपल्या पोरांचा सांभाळ का करीत नाहीत आणि अशा थंडीत अर्ध्यानागड्या मुलांना चिठ्या देऊन का धाडतात? त्याची आई कदाचित मूर्ख बाई असेल, तिचा धीर सुटला असेल. तिच्यासाठी खटपट करायला कुणीच नसेल, पाय पोटाशी आवळून ती बसली असेल आणि कदाचित आजारीही असेल. तर मग तिने योग्य त्या अधिकाऱ्यांकडे जाऊन दाद मागावी. कदाचित आपल्या भुकेल्या, खप्पड मुलाला मुद्दाम भीक मागायला पाठवून लोकांची ती फसवणूक करीत असेल. अशा चिठ्यांमधून तो बिचारा पोरगा काय शिकणार? फक्त त्याच्या काळजाला घट्टे पडत जाणार. तो पळापळ करतो, लोकांपाशी जाऊन भीक मागतो. लोकांना त्याच्यासाठी मुळीच सवड नाही. त्यांची हृदये दगडासारखी कठोर आहेत. त्यांचे शब्द निष्ठुर आहेत. "दूर हो! चालता हो! वाह्यात!" सगळ्यांकडून तो असे उद्‌गार ऐकतो आणि पोराच्या काळजाला घट्टे पडत जातात. घरट्यातून खाली कोसळलेल्या पाखराच्या पिलाप्रमाणे अवस्था झालेला तो बिचारा पोरगा भेदरून आणि थंडीमुळे

थरथर कापत असतो. त्याचे हात-पाय बधीर पडतात. त्याचा श्वास अवघड बनतो, तो खोकू लागतो. आता फार वाट पहावी लागणार नाही. दुष्ट सर्पाप्रमाणे आजार त्याच्या छातीत हळूच शिरतो आणि जवळच अंधाऱ्या कोपऱ्यात मृत्यू एव्हाना त्याची वाट पहात उभा असतो. त्याची काळजी करायला कुणी नसते, त्याला मदत करायला कुणी नसते. संपले त्याचे जीवन! अशी आयुष्येसुद्धा असतात! वारेन्का, ख्रिस्ताखातर मदत करा असे शब्द ऐकायचे आणि काहीही न देता जवळून निघून जायचे, हे फार क्लेशदायक आहे. शिवाय त्याला म्हणायचे: "देव तुला मदत करील!" काहीवेळा "ख्रिस्ताखातर" ऐकायला विशेष वाटत नाही. (लाडके, "ख्रिस्ताखातर" वेगवेगळ्या प्रकारचे असतात.) भिकारी यांत्रिकपणे हे शब्द रेकतात. तशा धंदेवाईक भिकाऱ्याला काही न देणे तेवढे क्लेशदायक वाटत नाही. तो निब्बर बनलेला असतो, अडचणीतून वाट काढणे त्याला माहीत असते. काही "ख्रिस्ताखातर" अनोळखी, कर्कश्य, भयानक ऐकू येतात. आज त्या मुलाचा कागद वाचत होतो तेव्हा कुंपणापाशी उभा असलेला एकजण तशा रीतीने उद्गारला. तो सर्वांपाशी भीक मागत नव्हता, पण मला म्हणाला: "साहेब, ख्रिस्ताखातर दहा कोपेक द्या!" त्याच्या घोगऱ्या आवाजाने मी दचकलो. पण मी त्याला नाणे दिले नाही — माझ्यापाशी नव्हतेच. गरीब माणसे भसाडचा आवाजात तक्रारी करतात तेव्हा श्रीमंतांना ते आवडत नाही. ते म्हणतात की, गरीब माणसे कटकट करतात, त्रास देतात! दारिद्र्य नेहमी त्रासदायकच असते — भुकेपायी उमटणारे विव्हळण्याचे आवाज त्यांची झोपमोड करतात काय?

माझ्या प्राणा, मी तुम्हाला प्रांजलपणे सांगतो की, काही अंशी माझे हृदय हलके व्हावे आणि त्याहूनही, माझ्या लेखनाच्या सुरेख शैलीची तुम्हाला झलक दाखवावी, म्हणून मी हे लिहिले. अलीकडील काळात माझी शैली आकार घेऊ लागलीय, असे तुमच्या ध्यानात आले असेलच. सध्या मी अशा मनःस्थितीत आहे की, माझ्या स्वतःच्या विचारांबद्दल मला प्रगाढ सहानुभूती वाटू लागलीय आणि लाडके, असली सहानुभूती काही उपयोगी पडणार नाही हे जरी मला चांगले माहीत असले, तरीही स्वतःला काही प्रमाणात न्याय दिल्यासारखे वाटते. माझ्या प्राणा, माणसाचा सर्वसाधारणपणे स्वतःला निष्कारण कमी लेखण्याकडे कल असतो, तो स्वतःला कवडीमोल समजतो, लाकडाच्या भुश्शापेक्षा कः पदार्थ मानतो. तुलनाच करायची तर असे घडायचे कारण म्हणजे माझ्यापाशी याचना करणाऱ्या त्या मुलाप्रमाणे खुद्द मीसुद्धा

नमान भेदरवला आणि चिरडला गेलोय. आता लाडके तुमच्याशी थोड्या रूपकात्मक भाषेत मी बोलतो: भल्या सकाळी कचेरीत घाईघाईने जात असताना कधी कधी माझी शहराकडे नजर जाते. शहराला जाग येत असते, ते उठत असते, त्यातून धूर निघत असतो, ते उकळत असते, त्याचा धडधडाट ऐकू येत असतो. अशा वेळी स्वत:च्या क्षुल्लकपणाची तीव्रतेने जाणीव होते, माझ्या चौकस नाकावर कुणीतरी सणसणीत ठोसा हाणल्यासारखे वाटते आणि मुकाट मान खाली घालून पुढचा रस्ता मी चालू लागतो. माझ्या लाडके, आता त्या भल्यामोठ्या काळपट उदास घरांना जरा जवळून निरखून पाहू या. स्वत:ला कमी लेखून नंतर त्याबद्दल शरमिंदे होणे योग्य आहे काय, याचा विचार करा. वारेन्का, लक्षात ठेवा, मी हे सगळे रूपकात्मक बोलतोय, थेट अर्थाने नव्हे. तर त्या घरांमध्ये आपल्याला काय दिसेल? गरजेपायी ज्याला खोली म्हणायची अशा एका दमट बिळातील अंधाऱ्या कोपऱ्यात एक कामगार झोपेतून जागा होत असलेला आपल्याला दिसतो. शक्यता आहे की, आदल्या दिवशी त्याने खराब केलेल्या बुटांविषयीच्या विचारांनी सबंध रात्र त्याला छळले असेल. अशा फालतू गोष्टींची स्वप्ने माणसाला पडावीत म्हणजे काय! होय, तो चांभार आहे आणि म्हणून स्वत:च्या धंद्यातील वस्तूचा सतत विचार केल्याबद्दल त्याला क्षमा करता येईल. त्याची मुले विव्हळताहेत आणि बायको भुकेली आहे. माझ्या प्राणा, केवळ चांभारच असे विचार मनात घेऊन जागे होतात असे नव्हे. जर दुसरी परिस्थिती नसती, तर ह्या गोष्टीचे विशेष वाटण्यासारखे नव्हते अथवा हिचा उल्लेखसुद्धा करण्याची जरूरी नव्हती. पण त्याच घरात, वरच्या अथवा खालच्या मजल्यावर, एक श्रीमंत माणूस त्याच्या मुलामेदार शयनगृहात सबंध रात्रभर बुटांचेच स्वप्न पाहतोय. अर्थात त्याच चांभाराच्या बुटांचे नव्हे, पण तरीही बुटांविषयीचे. म्हणजे एका अर्थी आपण सगळे चांभार आहोत. तरीही बिघडले नसते, पण एक अडचण अशी आहे की, त्या श्रीमंताच्या कानात कुजबुजून सांगायला कुणी नाही: "केवळ स्वत:चा विचार करून जगणे पुरे झाले, तू काही चांभार नाहीस, तुझी मुले निरोगी आहेत आणि बायको उपाशी नाही; जरा भोवती नजर टाक, स्वत:च्या बुटांचा विचार करण्यापेक्षा अधिक उदात्त गोष्ट तुला आढळत नाही का?" वारेन्का, हेच रूपकात्मक रीतीने तुम्हाला मी सांगू इच्छित होतो. कदाचित हा भयानक स्वैर विचार आहे, पण काहीवेळा तो माझ्या मनात येतो आणि तसा आला म्हणजे काळजातून तापल्या शब्दांच्या रूपाने बाहेर पडतो. म्हणून

स्वत:ला हीन समजून घ्यायची मुळीच गरज नाही, खळखळाटाला आणि गोंगाटाला भ्यायची गरज नाही. माझ्या लाडके, समारोपाखातर मला असे सांगायचे आहे: कदाचित तुमची समजूत झाली असेल की, मी नुसती वटवट करतोय, अथवा माझी मन:स्थिती चांगली नाही, किंवा एखाद्या पुस्तकातून हे मी उतरवून काढले आहे. नाही, लाडके, त्याबद्दल खात्री बाळगा. बाष्कळ वटवटीचा मला अत्यंत तिटकारा आहे, माझी मन:स्थिती मुळीच वाईट नाही आणि मी कुठल्याही पुस्तकातून काहीही उतरवून काढलेले नाही – समजले!

विषण्णपणे मी घरी आलो, टेबलापाशी बसलो, किटलीत पाणी तापवले व एक-दोन कप चहा ढोसायच्या बेतात होतो. तेवढ्यात आमचा गरीब शेजारी गोर्श्कोव आत आला. सकाळी माझ्या ध्यानात आले होते की, तो इतर भाडेकरूंना भीत भीत टाळून माझ्याकडे येऊ इच्छित होता. जाता जाता सांगतो, लाडके, त्याचे आयुष्य माझ्यापेक्षा फार वाईट आहे. फारच! बायको, मुले! जर गोर्श्कोवच्या जागी मी असतो, तर काय केले असते कुणास ठाऊक! तर माझा गोर्श्कोव आला, किंचित झुकून त्याने अभिवादन केले, नेहमीप्रमाणे त्याच्या डोळ्यांमधून पाणी वाहात होते, पाय घासत काही न बोलता तो उभा राहिला. मी त्याला खुर्चीवर बसविले, ती खुर्ची मोडकी होती हे मात्र खरे, पण दुसरी माझ्यापाशी नव्हती. चहा दिला. त्याने क्षमा मागितली, खूप वेळपर्यंत तो क्षमायाचना करीत राहिला, पण अखेर त्याने चहाचा पेला स्वीकारला. साखरेशिवाय चहा प्यायचा त्याचा इरादा होता, परत क्षमा मागू लागला, पण चहा साखरेसह पिणे आवश्यक आहे अशी मी त्याची खात्री पटविली. त्याने खूप वाद घातला, साखरेला नकार दिला, शेवटी स्वत:च्या पेल्यात साखरेचा अगदी छोटा खडा त्याने टाकला व मला सांगू लागला की, चहा विलक्षण गोड बनला होता. देवा, दारिद्र्य माणसाला किती खाली नेते! "काय रे बाबा?" मी त्याला विचारले. "ठीक आहे, तुम्ही माझे उपकारकर्ते आहात, मकार अलेक्सेयेविच, आमच्या कमनशिबी कुटुंबाला मदत करा. बायको-मुलं उपाशी आहेत. माझ्या बापाच्या मनाला काय वाटत असेल!" मी काहीतरी बोलायच्या बेतात होतो, पण तेवढ्यात तो पुढे म्हणाला: "मकार अलेक्सेयेविच, इथं मी सर्वांना भितो. म्हणजे भिण्यापेक्षा मला शरम जास्त वाटते. माणसं फार गर्विष्ठ आहेत. मी तुम्हाला कधी त्रास दिला नसता, तुम्हाला अप्रिय गोष्टी अनुभवाव्या लागल्यात हे मला ठाऊक आहे. तुम्ही जास्त मदत करू शकणार

नाही हेसुद्धा माहीत आहे. पण काहीतरी उसने द्या. तुम्ही दयाळू अंतःकरणाचे आहात हे मला माहीत आहे म्हणून तुमच्यापाशी येण्याचा धीर केला. माझ्याप्रमाणेच सध्या तुम्ही अडचणीत आहात हे मला ठाऊक आहे, म्हणूनच माझी अडचण तुम्ही जाणू शकाल." शेवटी त्याने त्याच्या धारिष्ट्याबद्दल आणि अशिष्टपणाबद्दल क्षमा मागितली. मी उत्तरलो की, त्याला मदत करायला मला मनापासून आनंद वाटला असता, पण माझ्यापाशी अक्षरशः काहीही नाही. "मकार अलेक्सेयेविच," तो मला म्हणाला, "मी फार मागत नाही, पण परिस्थिती अशी आहे (इथे तो शरमून लाल झाला), माझी बायको आणि मुलं उपाशी आहेत, निदान दहा कोपेक द्या." आता मात्र माझे काळीज पिळवटले. त्या माणसाची माझ्यापेक्षा जास्त वाईट परिस्थिती होती. माझ्याकडे अवघे वीस कोपेक उरले होते. उद्याच्या निकडीच्या गरजा भागविण्यास मी त्यांच्यावर अवलंबून होतो. म्हणालो: "नाही मित्रा, शक्य नाही." मी त्याला खुलासा केला. "मकार अलेक्सेयेविच, काय वाट्टेल ते करा," तो म्हणाला, "पण निदान दहा कोपेक द्या!" तेव्हा मी कप्पा उघडला आणि माझे वीस कोपेक त्याला देऊन टाकले, लाडके. भले काम! दारिद्र्याची कमाल! त्याच्याशी मी बोललो. शेवटी मी विचारले की, अशा विलक्षण दारिद्र्यात असताना चांदीच्या पाच रूबलची खोली भाड्याने का घेतली? त्याने मला खुलासा केला की, अर्ध्या वर्षापूर्वी ही खोली भाड्याने घेतली होती व तीन महिन्यांचे भाडे आगावू दिले होते. पण मग नशीब फिरले आणि धड ना तिकडे ना इकडे अशी अवस्था झाली बिचाऱ्याची! एवढ्या काळात त्याच्या केसचा निकाल लागेल असे त्याला वाटले होते. त्याची केस अप्रिय आहे. वारेन्का, त्याच्यावर कोर्टात खटला भरण्यात आलाय. खजिन्यात अफरातफर केलेल्या एका व्यापाऱ्याबरोबर तो खटल्यात गुंतलाय. फसवणूक उघडकीला आली, व्यापाऱ्यावर खटला झाला आणि मग गोर्श्कोव अडकला. गोर्श्कोवने त्या व्यवहारात दुर्लक्ष केले, सरकारी कामात कसूर केली, एवढाच त्याचा गुन्हा आहे. खूप वर्षे खटला चालू आहे. गोर्श्कोवविरुद्ध नवनवे पुरावे निर्माण होत आहेत. तो म्हणतो: "माझ्यावर अप्रामाणिकपणाचे कितीही आरोप रचले असले तरी मी खरोखर निष्पाप आहे. मी अफरातफर अथवा चोरी केलेली नाही!" पण त्याच्यावरील खटल्यामुळे त्याची बेअब्रू झाली आहे. त्याला नोकरीतून काढून टाकण्यात आले आणि प्रत्यक्षात जरी तो दोषी ठरला नसला, तरी संपूर्ण मोकळा झाला नाही. त्याची पूर्ण निर्दोष म्हणून सुटका

झाली तर नियमानुसार त्याला व्यापाऱ्याकडून मोठी रक्कम मिळेल. माझा त्याच्यावर विश्वास आहे, पण कोर्टाचा विश्वास बसत नाही. त्याची भानगड एवढी गुंतागुंतीची आहे की, शंभर वर्षेपर्यंत गुंता सुटणार नाही! जरा कुठे एक गुंता सुटला, तर व्यापारी दुसरा गुंता निर्माण करतो. माझ्या लाडके, मला गोश्कोंवबद्दल वाईट वाटते आणि मन:पूर्वक सहानुभूती वाटते. तो बेकार आहे. त्याच्या अपकीर्तीमुळे कुणीही त्याला नोकरीवर ठेवणार नाही. त्याच्या मालकीच्या सर्व वस्तू त्याने केव्हाच विकून टाकल्यात. खटला रखड-तोय आणि दरम्यान अगदी चुकीच्या वेळी मूल जन्मले. ह्या सगळ्या गोष्टींना खर्च होतो. मुलगा आजारी होता तेव्हा परत खर्च झाला. तो वारला तेव्हा आणखी खर्च. बायको आजारी आहे व स्वत: गोश्कोंवही जुना दुखणेकरी आहे. थोडक्यात म्हणजे भरपूर दु:ख सोसलेय. तरीही म्हणाला की, लौकरच त्याच्या खटल्याचा अनुकूल निकाल लागेल आणि त्याबद्दल त्याला मुळीच शंका वाटत नाही. फार फार वाईट वाटते मला त्याच्या-बद्दल, वारेन्का! मी त्याचे सांत्वन केले. माणूस बिचारा हरवलाय, घा-बरलाय, आधार शोधतोय, म्हणून मी त्याचे सांत्वन केले. लाडके, तुमचा निरोप घेतो, ख्रिस्त तुमचे रक्षण करो, तुम्हाला आरोग्य लाभो. माझ्या कबूतरा, तुमची आठवण झाली म्हणजे माझ्या दुखऱ्या मनाला औषध लावल्यासारखे वाटते आणि तुमच्यासाठी यातना सोसत असलो तरी त्या सोसण्यात मला सुख मिळते.

तुमचा विश्वासू मित्र,

मकार देवूष्कीन.

९ सप्टेंबर

लाडके, वार्वारा अलेक्सेयेवना!

माझे चित्त थाऱ्यावर नाही. फार भयानक गोष्ट घडलीय. माझे डोके गरगरतेय आणि माझ्याभोवतीच्या सर्व वस्तूही गरगरा फिरताहेत. हाय प्रा-णा, आता मी तुम्हाला काय सांगू! आपण अशी कधी कल्पनाही केली नव्हती. नाही, माझा विश्वास नाही, की मला हे आधी जाणवले नव्हते. मला हे सर्व आधी जाणवले होते. माझ्या काळजाने पूर्वीच अनुभवले होते. त्यादिवशी स्वप्नातसुद्धा तत्सम मी पाहिले होते.

तर असे घडले! शैलीचा विचार न करता तुम्हाला वर्णन करून

सांगतो, देव माझ्या मनात जसे आणील तसे कथन करतो. आज नोक-रीवर गेलो. कचेरीत माझ्या जागी बसून लिहू लागलो. लाडके, तुम्हाला हे सांगितले पाहिजे की, कालसुद्धा मी लिहीत होतो. काल माझ्यापाशी खुद्द तीमोफेय इवानोविच आला आणि म्हणाला की, "तातडीचा कागद आहे. मकार अलेक्सेयेविच, ह्या कागदाची स्वच्छ आणि सुबक नक्कल करा. आज सहीसाठी जायचा आहे." माझ्या देवदूता, मी नोंदले पाहिजे की, काल मी ठिकाणावर नव्हतो, कशावरही नजर टाकावीशी वाटत नव्हती. मन विषण्ण बनले होते! काळीज गोठले होते आणि मनात अंधार दाटला होता. माझ्या बिचाऱ्या पाखरा, सतत तुमची आठवण येत होती. तर मी नक्कल करण्यासाठी कागद घेतला. स्वच्छ, सुबक नक्कल केली, पण नंतर नेमके काय घडले कोण जाणे, खुद्द सैतानाने घोटाळा केला अथवा प्रारब्धात तसे होते मला माहीत नाही—एक संपूर्ण ओळ मी गाळली होती. आणि देवालाच ठाऊक, पण ती ओळ गाळल्यामुळे अर्थाचा अनर्थ बनला होता. कागदाला काल उशीर झाला होता आणि महामहीमांसमोर केवळ आजच तो सहीसाठी ठेवण्यात आला. मी आपला निःशंक मनाने नेहमीच्या वेळी कचे-रीत आलो आणि येमेल्यान इवानोविचशेजारी बसलो. लाडके, मी नोंदले पाहिजे की, अलीकडे मी पूर्वीपेक्षा दुप्पट लाजरा आणि शरमिंदा बनलोय. कुणाच्याही चेहऱ्याकडे पाहणे मी टाळतो. परिस्थिती एवढ्या थरापर्यंत पोहो-चलीय की, नुसती खुर्ची करकरली तरी माझी पाचावर धारण बसते. आज-सुद्धा मी अर्धमेल्या कासवाप्रमाणे मुंडी खाली घालून बसलो होतो. तेवढ्यात येफीम आकीमोविच (त्याच्यासारखा विदूषक जगात दुसरा नसेल!) सग-ळ्यांना ऐकू जाईल एवढ्या मोठ्या आवाजात म्हणाला: "काय मकार अलेक्सेयेविच, असे खालमुंडी काय बसलात?" आणि त्याने असे वाकडे तोंड करून दाखविले की, सर्वांकडून जोरदार हंशा उमटला. पुढे त्यांनी माझी टवाळी सुरू केली. मी कान आणि डोळे मिटून घेतले, हालचाल न करता निमूट बसून राहिलो. स्वतःची सोडवणूक करून घेण्याचा तो सर्वांत उत्तम उपाय. एकदम दूरवर गोंगाट झाला व माझे नाव उच्चारण्यात आले. माझ्या कानांनी माझी फसवणूक तर केली नव्हती? मला बोलावत होते, देवूष्कीनला बोलावणे पाठवण्यात आले होते. माझे काळीज धडधडले. मी का घाबरलो मला माहीत नाही. फक्त एवढेच माहीत आहे की, यापूर्वी सबंध आयुष्यात मी एवढा घाबरलो नव्हतो. मी खुर्चीला घट्ट चिकटून बस-लो—जणू काहीच घडले नव्हते अशा आविर्भावात. पण परत ते आवाज

अधिकाधिक जवळ येऊ लागले. अगदी कानापर्यंत माझ्या! "देवूष्कीन! देवूष्कीन! कुठे आहे देवूष्कीन?" मी डोळे वर उचलले: समोर येवस्ताफी इवानोविच. म्हणाला: "मकार अलेक्सेयेविच, ताबडतोब महामहीमांपाशी! तुम्ही नकलेत प्रचंड घोटाळा केलात!" तो फक्त एवढेच म्हणाला, पण लाडके, एवढे पुरे होते ना? मला हुडहुडी भरली, मी बधीर झालो, अर्धमेल्या अवस्थेतच मी चालू लागलो. एक खोली ओलांडली, दुसरी खोली ओलांडली, तिसरी ओलांडली आणि केबिनमध्ये हजर झालो! तेव्हा माझ्या मनात काय चालले होते ते मी वर्णन करू शकत नाही. महामहीम उभे होते व त्यांच्याभोवती बाकीचे. मला वाटते, लवून अभिवादन करायला मी विसरलो. माझे ओठ थरथरत होते आणि पाय थरथरत होते. लाडके, असे होण्याचे पहिले कारण म्हणजे शरम. उजवीकडे मी आरशात कटाक्ष टाकला व जे पाहिले त्यामुळे मी खलास झालो. दुसरे कारण म्हणजे मी नेहमी अस्तित्वात नसल्यासारखाच वावरतो. तेव्हा महामहीमांना माझ्या अस्तित्वाची दखल असेल, याबाबत मी साशंक होतो. कदाचित देवूष्कीन नावाचा, कुणी कचेरीत आहे असे पुसटसे त्यांनी कधीतरी ऐकले असेल. पण प्रत्यक्षात भेटायची तसदी कधी घेतली नव्हती.

चिडून सुरुवात झाली: "अहो तुम्ही हे काय केलंत महाराज? कुठं लक्ष असतं तुमचं? महत्त्वाचा, तातडीचा कागद आणि तुम्ही तो बिघडवून टाकता! असं कसं काम करता तुम्ही!" त्यावर महामहीम येवस्ताफी इवानोविचकडे वळले. त्यांचे काही शब्द माझ्या कानांवर येत होते: "दुर्लक्ष! हलगर्जीपणा! अप्रियता ओढवून घेता!" काहीतरी बोलायला मी तोंड उघडले. माफी मागायची इच्छा होती, पण जमले नाही. पळून जावेसे वाटले, पण धीर झाला नाही. आणि लाडके, तेवढ्यात असे काही घडले, शरमेपायी माझी लेखणी थरथर कापतेय! माझ्या कोटाचे बटण– आग लागो त्याला! माझे बटण सुताच्या धाग्यावर लोंबत होते–अचानक ते तुटले आणि खाली पडून गडगडत नेमके महामहीमांच्या पायांपाशी कोसळले. आणि हे घडले सभोवती पूर्ण शांतता नांदत असताना! त्यानंतर फार भयानक! तात्काळ महामहीमांनी माझ्या आकृतीला आणि माझ्या पोषाखाला लक्षपूर्वक न्याहाळले. मी आरशात काय पाहिले होते त्याची मला आठवण झाली. बटण उचलायला मी पुढे वाकलो. तो वेडेपणा मला का सुचला? बटण उचलू पहात होतो, पण ते हातात पकडता येईना. निसटत होते, गरगर फिरत होते, त्याला हातात धरणे अशक्य ठरले. माझ्या अंगातील

अखेरचे बळ संपत चालल्याची मला जाणीव झाली. सगळा लौकिक गमावला होता, माणूस म्हणून मी संपलो होतो! माझ्या कानांमध्ये प्रचंड गोंगाट ऐकू येत होता व त्यातून थेरेसा आणि फाल्दोनीच्या आरोळ्या ऐकू येत होत्या, हजारो जिभांमधून कुचाळक्या ऐकू येत होत्या. अखेरीस बटण हातात साप-डले, मी उठलो, ताठ उभा राहिलो. आता मी गाढवाने निदान तसेच ताठ उभे तरी रहावे—पण नाही! मी ते बटण परत तुटक्या धाग्यात खोवू लागलो, जणू ते आपोआप चिकटणार होते! शिवाय गालातल्या गालात हसत होतो! महामहीम प्रथम बाजूला वळले, मग त्यांनी परत माझ्याकडे रोखून पाहिले. येवस्ताफी इवानोविचला ते म्हणाले: "काय हे? ह्याचा जरा अवतार पहा! त्याला काय झालंय?.. असा कसा हा?" माझ्या लाडके, काय सांगू? त्याला काय झालंय? असा कसा हा? माझी ओळख मी पट-वली! येवस्ताफी इवानोविच म्हणत होता: "कधीही ताकीद दिलेली नाही, कसल्याही चुकीबद्दल ताकीद मिळालेली नाही, आदर्श वर्तन, कामानुसार पगार..." "त्याला काहीतरी मदत करा," महामहीम म्हणाले, "त्याला आगाऊ रक्कम द्या..." "पण त्यानं आधीच उचल केली आहे म्हणतात पगारातून. परिस्थितीपायी त्याला असं करावं लागलं, पण त्याचं वर्तन उत्तम आहे, कामात कधीही चूक केलेली नाही." माझ्या देवदूता, मी भाजून निघत होतो, नरकातील आगीत होरपळत होतो. साक्षात मेलो होतो! "ठीक, ठीक," महामहीम मोठ्या आवाजात म्हणाले, "परत लौकर नक्कल लिहून काढा. देवूष्कीन, इकडे या, चुका न करता नवी नक्कल लिहून काढा. आणि हो, हे पहा..." इथे महामहीमांनी सर्वांना रजा दिली व आम्ही दोघेच राहिलो. दुसरे लोक निघून जाताच महामहीमांनी घाईघाईने खिशातून पैशाचे पाकीट काढले व शंभर रूबलची नोट माझ्या हातात कोंबली. "हे घ्या... काय वाट्टेल ते समजा... पण घ्या..." ते म्हणाले. मी दचकलो, माझे मन हादरले. काय घडत होते ते समजत नव्हते. त्यांचा हात पकडून त्याचे चुंबन घेण्याची माझी इच्छा होती. पण ते शरमून लाल झाले आणि, माझ्या लाडके, मी तसूभरही खोटे सांगत नाही, पण माझा नालायक हात त्यांनी स्वतःच्या हाती घेतला व जणू त्यांच्या दर्जासमान असलेल्या जनरलशी हस्तांदोलन करावे, तसे माझ्याशी हस्तांदोलन केले. मग म्हणाले: "जा, याहून जास्त मी काही करू शकत नाही... परत चुका करू नका. जे घडले त्या पापाची निम्मीनिम्मी जबाब-दारी घेऊ."

लाडके, आता मी असे ठरविले आहे : जणू तुमच्या जन्मदात्यासाठी देवापाशी प्रार्थना करता, त्याप्रमाणे महामहीमांसाठी दररोज प्रार्थना करा, अशी तुम्हाला व फेदोराला मी विनंती करतो. मला जर मुले असती, तर त्यांनाही मी असेच सांगितले असते. आणि लाडके, मी अभिमानाने सांगतो की, आपल्या अत्यंत वाईट काळात अफाट मनःस्ताप भोगावा लागला होता तरीही, माझ्या अपमानापायी आणि अगतिकतेपायी तुमची होरपळ घडली तरीही, मी शपथपूर्वक सांगतो की, ह्या शंभर रूबलपेक्षा, महामहीमांनी माझ्यासारख्या क्षुल्लक माणसाशी, एका दारुड्याशी, बरोबरीच्या नात्याने हस्तांदोलन केले हे मला अधिक महत्त्वाचे वाटते. ह्या कृतीने त्यांनी मला परत माणसात आणले, माझा पुनर्जन्म घडविला, माझ्या आयुष्याला कायमची गोडी आणली. जरी मी पापी असलो, तरीसुद्धा महामहीमांसाठी मी केलेल्या प्रार्थना देवापाशी पोहोचतील अशी माझी खात्री आहे ! ..

लाडके ! आता मी फार बेचैन आहे, भयानक अस्वस्थ आहे ! माझे काळीज फुटून बाहेर पडेल असे वाटते. मला खूप थकवा वाटतोय. तुमच्यासाठी पंचेचाळीस रूबलच्या नोटा पाठवतो, घरमालकिणीला वीस देतो व स्वतःसाठी पस्तीस ठेवतो. त्यातील वीसमधून कपड्यांची डागडुजी करतो आणि पंधरा किरकोळ खर्चासाठी राखतो. सकाळच्या ह्या अनुभवांनी मी पूर्ण हादरून गेलोय. आता थोडा निजतो. मला मनातून खूप खूप शांत वाटतेय. फक्त माझे मन कुठेतरी ठणकतेय, खूप खोलात त्याची थरथर आणि हालचाल जाणवतेय. मी तुमच्याकडे येईन. पण या क्षणी मात्र ह्या सर्व घडामोडींमुळे मी भांबावून गेलोय... देव सगळे पाहतो, माझ्या लाडके, माझ्या अमूल्य कबूतरा !

तुमचा मित्र,

मकार देवूष्कीन.

१० सप्टेंबर

मत्प्रिय मकार अलेक्सेयेविच !

तुमच्या भाग्याबद्दल मला अकथित आनंद झालाय आणि, माझ्या मित्रा, तुमच्या साहेबांच्या औदार्याचे मोल मी जाणते. तर आता दुःखापासून विश्रांती घ्या ! मात्र कृपा करून क्षुल्लक वस्तूंवर पैसे उधळू नका. माफकपणे शांत जगा आणि आजपासूनच चार पैसे बाजूला शिल्लक ठेवायला आरंभ

करा, म्हणजे अचानक कोसळलेल्या संकटकाळात परत तुमची अडचण व्हायची नाही. आमच्याबद्दल कृपया काळजी करू नका. मी आणि फेदोरा आमचे कसेबसे निभावून घेऊ. एवढी मोठी रक्कम कशासाठी आमच्याकडे पाठवलीत, मकार अलेक्सेयेविच? आम्हाला पैशांची मुळीच गरज नाही. आमच्यापाशी जे आहे, त्यावर आम्ही समाधानी आहोत. खरे आहे की, इथून बिऱ्हाड हलविताना लौकरच आम्हाला पैशांची आवश्यकता भासेल, पण फेदोराला आशा आहे की, खूप काळापासूनचे तिचे एक जुने येणे वसूल होईल. निकड पडली तर असावेत म्हणून वीस रूबल स्वतःपाशी ठेवून घेते आणि बाकीचे तुमच्याकडे परत पाठवीत आहे. पैसे सांभाळून वापरा, मकार अलेक्सेयेविच. अच्छा. आता निवांत जगा, निरोगी आणि आनंदी रहा. मी आणखी लिहिले असते, पण मला फार थकवा वाटतोय. काल सबंध दिवस अंथरुणातून उठले नाही. आमच्याकडे येण्याचे कबूल केलेत हे छान केलेत. जरूर या, मकार अलेक्सेयेविच.

वा. दो.

११ सप्टेंबर

माझ्या लाडके, वार्वारा अलेक्सेयेवना!

तुम्हाला हात जोडून विनवतो, माझ्या प्राणा, आता मी पूर्ण सुखी आणि समाधानी असताना माझ्यापासून दूर जाऊ नका. माझ्या कबूतरा! फेदोराचे तुम्ही ऐकू नका, तुम्हाला जे जे हवे ते ते सर्व मी करीन. मी चांगला वागेन, निदान महामहीमांबद्दल वाटणाऱ्या आदराखातर उत्कृष्ट वर्तन राखेन. आपण परत एकमेकांना सुखी पत्रे लिहू, एकमेकांना आपले विचार, आपले आनंद कळवू. जर चिंता असल्याच तर त्याही सांगू. आपण गुण्यागोविंदाने आणि सुखाने जगू. साहित्याचा व्यासंग सुरू करू... माझ्या छोटया देवदूता! माझे दैव बदललेय, सगळे चांगले बदल घडत आहेत. घरमालकीण नीट बोलू लागलीय, थेरेसा अधिक हुशार वागू लागलीय आणि फाल्दोनीसुद्धा तत्पर बनलाय. राताझ्यायेवशी मी समझोता केला. आनंदाच्या भरात मी स्वतःच त्याच्याकडे गेलो. तो मनाचा फार चांगला माणूस आहे, माझ्या लाडके, आणि त्याच्याबद्दल लोक वाईट गोष्टी बोलतात त्या सपशेल खोटया आहेत. त्या धादांत असत्य आहेत असे आता मला आढळून आले आहे. आपल्याबद्दल लिहिण्याचा त्याचा मुळीच इरादा नव्हता. त्याने

स्वतःच मला हे सांगितले. नवीन लेखन त्याने मला वाचून दाखविले. आणि त्याने तेव्हा मला लव्हलेस असे म्हटले होते तो शब्द मुळीच अशिष्ट नाही. त्याने खुलासा केला की, हा शब्द परकी भाषेतून घेतलेला आहे व त्याचा अर्थ **धूर्त माणूस** अथवा साहित्यिक भाषेत अधिक सुंदर रीतीने सांगायचे तर... **चलाख तरुण**! एवढेच. दुसरे काही नव्हे. तो एक निष्पाप विनोद होता, माझ्या देवदूता! पण मी अडाणी, मूर्खासारखा अपमान वाटून घेतला. मी त्याची त्याबद्दल आता क्षमा मागून मोकळा झालो... वारेन्का, आज हवा किती सुरेख आहे. अर्थात सकाळी थोडा गारठा होता, पण त्या-मुळे हवा अधिक स्वच्छ आणि ताजी बनली. आज बुटांची छान जोडी खरेदी केली. नेवस्कीवर फिरायला गेलो. 'प्च्योल्का' वाचले [22] अरे हो, महत्त्वाचे सांगायला विसरलोच!

तर असे घडले!

आज सकाळी येमेल्यान इवानोविच आणि आक्सेन्ती मिखायलोविच यांच्याशी महामहीमांबद्दल मी बोलत होतो. वारेन्का, मला समजले की, केवळ माझ्या एकट्याशीच ते असे चांगले वागलेले नाहीत. दयाळूपणाविषयी ते प्रसिद्ध आहेत. वेगवेगळ्या ठिकाणांहून त्यांना दुवा पाठवतात आणि अने-कजण कृतज्ञतेपायी रडतात. लोक म्हणतात की, त्यांनी एका अनाथ मुलीचा सांभाळ केला आणि नंतर एका प्रतिष्ठित माणसाशी तिचे लग्न लावून दिले. तो माणूस महामहीमांच्या खास कामगिऱ्यांवर असतो. एकदा एका विधवेच्या मुलालाही त्यांनी नोकरी लावून दिली म्हणतात. शिवाय अशी अनेक सत्कृत्ये त्यांच्या हातून घडली आहेत. त्यात भर घालणे माझे कर्तव्य होते असे मला वाटले व म्हणून हातचे काही राखून न ठेवता मी संपूर्ण हकीकत इतरांना सांगून टाकली. मी लाज खिशात लपवली होती. पण अशा परिस्थितीत लाज कसली आणि अभिमान कसला! महामहीमांच्या सत्कृत्यांच्या वार्ता सर्वांच्या कानी पडोत! मी फार मनापासून उमाळून बोललो, लाजलो नाही, उलट तशी हकीकत सांगायला मिळते ह्याचा अभि-मान वाटला. मी सर्व काही सांगितले (मात्र तुमच्या बाबतीत शहाणपणाने मौन राखले, लाडके), माझ्या घरमालकिणीबद्दल, फाल्दोनीबद्दल, राता-झ्यायेवबद्दल, बुटांबद्दल आणि मार्कोवबद्दल—सगळे सगळे सांगून टाकले. काहीजण कुत्सित हसले, खरे तर सगळेच तसे हसले. कदाचित माझ्या आकृतीत अथवा माझ्या बुटांमध्ये त्यांना काहीतरी हास्यास्पद आढळले असावे. नक्की बुटांबद्दलच. दुसरा कुठला वाईट विचार नसावा. केवळ ते

तरुण आहेत अथवा सधन आहेत म्हणून. पण त्यांच्या मनात दुष्टावा नाही. महामहीमांची टवाळी करण्याचा त्यांचा मुळीच इरादा नव्हता. खरे ना, वारेन्का?

लाडके, अजून मला त्या गोष्टीचा विसर पडत नाही. त्या घडामोडींनी मी गोंधळून गेलोय. तुमच्यापाशी सर्पण आहे ना? थंडीपासून जपा, वारेन्का, कारण थंडी बाधायला वेळ लागत नाही. लाडके, तुमच्या दुःखद विचारांनी तुम्ही मला ठार मारत आहात. तुमच्यासाठी मी देवापाशी सतत प्रार्थना करतोय! तुमच्यापाशी लोकरी पायमोजे अथवा गरम कपडे आहेत ना? सांभाळा, माझ्या कबूतरा. ह्या म्हाताऱ्यावर दया करा आणि काही गरज लागली तर सांगा. सरळ सांगा. आता वाईट दिवस सपले. माझ्याबद्दल काळजी करू नका. भावी काळ तेजस्वी आहे!

वारेन्का, दुःखद काळ आपण भोगला, पण आता ते सारे संपले! आणखी काही वर्षे उलटतील आणि ह्या काळाबद्दलसुद्धा आपण उसासे टाकू. माझी तारुण्याची वर्षे मला आठवतात. कधी कधी एक कोपेकसुद्धा खिशात नसायचा. गारठा, भूक, पण तरीही मजेत होतो. नेवस्कीवर सकाळी फिरायला जायचा आणि एखादा सुंदर मुखडा पाहिला म्हणजे उरलेला सारा दिवस आनंदात! लाडके, तो काळ फार फार छान होता! वारेन्का, जगात जगणे छान आहे! विशेषतः पीटरबुर्गमध्ये. काल मी डोळ्यात पाणी आणून देवाची प्रार्थना केली आणि संकटकाळी माझ्या हातून घडलेल्या पापांना क्षमा करण्याची विनवणी केली. माझ्या तक्रारींबद्दल, माझ्या स्वैर विचारांबद्दल, माझ्या व्यसनांबद्दल, मी माफी मागितली. प्रार्थनेवेळी तुमच्याबद्दल प्रेमळ विचार मनात येत होते. देवदूता, एकट्या तुम्हीच मला धीर दिलात, माझे सांत्वन केलेत, मला चांगला सल्ला दिलात. लाडके, ही गोष्ट मी कधीही विसरणार नाही, विसरणे शक्य नाही. माझ्या कबूतरा, आज तुमच्या सर्व पत्रांची मी चुंबने घेतली. अच्छा! इथून जवळच कुठेतरी कोट विकताहेत म्हणे, तेव्हा जराशी नजर टाकून येतो. अच्छा देवदूता!

तुमचा सर्वस्वी

मकार देवूष्कीन.

१५ सप्टेंबर

प्रिय महाशय, मकार अलेक्सेयेविच!

मी फार अस्वस्थ झाले आहे. ऐका गडे, आमच्याकडे काय घडले. काहीतरी विपरीत होणार असे मला जाणवतेय. माझ्या अमूल्य मित्रा,

आता तुम्हीच निर्णय करा : श्रीयुत बीकोव पीटरबुर्गमध्ये आहेत. फेदोरा त्यांना भेटली. ते द्रोश्की* मधून जात होते, पण फेदोराला पाहताच त्यांनी द्रोश्की थांबविली व स्वतः तिच्यापाशी येऊन ती कुठे राहतेय याबद्दल चौकशी केली. तिने प्रथम सांगितले नाही. मग ते हसून म्हणाले की, तिच्याबरोबर कोण राहतेय हे त्यांना माहीत आहे. (असे दिसतेय, आन्ना फ्योदरोवनाने त्यांना सर्व सांगितलेय.) तेव्हा फेदोराला राहवले नाही आणि तिथे रस्त्यातच तिने त्यांची खरडपट्टी काढायला सुरुवात केली. ते अनैतिक माणूस आहेत आणि माझ्या सगळ्या दुर्भाग्याला कारण आहेत, असे म्हणाली. ते उत्तरले की, जेव्हा माणसापाशी एकही कोपेक नसतो, तेव्हा ते माणूस अभागी असते हे समजण्यासारखे आहे. फेदोरा मग त्यांना म्हणाली की, मी नोकरी करून जगू शकले असते, अथवा कुणाशी-तरी लग्न केले असते, किंवा कुठेतरी जागा मिळविली असती, पण आता मी कायमची सुखाला मुकलेय, कारण त्यांच्यापायी मी आजारी पडलेय आणि लौकरच मरणार आहे. त्यावर ते म्हणाले की, मी तरुण असल्यामुळे मला मरायला अद्याप खूप अवकाश आहे, मी चंचल मनाची आहे आणि **माझ्या नावाला काहीसा कलंक लागलाय** (त्यांचे शब्द). फेदोराला आणि मला वाटले होते की, त्यांना आमचे घर माहीत नाही. पण काल मी गोस्तीनी द्वोरला काही खरेदीसाठी गेले होते तेव्हा ते अचानक आमच्या घरी आले. मी घरात नसेन अशा वेळी ते मुद्दाम आले असावेत. आमच्या जीवनाबद्दल त्यांनी फेदोराला खूप वेळपर्यंत खोदून खोदून प्रश्न विचारले. आमचे सबंध घर त्यांनी न्याहाळले. माझे कामही पाहिले. शेवटी विचारले : "हा कोण कारकून तुमच्या ओळखीचा आहे?" तेवढ्यात तुम्ही आवारातून जात होतात. फेदोराने त्यांना तुम्हाला दाखविले. त्यांनी पाहिले व नुसते हास्य केले. फेदोराने त्यांना निघून जायला सांगितले. ती म्हणाली की, संकटांपायी आधीच माझी प्रकृती नाजुक बनलीय आणि त्यांना आमच्याकडे पाहिल्यानंतर माझी अवस्था आणखीच बिघडेल. ते गप्प बसले. मग म्हणाले की, ते सहज आले होते. फेदोराला त्यांनी पंचवीस रूबल देऊ केले. पण तिने अर्थातच घेतले नाहीत. काय बरे ह्याचा अर्थ? कशाला ते आमच्याकडे आले असावेत? आमच्याबद्दल त्यांना इत्थंभूत माहिती कशी मिळाली, मला समजत नाही! तर्क करून मी थकले. फेदोरा म्हणते, आमच्याकडे कधी कधी येणारी तिची

---

* रशियन बनावटीची घोडागाडी – अनु.

नणंद आक्सीन्या ही धोबीण नास्तास्याच्या ओळखीची आहे आणि नास्ता-स्याचा चुलतभाऊ ज्या खात्यात पहारेकऱ्याची नोकरी करतो त्या खात्यात आन्ना फ्योदरोवनाच्या पुतण्याच्या ओळखीचा माणूस काम करतोय. ह्यातून तर माहिती पाझरली नाही ना? कदाचित फेदोराची चूक होत असेल. काय करावे ते आम्हाला समजत नाही. आमच्याकडे ते खरेच परत येतील काय? हा एकच विचार माझ्या मनात धडकी भरवतोय! काल जेव्हा फेदोराने सर्व हकीकत सांगितली, तेव्हा भीतीपायी मी भोवळ येऊन पडाय-च्या बेतात होते. आणखी त्यांना काय पाहिजे? आता त्यांचे तोंड पहायची माझी इच्छा नाही. माझ्यासारख्या भिकारणीपाशी त्यांचे काय काम आहे? कोणत्याही क्षणाला बीकोव येतील अशा धास्तीत, मी सतत वावरतेय. माझे काय होईल? दैव माझ्यासाठी आणखी काय योजना आखतेय? मकार अलेक्सेयेविच, ख्रिस्ताखातर आत्ताच्या आत्ता माझ्याकडे या. देवाशपथ या.

वा. दो.

१८ सप्टेंबर

लाडके, वार्वारा अलेक्सेयेवना!

आजच्या तारखेला एक दुःखद, अनपेक्षित आणि पूर्णतः अनाकलनीय अशी घटना आमच्या घरात घडली. आमचा गरीब बिचारा गोर्श्कोव संपूर्ण निर्दोष ठरला. निर्णय केव्हाच ठरला होता, पण आज अंतिम निकाल ऐका-यला तो गेला होता. निकाल त्याला अत्यंत अनुकूल लागला. हलगर्जीपणाचा आणि दुर्लक्षाचा त्याच्यावरील आरोप काढून घेण्यात आला. नुकसानभरपाई म्हणून मोठी रक्कम व्यापाऱ्यामार्फत त्याला देवविण्यात आली. त्यामुळे त्याची परिस्थिती सुधारली आहे आणि त्याच्या नावावरील कलंक नाहीसा झालाय. थोडक्यात सर्व काही पालटले आहे आणि त्याच्या सर्वोत्तम अपेक्षा पुऱ्या झाल्यात. दुपारी तीन वाजता तो घरी परतला तेव्हा त्याचा चेहरा भुतासारखा फिकट दिसत होता, त्याचे ओठ थरथरत होते, पण तरीही त्याच्या मुद्रेवर स्मित होते. त्याने त्याच्या बायको-मुलांना मिठ्या मारल्या. त्याचे अभिनंदन करायला आम्ही त्याच्याभोवती गर्दी केली. तो खूप हेलावून गेला होता, सतत झुकून अभिवादन करीत होता, आमच्यापैकी प्रत्येकाशी अनेकदा हस्तांदोलन करीत होता. त्याची उंची काहीशी वाढल्यासारखी भासत

होती, पाठ अधिक ताठ बनली होती आणि डोळ्यांमधून पाणी वाहणे थांबले होते. बिचारा खूप उत्तेजित बनला होता! एक मिनिट तो एका जागी स्थिर उभा रहात नव्हता, वस्तू उचलीत होता आणि खाली ठेवीत होता, स्मित करीत होता व झुकून अभिवादन करीत होता, खाली बसत होता आणि परत उठत होता, मनात येईल ते बोलत होता, स्वतःच्या प्रतिष्ठेबद्दल, भल्या नावाबद्दल आणि मुलांबद्दल बोलत होता. तो रडलासुद्धा. आमच्यापैकीसुद्धा बहुतेकांचे डोळे पाणावले होते. त्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने बहुधा राताझ्यायेव म्हणाला: "मित्रा, जवळ खायला नसताना नुसत्या प्रतिष्ठेला काय चाटायचं! पैसा ही मुख्य गोष्ट, त्या पैशाचे आभार मानले पाहिजेत", आणि त्याने गोश्कोंवचा खांदा थोपटला. ह्या शब्दांनी गोश्कोंव दुखावला असे मला भासले. त्याने स्वतःची नाखुषी थेट व्यक्त केली नाही, पण राताझ्यायेवकडे एक विचित्र कटाक्ष फेकला व स्वतःच्या खांद्यावरील त्याचा हात दूर केला. पूर्वी असे त्याने कधीही केले नसते. अर्थात माणसे भिन्न भिन्न असतात. उदाहरणार्थ, अशा आनंदादिवशी मी एवढा गर्व बाळगला नसता. असे प्रसंग असतात जेव्हा माणूस अधिक वेळा झुकतो व दुसरे काहीही कारण नसताना केवळ स्वतःच्या काळजात कृतज्ञता दुथडी भरून वाहात असते म्हणून स्वतःचा अपमानही करून घेतो. पण माझ्याबद्दल आता कशाला बोलायचे? गोश्कोंव म्हणाला: "होय, पैसा ही चांगलीच गोष्ट आहे. देवाचे त्याबद्दल आभार मानले पाहिजेत!" तो पुनःपुन्हा म्हणत होता: "देवाचे त्याबद्दल आभार मानले पाहिजेत!" त्याच्या बायकोने अधिक चवदार आणि भरपूर खाद्यपदार्थ मागविले. घरमालकिणीने स्वतः जेवण बनविले. आमची घरमालकीण काही अंशी प्रेमळ बाई आहे. जेवण येईपर्यंत गोश्कोंव एका जागी स्वस्थ बसू शकेना. आमंत्रण असो वा नसो, सर्वांच्या खोल्यांमधून तो फिरून आला. प्रत्येक खोलीत तो जाई, स्मित करी, खुर्चीवर बसे, काहीतरी बोले अथवा काहीच न बोलता मुकाटपणे बाहेर निघून जाई. नाविक अधिकाऱ्याच्या खोलीत तो पत्ते खेळायलासुद्धा बसला. त्याने चार-पाच मूर्ख चुका केल्या व खेळणे टाकले. म्हणाला: "नाही, मी आपला सहज गंमत म्हणून बसलो," आणि खोलीतून बाहेर पडला. कॉरीडॉरमध्ये माझ्याशी त्याची भेट झाली. त्याने माझे दोन्ही हात धरले, थेट नजरेला नजर भिडविली, पण त्याचे पाहणे विचित्र होते. माझे हात त्याने घट्ट दाबले आणि तसाच सस्मित मुद्रेने पुढे निघून गेला. त्याचे स्मित काहीसे अवघडलेले, विचित्र, निर्जीव भासत होते. त्याची बायको आनंदापायी

रडली. त्यांच्याकडे सणाचा आनंद पसरला होता. लौकरच ते जेवले. जेवणानंतर तो बायकोला म्हणतो: "अग ए, मी जरा विश्रांतीला आडवा होतो," आणि तो बिछान्यावर निजला. स्वतःच्या मुलीला त्याने जवळ बोलाविले, तिच्या डोक्यावर हात ठेवला व खूप वेळपर्यंत तिचे डोके कुरवाळीत राहिला. मग परत बायकोला उद्देशून म्हणाला: "पेतेन्का कुठं आहे? आपला पेत्या कुठं आहे?" बायकोने भरभर क्रूस-चिन्ह केले व ती उत्तरली की, पेतेन्का तर केव्हाच वारला. "होय, होय, माहीत आहे, सारं माहीत आहे, पेतेन्का आता स्वर्गात आहे." त्याचे चित्त थाऱ्यावर नसल्याचे बायकोच्या ध्यानात आले. तो हेलावला होता आणि गहिवरला होता. ती त्याला म्हणाली: "तुम्ही जरा स्वस्थ निजा". "होय, होय... मी निजतो थोडा," आणि त्याने कूस वळविली, थोडा वेळ गप्प पडून राहिला, मग काहीतरी बोलण्यासाठी परत वळला. बायकोला नीट ऐकू आले नाही म्हणून तिने विचारले: "काय म्हणालात?" पण त्याने उत्तर दिले नाही. ती थोडा वेळ थांबली, त्याचा डोळा लागलाय असे तिला वाटले व गप्पा मारण्यासाठी घरमालकिणीकडे ती तासभर बसली. तासाभरानंतर ती परतली—पाहते तो नवरा अजूनही झोपलेलाच होता, मुळीच हालचाल करीत नव्हता. त्याला गाढ झोप लागलीय अशा समजुतीने ती बसून काहीतरी घरकाम करू लागली. सुमारे अर्धा तासपर्यंत ती कामात आणि स्वतःच्या विचारांमध्ये गुरफटली होती, नवऱ्याचासुद्धा तिला विसर पडला होता. पण अचानक कसल्यातरी अशुभाच्या शंकेने दचकून ती भानावर आली. खोलीतील मृतवत शांतता तिला प्रकर्षाने जाणवली. तिने पलंगाकडे नजर टाकली तेव्हा नवरा मघाच्याच अवस्थेत झोपलेला दिसला. ती त्याच्यापाशी गेली, तिने पांघरूण बाजूला सारले आणि पाहते तो थंडगार पडलेला—मेला होता गोर्श्कोव, अगदी अनपेक्षितपणे, जणू वज्राघात होऊन! कशामुळे तो मेला, देवच जाणे! वारेन्का, मी एवढा गोंधळलोय की, अजूनपर्यंत ठिकाणावर आलो नाही, माणूस असा सहज मरू शकतो ह्यावर माझा विश्वासच बसत नाही. गरीब बिचारा गोर्श्कोव! किती विचित्र दैव! बायको बिचारी धाय मोकलून रडतेय, घाबरून गेलीय. मुलगी एका कोपऱ्यात बसून आहे. एकच गोंधळ माजलाय तिथे. शवविच्छेदन करणार आहेत... आता अधिक सांगवत नाही. फार फार वाईट वाटतेय! उद्या-

च्या दिवसाची शाश्वती कुणी देऊ शकत नाही हा विचार मनाला खिन्न करतो... काही कारण नसताना माणूस मरतो...

तुमचा,

मकार देवूष्कीन.

१९ सप्टेंबर

प्रिय बाईसाहेब, वार्वारा अलेक्सेयेवना!

तुम्हाला लगबगीने बातमी सांगतो की, राताझ्यायेवने एका लेखकाकडून माझ्यासाठी काम मिळविले आहे. तो लेखक हस्तलिखिताचे एक जाडजूड बाड घेऊन आला—देवाच्या कृपेने भरपूर काम. फक्त त्याचे हस्ताक्षर फार वाईट असल्यामुळे काय करावे समजत नाही. लौकर काम संपवा अशी निकड लावीत आहेत. पण अशा रीतीने लिहिलेय की, काहीच उमजत नाही... दर पानाला चाळीस कोपेक असा दर ठरलाय. मी एवढ्याचसाठी तुम्हाला लिहितोय, माझ्या प्राणा, की लौकरच जादा पैसे मिळतील. आता निरोप घेतो, लाडके, मला कामाला बसले पाहिजे.

तुमचा विश्वासू मित्र,

मकार देवूष्कीन.

२३ सप्टेंबर

माझे प्रिय मित्र, मकार अलेक्सेयेविच!

तुम्हाला मी काहीही न लिहिण्याचा एव्हाना तिसरा दिवस, माझ्या मित्रा, कारण मला खूप खूप चिंता होत्या, माझ्यावर खूप संकटे कोसळली होती.

परवा माझ्याकडे बीकोव आले होते. मी एकटीच होते, फेदोरा कुठेतरी बाहेर गेली होती. जेव्हा मी दार उघडले आणि त्यांना पाहिले, तेव्हा मी एवढी भ्यायले की जागच्या जागी खिळले. माझा चेहरा पांढराफटक पडल्याची मला जाणीव झाली. ते नेहमीच्या सवयीने मोठ्यांदा हसत खोलीत आले व खुर्चीवर बसले. मला भानावर यायला बराच वेळ लागला, शेवटी कोपऱ्यात कामाला बसले. त्यांचे हसणे लौकरच थांबले. मला वाटते, माझी दशा पाहून ते चकित झाले होते.

अलीकडील काळात मी खूप कृश बनलेय. गालफडे बसलीत, डोळे खोल गेलेत. पांढऱ्या रुमालासारखा माझा चेहरा बनला असावा. एक वर्षापूर्वी ज्याने मला पाहिले असेल तो आता मला खरेच पटकन ओळखू शकणार नाही. ते माझ्याकडे खूप वेळपर्यंत टक लावून पहात राहिले, शेवटी परत त्यांची मुद्रा खुलली. काहीतरी बोलले. मी काय उत्तर दिले आठवत नाही, पण ते परत हसले. आख्खा तासभर ते माझ्याकडे बसले होते. खूप बोलले माझ्याशी, अनेक प्रश्न विचारले. अखेर निरोपापूर्वी त्यांनी माझा हात धरला व म्हणाले (मी तुम्हाला त्यांचा शब्द न शब्द लिहितेय): "वार्वारा अलेक्सेयेवना! आपल्यात बोलायचे तर आन्ना फ्योदरोवना, तुमची नातलग आणि माझ्या परिचयाची मैत्रीण, हलकट बाई आहे. (त्यांनी तिच्या संदर्भात आणखी एक अशिष्ट शब्द उच्चारला.) तुमच्या मावसबहिणीला तिनं आडमार्गाला लावलं आणि तुमचा सर्वनाश केला. माझ्या बाबतीत म्हणाल तर मी अत्यंत नीच वागलो, पुरुष नेहमी असेच वागतात." मग ते टिपेच्या आवाजात हसले. आपण बोलण्यात वाकबगार नाही, पण मुख्य गोष्ट बोलून टाकली, कारण प्रतिष्ठा त्यांच्या मनाला गप्प बसू देईना, असे ते म्हणाले. बाकीचे बोलणे थोडक्या शब्दांमध्ये उरकतो असे त्यांनी जाहीर केले. त्यांनी तात्काळ सांगितले की, माझ्या करग्रहणाची त्यांची इच्छा आहे, माझ्या अब्रूची परत स्थापना करणे ते स्वतःचे कर्तव्य मानतात, ते सधन आहेत, विवाहानंतर त्यांच्या स्तेपमधील खेड्यात ते मला नेऊ इच्छितात, तेथे सशांची शिकार करण्याचा त्यांचा इरादा आहे; इतःपर पीटरबुर्गमध्ये ते कधीही येणार नाहीत, कारण हे डांबीस शहर आहे; त्यांचा नालायक पुतण्या ह्या शहरात राहतो, त्याचा वारसाहक्क ते रद्द करून टाकणार आहेत व वास्तवात त्यांनी मला विवाहाची मागणी घालण्याचे हेच मुख्य कारण आहे: त्यांना स्वतःचा कायदेशीर वारस पाहिजे. नंतर त्यांनी शेरा मारला की, मी अत्यंत गरीबीत राहतेय आणि असल्या बिळात राहत असताना आजारी न पडले तरच नवल. आणखी एक महिनाभर मी येथे राहिले तर नक्की मरीन असे त्यांनी भाकीत केले. पीटरबुर्गमधील घरे भयानक वाईट आहेत असे ते म्हणाले व मला काही गरज आहे का, अशी विचारणा केली.

का कुणास ठाऊक, पण त्यांनी घातलेल्या विवाहाच्या मागणीमुळे मला रडू कोसळले. माझे अश्रू कृतज्ञेपोटी आहेत असा गैरसमज करून घेऊन ते म्हणाले की, मी एक गुणी, दयाळू मनाची आणि सुशिक्षित मुलगी आहे अशी त्यांची नेहमीच खात्री होती, पण तरीही माझ्याबद्दल योग्य चौकशा

करीपर्यंत हे पाऊल टाकायला ते बिचकत होते. मग त्यांनी तुमच्याबद्दल काही प्रश्न विचारले व पुढे म्हणाले की, तुम्ही फार उदार गृहस्थ आहात असे त्यांनी ऐकले आहे आणि तुमच्या ऋणात रहावे अशी त्यांची इच्छा नाही, तुम्ही माझ्यासाठी जे काही केले आहे त्याबद्दल पाचशे रूबल पुरेसे आहेत का? केवळ पैशाने तुमचे माझ्यावरील उपकार फिटण्यासारखे नाहीत असे जेव्हा मी म्हणाले, तेव्हा त्यांनी प्रत्युत्तर केले की, तो सारा मूर्खपणा आहे, हा सारा कादंबऱ्यांचा परिणाम आहे, मी अजून तरुण आहे आणि कविता वाचते, कादंबऱ्या तरुणींचा नाश करतात, पुस्तके केवळ नीतीमत्ता बिघडवतात आणि कुठल्याही पुस्तकांचे त्यांना दर्शनसुद्धा सहन होत नाही. त्यांच्या वयापर्यंत जगून झाल्यानंतर माणसांबद्दल बोला, असा त्यांनी मला सल्ला दिला. मग ते म्हणाले की, त्यांच्या प्रस्तावाचा मी काळजीपूर्वक विचार करावा, कारण असा महत्त्वाचा निर्णय घाईगर्दीने घेतल्यास पुढे पश्चात्ताप करावा लागण्याची शक्यता असते. तरुण माणसे नेहमी घाईने निर्णय घेण्याची आणि अविचाराने वागण्याची चूक करतात. अर्थात अनुकूल उत्तरास ते उतावीळ आहेत. अन्यथा मॉस्कोतील एका व्यापाऱ्याच्या मुलीशी लग्न करणे त्यांना भाग पडणार आहे, कारण त्यांच्या नालायक पुतण्याला वारसा न देण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली होती. माझ्या नकारांकडे दुर्लक्ष करून त्यांनी माझ्या कशीदाकामाच्या चौकटीवर पाचशे रूबल ठेवले व मिठाईसाठी खर्च करा असे म्हणाले. खेड्यात मी पुरीसारखी टण्ण फुगेन आणि ऐश्वर्यात लोळीन असे ते म्हणाले. सध्या म्हणे ते फार कामात आहेत, सबंध दिवस धावपळीत आहेत, केवळ मधल्या फुरसतीच्या क्षणांमध्ये मला भेटायला आले होते. एवढे बोलून ते निघून गेले. मी खूप वेळपर्यंत विचार केला, पुन:पुन्हा विचार केला आणि, माझ्या मित्रा, अखेर मी निर्णय घेतला. मी त्यांच्याशी लग्न करण्याचे ठरविले आहे, त्यांच्या प्रस्तावाला मान्यता देणार आहे. माझ्या बेअब्रूमधून माझी मुक्तता करण्यास, मला परत प्रतिष्ठा देण्यास, दारिद्र्य, खडतरता आणि दुर्भाग्याला भावी काळात माझ्यापासून दूर ठेवण्यास फक्त एकटे तेच समर्थ आहेत. भविष्यकाळापासून आणखी काय अपेक्षा मी ठेवायची? दैवापासून मी अधिक काय मागायचे? फेदोरा म्हणते की, माणसाने स्वत:चे सुख हुकवू नये आणि हे जर सुख नसेल, तर दुसरे काय? मला विचाराल तर माझ्यापाशी दुसरा मार्ग नाही. मी काय करू? अतिश्रमांपायी मी स्वत:ची प्रकृती बिघडवून घेतलीय आणि सतत काम करणे मला शक्य नाही. लोकांकडे कामाला जाऊ? —एकाकी-

पणापायी मी झुरून जाईन आणि कुणाच्याही लायकीची राहणार नाही. मी मूळचीच आजारी आहे, त्यामुळे नेहमी कुणावर तरी ओझे बनून राहीन. अर्थात आत्तासुद्धा मला काही स्वर्गसुख लाभणार नाही, पण मी काय करणार, माझ्या मित्रा, मी काय करू? निवडीला माझ्यापाशी वावच नाही!

मी तुमच्यापाशी सल्ला मागितलेला नाही. मला एकटीलाच विचार करायचा होता. आत्ता तुम्ही वाचलेल्या निर्णयांमध्ये बदल होणार नाही आणि माझ्या निर्णयाची अधीरपणे वाट पाहणाऱ्या बीकोवना मी तात्काळ माझा निर्णय कळविते आहे. ते म्हणाले की, त्यांची कामे खोळंबून राहणार नाहीत, त्यांना जाणे आवश्यक आहे आणि फालतू कारणांपायी ते कामे लांबणीवर टाकायला तयार नाहीत. मी सुखी होईन अथवा नाही, देवालाच ठाऊक, पण दैवावर भवितव्य सोपविण्याचा तरीही मी निश्चय केलाय. बीकोव दयाळू माणूस आहे असे म्हणतात. माझा ते आदर राखतील. कदाचित मीही त्यांचा आदर करीन. आमच्या विवाहापासून आणखी कशाची अपेक्षा करायची?

तुम्हाला सर्व कळवून टाकले आहे, मकार अलेक्सेयेविच, माझी सगळी कुचंबणा तुम्ही समजून घ्याल अशी खात्री आहे. माझ्या निर्णयांपासून मला ढळवू नका. तुमच्या प्रयत्नांना यश येणार नाही. असे पाऊल टाकणे मला का भाग पडले याबद्दल स्वतःशी समतोल विचार करा. प्रथम मी अस्वस्थ होते, पण आता मी अधिक शांत झालेय. पुढे काय वाढून ठेवलेय, मला माहीत नाही. जे व्हायचे ते होईल. देवाची मर्जी!..

बीकोव आले आहेत. मी पत्र अपुरेच सोडतेय. आणखी खूप सांगायची इच्छा होती. बीकोव समोर उभे आहेत.

वा. दो.

२३ सप्टेंबर

लाडके, वार्वारा अलेक्सेयेवना!

मी तावडतोब तुम्हाला उत्तर लिहितोय. लाडके, मी थक्क झालोय. काहीतरी विस्कटून गेलेय... काल आम्ही गोर्श्कोवचे दफन केले. वारेन्का, होय, बीकोव उदात्त वागलाय. पण माझ्या प्राणा, तुम्ही खरोखरीच संमती देणार? अर्थात सारी देवाची मर्जी. निश्चितच देवाच्या इच्छेने सर्व घडत

असते. त्यात काही संशय नाही. आणि हेही देवाच्या इच्छेने होत आहे. त्या विधात्याची करणी दैवाप्रमाणेच अगम्य आहे. निर्विवाद! फेदोरासुद्धा संमती देत आहे. आता तुम्ही सुखी आणि समाधानी व्हाल, माझ्या लाडक्या कबूतरा, माझ्या सुंदर देवदूता – पण इतकी घाई का, वारेन्का? होय, कामे आहेत... श्रीयुत बीकोव यांना कामे आहेत. अर्थात प्रत्येकाला कामे असतात, तेव्हा त्यांनाही कामे असू शकतील... तो घरातून बाहेर पडत होता तेव्हा मी त्याला पाहिले. भव्य माणूस आहे, फार भव्य! पण काहीतरी गडबड आहे. तो भव्य आहे हा मुद्दा नव्हे, परंतु मी कमालीचा बेचैन आहे. आता आपण एकमेकांना पत्रे कशी लिहिणार? आणि मी एकटा कसा जगू? तुम्ही सांगितल्याप्रमाणे मी मनातील मनात सर्व कारणांचा समतोलपणे विचार करतोय. सतत इथे बसून सारासार विचार करतोय. तुमचे पत्र आले तेव्हा मी त्या हस्तलिखिताच्या विसाव्या पानाची नक्कल करीत होतो. लाडके, तुम्ही इथून निघून जात आहात, तेव्हा सर्व वस्तू विकत घेतल्या पाहिजेत: पोषाख, बूट वगैरे. गोरोखोवायावरचे एक दुकान माझ्या माहितीचे आहे. पूर्वी मी त्याबद्दल सांगितलेले आठवते? पण आत्ता तुम्ही कशा निघून जाताय? आता तुम्ही तसे करू शकत नाही. ते अशक्य आहे, पूर्ण अशक्य आहे! खूप गोष्टी विकत घ्यायच्या आहेत, एक बग्गीसुद्धा! हवा वाईट आहे, पाऊस पडतोय, अगदी मुसळधार! असा ओला पाऊस... माझ्या देवदूता, तुम्हाला थंडी वाजेल. तुमच्या काळजाला थंडी वाजेल. खरे तर परक्या माणसाची तुम्हाला भीती वाटते, तरीही तुम्ही जाताय? आणि इथे मी एकटा कुणासाठी राहू? फेदोरा म्हणते की, तुमची सुख वाट पाहतेय... ती बाई जहांबाज आहे, माझा सर्वनाश व्हावा अशी तिची इच्छा आहे. आज चर्चमध्ये प्रार्थनेला जाणार का? मी तुम्हाला पहायला आलो असतो. लाडके, तुम्ही सुशिक्षित तरुणी आहात, गुणी आणि दयाळू मनाच्या आहात, हे अगदी खरे! पण त्याने त्या व्यापाऱ्याच्या पोरीशी लग्न करणे अधिक चांगले! तुम्हाला काय वाटते? व्यापाऱ्याच्या मुलीशी त्याने लग्न करणे अधिक श्रेयस्कर नाही का? अंधार पडताच मी तुमच्याकडे तासभरासाठी धावत येतो. सध्या लौकर अंधार पडतो आणि मी नक्की येतो. ह्या क्षणाला तुम्ही बीकोवची वाट पाहता आहात, तो निघून गेला म्हणजे येतो... माझी वाट पहा, मी धावत येतो...

मकार देवूष्कीन.

२७ सप्टेंबर

प्रिय मित्र, मकार अलेक्सेयेविच,

श्रीयुत बीकोव म्हणाले की, डच कापडाची निदान तीन डझन खमीस माझ्यापाशी असली पाहिजेत. तेव्हा दोन डझन खमीस शिवण्यासाठी लौकर शिंपीण शोधली पाहिजे, आमच्यापाशी फारशी सवड नाही. श्रीयुत बीकोव खूप चिडतात, म्हणतात की ह्या कपड्यांपायी फार किटकिट होते. आणखी पाच दिवसांनंतर आमचे लग्न आहे आणि लग्नानंतर दुसऱ्या दिवशी आम्ही इथून जात आहोत. श्रीयुत बीकोव घाई करताहेत, म्हणतात एवढा वेळ वाया घालविणे लज्जास्पद आहे. धावपळीपायी मी थकून गेलेय, दोन पायांवर उभे राहणे अवघड झालेय. कामे खूपच आहेत आणि खरेच, ह्यापैकी काही नसते तर फार बरे झाले असते. आणि हो: आम्हाला पुरेशी पिंगट रंगाची रेशमी लेस मिळाली नाही, विकत घेतली पाहिजे, कारण श्रीयुत बीकोव म्हणतात की, त्यांच्या बायकोने स्वैपाकिणीच्या अवतारात फिरावे अशी त्यांची इच्छा नाही, "सगळ्या जमीनदारणींची नाके मी कापली पाहिजेत!" तर मकार अलेक्सेयेविच, तुम्ही गोरोखोवायावरच्या मादाम शीफॉनपाशी जा, काही शिंपीणी तिला पाठवायला सांगा आणि तिने स्वतःही इथे येऊन जाण्याची तसदी घ्यायला सांगा. आज माझी प्रकृती बरी नाही. नव्या घरात फार गारठा आहे आणि सामान अस्ताव्यस्त पडलेय. श्रीयुत बीकोव यांची मावशी फार म्हातारी आहे. आम्ही जाण्यापूर्वीच ती मरेल अशी धास्ती वाटते, पण श्रीयुत बीकोव म्हणतात की, तसे काही घडणार नाही, ती ठीक होईल. आमच्या घरात भयानक अव्यवस्था माजलीय. श्रीयुत बीकोव आमच्याबरोबर रहात नाहीत आणि नोकर कुठे गायब होतात देव जाणे! काहीवेळा एकटी फेदोराच कामाला असते. सर्व कामांची जबाबदारी सांभाळणारा श्रीयुत बीकोव यांचा नोकर तीन दिवस कुठे नाहीसा झालाय माहीत नाही. श्रीयुत बीकोव रोज सकाळी येतात, खूप संतापतात. काल सकाळी घरात नोकराला त्यांनी चोप दिला, त्यामुळे त्यांचे बिनसलेय. ...तुमच्याकडे पत्र धाडायला कुणीही माणूस नव्हते. शहरी टपालसेवेमार्फत पाठवतेय. हो! एक महत्त्वाची गोष्ट विसरले होते. मादाम शीफॉनला सांगा की, कालच्या नमुन्यानुसार लेस बदला आणि नवे नमुने दाखविण्यासाठी तिलाच यायला सांगा. आणखी सांगा की, हलक्या स्वेटरबाबत माझा विचार बदलला आहे, तो विणला पाहिजे. आणि हातरुमालांवरील आद्याक्षरे भरतकामात करा. समजले? भरतकामात, रेशमाचा टाका घालून नव्हे.

विसरू नका. आणखी एक विसरले होते. तिला सांगा, केसाळ अंगरख्याच्या पदरांना वर ओढले पाहिजे, बगलांमध्ये वेण्या घातल्या पाहिजत आणि कॉलरच्या किनारीला लेस लावली पाहिजे अथवा रुंद... किनार लावली पाहिजे. मकार अलेक्सेयेविच, कृपया निरोप द्या.

तुमची,

वा. दो.

ता. क. माझी कामे सांगून तुमचा छळ करायची मला लाज वाटते. परवा सबंध सकाळभर तुम्ही धावपळ केलीत! पण काय करणार! आमच्या घरात मुळीच शिस्त नाही आणि मी आजारी आहे. तेव्हा माझ्यावर राग धरू नका, मकार अलेक्सेयेविच! एवढा कंटाळा, काय होईल माझ्या लाड-क्या, उदार मित्रा, मकार अलेक्सेयेविच! माझ्या भविष्यकाळात डोकावून पहायला मला भीती वाटतेय. भवितव्याविषयीच्या चाहुलीने मी पिडलेय आणि कसल्यातरी गुंगीत जगतेय.

ता. क. माझ्या मित्रा, देवाशपथ आत्ता मी तुम्हाला सांगितलेले न विसरता करा. तुमच्या हातून काहीतरी चूक घडेल अशी सतत भीती वाटते. भरतकामाची आठवण ठेवा, रेशमी टाका नको.

वा. दो.

२७ सप्टेंबर

प्रिय बाईसाहेब वार्वारा अलेक्सेयेवना!

तुमच्या सूचनांबरहुकूम सर्व कामगिऱ्या पार पाडल्या. मादाम शीफॉन म्हणतात की, भरतकाम करण्याचे त्यांनी स्वतःच ठरविले होते, कारण ते अधिक सोयीस्कर आहे म्हणे – मला त्यातील काही समजत नाही. किना-रीबद्दलही त्या काहीतरी म्हणाल्या, पण मी ते विसरलोय. एवढेच आठवते की, खूप खूप बोलल्या. फार कटकटी बाई! आणखी काय म्हणाल्या? त्या स्वतःच तुम्हाला सांगतील. माझ्या लाडके, माझा पुरता दम निघालाय. आज मी कचेरीतसुद्धा गेलो नाही. मात्र तुम्ही निष्कारण काळजी करू नका. तुमच्या मनःशांतीसाठी सगळ्या दुकानांची फेरी करायला मी तयार आहे. तुम्ही लिहिताय की, भविष्यकाळात डोकावून पहायची तुम्हाला भीती वाटते.

आज सात वाजता सर्व काही समजेल. मादाम शीफॉन स्वतःच तुमच्याकडे येईल. तेव्हा तुम्ही चिंता करू नका. कदाचित सगळे अधिक चांगल्यासाठीच घडेल अशी आशा बाळगा. ती नतद्रष्ट किनार माझ्या डोक्यातून काही केल्या जात नाही. देवदूता, मी तुमच्याकडे नक्की धावत आलो असतो. एव्हाना तुमच्या घराच्या फाटकापर्यंत दोनदा येऊन गेलो. पण श्रीमान बीकोव सतत चिडलेले असतात... तेव्हा काय करणार!

मकार देवूष्कीन.

२८ सप्टेंबर

प्रिय महाशय, मकार अलेक्सेयेविच!

कृपा करून जवाहिऱ्याकडे धावा. त्याला सांगा की, मोत्याची आणि पाचूची कर्णभूषणे बनविण्याची आता जरूरी नाही. श्रीयुत बीकोव म्हणतात, किंमत फार आहे, परवडणार नाही. ते रागावले आहेत. म्हणतात, आधीच त्यांच्या खिशाला भरपूर चाट बसलीय आणि आम्ही त्यांना लूबाडतोय. काल म्हणाले की, एवढे खर्च होणार आहेत ह्याची आधी कल्पना असती, तर ह्या फंदात ते पडलेच नसते. म्हणतात की, लग्न झाल्यानंतर ताबडतोब इथून निघून जायचे, पाहुण्यांना बोलवायचे नाही, नाचण्याची आणि मिरविण्याची अपेक्षा मी म्हणे बाळगू नये, कारण उत्सव साजरा करायला अद्याप अवकाश आहे. तर असे ते म्हणतात! देवाला ठाऊक आहे, मला ह्या कशाचीच गरज नाही! खुद्द श्रीयुत बीकोव यांनीच सगळया ऑर्डरी नोंदवल्या. त्यांना प्रत्युत्तर करण्याची माझी हिंमत नाही, फार तापट स्वभाव आहे त्यांचा. माझे काय होईल!

वा. दो.

२८ सप्टेंबर

माझ्या कबूतरा, वार्वारा अलेक्सेयेवना!

मी... म्हणजे जवाहिऱ्या म्हणाला—ठीक आहे! प्रथम मी स्वतःबद्दल सांगणार होतो की, मी आजारी पडलोय आणि अंथरुणातून उठू शकत नाही. आता धावपळीचा, महत्त्वाचा काळ आलाय, पण अशा वेळी नेमकी थंडीतापाची बाधा झालीय. ह्या आजाराचे निःसंतान होवो! तुम्हाला हेही

कळवितो की, माझ्या दुर्भाग्यात भर म्हणून महामहीमांनी कडक वागायचे ठरविले आहे, येमेल्यान इवानोविचवर खूप चिडले व ओरडले, शेवटी बिचाऱ्यांच्या तोंडून शब्द फुटेना. तर मी तुम्हाला सगळे कळविले. आणखी काही लिहिण्याची इच्छा होती, पण तुम्हाला निष्कारण त्रास होईल अशी मला भीती वाटते. लाडके, तसा मी मूर्ख, साधा माणूस आहे, डोक्यात येईल ते लिहितो. कदाचित अनावश्यक असे काहीतरी त्यात तुम्हाला आढळायचे – असो !

तुमचा,

मकार देवूष्कीन.

२९ सप्टेंबर

वार्वारा अलेक्सेयेवना, माझ्या प्राणा !

आज मी फेदोराला भेटलो, माझ्या कबूतरा ! ती म्हणते की, उद्या तुमचा विवाह आहे, परवा तुम्ही इथून जात आहात आणि श्रीमान बीकोव एव्हाना घोडे भाड्याने ठरवीत आहेत. महामहीमांबाबत मी तुम्हाला आधीच कळविले आहे. आणखी : गोरोखोवायावरील दुकानाच्या पावत्या मी तपासल्या. सर्व बरोबर आहेत, पण खूप महाग. श्रीमान बीकोव तुमच्यावर का चिडतात ? सुखी व्हा, लाडके ! मला आनंद आहे, होय तुम्ही सुखी झालात तर मला आनंद आहे. मी चर्चमध्ये आलो असतो, पण शक्य नाही, पाठ दुखतेय. आता पत्रांबद्दल... लाडके, आपल्या पत्रांची ने-आण आता कोण करील ? हो ! फेदोराची तुम्ही चांगली बोळवण केलीत. तुम्ही फार दयाळू आहात. देव तुमचे कल्याण करो. सत्कृत्ये कधी वाया जात नाहीत आणि लौकर अथवा उशीरा भलेपणाला न्याय हा मिळतोच. तुम्हाला खूप लिहायची माझी इच्छा आहे, दर तासाला, दर मिनिटाला, नुसते लिहीत रहायचे ! 'बेल्कीनच्या कथा' हे तुमचे पुस्तक अजून माझ्यापाशीच राहिले आहे. कृपया ते पुस्तक मला भेट म्हणून द्या, माझ्याकडून परत घेऊ नका. ते वाचायचे आहे म्हणून नव्हे. पण तुम्हाला ठाऊकच आहे, लाडके, हिवाळा जवळ येतोय. संध्याकाळी प्रदीर्घ बनतील, मन विषण्ण होईल, तेव्हा वाचायला छान. लाडके, मी माझी सध्याची जागा सोडून तुमच्या जुन्या जागेत जाणार आहे, फेदोराकडून भाड्याने घेणार आहे. त्या प्रामाणिक बाईपासून इतःपर मी कधीही दूर जाणार नाही. ती खूप कष्टाळू आहे. काल मी

तुमच्या रिकाम्या खोलीत गेलो होतो, खूप न्याहाळून पाहिली. तेथे कोपऱ्यात तुमची कशीदाकामाची चौकट तशीच पडून आहे, तुमचे अर्धवट कशीदाकाम नजरेला पडले. आणखीही काही वस्तू पाहिल्या. माझ्या एका पत्राभोवती तुम्ही दोरा गुंडाळून ठेवलाय. टेबलाच्या खणात एका कागदावर लिहिलेली अक्षरे वाचली: **"प्रिय महाशय, मकार अलेक्सेयेविच, घाईने लिहितेय..."** एवढेच. ऐनवेळी कुणीतरी पत्रलेखनात अडथळा आणला असावा. कोपऱ्यात आडोशामागे तुमचा छोटा पलंग आहे. माझ्या कबूतरा!!! अच्छा, कृपया ह्या पत्राचे मला लौकरात लौकर उत्तर धाडा.

मकार देवूष्कीन.

३० सप्टेंबर

माझे अमूल्य स्नेही, मकार अलेक्सेयेविच!

सारे पार पडले! माझ्या दैवाचे फासे टाकलेत. भवितव्यात काय ते मला माहीत नाही, पण मी देवावर सगळा हवाला टाकलाय. उद्या आम्ही जात आहोत. माझ्या अमूल्य मित्रा, माझ्या उपकारकर्त्या, माझ्या लाडक्या, तुमचा अखेरचा निरोप घेते! माझ्यासाठी खंत करू नका, सुखी रहा, माझी आठवण ठेवा, देव सतत तुमचे रक्षण करो! माझ्या विचारांमध्ये आणि प्रार्थनांमध्ये मी नेहमी तुमची आठवण करीन. माझा इथला काळ संपला. पूर्वीच्या आठवणी मला नव्या जीवनात फारशा सुख देणार नाहीत, पण तुमच्याबद्दलच्या आठवणी मात्र माझ्या काळजात अमोल ठेवा बनून राहतील. तुम्ही माझे एकमेव मित्र. इथे माझ्यावर प्रेम करणारे तुम्ही एकटेच. तुमचे माझ्यावरील उत्कट प्रेम मी पाहिले आहे, मला ते माहीत होते. केवळ माझ्या एका स्मिताने, केवळ माझ्या पत्रातील एका ओळीने, तुम्ही सुखी होत होता. आता माझी सवय तुम्हाला तोडून टाकणे भाग आहे. तुमचे एकट्याचे इथे कसे होईल! माझ्या प्रेमळ, अमूल्य, एकमेव मित्रा, इथे तुम्ही कुणावर विसंबणार! माझे पुस्तक, कशीदाकामाची चौकट आणि कधीकाळी सुरू केलेले पत्र तुमच्यासाठी ठेवून जाते. जेव्हा केव्हा त्या पत्रातील सुरुवातीच्या ओळी पहाल, तेव्हा मनाने पुढील सर्व मजकूर वाचा – तुमच्या मर्जीनुसार. मी तुम्हाला त्या पत्रात काय लिहिले कोण जाणे! तुमच्यावर खूप प्रेम करणाऱ्या तुमच्या गरीब बिचाऱ्या वारेन्काची आठवण ठेवा. तुमची

सर्व पत्रे फेदोराकडे कपाटात सर्वांत वरच्या कप्प्यात ठेवली आहेत. तुम्ही लिहिताय की तुम्ही आजारी आहात, पण श्रीयुत बीकोव आज मला कुठेही सोडत नाहीत. माझ्या मित्रा, मी तुम्हाला पुढे लिहीत राहीन, पण पुढे काय घडेल ते एकटा देवच जाणे! तेव्हा आता कायमचा निरोप घेऊ, माझ्या मित्रा, माझ्या कबूतरा, माझ्या लाडक्या, कायमचा! .. किती घट्ट आलिंगन द्यावेसे वाटतेय तुम्हाला! अच्छा माझ्या मित्रा, अच्छा, अच्छा. सुखी रहा. निरोगी रहा. मी चिरंतन तुमच्यासाठी प्रार्थना करीन. हाय! मला खूप दुःख होते आहे, माझ्या मनावर जबरदस्त दडपण जाणवते आहे. श्रीयुत बीकोव मला हाक मारताहेत. अच्छा.

तुमची चिरंतन लाडकी,

वा.

ता. क. माझा ऊर आसवांनी भरून आलाय...
अश्रू मला घुसमटून टाकताहेत. अच्छा.
देवा! किती दुःखद!
आठवण ठेवा, तुमच्या गरीब वारेन्काची आठवण ठेवा!

लाडके, वारेन्का, माझ्या कबूतरा, माझ्या अमूल्या! तुम्हाला दूर नेत आहेत, तुम्ही चाललात! तुम्हाला माझ्यापासून खेचून नेण्यापेक्षा त्यांनी माझे काळीज तोडले असते तर अधिक बरे झाले असते! अशा कशा वागलात! तुम्ही रडताय आणि तरीही जाताय! तुमचे पत्र आत्ता मला मिळाले, त्यावर सगळीकडे अश्रूंचे डाग आहेत. म्हणजे जाण्याची तुमची इच्छा नाही. म्हणजे तुम्हाला जबरदस्तीने घेऊन चाललेत. म्हणजे तुम्हाला माझी दया येतेय, तुम्ही माझ्यावर प्रेम करताय. आता तुमचे कसे होईल, तुमची काळजी कोण घेईल? तेथे तुमचे काळीज दुःखी होईल, ते गोठून जाईल. शोक त्याला शोषून घेईल, दुःख त्याचे दोन तुकडे करील. तुम्ही तेथे मराल, ओल्या मातीत तुम्हाला पुरतील आणि तुमच्यासाठी रडायला तेथे कुणीही नसेल. श्रीयुत बीकोव ससांच्या शिकारीत गुंतून राहतील... हाय, लाडके! काय हा तुम्ही निर्णय घेतलात, असे पाऊल तुम्ही कसे उचलू शकलात? तुम्ही काय केलेत, स्वतःचे तुम्ही काय करून घेतलेत? तेथे तुम्हाला मरणाकडे लोटत नेतील. देवदूता, तुमची ते उपासमार करतील. तुम्ही एखाद्या पिसाप्रमाणे नाजुक आहात. आणि मी कुठे होतो? मी मूर्ख बघत काय बसलो? मुलाचा तोल जातोय, मूल आजारी आहे हे पहात

होतो. मी निर्धाराने थोपवायला हवे होते – पण नाही! मी मूर्खासारखा वागलो, जणू काही माझा संबंध नाही अशा परकेपणाने वागलो. एवढेच नव्हे तर किनारीसाठी धावलो. नाही वारेन्का, मी अंथरुणातून उठेन. उद्या मी आजारातून बरा होईन आणि उठेन. तुमच्या बग्गीच्या चाकांखाली स्वतः-ला झोकून देईन. मी तुम्हाला जाऊ देणार नाही! हे काय हे? कोणत्या हक्कानुसार हे सारे चाललेय? मी तुमच्याबरोबर येईन, तुमच्या बग्गीमागून धावेन, जर तुम्ही मला बरोबर घेतले नाही तर ऊर फुटून मरेपर्यंत मी तुमच्यामागून धावत राहीन. तुम्ही जिथे जाताय तिथे काय आहे, तुम्हाला माहीत आहे का, लाडके? तुम्हाला माहीत नसेल तर मी सांगतो! तिथे स्तेप आहे, माझ्या प्राणा, ओसाड स्तेप! माझ्या हाताच्या तळव्याप्रमाणे! तिथे बोथट मनाच्या बाया आहेत आणि पुरुष अशिक्षित, दारुडे आहेत. आता तेथे झाडावरची पाने गळून पडलीत, पाऊस कोसळतोय, चावरी थंडी आहे – अशा ठिकाणी तुम्ही जात आहात! श्रीमान बीकोवना तेथे उद्योग आहे. ते तेथे सशांमागे धावतील, पण तुम्ही काय करणार? जमीनदाराची बायको म्हणून जगायची इच्छा आहे? तुम्ही माझ्या सुंदर देवदूत आहात! जरा स्वतःकडे नजर टाका – जमीनदाराच्या बायकोसारख्या दिसता काय? असे कसे होईल, वारेन्का? लाडके, कुणाला मी पत्र लिहू? जरा विचार करा – तो कुणाला पत्र लिहील? कुणाला मी लाडके म्हणून संबोधू? अशा लाडक्या नावाने कुणाला हाक मारू? मग तुम्हाला कुठे शोधू, माझ्या देवदूता. वारेन्का, मी मरणार, नक्की मरणार. असले दुर्भाग्य माझ्या काळजाला सोसणार नाही! खुद्द देवाच्या तेजावर करावे तसे मी तुमच्यावर प्रेम केले, पोटची मुलगी समजून प्रेम केले, तुमच्यातील प्रत्येक गोष्टीवर मी प्रेम केले. केवळ तुमच्या एकटीसाठीच मी जगत होतो. मी काम करीत होतो, नकला करीत होतो, भटकत होतो, माझी निरीक्षणे पत्रांच्या रूपाने कागदावर लिहून काढत होतो – ह्या सर्व गोष्टींचे एकच कारण म्हणजे तुम्ही माझ्या समोरच, जवळ रहात होतात. कदाचित हे तुम्हाला माहीत नव्हते, पण प्रत्यक्षात असेच होते. लाडके, तुम्ही विचार करा, तुम्ही कशा काय निघून चाललात? वस्तुतः तुम्ही जाऊ नये, जाणे शक्य नाही. अगदी कोणतीही शक्यता नाही! पाऊस कोसळतोय, तुम्ही अशक्त आहात, तुम्हाला थंडी बाधेल, तुमची बग्गी ओलीचिप्प भिजेल. तुम्ही शहरच्या वेशीबाहेर जाताच ती मोडेल. इथे पीटरबुर्गमध्ये कुचक्या बग्गी बनवितात. त्या सगळ्या बग्गी बनविणाऱ्यांना मी ओळखतो. त्यांचे ध्यान फक्त फॅशन-

वर! एखाद्या खेळण्याप्रमाणे ते बग्गी सजवतात, पण भक्कम बांधणी नसते. माझ्या लाडके, श्रीयुत बीकोव यांच्यासमोर मी लोटांगण घालीन. मी त्यांना सिद्ध करून दाखवीन, सर्व सिद्ध करून दाखवीन. तुम्हीसुद्धा तर्काच्या बळावर त्यांना पटवून द्या. तुम्ही त्यांना सांगा की, तुम्ही इथेच राहणे आवश्यक आहे आणि जाऊ शकत नाही. त्या मॉस्कोतील व्यापाऱ्याच्या मुलीशी त्यांनी का लग्न केले नाही! तसे त्यांनी केले तर फार बरे झाले असते. व्यापाऱ्याची मुलगी अधिक सुयोग्य आहे. खूपच! मला खात्री आहे. मग तुम्ही इथे माझ्याजवळ राहू शकला असता. श्रीयुत बीकोवची तुम्हाला काय गरज आहे? अचानक तुम्हाला ते का प्रिय झाले? तुम्हाला किनार विकत घेऊन दिली म्हणून? काय अर्थ आहे त्या किनारीत? कशाला ती? क्षुल्लक वस्तू आहे. इथे माणसाच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे, अशा वेळी त्या फडतूस कापडाचे काय महत्त्व? जरा थांबा, माझा पगार झाला म्हणजे मी तुम्हाला हवी तेवढी किनार विकत घेऊन देतो. माझ्या माहितीचे दुकान आहे. वारेन्का, फक्त माझा पगार होईपर्यंत मला अवधी द्या. देवा रे देवा! खरेच श्रीयुत बीकोवबरोबर तुम्ही स्तेपमध्ये चाललात, कधीही परत येणार नाही? हाय! नाही, तुम्ही मला पत्र लिहा, सर्व गोष्टी पत्रात लिहा आणि निघून जाल तेव्हा तेथूनसुद्धा पत्र लिहा. अन्यथा, माझ्या आकाशातील देवदूता, माझ्याजवळचे पत्र अखेरचे ठरेल आणि ते अखेरचे ठरू नये. असे कसे शक्य आहे? अचानक– शेवटचे? मी तुम्हाला लिहीत राहीन आणि तुम्ही लिहा... आता माझी शैली आकार घेतेय... माझ्या प्राणा, शैलीचे काय महत्त्व! मी काय लिहितोय ते आता माझे मलाच समजत नाही, अजिबात कळत नाही, पुन्हा वाचत नाही, शैली सुधारत नाही, फक्त लिहितोय, तुम्हाला जास्तीत जास्त लिहितोय... माझ्या कबूतरा, माझ्या प्राणा, माझ्या लाडके!

श्वेतरात्री

एक भावनाप्रधान प्रेमकहाणी

(एका स्वप्नाळू माणसाच्या आठवणी)[23]

...तुझ्या काळजापाशी निदान
निमिषमात्र राहता यावे म्हणूनच
तो जन्माला आला होता का ? [24]

इ. तुर्गेनेव

रात्र पहिली

फार सुंदर रात्र होती, प्रिय वाचका, अशी रात्र आपण फक्त तरुणपणीच अनुभवतो. आकाशात एवढ्या तारका चमचमत होत्या, आकाश एवढे निरभ्र होते की, त्यावर नजर टाकल्यानंतर नकळत स्वतःच्या मनात प्रश्न उमटत होता : अशा आकाशाखाली वेगवेगळी चिडकी आणि लहरी माणसे कशी जगू शकतात ? प्रिय वाचका, हासुद्धा यौवनसुलभ प्रश्न आहे, फार यौवनसुलभ आहे, पण देव करो आणि असला प्रश्न तुमच्या मनाला वारंवार सतावत राहो ! ... सर्व प्रकारच्या लहरी आणि चिडक्या मंडळींबद्दल बोलताना, ह्या सबंध दिवसभरातील माझ्या स्वतःच्या आदर्श वर्तनाची आठवण मला अपरिहार्यपणे होते आहे. भल्या सकाळीच मला कसलीतरी आश्चर्यकारक हुरहूर छळू लागली. एकदम मला वाटू लागले की, मला एकाकी माणसाला सगळे सोडून जात आहेत, माझा सारेजण त्याग करीत आहेत. अर्थात तुम्हाला विचारण्याचा हक्क आहे : हे सगळे कोण ? कारण गेली तब्बल आठ वर्षे मी पीटरबुर्गमध्ये राहतोय, पण एकाही माणसाशी ओळख करणे मला जमलेले नाही. आणि ओळखी करायची मला गरजच काय ? त्याशिवाय आख्खे पीटरबुर्ग माझ्या ओळखीचे आहे, म्हणून सबंध पीटरबुर्ग जेव्हा सामानसुमान बांधून अचानक दाचाकडे* निघून गेले, तेव्हा मला भास झाला की, सगळे मला टाकून जात आहेत. एकटयाने राहण्याच्या कल्पनेने मी धास्तावून गेलो आणि आख्खे तीन दिवस अत्यंत विषण्णपणे शहरभर भटकत राहिलो. नक्की काय करावे याबाबत माझ्या मनाचा निर्णय होत नव्हता. नेवस्कीवर गेलो, बागेत गेलो, नदीकिनारीच्या रस्त्याने

---

*दाचा – गावाबाहेरील उन्हाळी निवासस्थान – अनु.

भटकलो — पण गेल्या वर्षभरात ठरल्या वेळी ठरीव ठिकाणी दिसणारा एकही माहितीचा चेहरा माझ्या नजरेला पडला नाही. अर्थात ती माणसे मला ओळखत नाहीत, पण मी मात्र त्यांना ओळखतो. त्यांची मला उत्तम ओळख आहे; त्यांच्या चेहऱ्यामोहऱ्याचा मी चक्क अभ्यास केला आहे — जेव्हा ती माणसे मजेत असतात तेव्हा मला आनंद होतो आणि जेव्हा ती कोमेजतात तेव्हा मी उदास बनतो. फोन्तान्कावर रोज ठरल्या वेळी भेटणाऱ्या एका म्हाताऱ्याशी माझी जवळजवळ ओळख झाली आहे. त्याचा चेहरा अगदी गंभीर आणि विचारमग्न असतो; सतत काहीतरी पुटपुटत असतो, डावा हात झटकत असतो आणि त्याच्या उजव्या हातात सोनेरी मुठीची लांब गाठाळ छडी असते. त्याचेही माझ्याकडे लक्ष वेधलेय आणि माझ्याबाबत त्याला कुतूहल वाटतेय. माझी खात्री आहे की, फोन्तान्कावर ठरल्या जागी ठरल्या वेळी मी जर त्याला दिसलो नाही, तर तो नक्की उदास होईल. म्हणून काही वेळा आम्ही एकमेकांना किंचित झुकून अभिवादन करतो, विशेषतः आम्हा दोघांचीही मनःस्थिती प्रसन्न असते तेव्हा. एकदा आम्ही पुरते दोन दिवस भेटलो नाही आणि तिसऱ्या दिवशी आमची भेट घडली, तेव्हा आम्ही डोक्यावरील टोप्या उचलून अभिवादन करण्याच्या बेतात होतो, पण वेळीच सावरून हात खाली घेतले व अंतःकरणात मूक सहानुभूती बाळगून एकमेकांजवळून चालत निघून गेलो. काही घरेही माझ्या ओळखीची आहेत. जेव्हा मी रस्त्यावरून चालत जात असतो, तेव्हा प्रत्येक घर जणू मला भेटायला किंचित पुढे येते, सर्व खिडक्यांमधून मला न्याहाळून पाहते आणि जवळजवळ मला म्हणते: "नमस्ते, तुमची प्रकृती कशी आहे? देवाच्या कृपेनं मी ठणठणीत आहे आणि मे महिन्यात माझ्यावर आणखी एक मजला चढणार आहे." किंवा: "आपली प्रकृती कशी आहे? उद्यापासून माझी दुरुस्ती सुरू होतेय." अथवा: "मला जवळजवळ आग लागली होती आणि मी भलता घाबरलो होतो." इत्यादी, इत्यादी. त्या घरांपैकी काही माझी आवडती आहेत आणि काही चांगले स्नेही आहेत. त्यांच्यापैकी एक घर ह्या उन्हाळ्यात वास्तुशिल्पज्ञाकडून उपचार करून घेणार आहे. त्याला काही अपाय होत नाही हे पाहण्यासाठी मुद्दाम रोज त्याला पहायला येण्याचा माझा इरादा आहे, देवा, त्याचे रक्षण कर! ... पण एका अत्यंत सुंदर, फिकट गुलाबी, दगडी घरकुलाची गोष्ट मी कधीही विसरणार नाही. ते माझ्याकडे एवढ्या प्रेमाने पहायचे, स्वतःच्या गबाळया शेजाऱ्यांकडे अशी तुच्छ नजर फेकायचे, की त्याच्याजवळून चालत जात असताना माझ्या

काळजात आनंद उचंबळून यायचा. पण गेल्या आठवड्यात रस्त्यावरून जाताना मी ह्या मित्राकडे नजर टाकली आणि अचानक तक्रारवजा किंचाळी कानांना ऐकू आली: "मला पिवळा रंग फासताहेत!" पशू! रानटी! त्यांनी काहीही सोडले नाही: ना खांब, ना नक्षीदार कंगोरे. माझा मित्र गाणाऱ्या पिवळ्या पक्ष्यासारखा पिवळाधमक बनला होता. मला अक्षरशः कावीळ झाल्याचा भास झाला आणि स्वर्गीय साम्राज्याचा रंग[25] फासून विद्रूप बनविण्यात आलेल्या माझ्या मित्राला पाहण्याचे मला आजवर परत धैर्य झालेले नाही.

तर प्रिय वाचक, अशा रीतीने सबंध पीटरबुर्गला मी ओळखतो.

मी आधी म्हटलेय की, आख्खे तीन दिवसपर्यंत माझा अनामिक हुरहुरीने छळ केला आणि मग तिचे कारण मला उमजले. रस्त्यावर माझी अवस्था फार वाईट बनली होती (तो नाही, हा नाही आणि त्याचे काय झाले?)—आणि घरातही मी थाऱ्यावर नव्हतो. दोन संध्याकाळी मी डोकेफोड करीत होतो: माझ्या घरात काय कमी पडतेय? कशामुळे त्यात मला रहावेसे वाटत नाही? उत्तर शोधण्यासाठी मी माझ्या हिरव्या, मळकट भिंतींवर नजर टाकली, मात्र्योनाच्या कृपेने भरघोस कोळीष्टके माजलेल्या छतावर पाहिले, सबंध फर्निचरवर नजर फिरवली; संकटाचे मूळ कदाचित खुर्च्यांमध्ये लपून बसले असेल अशा विचाराने प्रत्येक खुर्ची निरखून पाहिली. (कारण एकही खुर्ची जर कालच्याप्रमाणे आज उभी नसली तर मी बेचैन होतो). खिडकीकडेही कटाक्ष टाकला, पण सर्व व्यर्थ!... मनावरचा भार मुळीच कमी झाला नाही! मात्र्योनाला बोलावून कोळीष्टकांबद्दल आणि एकूण अस्वच्छतेबद्दल तिची वडीलधारेपणाने मी कानउघाडणीही केली, पण तिने माझ्याकडे फक्त आश्चर्याने पाहिले आणि एकही शब्द न बोलता ती निघून गेली. त्यामुळे अजूनपर्यंत कोळीष्टके निवांतपणे जागच्या जागी लोंबताहेत. अखेर आज सकाळी मला कारण उमजले. अरेच्चा! मला सोडून सगळी माणसे गावाबाहेर दाचाकडे धूम पळताहेत! ह्या गावढळ शब्दप्रयोगाबद्दल मला क्षमा करा, पण उदात्त शब्द मला सुचत नव्हते... कारण पीटरबुर्गमध्ये राहणारा प्रत्येकजण दाचाकडे धावत होता किंवा दाचाकडून येत होता. कारण घोडागाडी भाड्याने घेणाऱ्या प्रत्येक सभ्य गृहस्थामध्ये मला तात्काळ एक कुटुंबवत्सल पुरुष दिसत होता, जो दिवसभराचे काम आटोपून दाचावर राहणाऱ्या आपल्या कुटुंबाकडे लगबगीने पळत होता, कारण रस्त्यावरील प्रत्येक माणसाची मुद्रा आता एक विशिष्ट रूप-

धारण करून जणू म्हणत होती : "मंडळी, आम्ही इथं फक्त तात्पुरते आलो आहोत, पण दोन तासांनंतर दाचांवर निघून जाणार आहोत." एखादी खिडकी उघडली गेली आणि तिच्या तावदानावर प्रथम साखरेसारखी शुभ्र निमुळती बोटे टिचक्या वाजवीत असली व नंतर कुंडीमधील फुले घेऊन जाणाऱ्या विक्रेत्याला हाक मारायला सुंदर मुलीचे डोके त्या खिडकीतून बाहेर डोकावले, तर मला साक्षात्कार घडायचा की, शहरातील कोंदट गाळ्यात वसंताचा आणि फुलांचा आनंद लुटण्यासाठी माणसे ती फुले विकत घेत नव्हती. उलट लौकरच त्यांचा दाचावर मुक्काम हलायचा होता आणि तेथे त्या फुलांच्या कुंड्या नेण्यात येणार होत्या. शिवाय, माझ्या निरीक्षणाच्या नव्या आणि वैशिष्ट्यपूर्ण क्षेत्रात मी एव्हाना एवढी प्रगती केली होती की, अवघ्या एका कटाक्षात कोणता माणूस कोणत्या दाचात राहतो हे मी अचूकपणे सांगू शकत होतो. कामेन्नी अथवा आप्तेकार्स्की बेटांवरचे रहिवासी, किंवा पीटरहॉफ रस्त्यावरचे रहिवासी त्यांच्या अभ्यासपूर्ण डौलदार वागण्यामुळे, फॅशनेबल उन्हाळी पोषाखांमुळे आणि शहरात येणाऱ्या त्यांच्या सुरेख घोडागाड्यांमुळे वेगळे ओळखू येत. पार्गोलोवो आणि त्यापुढे राहणारे निवासी त्यांच्या बुद्धिमत्तेची आणि प्रतिष्ठितपणाची तात्काळ छाप पाडत. तर क्रेस्तोवस्की बेटावरचा रहिवासी त्याच्या बेगुमान उल्हसित चेहऱ्यामुळे ओळखू यायचा. टेबल, खुर्च्या, तुर्की दिवाण आणि तत्सम घरगुती सामानाने लादलेल्या व त्या ढिगाऱ्याच्या शिखरावर विराजमान होऊन आपल्या धन्याच्या वस्तूंची इमानाने राखण करणाऱ्या खप्पड स्वयंपाकीणबाईला वाहून नेणाऱ्या घोडागाड्यांशेजारून हाती लगाम धरून संथपणे चालणाऱ्या गाडीवानांची लांबचलांब रांग जर माझ्या दृष्टीला पडली, अथवा फर्निचर आणि भांड्यांनी लादलेल्या होड्या नेवामधून अथवा फोन्तान्कामधून चोर्नाया नदीकडे किंवा बेटांकडे तरंगत जाताना मी जर पाहिल्या, तर त्या घोड्यागाड्या आणि होड्या माझ्या डोळ्यांना दसपटींनी, शंभरपटींनी जास्त दिसत. मला भासू लागायचे की, सगळे उठून रस्ता चालू लागलेत, काफलेच्या काफले दाचांकडे निघालेत, खुद्द पीटरबुर्ग एक वैराण वाळवंट बनायचा धोका निर्माण झालाय. मग मला शरमेची, दुखावलेपणाची आणि दुःखाची भावना लपेटून गेली : दाचावर जाण्याचे मला मुळीच कारण नव्हते आणि तेथे जायला मला जागाही नव्हती. प्रत्येक घोडागाडीबरोबर, घोडागाडी भाड्याने घेणाऱ्या प्रत्येक सभ्य गृहस्थाबरोबर, जायला मी तयार होतो. पण कुणीही, अगदी कुणीही मला निमंत्रण देत नव्हते. जणू मला

विसरण्यात आले होते, जणू मी खरेच त्यांना परका होतो!

मी खूप वेळपर्यंत आणि खूप अंतर भटकलो. त्यामुळे सवयीनुसार मी माझे भान हरवले होते आणि अचानक शहराच्या वेशीपाशी मी थडकल्याचे ध्यानात आले. तात्काळ मी आनंदी बनलो, अडथळा ओलांडून हिरवी मैदाने आणि कुरणे तुडवीत गेलो, माझा थकवा मी विसरलो होतो. माझ्या काळजावरचे दडपण नाहीसे होत असल्याची सर्वांगातून मला जाणीव घडत होती. माझ्या जवळून घोडागाड्यांमधून जाणारे लोक माझ्याकडे स्नेहल कटाक्ष टाकीत होते, मला अभिवादन करीत होते, सर्वांना कसलातरी आनंद भारून टाकीत होता व प्रत्येकजण सिगार ओढीत होता. आणि मला पूर्वी कधीही झाला नव्हता अशा आनंदाने झपाटले. जणू मी एकदम इटालीत होतो – निसर्गाने असा माझ्यावर जबरदस्त प्रभाव पाडला होता. शहराच्या भिंतींआड जणू घुसमटून गेलेला असा मी अर्धआजारी नगरवासी होतो.

आमच्या पीटरबुर्गच्या निसर्गात काहीतरी शब्दातीत हृदयस्पर्शी सामावलेले आहे. जेव्हा वसंत सुरू होतो, तेव्हा निसर्ग पूर्णत्वाने स्वतःच्या सामर्थ्याचे दर्शन घडवितो; त्याला लाभलेल्या ईश्वरी देणग्यांचा वापर करून तो स्वतःला नटवितो, फुलांचा शृंगार करतो... काहीवेळा जिची तुम्ही करुणा करता, काहीवेळा सहानुभूतीदर्शक प्रेमाने जिच्याकडे पाहता आणि काहीवेळा, जिच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करता, पण अचानक एका क्षणी ती विलक्षण सुंदर आणि आकर्षक दिसू लागते, अशा आजारी, क्षयी मुलीची मला अशावेळी नकळत आठवण होते व स्तंभित होऊन अनाहूतपणे तुम्ही स्वतःला प्रश्न विचारता: ह्या खिन्न, विचारमग्न डोळयांमध्ये कोणत्या शक्तीपायी एवढे तेज फुललेय? ह्या पांढुरक्या, खप्पड गालांवर कशामुळे असा रक्तिमा चढलाय? ह्या नाजुक चेहऱ्यात कशामुळे एवढी सजगता आलीय? कशामुळे तिचे स्तन धपापताहेत? ह्या गरीब बिचाऱ्या मुलीच्या चेहऱ्यात कशामुळे एवढे सामर्थ्य, एवढा जिवंतपणा आणि एवढे सौंदर्य निर्माण झाले? कशापायी त्या चेहऱ्यावर असे स्मित उमटले, कशापायी असे चमकदार, खळाळते हास्य उमटले? तुम्ही सभोवार पाहता, कुणालातरी धुंडाळता, तर्क लढवू लागता... पण तो क्षण सरतो आणि कदाचित दुसऱ्याच दिवशी तुम्हाला परत पूर्वीसारखीच ती खिन्न आणि विचारमग्न नजर भेटते, तोच पांढुरका चेहरा दिसतो, हालचालींमध्ये तोच केविलवाणेपणा, भित्रेपणा आणि पश्चात्ताप आढळतो. एवढेच नव्हे तर त्या क्षणिक स्फूर्तीपायी उमटलेल्या रोगट खेदाच्या

आणि चिडीच्या खुणासुद्धा दिसतात... आणि तुम्हाला वाईट वाटते की, एवढ्या लौकर, पुन्हा कधीही परतू न शकणारे ते सौंदर्य कोमेजले, ते फसवे सौंदर्य निष्कारण तुमच्यासमोर चमकले – त्यावर प्रेम करायलाही तुम्हाला सवड लाभली नाही याबद्दल वाईट वाटते...

असे असले तरी माझी रात्र मात्र दिवसापेक्षा जास्त चांगली होती! अशी घडली हकीकत.

मी शहरात खूप उशीरा परतलो आणि माझ्या घरापाशी आलो तेव्हा एव्हाना दहाचे टोल पडले होते. माझी वाट कालव्याच्या किनाऱ्यालगत जात होती आणि ह्यावेळी त्या रस्त्यावर चिटपाखरू आढळत नाही. खरे आहे, मी शहराच्या दूर टोकाला राहतो. मी चालताना गाणे गात होतो, कारण जेव्हा मी आनंदात असतो, तेव्हा स्वतःच्या आनंदात वाटेकरी बनवायला ज्याला ना मित्र ना ओळखीची प्रेमळ माणसे असतात अशा प्रत्येक आनंदी माणसाप्रमाणे मी हमखास गाणे गुणगुणतो. एकाएकी माझ्याकडून एक अनपेक्षित साहस घडले.

थोड्या अंतरावर, कालव्याच्या कठड्याशी एक स्त्री उभी होती; कठड्याच्या जाळीला रेलून ती एकतानतेने कालव्यातील गढूळ पाण्याकडे पहात असल्याचे भासत होते. तिच्या डोक्यावर पिवळी सुरेख टोपी होती आणि अंगात छानदार काळा आखूड कोट होता. "ही तरुण मुलगी आहे आणि नक्की तिचे केस दाट तपकिरी रंगाचे आहेत," – माझ्या मनात विचार आला. असे दिसले की, माझ्या पावलांची चाहूल तिला लागली नव्हती आणि श्वास रोधून धपापत्या काळजाने जेव्हा मी तिच्याजवळून पुढे गेलो, तेव्हा ती किंचितही जागची हलली नव्हती. "आश्चर्य आहे," माझ्या मनात आले, "बहुधा ती कसल्यातरी विचारात पार गढलीय." आणि एकदम मी जागच्याजागी थिजून उभा राहिलो. मला अस्पष्ट हुंदके ऐकल्याचा भास झाला. होय! माझी चूक घडली नव्हती: ती तरुणी रडत होती आणि मिनिटभरानंतर जोरजोराने हुंदकू लागली होती. अरे देवा! माझे अंतःकरण पिळवटले. आणि एरवी मी बायकांना लाजत असलो, तरी आताचा क्षण आगळा होता!... मी मागे वळलो, तिच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले आणि सगळ्या उच्चभ्रू रशियन कादंबऱ्यांमधून हजारो वेळा तो उद्‌गार आधीच उच्चारला गेलाय हे मला माहीत नसते तर हमखासपणे मी उद्‌गारलो असतो: "बाईसाहेब!" केवळ त्यामुळेच मी थबकलो. पण जोवर मी योग्य शब्द शोधत होतो, तोवर ती तरुणी परत

भानावर आली होती, तिने सभोवार नजर टाकली, स्वत:ला सावरून घेतले, नजर खाली झुकवली आणि चटपट पावलांनी मला ओलांडून कालव्याकाठ-च्या रस्त्याने ती पुढे गेली. मी ताबडतोब तिचा पाठलाग धरला, पण तिने ते ओळखले व ती दुसऱ्या बाजूच्या पादपथावरून चालू लागली. रस्ता ओलांडण्याचा मला धीर झाला नाही. पकडलेल्या पाखराच्या काळजाप्रमाणे माझे काळीज फडफडले. पण अचानक एक घटना माझ्या मदतीला धावून आली.

दुसऱ्या बाजूच्या पादपथावर, त्या अनोळखी तरुणीपासून जवळच, एकाएकी एक फ्रॉक कोटातील भक्कम वयाचा गृहस्थ अवतरला. पण त्याची चाल मात्र भक्कम नव्हती. त्याचा चालताना झोक जात होता आणि भिंतीचा आधार घेऊन तो तोल सावरीत होता. रात्रीच्या वेळी कुणी सोबत देण्याचा प्रस्ताव मांडू नये असे वाटणाऱ्या सर्व तरुणींसारखी ही तरुणीही एखाद्या बाणाप्रमाणे वेगाने व चपळपणे चालू लागली होती. तो झोकांड्या खाणारा माणूस कधीच तिला गाठू शकला नसता, जर माझ्या नशीबाने त्याला आत्यंतिक उपायांचा आश्रय घेण्याची प्रेरणा दिली नसती. अचानक, एकही शब्द न बोलता, त्या गृहस्थाने पुढे झेप घेतली व त्या अनोळखी तरुणीला गाठण्यासाठी तो धावू लागला. ती वाऱ्यासारखी पळू लागली, पण झोकांडणारा गृहस्थ तिच्या अधिकाधिक जवळ जाऊ लागला, त्याने तिला गाठले आणि तरुणीने किंचाळी फोडली... आणि माझ्या हातात गाठाळ छडी होती याबद्दल मी दैवाचे शतशः आभार मानले. क्षणात मी रस्ता ओलांडला, दुसऱ्याच क्षणी त्या अनाहूत गृहस्थाला पुढे काय वाढून ठेवले होते ह्याची जाणीव झाली, छडीच्या अदम्य युक्तीवादाला त्याने स्वीकारले, मुकाटपणे माघार घेतली आणि जेव्हा आमच्या दरम्यान खूप अंतर निर्माण झाले, तेव्हा दमदार शब्दांमध्ये त्याने माझा निषेध केला. पण त्याचे शब्द आमच्यापर्यंत खचितच पोहोचले.

"तुमचा हात द्या", मी त्या अनोळखी तरुणीला म्हणालो, "आणि तो परत आपल्यापाशी येण्याची हिंमत करणार नाही."

मनातील खळबळीमुळे आणि भीतीमुळे अजून थरथर कापणारा हात तिने मुकाटपणे माझ्या हाती दिला. हे अनाहूत गृहस्था! ह्या क्षणाबद्दल मी तुझे किती आभार मानले त्यावेळी! मी हळूच तिच्याकडे तिरपा कटाक्ष टाकला. ती फार गोड होती आणि तिचे केस दाट तपकिरी रंगाचे होते. माझा अंदाज बरोबर ठरला होता. तिच्या काळ्याभोर पापण्यांवर अजून

अश्रू चमकत होते – नुकत्याच वाटलेल्या भीतीपायी अथवा अनुभवलेल्या दुःखापायी, कारण मला ठाऊक नाही. पण ओठांवर मात्र स्मित उमटले होते. तिनेसुद्धा माझ्याकडे चोरटा कटाक्ष फेकला, ती किंचित लाजली आणि तिने नजर खाली वळविली.

"पाहिलंत, तेव्हा तुम्ही मला का टाळलंत? जर मी तुमच्याबरोबर असतो, तर काहीही घडलं नसतं..."

"पण मी तुम्हाला ओळखत नव्हते, मला वाटलं, तुम्हीसुद्धा..."

"म्हणजे आता तुम्ही मला ओळखता?"

"थोडंसं. उदाहरणार्थ, तुम्ही कशामुळं थरथर कापता आहात?"

"अरेच्चा, तुम्ही ताबडतोब जाणलंत!" माझी तरुणी चतुर होती असे आढळताच आनंदून मी उत्तरलो. सौंदर्याच्या जोडीला चतुरपणा कधी अडथळा आणत नाही. "होय, तुमची कुणाशी गाठ पडलीय हे पहिल्याच कटाक्षात ओळखलंत. अगदी बरोबर, मी स्त्रियांना लाजतो आणि मिनिटभरापूर्वी त्या गृहस्थानं तुम्हाला घाबरवलं होतं तेव्हा तुम्ही जशा अस्वस्थ बनला होतात, तेवढाच आता मी अस्वस्थ आहे हे कबूल करतो... आत्ता मला कसल्यातरी भीतीनं घेरलंय. अगदी स्वप्नाप्रमाणं घडलंय, पण मी कधी स्वप्नातसुद्धा कल्पना केली नव्हती की, एखाद्या दिवशी मी कुणा एका स्त्रीबरोबर बोलेन."

"काय म्हणता? खरंच?"

"होय, जर माझा हात थरथर कापतोय, तर त्याचं कारण यापूर्वी कधीही तुमच्या हातासारखा सुरेख छोटा हात मी माझ्या हातात धरला नव्हता म्हणून. मला बायकांच्या सहवासाची अजिबात सवय नाही. म्हणजे मला त्यांची कधीच सवय नव्हती. मी अगदी एकटा आहे. बायकांशी कसं बोलायचं असतं हेसुद्धा मला ठाऊक नाही. आणि आत्तासुद्धा कसं बोलायचं ते माहीत नाही – मी तुम्हाला मूर्खासारखं काही बोललो तर नाही ना? मला अगदी सरळ स्पष्ट सांगा. मी खात्री देतो की, मी मुळीच अपमान वाटून घेणार नाही..."

"नाही, नाही, मुळीच नाही, अगदी त्याउलट. आणि मी स्पष्टवक्ती व्हावं अशी जर तुमची मागणी असेल, तर मी तुम्हाला सांगत्ये की, बायकांना असला लाजरेपणा आवडतो. आणि आणखी जाणून घ्यायचं असेल तर मलासुद्धा तुमचा लाजरेपणा आवडलाय आणि माझ्या घरापर्यंत मी तुम्हाला माझ्यापासून दूर ढकलणार नाही."

"तुम्ही माझ्याशी असं वागताय," अत्यानंदाने धापा टाकीत मी बोलू लागलो, "की माझा लाजरेपणा आता क्षणात नाहीसा होईल आणि मग माझा एकमेव ठेवा मी गमावून बसेन!.."

"ठेवा? कसला ठेवा? हा मात्र मूर्खपणा."

"माफ करा, चुकलं माझं! चुकून जिभेवरून शब्द निसटले, पण अशा क्षणी इच्छा होणार नाही असं कसं शक्य आहे..."

"आवडावं अशी इच्छा?"

"होय, मन उदार करा, देवाशपथ, मन उदार करा! विचार करा, कोण मी! माझं वय एव्हाना सव्वीस आहे, पण मी कुणालाही, कधीही भेटलेलो नाही. अशा परिस्थितीत चतुरपणं आणि सफाईदारपणं मी कसा बोलू शकणार? जेव्हा सगळं उघड, स्पष्टपणं मांडलं जाईल, तेव्हा तुमच्या दृष्टीनं फायदेशीर ठरेल... जेव्हा माझं काळीज आतमध्ये खळबळाट करतं, तेव्हा गप्प राहणं मला अशक्य ठरतं. काही फरक पडत नाही... तुम्ही विश्वास ठेवाल, एकही स्त्री नाही, कध्धी कध्धी नाही! एकही ओळख नाही! फक्त रोजच्या रोज स्वप्न पाहतो की, अखेरीस कधीतरी, कुणाला-तरी मी भेटेन. हाय, अशा रीतीनं मी किती वेळा प्रेमात पडलोय हे तुम्हा-ला समजलं तर!..."

"पण कसं? कुणाच्या प्रेमात?"

"कुणाच्याही नव्हे, आदर्श व्यक्तीच्या. स्वप्नात दिसणाऱ्या व्यक्तीच्या. माझ्या स्वप्नांमध्ये माझी सर्व प्रेमप्रकरणं आकार घेतात. तुम्ही मला ओळ-खत नाही! अर्थात माझी यापूर्वी दोन-तीन स्त्रियांशी गाठ पडलीय, पण त्या कसल्या बायका? त्या तसल्या गृहिणी... तुम्ही हसाल आता मी जे काही सांगणार आहे ते ऐकून. एखादी उच्चकुलीन स्त्री रस्त्यात एकटी असेल तर तिच्याशी सहज संभाषण सुरू करण्याबाबत मी अनेकदा बेत योजले. अर्थात तिच्याशी मी भीत भीत आदरानं आणि मनःपूर्वक बोललो असतो. सांगितलं असतं की, एकटेपणापायी मी मरतोय, तिनं मला दूर ढकलू नये आणि कुणा स्त्रीशी ओळख करण्याची माझ्यापाशी काहीही साधनं नाहीत. तिची खात्री पटवून दिली असती की, माझ्यासारख्या दुर्दैवी माण-साची भित्री आर्जवं ऐकून घेणं एक स्त्री ह्या नात्यानं तिचं कर्तव्य होतं. आणि सरतेशेवटी मी तिच्यापाशी एवढीच मागणी करत होतो की, तिनं माझ्याशी भगिनीच्या सहानुभूतीनं दोन-तीन शब्द बोलावेत, मला तात्काळ दूर लोटू नये, तर माझं बोलणं खरं मानावं, माझं म्हणणं ऐकून घ्यावं,

तिला आवडत असेल तर खुशाल तिनं मला हसावं, पण मला काही आशा दाखवावी आणि आम्ही परत कधीही कदाचित भेटणार नसलो, तरी माझ्याशी निदान चार शब्द बोलावेत! ... तुम्ही मला हसता आहात... त्यासाठीच तर मी तुम्हाला हे सगळं ऐकवतोय..."

"वाईट वाटून घेऊ नका, मी एवढ्याचसाठी हसतेय की तुम्हीच तुमचे शत्रू आहात आणि जर तुम्ही प्रयत्न केला असतात तर कदाचित तुम्हाला यश आलं असतं, जरी ती गोष्ट रस्त्यावर घडली असती तरी! जेवढं साधं तेवढं जास्त चांगलं... प्रेमळ मनाच्या एकाही स्त्रीनं, जर ती मूर्ख नसेल आणि त्या विशिष्ट क्षणाला कुठल्यातरी कारणामुळं रागावलेली नसेल, तर ज्या दोन-तीन शब्दांसाठी तुम्ही एवढी भीत भीत विनवणी करता आहात ते शब्द तुमच्याशी बोलल्याविना तिनं तुम्हाला मुळीच दूर पाठवलं नसतं... पण हे मी काय बडबडतेय! अर्थात ती तुम्हाला वेडपट समजली असती. मी स्वत:वरून सांगत्येय. ह्या जगात माणसं कशी वागतात ह्याचं माझं ज्ञान तोकडं आहे!"

"मी तुमचा आभारी आहे," मी ओरडलो. "तुम्ही आत्ता माझ्यासाठी काय केलंत ह्याची तुम्हाला कल्पना नाही!"

"ठीक, ठीक! पण मला सांगा, तुम्हाला कसं माहीत झालं की, मी तसली बाई आहे, जिच्याशी... अं... जी तुमच्या अवधानाला आणि मैत्रीला लायक आहे... थोडक्यात म्हणजे तुमच्या शब्दात गृहिणी नव्हे. माझ्याजवळ येण्याचा निर्णय तुम्ही का घेतलात?"

"का? का? अहो, तुम्ही एकटचा होतात, तो गृहस्थ फारच धाडसी होता, शिवाय रात्रीची वेळ. तुम्ही मान्य करा की, हे कर्तव्य होतं..."

"नाही, नाही त्यापूर्वी, तिथं, रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला. माझ्याजवळ येण्याचा त्यावेळी तुमचा इरादा होता ना?"

"तिथं, रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला? खरं सांगायचं तर कसं उत्तर द्यावं ते मला समजत नाही. मला भीती वाटते... तुम्हाला माहीत आहे, आज मी खूप सुखात होतो. मी चालता चालता गात होतो. मी शहराबाहेर फिरायला गेलो होतो. असे सुखाचे क्षण यापूर्वी मी कधीही अनुभवले नव्हते. तुम्ही... कदाचित मला भास झाला असेल... तुम्हाला परत त्या गोष्टीची आठवण करून देतो त्याबद्दल माफ करा: मला भास झाला की, तुम्ही रडत होतात आणि मी... मला ते ऐकणं अशक्य झालं... माझं काळीज पिळवटलं... देवा रे! तुमच्यासाठी मी शोक करू शकत नव्हतो काय!

तुमच्यासाठी भावाच्या नात्यानं अनुकंपा वाटून घेणं पाप होतं काय? माफ करा, मी अनुकंपा म्हणालो... थोडक्यात, तुमच्यापाशी येण्याच्या माझ्या नकळत प्रेरणेपायी मी तुमचा अपमान केला असता काय?.."

"थांबा, खूप झालं, नका बोलू," नजर खाली वळवून आणि माझा हात दाबून तरुणी म्हणाली. "माझाच दोष की, मी हा विषय उकरून काढला. पण मला आनंद झालाय की, तुमच्याबाबतचा माझा अंदाज चुकला नाही... अगबाई, माझं घर आलं. मला ह्या गल्लीत जायला पाहिजे. इथं दोन पावलांवर... अच्छा, तुमची आभारी आहे..."

"म्हणजे खरंच, खरंच आपण परत कधी एकमेकांना भेटणार नाही?... खरंच, एवढ्यावर हे सारं संपणार?"

"पाहिलंत," हसून तरुणी म्हणाली, "आरंभी तुम्ही फक्त दोन शब्दांची मागणी करत होतात आणि आता... पण मी तुम्हाला काही सांगत नाही... कदाचित, भेट होईल परत आपली..."

"मी इथं उद्या येईन," मी म्हणालो. "अरेच्चा, माफ करा, मी एव्हाना हक्कानं मागणी करायला लागलोय..."

"होय, तुम्ही फार अधीरे आहात... हक्कानं मागणी करायला लाग-लात..."

"माझं जरा ऐका!" मी तिचे बोलणे अर्ध्यात तोडले. "मला क्षमा करा, जर परत मी तसंच काही वावगं बोललो तर... असं आहे: उद्या इथं न येणं मला अशक्य आहे. मी स्वप्नाळू आहे. माझं प्रत्यक्ष आयुष्य फार कमी आहे, असे क्षण मला फार क्वचित लाभतात आणि त्यांचा माझ्या स्वप्नांमध्ये पुन:पुन्हा अनुभव न घेणं माझ्या ताकदीपलिकडचं आहे. तुमच्याबद्दल मी सबंध रात्र, सबंध आठवडा, आख्खं वर्ष स्वप्न पाहीन. उद्या मी हमखास इथं येईन, नेमका ह्याच जागी येईन, ह्याच वेळेला येईन आणि कालच्या आठवणींनी आनंद अनुभवीन. एव्हाना ही जागा मला प्रिय बनलीय. पीटरबुर्गमध्ये माझ्या अशा दोन-तीन प्रिय जागा आहेत. एकदा तर आठवणींपायी मी रडलो होतो, तुमच्यासारखा... कोण जाणे, कदा-चित तुम्हीसुद्धा दहा मिनिटांपूर्वी कुठल्यातरी आठवणींपायी रडत होतात... मला माफ करा, मी परत विसरलो. कदाचित तुम्ही कधीतरी इथं खूप आनंद अनुभवला असेल..."

"ठीक आहे," तरुणी म्हणाली, "मला वाटतं, मी उद्या इथं येईन, दहा वाजताच. मला दिसतंय की, मी आता तुम्हाला इथं येण्याची मनाई

करू शकत नाही... मुद्दा असा की, मला इथं आलंच पाहिजे. मात्र मी तुमच्याशी संकेतभेट ठरवलीय असं समजू नका. मी आधीच तुम्हाला बजावते की, मला स्वत:साठी इथं येणं आवश्यक आहे. तर असं... मी तुम्हाला स्पष्ट सांगत्ये : तुम्ही जर आलात तर मला त्याचं काही विशेष वाटणार नाही. पहिली गोष्ट म्हणजे आजच्याप्रमाणं काही अप्रिय प्रसंग घडण्याची शक्यता आहे, पण तो विषय वेगळा... थोडक्यात, तुम्हाला पाहण्याची माझी केवळ इच्छा आहे... म्हणजे तुमच्याशी दोन शब्द बोलण्याची. पण आता तुम्ही कठोरपणं माझी परीक्षा घेणार नाही ना? एवढ्या सहजपणं मी संकेतभेट ठरवली म्हणून गैरसमज वाटून घेऊ नका... मी तशी भेट ठरवली नसती, जर... पण ते माझं गुपित राहू दे! मात्र त्याआधी एक अट..."

"अट! बोला, सांगा, सगळं आधी सांगा. मला सर्व अटी मान्य, सगळ्याला मी सज्ज," मी अत्यानंदाने ओरडलो, "मी स्वत:ला जबाबदार राहीन, आज्ञाधारक राहीन, आदर दाखवीन... तुम्ही मला ओळखता..."

"म्हणूनच, तुम्हाला ओळखत्ये म्हणूनच मी उद्या येण्याचं निमंत्रण देत्येय," हसून तरुणी म्हणाली. "मी तुम्हाला पूर्ण जाणत्येय. मात्र एका अटीवर या (मात्र कृपा करून मी जसं सांगीन तसं वागा – पहा, मी प्रांजलपणं सांगत्येय), माझ्या प्रेमात पडू नका... तसं घडून चालणार नाही, मी तुम्हाला खात्रीनं सांगत्येय. पण मैत्रीला मी तयार आहे, हा घ्या हात माझा... पण कृपा करून माझ्या प्रेमात पडू नका!"

"प्रतिज्ञापूर्वक सांगतो," मी ओरडलो आणि तिचा हात गच्च धरला.

"पुरे, प्रतिज्ञा करू नका, कारण तुम्ही दारूच्या भुकटीप्रमाणं पेट घ्याल हे मला ठाऊक आहे. मी असं बोलत्ये म्हणून गैरसमज करून घेऊ नका. जर तुम्हाला समजलं... माझंसुद्धा कुणीही नाही, ज्याच्याबरोबर दोन शब्द बोलू शकते, ज्याचा सल्ला घेऊ शकते. अर्थात सल्लागारांना कुणी रस्त्यावर शोधत फिरत नाही. पण तुम्ही अपवाद. मी तुम्हाला एवढी ओळखत्येय की, जणू गेली वीस वर्षं आपली मैत्री आहे... तुम्ही खरंच विश्वासघात करणार नाही ना?"

"तुम्ही पहालच... मात्र एक दिवसाचा अवधी मी कसा तग धरीन कुणास ठाऊक!"

"गाढ झोपा. शुभरात्री – आणि आठवण ठेवा की, एव्हाना मी तुमच्यावर विश्वास ठेवलाय. किती छान बोललात तुम्ही : प्रत्येक भावनेला, भावाला

वाटणाऱ्या अनुकंपेलासुद्धा, उत्तर देण्याची गरज आहे काय? तुम्हाला ठाऊक आहे, तुम्ही इतकं छान बोललात की, त्याच क्षणाला तुम्हाला विश्वासात घेऊन काही सांगण्याचा विचार माझ्या मनात पक्का झाला..."

"खुशाल सांगा, पण काय?"

"उद्या सांगीन. तोवर हे गुपित राहू दे. तुमच्या दृष्टीनं ते अधिक चांगलं. निदान कल्पनेत रोमांचक वाटेल. कदाचित मी उद्याच तुम्हाला ते गुपित सांगीन, कदाचित सांगणारही नाही... मी आधी तुमच्याशी आणखी बोलीन, आपण चांगल्या रीतीनं एकमेकांचा परिचय करून घेऊ..."

"ठीक, मी उद्याच माझ्याबद्दलची सर्व हकीकत तुम्हाला सांगीन! अरे, हे काय? जणू माझ्या जीवनात चमत्कार घडतोय... देवा रे, मी कुठं आहे? पण मला सांगा, दुसऱ्या एखाद्या बाईप्रमाणं तुम्ही माझ्यावर चिडला नाहीत आणि मला हाकलून लावलं नाहीत, ह्याबद्दल तुम्ही नाखूष तर नाहीत ना? अवघ्या दोन मिनिटांमध्ये तुम्ही मला कायम सुखी बनवलंत. होय! सुखी केलंत! कोण जाणे, कदाचित तुम्ही माझा माझ्याशी समेट घडवून दिलात, माझ्या शंकांचं निरसन केलंत... कदाचित मला तसल्या क्षणांचा लाभ होतोय... खरंच, मी उद्या तुम्हाला सगळं सांगीन, तुम्हाला सारं सारं माहीत होईल..."

"ठीक, ऐकीन मी. तुम्ही सुरवात करायची..."

"मान्य!"

"भेटू पुन्हा!"

"पुन्हा भेटू!"

आणि आम्ही पांगलो. मी सबंध रात्र भटकत होतो. घरी परत जाण्याची इच्छा होत नव्हती. मी खूप सुखात होतो... उद्यापर्यंत!

रात्र दुसरी

"पहा, तुम्ही अजून जिवंत आहात!" ती मला हसून म्हणाली आणि तिने स्नेहभराने माझे दोन्ही हात दाबले.

"मी इथं दोन तास उभा आहे. दिवसभर माझी काय अवस्था होती हे तुम्हाला ठाऊक नाही!"

"माहीत आहे, माहीत आहे... पण आता मुद्द्याचं बोलू. ठाऊक आहे, कशाला मी आल्ये? कालच्याप्रमाणं फालतू वटवट करायला नव्हे. तर असं: आपण पुढं शहाणपणानं वागलं पाहिजे. या सर्व गोष्टींबद्दल काल मी खूप वेळपर्यंत विचार केला."

"कशाबद्दल, कशा रीतीनं आणखी शहाणं वागायचं? माझ्या बाजूनं मी जय्यत तयार आहे. पण खरं सांगायचं तर माझ्या आयुष्यात आत्तापेक्षा शहाणी गोष्ट यापूर्वी कधीही घडलेली नाही."

"खरंच? प्रथम म्हणजे मी विनंती करत्ये की, एवढ्या जोरानं माझे हात दाबू नका आणि दुसरं म्हणजे तुम्हाला जाहीर करत्ये की, तुमच्याबद्दल आज मी खूप वेळपर्यंत विचार केला."

"आणि कोणत्या निष्कर्षाला आलात?"

"कोणत्या निष्कर्षाला आल्ये? निष्कर्ष असा काढला की, परत आरंभापासून सगळं सुरू केलं पाहिजे, कारण आज मला जाणीव झाली की तुम्ही मला अजून मुळीच ठाऊक नाहीत, काल मी अगदीच पोरकट तरुणीप्रमाणं वागल्ये आणि त्याचा दोष माझ्या उदार अंतःकरणाकडं जातो. म्हणजे आपण नेहमी स्वतःच्या कृतींचं विश्लेषण करायला लागतो तेव्हा त्याची परिणती ज्या रीतीनं होते तशीच झाली: मी स्वतःची स्तुती केली. आणि माझी ही चूक दुरुस्त करण्यासाठी, तुमच्याबद्दलचा बारीकसारीक तपशीलसुद्धा माहीत करून घेण्याचं मी ठरवलंय. पण चौकशी करायला दुसरं कुणीही उपलब्ध नाही, म्हणून तुम्हीच मला तुमच्या गुपितांसह सर्व काही सांगितलं पाहिजे. तुम्ही कोणत्या प्रकारचे इसम आहात? लौकर—स्वतःची कहाणी सांगायला सुरुवात करा ना!"

"कहाणी!" मी घाबरून ओरडलो. "कहाणी! कुणी तुम्हाला सांगितलं की, माझ्यापाशी माझी कहाणी आहे? मला कहाणी नाही..."

"जर कहाणी नाही तर जगलात कसे?" हसून तिने मध्येच विचारले.

"अगदी कोणतीही कहाणी नाही! अगदी सरळ स्वतःसाठी जगलो, मी पूर्ण एकटा आहे—म्हणजे अगदी एकाकी—एकटा म्हणजे काय तुम्हाला समजतं?"

"पण एकटा म्हणजे कसं? म्हणजे तुम्ही कध्धी कध्धी कुणाला पाहिलं नाही?"

"तसं नव्हे, दिसायचं ते दिसतं, पण तरीही मी एकटाच!"

"म्हणजे तुम्ही कुणाहीबरोबर बोलत नाहीत?"

"अगदी काटेकोर अर्थानं—कुणाहीबरोबर नाही."

"मग तुम्ही आहात तरी कोण, समजावून सांगा! थांबा, मी अंदाजानं सांगत्ये: तुमची बहुधा आजी आहे, जशी मला एक आजी आहे. ती आंधळी आहे आणि आख्खं आयुष्यभर ती मला कुठंही सोडत नाही, त्यामुळं माझी बोलायची सवयच विसरलीय. आणि दोन वर्षांपूर्वी जेव्हा मी वात्रट वागल्ये, मला डांबून ठेवणं अशक्य होतं असं जेव्हा तिच्या ध्यानात आलं, तेव्हा तिनं मला स्वतःपाशी बोलावून घेतलं आणि माझा फ्रॉक तिच्या फ्रॉकशी सेफ्टी पिन लावून अडकवून टाकला. तेव्हापासून आजपर्यंत सबंध दिवसभर आम्ही तशा बसून राहतो. ती आंधळी असली तरी पायमोजे विणत्ये आणि मला तिच्याशेजारी बसून शिवणकाम करावं लागतं अथवा पुस्तक मोठ्यांदा वाचून दाखवावं लागतं. अशी विचित्र रीत पडलीय—आख्खी दोन वर्षं कुणाशीतरी पिननं जखडून रहायची..."

"अरे बापरे, केवढं दुर्भाग्य! नाही बुवा, माझी असली आजी नाही."

"जर नाही, तर मग तुम्ही घरात बसून कसे राहता?"

"ऐका, मी कोण हे तुम्हाला जाणून घ्यायचंय?"

"होय, होय!"

"अगदी काटेकोर अर्थानं?"

"अगदी पूर्ण काटेकोर अर्थानं!"

"ठीक आहे. मी एक नमूना आहे."

"नमूना, नमूना! कोणता नमूना?" जणू काही वर्षभर हसायला मिळाले नाही अशा रीतीने खो खो हसत तरुणीने विचारले. "खरंच, तुमच्याबरोबर गंमत आली! पहा, इथं एक बाकडं आहे, त्यावर बसूया! इथं कुणीही फिरकत नाही, आपलं बोलणं कुणीही ऐकणार नाही आणि—सुरू करा ना तुमची कहाणी! कारण एव्हाना माझी खात्री पटलीय की, तुम्हाला कहाणी आहे, पण तुम्ही ती लपवता आहात. प्रथम सांगा, हा नमूना म्हणजे काय?"

"नमूना? नमूना—हा अस्सल, विचित्र माणूस!" तिच्या बालीश हसण्यात सामील होत मी उत्तरलो. "हा एक स्वभाव आहे. ऐका: स्वप्नाळू म्हणजे कोण माहीत आहे?"

"स्वप्नाळू! कमाल आहे, कुणाला माहीत नाही? मी स्वतः स्वप्नाळू आहे! आजीपाशी बसून राहत्ये तेव्हा टाळक्यात भलभलत्या कल्पना येत असतात. अशी स्वप्नांची सुरवात होते आणि विचार येतो—चिनी राजपुत्राशी

मी लग्न करत्येय... काहीवेळा स्वप्नं पाहण्यात मजा येत्ये! पण नाही, देवाला माहीत! विशेषत: त्याशिवाय दुसरी एखादी विचार करण्यासारखी गोष्ट असते तेव्हा," ह्यावेळी तरुणी शेवटचे वाक्य काहीशा गंभीरपणे म्हणाली.

"उत्तम! जर तुम्ही चिनी राजपुत्राशी लग्न केलेलं पाहिलंत, तर मला पूर्णपणं समजून घ्याल. हे पहा... खरंच, अजून मला माहीत नाही, तुमचं नांव काय?"

"अखेर! खूप लौकर आठवण झाली!"

"अरे देवा! तो विचारच माझ्या डोक्यात शिरला नाही. त्याशिवाय-सुद्धा मी मजेत होतो..."

"माझं नांव–नास्त्येन्का."

"नास्त्येन्का! एवढंच?"

"एवढंच! लोभी माणसा, तुम्हाला एवढं पुरेसं नाही?"

"पुरेसं? खूप, खूप त्याउलट फारच! नास्त्येन्का, तुम्ही फार उदार तरुणी आहात, त्यामुळं सरळ प्रथमपासूनच नास्त्येन्का अशी हाक मारायची तुम्ही मला परवानगी दिलीत!"

"बरं, बरं! पुढं!"

"पुढं असं, नास्त्येन्का, ऐका, अशी आहे माझी विचित्र कहाणी."

मी तिच्यापाशी बसलो, गंभीर पंडिताचा आव आणला आणि जणू पाठ केलेला परिच्छेद म्हणून दाखवावा तशी सुरुवात केली:

"तुम्हाला माहीत नसेल, नास्त्येन्का, पण ह्या पीटरबुर्गमध्ये काही खूप विचित्र कोपरे आहेत. सबंध पीटरबुर्गवर तळपणारा सूर्य ह्या स्थळी जणू डोकावूनसुद्धा पहात नाही. तेथे दुसराच, नवा सूर्य असतो. जणू ह्या कोपऱ्यांसाठी मुद्दाम ऑर्डर देऊन मागविलेला आणि त्याचा प्रकाश वेगळाच असतो. लाडक्या नास्त्येन्का, ह्या कोपऱ्यांमध्ये अगदी वेगळे आयुष्य भासते, आपल्याभोवतालच्या खदखदणाऱ्या आयुष्याशी त्याचे मुळीच साम्य नसते. कदाचित तसे आयुष्य एखाद्या अद्भुत राज्यात असू शकेल, पण आपल्या ह्या अत्यंत गंभीर काळातल्या पृथ्वीवर मात्र नक्कीच नव्हे. ह्या आयुष्यात विशुद्ध अद्भुतता आणि तप्त आदर्शवादाचे मिश्रण आहे, पण त्याचवेळी (हाय, नास्त्येन्का!) अत्यंत सुमार आणि सामान्यपणाही सामावला आहे. आत्यंतिक ठराविकपणाबद्दल तर बोलायलाच नको."

"छी :! देवा रे देवा! काय ही प्रस्तावना! आता यापुढं मला काय ऐकावं लागणार?"

"तुम्ही ऐका नास्त्येन्का (मला वाटतं, तुम्हाला नास्त्येन्का अशा हाका मारायला मी कधीही दमणार नाही), ऐका तुम्ही, ह्या कोपऱ्यांमध्ये विचित्र माणसं राहतात—स्वप्नाळू. अशा स्वप्नाळू माणसाची नेमकी व्याख्या करायची, तर तो माणूस नव्हे, कुठलातरी मधल्या प्रकारचा प्राणी आहे. हा प्राणी बहुधा एखाद्या दुर्गम कोपऱ्यात मुक्काम टाकतो, जणू दिवसाच्या प्रकाशापासून तो दडू पाहतो. आणि एकदा तो स्वतःच्या कोपऱ्यात स्थिरावला म्हणजे गोगलगायीप्रमाणं अथवा घर आणि प्राणी एकाच ठिकाणी असणाऱ्या कासव नामक मनोरंजक प्राण्याप्रमाणं त्या कोपऱ्याशी त्याचा लोभ जडतो. त्याला त्याच्या चार भिंती एवढ्या का आवडतात, ज्यांना हमखासपणं हिरवा रंग फासलेला असतो? त्या कळकट, भयाण, धुराची काजळी चढलेल्या भिंतींचा त्याला एवढा का लळा असतो असं वाटतं तुम्हाला? आणि हा विचित्र गृहस्थ, जेव्हा त्याच्या मोजक्याच ओळखीच्या लोकांपैकी कुणी एखादा भेटायला येतो (सरतेशेवटी कुणीही त्याच्या ओळखीचा उरत नाही), हा विचित्र माणूस त्या पाहुण्याचं गोंधळलेल्या मनःस्थितीत स्वागत का करतो? जणू त्या चार भिंतींआड त्यानं नुकताच एखादा गुन्हा केलाय, अथवा तो खोटया नोटा छापत होता, किंवा खुद्द कवी जिवंत नाही, पण त्याच्या मित्राला त्याच्या कविता प्रसिद्ध करणं पवित्र कर्तव्य वाटतंय अशी निनावी चिठी जोडून काही कविता रचून एखाद्या मासिकाला पाठवण्याच्या बेतात होता, असा तो शरमिंदा का दिसतो? त्याचा चेहरा एवढा आक्रसलेला का दिसतो? सांगा मला, नास्त्येन्का, त्या दोघांमध्ये संभाषणाचा सूर का जुळत नाही? एरवी हसायची आणि चतुर शेरे मारण्याची आवड असलेल्या, स्त्रियांबद्दल चर्चा करायची आणि इतर आनंदी विषयांवर बडबडायची सवय असलेल्या त्या बुचकळयात पडलेल्या मित्राकडून ना हसू ऐकू येतं ना चतुर शेरा ऐकू येतो, असं का? हा मित्र, जो नुकताच ओळखीचा झालाय आणि पहिल्यांदाच भेटायला येतोय—कारण पुन्हा असा प्रसंग घडणार नाही आणि मित्र दुसऱ्यांदा येणार नाही—हा संभाषणचतुर (जर हे चातुर्य त्याच्यापाशी असेल) मित्र त्याच्या यजमानाच्या चेहऱ्यावर बेचैन भाव पाहताच एवढा गोंधळून का जातो, त्याच्या जिभेला लगाम का बसतो? त्याउलट त्याचा यजमान संभाषणातील मोकळया जागा भरून काढण्याच्या आणि संभाषणाला तजेला आणण्याच्या शूर पण व्यर्थ प्रयत्नांपायी पुरता भांबावून

जातो आणि सर्व सुसंबद्धता गमावून बसतो. सामाजिक उपचारांमध्ये आपण पारंगत आहोत असं दाखवण्याचा तो यत्न करतो, स्त्रियांविषयी काही शेरे मारतो आणि चुकीनं त्याच्या भेटीला आलेल्या माणसाला निदान तो प्रिय वाटावा अशी धडपड का करतो? अचानक एका महत्त्वाच्या आणि प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या भेटीची आठवण करून पाहुणा झटकन टोपी खेचून लगबगीनं उठतो, यजमानाच्या घट्ट पकडीतून स्वतःचा हात सोडवून का घेतो? दरम्यान यजमान आपला खेद प्रदर्शित करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो, परिस्थिती सावरण्याचा आणि सुधारण्याचा प्रयत्न करतो, असं का? खोलीतून बाहेर पडताच त्याचा पाहुणा खो खो हसत सुटतो, ह्या विचित्र माणसाकडं परत कधीही भेटीला यायचं नाही अशी तिथल्यातिथं शपथ घेतो — वस्तुतः हा विचित्र माणूस फार छान आहे; मात्र स्वतःच्या कल्पनाशक्तीला छोटचा खेळात रमण्यास तो त्याचवेळी मनाई करू शकत नाही. म्हणजे सबंध संभाषणभर आपल्या नुकत्याच परिचयाच्या झालेल्या त्या माणसाच्या चेहऱ्याची निदान दूरत्वानं का होईना पण मांजरीच्या गरीब बिचाऱ्या पिलाच्या चेहऱ्याशी तुलना करण्याचा खेळ. लहान मुलांनी दुष्टपणानं बंदिवान केलेल्या, हरतऱ्हांनी दहशती घातलेल्या आणि छळलेल्या, त्या छळापासून सुटका करून घेण्यासाठी खुर्चीखाली सरपटत जाऊन लपून बसलेल्या, सबंध तासभर अंगावरचे केस फुलवत शिंकणाऱ्या, दोन्ही पंजांनी स्वतःचा चेहरा स्वच्छ करणाऱ्या, त्यानंतर आणि एकूण प्रदीर्घ काळपर्यंत सबंध जगावर वैरभावनेनं पाहणाऱ्या, एवढंच नव्हे तर त्याच्यासाठी प्रेमळ मोलकरणीनं ठेवलेल्या खाद्यपदार्थांच्या तुकड्यांकडेही संतापानं पाहणाऱ्या मांजरीच्या पिलाच्या चेहऱ्याशी त्या नवपरिचिताच्या चेहऱ्याची तुलना करण्याच्या खेळात तो रमतो, असं का?"

"ऐका," सारा वेळ आश्चर्याने डोळे विस्फारून आणि आ वासून माझे बोलणे ऐकणाऱ्या नास्त्येन्काने माझ्या बोलण्यात खंड पाडला, "ऐका: हे असं का घडलं ह्याची मला मुळीच कल्पना नाही आणि तुम्ही मला असले विचित्र प्रश्न का विचारता आहात हेही समजत नाही. पण एवढं मात्र निश्चित माहीत आहे की, आरंभापासून अखेरीपर्यंत ह्या सगळ्या गोष्टी तुमच्याच बाबतीत घडल्या आहेत."

"निःसंशयपणं," अत्यंत गंभीर चर्येने मी उत्तरलो.

"तसं असेल तर पुढं बोला," नास्त्येन्का म्हणाली, "कारण ह्या सगळ्याची अखेर काय झाली ते जाणून घ्यायची माझी फार इच्छा आहे."

"नास्त्येन्का, तुम्हाला जाणून घ्यायचंय की, आपला नायक स्वतःच्या कोपऱ्यात काय करत होता, अथवा मी काय करत होतो, कारण आपल्या कहाणीचा नायक मीच दस्तुरखुद्द नम्र महाशय; माझ्या मित्राच्या अनपेक्षित भेटीमुळं मी बावरून का गेलो आणि सबंध दिवसभर माझं चित्त ठिकाणावर का राहिलं नाही, हे तुम्हाला जाणून घ्यायचंय? दार अचानक उघडलं तेव्हा मी एवढा का दचकलो, माझा चेहरा लाल का बनला, माझ्या पाहुण्याचं योग्य स्वागत करायला मी असमर्थ का ठरलो आणि माझ्या स्वतःच्या पाहुणचाराच्या ओझ्याखालीच मी का दडपून गेलो, हे तुम्हाला जाणून घ्यायचंय?"

"होय, होय!" नास्त्येन्का उत्तरली. "हेच मला जाणून घ्यायचंय. ऐका: तुम्ही फार सुंदर निवेदन करता, पण एवढ्या सुंदर रीतीनं निवेदन केलं नाही तर चालणार नाही का? तुमचं बोलणं म्हणजे पुस्तकाचं वाचन भासतं."

"नास्त्येन्का," हसण्याची ऊर्मी कशीबशी दाबून मी गंभीर आणि खंबीर आवाजात म्हणालो, "लाडक्या नास्त्येन्का, मला माहीत आहे की मी फार सुंदर निवेदन करतो, पण माफ करा, मी दुसऱ्या रीतीनं कथन करूच शकत नाही. आता, लाडक्या नास्त्येन्का, सात वेळा मोहोरबंद केलेल्या कुंभामधून मुक्त झालेल्या राजा सालोमनच्या आत्म्यासारखी माझी आता स्थिती आहे. आता, लाडक्या नास्त्येन्का, आपल्या प्रदीर्घ विरहानंतर आपली पुनर्भेट आहे—कारण मी तुम्हाला खूप पूर्वीपासून ओळखतो, नास्त्येन्का, कारण मी खूप पूर्वीपासून कुणाचा तरी शोध घेतोय आणि मी नेमका तुम्हालाच शोधत होतो, आपली ही भेट पूर्वलिखित होती ह्याची ही खूण आहे—आता माझ्या डोक्यात हजारो झडपा उघडल्यात आणि शब्दांचे धो धो प्रवाह मी सोडले पाहिजेत, अन्यथा मी घुसमटून जाईन. तेव्हा कृपया माझ्या बोलण्यात खंड पाडू नका, नास्त्येन्का, नम्रपणं आणि लक्षपूर्वक माझं बोलणं ऐका, नाही तर मी चूप राहतो."

"नाही, नाही, नाही! बोला! आता मी तोंडून चकार शब्द काढणार नाही."

"पुढं सांगतो: माझ्या सखे नास्त्येन्का, माझ्या दिवसात असा एक तास आहे, ज्यावर माझं आत्यंतिक प्रेम आहे. हा तास म्हणजे सर्व कामं, जबाबदाऱ्या आणि कर्तव्यं पार पाडून प्रत्येकजण आपापल्या घराकडं जेवणासाठी, वामकुक्षी काढण्यासाठी अथवा घाईघाईनं घरी जाताना संध्या-

काळ, रात्र आणि उरलेला सर्व फावला वेळ कोणत्या प्रकारच्या मनोरंजनात घालवावा याबद्दल बेत करत असतो, तोच होय. ह्या तासाला आपला नायक — मला परवानगी द्या, नास्त्येन्का, हे निवेदन तृतीयपुरुषात करण्याचं, कारण प्रथमपुरुषी निवेदनाची मला अत्यंत शरम वाटतेय — तर आपला नायक, तोसुद्धा रिकामटेकडा नव्हता, इतरांच्या जोडीनंच पावलं टाकतोय. पण त्याच्या फिकट, काहीशा मलीन चेहऱ्यावर प्रसन्नतेचा विलक्षण भाव उमटलाय. पीटरबुर्गच्या थंड्या नभात सावकाशपणं विझत जाणाऱ्या संधिप्रकाशाकडं तो उदासीनपणानं पहात नाही. जेव्हा मी म्हणतोय की तो पाहतोय, तेव्हा मी खोटं सांगतोय: तो पहात नाही, जणू तो थकलाय अथवा दुसऱ्या कुठल्यातरी अधिक महत्त्वाच्या गोष्टीचा विचार करण्यात गुंतल्यामुळं त्या संधिप्रकाशाकडं त्याचं अर्धवट लक्ष आहे; जणू भोवतालच्या जगासाठी त्याच्यापाशी ओझरता, अगदी साधा क्षण आहे. तो प्रसन्न आहे कारण त्याच्या तापदायक **कामांपासून** उद्यापर्यंत तो मुक्त आहे आणि शाळेच्या वर्गातून बाहेर जाण्याची, आवडते खेळ खेळण्याची मुभा मिळालेल्या शाळकरी मुलाप्रमाणं त्याला आनंद झालाय. त्याच्यावर एक तिरपा कटाक्ष टाका, नास्त्येन्का: तुम्हाला तात्काळ दिसेल की, तो अनुभवत असलेल्या आनंदभावनेचा त्याच्या दुबळ्या मज्जांवर आणि त्याच्या रोगट कल्पनाशक्तीवर सुखद परिणाम घडलाय. तो पहा कसल्यातरी विचारात गुरफटला... तुम्हाला वाटतंय — जेवणाबद्दलच्या? आजच्या संध्याकाळविषयीच्या? कुठं एवढा टक लावून तो पाहतोय? चपळ घोड्यांनी ओढल्या जाणाऱ्या चमकदार बग्गीत बसून जाणाऱ्या स्त्रीकडं पाहून झोकदार कुर्निसात करणाऱ्या भव्य यष्टीच्या पुरुषाकडं तो पाहतोय? नाही, नास्त्येन्का, आता असल्या क्षुल्लक गोष्टी त्याच्या लेखी नाहीत! आता तो **स्वतःच्या खास** जीवनामुळं श्रीमंत बनलाय. त्याला ही श्रीमंती अचानक लाभलीय, मावळत्या सूर्याचा निरोपाचा किरण त्याच्यासमोर उगीच आनंदानं चमकला नव्हता. त्यानं त्याच्या हृदयाला ऊब आणली होती आणि अनेक कल्पना उसळवल्या होत्या. क्षणापूर्वी जिथं क्षुल्लक गोष्टीचा त्याच्यावर प्रभाव पडला असता अशा रस्त्याकडं आता तो ढुंकूनसुद्धा पहात नाही. आता "कल्पनांच्या देवतेनं"[26] (जर तुम्ही झूकोव्स्की वाचला असेल, लाडक्या नास्त्येन्का) एव्हाना लहरीपणानं तिच्या हातमागावर सोनेरी उभा धागा गुंफलाय आणि त्याच्यासाठी अफाट, अद्भुत स्वप्नांचं विणकाम सुरू केलंय. कोण जाणे, कदाचित तो ज्या सुरेख

ग्रॅनाइटच्या पादपथावरून घरी चाललाय तेथून त्याचा हात पकडून ती त्याला सातव्या बिलोरी स्वर्गात घेऊन गेलीय. आता त्याला थांबवण्याचा प्रयत्न करा आणि विचारा – सध्या तो कुठं उभा आहे, कोणत्या रस्त्यांना तो पार करून आला? पण बहुधा त्याला काहीही आठवणार नाही; कुठून आला ते आठवणार नाही आणि आता कुठं उभा आहे ते सांगू शकणार नाही. शरमेने लाल होत केवळ स्वतःची अब्रू सांभाळण्यासाठी काहीतरी कल्पित गोष्ट रचून सांगील. म्हणून जेव्हा एक अत्यंत प्रतिष्ठित म्हातारी पादपथाच्या मध्यभागी त्याला थांबवते आणि तिच्या हरवलेल्या वाटेची दिशा विचारते, तेव्हा त्याच्या तोंडून अस्फुट किंचाळी उमटते आणि घाबरून तो अवतीभोवती पाहतो. चिडून कपाळाला आठ्या घालून तो पुढं चालू लागतो. त्याच्याकडं पाहून स्मित करणाऱ्या आणि मागं वळून पुन्हा त्याच्यावर नजर टाकणाऱ्या रस्त्यावरच्या इतर माणसांकडं, अथवा त्याच्या वाटेमधून भेदरून पटकन उडी मारून बाजूला होणाऱ्या आणि त्याच्या रुंद, चिंतनमग्न स्मिताला व हातवाऱ्यांना पाहून खो खो हसणाऱ्या चिमुरड्या मुलीकडं, त्याचं मुळीच लक्ष नाही. पण तीच मघाची कल्पनादेवता त्या म्हातारीला, कुतूहलानं पाहणाऱ्या रस्त्यावरच्या इतर माणसांना, हसणाऱ्या चिमुरड्या मुलीला आणि फोन्तान्कावर (आपला नायक त्यावेळी तिथून चाललाय असं गृहीत धरू) दाटीनं उभ्या राहिलेल्या पडावांवर एव्हाना जेवणाऱ्या खलाशांना उचलून स्वतःच्या आनंदमयी भरारीवर घेऊन जाते. कोळयाच्या जाळयात माशा गुंततात त्याप्रमाणं त्या सर्वांना ती देवता तिच्या सोनेरी खोळीवर गुंफते. हा विचित्र माणूस स्वतःच्या नव्या संपदेसह त्याच्या गुंफेत आनंदानं प्रवेश करतो, जेवायला बसतो, आणि त्याची सतत विषण्णवदना मोलकरीण मात्र्योना जेव्हा टेबल स्वच्छ करून त्याला पाईप आणून देते, तेव्हा कुठं स्वारी तंद्रीमधून भानावर येते. तो जागच्याजागी चुळबुळतो आणि आश्चर्यानं आठवण करतो की, त्यानं एव्हाना जेवण संपवलंय आणि हे कसं घडलं ते त्याला समजत नाही. खोलीत अंधार पडला; त्याच्या काळजात रितेपणा आणि खिन्नपणा भरतो. कल्पनेचं पूर्ण साम्राज्य त्याच्याभोवती कोसळून पडतं; मागमूस न ठेवता, आवाज आणि खळखळाट न करता कोसळून पडतं; एखाद्या स्वप्नाप्रमाणं ते झर्रकन निघून गेलंय आणि तो कशाबद्दल स्वप्न पहात होता हेसुद्धा त्याला आठवत नाही. पण आता त्याच्या काळजाचं स्पंदन घडवणारी आणि त्याला किंचित वेदना देणारी एक अंधुक संवेदना, एक नवी इच्छा, त्याच्या

कल्पनाशक्तीला मोहकपणं आणि नकळतपणं चेतना देतेय, उत्तेजित बनवतेय, नव्या आभासांच्या झुंडीला साद घालतेय... छोटया खोलीत शांततेचं साम्राज्य नांदतंय; त्याची कल्पनाशक्ती एकांतात आणि ग्लानीत न्हाऊन निघतेय; ती हळूच पेट घेते, शेजारच्या स्वयंपाकघरात जगाची पर्वा न करता कॉफी बनविण्यात दंग झालेल्या म्हाताऱ्या मात्र्योनाच्या कॉफीपात्रातल्या पाण्याप्रमाणं त्याच्या कल्पनाशक्तीला उकळ्या फुटू लागतात. मग तिच्यामधून छोटया ज्वाला उमटू लागतात आणि निरुद्देश-पणानं सहज उचललेलं पुस्तक त्या स्वप्नाळू माणसाच्या हातून फक्त एक-दोन पानं वाचून गळून खाली पडतं. त्याची कल्पनाशक्ती परत जागी झालीय आणि तिच्या तारा जुळल्यात. अचानक सर्व चकचकीत भवितव्यासह एक नवीन जग, नवीन अद्भुत जीवन त्याच्यासमोर चमकून जातं. नवीन स्वप्न – नवीन सुख! सूक्ष्म आणि मादक विषाचा नवा घुटका! आपल्या वास्तव जीवनाची त्याला काय मातब्बरी! त्याच्या धुंद नजरेला आपलं जीवन सुस्त, मंद आणि आळशी भासतं, नास्त्येन्का! त्याच्या दृष्टीला आपण सगळे स्वतःच्या दैवाबाबत असमाधानी भासतो, आपल्याला जीवन रटाळ वाटतंय असं त्याला भासतं. आणि खरंच, पहा, पहिल्याच दृष्टी-क्षेपात आपण एकमेकांशी किती थंड, दुर्मुखलेले आणि चिडके वागतो... "बिच्चारे!" – माझ्या स्वप्नाळूच्या मनात विचार येतो. आणि त्याला असं वाटतं त्यात नवल नाही! आपल्या स्वप्नाळू माणसाला सर्वात अधिक महत्त्व देऊन, त्यालाच सतत अग्रभागी ठेवून, ते अद्भुत आभास किती आकर्षकतेने, कलाकुसरीने आणि सढळपणे अत्यंत जादूमय, सजग चित्र त्याच्यासाठी विणताहेत पहा! त्या विविध साहसांकडं पहा, कधीही न संपणाऱ्या त्याच्या धुंद स्वप्नांकडं पहा! कदाचित तुम्ही विचाराल, तो कसली स्वप्नं पाहतो? कशाला विचारायचं? सर्व तऱ्हेची स्वप्नं तो पाहतो... कवीच्या भूमिकेत, प्रथम मान्यता न मिळालेला आणि नंतर गौरव झालेला; हॉफमनशी मैत्री [27] झाल्याचं स्वप्न पाहतो; सेंट बार्थो-लोम्यूच्या रात्रीचं [28], डायना वेर्नोनचं [29], झार इवाननं कझानवर केलेल्या स्वारीत [30] शौर्य गाजवल्याचं, क्लारा मोवब्रायचं [31], एवफीया डेन्सचं [32], हूस [33] समोर असलेल्या प्रीलेट [34] मंडळाचं, रॉबर्टमधल्या [35] मृतांच्या पुनरु-त्थानाचं (संगीत आठवतं? स्मशानाचा वास येतो!), मीन्ना आणि ब्रेन्दाचं, बेरेझिनाच्या लढाईचं [36], उमरावीण वो-दा यांच्याकडच्या [37] काव्यवाचनाचं, दान्तोनचं [38], क्लेओपात्रा [39] ei suoi amanti चं, कलो-

म्नामधल्या छोटचा घरकुलाचं[40], त्याचा स्वतःचा कोपरा, हिवाळी रात्री त्याच्या शेजारी डोळे विस्फारून आणि ओठ विलग करून सुंदरी त्याचं बोलणं ऐकतेय, जसं तुम्ही आता माझं बोलणं ऐकताय, माझ्या छोटचा देवदूता... नाही, नास्त्येन्का, ज्या जीवनाचा अनुभव घ्यायला आपण आसुसलो आहोत, त्याची त्या विषयासक्त आळशाला काय किंमत? त्याला वाटतं की, हे जीवन दरिद्री, भिकार आहे. पण त्याच्या मनाला हा विचार शिवत नाही की, त्याच्या आयुष्यातसुद्धा एकदा दुःखद वेळ येईल, त्यावेळी ह्या भिकार जीवनातील एका दिवसासाठी स्वतःची सगळी काल्पनिक भराऱ्यांची वर्षं द्यायला तो तयार होईल; तेसुद्धा आनंद आणि सुखाच्या बदल्यात नव्हे. त्या दुःखाच्या क्षणाला, खेदाच्या आणि अनिर्बंध शोकाच्या वेळेला निवड करत बसण्याचंही त्याला भान उरणार नाही. पण ती भयावह घटका प्रत्यक्ष येईपर्यंत त्याला कसलीही वांच्छा नाही, कारण तो तिच्या अतीत आहे, कारण त्याला आधीच सर्व लाभलंय, तो तृप्त आहे; कारण तो स्वतःच्या जीवनाचा निर्माता आहे, जेव्हा जेव्हा नवी लहर त्याला प्रेरणा देते तेव्हा तेव्हा तो स्वतःसाठी नवीन जग निर्माण करतो. आणि हे परीकथेतलं अद्भुत जग किती सहजपणं, किती स्वाभाविकपणं निर्माण होतं! जणू तो आभास नव्हेच! खरंच, काही वेळा माझा विश्वास बसतो की, हे जग म्हणजे मृगजळ नव्हे, माझ्या उत्तेजित संवेदनांची ही निर्मिती नव्हे, माझ्या कल्पनाशक्तीचा खेळ नव्हे, तर ते खरोखरीचं आहे, वास्तव आहे, अस्तित्वात आहे! मला सांगा, नास्त्येन्का, अशा क्षणांना माझ्या मनाला पीळ का पडतो? कोणती जादू, कोणत्या अज्ञात शक्ती नाडीची स्पंदनं वाढवतात, स्वप्नाळूच्या डोळयांमध्ये आसवं उभी करतात, त्याच्या आसवांनी माखलेल्या फिकट गालांवर लाली आणतात आणि स्वर्गीय आनंदानं त्याचं सर्वांग भरून टाकतात? त्याच्या निद्राहीन रात्री असीम सुखात आणि आनंदात चटकन सरल्याचा भास का होतो? पहिला गुलाबी सूर्यकिरण जेव्हा त्याच्या खिडकीवर चमकतो आणि इथं पीटरबुर्गमध्ये घडतं त्याप्रमाणं पहाटेचा गूढ, अनिश्चित प्रकाश त्याच्या खोलीत पसरतो, तेव्हा आपला स्वप्नाळू थकल्याभागल्या अवस्थेत बिछान्यावर आडवा पडून गाढ झोपी का जातो? त्याच्या रोगट आणि हादरलेल्या चित्ताला उन्मादाची गुंगी का चढते, त्याच्या हृदयात असह्य गोडव्याची वेदना का भरते? होय, नास्त्येन्का, तुझी फसगत होते आणि नकळत विश्वास बसतो की, त्याच्या अंतरात्म्यातली खळबळ खरी आहे, अस्सल आहे. नकळत विश्वास

बसतो की, खरोखरच त्याच्या अशारीरिक स्वप्नांमध्ये जिवंतपणा, सचेतनता आहे. केवढी फसवणूक – उदाहरणार्थ, असीम आनंदासह, अमाप छळांसह प्रेमानं त्याच्या काळजात प्रवेश केला... नुसता त्याच्यावर एक कटाक्ष टाका, म्हणजे खात्री पटेल! त्याच्याकडं पाहिल्यावर तुमचा विश्वास बसेल, नास्त्येन्का, की त्याच्या उन्मादी स्वप्नांमध्ये त्यानं जिच्यावर प्रेम केलं, तिला प्रत्यक्षात तो ओळखत नाही? त्यानं खरंच तिला फक्त त्याच्या फसव्या कल्पनांमध्ये पाहिलं आणि त्या आभासाचंच केवळ त्याला स्वप्न पडलं? सबंध जगाचा त्याग करून ती दोघंच फक्त हातात हात गुंफून अनेक वर्षं एकत्र जगली नाहीत, त्यांच्या दोन खाजगी जगांना एका जगात मिसळून दोघांची नशीबं त्यांनी एकत्र गुंफली नाहीत, हे खरं असू शकेल? तर मग त्या विरहाच्या रात्री, काळ्या आकाशाखाली उसळलेल्या वादळाकडं दुर्लक्ष करून, तिच्या काळ्या पापण्यांवरील आसवांच्या थेंबांना फुंकरींनी उडवून लावणाऱ्या वाऱ्याकडं दुर्लक्ष करून, त्याच्या छातीवर पडून ती हुंदके देत रडत नव्हती का? खरंच ते नुसतं स्वप्न होतं? तो उदास, दुर्लक्षित, रान वाढलेला आणि पाऊलवाटांवर शेवाळं माजलेला बगीचा? तो विषण्ण आणि एकाकी बगीचा, जिथं ती दोघं आशा-निराशा अनुभवत, प्रेम करत, होय, "एकमेकांवर प्रदीर्घ काळ अत्यंत हळुवारपणं प्रेम करत"[41] अनेकदा फिरली होती? आणि तिच्या दुर्मुखल्या, म्हाताऱ्या, कठोर नवऱ्याबरोबर अनेक वर्षंपर्यंत ती अज्ञातवासात राहिली ते विचित्र जुनंपुराणं घर? तिच्या नवऱ्याला ती दोघं लहान मुलांप्रमाणं घाबरत होती, एकमेकांपासून स्वतःचं प्रेम बुजरेपणानं आणि खिन्नपणानं लपवून ठेवत होती. किती यातना त्यांनी सोसल्या, किती ती घाबरली होती, त्यांचं प्रेम किती विशुद्ध आणि निष्पाप होतं, आणि माणसं किती दुष्ट होती (ते सांगायची गरज नाही, नास्त्येन्का!). अरे देवा, त्यानंतर खूप वर्षांनी, त्याच्या मायभूमीच्या किनाऱ्यांपासून दूर, परक्या आकाशाखाली, माध्यान्हीनंतरच्या तप्त आकाशाखाली, चिरंतन सुंदर शहरात, संगीताच्या साथीवर चाललेल्या बॉलनृत्याच्या स्थळी, दिव्यांच्या रोषणाईनं झगमगलेल्या पालाझ्झोत (अगदी पालाझ्झोतच) तो तिला भेटणं शक्य होतं काय? पांढऱ्या फुलांनी आणि गुलाबांनी वेढलेल्या सज्जात त्याला पाहताच तिनं तात्काळ तोंडावरचा मुखवटा दूर केला आणि अस्फुटपणं 'मी मुक्त आहे' असं म्हणत आपला थरथरता देह त्याच्या मिठीत झोकून दिला; आनंदाचे चीत्कार काढत ती दोघं एकमेकांना बिलगली आणि क्षणात त्यांना सगळ्याचा विसर पडला:

दुःख, विरह, यातना, उदास घर, म्हातारा, दूर मायदेशातला भकास बगीचा, निराशेच्या यातनांपायी बधीर अवस्थेत तिनं त्याच्या मिठीतून स्वतःला वेगळं करून घेतलं होतं आणि निरोपाचं आवेगपूर्ण चुंबन घेतलं होतं तो बगीचामधला बाक... नास्त्येन्का, तुम्ही मान्य केलं पाहिजे की, शेजाऱ्याच्या बागेतलं चोरलेलं सफरचंद खिशात नुकतंच कोंबणाऱ्या एखाद्या शाळकरी मुलाप्रमाणं तुम्ही दचकाल, शरमेनं लाल व्हाल, जेव्हा तुमचं दार अचानक सताड उघडलं जाईल आणि तुमचा अनाहूत उंच, धिप्पाड, आनंदी स्वभावाचा मित्र जणू काही घडलंच नाही अशा थाटात प्रवेश करून आरोळी मारील: 'अरे मित्रा, मी नुकताच पावलोवस्कहून आलोय!' अरे देवा! म्हातारा उमराव मेला, अवर्णनीय सुखाचा क्षण जवळ आलाय आणि अशावेळी कुणीतरी पावलोवस्कहून येतो!"

माझ्या नाट्यमय भाषणाच्या अखेरींनंतर मी नाट्यमय मौन घेतले. मला आठवते की, खूप प्रयत्न करून खदखदून हसायची त्यावेळी मला आत्यंतिक इच्छा झाली होती, कारण माझ्या काळजात कसलीतरी वैर-भावना खळबळत असल्याचे एव्हाना जाणवत होते, माझा श्वास घशात अडकत होता, माझी हनुवटी थरथरू लागली होती आणि माझ्या डोळ्यां-मध्ये अधिकाधिक पाणी तरळू लागले होते... आपले चतुर डोळे विस्फारून माझे बोलणे ऐकणारी नास्त्येन्का आता तिच्या बालीश हसण्याच्या खळ-खळाटाने वातावरण भरून टाकणार असा माझा अंदाज होता आणि मला एवढ्या थराला गेल्याबद्दल पश्चात्ताप वाटला. खूप काळापासून माझ्या काळजावर भार होऊन बसलेल्या ह्या गोष्टी मी तिला निष्कारण सांगितल्या होत्या. अगदी तोंडपाठ असल्याप्रमाणे हा मजकूर मी घडाघडा म्हणू शकत होतो, कारण फार पूर्वीच मी तो तयार केला होता आणि माझी मलाच मी शिक्षा फर्मावली होती. पण तिला तो मजकूर वाचून दाखविण्याचा मला मोह झाला, अर्थात तिला त्यातले काही समजावे अशी माझी अपेक्षा नव्हती हे मला मान्य केले पाहिजे. आश्चर्य म्हणजे ती गप्प राहिली आणि थोड्या वेळानंतर माझा हात हलकेच दाबून तिने मला भित्र्या कुतूहलाने विचारले :

"खरंच तुम्ही सबंध आयुष्य असं जगलात?"

"सबंध आयुष्य, नास्त्येन्का," मी उत्तरलो, "संपूर्ण जीवन आणि असं दिसतंय की, शेवटपर्यंत असंच जगणार!"

"नाही, तसं योग्य नव्हे," काळजीच्या स्वरात ती म्हणाली. "असं

घडणार नाही. अन्यथा मलासुद्धा माझ्या आजीपाशी बसून सारं आयुष्य घालवावं लागेल. असं जगणं मुळीच चांगलं नाही हे तुम्हाला माहीत आहे?"

"माहीत आहे, नास्त्येन्का, माहीत आहे!" माझा भावनावेग न आवरून मी ओरडलो. "आणि आता कधी नव्हती एवढ्या तीव्रतेनं मला जाणीव झालीय की, माझ्या आयुष्यातली सर्वोत्तम वर्षं मी निष्कारण वाया घालवली! आता मला हे माहीत आहे आणि ही जाणीव मला अधिक बोचतेय, कारण देवानं तुम्हाला माझ्यापाशी धाडलं, माझ्या प्रेमळ देवदूता, मला हे सांगण्यासाठी आणि पटविण्यासाठी! आता तुमच्यापाशी बसून मी बोलतोय तेव्हा भविष्याचा विचार मला भेदरवतो आहे, कारण भविष्यकाळात माझ्या नशिबी परत केवळ एकलेपण आहे, परत केवळ निरर्थक, कुबट आयुष्य आहे; आणि आत्ता प्रत्यक्षात तुमच्यानजीक मी एवढा सुखी असताना स्वप्नं कसली पाहू? हे प्रिय तरुणी, तुमचं कल्याण होवो, कारण तुम्ही मला सुरवातीलाच दूर लोटलं नाही, त्यामुळं आता मी म्हणू शकतो की, माझ्या आयुष्यात मी निदान दोन संध्याकाळी जगलो!"

"नाही, नाही!" नास्त्येन्का ओरडली आणि तिच्या डोळ्यांमध्ये आसवे चमकली. "नाही, यापुढं तसं घडणार नाही. आपला तसा वियोग होणार नाही. दोनच संध्याकाळी म्हणजे काय?"

"हाय, नास्त्येन्का, नास्त्येन्का! तुम्ही माझा माझ्याशी आता किती दीर्घ काळ समेट घडवून दिलाय ह्याची तुम्हाला कल्पना आहे? अगदी गेल्या क्षणापर्यंत स्वत:बद्दल मी वाईट विचार करत होतो तसा आता करणार नाही, हे तुम्हाला माहीत आहे? माझ्या जीवनात माझ्या हातून पापं आणि गुन्हे घडले, माझ्यासारख्याचं जीवन म्हणजेच पाप आणि गुन्हा आहे, अशा विचारानं इत:पर कदाचित मी झुरत बसणार नाही, हे तुम्हाला ठाऊक आहे? आणि असं मुळीच मानू नका की मी तुम्हाला अतिशयोक्ती करून सांगितलं, देवाशपथ असं मानू नका, नास्त्येन्का, कारण काहीवेळा मला आत्यंतिक निराशेचे झटके येतात... कारण ह्या क्षणाला मला जाणवायला सुरवात झालीय की, अस्सल आयुष्य जगायला आरंभ करण्यास मी कधीच समर्थ ठरणार नाही; कारण वास्तवाशी आणि प्रत्यक्षाशी सर्व संपर्क, सर्व जाणीव मी एव्हाना गमावून बसलोय; कारण माझा आत्मा मी विकून टाकलाय; कारण काल्पनिक भराऱ्यांच्या रात्रींनंतर पूर्ण शुद्धी-

वरचे क्षण येतात आणि ते फार भीतीदायक आहेत! दरम्यान मानवी आवर्तात जीवनाचा गोंगाट कानांवर आदळत असतो, माणसं जगतात–अस्सल जीवन जगतात–हे तुम्ही पाहू आणि ऐकू शकता, त्यांचं जीवन तयार ऑर्डरीप्रमाणं नाही, त्यांचं जीवन स्वप्नाप्रमाणं अथवा आभासा-प्रमाणं उडून जाणार नाही, त्यांचं जीवन सतत नवीन आहे, चिरंतन तरुण आहे, त्यातला एकही तास दुसऱ्या तासासमान नाही, असं जेव्हा पाहता, तेव्हा जाणवतं की भित्री काल्पनिक भरारी उदास आणि कंटाळा आणण्याइतपत एकसुरी आहे, प्रत्येक छटेची आणि प्रवृत्तीची ती गुलाम आहे, सूर्याला झाकोळून टाकणाऱ्या पहिल्या मेघाची गुलाम आहे आणि स्वतःच्या सूर्याची विलक्षण जपणूक करणाऱ्या पीटरबुर्गमधल्या प्रत्येक अस्सल माणसाचं काळीज दुःखानं पिळवटून निघतं–आणि दुःखात कसलं आलंय कल्पनारंजन? अखेरीस तुमच्या **अक्षय** कल्पनाशक्तीचा सतत ताण तुम्हाला थकवा आणत असल्याची जाणीव होते, कारण तुम्ही परिपक्व बनत आहात, तुमची पूर्वीची उद्दिष्टं कालबाह्य बनलीत. त्यांच्या ठिकऱ्या उडाल्यात, ती धुळीला मिळालीत. जर जगायला दुसरं आयुष्यच नसेल, तर त्या फुटक्या तुकड्यांमधून परत आयुष्य उभारणं तुम्हाला भाग पडतं. पण तरीही तुमचा आत्मा दुसऱ्या कशाची तरी आस धरत असतो, मागणी करत असतो! आपल्या जुन्या स्वप्नांच्या राखेत तो स्वप्नाळू निष्कारण शोधत बसतो, पुन्हा जीवनाला धुगधुगी आणण्याच्या आशेनं ठिणगी धुंडाळत राहतो, त्या पुनरुज्जीवित आगीनं गोठलेल्या काळजाला ऊब देऊ पाहतो आणि पूर्वीच्या सर्व प्रेयसाला, अंतःकरण हलवून टाकणाऱ्या, रक्त पेटव-णाऱ्या, डोळ्यांमधून पाणी आणणाऱ्या आणि त्याची छान फसवणूक करणाऱ्या सर्व गोष्टींना परत आणू पाहतो! मी कुठवर जाऊन पोचलोय ह्याची तुम्हाला कल्पना आहे का, नास्त्येन्का? प्रत्यक्षात कधीही न घडले-ल्या, पण मला प्रिय असलेल्या माझ्या पूर्वीच्या भावनांचा वर्षदिन मला आता साजरा केला पाहिजे, कारण त्या तशाच मूर्ख, अशारीरिक स्वप्नां-प्रमाणं हा वर्षदिन साजरा करायचा आहे. असं करण्याची माझ्यावर पाळी आलीय, कारण ती मूर्ख स्वप्नं इतःपर नाहीत, त्यांना आधार द्यायला माझ्यापाशी काहीही नाही. स्वप्नं जगायची असतात! तुम्हाला माहीत आहे का, माझ्या विशिष्ट तऱ्हेनं एकेकाळी मला सुख देणाऱ्या विशिष्ट स्थळांना विशिष्ट तारखांना परत भेट देऊन त्यांची आठवण करायला आता मला आवडतं. माझ्या कधीही न परतणाऱ्या भूतकाळाशी माझ्या

वर्तमानाची सांगड घालायला मला आवडतं. एखाद्या भुताप्रमाणं निराश आणि विषण्ण मन:स्थितीत पीटरबुर्गच्या गल्ल्यांमधून आणि रस्त्यांवरून अनेकदा मी निरुद्देशपणं भटकत राहतो. माझ्या आठवणी! उदाहरणार्थ, मला आठवतं की, बरोब्बर एक वर्षापूर्वी, ह्याच वेळेला, ह्याच पादपथावर आजच्यासारखाच एकाकीपणं आणि निराशपणं मी येरझाऱ्या घालत होतो! आणि आठवतंय की, माझी स्वप्नंही अशीच उदास होती, पण आतापेक्षा तेव्हा काहीही अधिक चांगली परिस्थिती नव्हती, तरीही अभावितपणं मनात विचार येतो की, त्या काळात आयुष्य अधिक सोपं आणि अधिक निवांत होतं. आत्ता मला छळणाऱ्या काळ्या विचारानं त्यावेळी माझ्या आयुष्याला ग्रासलं नव्हतं; रात्रंदिवस मला सतावणाऱ्या सदसद्विवेकबुद्धीच्या भयाण आणि वेदनादायी यातनांचा अद्याप मी भक्ष्य बनलो नव्हतो. आणि स्वत:ला विचारतोस: कुठं आहेत रे स्वप्नं तुझी? आणि डोकं हलवून म्हणतोस: किती भराभर उलटतात वर्षं! आणि परत स्वत:ला विचारतोस: तुझ्या वर्षांचं तू काय केलंस रे? तुझा सर्वोत्तम काळ तू कुठं पुरलास? तू जगलास अथवा नाही? पहा, स्वत:शी म्हणतोस, जग किती थंड होत चाललंय. आणखी काही वर्षं उलटतील आणि त्यानंतर भयाण एकलेपण येईल, त्यापुढं कुबडीवर रेलून थरकाप घडवणारं म्हातारपण येईल आणि त्यानंतर केवळ कंटाळा आणि उदासीनता. तुझं काल्पनिक जग अंधुक होईल, तुझी स्वप्नं गोठतील, कोमेजतील आणि झाडांवरून गळून पडणाऱ्या पिवळ्या पानांप्रमाणं गळून पडतील... नास्त्येन्का! एकटं, पूर्ण एकटं जगणं, आणि खेद करायलासुद्धा काही नसणं – अक्षरश: काहीही नसणं – फार फार वाईट होईल... कारण जे काही मी गमावीन ते सर्व काहीही नव्हतं; केवळ एक मूर्ख, गोलाकार शून्य; केवळ स्वप्नं!"

"पुरे, आणखी पुढं मला सांगू नका!" डोळ्यामधून सांडणारा अश्रू पुसत नास्त्येन्का विनवणीच्या सुरात म्हणाली. "आता ते सर्व संपलं! आता आपण दोघं असू; आता माझं काहीही झालं तरी आपण कधीही एकमेकांपासून तुटायचं नाही. ऐका. मी साधी मुलगी आहे, मी फारशी शिकलेली नाही, अर्थात आजीनं माझ्यासाठी मास्तर ठेवले होते; पण खरंच मला तुमचं मन समजतं, कारण तुम्ही आत्ता जे काही सांगितलंत ते सर्व मी स्वत: अनुभवलंय, जेव्हा आजीनं मला तिच्या पोषाखाशी पिन लावून जखडून ठेवलं होतं. अर्थात तुमच्याप्रमाणं छानदार निवेदन करणं मला जमलं नसतं, कारण मी शिकलेली नाही", ती किंचित लाजून

म्हणाली. माझ्या नाटयमय भाषणाचा आणि भारदस्त शैलीचा अद्याप तिच्यावर प्रभाव होता. "पण तुम्ही स्वतःचं अंतःकरण माझ्यासमोर पूर्ण उघड केलंत ह्याचा मला खूप आनंद झालाय. आता मी तुम्हाला ओळखते, पूर्णत्वानं, सर्व काही! आणि माहीत आहे का? माझी कहाणी मी तुम्हाला सांगू इच्छितेय, काहीही गुपित न ठेवता, आणि त्यानंतर तुम्ही मला सल्ला द्या. तुम्ही फार बुद्धिमान माणूस आहात. तुम्ही मला सल्ला द्याल असं वचन देता ना?"

"आह्, नास्त्येन्का," मी उत्तरलो, "जरी मी कधीही सल्लागार नव्हतो, आणि बुद्धिमान सल्लागार तर मुळीच नव्हतो, तरीही आता मला दिसतंय की, जर आपण असे नेहमी राहणार असलो, तर हे फार शहाणपणाचं ठरेल आणि आपल्यापैकी प्रत्येकजण एक-दुसऱ्याला हमखास शहाणे सल्ले देईल! पण माझ्या छान छान नास्त्येन्का, कसला सल्ला हवाय तुम्हाला? मला सरळ सांगा; मी आता एवढा आनंदी, सुखी, धीट आणि हुषार आहे की, उत्तरासाठी मला मुळीच चाचपडावं लागणार नाही!"

"नाही, नाही!" हसून नास्त्येन्काने माझे बोलणे मध्येच तोडले. "मला फक्त शहाणा सल्ला नकोय, तर प्रामाणिक, बंधुत्वाच्या भावनेनं दिलेला सल्ला हवाय; जणू सबंध आयुष्यभर तुम्ही माझ्यावर प्रेम करताय अशा रीतीनं!"

"ठीक, नास्त्येन्का, चालेल!" अत्यानंदाने मी ओरडलो. "आणि जर गेली वीस वर्षं मी तुमच्यावर प्रेम केलं असतं, तरी आत्ता त्याहून जबरदस्त प्रेम मी तुमच्यावर करतोय!"

"तुमचा हात द्या!" नास्त्येन्का म्हणाली.

"हा घ्या!" हात पुढे देत मी उत्तरलो.

"तर आता माझी कहाणी सुरू करूया!"

कहाणी नास्त्येन्काची

"अर्धी कहाणी तुम्हाला एव्हाना माहीत आहे, म्हणजे तुम्हाला ठाऊक आहे की, माझी एक म्हातारी आजी आहे..."

"जर दुसरी अर्धी अशीच थोडक्यात असेल..." हसून मी मध्येच म्हणालो.

"चूप रहा आणि ऐका. पण त्याआधी एक अट: माझ्या बोलण्यात अडथळा आणू नका, नाही तर माझा गोंधळ होईल. आता शांतपणं ऐका.

"माझी एक म्हातारी आजी आहे. मी अगदी लहान असतानाच तिच्याकडं रहायला गेले, कारण माझे आई-वडील वारले. मला वाटतं की, आजी पूर्वी खूप श्रीमंत असावी, कारण आता ती तिच्या चांगल्या दिवसांच्या आठवणी काढते. तिनं मला फ्रेंच भाषा शिकवली आणि नंतर माझ्यासाठी मास्तर ठेवले. मी जेव्हा पंधरा वर्षांची झाले (आता मी सतरा वर्षांची आहे) तेव्हा आमचं शिक्षण थांबलं. याच वेळी मी वात्रट-पणा केला. मी नेमकं काय केलं ते मात्र तुम्हाला सांगणार नाही. तो फार मोठा गुन्हा नव्हता एवढं सांगितलं तरी पुरे आहे. पण आजीनं एका सकाळी मला जवळ बोलावलं आणि ती म्हणाली की, ती आंधळी असल्या-मुळं माझ्यावर लक्ष ठेवू शकत नाही; तिनं सेफ्टी पिन घेऊन माझा फ्रॉक तिच्या फ्रॉकशी अडकवला आणि म्हणाली की, उरलेलं आयुष्यभर आम्ही तशा बसून राहू, अर्थात माझ्या वागण्यात सुधारणा झाली नाही तर! थोडक्यात, सुरवातीला माझी सुटका अगदी अशक्य ठरली: काम करणं, वाचणं, अभ्यास करणं—सर्व काही आजीपाशी बसून. एक दिवस मी धूर्त वागायचा प्रयत्न केला आणि फ्योक्लाला माझ्याजागी बसायला सांगितलं. फ्योक्ला आमची मोलकरीण, ती बहिरी आहे. फ्योक्ला माझ्याऐवजी बसली. ह्यावेळी आजी आरामखुर्चीत झोपली होती आणि मी शेजारच्याच मैत्रिणीकडं गेले. पण त्या गोष्टीची अखेर वाईट झाली. आजीला जाग आली आणि मी तिच्याशेजारी गप्प बसून आहे अशा कल्पनेनं तिनं काही-तरी प्रश्न विचारला. फ्योक्लाला दिसत होतं की, आजी प्रश्न विचारतेय, पण ऐकू येत नव्हतं. काय करावं याबाबत तिनं खूप खूप विचार केला आणि शेवटी पिन सोडून ती पसार झाली..."

इथे नास्त्येन्का बोलायची थांबली आणि खो खो हसू लागली. मीही तिच्याबरोबर हसू लागलो. पण तिचे हसणे एकदम थांबले.

"तुम्ही आजीला हसू नका. मी हसतेय, कारण ते गंमतीचं आहे... आजीचं तसंच वागणं आहे त्याला काही इलाज नाही आणि माझं अजूनही तिच्यावर थोडं प्रेम आहे. तर मला ताबडतोब त्यावेळी शिक्षा झाली आणि परत पूर्वीच्या जागी बसवण्यात आलं. त्यानंतर बोटभर हालचाल करणं-सुद्धा अशक्य ठरलं.

"तर मी तुम्हाला सांगायला विसरले की, आमचं, म्हणजे आजीचं,

स्वतःचं घर आहे, छोटंसं घर आहे, फक्त तीन खिडक्यांचं, संपूर्ण लाकडी आणि आजीएवढंच जुनं; वरती पोटमाळा आहे. त्या पोटमाळ्यात रहायला एक नवा भाडेकरू आला..."

"म्हणजे तुमच्याकडं जुना भाडेकरू होता?" मी सहज प्रश्न केला.

"अर्थातच होता," नास्त्येन्का उत्तरली. "आणि गप्प राहणं त्याला तुमच्यापेक्षा जास्त चांगलं जमत होतं. एवढं खरं की, जीभ हलवायलाच त्याला कठीण जात होतं. तो होता एक म्हातारा, हडकुळा, मुका, आंधळा, लंगडा आणि अखेरीस ह्या जगात राहणं त्याला अशक्य झाल्या-मुळं तो मेला. त्यामुळं नवा भाडेकरू ठेवणं आवश्यक झालं, कारण भाडे-करूविना आमचं चालू शकत नाही. भाडं आणि आजीची पेन्शन एवढंच आमचं उत्पन्न. नवा भाडेकरू तरुण माणूस होता, तो इथला नव्हता, बाहेरगावचा होता. त्यानं भाड्याबाबत घासाघीस केली नाही, म्हणून आजीनं त्याला घरात घेतलं, पण नंतर ती मला विचारतेय: 'काय नास्त्येन्का, आपला भाडेकरू तरुण आहे?' मला खोटं बोलायची इच्छा नव्हती. मी म्हणाले: 'आजी, तो अगदी तरुण नाही आणि अगदी म्हाता-राही नाही.' आजीनं विचारलं: 'दिसायला छान आहे?'

माझी परत खोटं बोलायची इच्छा नव्हती. म्हणाले: 'होय आजी, तो दिसायला छान आहे.' आजी म्हणाली: 'याद राख! नाती, मी तुला एवढ्यासाठी इशारा देतेय की, त्याच्याकडं पाहू नकोस आणि त्याचा विचार मनात आणू नकोस. हे दिवस तर कसले! कल्पना करा, कुठलातरी क्षुल्लक भाडेकरू, पण तोसुद्धा म्हणे दिसायला छान! जुन्या काळी असं नव्हतं!'

"आजी नेहमी जुन्या काळाचे दाखले द्यायची! जुन्या काळी ती अधिक तरुण होती, जुन्या काळी सूर्य जास्त उबदार होता आणि जुन्या काळी साय एवढ्या लौकर आंबट होत नव्हती – जुन्या काळी सगळं छान होतं! मी गप्प बसून विचार करू लागले: आजी स्वतःच माझ्या डोक्यात भल-भलते विचार का भरवून देतेय, भाडेकरू तरुण आहे किंवा नाही असं विचारतेय? पण हा विचार नुसता ओझरता मनात चमकून गेला आणि मी परत विणकाम हाती घेतलं, टाके मोजले आणि नंतर त्याबद्दल पूर्ण विसरून गेले.

"एका सकाळी भाडेकरू आमच्याकडं आला आणि त्याच्या खोलीच्या भिंतींना कागद चिकटवायचं आम्ही आश्वासन दिलं होतं त्याबाबत विचारू

लागला. शब्दामागून शब्द वाढत गेला आणि आजी तर बडबडी. ती म्हणाली: 'नास्त्येन्का, माझ्या निजायच्या खोलीत जा आणि हिशेबाची फळी आण.' मी पटकन उठले, लाजून लाल झाले — का कुणास ठाऊक — आणि माझा फ्रॉक आजीच्या फ्रॉकशी पिननं अडकवला होता हे मी पुरती विसरून गेले. भाडेकरूच्या लक्षात न येईल अशा रीतीनं पिन काढण्याऐवजी मी एकदम अशी धाव घेतली की, आजीची खुर्ची माझ्याबरोबर फरफटत आली. भाडेकरूला माझ्याबद्दल सर्व काही समजलं हे मी पाहताच शरमून जागच्याजागी थिजले आणि एकाएकी मला रडू कोसळले. त्या क्षणाला एवढी शरम आणि एवढं दुःख झालं होतं की, मान वर करून पाहणं अशक्य झालं! आजी किंचाळली: 'उभी काय राहिलीस?' मी जास्तच रडू लागले... भाडेकरूनं पाहिलं की, त्याच्यापुढं मी शरमिंदी बनले होते, तेव्हा तो तात्काळ तिथून निघून गेला!

"तेव्हापासून दिवाणखान्यात जरा चाहूल लागली की, मला मेल्यागत व्हायचं. मनात यायचं, बहुधा भाडेकरू येतोय आणि वेळप्रसंगी सावधानता म्हणून हळूच पिन सोडवून ठेवायची. पण तो कधीच नव्हता, तो आला नाही. दोन आठवडे उलटले. भाडेकरूनं एकदा फ्योक्लामार्फत निरोप पाठवला की, त्याच्यापाशी खूप फ्रेंच पुस्तकं आहेत, सगळी चांगली पुस्तकं आहेत आणि ती वाचायला हरकत नाही; आणि कंटाळा येऊ नये म्हणून मी आजीला ती पुस्तकं वाचून दाखवली तर चालेल ना? आजीनं आभारपूर्वक मान्यता दिली, पण ती सतत विचारत राहिली की, पुस्तकं नैतिक आहेत अथवा नाहीत, कारण पुस्तकं जर अनैतिक असली, तर नास्त्येन्का, ती तू मुळीच वाचू नयेस, तुला ती भलत्या गोष्टी शिकवतील, असं आजी म्हणाली.

"'आजी, ती पुस्तकं मला काय शिकवतील? त्यांच्यात काय लिहिलंय?' मी विचारलं.

"'आं!' आजी म्हणाली, 'त्यांच्यात वर्णन केलंय, चांगल्या मुलींना तरुण पुरुष कशी फूस लावतात, त्यांच्या आईबापांच्या घरांमधून कसं पळवून नेतात, प्रथम त्यांच्याशी लग्नाची तयारी दाखवून नंतर त्या गरीब मुलींना उघड्यावर कसं टाकून देतात आणि शेवटी त्या मुलींची अखेर फार दुःखद होते. मी तसली खूप पुस्तकं वाचलीत. त्यांच्यात ही सगळी वर्णनं एवढी छान केलेली असतात की, सबंध रात्रभर जागून गुपचूप वाचत राहतेस.

तेव्हा खबरदार, नास्त्येन्का, तू तसली पुस्तकं वाचू नकोस. त्यानं ही कोणती पुस्तकं पाठवलीत?'

"'आजी, ह्या सगळया वॉल्टर स्कॉटच्या कादंबऱ्या आहेत.'

"'वॉल्टर स्कॉटच्या कादंबऱ्या? इथं काही लबाडी नाही अशी तुझी खात्री आहे? जरा बघ पाहू, त्यात त्यानं एखादं प्रेमपत्र लपवून पाठवलेलं नाही ना?'

"'नाही,' मी म्हणाले, 'आजी, एकही प्रेमपत्र नाही.'

"'पुस्तकाच्या बांधणीखाली पहा, काहीवेळा हे डांबीस बांधणीखाली चिठ्या खुपसून ठेवतात...'

"'नाही, आजी, बांधणीखालीसुद्धा काही नाही.'

"'नाही, अशी खात्री करून घे!'

"तर आम्ही वॉल्टर स्कॉट वाचायला सुरवात केली आणि महिन्या-भरात निम्मी पुस्तकं वाचून संपवली. मग आमच्या भाडेकरूनं आणखी, आणखी पुस्तकं आमच्याकडं धाडली, पूष्कीनची पुस्तकंसुद्धा पाठवली, शेवटी पुस्तकांविना जगणं मला अशक्य ठरलं आणि चिनी राजपुत्राशी लग्न करण्याचे विचार माझ्या डोक्यातून नाहीसे झाले.

"एकदा आमच्या भाडेकरूशी योगायोगानं माझी जिन्यावर गाठ पडली. काहीतरी वस्तू आणायला आजीनं मला धाडलं होतं. तो थांबला, मी लाजले आणि तोही लाजला. पण अखेर हसून त्यानं अभिवादन केलं, आजीच्या प्रकृतीची चौकशी केली आणि विचारलं: 'तुम्ही पुस्तकं वाचली?' मी उत्तरले: 'वाचली.' म्हणाला: 'तुम्हाला सर्वांत जास्त कोणतं आवडलं?' मी म्हणाले: 'आयव्हनो आणि पूष्कीन सर्वांत जास्त आवडली.' त्या वेळी एवढयावरच संपलं.

"आठवडयानंतर माझी परत त्याच्याशी जिन्यावर गाठ पडली. ह्या-वेळी आजीनं मला धाडलं नव्हतं, तर मलाच काहीतरी वस्तू हवी होती. दोन वाजून गेले होते आणि ह्यावेळी भाडेकरू नेहमी घरी परतायचा. म्हणाला: 'नमस्ते!' मी त्याला म्हणाले: 'नमस्ते!'

"म्हणाला: 'सबंध दिवसभर आजीपाशी बसून रहायला तुम्हाला कंटाळा येत नाही?'

"त्यानं जेव्हा हा प्रश्न मला केला, तेव्हा का कुणास ठाऊक माझा चेहरा लाल झाला, मी शरमिंदी झाले आणि मला दुःख वाटले, कारण

ह्याविषयी दुसरे विचारू लागले. काहीही न बोलता तिथून निघून जावंसं मला वाटत होतं, पण अंगात बळ नव्हतं.

"तो म्हणाला, 'हे बघा, तुम्ही प्रेमळ मुलगी आहात! मी तुमच्याशी असं बोलतो म्हणून माफ करा, पण तुमचं भलं व्हावं असं तुमच्या आजीपेक्षा मला जास्त तीव्रतेनं वाटतं. कुणापाशी जाता येईल अशा तुमच्या कुणी मैत्रिणी नाहीत?'

"मी म्हणाले की, मला एकही मैत्रीण नाही, पूर्वी एक माशेन्का नांवाची होती, पण ती प्स्कोवला निघून गेली होती.

"तो म्हणाला – 'माझ्याबरोबर नाटकाला यायची इच्छा आहे?'

"'नाटकाला? आजी काय म्हणेल? ...'

"म्हणाला – 'आजीच्या नकळत, हळूच ...'

"मी म्हणाले – 'नाही, आजीला फसवायची माझी इच्छा नाही. अच्छा!'

"म्हणाला – 'अच्छा!' त्यानंतर तो काहीही बोलला नाही.

"जेवणानंतर तो आमच्याकडं आला, बसला, आजीबरोबर खूप वेळ बोलला. आजी कुठं जाते का, तिच्या ओळखीची कुणी माणसं आहेत का, अशा त्यानं चौकशा केल्या आणि अचानक म्हणाला: 'आजच्या ऑपेराची बॉक्सची तिकीटं मी खरेदी केलीत – 'सेविलचा न्हावी'[12] खेळ आहे. माझ्या ओळखीची काही माणसं पहायला येणार होती, पण नंतर त्यांचा बेत बदलला. माझ्यापाशी तिकीटं उरलीत.'

"आजी उद्गारली: 'सेविलचा न्हावी'! जुन्या काळी ज्याचा खेळ करायचे तोच का हा न्हावी?'

"तो म्हणाला: 'होय, तोच तो न्हावी!' आणि त्यानं माझ्याकडं एक नजर टाकली. मला एव्हाना त्याचा हेतू समजला होता, मी लाजले आणि अपेक्षेच्या भावनेनं माझं काळीज फडफडलं.

"आजी म्हणाली: 'अर्थात, मला तो ऑपेरा ठाऊक आहे! जुन्या काळी आमच्या घरच्या नाटकांमध्ये मी रोझिनाची भूमिका करायची.' 'तुमची यायची इच्छा आहे आज?' त्याने विचारले. 'माझी तिकीटं वाया जात आहेत.'

"आजी पुढं म्हणाली: 'मला वाटतं, आम्ही येऊ. काय बिघडलं? आणि माझ्या नास्त्येन्कानं अजून कधी नाटकाचं थिएटर पाहिलेलं नाही.'

"देवा रे, केवढा आनंद! आम्ही ताबडतोब तयारीला लागलो,

पोषाख केले आणि गेलो. आजी आंधळी आहे, पण तिला संगीत ऐकायचं होतं आणि शिवाय ती प्रेमळ मनाची बाई आहे. माझं मनोरंजन व्हावं अशी तिची इच्छा होती आणि आमच्या आम्ही तसं जाणं कधीही शक्य नव्हतं. 'सेविलचा न्हावी' बद्दलची माझी मतं मी सांगू शकणार नाही, पण एवढं मात्र मी सांगीन की, ती सारी संध्याकाळ आमचा भाडेकरू माझ्याकडं प्रेमानं पहात होता, माझ्याशी खूप भलेपणानं बोलत होता आणि माझ्या ताबडतोब ध्यानात आलं की, मी त्याच्याबरोबर एकटीनं जावं असं जेव्हा त्यानं त्या सकाळी मला सुचवलं होतं, तेव्हा तो केवळ माझी कसोटी पहात होता. मला अत्यानंद झाला होता. त्या रात्री मी खूप अभिमानाच्या आणि आनंदाच्या मनःस्थितीत झोपी गेले. माझं काळीज एवढ्या जोरानं धडधडत होतं की, मला किंचित ताप चढल्यासारखं भासत होतं आणि सबंध रात्र 'सेविलचा न्हावी' बद्दल मी बरळत होते.

"मला वाटलं की, तो आता आमच्याकडं वारंवार यायला लागेल, पण माझा अंदाज साफ चुकला होता. तो यायचा जवळ जवळ थांबला. महिन्यातून केव्हातरी एकदा सहज तो यायचा, पण तेसुद्धा आम्हाला परत नाटकाला यायचं निमंत्रण देण्यासाठी. आम्ही एकदा-दोनदा गेलो. पण मला त्याचा मुळीच आनंद झाला नव्हता. आजी मला वाईट वागवत होती ह्याबद्दल त्याला माझी कीव येत होती व माझ्यासाठी त्याला फक्त तेवढंच करता येत होतं म्हणून तो तसं करत होता, हे मला समजत होतं. मी खूप खूप झुरत राहिले आणि मग मला कशानंतरी झपाटलं: स्वस्थ एका जागी बसणं, वाचणं, विणणं मला अशक्य झालं. काहीवेळा मी हसायची आणि काहीवेळा आजीवर केवळ सूड उगवण्यासाठी विचित्र वागायची अथवा काहीवेळा नुसती रडायची. मी एवढी रोडावले, की जवळ जवळ आजारी पडले. ऑपेराचा मोसम संपला होता आणि आमचा भाडेकरू आमच्याकडं यायचा पूर्ण थांबला. जेव्हा तो मला भेटायचा — अर्थात जिन्यावर — तेव्हा एवढ्या गंभीरपणानं आणि मुकाटपणानं लवून झुकायचा, जणू त्याला माझ्याशी बोलायची मुळीच इच्छा नसायची. तो बाहेर निघून गेला तरी मी मात्र लाजेनं लालबुंद बनून अर्ध्या जिन्यातच उभी असायची, कारण जेव्हा जेव्हा तो माझ्या दृष्टीला पडायचा, तेव्हा तेव्हा माझं सर्व रक्त माझ्या डोक्याकडं धावून यायचं.

"आता जवळ जवळ अखेर आलीय. गेल्या मे महिन्यात आमचा भाडेकरू आमच्याकडं आला आणि आजीला म्हणाला की, त्याची इथली

सगळी कामं संपली होती आणि एक वर्षासाठी तो परत मॉस्कोला जाणार आहे. हे ऐकताच मी पांढरीफटक पडले आणि भोवळ येऊन खुर्चीत कोसळले. आजीच्या काहीही ध्यानात आलं नाही. त्यानं त्याचं प्रयाण जाहीर केल्यानंतर झुकून अभिवादन केलं आणि तो निघून गेला.

"मी काय करायचं? मी खूप खूप विचार केला, झुरले आणि काळजी करत बसले. शेवटी मी निर्णय घेतला. तो उद्या जाणार होता आणि आजी झोपी गेल्यानंतर त्याच संध्याकाळी अखेरचं पाऊल टाकण्याचा मी निश्चय केला. तर मी असं केलं. माझ्या सगळया कपडयांचं आणि अंतर्वस्त्रांचं मी एक गाठोडं बांधलं, ते काखोटीला मारून जवळ जवळ अर्धमेल्या अवस्थेतच जिना चढून पोटमाळयावरल्या त्या भाडेकरूच्या खोलीकडं निघाले. मला वाटतं, त्या जिन्याच्या पायऱ्या चढून जायला मला तासभर लागला. मी त्याचं दार ढकलून उघडलं. मला पाहताच त्याच्या तोंडून चीत्कार उमटला. मला तो भूत समजला होता. मग तो माझ्यासाठी पाणी आणायला धावला, कारण मला धड उभं राहवत नव्हतं. माझं काळीज एवढचा मोठचांदा धडधडत होतं, की माझं डोकं दुखत होतं आणि मला भोवळ येत होती. जेव्हा मी भानावर आले, तेव्हा गाठोडं त्याच्या बिछान्यावर टाकलं, त्याशेजारी बसकण मारली आणि दोन्ही हातांनी माझा चेहरा झाकून रडू लागले. त्याला सर्व गोष्टींचा तात्काळ उलगडा आला असावा, कारण तो माझ्यासमोर फिकट मुद्रेनं आणि खिन्न डोळयांनी उभा होता. त्याची ती अवस्था पाहून माझं काळीज फाटलं.

"तो म्हणाला: 'नास्त्येन्का, कृपा करून माझं ऐका. मी काहीही करू शकत नाही. मी एक गरीब माणूस आहे. अजून माझ्यापाशी काहीही नाही, धड चांगली नोकरी नाही. मी तुमच्याशी लग्न केलं तर कशावर आपण गुजराण करायची?'

"आम्ही खूप वेळपर्यंत बोलत राहिलो आणि अखेरीस माझ्या मनाच्या गोंधळात मी सांगून टाकलं की, इतःपर आजीबरोबर राहणं मला शक्य नाही, मी पळून जाईन, सेफ्टी पिननं बांधून घेणं मला नकोय आणि त्याची इच्छा असो वा नसो, पण त्याच्याबरोबरच मी मॉस्कोला जाणार, कारण त्याच्याविना मी जगू शकत नाही. लज्जा, प्रेम, अभिमान ह्या सर्व गोष्टी एकाच वेळी माझ्यात उचंबळून येत होत्या. अक्षरशः भोवळ येऊन मी त्याच्या बिछान्यावर पडले. त्याच्या नकाराची मला फार भीती वाटत होती!

"काही मिनिटंपर्यंत तो गप्प बसून राहिला. मग तो उठला, माझ्यापाशी आला आणि माझा हात त्यानं स्वतःच्या हातात घेतला.

"आसवं त्याच्या गालांवरून ओघळत होती. तो म्हणाला : 'माझ्या लाडके, माझ्या प्रेमळ नास्त्येन्का, माझं ऐक. मी शपथ घेऊन सांगतो की, जेव्हा केव्हा मी लग्न करण्याच्या परिस्थितीत येईन, तेव्हा फक्त तुम्हीच, दुसरं कुणीही नव्हे, मला सुखी करू शकाल. तुम्ही एकट्याच केवळ मला सुखी करू शकाल असं मी आता म्हणतोय, त्यावर विश्वास ठेवा. तर ऐका : मी मॉस्कोला चाललोय आणि तिथं बरोब्बर एक वर्ष राहणार आहे. दरम्यान मी माझा जम बसवीन अशी आशा करतो. जेव्हा मी परत येईन, तोपर्यंत तुमचं माझ्यावरचं प्रेम संपलं नसेल, तर मी शपथपूर्वक सांगतो की, आपण सुखी होऊ. पण आत्ता मात्र अशक्य आहे. मी आत्ता तुम्हाला काहीही देऊ शकत नाही, द्यायला माझ्यापाशी काहीही नाही. मी परत सांगतो, जर वर्षभराच्या आत ते घडलं नाही, तरीसुद्धा कधीतरी नक्की घडेल. अर्थात माझ्याऐवजी तुम्ही दुसऱ्या कुणाचा स्वीकार केला नसेल तर! मी तुम्हाला वचनात बांधून ठेवू शकत नाही, तसं करण्याचं धैर्य माझ्यापाशी नाही.'

"तो असं म्हणाला आणि दुसऱ्या दिवशी निघून गेला. ह्याबाबत चकार शब्दानं आजीपाशी बोलायचं नाही असं आम्ही ठरवलं होतं. तशी त्याची इच्छा होती. आता माझी कहाणी संपत आली. बरोब्बर एक वर्ष उलटून गेलंय. तो परत आलाय, आख्खे तीन दिवस तो इथं आहे, आणि..."

"आणि काय?" कहाणीची अखेर ऐकण्यास अधीर होऊन मी ओरडलो.

"आणि तो अजून भेटायला आला नाही!" नास्त्येन्का कशीबशी उत्तरली. "त्याच्याकडून काहीही निरोप नाही."

ती बोलायची थांबली, काही वेळानंतर तिने मान खाली घातली आणि एकदम हातांच्या ओंजळीत तोंड खुपसून हमसाहमशी रडायला सुरुवात केली. माझे काळीज पिळवटले. अशी अखेर मी कधीही अपेक्षिली नव्हती.

"नास्त्येन्का," मी घाबरट आवाजात चुचकारत म्हणालो, "नास्त्येन्का, कृपा करून रडू नका! तुम्हाला कसं समजलं? कदाचित अजून तो इथं आला नसेल."

"आलाय, आलाय," नास्त्येन्का भानावर येत म्हणाली. "तो इथं आहे, मला माहीत आहे. त्याच्या प्रयाणापूर्वीच्या संध्याकाळी आम्ही ठरवलं

होतं. आत्ता मी तुम्हाला जी हकीकत सांगितली त्याप्रमाणं सगळं बोलून, ठरवून झाल्यानंतर, नेमक्या ह्याच ठिकाणी ताजी हवा खाण्यासाठी आम्ही आलो होतो. दहा वाजले होते, आम्ही ह्या बाकावर बसलो. माझं रडणं एव्हाना थांबलं होतं, त्याचं बोलणं मी मुग्ध होऊन ऐकत होते... तो म्हणाला होता की, ज्या क्षणाला तो परतेल, त्याच क्षणाला माझ्यापाशी येईल आणि जर मी त्याला नाकारलं नाही, तर आम्ही आजीला सर्व काही सांगू. आता तो परतलाय हे मला माहीत आहे आणि तरीही तो आला नाही, नाही आला!"

तिला परत रडू कोसळले.

"देवा रे! मदतीसाठी काही करता येणार नाही काय?" मी ओरडलो आणि कमालीच्या निराशेने बाकावरून ताडकन उठलो. "मला सांगा, नास्त्येन्का, मी जर त्याला जाऊन भेटलो, तर मदत होईल?"

"हे शक्य आहे?" अचानक डोके वर उचलीत तिने विचारले.

"नाही, अर्थातच नाही," माझी चूक उमजून मी म्हणालो. "मला दुसरी एक कल्पना सुचलीय. त्याला पत्र लिहा."

"नाही, ते शक्य नाही, तसं चालणार नाही!" ती ठामपणे उत्तरली, पण त्याचवेळी तिने डोळे जमिनीवर वळविले आणि माझी नजर टाळण्याचा प्रयत्न केला.

"का चालणार नाही?" माझ्या कल्पनेबरोबर वाहवत जात मी पुढे विचारले. "पण नास्त्येन्का, पत्र खास पाहिजे! त्यातल्या शब्दरचनेवर सगळं अवलंबून आहे. ऑह्, नास्त्येन्का, खरंच! माझ्यावर विश्वास ठेवा, खरंच विश्वास ठेवा! मी तुम्हाला मूर्ख सल्ला देणार नाही. ही घडी बसवणं शक्य आहे. त्यावेळीसुद्धा तुम्हीच पहिलं पाऊल टाकलं होतं... मग आता काय बिघडलं?"

"नाही चालणार, चालायचं नाही! मी फारच पुढं जातेय असं भासेल..."

"आह्, माझ्या प्रेमळ नास्त्येन्का!" स्मित न लपविता मी तिचे बोलणे तोडले. "तसं भासणार नाही, तुमचा तसा हक्क आहे, कारण त्यानं तुम्हाला वचन दिलं होतं. आणि तुम्ही जे काही मला सांगितलंय, त्यावरून मला दिसतंय की, तो चतुर माणूस आहे, तो चांगला वागला," माझ्या स्वतःच्या युक्तीवादाच्या आणि आर्जवांच्या तर्कशुद्धतेत अधिकाधिक रमत मी पुढे बोलत राहिलो. "तो कसा वागला? त्यानं स्वतःला वचनानं

बांधून घेतलं. त्यानं म्हटलं की, जर त्यानं लग्न केलं, तर तुमच्याविना दुसऱ्या कुणाशीही तो लग्न करणार नाही ; अगदी आत्तासुद्धा त्याला नकार देण्याचं स्वातंत्र्य त्यानं तुम्हाला देऊ केलं होतं... अशा स्थितीत तुम्ही पहिलं पाऊल टाकू शकता, तुम्हाला तसा हक्क आहे. त्याच्यापेक्षा तुम्हाला अधिक फायदेशीर परिस्थिती उपलब्ध आहे. उदाहरणार्थ, त्याच्या वचनातून त्याला आता मुक्त करण्याची तुमची इच्छा असली..."

"मला सांगा, तुम्ही कसं लिहिलं असतं?"

"काय?"

"हे पत्र."

"मी असं लिहिलं असतं: 'माननीय महाशय...'"

"असंच लिहिलं पाहिजे? माननीय महाशय?"

"होय! नाहीतर काय? मला वाटतं..."

"बरं, बरं! पुढं!"

"'माननीय महाशय!

माफ करा की मी...' पण नाही, कोणत्याही क्षमायाचनांची गरज नाही! खुद्द वस्तुस्थितीच सिद्ध करील, साधं लिहा:

"'मी तुम्हाला लिहितेय. माझ्या अधीरपणाबद्दल क्षमा करा. पण मी सबंध वर्ष सुखाच्या आशा बाळगून जगले. शंकेचा एक दिवसही मी सोसू शकत नाही हा माझा अपराध आहे का? आता तुम्ही परत आलात, कदाचित तुम्ही तुमचा विचार बदललाय. तसे असेल तर हे पत्र तुम्हाला सांगेल की, मी तक्रार करत नाही आणि तुम्हाला दोषी ठरवत नाही. मी तुम्हाला दोषी धरत नाही, कारण तुमच्या हृदयावर माझी सत्ता नाही. माझं दैवच तसं!

"तुम्ही भले गृहस्थ आहात. माझ्या अधीर ओळींना हसणार नाही, किंवा त्यामुळं चिडणार नाही. आठवण ठेवा, त्यांना लिहिणारी मुलगी गरीब बिचारी आहे, ती एकटी आहे, तिला मार्गदर्शन करायला अथवा सल्ला द्यायला कुणीही नाही, आणि स्वतःच्या काळजावर ताबा ठेवायला तिला कधीच जमलेलं नाही. पण क्षणभर माझ्या अंतरात्म्याला झाकोळून टाकणाऱ्या संशयाला क्षमा करा. जिनं तुमच्यावर प्रेम केलं आणि जी अजूनही तुमच्यावर प्रेम करतेय, तिला केवळ विचारांमध्येसुद्धा दुखवण्यास तुम्ही असमर्थ आहात!'"

"होय, होय, अगदी अस्संच मी मनाशी योजलं होतं!" नास्त्येन्का

ओरडली. तिचे डोळे आनंदाने चमकत होते. "ओह्! तुम्ही माझ्या संशयांना पिटाळून लावलंत, तुम्हाला खुद्द देवानंच माझ्याकडं धाडलं! तुमचे मी खूप खूप आभार मानते!"

"कशाबद्दल? देवानं मला धाडल्याबद्दल?" तिच्या प्रफुल्ल मुद्रेकडे आनंदाने पहात मी म्हणालो.

"होय, अगदी तेवढ्यासाठीसुद्धा!"

"आह् नास्त्येन्का! केवळ आपल्याबरोबर ह्या जगात राहतात म्हणून काही माणसांचे आपण आभार मानतो. मी तुमच्याशी कृतज्ञ आहे, कारण तुम्ही मला भेटलात, तेवढ्यासाठी सबंध आयुष्यभर तुमची आठवण ठेवीन!"

"पुरे, पुरे! आता ऐका माझं: त्यावेळी आमचं असं ठरलं होतं की, तो आल्याक्षणी त्यानं मला कळवायचं. माझ्या ओळखीच्या माणसांपाशी त्यानं पत्र ठेवायचं. ती माणसं अगदी साधी आहेत आणि त्यांना ह्याबाबत काहीही माहीत नाही. किंवा जर त्याला लिहिणं शक्य झालं नाही, कारण पत्रात नेहमी सगळं सांगता येतंच असं नव्हे, तर इथं, ह्याच ठिकाणी, आमच्या संकेतभेटींच्या स्थळी, आल्या दिवशीच रात्री बरोब्बर दहा वाजता त्यानं इथं यायचं. तो आलाय हे मला ठाऊक आहे, पण एव्हाना तीन दिवस उलटलेत आणि ना स्वतः आला, ना त्यानं मला पत्र पाठवलं. दिवसा आजीला सोडून बाहेर पडणं मला अगदी अशक्य आहे. तर ज्या भल्या माणसांबद्दल आत्ता मी तुम्हाला सांगितलं, त्यांच्यापाशी उद्या जाऊन माझं पत्र द्याल का? ती माणसं ते पत्र पाठवतील. जर उत्तर असेल, तर तुम्ही स्वतःच ते घेऊन रात्री दहा वाजता इथं या."

"पण पत्र, पत्र! आधी तुम्ही पत्र तर लिहिलं पाहिजे! तेव्हा हे सगळं परवा घडेल."

"पत्र..." नास्त्येन्का गोंधळून म्हणाली, "पत्र..."

तिने वाक्य पूर्ण केले नाही. प्रथम तिने चेहरा माझ्यापासून दूर वळविला, लज्जेपायी ती गुलाबी बनली आणि अचानक माझ्या हातात एक पत्र पडले. म्हणजे ते आधीच लिहिण्यात आले होते, त्यावर पत्ता होता आणि मोहोर केली होती. एक हळुवार, नाजुक आठवण मनात भर्रकन उमटून गेली.

"रो, रो–झि, झि–ना, ना," मी सुरुवात केली.

"रोझिना!" आम्ही दोघे गायलो. अत्यानंदापायी मी तिला मिठीच

मारणार होतो आणि ती लाजून चूर झाली होती. हसण्यापायी तिच्या डोळ्यांमधून पाणी आले होते, तिच्या काळयाशार पापण्यांवर छोटया मोत्यां-प्रमाणे अश्रू चमकत होते.

"पुरे, पुरे! आता निरोप घ्या!" ती घाईघाईने म्हणाली. "हे पत्र आणि ह्या पत्त्यावर ते नेऊन द्या. अच्छा! उद्या भेटू!"

तिने माझे दोन्ही हात घट्ट दाबले, मान डोलावली आणि तीराप्रमाणे तिच्या गल्लीत ती धावली. डोळ्यांनी तिचा पाठलाग करत मी खूप वेळ तेथेच उभा होतो.

"उद्यापर्यंत! उद्यापर्यंत!" जेव्हा ती दृष्टीआड झाली तेव्हा हे शब्द माझ्या मनात घुमत होते.

रात्र तिसरी

आजचा दिवस खिन्न होता, पावसाळी होता, अंधारा होता – अगदी माझ्या भावी म्हातारपणासारखा. माझ्या डोक्यात विचित्र विचारांची गर्दी उसळतेय, अंधुक भावना जाणवताहेत, अद्याप स्पष्ट न समजलेले प्रश्न डोक्यात घोटाळताहेत – पण त्यांना सोडवण्याची बहुधा माझ्यात ताकद नाही, किंवा माझी इच्छा नाही. ही सगळी उकल करणे माझे काम नव्हे!

आज आम्ही भेटणार नाही. काल रात्री आम्ही निरोप घेतला तेव्हा आकाशात ढग जमू लागले होते आणि धुके दाटू लागले होते. मी म्हणालो होतो की, उद्या फार वाईट हवा असेल. तिने उत्तर दिले नाही, ती स्वत:विरुद्ध बोलू इच्छित नव्हती. तिच्या दृष्टीने हा दिवस स्वच्छ आणि तेजस्वी असेल, तिच्या सुखावर एकाही मेघाचे सावट पडणार नाही.

"जर पाऊस पडत असला, तर आपण भेटणार नाही!" ती म्हणाली, "मी येणार नाही."

मला वाटले की आजच्या पावसाकडे ती लक्ष देणार नाही आणि तरीही ती आली नाही.

काल आमची तिसरी भेट घडली, आमची तिसरी श्वेतरात्र...

आनंद आणि सुख माणसाला सुंदर बनवतात! हृदयात प्रेम खूप उचंबळून येते! जणू भासते की, स्वत:च्या हृदयातील सर्व प्रेम दुसऱ्याच्या हृदयात ओतावे. सर्वत्र आनंद नांदावा, सगळे हसरे असावेत असे वाटते.

आणि हा आनंद किती संसर्गी असतो! काल तिच्या शब्दांमध्ये अपार माया भरली होती, माझ्याबद्दल तिच्या काळजात ओत:प्रोत स्नेह दाटला होता... माझी तिने खूप खातर केली, खूप लडिवाळ वागली ती माझ्याशी ; माझ्या काळजात आशांचे अंकुर फुटावेत असं ती बोलली. ओह्, सुखापायी केवढा नखरेलपणा! आणि मी... मी ते सगळं खरे मानले, मला वाटले की ती...

अरे देवा, अशी कशी मी समजूत करून घेतली? सर्व काही दुसऱ्याचे असताना, माझे काहीही नसताना, मी असा कसा आंधळेपणाने वागलो? जेव्हा तिची ती सारी समता, तिची आस्था, तिचे प्रेम... होय, माझ्याबद्दल वाटणारे प्रेमसुद्धा... दुसरेतिसरे काहीही नव्हते, तर दुसऱ्याशी लौकरच घडायच्या भेटीपायी निर्माण झालेला तो आनंद होता, स्वत:च्या आनंदात मला सहभागी करून घेण्याची तिची इच्छा होती? जेव्हा तो आला नाही, जेव्हा आम्ही व्यर्थ त्याची वाट पाहिली, तेव्हा तिच्या कपाळाला आठ्या पडल्या, ती भेदरली, घाबरली. तिच्या सर्व हालचाली, तिचे सर्व शब्द पूर्वीप्रमाणे चपळ, खेळकर आणि आनंदी राहिले नाहीत. आश्चर्य म्हणजे तिने माझ्याकडे दुप्पट ध्यान द्यायला आरंभ केला, जणू ज्याची आशा ती मनात बाळगून होती आणि ते खरे होणार नाही असा विचार करायलासुद्धा ती घाबरत होती, त्याचा अंत:प्रेरणेने ती माझ्यावर वर्षाव करत होती. माझी नास्त्येन्का एवढी भेदरली, एवढी घाबरली, की बहुधा शेवटी तिला माझे तिच्यावरील प्रेम उमजले आणि माझ्या गरीब बिचाऱ्या प्रेमाची दया आली. जेव्हा आपण असुखी असतो तेव्हा दुसऱ्यांचे दु:ख आपल्याला प्रकर्षाने जाणवते. भावना नष्ट होत नाही, उलट ती अधिक एकवटते...

मी तिच्यापाशी भरल्या अंत:करणाने गेलो होतो, तिच्या भेटीला अधीर झालो होतो. आता मला काय वाटेल ह्याचा तेव्हा मनात विचार आला नव्हता, अशी अखेर होईल असे मला तेव्हा वाटले नव्हते. ती आनंदाने फुलली होती, त्याच्या उत्तराची वाट पहात होती. उत्तरादाखल तो स्वत:च येणार होता. तिच्या हाकेला ओ देण्यासाठी तो धावत येणार होता. ती माझ्याआधी आख्खा तासभर येऊन बसली होती. सुरुवातीला ती सगळ्या गोष्टींना हसत होती, माझ्या प्रत्येक शब्दाची तिला गंमत वाटत होती. माझ्या मनातील विचार मी तिला बोलून दाखविण्याच्या बेतात होतो, पण तेवढ्यात थांबलो.

"मला एवढा आनंद का झालाय, तुम्हाला ठाऊक आहे?" ती म्हणाली. "तुम्हाला पाहून एवढा आनंद का होतोय मला? आज तुम्ही मला खूप का आवडता?"

"का?" मी विचारले आणि माझे काळीज धडधडले.

"तुम्ही मला आवडताय, कारण तुम्ही माझ्या प्रेमात पडला नाहीत. तुमच्या जागी दुसरा कुणी असता, तर मला त्यानं बेचैन केलं असतं, माझा पिच्छा पुरवला असता, सुस्कारे टाकत बसला असता, पण तुम्ही किती छान आहात!"

आणि तिने माझा हात एवढ्या जोराने दाबला, की माझ्या तोंडून अस्फुट किंचाळी उमटली. ती मनसोक्त हसली.

"देवा! किती छान मित्र आहात तुम्ही!" मिनिटभरानंतर ती गंभीरपणे बोलू लागली. "खरंच, देवानंच तुम्हाला माझ्यापाशी धाडलं! जर तुम्ही आत्ता माझ्याबरोबर नसतात, तर माझं काय झालं असतं? किती निःस्वार्थ आहात तुम्ही! किती छान माझ्यावर प्रेम करता! जेव्हा मी लग्न करीन, तेव्हा आपली मैत्री अधिक घट्ट होईल, भावा-बहिणीपेक्षा जास्त स्नेह आपल्यात निर्माण होईल. मी तुमच्यावर तेवढंच प्रेम करीन, जेवढं त्याच्यावर..."

त्या क्षणी मला खूप खूप उदास वाटले. पण माझ्या अंतरात मात्र हास्यासमान काहीतरी खळबळत होते.

"तुम्हाला भ्रम झालाय," मी म्हणालो, "तुम्ही घाबरला आहात. तुम्हाला वाटतंय की तो येणार नाही."

"देव तुमचं रक्षण करो!" ती उत्तरली. "जर मी कमी सुखी असते, तर तुमच्या अविश्वासापायी, तुमच्या दूषणांपायी, मी खचित रडले असते. तुम्ही माझ्या मनात विचार भरून दिलाय आणि खूप काळ त्यावर चिंतन करायचा उद्योग पुरवलाय. पण त्यावर मी नंतर विचार करीन. आत्ता मला मान्य केलं पाहिजे की, तुमचं बोलणं खरं आहे. होय! मी माझी राहिलेली नाही. माझं सर्वांग अपेक्षांनी फुललंय आणि माझ्या भावना तरल बनल्यात. पुरे, सध्या आपल्या भावना बाजूला ठेवू!.."

एवढ्यात कुणाचीतरी पावले वाजली. अंधारातून एक माणूस उगवला, तो आमच्या दिशेने येत होता. आम्हा दोघांचाही थरकाप उडाला. तिच्या तोंडून तर चीत्कार उमटला. मी तिचा हात सोडला आणि तिच्यापासून दूर जाण्याची हालचाल केली. पण आमची फसगत झाली होती: तो नव्हता!

"तुम्हाला कशाची भीती वाटते? माझा हात तुम्ही का दूर झटकलात?" माझ्या हातात स्वतःचा हात परत देत ती म्हणाली. "काय झालं? आपण त्याला एकत्र भेटू. माझी इच्छा आहे की, आपलं एकमेकांवर किती प्रेम आहे ते त्यानं पहावं."

"आपलं एकमेकांवर किती प्रेम आहे!" मी ओरडलो.

"ओह्, नास्त्येन्का, नास्त्येन्का!" माझ्या मनात विचार आला. "किती किती बोलून गेलीस तू ह्या शब्दामध्ये! असलं प्रेम, नास्त्येन्का, काळीज गोठवून टाकतं आणि मनावर त्याचा भार पडतो. तुझा हात थंडगार आहे, माझा आगीसारखा धगधगतोय. किती आंधळी आहेस तू, नास्त्येन्का!.. ओ! माणूस काहीवेळा असह्य सुखी असतो! पण मी तुझ्यावर रागवू शकत नाही!..."

अखेरीस माझा स्वतःवरचा ताबा सुटला.

"ऐका, नास्त्येन्का!" मी ओरडलो. "आज दिवसभर माझी काय अवस्था होती माहीत आहे?"

"काय, काय झालं? लौकर सांगा! आत्तापर्यंत गप्प का राहिलात?"

"प्रथम, नास्त्येन्का, जेव्हा मी तुमची कामगिरी पार पाडली, पत्र दिलं, तुमच्या भल्या माणसांना भेटलो, नंतर... मग मी घरी आलो आणि निजायला आडवा झालो."

"एवढंच?" हसून ती मध्येच म्हणाली.

"होय, जवळ जवळ एवढंच," मी कसाबसा बोललो, कारण माझ्या डोळयांमध्ये एव्हाना मूर्ख आसवे तरारली होती. "आपल्या भेटीआधी तासभर मी जागा झालो, पण मी झोपलोच नाही असं वाटतं. मला काय झालं होतं समजत नाही. मी इथं तुम्हाला सगळी हकीकत सांगण्यासाठी आलोय, काळ माझ्या दृष्टीनं जणू थबकलाय, त्या क्षणापासून केवळ एक भावना, एक संवेदना जणू माझ्याबरोबर कायम वास करणार आहे, तो क्षण जणू कायम टिकून राहणार आहे आणि माझ्या दृष्टीनं आयुष्य थांबलंय!... जेव्हा मी जागा झालो, तेव्हा खूप पूर्वी ऐकलेली एक गोड सुरावट—एकेकाळी ऐकलेली आणि विसरून गेलेली—मला आठवली. असं जाणवलं की, माझ्या अंतःकरणातून सबंध आयुष्यभर ती फुटून बाहेर पडायचा प्रयत्न करत होती आणि केवळ आता..."

"आह्, देवा रे देवा!" नास्त्येन्काने मध्येच म्हटले. "हे काय घडलं? तुमचा एकही शब्द मला समजत नाही."

"आह्, नास्त्येन्का! ही विचित्र संवेदना तुम्हाला जाणवून देण्याची माझी इच्छा होती..." मी केविलवाण्या आवाजात आरंभ केला. अजूनही त्या आवाजात आशेचा एक कण होता, अर्थात तो खूपच सूक्ष्म होता.

"पुरे, थांबा, पुरे!" ती म्हणाली. क्षणात त्या लबाड मुलीने सर्व जाणले.

अचानक ती असाधारण बडबडी, उल्हासी आणि खेळकर बनली. तिने माझा दंड धरला, ती हसली आणि मला हसविण्याचा तिने प्रयत्न केला. माझ्या गोंधळलेल्या मन:स्थितीतील प्रत्येक शब्दाला तिच्याकडून हास्यलहरी उमटत होत्या... मला राग यायला लागला होता, तेवढ्यात ती नखरेल वागू लागली.

"हे पहा," ती बोलू लागली, "मला थोडंसं दु:ख झालं होतं की, तुम्ही माझ्या प्रेमात पडला नव्हतात. ह्यानंतर माणसाची पारख कशी बाई करायची! काहीही असो, श्रीमान हट्टी, माझ्या स्पष्टवक्तेपणाबद्दल तुम्हाला माझं कौतुक करावंच लागेल. माझ्या टाळक्यात येणाऱ्या सर्व गोष्टी मी तुमच्यापाशी बोलते, अगदी अत्यंत मूर्ख वाटतील अशासुद्धा!"

"ऐका! मला वाटतं, अकरा वाजले?" शहरातील दूरच्या मनोऱ्यावरील घंटानादाला ऐकत मी म्हणालो. एकदम ती हसायची थांबली आणि गप्प राहून टोले मोजू लागली.

"होय, अकरा," अखेरीस ती काहीशा घाबरट, अनिश्चित स्वरात म्हणाली.

तिला घाबरवल्याबद्दल, टोल मोजायला लावल्याबद्दल त्याच क्षणी मला पश्चात्ताप झाला आणि माझ्या दुष्ट वर्तनाच्या लहरीबद्दल मी स्वत:ला शिव्या मोजल्या. तिच्याबद्दल मला वाईट वाटू लागले आणि माझ्या अपराधाचे क्षालन कसे करावे ते मला समजेना. मी तिचे सांत्वन करू लागलो, त्याच्या गैरहजेरीबद्दल कारणे हुडकू लागलो, त्याची समर्थने करण्याचा प्रयत्न करू लागलो. अशा क्षणी नास्त्येन्काला फसविण्यापेक्षा अधिक सोपे दुसरे काही नव्हते, अशा क्षणी कुणीही कोणतेही सांत्वन ऐकून घ्यायला आनंदाने तयार असतो आणि निमित्तमात्र कारण सापडले तरी अत्यानंद होतो.

"खरंच, गंमत आहे," माझ्या समर्थनांच्या असाधारण स्पष्टपणात अधिकाधिक तापून आणि रमून मी बोलू लागलो. "तो येऊच शकला नाही. तुम्ही मला फसवलंत आणि गोंधळून टाकलंत, नास्त्येन्का, त्यामुळं

माझा वेळेचा हिशेब चुकला... जरा विचार करा; त्याला जेमतेम पत्र मिळालं असेल. गृहीत धरा की, तो येऊ शकत नाही, कदाचित तो उत्तर लिहितोय, तर पत्र किमान उद्यापर्यंत येऊच शकत नाही. उद्या मी लौकरात लौकर त्याच्याकडं जाईन आणि तडक तुम्हाला येऊन कळवीन. शेवटी हजारो अनपेक्षित कारणं घडू शकतात. कदाचित पत्र आलं तेव्हा तो घरात नव्हता, कदाचित अजून त्यानं ते पत्र वाचलंच नसेल! काहीही घडू शकतं."

"होय, होय," नास्त्येन्का उत्तरली, "मी ह्याचा विचारच केला नव्हता. अर्थात, काहीही घडू शकतं," ती पुढे समजुतीच्या स्वरात म्हणाली. पण त्याच्यात तिच्या कुठल्यातरी अंधुक, विरोधी विचाराचा विसंवाद उमटला होता. "तुम्ही आता असं करा," ती पुढे म्हणाली, "तुम्ही उद्या शक्य तितक्या लौकर जा आणि काही उत्तर मिळालं तर तात्काळ मला कळवा. मी कुठं राहते, तुम्हाला ठाऊक आहे ना?" ती मला तिचा पत्ता परत सांगू लागली.

नंतर ती एकदमच माझ्याशी गोड वागू लागली, हळुवार वागू लागली... माझे सर्व बोलणे ती लक्षपूर्वक ऐकत होती असे भासले, पण जेव्हा मी तिला काहीतरी थेट प्रश्न केला, तेव्हा ती गप्प राहिली, शरमून तिने तोंड दुसरीकडे फिरविले. मी तिच्या डोळ्यांमध्ये पाहिले – होय, ती रडत होती.

"अरेरे, काय हे? किती लहान बाळ आहात! केवढा हा बालिश-पणा?... पुरे!"

तिने स्मित करण्याचा, शांत होण्याचा प्रयत्न केला. पण तिची हनु-वटी थरथरत राहिली, तिचे स्तन धपापत राहिले.

"मी तुमच्याबद्दल विचार करतेय," मिनिटभर मूक राहिल्यानंतर ती मला म्हणाली. "तुम्ही खूप उदार मनाचे आहात. जर माझं काळीज पाषाणाचं असतं, तरच तेवढं मला हे जाणवलं नसतं... आता माझ्या डोक्यात काय आलं ठाऊक आहे? मी तुम्हा दोघांची तुलना केली. तो कशाला – तुम्ही का नाही? तुमच्यासारखा तो का नाही? तो तुमच्यापेक्षा कमी आहे, पण तरीही मी तुमच्यापेक्षा त्याच्यावर जास्त प्रेम करते."

मी काहीही उत्तर दिले नाही. मी काहीतरी बोलेन अशा अपेक्षेने ती वाट पहात होती, असे भासले.

"अर्थात मी कदाचित अजून त्याला पूर्ण समजत नाही, पूर्ण जाणत

नाही. तुम्हाला माहीत आहे, मी नेहमी त्याला काहीशी घाबरून आहे. तो नेहमी गंभीर असायचा, गर्विष्ठ भासायचा. अर्थात मला ठाऊक आहे की, तसा तो केवळ दिसतो, पण त्याच्या काळजात माझ्या काळजापेक्षा जास्त प्रेमळपणा भरलेला आहे... मला आठवतं, त्याच्यापाशी मी गाठोडं घेऊन गेले तेव्हा त्यानं माझ्याकडं कशा नजरेनं पाहिलं होतं. पण तरीही, त्याच्याबद्दल मला अधिक आदरच वाटतो. आम्ही एका पातळीवरची नाहीत असं वाटतं ना?"

"नाही, नास्त्येन्का, नाही," मी उत्तरलो, "ह्याचा अर्थ जगातल्या इतर कशाहीपेक्षा त्याच्यावर तुम्ही जास्त प्रेम करता आणि स्वत:पेक्षा कित्येक पटींनी प्रेम करता."

"ठीक आहे, तसं गृहीत धरू," भाबडी नास्त्येन्का उत्तरली. "आता माझ्या डोक्यात काय आलं ठाऊक आहे? मात्र त्याच्याशी ह्याचा काहीही संबंध नाही, मी एकूण बोलतेय. फार पूर्वीच माझ्या मनात हे आलंय. आपण एकमेकांशी बंधुभावानं का वागत नाहीत? अत्यंत उत्तम माणूससुद्धा नेहमी काहीतरी लपवून ठेवण्याचा प्रयत्न का करतो, त्या गुपिताबद्दल मौन का बाळगतो? काळजात आहे ते सरळ आत्ता बोलून का टाकत नाही, जेव्हा वाऱ्यावर शब्द फुकट उधळत नाहीस हे माहीत आहे? पण प्रत्ये-कजण आहे त्यापेक्षा जास्त कठोर असल्याचा देखावा करतो, जणू त्याच्या भावना फार लौकर व्यक्त झाल्या तर तो त्याच्या भावनांचा अपमान होईल अशी त्याला भीती वाटत असते..."

"आह्, नास्त्येन्का! तुम्ही खरं बोलताय, पण तसं वेगवेगळ्या कारणांमुळं घडतं," मी मध्येच म्हणालो. त्या क्षणाला माझ्या भावनांना मी जास्तीत जास्त मुरड घातली होती.

"नाही, नाही!" अत्यंत भावनावेगाने ती उत्तरली. "उदाहरणार्थ, तुम्ही इतरांसारखे नाही! अर्थात मला काय जाणवतंय ते तुम्हाला कसं सांगावं, खरंच समजत नाही. पण मला वाटतंय, तुम्ही, उदाहरणार्थ... निदान आत्ता तरी... मला वाटतंय की, माझ्यासाठी तुम्ही काहीतरी त्याग करताय," ती हळूच म्हणाली आणि माझ्याकडे तिने एक चोरटी नजर टाकली. "असं तुमच्याशी मी बोलतेय याबद्दल क्षमा करा: मी एक साधी मुलगी. अजून जगाचा फार कमी अनुभव आहे मला आणि खरंच, काही-वेळा मला व्यवस्थित बोलणं जमत नाही," कुठल्यातरी रहस्यमय भावनेने तिचा आवाज कंप पावत होता. स्मित करून तिने आपली भीती झाकायचा

प्रयत्न केला. "पण मला तुम्हाला एवढंच सांगायचं होतं की, मी तुमची खूप आभारी आहे, मलासुद्धा हे सर्व जाणवतंय... ह्यासाठी देव तुम्हाला सुखी करो! त्या दिवशी तुम्ही मला त्या स्वप्नाळूबद्दलची हकीकत सांगित-लीत, ती मुळीच खरी नाही. म्हणजे मला म्हणायचंय, तुमचा तिच्याशी मुळीच संबंध नाही. तुम्ही बरे होत आहात, तुम्ही स्वतःचं वर्णन केलंत त्यापेक्षा अगदी वेगळे आहात. जर कधी कुणाच्या प्रेमात पडलात, तर देव तुम्हाला तिच्याबरोबर सुखी करो! आणि तिच्यासाठी मी देवापाशी काहीही मागणी करीत नाही, कारण ती तुमच्याबरोबर सुखी होईल! मला हे माहीत आहे, कारण मी स्वतः एक स्त्री आहे आणि जर मी असं सांगत्ये, तर त्यावर तुम्ही विश्वास ठेवला पाहिजे..."

ती गप्प झाली आणि तिने माझा हात जोराने दाबला. मानसिक खळबळीपायी मीसुद्धा काही बोलू शकलो नाही. अशीच काही मिनिटे सरली.

"आज तो येत नाही असं दिसतंय खरं," अखेरीस डोके वर उचलून ती म्हणाली. "खूप उशीर झालाय!.."

"तो उद्या येईल," अत्यंत विश्वासपूर्वक आणि ठाम आवाजात मी म्हणालो.

"होय," उजळत्या मुद्रेने ती पुढे म्हणाली. "मला स्वतःलाच आता दिसतंय की, तो फक्त उद्याच येणार. अच्छा, पुन्हा भेटू! उद्या! जर पाऊस असला तर मी कदाचित येणार नाही. पण परवा येईन, नक्की येईन, काहीही झालं तरी! तुम्ही इथं नक्की या. तुम्हाला भेटायची माझी इच्छा आहे. मी तुम्हाला सारी हकीकत सांगीन."

नंतर जेव्हा आम्ही निरोप घेतले, तेव्हा माझ्या हाती स्वतःचा हात देऊन, माझ्याकडे न्याहाळून पहात ती म्हणाली:

"आपण आता नेहमी एकत्र आहोत, खरं ना?"

ओ! नास्त्येन्का! नास्त्येन्का! आता मी किती एकाकी आहे हे तुला समजले असते तर!

नवाचे टोल जेव्हा पडले, तेव्हा खोलीत बसून राहणे मला अशक्य ठरले. अंगात कपडे चढविले आणि पाऊस कोसळत असूनही घराबाहेर पडलो. मी तेथे गेलो, आमच्या बाकावर बसलो. मी तिच्या गल्लीत गेलो, पण मला लाज वाटली आणि त्यांचे घर अवघ्या दोन पावलांच्या अंतरावर असताना, त्यांच्या खिडक्यांकडेसुद्धा नजर न टाकता मी परतलो.

मी घरी आलो तेव्हा कधी अनुभवली नव्हती अशा निराशेने मला घेरले. किती दमट आणि कंटाळवाणा काळ! जर हवा चांगली असती, तर सबंध रात्रभर मी भटकलो असतो...

पण उद्यापर्यंत, उद्यापर्यंत! उद्या ती मला सर्व हकीकत सांगील.

आज पत्र नव्हते. पण तसेच घडायला हवे होते. एव्हाना ती एकत्र आहेत.

रात्र चौथी

देवा, ह्या सगळ्याची अखेर कशी झाली! ते सगळे कसे संपले!

मी नऊ वाजता आलो. एव्हाना ती तेथे होती. दुरूनच मी तिला ओळखले. पहिल्या वेळी ती जशी उभी होती तशीच आज कठड्याला रेलून उभी होती. माझी चाहूल तिला लागली नाही.

"नास्त्येन्का!" मनातील खळबळ दाबून मी कशीबशी हाक मारली.

ती भर्रदिशी माझ्याकडे वळली.

"तर!" ती म्हणाली, "लौकर!"

मी तिच्याकडे गोंधळून पाहिले.

"कुठं आहे पत्र? तुम्ही पत्र आणलंत?" एका हाताने कठडा पकडीत तिने परत विचारले.

"नाही, माझ्यापाशी पत्र नाही," अखेरीस मी म्हणालो, "म्हणजे अजून तो आला नाही?"

तिची मुद्रा भयानक फिकी पडली आणि माझ्याकडे ती खूप वेळपर्यंत टक लावून पहात राहिली. तिच्या अखेरच्या आशेचा मी चुराडा केला होता.

"हवं तसं वागू दे त्याला!" अखेरीस रुद्ध आवाजात ती म्हणाली. "पाहिजे तसं वागू दे त्याला, जर तो मला अशी टाकतोय!"

तिने नजर खाली वळविली, मग तिला माझ्याकडे पहायचे होते, पण तसे शक्य झाले नाही. आणखी काही मिनिटेपर्यंत स्वतःच्या मनाचा तोल सावरण्याचा तिने प्रयत्न केला, मग एकदम ती कठड्याकडे वळली आणि तिच्या आसवांचा बांध फुटला.

"पुरे, पुरे!" मी बोलू लागलो, पण तिच्याकडे पाहताच पुढे बोलण्याचे माझ्यात बळ उरले नाही. आणि बोलणार तरी काय?

"माझं सांत्वन करू नका," ती रडत म्हणाली. "त्याच्याबद्दल बोलू नका; तो येईल, त्यानं माझा कठोरपणं त्याग केलेला नाही, अमानुषपणं त्यानं मला टाकलं नाही, असं बोलू नका. उलट तो तसंच वागलाय. कशाबद्दल, कशाबद्दल? माझ्या पत्रात, त्या अभागी पत्रात, खरंच तसं काही होतं?"

हुंदक्यांमुळे पुढे तिला बोलवेना. तिच्याकडे पाहताना माझे काळीज फाटत होते.

"किती अमानुष कठोरपणा!" ती परत बोलू लागली. "आणि एकही ओळ नाही, एकही ओळ नाही! निदान उत्तर द्यायचं की, त्याला माझी गरज नाही, तो मला टाकून देतोय. पण आख्ख्या तीन दिवसात एकही ओळ नाही! एका गरीब, असहाय मुलीला दुखावणं, तिचा अपमान करणं, किती सोपं वाटतं त्याला! आणि तिचा एकमेव अपराध काय, तर ती त्याच्यावर प्रेम करते! ह्या तीन दिवसात मी काय काय सोसलं! देवा रे देवा! जेव्हा मला आठवण येते, पहिल्यांदा मीच स्वत: त्याच्यापाशी गेले, त्याच्यासमोर खाली झुकले, रडले, निदान थेंबभर प्रेमाची याचना केली... आणि त्यानंतर! ऐका," ती माझ्याकडे वळली आणि तिचे काळे डोळे चमकले, "हे तसं नाही! तसं असणं शक्य नाही! हे अनैसर्गिक आहे! एक तर तुमची अथवा माझी फसगत झाली. कदाचित त्याला पत्र मिळालं नसेल? कदाचित त्याला आत्तापर्यंत काहीच माहीत नसेल? तुम्हीच निर्णय घ्या, देवाशपथ मला सांगा, खुलासा करा – मला हे समजूच शकत नाही – तो माझ्याशी वागला तसं रानटीपणं वागणं कसं शक्य आहे? एकही शब्द नाही! अत्यंत नीच माणसालासुद्धा जगात अनुकंपा दाखवतात. कदाचित त्यानं काहीतरी वावगं ऐकलं, कदाचित कुणीतरी माझ्याबद्दल त्याला काही सांगितलं?" माझ्याकडे वळून तिने ओरडून प्रश्न केला. "काय, तुम्हाला काय वाटतं?"

"ऐका, नास्त्येन्का, उद्या मी तुमच्या वतीनं त्याच्याकडं जातो."

"आणि मग?"

"मी त्याला सारा खुलासा विचारतो, त्याला सगळी हकीकत सांगतो."

"आणि मग?"

"तुम्ही पत्र लिहा. नाही म्हणू नका, नास्त्येन्का, नाही म्हणू नका!

तुमच्या कृतीचा आदर करायला मी त्याला भाग पाडतो, त्याला सगळं माहीत होईल आणि जर..."

"नाही, माझ्या मित्रा, नाही," तिने माझे बोलणे अर्ध्यात तोडले. "खूप झालं! आता माझ्याकडून एकही शब्द, एकही वाक्य लिहिलं जाणार नाही – बस्स! मी त्याला ओळखत नाही, इतःपर मी त्याच्यावर प्रेम करत नाही, मी त्याला विसरून जाईन..."

तिला बोलवेना.

"शांत व्हा, शांत व्हा! इथं बसा, नास्त्येन्का," तिला बाकावर बसवीत मी म्हणालो.

"मी शांत आहे. पूर्णतया! हे विशेष नाही! हे अश्रू सुकून जातील! तुम्हाला काय वाटतं, मी आत्महत्या करीन, पाण्यात उडी घेईन?"

माझा ऊर भरून आला होता. मला बोलावेसे वाटत होते, पण तोंडून शब्द फुटत नव्हता.

"ऐका!" माझा हात धरून ती पुढे म्हणाली. "मला सांगा: तुम्ही तसं वागला नसतात ना? जी स्वतः तुमच्यापाशी आली तिला तुम्ही टाकलं नसतं, तिच्या गरीब, मूर्ख हृदयाबद्दलचा तुमचा निर्लज्ज तिटकारा तिच्या तोंडावर तुम्ही फेकला नसता ना? तुम्ही तिची काळजी घेतली असती ना? ती एकटी होती, तिला स्वतःची जपणूक करता येत नव्हती, तुमच्यावरल्या प्रेमापासून स्वतःचा बचाव करणं तिला जमलं नाही, ती दोषी नाही, सरतेशेवटी ती अपराधी नाही... तिनं काहीही केलेलं नाही, हे तुम्ही समजून घेतलं असतं ना? देवा रे देवा..."

"नास्त्येन्का!" मी ओरडलो. माझ्या मनावरचा माझा ताबा आता सुटला होता. "नास्त्येन्का! तुम्ही माझा छळ करता आहात! तुम्ही माझं काळीज चिरता आहात, तुम्ही मला ठार मारता आहात, नास्त्येन्का! मी गप्प बसू शकत नाही! अखेर मी सांगणं भाग आहे, माझ्या काळजात काय खदखदतंय ते बोलून टाकणं आवश्यक आहे..."

असे बोलून मी बाकावरून उठलो. तिने माझा हात धरला आणि विस्मयाने माझ्याकडे पाहिले.

"काय झालं तुम्हाला?" अखेरीस ती बोलली.

"ऐका!" मी ठामपणे म्हणालो. "ऐका माझं, नास्त्येन्का! आता जे काही मी बोलेन ते सर्व मूर्खपणाचं, निरर्थक, बाष्कळ आहे! मला माहीत आहे की असं कधीही घडणार नाही, पण गप्प बसणं मला अशक्य

आहे. ज्याचा तुम्हाला त्रास होणार आहे, त्याबद्दल आधीच मी तुमची क्षमा मागतो! .."

"पण काय आहे असं?" रडायची थांबत ती म्हणाली. माझ्याकडे रोखलेल्या तिच्या चकित डोळ्यांमध्ये कुतूहल चमकत होते. "काय झालंय तुम्हाला?"

"ह्याला अर्थ नाही, पण माझं तुमच्यावर प्रेम आहे, नास्त्येन्का! ऐकलंत! आता सगळं सांगून झालं!" हात झटकीत मी म्हणालो. "आता पहा, माझ्याबरोबर बोलत होतात तसं बोलणं शक्य आहे का, मी जे तुम्हाला सांगणार आहे ते तुम्ही ऐकू शकाल का..."

"का नाही, का नाही?" नास्त्येन्काने माझे बोलणे तोडले. "काय बिघडलं? मला केव्हापासून माहीत होतं की, तुमचं माझ्यावर प्रेम आहे, फक्त मला भासलं की, तुमचं हे प्रेम वेगळ्या तऱ्हेचं आहे... आह्, देवा रे देवा!"

"सुरवातीला तसं होतं, नास्त्येन्का, पण आता, आता... मला नेमकं तसंच वाटतंय, जसं तुम्ही गाठोडं घेऊन प्रथम त्याच्याकडं गेलात तेव्हा तुम्हाला वाटलं होतं. नास्त्येन्का, तुमच्यापेक्षा माझी अवस्था जास्त वाईट आहे, कारण त्यावेळी त्याचं दुसऱ्या कुणावरही प्रेम नव्हतं, पण तुम्ही प्रेम करताय!"

"तुम्ही मला हे काय सांगताय! आता मात्र मला तुम्ही मुळीच समजेनासे झालात! अहो पण कशाला, नव्हे, का, म्हणून तुम्हाला अचानक... देवा! मी मूर्खासारखं बोलतेय! पण तुम्ही..."

आणि नास्त्येन्का पुरती गोंधळून गेली. तिचे गाल लाल झाले, तिची नजर खाली वळली.

"काय करायचं, नास्त्येन्का, मी काय करू! मी अपराधी आहे, मी गैरफायदा घेतला... पण नाही, नाही, मी दोषी नाही, नास्त्येन्का. मला हे ऐकू येतंय, जाणवतंय, कारण माझं काळीज मला सांगतंय की, माझं बरोबर आहे, कारण मी तुम्हाला दुखवू शकत नाही, तुमचा अपमान करू शकत नाही! मी तुमचा मित्र होतो. आणि आताही मित्र आहे. मी तुमचा विश्वासघात केलेला नाही. पहा, आता माझ्या डोळ्यातून आसवं टपकताहेत, नास्त्येन्का. खुशाल वाहू देत, खुशाल, त्यांचा कुणालाही त्रास नाही. ती वाळतील, नास्त्येन्का..."

"बसा, बसा ना," मला बाकावर बसवीत ती म्हणाली. "ओह्, देवा रे!"

"नाही! नास्त्येन्का, मी नाही बसणार. आता मी यापुढं इथं थांबू शकत नाही. यापुढं तुम्ही मला पाहू शकणार नाही. मी सगळं सांगतो आणि निघून जातो. मला एवढंच सांगायचं की, मी तुमच्यावर प्रेम करतोय हे तुम्हाला कधीही समजलं नसतं. मी माझं गुपित राखून ठेवलं असतं. माझ्या अहंकारापायी मी ह्या क्षणाला तुम्हाला छळतोय, तसं छळलं नसतं. नाही! पण आता मला सहन होत नाही. तुम्हीच हे बोलणं सुरू केलंत, तुम्ही दोषी आहात, सर्व गोष्टींना तुम्हीच दोषी आहात, मी नव्हे. तुम्ही मला स्वतःपासून दूर लोटू शकत नाही..."

"नाही हो, मुळीच नाही, मी तुम्हाला दूर लोटत नाही!" गरीब बिचारी नास्त्येन्का स्वतःचा गोंधळ लपविण्याचा प्रयत्न करीत म्हणाली.

"तुम्ही मला हाकलून लावत नाही? नाही! मी स्वतःच तुमच्यापासून पळून जाणार होतो. मी जाईन, पण आधी सगळं सांगतो, कारण जेव्हा तुम्ही इथं बोलत होतात, तेव्हा मला बसणं अशक्य झालं होतं. जेव्हा तुम्ही इथं रडत होतात, जेव्हा तुमचा त्या विचारानं... त्या... (नास्त्येन्का, आता त्याचा मी उच्चार करतो), तुमचा त्याग करताहेत, तुमच्या प्रेमाला लाथाडताहेत अशा विचारानं तुमच्या मनाचा छळ चालला होता, तेव्हा मला जाणवलं, मला ऐकू आलं की, माझ्या हृदयात तुमच्याबद्दल किती अपार प्रेम साठलंय, नास्त्येन्का, किती किती प्रेम साठलंय!.. आणि ह्या प्रेमाच्या साह्यानं मी तुम्हाला मदत करू शकत नाही ह्याचं मला दुःख झालं... माझं काळीज विदीर्ण झालं आणि मी, मी—गप्प राहू शकलो नाही, मी बोलणं आवश्यक होतं, नास्त्येन्का, आवश्यक होतं!.."

"होय, होय! बोला, माझ्याशी बोला असं!" संदिग्ध हालचाल करीत नास्त्येन्का म्हणाली. "मी तुमच्याशी असं बोलतेय म्हणून तुम्हाला कदाचित विचित्र वाटत असेल, पण... बोला! मी नंतर सांगीन! मी तुम्हाला सगळं सांगीन!"

"तुम्हाला माझी कीव वाटते, नास्त्येन्का. माझ्या लाडक्या मैत्रिणी, तुम्हाला माझी केवळ दया येते! जे घडलं ते घडलं! जे तोंडून बाहेर पडलं ते मागं फिरवता येत नाही! खरं ना? तर आता तुम्हाला सगळं माहीत आहे. हा आपला आरंभबिंदू. छान! आता हे सगळं सुरेख आहे.

फक्त ऐका. जेव्हा तुम्ही बसून रडत होतात, तेव्हा मी स्वतःबद्दल विचार केला (ओह्, माझ्या मनात काय आलं ते सांगू द्या मला!), मी विचार केला, की (अर्थात असं कधीही घडणार नाही, नास्त्येन्का), मला वाटलं, की तुम्ही... मला वाटलं की तुम्ही, अगदी तटस्थ रीतीनं, इतःपर त्याच्यावर प्रेम करत नाही. तेव्हा – ह्याबद्दल मी काल आणि परवा विचार केला, नास्त्येन्का – तेव्हा मी असं करीन, नेमकं असं करीन, की तुमचं माझ्यावर प्रेम बसेल. तसं तुम्हीच म्हणालात, स्वतःच सांगितलंत, नास्त्येन्का, की तुम्ही माझ्या प्रेमात पडायच्या अगदी बेतात होतात. पण पुढं काय? मला वाटतं, हेच मला सांगायचं होतं. बाकी सांगायचं एवढंच उरलंय की, जर तुम्ही माझ्या प्रेमात पडला असतात तर काय झालं असतं! आणखी काही नाही! माझ्या सखी, ऐका – कारण काही झालं तरी तुम्ही माझी मैत्रीण – अर्थात मी एक साधा माणूस, गरीब, अगदी क्षुल्लक, पण मुद्दा तो नव्हे (मनाच्या गोंधळापायी मी भलतंच काहीतरी बोलतोय, नास्त्येन्का), मी तुमच्यावर असं प्रेम केलं असतं, असं प्रेम केलं असतं, की माझ्या प्रेमाचं तुम्हाला कधीही ओझं भासलं नसतं; जरी मला माहीत नसलेल्या त्या माणसावर तुम्ही प्रेम केलं असतं आणि पुढंही प्रेम करत राहिला असतात, तरी! तुमच्यापाशी एक कृतज्ञ, एक उपकृत गरम काळीज तुमच्यासाठी धडधडतंय एवढं तुम्ही ऐकलंत, दर मिनिटाला जाणवून घेतलंत म्हणजे पुरे... ओह्, नास्त्येन्का, नास्त्येन्का! तुम्ही माझी काय ही अवस्था केलीत!.."

"रडू नका ना, तुम्ही रडावं अशी माझी इच्छा नाही," बाकावरून पटकन उठत नास्त्येन्का म्हणाली. "चला, उठा, माझ्याबरोबर चला, रडू नका ना, रडू नका," स्वतःच्या रुमालाने माझे अश्रू पुसत ती म्हणाली. "आता चला पाहू. कदाचित मी तुम्हाला काहीतरी सांगत्ये... आता त्यानं मला टाकलंय, मला तो विसरलाय, पण तरीही मी त्याच्यावर अजून प्रेम करतेय (तुम्हाला फसवू इच्छित नाही)... पण मला उत्तर द्या. उदाहरणार्थ, जर मी तुमच्या प्रेमात पडले असते, म्हणजे मी फक्त... ओह्, माझ्या मित्रा, माझ्या मित्रा! जेव्हा मला आठवतं, जेव्हा विचार करते, तुमच्या प्रेमाला त्यावेळी हसून मी तुम्हाला किती घायाळ केलं, तुम्ही माझ्या प्रेमात पडला नाहीत म्हणून तुमची वाखाणणी केली!.. देवा रे! कसं हे आधी माझ्या ध्यानात आलं नाही, कशी मी मूर्ख होते, पण... मी निश्चय केलाय, मी सगळं सांगत्ये..."

"ऐका, नास्त्येन्का, काय ठाऊक आहे? मी तुमच्यापासून दूर निघून जातो. मी तुमचा निव्वळ छळ करतोय. तुम्ही मला हसलात म्हणून तुमची विवेकबुद्धी तुम्हाला टोचू लागलीय आणि माझी इच्छा नाही, मुळीच इच्छा नाही की, तुमच्या दुःखात आणखी ही भर पडावी... अर्थात, मी दोषी आहे, नास्त्येन्का, अच्छा!"

"थांबा, ऐका माझं. तुम्ही वाट पाहू शकता?"

"कशाची वाट पाहू? कशी?"

"माझं त्याच्यावर प्रेम आहे. पण ते नाहीसं होईल, ते नाहीसं होणं आवश्यक आहे, ते नाहीसं होणार नाही असं शक्य नाही. एव्हाना ते जाऊ लागलंय, मी ऐकतेय... कोण जाणे, कदाचित आजच ते नाहीसं होईल, कारण मला तो नजरेसमोर नकोसा झालाय, कारण त्यानं माझा अपमान केलाय, उलट तुम्ही इथं माझ्याबरोबर रडलात, तुम्ही माझ्यावर प्रेम करता आणि त्याच्याप्रमाणं तुम्ही माझा त्याग करत नाही, पण त्यानं माझ्यावर प्रेम केलं नाही आणि कारण सरतेशेवटी मी स्वतः तुमच्यावर प्रेम करतेय... होय, प्रेम करतेय! जसं तुम्ही माझ्यावर प्रेम करता, तसंच मी तुमच्यावर प्रेम करतेय. मी स्वतःच यापूर्वी तुम्हाला तसं सांगितलं, तुम्ही तुमच्या कानांनी ऐकलंत–तुमच्यावर प्रेम करते, कारण त्याच्यापेक्षा तुम्ही जास्त चांगले आहात, कारण त्याच्यापेक्षा तुम्ही जास्त सज्जन आहात, कारण, कारण, की तो..."

बिचारी एवढी गदगदून गेली होती, की तिला वाक्य पूर्ण करणे अशक्य ठरले. तिने माझ्या खांद्यावर तिचे डोके टेकविले, मग छातीवर टेकविले आणि ती हमसाहमशी रडू लागली. मी तिचे सांत्वन केले, तिची समजूत घातली, पण तिला रडे आवरेना. माझा हात दाबत हुंदकत हुंदकत ती म्हणाली: "थांबा, थांबा! आत्ता मी रडणं आवरते! मला सांगायचंय... तुम्ही अशी समजूत करून घेऊ नका... हे अश्रू... निव्वळ दुबळेपणापायी... माझा आवेग ओसरेपर्यंत थांबा..." अखेर तिचे रडणे थांबले. तिने अश्रू पुसले आणि आम्ही परत चालू लागलो. मी बोलणार होतो, पण तिने मला थांबायची विनवणी केली. आम्ही गप्प राहिलो... अखेरीस तिने मनाला सावरले आणि ती बोलू लागली...

"त्याचं असं आहे," तिने क्षीण आणि कापऱ्या आवाजात आरंभ केला. पण त्या आवाजात अचानक अशी काही धार उमटली, की ती थेट माझ्या काळजाला जाऊन भिडली आणि एक गोडसर ठणक जाणवू

लागली. "मी अशी विसंगत आणि चंचल आहे असं समजू नका. एवढ्या सहज मी सारं विसरून जाईन आणि विश्वासघात करीन असं समजू नका... मी सबंध वर्ष त्याच्यावर प्रेम केलं आणि देवाशपथ सांगत्ये, कध्धी कध्धी विचारातसुद्धा मी त्याच्याशी अप्रामाणिक वागले नाही. त्यानं माझ्या निष्ठेची हेटाळणी केली, माझी प्रतारणा केली – देव त्याचं रक्षण करो! पण त्यानं माझं काळीज चिरलं, त्याला दुखावलं. मी – मी त्याच्यावर प्रेम करत नाही, कारण जो विशाल मनाचा आहे, जो मला समजून घेतो, जो सज्जन आहे, त्याच्यावरच मी प्रेम करू शकते. कारण मी स्वत: तशी आहे आणि तो मला लायक नाही – जाऊं दे! त्यानं चांगलंच केलं, माझा नंतर अपेक्षाभंग होण्यापेक्षा आणि नंतर त्याची खरी ओळख पटण्यापेक्षा... संपलं सारं! कुणास ठाऊक, माझ्या भल्या मित्रा," माझा हात दाबत ती पुढे म्हणाली, "कुणास ठाऊक, माझं खुद्द हे प्रेमच एक खोटी भावना होतं, कल्पनेचा खेळ होतं. कदाचित खटयाळपणातून, मूर्खपणातून त्याचा आरंभ झाला, कारण मी सतत आजीच्या कडक नजरेखाली होते? कदाचित त्याच्यावर नव्हे, तर दुसऱ्या कुणावर, त्याच्यासारख्या नसलेल्यावर, माझी कीव करणाऱ्यावर मी प्रेम केलं पाहिजे आणि, आणि... सोडून देऊ, सोडून देऊ हा विषय," अस्वस्थतेपायी श्वास घुसमटून नास्त्येन्काने स्वत:चे बोलणे तोडले. "मी तुम्हाला एवढंच सांगणार होते... मला सांगायचं होतं की, मी जरी त्याच्यावर प्रेम करत असले (नाही, प्रेम करत होते), तसं असलं तरीसुद्धा, तुम्ही पुन्हा एकदा सांगा... तुमचं प्रेम तेवढं महान आहे असं तुम्हाला जर जाणवत असेल, अखेरीस ते माझ्या काळजातून पहिल्या प्रेमाला पळवून लावण्यास समर्थ असेल... जर तुम्हाला माझी करुणा वाटत असेल, मला एकाकी, परित्यक्त, निराश अवस्थेत माझ्या नशीबावर सोपवून देण्याची तुमची जर इच्छा नसेल, आत्ता माझ्यावर प्रेम करताय तसं नेहमी माझ्यावर प्रेम करण्याची तुमची जर इच्छा असेल, तर शपथपूर्वक सांगत्ये की, माझी कृतज्ञता... माझं प्रेम अखेरीस तुमच्या प्रेमाला लायक ठरेल... आता माझ्या हाताचा स्वीकार कराल?"

"नास्त्येन्का," मी ओरडलो आणि हुंदक्यापायी माझा श्वास गुदमरला. "नास्त्येन्का! .. ओ नास्त्येन्का! .."

"पुरे, पुरे! आता अगदी पुरे!" स्वत:चा कसाबसा तोल सांभाळीत ती म्हणाली. "आता सारं सांगून झालंय. खरं ना? काय? तुम्ही सुखी आहात आणि मीसुद्धा सुखी आहे. याबद्दल आता आणखी एक शब्द उच्चा-

रायचा नाही. थांबा, माझ्यावर दया करा... देवाशपथ, दुसऱ्या कसल्यातरी विषयावर बोला! .."

"होय, नास्त्येन्का, होय! याबद्दल पुरे झालं. आता मी भाग्यवान आहे, मी... नास्त्येन्का, दुसऱ्या कशाबद्दल तरी लौकर बोलू, अगदी लौकर! होय, मी तयार आहे..."

आणि काय बोलायचे ते आम्हाला सुचेना. आम्ही हसलो, आम्ही रडलो, आम्ही हजारो असंबद्ध, अर्थहीन शब्द बोललो. कधी फूटपाथवरून फिरलो, तर कधी अचानक माघारी फिरलो आणि रस्ता ओलांडू लागलो. मग थबकलो आणि परत नदीतीराशी आलो. आम्ही लहान मुलांप्रमाणे वागत होतो...

"मी सध्या एकटा राहतो, नास्त्येन्का," मी बोलू लागलो, "पण उद्या... अर्थात, नास्त्येन्का, मी गरीब आहे. मला वर्षाला फक्त बाराशे मिळतात, पण काही हरकत नाही..."

"अर्थात हरकत नाही. शिवाय आजीची पेन्शन आहे. ती आपल्याला अडचण होणार नाही. आजीला बरोबर घेतलं पाहिजे."

"अर्थात, आजीला आपल्याबरोबर घेतलं पाहिजे... पण मात्र्योना..."

"आह्, आमच्याकडंसुद्धा फ्योक्ला आहे!"

"मात्र्योना प्रेमळ आहे, फक्त एक उणीव आहे तिच्यात. तिला कल्पनाशक्ती नाही, नास्त्येन्का, अजिबात कल्पनाशक्ती नाही. पण काही हरकत नाही! .."

"काही हरकत नाही. त्या दोघी एकत्र राहू शकतील. मात्र तुम्ही उद्याच आमच्याकडं मुक्काम हलवा."

"म्हणजे? तुमच्याकडं? छान, माझी तयारी आहे..."

"होय, तुम्ही आमच्याकडं रहा. आमच्याकडं वरती पोटमाळा आहे. तो मोकळा पडलाय. एक म्हातारी, चांगल्या कुळातली बाई भाडेकरू होती, पण ती निघून गेली. आणि एका तरुण माणसाला भाडेकरू म्हणून घ्यायचा आजीचा विचार आहे. मी म्हणाले: 'कशाला तरुण माणूस?' ती म्हणते: 'मी आता म्हातारी झाल्ये, पण, नास्त्येन्का, तू अशी मात्र समजूत करून घेऊ नको, की तुझी त्याच्याशी सोयरीक जोडायचा मी प्रयत्न करतेय.' मी ओळखलं की, तिचा तोच बेत आहे..."

"आह्, नास्त्येन्का!"

आणि आम्ही दोघेही खदखदून हसलो.

"आता पुरे झालं, पुरे. तुम्ही कुठं राहता? मी विसरलेच."

"तिथं, पुलापाशी, बरान्नीकोवच्या घरात."

"तेवढ्या मोठ्या घरात?"

"होय, तेवढ्या मोठ्या घरात."

"माहीत आहे, छान घर आहे. पण तुम्ही सोडा ते घर आणि लौकरात लौकर आमच्याकडं रहायला या..."

"उद्याच, नास्त्येन्का, उद्याच. तिथं मी थोडं भाडं देणं आहे, पण ते काही विशेष नाही... लौकरच माझा पगार होईल..."

"कदाचित मी शिकवण्या करीन. स्वत: शिकेन आणि शिकवण्याही करीन..."

"हे झकास... आणि मला लौकरच बढती मिळेल, नास्त्येन्का..."

"तर तुम्ही उद्या माझे भाडेकरू बनणार..."

"होय, आणि आपण 'सेविलचा न्हावी' पहायला जाऊ, कारण लौकरच त्याचे परत खेळ सुरू होणार आहेत."

"होय, जाऊ," नास्त्येन्का हसून म्हणाली. "नाही, त्यापेक्षा आपण दुसरा एखादा खेळ पाहू, 'न्हावी' नको..."

"ठीक आहे, दुसरा एखादा खेळ पाहू. ते जास्त चांगलं होईल. माझ्या ध्यानात आलं नाही..."

अशा रीतीने बोलत आम्ही धुंद मन:स्थितीत भटकत होतो, आम्हाला काय होत होते ह्याची आमची आम्हालाच जणू जाणीव होत नव्हती. कधी एका जागी थांबून खूप वेळपर्यंत गप्पा मारीत होतो, तर कधी परत चालत होतो आणि कुठे कुठे भटकत होतो देव जाणे... परत हसणे, परत अश्रू... अचानक नास्त्येन्काला घरी जावेसे वाटायचे आणि तिला थोपवायची माझी हिंमत व्हायची नाही, पण तिला अगदी तिच्या घरापर्यंत सोबत करायची मला इच्छा असायची. आम्ही वाट चालू लागायचे. आणि अचानक पाव तासानंतर परत नदीतीरी आमच्या बाकापाशी स्वत:ला आढळायचे. एकदम ती सुस्कारते आणि परत डोळ्यांमधून आसवे ओघळू लागतात. मी घाबरतो, माझे शरीर गार पडते... पण तेवढ्यात ती माझा हात दाबते आणि परत मला घेऊन चालू लागते, बडबडू लागते, बोलू लागते...

"आता मात्र खरंच मला घरी गेलं पाहिजे. मला वाटतं, खूप उशीर

झाला," अखेरीस नास्त्येन्का म्हणाली. "आपला पोरकटपणा बास्स झाला!"

"होय, नास्त्येन्का, मात्र आता मला झोप लागणार नाही. मी घरी जात नाही."

"मलासुद्धा झोप येणार नाही असं वाटतं. पण घरापर्यंत सोबत करा माझी..."

"अर्थात!"

"आता मात्र नक्की घरापर्यंत जायचं."

"नक्की, अगदी नक्की..."

"शप्पत? कारण कधी तरी घरी परतलं पाहिजे."

"अगदी शप्पत," मी हसून उत्तरलो.

"चला!"

"चला."

"आकाशाकडं पहा, नास्त्येन्का, पहा! उद्या फार छान दिवस उगवेल. किती निळं आकाश, किती सुंदर चंद्र! पहा: तो पिवळा ढग आता चंद्राला झाकून टाकतोय, पहा, पहा!... नाही, तो जवळून निघून गेला. बघा ना, बघा!"

पण नास्त्येन्का ढगाकडे पहात नव्हती. ती पुतळ्याप्रमाणे स्तब्ध उभी होती. मिनिटभरानंतर ती मला घाबरत बिलगू लागली. माझ्या हातातील तिचा हात थरथरत होता. मी तिच्याकडे पाहिले... ती मला अधिकच बिलगली.

त्या क्षणाला आमच्या जवळून एक तरुण माणूस चालत गेला. तो अचानक थबकला, आमच्याकडे त्याने न्याहाळून पाहिले आणि काही पावले टाकली. माझ्या काळजात धडधडले...

"नास्त्येन्का," मी अस्फुट आवाजात म्हणालो, "हा कोण, नास्त्येन्का?"

"हा तोच!" मला अधिक बिलगत ती पुटपुटली. तिचा थरकाप वाढला होता. माझेही अवसान गळाले.

"नास्त्येन्का! नास्त्येन्का! तू आहेस!" आमच्यापाठी आवाज ऐकू आला आणि त्याच क्षणी तरुणाने आमच्या दिशेने काही पावले टाकली...

देवा, कसली किंचाळी! केवढी ती दचकली! कशी ती माझ्या हाताला झटकून त्याला भेटायला धावली! मी पूर्ण हताशपणे उभा राहून

त्यांच्याकडे पहात होतो. तिने जेमतेम त्याला हात दिला, जेमतेम त्याला आलिंगन दिले आणि परत ती माझ्याकडे वाऱ्यासारखी, विजेच्या वेगाने धावली. मी स्वतःला सावरायच्या आतच तिने माझ्या मानेभोवती दोन्ही हातांचा विळखा घातला आणि माझे आवेगाने दीर्घ चुंबन घेतले. मग मला उद्देशून एकही शब्द न बोलता परत ती त्याच्यापाशी धावली, तिने त्याचा हात धरला व स्वतःबरोबर त्याला ती घेऊन गेली.

त्यांच्या पाठमोऱ्या आकृतींकडे खूप वेळ टक लावून पहात मी उभा होतो... अखेरीस ती दोघेही माझ्या नजरेआड नाहीशी झाली.

सकाळ

माझ्या रात्री सकाळी संपल्या. दिवस वाईट होता. पाऊस कोसळत होता आणि माझ्या खिडकीच्या काचेवर उदास टपटप वाजत होता. खोलीत अंधार झाला होता, बाहेर वातावरण कुंद होते. माझे डोके दुखत होते आणि गरगरत होते. माझ्या अंगात ताप चढत होता.

"बाप्पा, तुमचं पत्र आलंय. पोस्टमननं आणून दिलं," मात्र्योना मला म्हणाली.

"पत्र? कुणाकडून?" खुर्चीवरून ताडकन उठत मी ओरडलो.

"मला माहीत नाही, बाप्पा, तुम्हीच पहा. कदाचित त्यावर लिहिलं असेल, कुणाकडून."

मी मोहोर तोडली. ते तिच्याकडून आले होते!

"मला क्षमा करा, क्षमा करा!" नास्त्येन्काने मला लिहिले होते, "तुमच्यासमोर गुडघे टेकून विनंती करते, क्षमा करा मला! मी तुम्हाला आणि स्वतःला फसवलं, ते स्वप्न होतं, आभास होता... आज तुमच्या विचारानं मी उदास झालेय. माफ करा, माफ करा मला!

"मला दोषी ठरवू नका, कारण मी तुमच्याविषयी माझ्या भावना मुळीच बदललेल्या नाहीत. मी म्हणाले होते की, तुमच्यावर मी प्रेम करीन, आताही तुमच्यावर प्रेम करतेय, प्रेमापेक्षाही जास्त! देवा रे! जर तुम्हा दोघांवरही एकाच वेळी प्रेम करू शकले तर! जर तुम्ही तो असतात तर!"

"जर तो तुम्ही असता तर!" माझ्या डोक्यात चमकून गेले. मी तुझेच शब्द आठवले, नास्त्येन्का!

"तुमच्यासाठी मी आता काय काय केलं असतं ते देव पाहतोय! तुम्हाला खूप जड जातंय, दुःख होतंय, हे मला माहीत आहे. मी तुम्हाला दुखवलं, पण जर प्रेम करत असशील तर अपमान कुणी फार वेळ मनात धरून ठेवतं का? आणि तुम्ही माझ्यावर प्रेम करता!

"धन्यवाद! होय! ह्या प्रेमाबद्दल तुमचे आभार. कारण जागं झाल्या-नंतर एखादं गोड स्वप्न खूप वेळपर्यंत आठवत राहतं, त्याप्रमाणं माझ्या आठवणीत तुमचं प्रेम कोरलं गेलंय. ज्या बंधुवत प्रेमानं तुम्ही स्वतःचं अंतःकरण माझ्यासमोर मोकळं केलंत आणि माझ्या विदीर्ण काळजाला जपण्यासाठी, सांभाळण्यासाठी आणि बरं करण्यासाठी ज्या उदारपणं त्याचा स्वीकार केलात, तो क्षण मी कायम आठवत राहीन. जर तुम्ही मला क्षमा केलीत, तर तुमच्याबद्दलच्या चिरंतन कृतज्ञभावनेचं वलय माझ्या स्मृतीभोवती सदैव राहील, माझ्या काळजावरून ती भावना कधीही पुसली जाणार नाही. ही स्मृती मी जपून ठेवीन, तिच्याशी प्रामाणिक राहीन, ती फार सातत्यशील आहे. फक्त कालचीच रात्र, पण किती चटकन ती ज्याची होती त्याकडं कायमची उडून गेली!

"आपण भेटू, तुम्ही आमच्याकडं या, आम्हाला सोडू नका, तुम्ही माझे कायम मित्र, भाऊ म्हणून रहा... आणि जेव्हा मला भेटाल, तेव्हा तुमचा हात मला द्या... होय ना? तुम्ही तुमचा हात मला द्या, तुम्ही मला क्षमा केलीत, खरं ना? तुम्ही माझ्यावर **पूर्वीप्रमाणंच** प्रेम करता ना?

"आह्, माझ्यावर प्रेम करा, मला टाकू नका, कारण ह्या क्षणाला मी तुमच्यावर अत्यंत प्रेम करतेय, कारण तुमच्या प्रेमाला मी लायक आहे, कारण त्याला लायक असं मी वागणार... माझ्या मित्रा, लाडक्या! पुढच्या आठवड्यात मी त्याच्याशी लग्न करतेय. तो माझ्यावर आषक्त बनून परतलाय, तो मला कधीही विसरला नव्हता... मी त्याच्याबद्दल लिहिलं म्हणून रागावू नका. त्याच्यासह तुमच्याकडं यायची माझी इच्छा आहे. तुम्हाला तो आवडेल, खरं ना?

"आम्हाला क्षमा करा. आठवण ठेवा आणि प्रेम करा तुमच्या

नास्त्येन्कावर!"

हे पत्र मी अनेकदा पुनःपुन्हा वाचले. मला रडावेसे वाटत होते. अखेरीस ते पत्र माझ्या हातून गळून खाली पडले आणि मी तोंड हातांच्या ओंजळीत झाकून घेतले.

"बाप्पा रे बाप्पा!" मात्र्योना उद्गारली.

"काय, म्हातारे?"

"छतावरची कोळीष्टकं तर मी सगळी झाडून काढली. आता खुशाल लगीन करा, पाहुण्यांना बोलवा..."

मी मात्र्योनाकडे पाहिले... ही अजून धट्टीकट्टी, **तरुण** म्हातारी होती. पण का कोण जाणे, अचानक मला ती वाकलेली जख्ख म्हातारी भासली. तिच्या डोळ्यांमध्ये तेज नव्हते. तिचा चेहरा सुरकुत्यांनी भरून गेला होता... का कोण जाणे, पण मला भासले की, त्या म्हातारी-प्रमाणे माझी खोलीही जख्ख म्हातारी बनली होती. तक्तपोशी आणि भिंती डागाळल्या होत्या, सगळे मलिन बनले होते. कोळीष्टके आणखी वाढली होती. का कोण जाणे, पण जेव्हा मी खिडकीतून बाहेर नजर टाकली, तेव्हा मला भास झाला की, समोरचे घरही जुनाट आणि विटके बनले होते, खांबांवरचा गिलावा निखळून पडला होता, नक्षीदार कंगोरे काळ-वंडले होते आणि चकचकीत पिवळ्या भिंती कबऱ्या रंगाच्या बनल्या होत्या...

किंवा मेघांआडून अनपेक्षितपणे बाहेर डोकावलेला सूर्यकिरण पावसाच्या ढगामागे लपला म्हणून असेल कदाचित, पण माझ्या नजरेला परत सर्व मलिन भासू लागले. किंवा कदाचित माझ्या भविष्याचा अंधारमय आणि विषण्ण देखावा नजरेसमोर उभा राहिला म्हणून असेल, मी स्वतःला आत्ता आहे तसा पाहिले, बरोब्बर पंधरा वर्षांनंतर, वृद्धत्वाकडे झुकलेला, हीच खोली, असेच एकलेपण, हीच मात्र्योना, ह्या काळात मुळीच शहाणी न बनलेली.

पण माझे अपमान मी आठवेन काय, नास्त्येन्का! तुझ्या तेजस्वी, निष्कलंक सुखावर काळा मेघ मी लोटीन काय! कडवट दूषणांपायी तुझ्या काळजात दुःख निर्माण करीन काय, विवेकाच्या गुप्त वेदनांनी त्याला घायाळ करीन काय, उन्मादक्षणी त्याला कळवळायला लावीन काय, जेव्हा त्याच्याबरोबर विवाहवेदीवर चालत जाशील तेव्हा तुझ्या काळ्या कुरळ्या बटांमध्ये माळलेल्या नाजुक फुलांपैकी निदान एक तरी फूल मी चुरडीन काय... कधीही नाही, कधीही नाही! तुझे आकाश निरभ्र राहो, तुझे

गोड स्मित तेजस्वी आणि प्रसन्न राहो; दुसऱ्या एका एकाकी, कृतज्ञ माणसाला तू भाग्याच्या आणि सुखाच्या क्षणाचा लाभ करून दिलास, म्हणून तुझे सतत कल्याण होवो!

देवा! पूर्ण मिनिटभर भाग्य! माणसाच्या संपूर्ण आयुष्यासाठी हे काय कमी आहे?..

१८४८

एक ओंगळ घटना

लघुकथा [43]

ही ओंगळ घटना तेव्हा घडली, जेव्हा आमच्या परमप्रिय पितृभूमीत अदम्य बळाने आणि भाबडया व हेलावणाऱ्या भावनेने पुनरुत्थान नुकतेच सुरू झाले होते, सगळ्या शूर पुत्रांची मने नव्या भवितव्यांच्या कल्पनांनी आणि आशांनी पेटून उठली होती. तेव्हा, एका हिवाळी रात्री, गोठलेल्या थंडीत, अकरा वाजून गेल्यानंतरच्या सुमारास, तीन अत्यंत प्रतिष्ठित गृहस्थ, पीटरबुर्ग विभागातील एका दुमजली घरातील एका झकास आरामशीर खोलीत बसले होते व कमालीच्या स्वारस्यपूर्ण विषयावर वजनदार आणि उदात्त संभाषण करण्यात गुंतले होते. हे तीनही सद्‌गृहस्थ जनरल पदाचे मानकरी होते. एका छोटया मेजाभोवती ते बसले होते. प्रत्येकजण गुबगुबीत आरामखुर्चीत विसावला होता आणि गप्पा मारताना शांतपणे व आरामशीरपणे शँपेनचे घुटके घेत होता. मेजावर बर्फाने अर्ध्या भरलेल्या चांदीच्या पात्रात बाटली उभी होती. गोष्ट अशी की, गुप्त सल्लागार स्तेपान निकीफोरोविच निकीफोरोव, पासष्ट वर्षांचे कट्टर ब्रह्मचारी, नुकत्याच विकत घेतलेल्या ह्या घराची वास्तुशांती साजरी करीत होते व त्याचवेळी स्वतःचा वाढदिवसही – जो आजवर त्यांनी कधीही साजरा केला नव्हता – साजरा करीत होते. अर्थात हा उत्सव काही फार मोठा नव्हता. आपण आधी पाहिलेच आहे त्याप्रमाणे तेथे फक्त दोन पाहुणे होते – दोघेही श्रीमान निकीफोरोव यांचे माजी सहकारी आणि हाताखालचे कर्मचारी व राज्य-सल्लागार. त्यांची नावे: सेम्योन इवानोविच शिपूलेन्को आणि इवान इल्यिच प्रालीन्स्की. ते नऊ वाजायच्या सुमाराला आले, चहा प्यायले, मग शँपेन सुरू केली व बरोब्बर साडेअकरा वाजता त्यांनी घरी जायला पाहिजे होते हे त्यांना आधीच माहीत होते. त्यांचे यजमान

नियमित जीवनाचे भोक्ते होते. दोन शब्द त्यांच्याबद्दल: तुटपुंज्या प्राप्तीचा कनिष्ठ अंमलदार म्हणून त्यांनी कारकीर्द सुरू केली, शांतपणे पंचेचाळीस वर्षे रखडत काढली, शेवटी कुठले पद मिळणार ह्याची पूर्ण जाणीव होती, आकाशातल्या ताऱ्यांना गवसणी घालण्याची स्वप्नातसुद्धा महत्त्वाकांक्षा बाळगली नाही, पण एव्हाना दोन ताऱ्यांचा सन्मान मिळाला होता, आणि कोणत्याही स्थितीत एखाद्या विषयावर स्वतःचे मत प्रकट करणे त्यांना मुळीच आवडत नव्हते. ते प्रामाणिक होते, म्हणजे मुद्दाम अप्रामाणिक वागण्याची त्यांना जरूरी पडली नाही. ते अविवाहित राहिले, कारण फार स्वार्थी होते. फारसे मूर्ख नव्हते, पण स्वतःच्या बुद्धीचे प्रदर्शन करणे आवडत नसे. त्यांना सर्वांत जास्त तिरस्कार होता अव्यवस्थितपणाचा आणि अतिउत्साहाचा. ह्या अतिउत्साहाला ते नैतिक अव्यवस्थितपणा समजत आणि आयुष्याच्या अखेरी स्वतःच्या अस्तित्वाच्या मधुर, सुस्त आरामात व एकांतवासात ते संपूर्ण रमून गेले होते. अधिक चांगल्या दर्जाच्या माण-सांकडे कधी कधी ते पाहुणे म्हणून जातात, पण तरुणपणापासूनच त्यांना स्वतःकडे पाहुणे आलेले मुळीच खपत नव्हते. अलीकडे, जेव्हा ते ग्रॅन्ड पेशन्सचा डाव मांडून बसत नसत, तेव्हा त्यांच्या खोलीतील घड्याळाच्या संगतीत समाधानाने बसून रहात. गुबगुबीत आरामखुर्चीत पडून आख्खी संध्याकाळ त्या घड्याळाची टिकटिक निवांतपणे ऐकत रहात. त्यांचे दर्शन पूर्णतया प्रतिष्ठित होते, दाढी नेहमी गुळगुळीत घोटलेली असायची, स्वतः-च्या वयापेक्षा लहान दिसत, प्रकृती उत्तम राखली होती आणि अजून प्रदीर्घ काळ जगतील असे दिसत होते. त्यांचे वागणे अत्यंत सभ्य होते. त्यांचे पद अत्यंत आरामदायी होते: काही बैठकांना उपस्थित रहायचे आणि काही कागदपत्रांवर सह्या करायच्या. थोडक्यात, त्यांना उत्तम माणूस समजत. त्यांना एकच हवस होती, अथवा त्याहून अधिक चांगले सांगायचे तर, एकच पेटती इच्छा होती: स्वतःचे घर असण्याची. अस्सल खानदानी घर, केवळ राहती जागा नव्हे. ही इच्छा अखेर पूर्ण झाली होती: पीटरबुर्ग प्रदेशात त्यांनी घर पाहून विकत घेतले होते. जरा गावा-पासून दूर असले तरी घराभोवती बाग होती आणि खुद्द घर ऐटदार होते. नव्या मालकाने युक्तिवाद केला होता की, तो गावापासून जेवढा दूर राहील, तेवढे अधिक चांगले आहे, कारण पाहुण्यांची स्वतःच्या घरात गर्बराई करण्याची त्याला मुळीच आवड नव्हती आणि बाहेर जाण्यासाठी व कचेरीत जाण्यासाठी त्याच्यापाशी दोन आसनांची सुरेख चॉकलेट रंगाची

बग्गी होती, मिखेय नावाचा बग्गी चालविणारा होता व छोटया चणीच्या पण भक्कम आणि देखण्या घोड्यांची एक जोडी होती. चाळीस वर्षांच्या काटकसरीचे हे फळ होते, त्यामुळे अंत:करणाला ह्या सर्व गोष्टींचा आनंद मिळत होता. म्हणून हे घर विकत घेऊन त्यात रहायला आल्यानंतर स्तेपान निकीफोरोविचना काळजात एवढे विलक्षण समाधान वाटत होते की, त्यांनी स्वत:च्या वाढदिवसाला साक्षात दोन पाहुण्यांना घरी निमंत्रण केले. वस्तुत: ही तारीख त्यांनी आजपर्यंत अत्यंत जिवलग मित्रांपासून-सुद्धा लपवून ठेवली होती. त्यांच्या एका पाहुण्याबाबत त्यांचे काही विशिष्ट विचार होते. ते स्वत: घराच्या वरच्या मजल्यावर रहात होते आणि त्याच धर्तीच्या खालच्या मजल्यासाठी त्यांना एक भाडेकरू हवा होता. स्तेपान निकीफोरोविच ह्या बाबतीत सेम्योन इवानोविच शिपूलेन्कोवर फार भिस्त ठेवून होते आणि त्या संध्याकाळदरम्यान दोनदा त्यांनी संभाषणाचा ओघ ह्या विषयाकडे वळविला होता. पण सेम्योन इवानोविच खात्रीचा होकार देऊ शकत नव्हते. त्यांनीसुद्धा स्वत:ची कारकीर्द सावकाशपणे आणि श्रमून कोरली होती. त्यांचे केस आणि कल्ले काळे होते व त्यांचा चेहरा सतत काविळीचा विकार झाल्याप्रमाणे दिसायचा. ते विवाहित होते, दुर्मुखले घरबशे होते, घरच्यांना कायम दहशतीत वागवायचे, स्वत:ची कामे अत्यंत आत्मविश्वासाने पार पाडायचे. कोणते पद त्यांना लाभणार ह्याची त्यांना पूर्ण जाणीव होती आणि कोणत्या गोष्टी त्यांना कधीही लाभणार नाहीत ह्याची त्याहून अधिक चांगली जाणीव होती. त्यांची नोकरी चांगली होती व तिला ते घट्ट धरून होते. नव्या युगाची नुकतीच पहाट फुटतेय हे त्यांनी किंचित कडवटपणाने मान्य केले होते, पण त्याबद्दल त्यांना फारशी धास्ती वाटत नव्हती. त्यांचा स्वत:वर विश्वास होता व इवान इल्यिच प्राली-न्स्कींची नव्या विषयांवरील रटाळ वटवट तुच्छ मुद्रेने ऐकत होते. एव्हाना ते सारेच थोडे झिंगले होते आणि खुद्द स्तेपान निकीफोरोविचनी श्रीमान प्रालीन्स्कींबरोबर नव्या युगाबाबत किंचित वाद घालायचा निर्णय केला. आता महामहीम श्रीमान प्रालीन्स्की यांच्याबद्दल चार शब्द सांगितले पाहिजेत, कारण ह्या कथेचे तेच नायक आहेत.

राज्य-सल्लागार इवान इल्यिच प्रालीन्स्की यांना अवघ्या चार महि-न्यांपूर्वीच महामहीम म्हणून संबोधायला आरंभ झाला होता. थोडक्यात, ते नवे जनरल होते. वयानेसुद्धा ते तरुण होते, त्रेचाळीसपेक्षा त्यांचे वय जास्त नव्हते. पण त्यांच्या वयापेक्षा ते अधिक तरुण दिसत आणि तसे

तरुण दिसणे त्यांना आवडत होते. ते उंच, देखणे पुरुष होते. त्यांच्या पोषाखाच्या निवडीबाबत त्यांना अभिमान होता, त्यांचा बहुमानाचा तारा ते रुबाबात लावीत, लहानपणी हस्तगत केलेल्या काही खानदानी लकबी चतुराईने वापरीत आणि अजून अविवाहित राहिल्यामुळे श्रीमंत व खानदानी पत्नी प्राप्त करण्याची स्वप्ने पहात. अजूनही जरी ते अनेक स्वप्नात रमत असले, तरी मूर्ख नव्हते. ते पट्टीचे वक्ते होते आणि पार्लमेंटरी भाषा वापरण्याची त्यांना हौस होती. खानदान कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता, एका जनरलचे ते पुत्र होते आणि नखरेबाज होते. बालपणी ते मखमाली आणि तलम तागाचे कपडे वापरीत, शाही विद्यालयात शिकायला जात. जरी तेथे त्यांना विशेष ज्ञानप्राप्ती झाली नाही, तरी कचेरीत त्यांनी चांगली कामगिरी बजाविली होती व जनरलपदापर्यंत ते वर चढले होते. त्यांच्या वरिष्ठांना ते कार्यक्षम वाटत होते व त्यांच्यावर वरिष्ठांनी आशा केंद्रित केल्या होत्या. पण ज्यांच्या हाताखाली त्यांनी कारकीर्द सुरू केली होती आणि जनरलपदापर्यंत काम केले होते, त्या स्तेपान निकीफोरोविचना मात्र ते कधीही खास कार्यक्षम भासले नव्हते आणि त्यांनी त्यांच्याबाबत कोणत्याही आशा बाळगल्या नव्हत्या. फक्त इवान इल्यिच खानदान कुळातून आले होते व इस्टेटदार होते, एवढीच गोष्ट त्यांना आवडत होती. म्हणजे कारभारी व्यवस्था पहात असलेले मोठे दगडी घर इवान इल्यिचच्या मालकीचे होते, काही मान्यवर लोक त्यांचे नातेवाईक होते, शिवाय त्यांचे रूप चांगले होते. पण मनात मात्र स्तेपान निकीफोरोविच यांना इवान इल्यिचच्या बढाईखोरपणाची आणि छचोरपणाची चीड येत असे. इवान इल्यिचना खुद्द स्वतःला काहीवेळा जाणवायचे की, ते अतिसंवेदनाशील होते, हळवे होते. वारंवार त्यांना पश्चात्तापाचे झटके येत. जणू काही बाबतीत त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीला टोचणी लागलीच पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. मग अत्यंत कडवटपणाने आणि गुप्त वेदना सोसून ते स्वतःशी कबूल करीत की, त्यांना जेवढी इच्छा होती, तेवढी त्यांच्या विचारांची भरारी उंच गेली नव्हती. अशा क्षणी ते विलक्षण निराश होत, विशेषतः मूळव्याधीचा त्रास होत असताना, आणि स्वतःचे जीवन अपयशी झाले असे म्हणत, स्वतःच्या बुद्धीवरचा त्यांचा विश्वास मावळून जाई, एवढेच नव्हे स्वतःच्या पार्लमेंटरी गुणांवरचा त्यांचा विश्वास नष्ट होई (अर्थात खाजगीरीत्या) आणि स्वतःला दूषणे लावून घेत. ह्या सर्व गोष्टी कौतुकास्पद होत्या, तरी अर्ध्या तासानंतर छाती पुढे काढून, आनंदी मुद्रेने, पूर्वीपेक्षा

अधिक ठामपणे व उर्मटपणे, स्वतःच्या करामतीची ग्वाही देण्यास त्यांना कसलाही प्रतिबंध होत नसे. आपण केवळ एक उच्च पदाधिकारीच नव्हे, तर मुत्सद्दीही आहोत आणि रशिया आपली दीर्घ काळ आठवण ठेवील, अशी ते फुशारकी मारीत. काहीवेळा तर त्यांच्या डोळ्यांसमोर त्यांच्या स्मारकांची दृश्ये तरळत. ह्या सर्व गोष्टी दाखवतात की, इवान इल्यिच यांनी फार उच्च महत्त्वाकांक्षा बाळगली होती, पण काळजात मात्र काहीशा भीतीने त्यांनी स्वतःच्या अंधुक स्वप्नांना व आकांक्षांना दडवून ठेवले होते. थोडक्यात, ते एक भले गृहस्थ होते आणि मनाने कवीसुद्धा होते. गेल्या काही वर्षांत निराशेचे दुखरे क्षण त्यांना वारंवार अनुभवावे लागत होते. ते कमालीचे चिडखोर व संशयी बनले होते, किंचित विरोध झाल्यास त्यांना तो अपमान वाटू लागला होता. पण रशियातल्या नव्या वाऱ्यांनी त्यांच्यात आशा प्रज्वलित केल्या होत्या. जनरलपदी त्यांची बढती झाली तेव्हा त्या आशा ठाम बनल्या. त्यांच्या मनाने उभारी घेतली; त्यांची मान ताठ बनली. अचानक त्यांच्या वक्तव्याला पालवी फुटली व ते खूप बोलू लागले, अत्याधुनिक विषयांवर बडबडू लागले व लक्षणीय वेगाने आणि उत्साहाने त्यांनी त्या विषयांवर प्रभुत्व प्राप्त केले. बोलण्याच्या संधी ते हुडकू लागले, शहरभर फिरू लागले आणि अविचारी उदारमतवादी म्हणून अनेक ठिकाणी त्यांची ख्याती पसरली. ह्या गोष्टीचा त्यांना फार अभिमान वाटू लागला. ह्या सायंकाळी शँपेनचे तीन-चार चषक रिचवल्या-नंतर ते विशेष रंगात आले होते. स्तेपान निकीफोरोविचना फारा दिवसात ते भेटले नव्हते, त्यांच्याबद्दल त्यांना आदर होता व त्यांचे ते ऐकतही असत. पण आज स्तेपान निकीफोरोविच यांची सर्व विषयांवरील मते बदलून टाकण्याची इवान इल्यिचना तीव्र इच्छा निर्माण झाली. काही कारणास्तव स्तेपान निकीफोरोविचना ते प्रतिगामी समजत होते व आत्यंतिक त्वेषाने त्यांच्यावर तुटून पडले. स्तेपान निकीफोरोविचनी स्वतःचे समर्थन करण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही. त्यांनी केवळ धूर्तपणे स्मित केले, मात्र त्यांना विषय आवडला होता. इवान इल्यिच खूप तापले आणि ती मोठी जोरदार चर्चा चालू आहे असे मनाशी कल्पून, भावनेच्या भरात नको तेवढ्या वेळांना त्यांनी मद्याच्या चषकाचा आश्रय घेतला. जेव्हा जेव्हा त्यांचा चषक रिता होई, तेव्हा तेव्हा स्तेपान निकीफोरोविच बाटली उचलून त्यांचा चषक पुन्हा भरून देत. अचानक का कुणास ठाऊक, इवान इल्यिचना ते अपमानकारक वाटू लागले, विशेषतः शेजारी बसलेल्या सेम्योन

इवानोविच शिपूलेन्कोंबद्दल त्यांच्या मनात पूर्वीपासूनच अढी होती, एवढेच नव्हे तर शिपूलेन्कोंच्या दुष्ट स्वभावाची त्यांना भीती वाटायची व आता शिपूलेन्को अत्यंत कावेबाजपणे गप्प बसले होते, गरजेपेक्षा जास्त वेळा त्यांच्या मुद्रेवर स्मित उमटत होते. "त्यांना बहुधा मी बच्चा वाटतो", इवान इल्यिचच्या डोक्यात हा विचार चमकून गेला.

"नाही, केव्हाच, केव्हाच व्हायला पाहिजे होतं," ते अधीऱ्या स्वरात पुढे बोलत होते. "फार उशीर केलाय आपण आणि माझ्या दृष्टीनं दयाळू-पणाला सर्वांत प्राधान्य आहे. कनिष्ठसुद्धा माणसंच आहेत हे ध्यानात ठेवून त्यांच्याशी दयाळूपणानं वागलं पाहिजे. दयाळूपणा सर्वांना वाचवील आणि सर्व ठिकाणावर आणील..."

"ही-ही-ही-ही!" सेम्योन इवानोविचच्या दिशेने कुचके हसणे ऐकू आले.

"तुम्ही आमची एवढी कडक हजेरी का घेताय," सौजन्यपूर्ण स्मित करीत अखेरीस स्तेपान निकीफोरोविचनी आक्षेप घेतला. "मी कबूल करतो, इवान इल्यिच, नेमकं तुम्हाला काय म्हणायचंय ते अजूनपर्यंत माझ्या ध्यानात येत नाही. तुम्ही दयाळूपणाची शिफारस करता आहात. म्हणजे माणसाबद्दल प्रेम बाळगणं, असंच ना?"

"होय, माणसाबद्दल प्रेम बाळगणं असं म्हणायला हरकत नाही. मी..."

"जरा थांबा! मला वाटतं, फक्त एवढ्यावरच भागणार नाही. माणसांबद्दल प्रेम वाटणं नेहमीच चांगलं. पण सुधार एवढ्यावरच थांबणार नाहीत. शेतकऱ्यांचे, कायद्याचे, आर्थिक, नैतिक असे अनेक प्रश्न उद्भवलेत... आणि... आणि... ह्या प्रश्नांना अंत नाही आणि त्या सर्वांना एकत्र करून एकाच वेळी सोडवण्याचा प्रयत्न केल्यास प्रचंड गोंधळ माजेल. म्हणून आम्हाला चिंता वाटते, एकटचा दयाळूपणाबद्दल नव्हे..."

"होय, मामला सखोल आहे," सेम्योन इवानोविच यांनी शेरा मारला.

"मला ते उत्तम समजतं आणि मला बोलायला परवानगी द्या, सेम्योन इवानोविच, की गोष्टींचं सखोल ज्ञान करून घेण्यात मी तुम्हाला हार जाणार नाही," इवान इल्यिच खवटपणे आणि निष्कारण कठोर स्वरात म्हणाले. "आणि धार्ष्ट्य करून मी तुम्हाला असेही सांगतो स्तेपान निकीफोरोविच, की तुम्हालासुद्धा माझं बोलणं समजलं नाही..."

"नाही समजलं."

"आणि तरीही माझं ठाम मत आहे आणि सर्वत्र मी ह्या विचाराचा प्रसार करतो की, खास करून कनिष्ठांशी दयाळूपणं वागणं, अंमलदारापासून कारकुनापर्यंत, कारकुनापासून चपराशापर्यंत, चपराशापासून शेतगड्यापर्यंत—मी म्हणतो की, दयाळूपणा हा भावी सुधारांची आणि एकूण नूतनीकरणाची कोनशीला ठरेल. का? कारण! हे अनुमान पहा: मी दयाळू आहे म्हणून माझ्यावर प्रेम करतात. माझ्यावर प्रेम करतात म्हणजे तदनुषंगानं माझ्याबद्दल खात्री बाळगतात. माझ्यावर खात्री ठेवतात म्हणजे माझ्यावर विश्वास आहे. माझ्यावर विश्वास आहे म्हणजे माझ्यावर प्रेम आहे. म्हणजे मला म्हणायचंय की, जर लोक विश्वास ठेवत असतील, तर ते सुधारांवर विश्वास ठेवतील, त्यांना त्यांचा आशय समजेल, नैतिकदृष्टचा एकमेकांना आलिंगन देतील आणि प्रत्येक गोष्टीचा बांधिलकीच्या नात्यानं, पूर्ण छाननी करून निर्णय घेतील. तुम्ही हसताय का सेम्योन इवानोविच? समजत नाही?"

स्तेपान निकीफोरोविचनी काही न बोलता भुवया उंचावल्या. ते चकित झाले होते.

"मला वाटतं, मला दारू थोडी जास्त झालीय," सेम्योन इवानोविच खवचटपणे म्हणाले, "आणि म्हणून माझ्या डोक्यात काही गोष्टींचा प्रकाश पडत नाही."

इवान इल्यिच दचकले.

"आपल्याला सोसणार नाही," किंचित विचार केल्यानंतर अचानक स्तेपान निकीफोरोविच उद्गारले.

"सोसणार नाही म्हणजे काय?" इवान इल्यिचनी आश्चर्याने विचारले. स्तेपान निकीफोरोविचचा शेरा त्यांना अनपेक्षित आणि तुटक वाटला होता.

"आपल्याला सोसणार नाही," स्तेपान निकीफोरोविचना अधिक खुलासा करायची इच्छा नव्हती.

"तुम्ही नवी दारू आणि नव्या केसाळ कातड्यांबाबत तर बोलत नाही ना?" उपहासाने इवान इल्यिचनी विचारले. "नाही साहेब, मी स्वतःला जबाबदार राहीन."

ह्या क्षणाला घड्याळाने साडेअकराचा टोल दिला.

"चला, जायची वेळ झाली," खुर्चीतून उठण्याचा आविर्भाव करीत

सेम्योन इवानोविच म्हणाले. पण इवान इल्यिचनी त्यांच्यावर कुरघोडी केली व झटकन उठून धुराड्याच्या फळीवरील स्वतःची केसाळ टोपी उचलली. ते काहीसे दुखावलेले दिसत होते.

"तर सेम्योन इवानोविच, तुम्ही विचार कराल?" आपल्या पाहुण्यांना निरोप देत स्तेपान निकीफोरोविच म्हणाले.

"घराबाबत म्हणताय? विचार करतो, नक्की विचार करतो."

"तुमचा विचार पक्का झाला म्हणजे ताबडतोब कळवा."

"सगळी कामांची चर्चा, अं?" स्वतःच्या टोपीशी चाळा करीत श्रीमान प्रालीन्स्की काहीशा खुशामतीच्या सुरात म्हणाले. त्यांच्याकडे जणू दुर्लक्ष करण्यात येत होते असे त्यांना भासले.

स्तेपान निकीफोरोविचनी भुवया उंचावल्या, पण ते काही बोलले नाहीत. जणू पाहुण्यांना अधिक थांबवून धरण्याची त्यांची इच्छा नव्हती. सेम्योन इवानोविचनी घाईघाईने त्यांचा निरोप घेतला.

"ठीक आहे... ह्यानंतर तुमची इच्छा... जर तुम्हाला साधे शिष्टाचार समजत नाहीत," श्रीमान प्रालीन्स्कीनी स्वतःशी विचार केला आणि काहीशा आढ्यतेने स्तेपान निकीफोरोविचसमोर हात धरला.

दर्शनी दालनात इवान इल्यिचनी स्वतःभोवती भारी किंमतीचा, कमी वजनाचा केसाळ कोट लपेटून घेतला, सेम्योन इवानोविचच्या जुनाट, हलक्या दर्जाच्या कोटाकडे न पाहिल्याचा आव आणला व दोघेही जिना उतरू लागले.

"आपला म्हातारा काहीसा दुखावला," इवान इल्यिच मुकाट चालणाऱ्या सेम्योन इवानोविचना म्हणाले.

"छेः, कशाबद्दल?" सेम्योन इवानोविच थंड आणि शांत स्वरात उत्तरले.

"लाळघोटचा!" इवान इल्यिचच्या मनात आले.

ते पोर्चमध्ये पोहोचले. भुऱ्या रंगाच्या बेडौल तट्टाची घसरगाडी सेम्योन इवानोविचसाठी आली.

"सैतान! त्रिफोननं माझी बग्गी कुठं ठेवली?" स्वतःचा गाडीवान न दिसल्यामुळे इवान इल्यिच त्रासून ओरडले.

त्यांनी इकडे-तिकडे पाहिले, पण बग्गीचा पत्ता नव्हता. स्तेपान निकीफोरोविचच्या दरवानाला त्याबद्दल काहीच माहिती नव्हती. त्यांनी वार्लामला, सेम्योन इवानोविचच्या गाडीवानाला विचारले. तो उत्तरला की,

बग्गी आणि गाडीवान सारा वेळ तेथेच होते, पण आता कुठेतरी गायब झाले होते.

"अगदी विचित्र प्रसंग!" श्रीमान शिपूलेन्को म्हणाले. "तुमची इच्छा असेल तर पोहोचवू?"

"नालायक माणसं!" श्रीमान प्रालीन्स्की संतापाने बेभान होऊन ओरडले. "कुत्र्यानं मला विचारलं होतं, इथं पीटरबुर्ग प्रदेशात त्याच्या कुणा मैत्रिणीच्या लग्नाला जाऊ काय म्हणून, सैतान तिचं वाट्टोळं करो! मी त्याला जायला कडक मनाई केली होती. पण माझी खात्री आहे, तो तिकडंच गेला!"

"तो खरंच तिकडं गेलाय," वार्लीम म्हणाला. "अवघ्या एका मिनिटात परततो, तुम्ही बाहेर यायच्या आत येतो, असं म्हणाला होता."

"वाटलंच! मला आधीच जाणवलं होतं! आता चांगला सोलून काढतो बेट्याला!"

"तुम्ही त्याला एक-दोनदा पोलीस स्टेशनावर चाबकाचा मार द्यायला लावा, मग तो तुमचे हुकूम अचूक पाळील," घसरगाडीतील उबदार पांघरूण लपेटून घेत सेम्योन इवानोविच म्हणाले.

"कृपया, तुम्ही चिंता करू नका, सेम्योन इवानोविच!"

"जशी तुमची मर्जी. पण मी पोहोचवू शकतो."

"अच्छा, धन्यवाद!"

सेम्योन इवानोविच निघून गेले आणि मनाशी खूप चडफडत इवान इल्यिच लाकडी पादपथावरून चालू लागले.

"तुला मी आता चांगला इंगा दाखवतो, हलकटा! मुद्दाम पायी जातो, तुला जाणवावं म्हणून, तू भ्यावास म्हणून! परत येशील तेव्हा समजेल की तुझा धनी पायी चालत गेला... नीच!"

इवान इल्यिचनी यापूर्वी अपशब्दांचा असा भडिमार कधीही केला नव्हता, पण आज ते कमालीचे संतापले होते, शिवाय त्यांचे डोके भण-भणत होते. ते पिणाऱ्या माणसांपैकी नव्हते, त्यामुळे पाच-सहा चषकांचा लौकरच त्यांच्यावर परिणाम घडला होता. पण रात्र फार सुरेख होती. हवेत गारठा होता, विलक्षण शांतता होती आणि वारा अजिबात पडला होता. आकाश निरभ्र होते, ताऱ्यांनी खच्चून भरले होते. पूर्ण चंद्र धरती-मातेवर रुपेरी चांदण्याचा वर्षाव करीत होता. एकूण सगळे एवढे छान

होते की, पन्नास पावले चालून गेल्यानंतर इवान इल्यिचना स्वतःच्या संकटाचा विसर पडला. उलट त्यांना फारच मजा वाटू लागली. माणसे जेव्हा किंचित झिंगलेली असतात, तेव्हा त्यांची मनःस्थिती वेगाने पालटत असते. निर्जन रस्त्यावरील गचाळ लाकडी खोपटेसुद्धा त्यांना मोहक वाटू लागली होती.

"मी चालत निघालो हे एका परीनं छानच झालं," त्यांच्या मनात विचार आला, "त्रिफोनला धडा मिळेल आणि मला आनंद. खरंच, अधून-मधून चाललं पाहिजे. त्यात काय? बल्शोय प्रॉस्पेक्तवर चुटकीसरशी गाडी-वान सापडेल. सुरेख रात्र! किती छान ही घरं! बहुधा इथं छोटी माणसं रहात असावीत... कारकून... दुकानदार... हा स्तेपान निकीफोरोविच! किती जुनाट मतांची ही माणसं, म्हातारे ठोंबे! होय, ठोंबे हाच शब्द योग्य! तसा तो चतुर माणूस आहे. शांतपणं व्यावहारिक अर्थ जाणून घेण्याची त्याच्यापाशी कुवत आहे. पण म्हातारे ते म्हातारेच! त्यांच्यापाशी हे नाही... काय बरं ते! काहीतरी नाही... सोसणार नाही म्हणे! त्याला काय म्हणायचं होतं? बोलण्यापूर्वी थोडा विचारातसुद्धा पडला होता. पण माझं बोलणं त्याला मुळीच समजलं नाही. आणि समजणार नाही तर दुसरं काय होणार? समजण्यापेक्षा न समजणं जास्त अवघड! महत्त्वाचं म्हणजे माझी खात्री पटलीय, मनःपूर्वक खात्री पटलीय. दयाळू-पणा... माणसांवर प्रेम. माणसाला परत माणूस बनवायचं... त्याच्या लायकीचं पुनरुज्जीवन करायचं आणि तेव्हा... तयार साहित्यासह कामाला लागा. मला वाटतं, स्पष्ट आहे! हो-य! महामहीम, ह्या अनुमानाचा स्वीकार करा: उदाहरणार्थ, आपण एका गरीब, दडपलेल्या कारकुनाला भेटतो. 'तर... कोण तू?' उत्तर: 'कारकून.' ठीक, कारकून; पुढं: 'कसली कारकुनी करतो?' उत्तर: अमूक अमूक, कारकुनी करतो. 'नोकरी करतोस?' 'होय.' 'सुखी व्हायची इच्छा आहे?' 'आहे.' 'सुखासाठी काय आवश्यक आहे?' अमूक अमूक आवश्यक आहे. 'का?' कारण... आणि दोन शब्दात माणूस मला समजून घेतो: तो माणूस माझा झाला, तसे म्हणायचे तर त्या माणसाला मी जाळ्यात पकडलं आणि त्याचं मी काय वाट्टेल ते करू शकतो, म्हणजे त्याच्या हितासाठी. हा सेम्योन इवानो-विच फार वाह्यात माणूस आहे. किती हिडीस त्याचं थोबाड... चाबकानं त्याला झोडपून काढा! मुद्दाम तो असं म्हणाला. नाही, खोटं बोलतोस, तूच झोडप, मी नाही झोडपणार. त्रिफोनला मी शब्दांनी लज्जित करीन,

टोचून बोलून शरम आणीन आणि त्याला ते जाणवतील. दंडुक्याचा प्रश्न, हं... अजून सोडवलेला नाही, हं... एमेरान्सकडं जावं काय? थू: तुझी, नतद्रष्ट फूटपाथ!" अचानक पाय निसटताच ते ओरडले. "आणि ही राजधानी! प्रबोधन! पाय सहज मोडेल. हं. ह्या सेम्योन इवानीचचं तोंडसुद्धा बघावंसं वाटत नाही. अगदी तिरस्करणीय थोबाड. नैतिकदृष्टचा आलिंगनं दिली पाहिजेत असं मी जेव्हा म्हटलं, तेव्हा तो मुद्दाम खिंकाळून हसला. पण लोकांनी एकमेकांना आलिंगनं दिली, तर तुझं काय जातं बेट्या? तुला तर आलिंगन देणार नाही—त्यापेक्षा शेतगड्याला... जर मला शेतगडी भेटला, तर त्याच्याशी मी बोलीन. कदाचित मी झिंगलो होतो म्हणून मला नीट सांगता आलं नसेल. कदाचित आताही मी नीट खुलासा करू शकत नाही... हं. यापुढं कधीही दारू पिणार नाही. संध्याकाळपासून वटवट करतो आहेस आणि उद्या त्याबद्दल पश्चात्ताप करशील. मी न लटपटता चालतोय... पण ते सगळे हलकट आहेत!"

अशा रीतीने तुटक, असंबद्ध बडबड करीत इवान इल्यिच फूटपाथवरून चालत होते. त्यांच्यावर ताज्या हवेचा परिणाम घडला होता व ते थोडे भानावर आले होते. आणखी पाच मिनिटांनंतर ते शांत झाले असते व त्यांना झोपायची इच्छा झाली असती. पण अचानक, बल्शोय प्रॉस्पेक्तपासून अवघ्या दोन पावलांच्या अंतरावर, त्यांना संगीत ऐकू आले. त्यांनी सभोवार पाहिले. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला एका अत्यंत मोडकळीला आलेल्या एकमजली, पण खूप लांब लाकडी घरात जल्लोष चालू होता. तेथे फिडलवर धनुकल्या घासत होत्या, डबल-बास घुमत होता, फ्ल्यूटमधून खूप आनंदी नृत्याचे सूर उमटत होते. खिडक्यांखाली माणसांचा घोळका उभा होता, त्यात जास्त भरणा होता सुती अंगरखे घातलेल्या व डोक्यांना रुमाल बांधलेल्या बायकांचा. खिडक्यांच्या फटींमधून आतील दृश्य पाहण्यासाठी त्या माना ताण-ताणून पहात होत्या. एकूण तेथे धमाल चाललेली दिसत होती. नाचणाऱ्यांच्या पावलांचा आवाज रस्त्याच्या थेट विरुद्ध बाजूपर्यंत ऐकू येत होता. इवान इल्यिचना जवळच एक पोलीस दिसला व ते त्याच्यापाशी गेले.

"बंधू, हे घर कुणाचं?" स्वतःच्या छातीवरील बहुमानाचे पदक पोलीसाला दिसू शकेल अशा बेताने आपल्या भारी किंमतीच्या केसाळ कोटाची बटणे उघडीत त्यांनी विचारले.

"कारकून प्सेल्दोनिमोव यांचं, ते रजिस्ट्रार आहेत," तात्काळ ताठ

उभे रहात पोलीस उत्तरला. इवान इल्यिचचे पदक त्याच्या नजरेला क्षणात दिसले होते.

"प्सेल्दोनिमोवचं? अरे वा! प्सेल्दोनिमोव?... तो काय, लग्न करतोय?"

"होय, साहेब, लग्न करताहेत, नामधारी सल्लागारांच्या मुलीशी. म्लेकोपितायेव, नामधारी सल्लागार... नगरपालिका मंडळात काम करायचे. हे घर वधूबरोबर जातंय."

"म्हणजे आता हे प्सेल्दोनिमोवचं घर, म्लेकोपितायेवचं नव्हे?"

"होय, साहेब. पूर्वी हे घर म्लेकोपितायेवचं होतं, पण आता प्सेल्दोनिमोवचं."

"हं. मी तुझ्यापाशी ही चौकशी करतोय ह्याचं कारण, बंधू, मी त्याचा बॉस आहे. प्सेल्दोनिमोव ज्या कचेरीत काम करतो, त्या कचेरीत मी जनरलपदावर आहे."

"तुमच्या सेवेला हजर आहे, महामहीम," पोलीस आणखीच ताठ उभा राहिला, पण इवान इल्यिच जणू कसल्यातरी विचारात गढले होते. उभ्या उभ्या ते विचार करीत होते...

होय, प्सेल्दोनिमोव खरोखरीच त्यांच्या कचेरीत काम करीत होता. आता त्यांना त्याचा चेहरा आठवला. हा अगदी छोटा कारकून होता, महिना दहा रूबल पगाराचा. श्रीमान प्रालीन्स्की यांनी अलीकडेच कचेरीचा कारभार स्वीकारला होता, त्यामुळे हाताखालील सर्व कर्मचाऱ्यांची रीतसर आठवण राहणे त्यांना शक्य नव्हते, पण प्सेल्दोनिमोवची आठवण त्यांना राहिली होती, त्याच्या आडनावामुळेच. प्रथमदर्शनीच ते आडनाव त्यांच्या मनात ठसले होते आणि ते आडनाव धारण करणाऱ्या व्यक्तीला त्यांनी जरा लक्षपूर्वक न्याहाळून पाहिले होते. आता त्यांना तो तरुण ठळकपणे आठवला: लांब बाकदार नाक, झुबकेदार सोनसळी केस, हडकुळी आणि उपासमार सोसलेली अंगकाठी, भयानक गणवेष आणि अत्यंत गचाळ विजार. तेव्हाच मनात उमटून गेलेला विचारसुद्धा इवान इल्यिचना आठवला: व्यवस्थित पोषाखासाठी ह्या गरीब बिचाऱ्याला सणानिमित्त दहा रूबल मंजूर करावेत का? पण ह्या गरीब बिचाऱ्याचा चेहरा तेव्हा एवढा अनाकर्षक होता, त्यावरील भाव एवढा अप्रिय होता की, केवळ तिटकाऱ्याविना कोणतीही दुसरी भावना पाहणाऱ्याच्या मनात निर्माण झाली नसती. त्यामुळे इवान इल्यिचच्या मनातील दयाळूपणाची भावना

विरून गेली होती आणि प्सेल्दोनिमोव बक्षिसाविना राहिला होता. अवघ्या एका आठवड्यापूर्वी, लग्न करण्याची परवानगी मागण्यासाठी हाच प्सेल्दोनिमोव जेव्हा आला, तेव्हा इवान इल्यिच अधिकच चकित झाले होते. त्यांना आठवले की, त्या विषयात खोलवर चौकशी करायला त्यांना सवड नव्हती आणि लग्नाचा प्रश्न घाईघाईने, वरवर सोडविण्यात आला होता. तरी त्यांना स्पष्ट आठवले की, प्सेल्दोनिमोवला लग्नात हुंडा म्हणून लाकडी घर आणि रोख चारशे रूबल मिळणार होते. ह्या परिस्थितीचे इवान इल्यिचना तेव्हाच आश्चर्य वाटले होते. त्यांना आठवले की, दोन नावांच्या संयोगावर त्यांनी काहीतरी शाब्दिक कोटीसुद्धा केली होती : प्सेल्दोनिमोव आणि म्लेकोपितायेवा. त्यांना हे सर्व ठळक आठवले.

त्यांना हे सर्व आठवले आणि ते जास्त जास्त विचारात गढले. सर्वांना माहीतच आहे की, प्रदीर्घ युक्तिवाद काहीवेळा आपल्या मनात निमिषार्धात चमकून जातात, संवेदनांच्या रूपाने येऊन जातात, त्यांचा माणसाच्या भाषेत अनुवाद घडत नाही, मग साहित्यिक भाषेबाबत तर विचारायलाच नको. तरीसुद्धा आमच्या नायकाच्या संवेदनांचा अनुवाद करण्याचा आम्ही प्रयत्न करू आणि निदान त्यांचा आशय वाचकांना सांगू, त्यांच्यातील महत्त्वाचा व आकलनीय भाग सांगू. कारण आपल्या अनेक संवेदना जेव्हा सामान्य भाषेत अनुवादित होतात, तेव्हा त्या अतर्क्य भासतात. म्हणूनच त्या कधीही दिवसाच्या उजेडात येत नाहीत, पण प्रत्येकाला त्यांची अनुभूती मात्र येते. इवान इल्यिच यांच्या संवेदना आणि त्यांचे विचार यांच्यात काहीशी असंबद्धता होती. पण त्याचे कारण आपल्याला ठाऊक आहे.

"अरेच्चा!" त्यांच्या मनात आले, "आम्ही सतत बोलतो, पण जेव्हा प्रत्यक्ष कृतीची वेळ येते, तेव्हा नाक दाबून गप्प बसतो. आता ह्या प्सेल्दोनिमोवचं उदाहरण घ्या : नुकताच तो विवाहसोहळ्यातून परतलाय, त्याचं मन अस्वस्थ आहे, आशेनं भरलंय, विवाहसुखाची चव घ्यायला अधीर झालंय... त्याच्या जीवनातील हा एक सर्वांत सुखी दिवस आहे... आता तो लोकांचा पाहुणचार करतोय, मेजवानी देतोय—ती मेजवानी माफक असेल, गरीब असेल, पण आनंदी आहे, उल्हासी आणि हार्दिक आहे. त्याचा मुख्य साहेब, म्हणजे मी, ह्या क्षणाला त्याच्या घराबाहेर उभा राहून संगीत ऐकतोय हे त्याला समजलं तर? खरंच, तो काय करील? जर मी थेट आत चालत गेलो तर तो काय करील? प्रथम तो

दचकेल, आश्चर्यानं थक्क होईल. कदाचित माझं ते आक्रमण ठरेल, मी सगळा बेरंग करीन... होय, दुसरा कोणताही जनरल आत गेला तर तसे घडेल, पण माझी गोष्ट वेगळी आहे... अगदी बरोबर, माझी गोष्ट वेगळी...

"होय, स्तेपान निकीफोरोविच! मघाशी तुम्ही मला समजून घेतलं नाहीत – आता हे तयार उदाहरण आहे तुमच्यासाठी!

"होय. आम्ही दयाळूपणाबद्दल खूप ओरडा करतो, पण शौर्य गाजवायला, पराक्रम करायला आम्ही समर्थ नाही.

"शौर्य म्हणजे काय? सांगतो. विचार करा: समाजातील सर्व घटक आणि मी यांच्यातील सध्याचे संबंध ध्यानात घेता, दरमहा दहा रूबल पगारवाल्या माझ्या हाताखालच्या चाकराकडं, रजिस्ट्रारकडं, मध्यरात्रीनंतर लग्नाच्या समारंभाला मी जाणं, म्हणजे साक्षात वेडेपणा, विचारांचा भयानक गोंधळ, पॉम्पीचे अखेरचे दिवस[44], धुमाकूळ! कुणालाही आकलन होणार नाही. स्तेपान निकीफोरोविच मरतील – पण त्यांना समजणार नाही. ते म्हणालेच होते. सोसणार नाही. पण तुम्ही म्हातारे लोक आहात, अर्धांगवायू झालेले आणि प्रतिगामी! मला सो-से-ल! पॉम्पीच्या अखेरच्या दिवसाचं मी माझ्या कनिष्ठासाठी शुभ दिवसात रूपांतर करीन. वाह्यात: वेडसर भासणाऱ्या कृतीचं एका सुरळीत, पितृवत, उदात्त आणि नैतिक कृतीत रूपांतर करीन. कसं? असं. कृपया ऐका...

"समजा... मी घरात प्रवेश केला: त्यांना आश्चर्य वाटतं, नाच थांबतात, ते माझ्याकडं रोखून पाहतात, एक पाऊल मागं सरतात. ठीक, इथं मी कृती करतो. चेहऱ्यावर अत्यंत मधुर स्मित आणून मी घाबरलेल्या प्सेल्दोनिमोवपाशी जातो आणि अगदी साध्या शब्दांमध्ये म्हणतो: 'तर मी इकडं महामहीम स्तेपान निकीफोरोविचांकडं आलो होतो. इथून ते जवळच राहतात, कदाचित तुला माहीत असेल...' मग मी गंमतीदारपणं त्रिफोनचा साहसी उद्योग वर्णन करतो. त्रिफोनवरून माझ्या चालण्याबाबतचं वर्णन करतो. 'तर मला संगीत ऐकू आलं, मी पोलीसाजवळ चौकशी केली आणि, बंधू, मला समजलं की तू लग्न करतो आहेस. तेव्हा मनाशी विचार केला, माझ्या कनिष्ठाच्या घरात जावं आणि माझा कारकून कसं लग्न करतोय ते पहावं... मला तू हाकलून तर लावणार नाहीस ना?' मला हाकलून लावणार! कनिष्ठासाठी काय पण शब्द! तो काय मला हाकलून लावणार! मला वाटतं, त्याला वेड लागेल, आरामखुर्चीत मला

बसवायला धावत येईल, आदरापायी थरथर कापेल, प्रथम त्याचं चित्त-सुद्धा ठिकाणावर राहणार नाही! ..

"ह्यापेक्षा साधी, डौलदार कृती दुसरी कोणती असू शकेल! कशाला मी आत गेलो? हा दुसरा प्रश्न! म्हणजे त्या गोष्टीची नैतिक बाजू. त्यातच तर गंमत आहे!

"हं! काय बरं विचार करत होतो? हां!

"अर्थात ते मला अत्यंत महत्त्वाच्या पाहुण्यापाशी बसवतात, कुणी नामधारी सल्लागार अथवा नातेवाईक, लाल नाकाचा एखादा सेवानिवृत्त कप्तान... गोगोलनी अशा प्रकारच्या व्यक्तींचं छान वर्णन केलं. अर्थात माझी वधूशी ओळख करून देण्यात येते, मी तिची स्तुती करतो, पाहु-ण्यांना उत्तेजन देतो. मी त्यांना विनंती करतो की, लाजू नका, मजा करा, नाचा, मी विनोद करतो, हसतो; थोडक्यात, मी प्रेमळ आणि मोहक वागतो. जेव्हा मी स्वतःवर खूष असतो, तेव्हा नेहमीच प्रेमळ आणि मोहक वागतो. हं, पण आत्ता मात्र मी किंचित नशेत आहे... झिंगलेला नाही, पण किंचित...

"साहजिकच, एक सभ्य माणूस ह्या नात्यानं मी त्यांना बरोबरीनं वागवतो, कोणत्याही खास मागण्या करीत नाही... पण नैतिकदृष्टचा, नैतिकदृष्टचा बाब वेगळी: त्यांना समजेल आणि ते मोल करतील. माझ्या कृतीनं त्यांच्यातील उदात्तता उफाळून येईल... मी तिथं सुमारे अर्धा तास थांबीन—फार तर एक तासभर. अर्थात जेवणापूर्वी मी तिथून निघेन. त्यांची धांदल उडेल, माझ्या ते विनवण्या करतील, जमिनीपर्यंत लवतील, पण मी फक्त एकच प्याला पिणार, त्यांचं अभिनंदन करणार आणि जेवणा-पूर्वी तिथून निघणार. 'काम आहे' असं म्हणेन. ज्या क्षणी 'काम' हा शब्द मी उच्चारीन, त्या क्षणी त्यांचे चेहरे आदरानं गंभीर बनतील. ह्यातून त्यांना मी सौम्यपणं सुचवीन की त्यांच्या-माझ्यात फार मोठा फरक आहे—जमीन आणि आकाशाएवढा. असा भेद दाखविण्याची माझी इच्छा नाही, पण तसं करणं आवश्यक आहे... कुणी काहीही म्हणो, पण नैतिक दृष्टीनंसुद्धा आवश्यक आहे. मी स्मित करीन, कदाचित हसेन-सुद्धा आणि मग प्रत्येकजण उल्हसित होईल. वधूशी काहीतरी मजेदार संभाषण करीन. हं—मी काय म्हणेन, मला ठाऊक आहे: मी सूचना देईन की, बरोब्बर नऊ महिन्यांनंतर धर्मपिता म्हणून मी परत येईन, हा-हा! ती निश्चित त्या काळात बाळंत होईल. ह्यांना सशासारखी ढीगभर

पोरं होतात. सगळे खो खो हसतील, नवरी लाजेल. मी भावनाभरानं तिच्या कपाळाचं चुंबन घेईन, तिला आशीर्वाद देईन आणि... उद्या कचेरीत माझा पराक्रम सर्वांना समजेल. उद्या मी परत कडक, उद्या मी परत काटेकोर, कठोर. पण मी कसा आहे ते सर्वांना आता माहीत आहे. माझं मन त्यांना माहीत आहे, माझी किंमत ठाऊक आहे. 'ते कडक साहेब आहेत, पण माणूस म्हणून देवदूत आहेत!' तर मी जिंकलो. तुमच्या डोक्यातही कधी आली नसती अशी क्षुल्लक कृती करून मी विजय मिळविला. आता ते माझे आहेत. मी त्यांचा बाप, ते माझी मुलं... मग काय, महामहीम स्तेपान निकीफोरोविच, तुम्ही असं वागून दाखवा पाहू!

"...हो, तुम्हाला ठाऊक आहे का, प्सेल्दोनिमोव पुढं आपल्या मुलांना आठवण सांगेल की, त्याच्या लग्नात जनरलनी कशी मौज केली होती आणि दारूसुद्धा प्यायले होते! आणि ती मुलं त्यांच्या मुलांना सांगतील, ती त्यांच्या नातवंडांना सांगतील, एखाद्या पवित्र हकीकतीप्रमाणं, की एका उच्चपदस्थानं, एका मुत्सद्द्यानं (तोवर मी तसा झालेला असेन) त्यांचा बहुमान केला होता... इ. इ. वस्तुतः मी दलितांना नैतिकदृष्टचा वर उठवीन, त्याला मी त्याचेपण परत मिळवून देईन... तो महिना दहा रूबल पगार मिळवतो! जर मी असं पाच वेळा, दहा वेळा वागलो, अथवा तत्सम काही केलं, तर सार्वत्रिक लोकप्रियता मला लाभेल! सर्वांच्या हृदयावर माझा ठसा उमटेल आणि त्यातून, ह्या लोकप्रियतेमधून पुढं काय काय निर्माण होईल, कोण जाणे!"

असा अथवा जवळ जवळ असा युक्तिवाद इवान इल्यिचनी स्वतःशी केला (सद्गृहस्थहो, माणूस कधी कधी स्वतःशी काय वाट्टेल ते बोलतो! विशेषतः चमत्कारिक मनःस्थितीत). हे सारे विचार त्यांच्या मनात अर्ध्या मिनिटाच्या अवधीत चमकून गेले आणि अर्थात ह्या चिंतनांनी त्यांनी स्वतःचे कदाचित समाधान करून घेतले असते व मनानेच स्तेपान निकीफोरोविचना लज्जित करून शांतपणे ते घरी जाऊन झोपले असते. त्यांचे तसे वागणे चांगले ठरले असते! पण दुर्दैव म्हणजे तो क्षण विचित्र वागण्याचा होता!

जणू मुद्दाम घडावे तसे त्या निमिषार्धात अचानक त्यांच्या नजरेसमोर कल्पनेने स्तेपान निकीफोरोविच व सेम्योन इवानोविचचे आत्मतुष्ट चेहरे ठळक उभे राहिले.

"आम्हाला सोसणार नाही!" रुंद स्मित करीत स्तेपान निकीफोरोविच परत म्हणाले.

"ही-ही-ही!" सेम्योन इवानोविचनी छद्मी स्मित दाखविले.

"बघूया, कसं सोसणार नाही!" इवान इल्यिच ठामपणे म्हणाले. त्यांचा चेहरासुद्धा लाल बनला. फूटपाथवरून ते खाली उतरले आणि ठाम पावलांनी रस्ता ओलांडून त्यांच्या कनिष्ठाच्या, रजिस्ट्रार प्सेल्दोनिमोवच्या, घरात शिरले.

त्यांच्या वाईट ग्रहाने त्यांना घरात जायला प्रवृत्त केले होते. छोटया उघडया फाटकातून ते धीटपणे आत गेले, बसक्या आवाजात उगीच भुंकत त्यांच्या पायांवर उडी घेणाऱ्या एका छोटया केसाळ कुलंगी कुत्र्याला त्यांनी तिरस्काराने लाथ हाणली. पहारेकऱ्याच्या देवडीप्रमाणे आवारात पुढे आलेल्या बंद पोर्चपर्यंतची लाकडी पाऊलवाट चालून तीन डगमगत्या लाकडी पायऱ्या ते चढले. बारक्या प्रवेशद्वाराच्या आत कुठेतरी चरबीच्या मेणबत्तीचा अखेरचा तुकडा अथवा रात्रीचा दिवा जळत होता, पण तरीसुद्धा बाहेर थंड करण्या-साठी ठेवलेल्या मांसाच्या जेलीच्या भांडयात इवान इल्यिच यांचा रबरी बुटांचा डावा पाय फस्सदिशी पडलाच. कुतूहलापायी इवान इल्यिचनी खाली वाकून पाहिले तेव्हा आणखी दोन बशांमध्ये काहीतरी पदार्थ शेजारी अस-ल्याचे व दुधाच्या चिकाचे दोन साचे ठेवल्याचे त्यांना आढळले. मांसाच्या जेलीची त्यांच्या पायामुळे झालेली दुर्दशा पाहून क्षणभर ते दचकले व ता-त्काळ माघार घेण्याचा विचार निमिषमात्र त्यांच्या डोक्यात चमकून गेला. पण तो भित्रेपणा ठरेल अशी त्यांनी स्वतःची समजूत घातली. कुणीही त्यांना पाहिले नव्हते व मांसाची जेली त्यांनी खराब केल्याचा त्यांच्यावर कुणी संशय घेणे शक्य नव्हते असा मनाशी युक्तिवाद करून त्यांनी पटकन रबरी बुटावरच्या जेलीच्या खुणा पुसून टाकल्या आणि नमदी आवरणाचे दार चाचपून ते उघडले. एका अत्यंत छोटया प्रवेश दालनात ते उभे असल्याचे त्यांना आढळले. त्या दालनाच्या अर्ध्या भागात ओव्हरकोटांचा, अंगरख्यांचा, टोप्यांचा, मफलरांचा व रबरी बुटांचा ढीग पडला होता. उरलेल्या अर्ध्या भागात वादकांनी—दोन फिडल, एक फ्ल्यूट आणि एक डबल-बास—बस्तान घातले होते. अर्थात ते चारही लोक रस्त्यावरून धरून आणलेले होते. बिनरंगाच्या एका छोटया मेजापाशी ते बसले होते, त्या मेजावर एकमेव चरबीची मेणबत्ती तेवत होती व नृत्यसंगीताचा शेवटचा तुकडा ते बडवत होते. शेजारच्या खोलीत धूळ, तंबाखूचा धूर व वाफांच्या धूसर पडद्याआड नाचणाऱ्या लोकांच्या आकृती दिसत होत्या. तेथे धुंद उन्मादक वातावरण

पसरले होते. हसण्याचे, आरोळ्यांचे, चीत्कारांचे आवाज ऐकू येत होते. घोडदळाच्या तुकडीप्रमाणे पुरुष पाय आपटत होते. त्या नरकसमान गोंगाटामधून समारंभाचे चालकत्व करणाऱ्या माणसाच्या आज्ञा ऐकू येत होत्या. तो तेथे अगदी घरच्याप्रमाणे आणि सहज वावरत होता : "पुरुषांनो पुढे या, ..." इ. इ. इवान इल्यिचनी धडधडत्या अंत:करणाने ओव्हरकोट व रबरी बूट उतरविले आणि टोपी हातात धरून ते खोलीत गेले. इत:पर कोणताही युक्तिवाद मनाशी लढविण्याचा चाळा त्यांनी थांबविला होता.

सगळे नाचाची शेवटची फेरी पूर्ण करण्यात गुंतले असल्यामुळे आरंभी कुणाचेच त्यांच्याकडे लक्ष गेले नाही. इवान इल्यिच एका जागी खिळून उभे होते आणि त्या गोंधळातून त्यांना काहीही बोध घडत नव्हता. स्त्रियांचे पोषाख आणि दातात सिगारेटी धरलेल्या तरुण पुरुषांचे चेहरे शेजारून भिरभिरत जात होते... एका तरुणीचा आकाशी रंगाचा रुमाल फडफडत इवान इल्यिचच्या नाकाच्या शेंड्याला स्पर्श करून गेला. केस पिंजारलेला एक वैद्यक शाखेचा विद्यार्थी इवान इल्यिचना जोरात धक्का मारून त्या तरुणीमागे धावला. एक उंचच उंच लष्करी ऑफीसर त्यांच्या नजरेसमोरून भिरभिरत गेला. कुणीतरी नाचता नाचता इतरांबरोबर पाय आपटत कर्कश्य आवाजात किंचाळला : "अरे प्सेल्दोनिमोवा !" इवान इल्यिचच्या पायांखाली काहीतरी चिकट स्पर्श जाणवत होता : तक्तपोशीला मेण घासले असावे. फारशा लहान नसलेल्या त्या खोलीत सुमारे तीस पाहुणे होते.

आणखी एका मिनिटानंतर नाच संपला आणि घराबाहेर असताना इवान इल्यिचनी जी कल्पना केली होती, जे स्वप्न पाहिले होते, ते तात्काळ प्रत्यक्षात घडले. अजून श्वास ठिकाणावर न आलेल्या, चेहऱ्यांवरचा घाम न पुसलेल्या, नाचणाऱ्या माणसांमध्ये व पाहुण्यांमध्ये विचित्र कुजबूज सुरू झाली. नवागत पाहुण्याकडे सर्वांचे डोळे, सर्वांचे चेहरे वळले होते. क्षणानंतर सगळे तात्काळ मागे सरले व ज्यांचे अद्याप नव्या पाहुण्याकडे लक्ष गेले नव्हते अशा लोकांना त्यांच्या कपड्याच्या टोकांना खेचून शांत राहण्यास सांगण्यात आले. इवान इल्यिचना पाहताच ती माणसेसुद्धा तात्काळ पाऊलभर मागे सरली. इवान इल्यिच अजून एकही पाऊल पुढे न टाकता दारातच उभे होते, पण त्यांच्यात आणि इतर पाहुण्यांमध्ये अंतर वाढत होते, मधली मोकळी जागा विस्तारत होती. त्या मोकळ्या जागेत टॉफीच्या कागदी आवरणांचा, कागदाच्या तुकड्यांचा व सिगारेटींच्या थोटकांचा खच

पडला होता. फ्रॉक-कोट घातलेला, सोनसळी केस विखुरलेला, लांब बाकदार नाकाचा एक तरुण अचानक त्या मोकळ्या जागी दबकत्या पावलांनी येऊन उभा राहिला. खांदे पाडून तो चालत होता व लाथ मारण्यासाठी धनी जेव्हा कुत्र्याला बोलावतो, तेव्हाची कुत्र्याची नजर ह्या माणसाच्या नजरेशी साम्य दाखवीत होती.

"नमस्कार, प्सेल्दोनिमोव, मला ओळखलंस?" इवान इल्यिच म्हणाले, पण त्याच क्षणी त्यांना मनात जाणवले की, ते अगदी मूर्खासारखे बरळले होते. त्यांना असेसुद्धा जाणवले की, ह्या क्षणाला ते सर्वांत भयानक मूर्खपणा करीत होते.

"म... म... महामहीम!" प्सेल्दोनिमोव चाचरत उद्गारला.

"होय, होय. बंधू, मी तुझ्याकडं केवळ योगायोगानं आलो, कदाचित तुला स्वतःलाच हे ध्यानात आलं असेल..."

पण प्सेल्दोनिमोवच्या ध्यानात काहीही येत नव्हते. डोळे विस्फारून अत्यंत गोंधळल्या मुद्रेने तो उभा होता.

"मला वाटतं, तू मला हाकलून लावणार नाहीस... आनंद होवो न होवो, पाहुण्याचं स्वागत कर!" इवान इल्यिच पुढे म्हणाले. शरमेपायी त्यांच्या पायांमधील ताकद नष्ट झाल्याची त्यांना जाणीव होत होती, चेहऱ्यावर स्मित आणणे त्यांना अशक्य ठरले होते. स्तेपान निकीफोरोविच आणि त्रिफोनची हकीकत सांगणे सर्वथा अशक्य होत चालले होते. पण प्सेल्दोनिमोव तसाच मुखस्तंभासारखा उभा होता आणि त्याच्या मुद्रेवरील बावळट भाव कायम होता. इवान इल्यिच कचरले. आणखी क्षणभर असेच पुढे चालले तर परिस्थिती चिघळणार ह्याची त्यांना जाणीव झाली.

"मी तुम्हाला अडथळा आणला वाटतं... मी जातो!" ते कसेबसे म्हणाले आणि त्यांच्या ओठाच्या उजव्या कोपऱ्यातील एक स्नायू थरथरला.

पण एव्हाना प्सेल्दोनिमोव भानावर आला होता...

"महामहीम, आपलं स्वागत असो... आमचा बहुमान झाला..." घाईघाईने लवून अभिवादन करीत तो पुटपुटला. "आसनावर बसावं..." आणखी भानावर येत त्याने दोन्ही हातांनी दिवाणाकडे खूण केली. नाचायला मोकळी जागा करण्यासाठी त्या दिवाणासमोरचे टेबल सरकवून ठेवण्यात आले होते.

इवान इल्यिचनी मनाशी सुटकेचा सुस्कारा टाकला व ते दिवाणावर मटकन बसले. त्याच क्षणी कुणीतरी दिवाणासमोर टेबल सरकवून आणले.

इवान इल्यिचनी सभोवार धावती नजर टाकली आणि त्यांना आढळले की, ते एकटेच बसले होते व बाकी सगळे – स्त्रियासुद्धा – उभे होते. वाईट चिन्ह होते. पण ह्याचा उल्लेख करण्याची, उत्तेजन देण्याची अद्याप वेळ झाली नव्हती. पाहुणे अजूनही अंग चोरून उभे होते व अजून काही उमज न पडलेला, चेहऱ्यावर मुळीच स्मित नसलेला एकटा प्सेल्दोनिमोव कुबड काढून त्यांच्यासमोर उभा होता. थोडक्यात, ते दृश्य अप्रिय होते. त्या क्षणाला आपल्या कथानायकाच्या मनाला अपार वेदना झाल्या, की हरून-अल्-रशिद-च्या[45] थाटातील त्यांची ही तात्त्विक सफर प्रत्यक्षात फार मोठा पराक्रमच ठरली असती. पण अचानक एक छोटी आकृती प्सेल्दोनिमोवशेजारी आली व वाकून अभिवादन करू लागली. इवान इल्यिचना त्या व्यक्तीची ओळख पटताच अपरिमित आनंद झाला. ती व्यक्ती म्हणजे त्यांचा मुख्य कारकून आकीम पेत्रोविच झूबीकोव. अर्थात कचेरीबाहेर ह्या माणसाचा इवान इल्यिचना परिचय नव्हता, पण एक कार्यक्षम आणि मिटल्या तोंडाचा कर्मचारी म्हणून त्याला ते ओळखत होते. इवान इल्यिच तात्काळ उठले आणि त्यांनी आकीम पेत्रोविचसमोर आख्खा हात – दोन बोटे नव्हे – पुढे केला. आकीम पेत्रोविचने अत्यादराने स्वतःच्या दोन्ही हातांमध्ये तो हात धरला. जनरल खूष झाले. अप्रियता टळली होती.

आता खरोखरीच प्सेल्दोनिमोव दुसरा नव्हे, तर तिसरा माणूस बनला होता. हकीकत थेट मुख्य कारकुनाला सांगणे शक्य होते, गरजेपायी त्याला निकट परिचित मानणे भाग होते आणि प्सेल्दोनिमोव तोवर मौन धरून आदराने थरथर कापत उभा राहिला असता. ह्या क्रमाने गोष्टी घडणार होत्या. आणि हकीकत सांगणे अत्यावश्यक होते. इवान इल्यिचना ती गरज जाणवली. प्रत्येकजण काही अपेक्षेने पहात होता, घरची माणसेसुद्धा दोन्ही दारांमध्ये दाटीवाटीने आणि आतुर मुद्रांनी उभी होती. पण मुख्य कारकून मूर्खपणे अजून तसाच उभा होता हे फार वाईट होते.

“अहो असे उभे काय!” दिवाणापाशी अवघडलेपणाने मुख्य कारकुनाला बोट दाखवीत इवान इल्यिच पुटपुटले.

“धन्यवाद... मी इथं बसतो,” आकीम पेत्रोविच पटकन खुर्चीवर बसत म्हणाले. अजूनही चिकाटीने उभ्या असलेल्या प्सेल्दोनिमोवने पुढे झुकून ती खुर्ची सरकवली होती.

“काय घडलं तुम्ही कल्पना करू शकता,” अजूनही कंपायमान असणाऱ्या, पण तरीही मोकळ्या आणि सहज आवाजात इवान इल्यिच केवळ

आकीम पेत्रोविचला उद्देशून सांगू लागले. ते शब्द ताणून आणि लांबवून बोलत होते, स्वरांचे उच्चार निसटते येत होते, थोडक्यात, ते अत्यंत कृत्रिम वागत होते असे त्यांनी स्वतःशी कबूल केले होते. त्यावर त्यांचा इलाज नव्हता. कसलीतरी बाह्य शक्ती त्यांच्यावर बळजबरी करीत होती. त्या क्षणाला त्यांना खूप काही जाणीव झाली होती व ती जाणीव वेदनादायी होती.

"तुम्ही कल्पना करू शकता, आत्ताच मी स्तेपान निकीफोरोविच निकीफोरोव यांच्याकडून आलो, कदाचित त्यांचं नाव तुम्ही ऐकलं असेल – ते गुप्त सल्लागार आहेत. त्या... कमिशनवर..."

आकीम पेत्रोविचनी आदरापोटी सर्वांग पुढे झुकविले. जणू त्यांना म्हणायचे होते: "अर्थात, त्यांचं नाव आम्ही ऐकलंय!"

"आता ते तुझे शेजारी आहेत," शिष्टाचारापायी आणि सहजपणे वावरत आहोत असे दाखविण्यासाठी इवान इल्यिच प्सेल्दोनिमोवला उद्देशून म्हणाले. पण त्याच्या नजरेत ह्या विषयाबाबत निर्विकारता पाहताच इवान इल्यिचनी झटदिशी त्याच्यापासून दुसरीकडे तोंड फिरविले.

"स्वतःचं घर विकत घेण्याची म्हाताऱ्याची सबंध आयुष्यभर धडपड चालली होती... तर त्यांनी घर विकत घेतलं. फार छान टुमदार घर आहे. आणि नेमका आजच त्यांचा वाढदिवस होता. यापूर्वी त्यांनी स्वतःचा वाढदिवस कधीही साजरा केला नव्हता, कंजूसपणापायी आमच्यापासूनसुद्धा लपवून ठेवला होता – ह्यॅ-ह्यॅ! पण यावेळी ते स्वतःच्या नव्या घरावर एवढे खूष होते की, त्यांनी मला आणि सेम्योन इवानोविचना निमंत्रण केलं. त्यांना ओळखता: शिपूलेन्को."

आकीम पेत्रोविच परत एकदा झुकले. अत्यंत उत्साहाने त्यांनी शरीराची कमान केली! इवान इल्यिचना काहीसा हुरूप आला. महामहीमांना ह्या क्षणी आपल्या पाठिंब्याची नितांत गरज आहे असे मुख्य कारकुनाच्या ध्यानात आले असावे अशी इवान इल्यिचना भीती वाटू लागली होती. आणि त्याहून अधिक वाईट दुसरे काहीही नव्हते.

"तर आम्ही तिघं बसलो, आम्हाला शँपेन देण्यात आली, कामांची आम्ही चर्चा केली... वेगवेगळया बाबतीतल्या... अनेक प्रश्नांवर बोललो... एवढंच नव्हे तर आमचा वादसुद्धा झाला... ख्यॅ, ख्यॅ!"

आकीम पेत्रोविचनी आदराने भुवया उंचावल्या.

"पण मुद्दा तो नव्हे. अखेर मी निरोप घेतला, म्हाताऱ्याच्या फार नियमित सवयी आहेत. ह्या वयात लौकर झोपी जातात. मी बाहेर पडलो...

माझा त्रिफोन कुठंच दिसेना! मी चिडलो आणि विचारलं: 'त्रिफोननं बग्गी कुठं नेली?' असं आढळलं की, मी उशीरा बाहेर पडेन अशा अंदाजानं तो त्याच्या कुठल्याशा बहिणीच्या लग्नाला गेला... ती नक्की कोण, देवाला ठाऊक! इथंच कुठंतरी पीटरबुर्ग प्रदेशात. बेटा बग्गीसुद्धा घेऊन गेला." परत शिष्टाचारादाखल जनरलनी प्सेल्दोनिमोवकडे पाहिले. तो त्यांच्या नजरेपायी घाबरून चुळबुळला, पण जनरलना त्याचे तसे वागणे नको होते. "सहानुभूती नाही, काळीज नाही," त्यांच्या मनात विचार चमकून गेला.

"काय म्हणताय!" आकीम पेत्रोविचनी आश्चर्याने थक्क होऊन म्हटले. जमावातून आश्चर्याची हलकी कुजबूज उमटली.

"माझी परिस्थिती काय झाली असेल कल्पना करा," (इवान इल्यिचनी जमलेल्या पाहुण्यांकडे दृष्टिक्षेप टाकला) "काही इलाज नव्हता, पायी चालू लागलो. मनाशी विचार केला, बल्शोय प्रॉस्पेक्तपर्यंत भटकत जावं आणि तिथं एखादा गाडीवान पकडावा, ख्यँ, ख्यँ!"

"ही-ही-ही!" अकीम पेत्रोविचनी आदराने हसण्याला पुस्ती जोडली. जमावातून परत एकदा कुजबूज उमटली, पण ह्यावेळी मजेचा सूर होता. ह्याचवेळी भिंतीवरील दिव्याची काच जोराने तडकून फुटली. कुणीतरी वेगाने दिव्याकडे धावला. प्सेल्दोनिमोवने दिव्याकडे एकदा कठोरपणे पाहिले, पण जनरलनी तिकडे लक्षच दिले नाही आणि सारे शांत झाले.

"तर मी चालतोय... रात्र अगदी सुरेख, शांत. एकदम संगीताचा, पावलं आपटण्याचा, लोकांच्या नाचण्याचा आवाज ऐकू आला. पोलीसाला कुतूहलानं विचारलं: प्सेल्दोनिमोवचं लग्न चाललंय असं तो म्हणाला. तू बंधू, सबंध पीटरबुर्ग प्रदेशाला बॉलनृत्याला बोलावलंस काय? ह्यँ-ह्यँ!" अचानक ते परत प्सेल्दोनिमोवकडे वळले.

"ही-ही-ही-ही! खरंच..." आकीम पेत्रोविचनी प्रतिसाद दिला. पाहुण्यांमध्ये परत चुळबूळ माजली, पण सर्वांत लाजिरवाणी बाब म्हणजे प्सेल्दोनिमोवने जरी झुकून परत अभिवादन केले, तरी त्याच्या मुद्रेवर अजिबात स्मित उमटले नव्हते. जणू तो लाकडाचा ठोकळा होता. "हा गाढव आहे काय?" इवान इल्यिचच्या मनात आले. "गधडा जरासा हसेल तर सारं काही साजरं दिसेल!" त्यांच्या काळजात अधीरता दाटली होती. "तर मनाशी विचार केला, माझ्या कनिष्ठाकडं जावं. तसा तो काही मला हाकलून लावायचा नाही... आवडो न आवडो – पाहुण्याचं स्वागत कर! बंधू,

तू मला क्षमा कर, मी जर तुम्हाला काही अडथळा आणला असला, तर मी जातो... मी सहज पहायला म्हणून आत आलो..."

आता हळूहळू सगळे हालचाल करू लागले. आकीम पेत्रोविच उन्मादक चेहऱ्याने पहात होते: "महामहीम, तुम्ही कसा अडथळा आणाल?" सर्व पाहुणे चुळबुळ लागले आणि तणाव नाहीसा झाल्याच्या पहिल्या खुणा दाखवू लागले. जवळ जवळ सर्व स्त्रिया बसल्या. हे चिन्ह चांगले होते. त्यांच्यातील अधिक धीट बायका रुमालांनी स्वतःला वारा घालू लागल्या. एका जीर्ण मखमाली पोषाखातील बाईने मुद्दाम मोठ्यांदा काही शेरा मारला. तिला उत्तर देणाऱ्या ऑफीसरचा त्याहून मोठ्या आवाजात बोलण्याचा इरादा होता, पण दुसरे कुणीही मोठ्यांदा बोलत नव्हते म्हणून त्याने विचार बदलला. पुरुषांमध्ये कारकून आणि काही विद्यार्थ्यांचा जास्त भरणा होता. एकमेकांना नेत्रपल्लवी करून आणि खोकून तणाव शिथिल करण्याचे ते इशारे करू लागले, वेगवेगळया दिशांना एक-दोन पावले टाकू लागले. वस्तुतः कुणालाही विशेष लाजल्यासारखे वाटत नव्हते. पण त्यांना अवघडल्याप्रमाणे झाले होते आणि त्यांच्या आनंदावर विरजण टाकणाऱ्या ह्या माणसाबद्दल मनातल्या मनात त्यांना वैरभावना वाटत होती. स्वतःच्या भित्रेपणाची शरम आलेला ऑफीसर टेबलाच्या दिशेने जाऊ लागला.

"अरे बंधू, तुझं नाव आणि तुझ्या वडलांचं नाव काय?" इवान इल्यिचनी प्सेल्दोनिमोवला विचारले.

"पोरफीरी पेत्रोविच, महामहीम," कवायतीला उभे राहिलेल्या शिपायाच्या थाटात डोळे विस्फारून तो उत्तरला.

"अरे पोरफीरी पेत्रोविच, तुझ्या नव्या नवरीशी माझी ओळख तर करून दे... तिच्यापाशी मला घेऊन जा..."

आणि ते उठू लागले. पण प्सेल्दोनिमोव तडक धावत दिवाणखान्यात गेला. नवरी दारातच उभी होती, पण स्वतःचा उल्लेख ऐकताच ती लपली. क्षणभरानंतर प्सेल्दोनिमोव तिच्या हाताला धरून तिला घेऊन आला. सर्वांनी त्यांना वाट करून दिली. इवान इल्यिच गंभीरपणे उठून उभे राहिले आणि तिच्याकडे वळून त्यांनी सौजन्यपूर्ण स्मित केले.

"आपल्याला भेटून फार फार आनंद झाला," डौलदारपणे मान झुकवून ते म्हणाले. "विशेषतः अशा दिवशी..."

त्यांनी लबाड स्मित केले. बायकांमध्ये एक प्रसन्न खळबळ माजली.

"मोहक!" मखमाली पोषाखातील महिला चीत्कारली.

नवरी प्सेल्दोनिमोवला अनुरूप होती. कृश बांध्याची ती मुलगी सतरा-पेक्षा जास्त वयाची नव्हती. तिची कांती फिकट होती, चेहरा छोटुकला होता व त्यावर लहान धारदार नाक होते. भिरीभिरी फिरणाऱ्या तिच्या बारीक डोळयांमध्ये शरम अजिबात नव्हती, उलट त्यांच्यात कुतूहल होते व काहीसा दुष्टपणाही होता. कदाचित प्सेल्दोनिमोवने तिला केवळ तिच्या रूपापायी स्वीकारले नव्हते. गुलाबी अस्तराचा शुभ्र तलम मलमलीचा पोषाख तिने परिधान केला होता. तिची मान हडकुळी होती, शरीर कोंबडीच्या पिलासारखे होते, तिची हाडे ठळक उठून दिसत होती. जनरलांच्या अभिवादनाला उत्तर म्हणून ती काहीही बोलू शकली नाही.

"वा, छान आहे तुझी नवरी," जणू काही केवळ प्सेल्दोनिमोवला सांगावे अशा दबत्या आवाजात इवान इल्यिच म्हणाले, पण हे शब्द तिच्या कानांपर्यंत पोहोचतील अशी त्यांनी खबरदारी घेतली. प्सेल्दोनिमोवने एका शब्दाने उत्तर दिले नाही, ह्यावेळी तो खाली झुकलासुद्धा नाही. त्याच्या डोळयांमध्ये काहीतरी थंड, रहस्यमय, काहीतरी अशुभ भाव चमकला असा इवान इल्यिचना भास झाला. कोणत्याही परिस्थितीत त्याच्या काळजाला हात घालणे आवश्यक होते. म्हणून तर ते तेथे आले होते.

"जोडपं छान आहे," त्यांच्या मनात विचार आला. "पण तरीही..."

आणि आता दिवाणावर त्यांच्याशेजारी बसलेल्या नवरीकडे त्यांनी परत मोर्चा वळविला. पण त्यांच्या दोन-तीन प्रश्नांना तिच्याकडून फक्त हो अथवा नाही अशी तुटक उत्तरे मिळाली व तीसुद्धा अस्पष्ट.

"निदान हिनं थोडं लाजावं," त्यांच्या मनातील विचारचक्र पुढे चालू होते. "तेव्हा मी थट्टा सुरू केली असती. अन्यथा माझी परिस्थिती फारच विकट आहे." आकीम पेत्रोविचही शुंभाप्रमाणे गप्प होता आणि त्याचा हा मूर्खपणा अक्षम्य होता.

"मंडळी! मी तुमच्या मनोरंजनात व्यत्यय तर आणला नाही ना?" इवान इल्यिचनी सर्वांना उद्देशून विचारले. स्वतःच्या हातांचे तळवे घामेजल्याचेही त्यांना जाणवले.

"मुळीच नाही... चिंता करू नका, महामहीम, आत्ता सुरू करतो, तोवर... जरा थंड होतोय," ऑफीसर उत्तरला. नवरीने त्याच्याकडे कौतुकाने पाहिले. ऑफीसर अजून म्हातारा झाला नव्हता आणि कुठल्यातरी रेजिमेंटचा गणवेष त्याच्या अंगावर होता. प्सेल्दोनिमोव अजूनही तेथेच पोक काढून उभा होता व त्याचे नाक त्यामुळे अधिकच बाकदार जाणवत

होते. धन्याच्या निरोपांची वाट पहात हाती ओव्हरकोट धरून उभ्या असलेल्या चोपदाराप्रमाणे तो ऐकत उभा होता. खुद्द इवान इल्यिचनी ही तुलना केली होती. त्यांचा तोल सुटत चालला होता, त्यांना अवघड वाटत होते, भयानक अवघड वाटत होते, जणू जमीन त्यांच्या पायांखालून निसटत होती, जणू ते अशा ठिकाणी अडकले होते जेथून बाहेर पडणे त्यांना अशक्य ठरले होते, अक्षरश: अंधारात चाचपडल्यासारखी त्यांची अवस्था झाली होती.

अचानक सर्व पांगले आणि एक फारशी उंच नसलेली, स्थूल देहाची वयस्क बाई तेथे अवतरली. तिचे कपडे साधे असले तरी नेटके होते, खांद्यांवर मोठ्ठा रुमाल होता व गळ्याशी त्याला पिन अडकवली होती आणि डोक्यावरील टोपीची तिला सवय नसावी असे भासत होते. तिच्या हातांमध्ये फार मोठे नसलेले गोल तबक होते, त्या तबकात बूच उघडलेली पण अद्याप पूर्ण भरलेली शँपेनची बाटली होती व अवघे दोन चषक होते—ना जास्त ना कमी. म्हणजे ती बाटली फक्त दोन पाहुण्यांसाठी होती.

वयस्क बाई थेट जनरलांपाशी आली.

"माफ करा, महामहीम," वाकून अभिवादन करीत ती म्हणाली, "आमच्या घराला आपले पाय लागले, माझ्या मुलाच्या लग्नाला हजर राहून आमचा बहुमान केलात, तर कृपया मदिरा स्वीकारून तरुण जोडप्याचं अभिनंदन करा. नाही म्हणू नका, आमचा आदर राखा."

इवान इल्यिचना तिने फार मोठ्या अडचणीतून मुक्त केले होते. ती अजून तेवढी म्हातारी बाई नव्हती, तिचे वय फार तर पंचेचाळीस-शेहेचाळीस वर्षांचे होते, त्याहून जास्त नव्हे. पण तिचा खूप सुस्वभावी, गुलाबी, मनमोकळा रशियन चेहरा होता, तिचे स्मित प्रेमळ होते; ती एवढ्या साधेपणाने झुकली, की इवान इल्यिचना एकदम हुरूप चढला व त्यांना परत आशा वाटू लागली.

"तर तुम्ही मुलाच्या मातोश्री?" दिवाणावरून उठत ते म्हणाले.

"होय, महामहीम," मान लांबवून परत एकदा नाक पुढे करीत प्सेल्दोनिमोव पुटपुटला.

"ओहो! फार आनंद, फार आनंद झाला आपल्याला भेटून!"

"तर नाही म्हणू नका, महामहीम."

"मी अत्यंत आनंदानं स्वीकारतो!"

तबक ठेवण्यात आले आणि मद्य ओतायला प्सेल्दोनिमोव पुढे धावला. अजून उभ्याच असलेल्या इवान इल्यिचनी चषक उचलला.

"मला ह्या घटनेचा विशेष, अगदी खास आनंद होतोय की मी..." ते बोलू लागले, "मी सर्वांसमोर सांगू शकतो... थोडक्यात, वरिष्ठ म्हणून... बाईसाहेब तुम्हाला (ते नवविवाहितांकडे वळून म्हणाले) आणि माझ्या मित्रा पोरफीरी तुला, संपूर्ण संपन्नतेचा आणि दीर्घ सुखाचा लाभ होवो अशी इच्छा व्यक्त करतो."

आणि अत्यंत भावनाभराने त्यांनी चषक रिता केला. ह्या संध्याकाळ-पासून सातवा. प्सेल्दोनिमोव गंभीरपणे आणि खिन्नपणे पहात होता. जनर-लना त्याचा फार तिटकारा वाटू लागला होता.

"आणि हा लंबू (त्यांनी ऑफीसरकडे नजर टाकली) इथंच घोटाळ-तोय. बेटा एक आरोळी का ठोकत नाही – हुर्रा? मग सगळं रांकेला लागेल..."

"आणि आपण, आकीम पेत्रोविच, प्या आणि अभिनंदन करा," म्हातारी मुख्य कारकुनाला उद्देशून पुढे म्हणाली. "आपण त्याचे प्रमुख, तो तुमच्या हाताखालचा. त्याची आई म्हणून सांगत्ये, माझ्या मुलावर लक्ष ठेवा. यापुढंही आम्हाला विसरू नका, आकीम पेत्रोविच, तुम्ही खूप भले माणूस आहात."

"ह्या रशियन म्हाताऱ्या किती छान!" इवान इल्यिचच्या मनात आले. "सर्वांना आनंदी केलं. मला नेहमी माणसं आवडत आलीत..."

ह्या क्षणाला आणखी एक तबक मेजावर आणण्यात आले. अजून न धुतलेल्या नव्याकोऱ्या छापील चीटाचा फ्रॉक सळसळवीत आणि गोलाकार फुगीर झगा घातलेल्या एका मुलीने ते तबक आणले होते. तबक खूप मोठे असल्यामुळे तिने कसेबसे हातांवर वाहून ते आणले होते. सफरचंदे, टॉफी, मार्मलेड, आक्रोड इत्यादी पदार्थांनी भरलेल्या असंख्य बशा त्या तबकात होत्या. ह्या क्षणापर्यंत तबक दिवाणखान्यात पाहुण्यांसाठी, विशेषतः महिलां-साठी, ठेवलेले होते. पण आता फक्त एकट्या जनरलांसमोर ते ठेवण्यात आले.

"संकोच करू नका, महामहीम, आमच्या गरीबाघरच्या फराळाचा," परत झुकून अभिवादन करीत म्हातारी म्हणाली.

"आनंदानं!" इवान इल्यिच म्हणाले आणि दोन बोटांमध्ये त्यांनी मजेत एक आक्रोड फोडला. अगदी अखेरपर्यंत लोकशाही वृत्तीने वागण्याचा त्यांनी निर्धार केला होता.

दरम्यान नवरी खी-खी हसली.

"काय झालं?" जिवंतपणाची खूण पाहून सस्मित मुद्रेने इवान इल्यिचनी विचारले.

"ते, इवान कोस्तेन्कीनिच हसवताहेत," नजर खाली झुकवून ती उत्तरली.

दिवाणामागे आडोसा घेऊन मादाम प्सेल्दोनिमोवशी कुजबुजणाऱ्या एका देखण्या, सोनेरी केसांच्या तरुणाकडे जनरलांचे यापूर्वीच लक्ष गेले होते. तो तरुण उभा राहिला. तो खूप लाजरा आणि वयाने खूप लहान दिसत होता.

"मी त्यांना स्वप्नांच्या पुस्तकाबद्दल सांगत होतो, महामहीम," खजिल-पणे क्षमायाचनेच्या स्वरात तो पुटपुटला.

"हे कसलं स्वप्नांचं पुस्तक?" इवान इल्यिचनी सौम्यपणे विचारले.

"एक नवीन स्वप्नांचं पुस्तक आहे, साहित्यिक. मी त्यांना म्हटलं की, श्री. पानायेव स्वप्नात दिसले, तर त्याचा अर्थ सदऱ्यावर कॉफी सांडणार!"

"किती भाबडेपणा!" इवान इल्यिचच्या मनात संतापाने विचार आला. त्या तरुणाचा चेहरा बोलताना लाजेपायी जरी लालेलाल बनला होता, तरी श्री पानायेव यांच्याबद्दल सांगितल्याचा त्याला अत्यंत आनंद झाला होता.

"अं... हो, मी ऐकलंय..." महामहीमांनी त्याला प्रतिसाद दिला.

"नाही, त्यापेक्षा जास्त चांगलं एक आहे," दुसरा एक आवाज अगदी इवान इल्यिचच्या नजीक उमटला. "एक नवा शब्दकोश बाहेर पडतोय आणि असं म्हणतात की, श्रीमान क्रायेवस्की आल्फेराकी... आणि ओब्लीचितेल्नाया साहित्यावर लेख लिहिणार आहेत..."

हा शेरा मारणारा तरुण बुजरा मुळीच नव्हता, उलट अतिपरिचय करण्याकडे त्याचा कल होता. त्याने हातमोजे आणि पांढरी बंडी घातली होती व हातांमध्ये हॅट धरली होती. तो नाचला नव्हता, नुसता आढ्यतेने पहात होता, कारण 'गोलोवेश्का'[16] नामक एका औपरोधिक नियतकालि-कात तो काम करीत होता, अगदी योगायोगाने विवाहसमारंभाला आला होता. त्याला प्सेल्दोनिमोवने सन्मान्य पाहुणा म्हणून बोलाविले होते. त्या दोघांची एक वर्षापूर्वीपासून अरे-तुरेवर ओळख होती जेव्हा एका जर्मन बाईच्या "कोपऱ्यात" दोघांनी उपासमार सोसली होती. हा तरुण वोदका पीत होता आणि त्यासाठी वारंवार पाठीमागच्या एका खोलीत जात होता.

त्या खोलीचा रस्ता सर्वांना माहीत होता. जनरलना हा तरुण मुळीच आवडला नव्हता.

"आणि त्यात गंमत अशी आहे, महामहीम," अचानक तो सोनेरी केसवाला तरुण – ज्याने कॉफी सांडण्याबद्दलची गोष्ट सांगितली होती व पांढरी बंडीवाला तरुण ज्याच्याकडे तिटकाऱ्याने पहात होता – आनंदाने म्हणाला, "श्री. क्रायेवस्कींना शुद्धलेखन नीट माहीत नाही आणि ओब्लीचितेल्नायाऐवजी ते आब्लीचितेल्नाया लिहितात असा लेखकाचा दावा आहे..."

पण तो बिचारा तरुण वाक्य कसेबसे पूर्ण करू शकला. जनरलांच्या डोळ्यांकडे पाहताच त्याला उमजले होते की, त्यांना हे सर्व पूर्वीच माहीत होते व ही वस्तुस्थिती त्यांना शरमिंदी करीत होती. तरुणाला फार गोंधळल्यासारखे झाले. त्याने कुठेतरी तोंड लपविले आणि नंतर उरलेला सारा वेळ तो खिन्न होता. त्याची जागा 'गोलोवेश्का'च्या धीट कर्मचाऱ्याने घेतली व जनरलांच्या अगदी जवळ बसण्याच्या इराद्याने तो पुढे आला. ही जवळीक जनरलना विशेष रुचली नाही.

"हो! मला सांग, पोरफीरी," काहीतरी बोलण्याच्या हेतूने ते म्हणाले, "फार पूर्वीपासून तुला मी विचारणार होतो, तुला प्सेल्दोनिमोव का म्हणतात – प्सेवदोनिमोव का नाही? बहुधा तुझं आडनाव प्सेवदोनिमोव असावं?"

"त्याबाबत मी नक्की सांगू शकत नाही, महामहीम," प्सेल्दोनिमोव उत्तरला.

"त्याचे वडील प्रथम जेव्हा नोकरीत शिरले तेव्हा कागदपत्रांची काही भानगड झाली असावी, म्हणून आता त्याचं आडनाव प्सेल्दोनिमोव राहिलंय," आकीम पेत्रोविचनी खुलासा केला. "असं घडतं कधी कधी."

"अगदी बरोब्बर!" जनरल अधीरपणे म्हणाले. "अगदी बरोबर, कारण तुम्हीच बघा: प्सेवदोनिमोव हा शब्द साहित्यातल्या "प्सेवदोनीम"* वरून आलाय. पण प्सेल्दोनिमोव ह्या शब्दाला काही अर्थ नाही."

"अज्ञानापायी," आकीम पेत्रोविचनी पुस्ती जोडली.

"खरंच, अज्ञानापायी?"

"रशियन माणसं! अज्ञानापायी काही वेळा शब्द बदलतात. आणि

---

* टोपण नाव – अनु.

काही वेळा स्वतःच्या पद्धतीनं त्यांचा उच्चार करतात. उदाहरणार्थ, "इनवालिद" ऐवजी ते "न्येवालिद" म्हणतात."

"खरंच... न्येवालिद... ख्यॅं, ख्यॅं, ख्यॅं!"

"मेमेर* सुद्धा म्हणतात, महामहीम," उंच ऑफीसर म्हणाला. स्वतःचे अस्तित्व दाखविण्यासाठी केव्हापासून तो तळमळत होता.

"मूमेर म्हणजे काय?"

"मूमेर म्हणजे नूमेर**, महामहीम!"

"अच्छा, मूमेर... नूमेरऐवजी... हो, हो... ख्यॅं, ख्यॅं, ख्यॅं!" ऑफीसरसाठी इवान इल्यिचना खिंकाळणे आवश्यक होते.

ऑफीसरने त्याचा टाय नीट केला.

"आणखी म्हणतात: नीमो," नियतकालिकाच्या कर्मचाऱ्याने सूर लावला. पण त्याचे बोलणे न ऐकण्याचे महामहीमांनी ठरविले. सगळ्यांसाठी खिंकाळणे शक्य नव्हते.

"मीमो*** ऐवजी नीमो," नियतकालिकाच्या "कर्मचाऱ्या" ने आपले घोडे पुढे रेटले.

इवान इल्यिचनी त्याच्याकडे कठोर नजरेने पाहिले.

"उगीच मधे तोंड कशाला खुपसतोस?" प्सेल्दोनिमोवने कर्मचाऱ्याला हळूच टोचले.

"मी फक्त बोलतोय! बोलायचंसुद्धा नाही का?" त्याने दबत्या आवाजात विचारले, पण पुढे तो गप्प झाला व आंतरिक संतापाने खोलीतून नाहीसा झाला.

त्याने सरळ मागची खोली गाठली. आरंभापासून नाचणाऱ्या पुरुषांसाठी तेथे दोन प्रकारच्या वोदका, खारे मासे, माशांची अंडी आणि खास स्थानिक कडक मद्याची बाटली यारोस्लावल कशीद्याच्या रुमालाने झाकलेल्या छोटया मेजावर ठेवलेली होती. काळजातील रागापायी तो ग्लासात वोदका ओतत होता तेवढयात विखुरलेल्या केसांचा वैद्यकीय विद्यार्थी – प्सेल्दोनिमोव नृत्यसमारंभातील सर्वोत्कृष्ट नर्तक, ज्याला कॅनकॅन नृत्यही माहीत होते – अचानक आत घुसला. त्याने हावरेपणाने दारूने भरलेले काचपात्र धरले.

---

* मेंबर – अनु.

** नंबर – अनु.

*** जवळून – अनु.

"आत्ता सुरू करताहेत!" घाईघाईने वोदका गलासात ओतत तो म्हणाला. "बघायला ये. हातांवर नाचणार आहे मी पाय वर करून. आणि जेवणानंतर **मासजोनृत्य**[17] करायचं धाडस पत्करणार आहे. लग्नाच्या वेळी ते छान शोभतं. प्सेल्दोनिमोवला मित्रत्वाची सूचना, म्हणून... क्लेओपात्रा सेम्योनोवना फार छान आहे, तिच्याशी कोणताही धोका पत्करता येतो."

"हा मागासलेला आहे," ग्लासातील वोदका पीत कर्मचारी दुर्मुखलेपणाने उत्तरला.

"कोण?"

"तो खासा, ज्याच्यापुढं सगळा फराळ ठेवला. प्रतिगामी! मी तुला सांगतोय."

"झाली तुझी सुरुवात," विद्यार्थी पुटपुटला आणि संगीताचे स्वर ऐकताच खोलीबाहेर धावला.

कर्मचारी एकटा उरला. धैर्यासाठी आणि स्वातंत्र्यासाठी त्याने आणखी एकदा ग्लास भरला, तो घशाखाली ओतला, खाद्यपदार्थाचा तोबरा भरला आणि राज्य-सल्लागार इवान इल्यिचना एवढा कट्टर शत्रू अथवा त्यांच्यावर सूड घेण्यास टपलेला, 'गोलोवेश्का'च्या कर्मचाऱ्याहून दुसरा कुणीही आजवर जन्मला नव्हता – विशेषत: वोदकाचे एक-दोन प्याले रिचविल्यानंतर. हाय! इवान इल्यिचना ह्याबद्दल पुसटशी कल्पनासुद्धा नव्हती. आणखी एका अत्यंत महत्त्वाच्या परिस्थितीचीही त्यांना कधी अंधुक जाणीव नव्हती, पण पाहुणे व महामहीम यांच्यातील पुढील सर्व संबंधांवर तिचा परिणाम घडला. स्वत:च्या कनिष्ठाच्या विवाहाला हजर राहण्याबद्दलचा त्यांनी योग्य आणि तपशीलवार खुलासा दिला होता हे खरे असले तरी, त्यांच्या खुलाशाने कुणाचेही प्रत्यक्षात समाधान झाले नव्हते व पाहुणे अजूनही अवघडलेले होते. आणि मग जादू घडावी तसे सर्व पालटले. प्रत्येकाला मोकळे वाटू लागले आणि जणू अनपेक्षित पाहुणा त्या खोलीत नव्हताच अशा थाटात धिंगाणा घालण्याची, हसण्याची आणि चीत्कारण्याची प्रत्येकाची सज्जता बनली. ह्याचे कारण उपस्थितांमध्ये अफवा पसरली, कुजबुजत्या आवाजात माहिती पसरली, की हा पाहुणा किंचित... झिंगलेला होता. आरंभी जरी ही भयानक निंदा भासली, तरी हळूहळू तिच्यातील खरेपण सर्वांना पटले आणि एकदम सर्व स्पष्ट झाले. एवढेच नव्हे तर अचानक असाधारण मोकळेपणाची भावना पसरली. त्याच क्षणाला नृत्यसंगीत सुरू झाले, जेव-

णापूर्वीचा तो शेवटचा नाच होता आणि वैद्यक विषयाचा विद्यार्थी त्या नाचात भाग घ्यायला कमालीचा अधीर बनला होता.

इवान इल्यिचनी परत एकदा नवरीशी बोलण्याचा, ह्यावेळी योग्य शाब्दिक कोटी करून तिला जिंकण्याचा, नुकता मनाशी निर्धार केला होता, तेवढ्यात उंच ऑफीसर तिच्यापाशी धावत आला व तिच्यासमोर एक गुडघा टेकवून बसला. ती चटकन दिवाणावरून उठली व नाचात भाग घ्यायला त्याच्याबरोबर भिरभिरत गेली. ऑफीसरने साधी क्षमासुद्धा मागितली नाही आणि तिने तर जनरलकडे ढुंकून बघितले नाही. त्यांची ब्याद टळल्याचा तिला खरे तर आनंदच झाला होता.

"सरतेशेवटी तिचा अधिकार आहे," इवान इल्यिचनी मनाशी विचार केला, "आणि त्यांना शिष्टाचार माहीत नाही."

"हं... बंधू पोरफीरी, तू माझ्याशी उपचार पाळत बसू नको," ते प्सेल्दोनिमोवला उद्देशून म्हणाले. "कदाचित तुला तिथं काही काम असेल... व्यवस्था पहायची असेल... तर कृपया लाजू नको." पण मनाशी ते म्हणाले: "हा बेटा माझ्यावर पहारा करतोय का?"

प्सेल्दोनिमोवची लांबोडी मान आणि बोचरी नजर इवान इल्यिचना असह्य बनली होती. थोडक्यात, त्यांच्या अपेक्षेनुसार इथे काहीही घडत नव्हते, अगदी वेगळेच घडत होते, पण अद्याप दूरपर्यंत हे मान्य करायची इवान इल्यिचची इच्छा नव्हती.

नाच सुरू झाला.

"आज्ञा करावी, महामहीम?" आकीम पेत्रोविच महामहीमांचा चषक परत भरण्यासाठी हाती बाटली धरून आदराने विचारते झाले.

"मी... मला खरंच माहीत नाही, जर..."

पण एव्हाना मुद्रेवर सुखकारक तेज झळकवून आकीम पेत्रोविच चषकात शँपेन ओतत होते. महामहीमांचा चषक भरून झाल्यानंतर त्यांनी हळूच, चोरटेपणाने, अंगाला ओळोखेपिळोखे देत स्वतःचा चषक भरला. पण बाह्यतः आदर व्यक्त करण्यासाठी चषकाच्या कडेपासून एक बोटभर शँपेन कमी भरली. स्वतःच्या नजीकच्या वरिष्ठापाशी बसताना त्यांची अवस्था बाळंतपणाच्या कळा देणाऱ्या बाईसारखी झाली होती. आणि बोलायला त्यांना एकही विषय गवसत नव्हता. ज्याअर्थी महामहीमांच्या संगतीचा सन्मान

त्यांना लाभला होता, त्याअर्थी महामहीमांचे मनोरंजन करणे त्यांचे उघड कर्तव्य होते. शँपेनने त्यांना बहाणा प्राप्त करून दिला आणि महामहीमांना-मुद्धा चषकात शँपेन ओतल्याबद्दल बरे वाटले होते – त्यांना खुद्द शँपेनबद्दल सुख वाटत नव्हते, कारण ती थंड नव्हती अणि अगदी भिकार होती, पण नैतिकदृष्टचा सुख वाटले होते.

"म्हाताऱ्याला स्वतःला प्यायची इच्छा आहे," इवान इल्यिचच्या मनात विचार आला, "पण माझ्याशिवाय त्याची हिंमत होत नाही. कशाला अडवायचं... शिवाय आमच्या दोघात बाटली उभी असताना न पिणं हास्यास्पद दिसेल."

त्यांनी घुटका घेतला आणि नुसते बसून राहण्यापेक्षा हे अधिक चांगले भासले.

"मी इथं आहे," शब्दांमध्ये अंतर वाढवीत आणि त्यांच्यावर जोर देत ते बोलू लागले, "मी इथं अगदी योगायोगानं आलो... अर्थात कुणाला वाटेल... की अशा मंडळीत मी हजर असणं योग्य नव्हे."

आकीम पेत्रोविच गप्प बसून भित्र्या कुतूहलाने ऐकत होते.

"पण मला आशा आहे की, मी इथं का आहे हे तुम्ही समजू शकाल... अर्थात मी काही दारू प्यायला इथं आलो नाही. ख्यॅं, ख्यॅं!"

आकीम पेत्रोविचना महामहीमांबरोबर खिंकाळायला आवडले असते, पण काही कारणाने तसे वागणे त्यांना जमले नाही आणि परत एकदा सांत्वनपर असे काहीही बोलणे त्यांना सुचले नाही.

"मी इथं... तसं सांगायचं तर, धीर द्यायला – नैतिक... तसं सांगायचं तर... उद्दिष्ट दाखवायला," इवान इल्यिच पुढे बोलू लागले. आकीम पेत्रोविचच्या मठ्ठपणाचा त्यांना राग आला होता. पण बिचाऱ्या आकीम पेत्रोविचनी अपराधी भावनेने नजर खाली वळविलेली पाहताच ते एकदम गप्प झाले. काहीशा गोंधळात जनरलनी परत एक घुटका मारला आणि ह्यातच आपली सुटका समजून आकीम पेत्रोविचनी तत्परतेने बाटली उचलून नव्याने चषक भरला.

"तुझ्यापाशी विशेष हिकमती नाहीत," इवान इल्यिच बिचाऱ्या आकीम पेत्रोविचकडे कठोर नजरेने पहात मनाशी म्हणाले. जनरलांची ती करडी नजर जाणवलेल्या आकीम पेत्रोविचनी पुढे तोंडातून एक शब्द काढला नाही आणि दृष्टी वर उचलली नाही. अशा रीतीने दोन मिनिटे ते दोघे तसेच

बसून राहिले, पण आकीम पेत्रोविचना ती अत्यंत वेदनादायी दोन मिनिटे होती.

आकीम पेत्रोविचबद्दल दोन शब्द. हा माणूस गरीब कोकरासारखा होता, जुन्या पठडीतील होता, गुलामीत वाढला होता, पण तरीही तो प्रेमळ आणि खानदानी होता. तो पीटरबुर्गचा रशियन होता. म्हणजे त्याचे वडील आणि वडिलांचे वडील पीटरबुर्गमध्ये जन्मले व वाढले होते, तेथेच त्यांनी चाकरी केली होती आणि शहर सोडून ते कधीही बाहेर गेले नव्हते. हा रशियनांचा एक खास वर्ग होता. रशियात काय चाललेय ह्याचा त्यांना अजिबात पत्ता नव्हता व ह्या अज्ञानाबद्दल त्यांना मुळीच चिंता वाटत नव्हती. त्यांचे सर्व ध्यान पीटरबुर्गवर आणि सर्वप्रथम ते ज्या कचेरीत नोकरी करीत, तेथे केंद्रित झालेले होते. कोपेक लावून पत्त्यांचा जुगार खेळण्यात, छोटचा दुकानांमध्ये आणि त्यांच्या मासिक वेतनात त्यांचे सारे ध्यान गुंतलेले होते. रशियन चालीरीती आणि गाणी यांच्याबद्दल त्यांना काहीही माहीत नव्हते, फक्त 'लूचीनुष्का' माहीत होते, कारण भटके बाजाची पेटीवाले ते गाणे सतत पेटीवर वाजवीत असत. त्याशिवाय आणखी दोन महत्त्वाची आणि अपरिहार्य अशी वैशिष्टचे होती, ज्यांच्यामुळे खरा रशियन व पीटरबुर्गचा रशियन यांच्यातील भेद तात्काळ समजून येत असे. पहिले वैशिष्टच म्हणजे पीटरबुर्गचे सगळे रशियन 'पीटरबुर्गचे बातमीपत्र'[48] न म्हणता 'अकादमी बातमीपत्र' म्हणत. दुसरे तेवढेच महत्त्वाचे म्हणजे "झावत्रक"* हा शब्द पीटरबुर्गचा रशियन कधीही उच्चारत नाही, तर "फ्रीश्तिक" म्हणतो आणि "फ्री" वर विशेष आघात देतो. ह्या दोन आवश्यक भेदांवरून तुम्ही त्यांना नेहमी ओळखू शकता. थोडक्यात, गेल्या पस्तीस वर्षांत पूर्णतया घडलेला सालस नमुना आहे. म्हणजे आकीम पेत्रोविच मूर्ख नव्हता. जर जनरलनी त्याला त्याच्या ज्ञानाच्या क्षेत्राशी संबंधित काही प्रश्न विचारला असता, तर त्याने उत्तर दिले असते व संभाषण चालू ठेवले असते, पण कनिष्ठाने काही प्रश्न विचारणे अयोग्य होते आणि महामहीमांच्या सध्याच्या हेतूंना अधिक जाणून घेण्याची आकीम पेत्रोविचला तळमळ लागली होती.

दरम्यान विचारचक्राच्या भोवऱ्यात इवान इल्यिच पुरते गुरफटून गेले होते. त्या विमनस्क मनःस्थितीत नकळतपणे सारा वेळ ते शँपेनचे घुटके

---

* न्याहरी – अनु.

घेत राहिले होते. आणि आकीम पेत्रोविच उत्साहाने त्यांचा चषक पुनः-पुन्हा भरीत होते. दोघांपैकी कुणीही बोलत नव्हते. इवान इल्यिच विशेष ध्यान देऊन नाच पाहू लागले. अचानक एक विशिष्ट तपशील पाहाताच ते चकित झाले.

नाच धुंद बेभानपणे चालू होता. बेफाम मनाने नाचाचा आनंद लुटण्याची सर्वांची शिकस्त चालू होती. काही थोडे पुरुषच नाचात निष्णात होते, पण ज्याना नाच येत नव्हता असे लोकही एवढ्या जोरात पाय आपटत होते की, तेसुद्धा उत्तम नर्तक भासत होते. ऑफीसरचे वेगळेपण उठून दिसत होते. नाचाच्या विविध मुद्रा एकट्याने नाचणे त्याला आवडत होते. त्याच्या वळसेदार हालचाली प्रशंसनीय होत्या – खांबासारखा ताठ तो उभा रहायचा आणि अचानक जणू खाली कोसळत असल्याप्रमाणे बगलांना वाकायचा; पण दुसऱ्याच क्षणी विरुद्ध बाजूला जमिनीशी कोन साधायचा. त्याने चेहरा गंभीर राखला होता आणि त्याच्या नाचण्याचे प्रत्येकजण कौतुक करीत होता. दुसरा पुरुष नाचाच्या आधी चिक्कार प्यायल्यामुळे नाचाच्या पहिल्या फेरीनंतर तात्काळ झोपी गेला होता व त्याच्या जोडीदारीणीला एकटीने नाचावे लागत होते. निळ्या रुमालवाल्या महिलेबरोबर नाचणाऱ्या तरुण रजिस्ट्रारने त्या संध्याकाळच्या पाचही काद्रिल नाचांमध्ये एकच युक्ती पुनः-पुन्हा वापरली होती. त्या महिलेच्या किंचित मागे राहून तो तिच्या रुमालाचे टोक धरायचा आणि जोडीदार बदलण्याच्या क्षणाला त्या रुमालावर दहा-वीस चुंबनांचा वर्षाव करायची संधी घ्यायचा. ती महिला जणू काही तिच्या ध्यानातच आले नाही असा बहाणा करून त्याच्या पुढे तरंगत जायची. वैद्यकाच्या विद्यार्थ्याने खरोखरीच नुसत्या हातांवर नाचून दाखविले व इतरांनी उत्साहाने टाळ्या पिटून, आनंददर्शक चीत्कार काढून त्याचे कौतुक केले. थोडक्यात, मुक्त स्वातंत्र्याचे वातावरण नांदत होते. शँपेन चढलेले इवान इल्यिच स्मित करण्याच्या बेतात होते, पण एका कटु संशयाने हळूच त्यांच्या मनात शिरकाव केला. अर्थात त्या लोकांनी मनःपूत वागावे, मोकळेपणाने वावरावे, अशी त्यांची इच्छा होती. जेव्हा ती सारी माणसे त्यांच्यापासून मागे सरली होती, तेव्हा वातावरण मनमोकळे व्हावे म्हणून ते आसुसले होते, होय आसुसले होते, पण आता हा मोकळेपणा सर्व सीमा ओलांडून जाऊ लागला होता. उदाहरणार्थ, चौथ्या वेळेला विकत घेतलेला एक जीर्णशीर्ण निळा मखमली पोषाख परिधान केलेल्या बाईने नाचाच्या सहाव्या मुद्रेवेळी त्या पोषाखाला अशा पिना खोवल्या, की जणू तिने पाट-

लोण नेसलीय असे भासू लागले. हीच ती क्लेओपात्रा सेम्योनोवना होती, जिच्याशी तिचा जोडीदार वैद्यक विद्यार्थी याच्या मते कोणताही धोका पत्करायला हरकत नव्हती. वैद्यक विद्यार्थ्याबाबत काही बोलायची गरजच नव्हती : तो साक्षात फोकीन[19] होता. पण ह्या सगळ्याचा अर्थ काय? प्रथम ते मागे सरले आणि आता अचानक मोकाट सुटले. अर्थात त्यामुळे काही बिघडले नव्हते, पण हा बदल फार विचित्र होता. त्यांना त्यात अनिष्टता जाणवली. ते लोक इवान इल्यिचचे अस्तित्वच विसरून गेले होते. अर्थात ते प्रथम हसले होते आणि टाळ्या वाजवण्याचे धाडसही त्यांनी केले होते. आकीम पेत्रोविचनी त्यांच्या सुराला सूर लावून आदरपूर्वक खीखी केले होते. महामहीमांच्या मनात त्यांच्याबद्दल नवा आकस निर्माण होतोय ह्याची त्यांना मुळीच कल्पना नव्हती.

"तरुण माणसा, फार सुंदर नाचता," जवळून जाणाऱ्या विद्यार्थ्याला सांगणे इवान इल्यिचना भाग पडले. काद्रिल नाच नुकताच संपला होता.

विद्यार्थी झटकन त्यांच्या दिशेला वळला, त्याने तोंड वाकडे केले आणि महामहीमांच्या चेहऱ्यापाशी उर्मटपणे स्वतःचा चेहरा भिडवून तो बेंबीच्या देठापासूनच्या आवाजात कोंबड्याप्रमाणे आरवला. हे अती झाले. इवान इल्यिच टेबलापासून उठले. तरीसुद्धा मुक्त हास्याचा दणका उडाला, कारण आरवणे फार स्वाभाविक उमटले होते व ही युक्ती अनपेक्षित होती. इवान इल्यिच अजून गोंधळल्या मनःस्थितीत तेथे उभे होते, तेवढ्यात प्सेल्दोनिमोव त्यांना जेवणाचे निमंत्रण द्यायला आला. त्याच्यापाठी त्याची आई होती.

"साहेब, महामहीम," ती झुकून म्हणाली, "आमचा बहुमान करावा, गरीबाघरच्या अन्नाला नाकारू नका..."

"मी... मला खरंच, माहीत नाही..." इवान इल्यिच बोलू लागले. "मी त्यासाठी आलो नव्हतो... मी ... आता जायच्या तयारीत होतो..."

खरेच त्यांनी हातात टोपी धरली होती. एवढेच नव्हे तर त्या क्षणी त्यांनी स्वतःशी शपथ घेतली होती की, कोणत्याही परिस्थितीत तेथून निघून जायचे, अजिबात थांबायचे नाही... आणि ते थांबले. मिनिटभरानंतर मिरवणुकीचे नेतृत्व करीत ते जेवणाच्या टेबलाकडे निघाले होते. प्सेल्दोनिमोवने व त्याच्या आईने पुढे जाऊन वाट मोकळी केली होती. अत्यंत मानाच्या स्थळी त्यांना स्थानापन्न करण्यात आले व परत एक बूच उघडलेली शँपेनची बाटली त्यांच्या बशीपाशी अवतरली. टेबलावर खारे मासे आणि वोदका होती. इवान इल्यिचनी हात पुढे केला, स्वतःच वोदका भल्या

मोठ्या ग्लासात ओतून घेतली व घशात ढकलली. वोदका प्यायची त्यांना सवय नव्हती. त्यांना भासले की, ते जणू उंच टेकाडावरून खाली गडगडत होते, कशालातरी धरून थांबणे आवश्यक होते हे त्यांना समजत होते, पण तशी कोणतीही शक्यता उपलब्ध नव्हती.

त्यांची परिस्थिती अधिकाधिक चमत्कारिक बनत चालली होती. खरेच तिच्यात काहीतरी दैवदुर्विलास सामावला होता. अवघ्या एका तासाच्या अवधीत त्यांच्या बाबतीत काय काय घडले ते देवच जाणतो. त्या घरात त्यांनी प्रवेश केला तेव्हा अखिल मानवतेसाठी आणि त्यांच्या सर्व कनिष्ठांसाठी ते बाहू पसरून उभे होते, पण अवघ्या एका तासाच्या आत त्यांना सखेद कबूल करावे लागले होते की, त्यांना प्सेल्दोनिमोवचा तिटकारा वाटत होता; त्याला, त्याच्या बायकोला व त्याच्या लग्नाला ते शिव्याशाप मोजत होते. एवढ्यावरच संपले नव्हते: त्यांना चेहऱ्यावरून व डोळ्यांवरून समजत होते की, खुद्द प्सेल्दोनिमोव त्यांचा तिटकारा करीत होता. त्याची नजर जणू म्हणत होती: "इथून चालता का होत नाहीस, नतद्रष्टा! माझ्या मानगुटीवर बसलास!..." इवान इल्यिचनी प्सेल्दोनिमोवच्या नजरेत हे सर्व केव्हाच वाचले होते.

असे असले तरी अगदी आत्तासुद्धा, टेबलापाशी बसल्यानंतर, परिस्थिती ही अशी होती हे स्वत:शी मान्य करण्यापेक्षा इवान इल्यिचनी आपला हात तोडून दिला असता. अजून घडी पुरती भरली नव्हती, अजून कुठेतरी नैतिक समतोल शिल्लक होता. पण काळजात... काळजात ठणकत होते. स्वातंत्र्याला, मोकळ्या हवेला विश्रांतीला ते उत्सुक होते. पण इवान इल्यिच फार कनवाळू गृहस्थ होते.

वस्तुत: त्यांना माहीत होते की, त्यांनी तेथून केव्हाच निघून जायला हवे होते, नुसते जायलाच नव्हे तर जीव वाचविण्यासाठी पळायला पाहिजे होते. त्यांना कळले होते की, रस्त्यावर त्यांनी कल्पना केली होती त्यानुसार त्या घरात घटना घडल्या नव्हत्या.

"मी कशासाठी आलो? इथे खाण्यासाठी आणि पिण्यासाठी?" खारा मासा तोंडी लावताना त्यांनी स्वत:ला प्रश्न केला. त्यांच्या विचारांनी दुष्ट वळण घेतले. स्वत:च्या पराक्रमाबाबत एक क्षणभर त्यांच्या मनात उपहासाची भावना उमटली. नेमक्या कोणत्या हेतूने ते तेथे आले होते ह्याचा त्यांचा त्यांनाच उलगडा होईनासा झाला.

"पण मी जाणार कसा? न संपवता निघून जाणं अशक्य होतं. काय म्हणतील? म्हणतील की, मी अयोग्य स्थळी भटकतोय. जर मी संपवलं नाही, तर तसंच भासेल. उदाहरणार्थ, स्तेपान निकीफोरोविच, सेम्योन इवानीच, कचेरीतले सगळे लोक, ते शेम्बेल आणि शूबिन उद्या काय म्हणतील (कारण ही बातमी बाहेर फुटणारच)? नाही, मी अशा रीतीनं बाहेर पडलं पाहिजे, की मी नेमका कशासाठी आलो होतो ह्याचा प्रत्ये-काला उलगडा झाला पाहिजे. माझा नैतिक हेतू मी स्पष्ट केला पाहिजे." पण तसे करायला संधी सापडत नव्हती. "ते माझा आदरसुद्धा राखत नाहीत," त्यांचे मनाशी बोलणे पुढे चालू झाले, "कशाला हसताहेत? असे बेशरम आहेत... जणू त्यांना काही भावनाच नाहीत. होय, सगळ्या नव्या पिढीत भावनाहीनता असल्याचा मला फार पूर्वीपासून संशय आहे. वाट्टेल त्या परिस्थितीत मी इथं थांबलंच पाहिजे! त्यांचा नाच संपलाय आणि आता टेबलाभोवती ते जमलेत, तेव्हा आता मी समस्या, सुधारणा आणि रशियाचा मोठेपणा ह्या विषयांवर बोलू शकतो... अजून मी त्यां-च्यावर मात करीन! होय! कदाचित, अजून काहीच नाही... कदाचित प्रत्यक्षात नेहमी असंच घडतं. त्यांना जिंकण्यासाठी कशानं बरं आरंभ करावा? कोणती पद्धत अवलंबावी? मी गोंधळलोय... बावरलोय... त्यांना काय हवं आहे, त्यांची काय मागणी आहे? ते तिथं हसताना मी पाहतोय... मला तर हसत नाहीत ना? देवा रे! पण मला काय हवंय... मी इथं आहे... निघून का जात नाही... काय मिळवायचा मी प्रयत्न करतोय?" ह्या विचारांसरशी त्यांच्या मनात काहीतरी शरमेची भावना, कसलीतरी खोल आणि असह्य शरमेची भावना, त्यांच्या काळजात जास्त जास्त घर करू लागली.

पण एकापाठोपाठ एक घटना तशीच घडत गेली.

टेबलाशी बसल्यानंतर बरोब्बर दोन मिनिटांनी एका भयानक विचाराने त्यांना पुरते झपाटले. अचानक त्यांना जाणवले की, त्यांना दारू कमा-लीची चढली होती आणि परिस्थिती पूर्वीसारखी नव्हती, तर पूर्णतया आटोक्याबाहेरची होती. ह्याचे कारण होते शँपेननंतर प्यायलेला वोदकाचा प्याला. त्याने तात्काळ परिणाम घडविला होता. त्यांना अत्यंत दुबळेपणा सर्वांगातून जाणवत होता. क्षणभर त्यांचे मन उभारी घेत होते, पण त्यांची सदसद्विवेकबुद्धी त्यांना शांत बसू देत नव्हती आणि सतत किंचाळत होती:

"हे चांगलं नाही, अजिबात चांगलं नाही, अत्यंत लाजिरवाणं आहे!" अर्थात चंचल झिंगलेले विचार एका जागी कायम राहू शकत नव्हते. त्यांच्या अंतरंगात दोन पक्ष ठळकपणे निर्माण झाले. एका पक्षात धाष्टर्य होते, जिंकण्याची खुमखुमी होती, अडथळे ओलांडण्याची हिंमत होती व अजूनही हेतू साध्य होईल अशी पराकाष्ठेची खात्री होती. दुसऱ्या बाजूला त्यांच्या काळजात खुपणारी वेदना होती आणि काळजातील रक्त कुणीतरी शोषून घेतेय अशी भावना होती. "लोक काय म्हणतील? ह्याची अखेर कशात होणार? उद्या काय होईल, उद्या, उद्या! ..."

यापूर्वी त्यांना अंधुक जाणीव होती की, पाहुण्यांमध्ये त्यांचे काही वैरी होते. "त्याचं कारण कदाचित मी इथं आलो तेव्हा थोडासा झिंगेत होतो," त्यांच्या मनात छळवादी संशयी विचार आला. आणि आता खरो-खरीच जेव्हा त्यांना आढळले की, टेबलापाशी त्यांचे शत्रू होते, तेव्हा त्यांच्या मनातील संशय पार विरून गेले.

"पण कशाबद्दल? कशाबद्दल?" ते मनाशी विचारीत होते.

ह्या टेबलाभोवती सर्व तीस पाहुणे बसले होते व त्यांच्यापैकी अनेकांची ब्रह्मानंदी टाळी लागली होती. बाकीचे उगीच बेफिकीर वागत होते, दुष्टा-व्याने ओरडत होते, एकाच वेळी बडबडत होते, अयोग्य बोलून पीत होते, बायकांच्या अंगांवर पावाचे तुकडे फेकत होते व त्यासुद्धा तशीच परतफेड करीत होत्या. एक मेणचट फ्रॉक-कोटातील पुरुष खुर्चीवर बसला त्याच क्षणी खाली कोसळला होता व सबंध जेवणभर फरशीवरच निजून होता. दुसरा टेबलावर चढून शुभचिंतनपर पेयपान करू इच्छित होता, पण ऑफीसरने त्याच्या कोटाच्या शेपट्या धरून त्याचा उत्साह आवरला होता. जेवणात सर्व पदार्थांची खिचडी झाली होती, जरी कुणा एका जनरलचा भूदास आचारी ह्या प्रसंगासाठी खास आणण्यात आला होता. जिभा आणि बटाटे, मांसाची जेली, कटलेटे आणि हिरवे वाटाणे, हंसाचे मांस आणि सर्वांत शेवटी दुधाचा चीक होता. पेयांमध्ये बीयर, वोदका आणि स्थानिक मदिरा यांचा समावेश होता. जनरलांच्या बशीशेजारी शँपेनची बाटली होती व आकीम पेत्रोविच टेबलापाशी पुढाकार घेऊ शकत नसल्यामुळे जनरलनाच त्यांच्या चषकात शँपेन ओतणे भाग पडले होते. स्वस्त मदिरा अथवा हाती जे येईल ते पेय इतर पाहुण्यांसाठी ठेवलेले होते. अनेक छोट्या मेजांना एकत्र करून जेवणाचे मेज बनविण्यात आले होते, त्यात पत्ते खेळण्याच्या टेबलाचाही समावेश होता. वेगवेगळ्या आच्छादनांमध्ये यारोस्लावल कशी-

ह्याचेही एक आच्छादन होते. स्त्री आणि पुरुष एकाआड एक बसले होते. प्सेल्दोनिमोवची आई मात्र टेबलाशी बसत नव्हती. ती सारखी धावपळ करीत होती, वेगवेगळ्या सूचना देत होती. पण आता एक अमंगळ बाई तेथे अवतरली. यापूर्वी तिचे दर्शन घडलेले नव्हते. लालसर रेशमी पोषाख तिने घातला होता, सुजलेल्या गालावर रुमाल बांधला होता व अत्यंत उंच टोपी डोक्यावर ठेवली होती. ती नवरीची आई होती आणि बऱ्याच आग्रहानंतर तिने जेवणाच्या मेजापाशी उपस्थित राहण्यास मान्यता दिली होती. प्सेल्दोनिमोवच्या आईशी तिचे हाडवैर असल्यामुळे आत्तापर्यंत तिने तेथे पाय ठेवला नव्हता. पण याबद्दल नंतर सांगू. तिने जनरलांकडे एक संतापी कटाक्ष टाकला. एवढेच नव्हे तर उपहासगर्भ कटाक्ष फेकला व त्यांच्याशी ओळख करण्याची मुळीच इच्छा दाखविली नाही. इवान इल्यिचना ही व्यक्ती अत्यंत संशयास्पद भासली. पण त्यांच्या मनात भीती आणि चिंता उत्पन्न करणाऱ्या आणखीही काही संशयास्पद व्यक्ती तेथे उपस्थित होत्या. त्या आपापसात एक कटसुद्धा रचत होत्या असे भासत होते — अर्थात इवान इल्यिचविरुद्ध. निदान त्यांचा तरी तसा समज झाला होता व जेवण जसजसे पुढे जात होते, तसतसा त्यांचा समज बळावत चालला होता. सर्वांत संशयास्पद होता एक दाढीवाला — बहुधा तो चित्रकार असावा. तो सारखा इवान इल्यिचकडून स्वतःच्या शेजाऱ्याकडे नजरा टाकायचा व त्या शेजाऱ्याच्या कानात काहीतरी कुजबुजायचा. आणखी एक पाहुणा, विद्यार्थी, एव्हाना पुरता झिंगला असला तरी संशयास्पद खुणा दाखवीत होता. त्या वैद्यक विद्यार्थ्याची लक्षणेही ठीक नव्हती. ऑफीसरसुद्धा खात्रीलायक वाटत नव्हता. पण 'गोलोवेश्का'चा कर्मचारी विशेष आणि ठळकपणे तिटकारा व्यक्त करीत होता. तो खुर्चीत बेफिकीरपणे पसरला होता, सभोवार उर्मटपणे पहात होता आणि नाकाने फुरफुर आवाज काढत होता. अवघ्या चार कविता 'गोलोवेश्का' मध्ये प्रसिद्ध झालेल्या व त्या जोरावर उदारमतवादी बनलेल्या त्या कर्मचाऱ्याकडे कुणीही लक्ष देत नव्हते. सर्वांना त्याचा उघड तिटकारा होता. पण पावाचा एक तुकडा अचानक जेव्हा इवान इल्यिचच्या अगदी जवळ पडला, तेव्हा तो लेखकूच गुन्हेगार होता असे त्यांनी शपथेवर सांगितले असते.

ह्या सर्व गोष्टींचा त्यांना अर्थातच फार खेद वाटला.

आणखी एक निरीक्षण विशेष पीडादायी होते: इवान इल्यिचना स्पष्टपणे जाणवले होते की, त्यांचे शब्दोच्चार निसटते आणि जड उमटत

होते. म्हणजे त्यांना खूप सांगायचे असले तरी त्यांची जीभ वळत नव्हती. मग अचानक त्यांना विस्मरण होऊ लागले आणि मुख्य म्हणजे काहीही कारण नसताना ते नाकाने फुरफुरू लागले व हसण्यासारखे काहीही घडलेले नसताना हसू लागले. ही अवस्था शँपेनच्या चषकानंतर घडली. वस्तुत: इवान इल्यिचनी स्वत:च स्वत:साठी शँपेन ओतून घेतली होती आणि प्यायची इच्छा नसतानाही नकळतपणे पिऊन टाकली होती. ह्या चषकानंतर अचानक त्यांना रडावेसे वाटू लागले. अत्यंत चमत्कारिक भावनाप्रधानतेच्या ते आहारी जात होते. परत त्यांना प्रेम वाटू लागले, सर्वांबद्दल प्रेम वाटू लागले, प्सेल्दोनिमोवबद्दल आणि 'गोलोवेश्का' च्या कर्मचाऱ्याबद्दलसुद्धा. एकदा त्यांना सर्वांना मिठी मारावीशी वाटू लागली, सर्व विसरावे आणि समझोता करावा असे वाटू लागले. एवढेच नव्हे तर सर्वांना मोकळेपणाने सगळे सगळे सांगून टाकावे, स्वत: किती भले आणि चांगले माणूस आहोत, आपल्या अंगी किती उत्तम गुण आहेत, असे सांगावेसे त्यांना वाटू लागले. देशाला ते किती उपयुक्त आहेत, महिलांचे ते किती छान मनोरंजन करतात, त्याहून महत्त्वाचे म्हणजे ते किती पुरोगामी विचारसरणीचे आहेत, प्रत्येकाबाबत – अगदी खालच्यातील खालच्यापर्यंत – त्यांचा किती सद्हेतुपूर्ण दृष्टिकोन असतो, असे त्यांना सांगावेसे वाटत होते. सरतेशेवटी, प्सेल्दोनिमोवकडे अनाहूतपणे येऊन, दोन बाटल्या शँपेन पिऊन, स्वत:च्या उपस्थितीने त्याला आनंदी करण्यामागील सर्व हेतू प्रांजलपणे सर्वांना सांगून टाकण्याची त्यांची इच्छा होती.

"सत्य, सर्वप्रथम पवित्र सत्य आणि प्रांजलता! मी त्यांना प्रांजलपणातून काबीज करीन. ते माझ्यावर विश्वास ठेवतील, मला स्पष्ट दिसतेय. आत्ता जरी ते वैऱ्याच्या नजरांनी पहात असले, तरी जेव्हा मी सर्व उघड करीन, तेव्हा मी त्यांना अदम्यपणं जिंकीन. ते प्याले भरतील आणि आरोळी ठोकून माझ्या आरोग्यासाठी पितील. माझी खात्री आहे की, ऑफीसर त्याच्या बुटाच्या आरीवर प्याला आपटून फोडेल. 'हुर्रा' असं ओरडायलाही हरकत नाही. हुस्सार पद्धतीनं मला उंच उडवून झेलायची त्यांची इच्छा असली तरी मला ते आवडेल. नव्या नवरीच्या कपाळाचं मी अवघ्राण करीन. ती छान आहे. आकीम पेत्रोविचही छान माणूस आहे. प्सेल्दोनिमोव अर्थात कालांतरानं सुधरेल. तसं म्हणायचं तर त्याला उच्चभ्रूंची चमक नाही... आणि अर्थात एकूण नव्या पिढीपाशी ती आत्मिक नजमकत नसली ...तरी इतर युरोपीय सत्तांमध्ये रशियाची सध्याची कामगिरी काय आहे

ह्याबाबत मी त्यांना सांगीन. शेतकऱ्यांच्या प्रश्नाचाही उल्लेख करीन आणि ...आणि सगळ्यांचा मी आवडता होईन व गौरवानं प्रयाण करीन!"

ही स्वप्ने अर्थातच रम्य होती, पण ह्या सगळ्या गुलाबी आशांमध्ये इवान इल्यिचना अचानक एक अप्रिय इच्छा झाली: थुंकण्याची! अगदी त्यांची इच्छा नसताना एकदम थुंकी त्यांच्या तोंडातून बाहेर वाहू लागली. त्यांच्या ध्यानात आले की, त्यांच्या शेजारी बसलेल्या आकीम पेत्रोविचच्या गालावर त्यांच्या थुंकीचा फवारा उडाला होता, पण केवळ आदरापोटी आकीम पेत्रोविचनी ताबडतोब गाल पुसला नव्हता. इवान इल्यिचनी कागदी रुमाल उचलला व स्वतःच त्यांचा गाल पुसला. पण दुसऱ्याच क्षणी हे त्यांना इतके विचित्र वाटले, सर्वसामान्य जाणीवेच्या एवढे पलीकडचे वाटले, की ते गप्प राहून स्वतःशी आश्चर्य करू लागले. आकीम पेत्रोविच खूप पिऊ शकले असते, पण ते बुचकळ्यात पडले होते. इवान इल्यिचच्या ध्यानात आले की, गेला पाव तास ते आकीम पेत्रोविचना अत्यंत स्वारस्यपूर्ण विषयावर काही सांगत होते, पण आकीम पेत्रोविच त्यांचे बोलणे ऐकून केवळ गोंधळलेच नव्हते, तर काहीसे घाबरलेही होते. त्यांच्यापलिकडे एक खुर्ची सोडून बसलेला प्सेल्दोनिमोवसुद्धा डोके एका बाजूला कलते करून, मान लांबवून, मुद्रेवर अप्रिय भाव आणून ऐकत होता. तो अक्षरशः त्यांच्यावर नजर ठेवून होता. पाहुण्यांवर नजर फिरवताच इवान इल्यिचच्या ध्यानात आले की, त्यांच्यापैकी अनेक सरळ टक लावून पहात होते आणि हसत होते. आश्चर्य म्हणजे ह्या गोष्टीची इवान इल्यिचना मुळीच शरम वाटली नाही, उलट त्यांनी चषकामधून आणखी एक घुटका मारला आणि एकदम मोठ्या आवाजात बोलायला आरंभ केला.

"मी सांगत होतो!" जास्तीत जास्त मोठ्या आवाजात त्यांनी आरंभ केला, "मी सांगत होतो, मंडळी, आकीम पेत्रोविचना की रशिया... होय, रशियाच... थोडक्यात, तुम्हाला उमजतंय मला काय म्हणायचं आहे... माझी ठाम खात्री आहे की रशिया सध्या द-दयाळूपणाच्या अवस्थेतून जातोय..."

"द-दयाळूपणा!" टेबलाच्या दुसऱ्या टोकापासून आवाज आला.

"दू-दू!"

"त्यू-त्यू!"

इवान इल्यिच गप्प झाले. प्सेल्दोनिमोव खुर्चीवरून उठला आणि सभोवार नजर टाकीत त्याने विचारले: "कोण ओरडला?" आकीम पेत्रोवि-

चनी पाहुण्यांना शरम वाटली पाहिजे अशा अर्थाने डोके हलविले. इवान इल्यिचनी हे ठळकपणे पाहिले, पण वेदना सोसत ते मुकाट बसले.

"दयाळूपणाच्या!" ते हट्टाने पुढे बोलू लागले. "आणि अगदी थोड्या वेळापूर्वी... होय, अगदी थोड्या वेळापूर्वी मी स्तेपान निकीफोरोविचना म्हणालो... होय... की... की नूतनीकरण, तसं सांगायचं म्हणजे वस्तूंचं..."

"महामहीम!" टेबलाच्या दुसऱ्या टोकापासून मोठा आवाज आला.

"काय आज्ञा आहे?" थबकून इवान इल्यिचनी विचारले व कोण ओरडले ते पाहू लागले.

"काही नाही, महामहीम, मी वाहवत गेलो, तुम्ही बोला पुढं! बोला... पु-ढं!" परत आवाज आला.

इवान इल्यिच दचकले.

"तर त्या वस्तूंचं नूतनीकरण..."

"महामहीम!" परत आवाज ओरडला.

"आपल्याला काय पाहिजे?"

"नमस्ते!"

ह्यावेळी इवान इल्यिचचा संयम सुटला. वाक्याच्या मध्येच ते थांबले आणि शांतताभंग करणाऱ्या व्यक्तीकडे वळले. हा आणखी एक अगदी तरुण विद्यार्थी होता, खूप झिंगला होता व सर्वांत संशयास्पद होता. तो केव्हापासून आरडाओरडा करीत होता, त्याने एक ग्लास व दोन बशा फोडल्या होत्या व लग्नात असेच वागतात असे ठासून सांगितले होते. इवान इल्यिच ज्या क्षणाला त्या दंगेखोराकडे वळले, त्याच क्षणी ऑफीसर त्याला दटावीत होता.

"तू ओरडतोस काय? तुला बाहेर हाकलून दिलं पाहिजे!"

"तुमच्याबद्दल, महामहीम, तुमच्याबद्दल नव्हे! पुढं बोला तुम्ही!" खुर्चीवर रेलून बसत तो झिंगलेला शाळकरी मुलगा ओरडला. "तुम्ही पुढं बोला, मी ऐकतोय आणि तुमच्यावर मी बेहद्द, बे-हद्द खूष आहे! वाहव्वा! वाहव्वा!"

"झिंगलेला कारटा!" प्सेल्दोनिमोव दबत्या आवाजात म्हणाला.

"मला दिसतंय की तो झिंगलाय, पण..."

"मी त्याला एक गंमतीदार गोष्ट सांगत होतो, महामहीम," ऑफीसर बोलू लागला, "आमच्या पलटणीतल्या एका लेफ्टनंटबद्दल, तो मोठ्या

साहेबांशी नेमकं अस्संच बोलायचा. आता हा त्याची नक्कल करतोय. मोठ्या साहेबांच्या प्रत्येक शब्दाला तो सारखा म्हणायचा: 'वाहव्वा! वाहव्वा!' त्याला दहा वर्षांपूर्वी ह्याबद्दल नोकरीतून बडतर्फ करण्यात आलं."

"कोण हा लेफ्टनंट?"

"आमच्या पलटणीत होता, महामहीम. त्या 'वाहव्वा' शब्दापायी त्याला वेड लागलं. प्रथम माफक उपाय योजण्यात आले, पुढं त्याला अटकेत ठेवलं... मोठे साहेब त्याला जन्मदात्या पित्याप्रमाणं ताकीद देत, पण तो आपला म्हणतोय: 'वाहव्वा! वाहव्वा!' आश्चर्य म्हणजे तो ऑफीसर शूर होता. सहा फुटांपेक्षा जास्त उंच. त्याच्यावर लष्करी खटला भरणार होते, पण तो वेडा झाल्याचं ध्यानात आलं."

"तर... शाळकरी पोरगा. शाळकरी वर्तनाशी कठोरपणा दाखवायची गरज नाही... मी माझ्या बाजूनं क्षमा करायला तयार आहे..."

"वैद्यकीय तपासणी झाली होती, महामहीम."

"म्हणजे! त्याचं वि-च्छे-दन केलं?"

"छे: छे! तो धडधाकट जिवंत आहे."

अजूनपर्यंत शिष्टाचार बाळगून बसलेल्या पाहुण्यांमध्ये जोरदार हशा झाला. इवान इल्यिच संतापले.

"सभ्य गृहस्थहो, सभ्य गृहस्थहो!" आरंभी काहीसे तोतरे बोलत, ते ओरडले, "जिवंत माणसाचं विच्छेदन करत नाही हे समजण्याइतपत मी शुद्धीवर आहे. मला वाटलं की, त्याच्या वेडाच्या भरात तो इतःपर जिवंत नाही... म्हणजे मेला असावा... तर मला सांगायचंय... की तुम्हाला मी आवडत नाही... पण मला मात्र तुम्ही सारे आवडता... पोर... पोरफीरी आवडतो... असं बोलून मी स्वतःची किंमत कमी करतोय..."

ह्या क्षणाला इवान इल्यिचच्या तोंडातून मोठ्या प्रमाणात लाळ उडाली व सर्वांच्या ध्यानात येईल अशा जागी टेबलाच्या कापडी आवरणावर तिचा डाग पडला. तो टिपण्यासाठी प्सेल्दोनिमोव रुमाल घेऊन धावला. ह्या अखेरच्या दुर्दैवी घटनेने इवान इल्यिच पूर्ण खचले.

"सभ्य गृहस्थहो, हे फारच झालं!" निराशेने ते ओरडले.

"माणूस जेव्हा झिंगतो, महामहीम," प्सेल्दोनिमोव परत म्हणाला.

"पोरफीरी! मला दिसतंय की तुम्ही... सगळे... हो! मी म्हणतो

की मला आशा आहे... तुम्हा सर्वांना मी विचारतो... तुमच्या नजरेतून मी कसा उतरलो?"

इवान इल्यिचचे डोळे आसवांनी डबडबले होते.

"महामहीम!"

"पोरफीरी, तुला मी विचारतो... सांग, जर मी आलो... होय... होय, लग्नाला, तर माझा त्यामागं हेतू होता. नैतिकदृष्ट्या उंचावण्याची माझी इच्छा होती... तुम्हाला जाणवावं अशी माझी इच्छा होती. मी सर्वांना विचारतो: तुमच्या नजरेतून मी फार उतरलोय का?"

स्मशानशांतता पसरली. विचार करा—स्मशानशांतता आणि अशा विशिष्ट प्रश्नांनंतर. "का, का अशा क्षणाला ते ओरडत नाहीत?" महामहीमांच्या मनात विचार चमकून गेला. पण पाहुण्यांनी नुसती नजरांची देवघेव केली. आकीम पेत्रोविच अर्धमेल्या अवस्थेत बसले होते आणि भीतीने बोबडी वळलेला प्सेल्दोनिमोव केव्हापासून त्याला छळणारा प्रश्न स्वतःशी विचारीत राहिला:

"ह्या सगळ्यापायी उद्या माझं काय होईल?"

एव्हाना जबरदस्त झिंगलेल्या, पण आत्तापर्यंत दुर्मुखली शांतता पाळगणाऱ्या 'गोलोवेश्का'च्या कर्मचाऱ्याने अचानक थेट इवान इल्यिचकडे मोहरा वळविला. डोळ्यांमधून आग ओकीत सर्वांच्या वतीने तो उत्तर देऊ लागला.

"हो-य!" मोठ्या आवाजात तो ओरडला, "होय, तुम्ही स्वतःला खालच्या पातळीवर नेलंत, होय... तुम्ही प्रतिगामी आहात... प्र-ति-गा-मी..!"

"तरुण माणसा, आठवण ठेवा! कुणाशी तुम्ही बोलता आहात?" स्वतःच्या जागेवरून परत ताडकन उठत इवान इल्यिच संतापाने ओरडले.

"तुमच्याशी आणि दुसरी गोष्ट म्हणजे मी तरुण नाही... तुम्ही दिमाख दाखवायला आणि लोकप्रियता मिळवायला आला होतात..."

"प्सेल्दोनिमोव, हे काय आहे?" इवान इल्यिच ओरडले.

पण ताडकन उभा झालेला प्सेल्दोनिमोव अतिभीतीपायी जागचा हलू शकत नव्हता आणि काय करावे ते त्याला सुचेना. पाहुणेसुद्धा आपापल्या जागी थिजले. चित्रकार व विद्यार्थी ओरडले "ब्राव्हो, ब्राव्हो!"

कर्मचारी अनावर त्वेषाने पुढे ओरडत राहिला:

"होय, तुमच्या दयाळूपणाची घमेंड मारायला तुम्ही आलात! सगळ्यांच्या आनंदावर तुम्ही विरजण घातलंत. तुम्ही शँपेन प्यालात, पण विचार

करायला विसरलात की महिना दहा रूबल पगारवाल्या कारकुनाला ती फार महाग आहे आणि मला संशय येतो की, स्वतःच्या कनिष्टांच्या तरुण बायकांचा उपभोग घेण्याचा छंद असलेल्या साहेबलोकांपैकी तुम्ही एक आहात! एवढंच नव्हे तर माझी खात्री आहे की, खंडणी उकळण्याला तुमचा पाठिंबा आहे... होय, होय, होय!"

"प्सेल्दोनिमोव, प्सेल्दोनिमोव!" हात पुढे पसरीत इवान इल्यिच ओरडले, कर्मचाऱ्याचा प्रत्येक शब्द खंजिराप्रमाणे त्यांच्या काळजात घुसत गेला होता.

"जरा थांबा, महामहीम, कृपया अस्वस्थ होऊ नका!" प्सेल्दोनिमोव ठामपणे ओरडला, कर्मचाऱ्याच्या दिशेने तो झेपावला, त्याच्या कोटाची कॉलर त्याने पकडली आणि टेबलापासून त्याला दूर खेचले. हडकुळ्या प्सेल्दोनिमोवच्या अंगात एवढा जोर असेल अशी कुणाचीही अपेक्षा नव्हती. पण कर्मचारी फार झिंगला होता व प्सेल्दोनिमोव शुद्धीवर होता. कर्मचाऱ्याच्या पाठीवर त्याने काही गुद्दे मारले व त्याला दाराबाहेर ढकलून दिले.

"तुम्ही सगळे नीच आहात!" कर्मचारी ओरडला. "उद्या तुम्हा सगळ्यांची 'गोलोवेश्का' त भंबेरी उडवतो!"

सगळे ताडकन उभे झाले.

"महामहीम, महामहीम!" जनरलांभोवती प्सेल्दोनिमोव, त्याची आई व काही पाहुणे गलका करू लागले, "महामहीम, शांत व्हा!"

"नाही, नाही!" जनरल ओरडले. "माझा अधःपात झाला... मी आलो... तसं म्हणायचं तर आशीर्वाद द्यायला. आणि हे फळ मिळालं!"

जणू शुद्ध हरपल्याप्रमाणे ते खुर्चीत कोसळले. मेजावर दोन्ही हात ठेवून त्यांच्यावर त्यांनी स्वतःचे डोके टेकविले—थेट दुधाच्या चिकाच्या बशीत. सर्वांना वाटलेल्या धास्तीचे वर्णन करण्यात अर्थ नाही. एक मिनिटानंतर ते उठले, अर्थात जाण्याच्या हेतूने, पण त्यांचा तोल गेला, खुर्चीत पाय अडकला व सपशेल लोटांगण घालून तेथेच ते घोरू लागले...

एरवी दारू न पिणारे लोक चुकून कधीतरी खूप पितात, तेव्हा असे घडते. अगदी अखेरच्या क्षणापर्यंत त्यांची जाणीव शुद्धीवर असते आणि मग एकदम झाड उन्मळून कोसळावे तसे पडतात. पूर्ण शुद्ध हरपून इवान इल्यिच फरशीवर पडले होते. प्सेल्दोनिमोव स्वतःच्या झिंज्या पकडून खांबासारखा उभा राहिला. झाल्या घटनेची चर्चा करीत पाहुणे पांगू लागले. एव्हाना सुमारे तीन वाजले होते.

मुख्य बाब अशी होती की, प्सेल्दोनिमोवची प्रत्यक्ष अवस्था कल्पनेपेक्षाही फार वाईट होती. सध्याची अप्रिय घटना लक्षात घेतासुद्धा. आणि इवान इल्यिच अजून फरशीवर पडून आहेत व प्सेल्दोनिमोव स्वतःच्या झिंज्या पकडून आत्यंतिक निराशेने त्यांच्याशेजारी उभा आहे, तोवर कथानिवेदनाच्या क्रमात आपण खंड पाडू आणि खुद्द पोरफीरी पेत्रोविच प्सेल्दोनिमोवबद्दल चार खुलासेपर शब्द सांगू.

त्याच्या लग्नाच्या महिनाभर आधी त्याचा अक्षरशः सर्वनाश घडणार होता. त्याचे वडील जेथे नोकरी करीत होते व त्यांच्यावर खटला चालू असताना ते वारले होते, त्या गुबेर्नियातून तो आला होता. त्याच्या लग्नापूर्वी पाच महिने – प्सेल्दोनिमोवने पीटरबुर्गमध्ये पूर्ण वर्षभर उपासमार सोसली होती – जेव्हा त्याला दरमहा दहा रूबल पगाराची नोकरी मिळाली, तेव्हा शरीराने व मनाने पुनरुज्जीवन लाभल्यासारखे त्याला भासले होते. पण परिस्थितीपायी परत तो खालावला होता. सबंध जगात फक्त दोनच प्सेल्दोनिमोव उरले होते – तो आणि त्याची आई. नवऱ्याच्या मृत्युनंतर ती गुबेर्निया सोडून आली होती. कडाक्याच्या थंडीचे दुःख माता आणि पुत्र एकत्र सोसत होते व कसेबसे पोट भरीत होते. काही असेही दिवस होते, जेव्हा तहान भागविण्यासाठी प्सेल्दोनिमोव फोन्तान्कावर भांडे घेऊन गेला होता. शेवटी त्याला नोकरी मिळाली, तेव्हा निवाऱ्याचा एक कोपरा त्याने स्वतःसाठी व आईसाठी भाड्याने घेतला. ती लोकांचे कपडे धुवू लागली आणि त्याने चार महिने काटकसरीने पैसे साठवून बूट व ओव्हरकोट विकत घेतले. कचेरीत त्याने किती यातना सोसल्या! त्याचा वरिष्ठ त्याच्यापाशी येऊन विचारायचा: बान्यात* तो फार दिवसांपूर्वी गेला होता का? एक अफवा पसरली होती की त्याच्या कोटाच्या कॉलरखाली ढेकणांनी घरे केली होती. पण प्सेल्दोनिमोवचा खंबीर स्वभाव होता. तो दिसायला बापुडवाणा आणि शांत होता. त्याचे शिक्षण अपुरे होते आणि तो कोणत्याही विषयावर स्वतःचे मत कधी व्यक्त करीत नसे. तो विचार करायचा, योजना आखायचा अथवा नाही, त्याच्या काही आशा-आकांक्षा होत्या किंवा नाही, ह्याबाबत निश्चितपणे मी सांगू शकत नाही. पण प्राप्त परिस्थितीमधून बाहेर पडण्याचा आणि नव्या जीवनाला आरंभ करण्याचा एक अंतःप्रेरित, अदम्य आणि नकळत निर्धार मात्र त्याच्या मनात पक्का रुजला

---

* हमामखाना – अनु.

होता. त्यांच्या अंगी मुंगीची चिकाटी होती. तुम्ही मुंग्यांचे वारूळ फोडलेत, तर त्या तात्काळ परत बांधतात, पुन्हा नष्ट केलेत, पुन्हा बांधू लागतात — असे न दमता कायम चालते. तो कष्टाळू आणि काटकसरी प्राणी होता. एका दृष्टिक्षेपात लक्षात यायचे की, तो वाट काढील, स्वतःचे घरटे बांधील आणि अडीअडचणीसाठी थोडी पुंजीसुद्धा साठवील. सबंध जगात फक्त त्याची आई त्याच्यावर प्रेम करीत होती. तो तिचा जीव की प्राण होता. ती निर्धारी, चिवट, कष्टाळू आणि अत्यंत सुस्वभावी बाई होती. एकेकाळी त्यांच्या गुबेर्नियात खजिना-कारकुनाची नोकरी केलेल्या आणि अलीकडे कुटुंबासह पीटरबुर्गमध्ये स्थायिक झालेल्या सेवानिवृत्त नामधारी सल्लागार म्लेकोपितायेव ह्यांच्याशी त्यांची गाठ पडली नसती, तर काहीतरी घडण्याची वाट पहात ती दोघे माय-लेक स्वतःच्या निवाऱ्यात आणखी पाच-सहा वर्षे अशीच गुपचूप जगत राहिली असती. म्लेकोपितायेव यांचे प्सेल्दोनिमोवच्या वडिलांनी एकदा भले केले होते. अर्थात त्यांच्यापाशी फार पैसे नसले तरी काही नक्की होते. पण नेमकी किती रक्कम होती हे ना त्यांच्या बायकोला, ना मोठ्या मुलीला, ना त्यांच्या नातेवाईकांना ठाऊक होते. त्यांना दोन मुली होत्या; तसे ते वेडपट डोक्याचे, दारूबाज, घरात हुकूमशाही गाजविणारे व आजारी असल्यामुळे एका मुलीचे प्सेल्दोनिमोवशी लग्न लावण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात आली. "मी त्याला ओळखतो, त्याचा बाप चांगला माणूस होता आणि मुलगाही चांगला माणूस होईल." जेव्हा म्लेकोपितायेव एखादी गोष्ट करण्याचे मनावर घेत, तेव्हा ते ती पार पाडीत. ते फार लहरी जुलूमशहा होते. त्यांच्या आजारापायी पांगळे बनल्यामुळे ते सारा वेळ आरामखुर्चीत बसून रहात, पण त्यामुळे त्यांच्या मद्यपानात मुळीच अडथळा येत नव्हता. दिवसचे दिवस ते मद्यपान करीत आणि शिवीगाळ करीत. ते दुष्ट स्वभावाचे होते व अखंड छळ करायला कुणीतरी जवळ असावे असे त्यांना वाटायचे. ह्या हेतूने त्यांनी काही दूरच्या नातेवाईकांना घरात ठेवून घेतले होते — सतत आजारी व कुरकुरणारी त्यांची बहीण, वाईट स्वभावाच्या त्यांच्या बायकोच्या दोन बहिणी, अपघातात एक फासळी तुटलेली एक म्हातारी मावशी. त्याशिवाय जर्मन कुळातील एक बाई त्यांनी घरात ठेवली होती — 'अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक कथा' त्यांना ती खुमासदारपणे सांगायची. ह्या सर्व दुर्दैवी पराधीनांना छळण्यात, त्यांना अखंड शिव्या घालण्यात, म्लेकोपितायेव यांचे मुख्य समाधान सामावले होते. मात्र त्यांच्यापैकी कुणीही त्यांना दुरुत्तर करण्याचे

धाडस करीत नसत. जन्मतः दातदुखी असलेल्या त्यांच्या बायकोचाही अपवाद नव्हता. त्या लोकांमध्ये भांडणे लावून द्यायची, अफवा पसरवायच्या आणि त्यांच्या मारामाऱ्या पाहून मजेने हसायचे, हा म्लेकोपितायेव यांचा आवडता छंद होता. त्यांची मोठी मुलगी जेव्हा तिच्या ऑफीसर नवऱ्याबरोबर अतीव दारिद्र्यात दहा वर्षे काढल्यानंतर, तीन लहान, आजारी मुलांना सांगाती घेऊन विधवा म्हणून त्यांच्या आश्रयाला आली, तेव्हा त्यांना मनस्वी आनंद झाला होता. त्यांना मुलांची आवड मुळीच नव्हती, पण त्यांच्या रोजच्या प्रयोगांना त्यांच्यामुळे जादा खाद्य मिळत होते, म्हणून म्हातारा समाधानात होता. चिडक्या स्वभावाच्या बायकांचा आणि आजारी मुलांचा हा जमाव, पीटरबुर्ग प्रदेशातील त्या लाकडी घरात त्यांच्या जुलूमशहाबरोबर रहात होता. म्हातारा फार कंजूस असल्यामुळे त्या लोकांना नेहमी अर्धपोटी रहावे लागे—मात्र वोदकाच्या खर्चाला म्हातारा हात आखडत नसे—आणि म्हाताऱ्याला निद्रानाश असल्यामुळे मनोरंजनाची गरज भासे व घरच्या लोकांना कधीही शांत झोप मिळत नसे. थोडक्यात, सगळेजण अत्यंत भिकार आयुष्य रखडत काढत होते व स्वतःच्या नशीबाला बोल लावत होते. दरम्यान म्लेकोपितायेवांचे लक्ष प्सेल्दोनिमोवकडे गेले. त्याच्या लांब नाकामुळे आणि दीनवाण्या अवतारामुळे तो त्यांच्या मनात भरला. त्यांच्या रोगट आणि सुमार रूपाच्या धाकट्या मुलीला सतरावे वर्ष नुकतेच सरले होते. एकेकाळी जरी ती जर्मन शाळेत गेली होती, तरी प्राथमिक ज्ञानापलिकडे तिची प्रगती झाली नव्हती. मग तिच्या पांगळ्या आणि दारुड्या बापाच्या धाकात, घरच्या कुचाळक्यांच्या, हेरगिरीच्या आणि दुष्टाव्याच्या वातावरणात ती खाष्ट व हडकुळी वाढली. तिला ना कधी मैत्रिणी होत्या, ना अक्कल. मात्र लग्नासाठी ती फार पूर्वीपासून आसुसली होती. परक्यांसमोर ती बापुडवाणी रहायची, पण आईशेजारी, घरच्या अवलंबितांसमोर मात्र हडळीचा अवतार धारण करायची. तिच्या बहिणीच्या मुलांना चिमटे काढायला तिला आवडायचे, त्यांना ती धक्के मारून पाडायची व जर त्यांनी साखर अथवा पाव चोरला तर चुगल्या करायची. तिच्यात आणि तिच्या मोठ्या बहिणीत सतत भांडण पेटलेले असायचे, म्हाताऱ्याने स्वतःच प्सेल्दोनिमोवपुढे तिला देऊ केले होते, जरी तो गरीब होता, तरीही प्सेल्दोनिमोवने विचार करायला थोडा अवधी मागितला होता. त्याने आणि त्याच्या आईने ह्या विषयावर खूप विचारविनिमय केला. पण हुंडा म्हणून घर देत होते. जरी ते घर लाकडी होते, एकमजली होते, खिळखिळे होते,

तरी घर ते घरच. शिवाय चारशे रूबल रोख देत होते – एवढी रक्कम केव्हा साठवणार! "कशासाठी मी घरात माणूस घेतोय?" नशेबाज जुलूमशहा ओरडला. "पहिलं कारण म्हणजे तुम्ही सगळ्या बाया आणि बायांचा मला वीट आलाय. माझी इच्छा आहे की, माझ्या पिपाणीच्या सुरावर प्सेल्दोनिमोवनं नाचावं, कारण मी त्याचा उपकारकर्ता ठरणार आहे. दुसरं कारण म्हणजे तसं घडावं अशी तुमची कुणाचीही इच्छा नाही आणि तुमचा संताप होतोय. तर तुमच्याविरुद्ध मुद्दाम असं वागतोय! जसं बोललो, तसं करीन! आणि पोरफीरी, जेव्हा ती तुझी बायको होईल, तेव्हा तिला बदडून काढ. जन्मापासून तिच्यात सात सैतान बसलेत. त्या सगळ्यांना हाकलून काढ, मी तुझ्यासाठी कुबडी तयार ठेवतो! ..."

प्सेल्दोनिमोव गप्प बसला, पण मनाशी त्याने निर्णय केला होता. समारंभाआधीच त्याला आणि त्याच्या आईला त्या घरात घेण्यात आले होते, न्हाऊ-माखू घालण्यात आले होते, कपडे-बूट देण्यात आले होते, लग्नासाठी पैसेसुद्धा देण्यात आले होते. म्हाताऱ्याने त्यांना आधार दिला होता त्याचे कारण बहुधा घरातील सर्व माणसे माय-लेकाचा दुस्वास करीत होती. खरे तर म्हाताऱ्याला प्सेल्दोनिमोवची आई आवडली होती, त्याने स्वतःवर संयम राखला होता व तिला छळले नव्हते. लग्नापूर्वी एक आठवडा त्याने प्सेल्दोनिमोवला कझाचोक नाचायचा हुकूम ठोकला होता. "पुरे, माझ्यासमोर तुला स्वतःच्या स्थानाचा विसर पडत नाही ना, एवढंच पहायचं होतं," नाचाच्या अखेरी म्हातारा म्हणाला होता. लग्नासाठी त्याने अगदी क्षुल्लक रक्कम मंजूर केली होती व स्वतःच्या सर्व नातेवाईकांना आणि ओळखीच्यांना निमंत्रित केले होते. प्सेल्दोनिमोवने आपल्या बाजूने फक्त 'गोलोवेश्का'च्या कर्मचाऱ्याला व सन्मान्य पाहुणा म्हणून आकीम पेत्रोविचला बोलाविले होते. प्सेल्दोनिमोवला चांगली जाणीव होती की, त्याची भावी पत्नी त्याचा तिरस्कार करीत आहे व त्याच्याऐवजी ऑफीसरशी लग्न करणे तिला अधिक आवडले असते. पण त्याने ते सर्व सहन केले, कारण त्याने व त्याच्या आईने तसा निर्णय घेतला होता. लग्नाच्या सबंध दिवसभर आणि सारी संध्याकाळ म्हातारा घाणेरडी शिवीगाळ करीत होता व खूप दारू प्यायला होता. घरची सगळी माणसे मागील खोल्यांमध्ये चिडीचूप बसली होती, गर्दीपायी घुसमटली होती. पुढच्या खोल्या नाचासाठी आणि जेवणासाठी मोकळ्या ठेवल्या होत्या. अखेरीस संध्याकाळी अकराच्या सुमा-

रास म्हातारा जेव्हा तर्रर्र पिऊन झोपी गेला, तेव्हा सबंध दिवसभर प्सेल्दोनिमोवच्या आईशी छत्तीसाचा आकडा धरलेल्या वधूच्या मातेने झाले-गेले विसरायचे ठरविले व नाचाला आणि जेवणाला हजर रहायचा निर्णय घेतला. इवान इल्यिचच्या आगमनाने सगळा बेरंग झाला होता. म्लेकोपितायेवची बायको शरमिंदी झाली होती, तिने अपमान मानून घेतला होता व खराखुरा जिवंत जनरल निमंत्रित केला असताना तिला आधी सूचना न दिल्याबद्दल तिने प्रत्येकाची खरपूस हजेरी घेतली होती. जनरल अनामंत्रित आले होते अशी प्रत्येकाने तिची खात्री पटविण्याचा प्रयत्न केला, पण तिचा विश्वास बसला नाही. शँपेन मागवावी लागली. प्सेल्दोनिमोवच्या आईपाशी फक्त एक रूबल होता व खुद्द त्याच्यापाशी एक कोपेकसुद्धा नव्हता. प्सेल्दोनिमोवला सासूपुढे प्रथम एका शँपेनसाठी आणि नंतर दुसऱ्या बाटलीसाठी हात पसरावे लागले होते. त्याच्या वरिष्ठांबद्दल, त्याच्या नोकरीबद्दल विचार करा—अशी त्याला तिची मनधरणी करावी लागली होती. तिने शेवटी त्याला पैसे दिले होते, पण प्सेल्दोनिमोवला पित्ताचा आणि शिरक्याचा प्याला[50] प्यायला लावले होते. जेथे त्याचा पहिल्या रात्रीचा बिछाना शृंगारला होता त्या खोलीत तो अनेकदा धावला होता व स्वर्गीय सुखांचा आनंद जेथे त्याला पुढे मिळणार होता, त्या बिछान्यावर तोंड पालथे खुपसून, स्वतःच्या झिंज्या उपटत त्याने नपुसक संतापापायी अश्रू ढाळले होते. हाय! त्या संध्याकाळी प्यायलेल्या शँपेनच्या दोन बाटल्यांची केवढी किंमत मोजावी लागली होती ह्याची इवान इल्यिचना कल्पना नव्हती! आणि त्या सर्व प्रकाराची अखेर अशी झाल्यानंतर प्सेल्दोनिमोवच्या मनात केवढे भय, केवढी निराशा, केवढे दुःख दाटले असेल त्याची कल्पना करा! पुन्हा एकदा समोर संकट वाढून ठेवलेले होते. कदाचित सबंध रात्रभर दुष्ट लहरी नववधूचे रडणे आणि विव्हळणे ऐकावे लागणार होते, तिच्या मूर्ख नातेवाईकांचे टोमणे खावे लागणार होते. त्याचे डोके आधीच ठणकत होते व अभेद्य विषण्णतेपायी त्याची दृष्टी अंधुक बनली होती. इवान इल्यिचना मदत करणे आवश्यक होते, रात्री तीन वाजता डॉक्टरला बोलवायला पाहिजे होते अथवा त्यांना घरी न्यायला घोडागाडी आणायला पाहिजे होते, शिवाय आसामी फार मोठी असल्यामुळे तिच्या सद्यःअवस्थेत सर्वसामान्य द्रोश्की * न आणता एखादी खाजगी बग्गी आणणे भाग होते. आणि बग्गीला

---

* घोडागाडी — अनु.

पैसे कुठून आणायचे? जनरल तिच्याशी एक शब्द बोलले नव्हते व जेवण-भर त्यांनी तिच्याकडे ढुंकूनसुद्धा पाहिले नव्हते, म्हणून संतापलेल्या वधूमातेने आणखी एकही कोपेक देण्यास नकार दिला. कदाचित तिच्याकडे अधिक पैसे नसतीलही. पैसे येणार कुठून? काय करायचे? स्वत:चे केस उपटायला सबळ कारण होते!

दरम्यान जेवणखोलीतील छोटचा कातडी दिवाणावर इवान इल्यिचना उचलून नेण्यात आले होते. टेबलांवरील बशा उचलून नेण्यात येत होत्या व टेबलांना अलग करण्यात येत होते त्या काळात प्सेल्दोनिमोव लोकांकडून उसने पैसे घेण्यासाठी धावपळ करीत होता. त्याने नोकरांपाशीसुद्धा पैसे मागितले, पण कुणाजवळच पैसे नव्हते. सर्वांनंतर मागे थांबलेल्या आकीम पेत्रोविचजवळसुद्धा पैसे मागण्याचे त्याने धाडस केले. पण ते जरी भले माणूस असले, तरी पैशांचे नाव काढताच ते एवढे गोंधळले व घाबरले, की त्यांच्या तोंडून अत्यंत मूर्खपणाचे शब्द बाहेर पडले.

"दुसऱ्या वेळी मी आनंदाने देईन," ते पुटपुटले, "पण आत्ता... खरंच, मला माफ करा..."

आणि टोपी उचलून ते लगबगीने घराबाहेर पडले. फक्त एकच व्यक्ती थोडीफार उपयोगाची ठरली होती: स्वप्नांच्या पुस्तकाबाबत बोलणारा दयाळू अंत:करणाचा तरुण. अर्थात तोसुद्धा विशेष उपयुक्त नव्हता. प्सेल्दोनिमोवबद्दल अतीव सहानुभूती वाटल्यामुळे तो सर्वांच्या मागे राहिला होता. अखेरीस प्सेल्दोनिमोव, त्याची आई व त्या तरुणाने आपापसात विचारविनिमय करून ठरविले की, डॉक्टरना बोलावण्यापेक्षा बग्गी बोलावून आजाऱ्याला त्याच्या घरीच न्यावे व बग्गी येईपर्यंतच्या अवधीत कानशीलांवर आणि डोक्यावर थंड पाण्याच्या पट्टया ठेवणे, बर्फ ठेवणे, असले घरगुती उपाय योजावेत. हे काम प्सेल्दोनिमोवच्या आईने स्वत:कडे घेतले. बग्गी शोधण्यासाठी तरुण धावला. तशा वेळी पीटरबुर्ग प्रदेशात द्रोश्कीसुद्धा मिळणे अवघड होते, म्हणून तो शहराच्या वेशीजवळच्या गाडीवानांच्या खाणावळीपाशी गेला व त्याने गाडीवानांना झोपेतून उठविले. त्यांनी घासाघीस केली. रात्रीच्या अशा प्रहराला पाच रूबलसुद्धा कमी आहेत असे गाडीवानांचे म्हणणे पडले. शेवटी त्यांच्यापैकी एकजण तीन रूबलवर कबूल झाला. पण चार वाजण्याच्या जरा आधी तो तरुण जेव्हा प्सेल्दोनिमोवच्या घराशी भाड्याच्या बग्गीतून आला, तेव्हा एकूण योजनांमध्ये केव्हाच बदल घडले

होते. अजूनही शुद्धीवर न आलेले इवान इल्यिच फार आजारी झाले होते, कण्हत आणि तळमळत होते व तशा अवस्थेत त्यांना त्यांच्या घरापर्यंत नेणे अशक्य होते, एवढेच नव्हे तर धोक्याचे होते. "आणखी यातून काय निर्माण होईल?" अगदी खचून गेलेल्या प्सेल्दोनिमोवने स्वतःला प्रश्न केला. काय करायचे? आणखी एक समस्या उद्‌भवली होती: जर आजाऱ्याला त्यांच्याच घरात ठेवायचे ठरले, तर त्याला कुठे निजवायचे? सबंध घरात दोनच पलंग होते—एका प्रचंड पलंगावर म्हातारा म्लेकोपितायेव त्याच्या बायकोसह झोपायचा आणि नवविवाहितांसाठी अक्रोडाच्या लाकडाचा विकत घेतलेला नवा पलंग, बाकीची सर्व मंडळी खाली चिंध्या झालेल्या परांच्या गाद्यांवर अंगांच्या मुटकुळ्या करून झोपत होती. त्या गाद्यांना घाण वास येत होता आणि त्यांचे दर्शन गलिच्छ होते. शिवाय घरच्या माणसांना पुरतील एवढीच त्यांची संख्या होती. आजाऱ्याला कुठे निजवायचे? अर्थात परांची एखादी गादी शोधता आली असती, म्हणजे कुणाच्या तरी अंगाखालून खेचून काढता आली असती, पण ती कुठे घालायची आणि कशावर? सर्वोत्तम स्थळ म्हणजे बाहेरचा दिवाणखाना, कारण कुटुंबियांच्या गाभ्यापासून तो दूर होता व त्याला स्वतंत्रपणे बाहेर जाण्याचे दार होते. पण गादी कशावर घालायची? खुर्च्यांवर तर नव्हे? सर्वांना माहीत आहे की, जिम्नाशियममध्ये शिकणारी मुले शनिवार-रविवारी घरी येतात, तेव्हा त्यांना असे खुर्च्यांवर गाद्या पसरवून निजविण्यात येते, पण इवान इल्यिचसारख्या माणसाला तसे झोपविणे अनादराचे झाले असते. उद्या सकाळी झोपेतून जागे झाल्यावर ते काय म्हणतील? प्सेल्दोनिमोव हा प्रस्ताव ऐकायलासुद्धा तयार नव्हता. एकच गोष्ट करणे शक्य होते—नवविवाहितांच्या पलंगावर इवान इल्यिचना झोपवायचे. आम्ही आधीच नमूद केल्याप्रमाणे, हा पलंग जेवणखोलीजवळच्या एका छोट्या खोलीत होता. नव्याने खरेदी केलेली, दोन माणसे झोपू शकणारी गादी त्यावर घातली होती. अजून त्यावर कुणी निजले नव्हते, स्वच्छ चादरी होत्या आणि चार गुलाबी उशा झालरी लावलेल्या मलमली आच्छादनांमध्ये ठेवलेल्या होत्या. पांघरूण गुलाबी सॅटिनचे, काटेकोर टाके घातलेले होते. वरच्या सोनेरी कडीमधून मलमली पडदे सोडले होते. थोडक्यात, सर्व काही योग्य सजवलेले होते व बहुतेक सर्व पाहुण्यांनी निदान एकदातरी ह्या शयनगृहात डोकावून पाहिले होते आणि उघडपणे वाखाणणी केली होती. प्सेल्दोनिमोवबद्दल जरी नवरीला तिटकारा वाटत असला, तरी संध्याकाळच्या दरम्यान ती अनेकदा चोरपावलांनी त्या शयनगृहात आली

होती व पलंगाकडे तिने चोरटे कटाक्ष टाकले होते. जेव्हा तिला समजले की, पटकीसमान काही रोगाची बाधा झालेला हा पाहुणा तिच्या पहिल्या रात्रीसाठी शृंगारलेल्या पलंगावर निजविण्यात येणार, तेव्हा अर्थातच तिच्या संतापाला पारा उरला नाही. तिच्या आईने तिची कड घेण्याचा प्रयत्न केला व दुसऱ्याच दिवशी नवऱ्यापाशी तक्रार करण्याची धमकी घातली . पण प्सेल्दोनिमोवने स्वतःचा हिसका दाखविला व आपलेच म्हणणे खरे केले. इवान इल्यिचना नवविवाहितांच्या शयनगृहात निजविण्यात आले आणि जोडण्यासाठी खुर्च्यांवर गाद्या पसरण्यात आल्या. नवरी विव्हळत होती, सर्वांना चिमटे काढायच्या बेतात होती, पण अवज्ञा करण्याचा तिला धीर झाला नाही. बापाच्या कुबडीशी तिचा चांगला परिचय होता व दुसऱ्या दिवशी काही तपशीलाची बाप निश्चित विचारणा करणार आहे, हे तिला ठाऊक होते. तिच्या सांत्वनादाखल गुलाबी पांघरूण व मलमली झालरीच्या उशा बाहेरच्या दालनात आणण्यात आल्या. ह्या क्षणाला तो तरुण बग्गी घेऊन आला होता. इतःपर बग्गीची गरज नाही असे ऐकताच त्याची पाचावर धारण बसली. आता बग्गीचे भाडे त्याने स्वतः देणे भाग होते आणि अजूनपर्यंत त्याचा स्वतःचा असा फुटका कोपेक कधी त्याच्यापाशी नव्हता. प्सेल्दोनिमोवने स्वतःची दिवाळखोरी जाहीर केली. गाडीवानाला शांत करण्याचे प्रयत्न झाले. पण गाडीवान आरडाओरडा करू लागला व खिडक्यांवर खडखड वाजवू लागला. ह्या सर्व गोष्टींची अखेर कशी झाली, तपशीलवार मला माहीत नाही. बहुधा असे घडले की, त्या तरुणाने स्वतःला तारण ठेवून बग्गीसकट चौथ्या रोझ्देस्त्वेन्स्की रस्त्यावर प्रयाण केले आणि तेथे काही मित्रांसह रात्र घालविणाऱ्या एका विद्यार्थ्याला जागे करून पैशांची सोय लावण्याचा त्याचा इरादा होता. एव्हाना पहाटेचे चार वाजून गेले होते आणि नवविवाहित बाहेरच्या दालनात दार बंद करून पडली होती. प्सेल्दोनिमोवची आई इवान इल्यिचच्या उशाशी सबंध रात्र शुश्रूषा करीत बसली. फरशीवरील गालीचावर ती आडवी झाली, स्वतःचा जुना कोट तिने अंगाभोवती लपेटून घेतला होता, पण तिला झोपणे अशक्य ठरले, कारण सतत उठावे लागत होते—इवान इल्यिचना जबरदस्त हगवण लागली होती. अत्यंत धैर्यवान आणि विशाल मनाच्या त्या बाईने स्वतःच्या हातांनी इवान इल्यिचचे कपडे उतरविले, स्वतःच्या पोटच्या मुलाप्रमाणे त्यांचे सर्व केले, सबंध रात्रभर शौचपात्राची ने-आण केली. पण ह्या रात्रीचे दुर्दैव एवढ्यावरच संपले नव्हते.

बाहेरच्या दालनात नवविवाहित जोडपे बंद होऊन अवघी दहा मिनिटे उलटली असतील, तेवढ्यात एक हृदयभेदक किंकाळी वातावरणात उमटली. ही किंकाळी आनंदी नव्हती, तर तिच्यात अशुभसूचकता होती. त्यापाठोपाठ धप्प पडल्याचा आवाज आणि खुर्च्या कोसळल्याचा खडखडाट. क्षणार्धात त्या अंधाऱ्या खोलीत वेगवेगळ्या अवतारात असलेल्या, घाबरलेल्या महि-लांचा कळप धापा टाकीत अवतीर्ण झाला. त्या महिला म्हणजे: वधूची आई, तिची मोठी बहीण – जिने आपल्या आजारी मुलांना तात्पुरते सोडले होते – आणि तिची एक आत्या व दोन मावशा, त्यात बरगडी मोडलेल्या बाईचाही समावेश होता. स्वयंपाकीणसुद्धा आली होती आणि परीकथा सांग-णारी जर्मन आश्रितसुद्धा आली होती. वस्तुतः तिची स्वतःची गादी, जी त्या घरात सर्वोत्तम होती व तिची एकमेव मालमत्ता होती, तिच्या अंगा-खालून बळजबरीने काढून नवविवाहित दांपत्याला देण्यात आली होती. ह्या सर्व सन्माननीय आणि तीक्ष्ण नजरेच्या महिला गेला पाव तास स्वयंपा-कघरातून चोरपावलांनी कॉरीडॉरमध्ये येऊन बाहेरच्या खोलीत काय चाललेय ह्याचा अतिकुतूहलापायी कानोसा घेत होत्या. दरम्यान कुणीतरी घाईने मेणबत्ती पेटविली व अत्यंत अनपेक्षित देखावा सर्वांच्या नजरेस पडला. दुहेरी वजन पेलण्यास असमर्थ ठरलेल्या आणि गादीच्या केवळ कडांना आधार देणाऱ्या खुर्च्या बाजूला सरकल्या होत्या व गादी त्यांच्या मधोमध खाली कोसळली होती. नवरी संतापाने विव्हळत होती. ह्यावेळी ती पुरती अपमानीत झाली होती. नैतिकदृष्ट्या खचलेला प्सेल्दोनिमोव चोरी करताना पकडलेल्या गुन्हेगाराप्रमाणे उभा होता. त्याने स्वतःचे समर्थन करण्याचासुद्धा प्रयत्न केला नाही. सर्व बाजूंनी कण्हणे व चीत्कार ऐकू येत होते. गोंगाट ऐकून प्सेल्दोनिमोवची आईसुद्धा तेथे धावत आली होती, पण ह्यावेळी वधू-माता पूर्ण वरचढ ठरली. प्रथम तिने प्सेल्दोनिमोववर अत्यंत विचित्र आणि अन्याय्य आरोपांचा वर्षाव केला: "तू कसला नवरा रे ह्यानंतर? अशा लज्जास्पद प्रकारानंतर तू कुठं तोंड दाखवशील?" आणि तत्सम, अखेरीस तिने मुलीचा हात धरून तिला तिच्या नवऱ्यापासून दूर नेले. दुसऱ्या दिवशी संतापलेल्या नवऱ्याला खुलासा करण्याची जबाबदारी वधूमातेने स्वतःच्या शिरावर घेतली. तिच्यापाठोपाठ सगळ्याजणी पुटपुटत, माना डोलवत खोलीतून बाहेर पडल्या. प्सेल्दोनिमोवपाशी फक्त त्याची आई उरली. तिने त्याचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. पण त्याने तिला तेथून तात्काळ घालविले.

त्याचे सांत्वन होणे अशक्य होते. तो धडपडत दिवाणावर जाऊन बसला. अत्यंत आवश्यक तेवढी अंतर्वस्त्रे घालून, अनवाणी अवस्थेतच तो उदासपणे विचार करू लागला. त्याच्या मेंदूत विचार पाठशिवणीचा खेळ खेळत होते. अगदी थोड्या वेळापूर्वी जेथे नाचाचा जल्लोष झाला होता व सिगारेटींच्या धुराचा वास अजूनही जेथे रेंगाळत होता, त्या खोलीवर काही वेळा तो खिन्न नजर फिरवीत होता. काही ठिकाणी ओले डाग पडलेली घाण तक्तपोशी टॉफीच्या कागदांनी व सिगारेटींच्या थोटकांनी भरली होती. पहिल्या रात्रीच्या बिछान्याची दुर्दशा आणि उलटलेल्या खुर्च्या अत्यंत उत्तम आणि खात्रीलायक ऐहिक आशांच्या व स्वप्नांच्या फोलपणाची साक्ष देत होत्या. तशा अवस्थेत सुमारे तासभर तो बसून होता. त्याच्या मनात केवळ काळेकुट्ट विचार होते: कचेरीत त्याच्यासमोर कोणते भवितव्य वाढून ठेवले होते? त्याला खेदपूर्वक जाणीव झाली की, आज रात्री जे काही घडले होते त्यानंतर जुन्या नोकरीत टिकून राहणे अशक्य होते व कोणत्याही परिस्थितीत नवी नोकरी धुंडाळणे आवश्यक होते. म्लेकोपितायेवचा विचारही त्याच्या डोक्यात आला – त्याची विवशता जोखून पाहण्यासाठी म्लेकोपितायेव उद्या त्याला नक्की कझाचोक नाचायला भाग पाडणार. दुसरा विचारही त्याच्या मनात आला की, म्लेकोपितायेवने जरी त्याला लग्नासाठी पन्नास रूबल खर्चायला दिले होते –त्या रकमेतील शेवटचा कोपेकसुद्धा खर्चून गेला होता – तरी आधी कबूल केलेला चारशे रूबल हुंडा देण्याबाबत अजून अवाक्षराने उल्लेख नव्हता व घरसुद्धा त्याच्या नावावर रीतसर नोंदवून देण्यात आले नव्हते. त्याला त्याच्या आयुष्यातील अत्यंत अवघड क्षणी एकाकी टाकून जाणारी त्याची पत्नी व तिच्यासमोर एक गुडघा टेकून बसणारा उंच ऑफीसर, ह्यांचे विचार त्याच्या मनात आले. त्याने ते स्पष्ट पाहिले होते. तिच्या बापाने खात्रीपूर्वक सांगितलेल्या तिच्यात जन्मापासून वसणाऱ्या सात सैतानांबाबत आणि त्यांना हाकलून लावण्यासाठी तयार ठेवलेल्या कुबडीबाबत त्याच्या मनात विचार आला. खूप काही सहन करण्याची त्याच्यात ताकद होती हे त्याला जाणवत होते, पण नशीब त्याच्याशी असे काही खेळ करीत होते, की त्याला स्वतःच्या सामर्थ्याबाबत शंका वाटू लागली होती.

प्सेल्दोनिमोव असे दुःख करीत होता. दरम्यान मेणबत्ती खूप जळून गेली होती. प्सेल्दोनिमोवच्या तिरप्या चेहऱ्यावर तिचा थरथरता प्रकाश थेट पडत होता व भिंतीवर महाप्रचंड सावली दिसत होती: लांबवलेली

मान, बाकदार नाक, केसांची दोन झुल्पे, एक कपाळावर आणि दुसरे डोक्याच्या पाठीशी उभे राहिलेले. अखेरीस सकाळची ताजी हवा खोलीत चोरपावलांनी येऊ लागली तेव्हा तो उठला, थरथरत बधीरपणे खुर्च्यांमधल्या गादीपाशी गेला आणि काहीही परत मांडामांड न करता, मेणबत्ती न विझवता, डोक्याखाली उशीसुद्धा न घेता, तो सरळ बिछान्यावर पालथा पडला व असा गाढ झोपला, मढ्यागत झोपला, तशी झोप बाजारपेठेत सार्वजनिक स्थळी उद्या वधाची शिक्षा[51] भोगणारे लोकच फक्त झोपू शकतात.

पण दुसरीकडे इवान इल्यिच प्रालीन्स्की यांनी प्सेल्दोनिमोवच्या वैवाहिक जीवनाच्या पहिल्या रात्रीच्या पलंगावर ज्या यातना सोसल्या त्याची तुलना कशाशी करणार! डोकेदुखी, मळमळ आणि तत्सम इतर भावना आरंभी त्यांचा एक क्षणभरही पिच्छा सोडत नव्हत्या. ते अक्षरशः नरकयातनांमधून गेले. क्वचित त्यांच्या मेंदूत जागी होणारी जाणीवेची संवेदना त्यांना भयानक पोकळ्या दाखवायची, किळसवाणे प्रसंग दाखवायची. त्यामुळे ते बेशुद्ध असते तरच जास्त बरे झाले असते असे त्यांना वाटायचे. पण अजूनही त्यांच्या मनात विचारांचा गोंधळ चालूच होता. प्सेल्दोनिमोवच्या आईला त्यांनी ओळखले, तिने प्रेमळपणे त्यांना दिलेल्या ताकीदी त्यांनी ऐकल्या: "थोडं सोस, माझ्या लाडक्या, सहन कर, सवय होईल!" जरी त्यांनी तिला ओळखले होते, तरी ती त्यांच्या शेजारी का होती ह्याचे तार्किक कारण ते स्वतःला देऊ शकत नव्हते. किळसवाणी पिशाच्चे त्यांच्यासमोर उभी रहात होती – सर्वांत जास्त वेळा सेम्योन इवानीचचे, पण अधिक बारकाईने पाहिल्यावर त्यांच्या ध्यानात आले की, ते सेम्योन इवानीच नव्हते, तर प्सेल्दोनिमोवचे नाक होते. चित्रकार, ऑफीसर आणि गालावर रुमाल बांधलेली म्हातारी यांच्या आकृतीसुद्धा त्यांच्या नजरेसमोरून चमकून गेल्या. मलमली पडदे ज्यातून सोडले होते ते डोक्यावरील मुलामा लावलेले कडे त्यांच्या विचारांना सतत गुंतवीत होते. मेणबत्तीच्या मंद प्रकाशात त्यांना ते कडे स्पष्ट दिसत होते व स्वतःला ते सतत प्रश्न विचारीत होते: "हे कडं कशासाठी आहे, ते इथं का आहे, त्याचा अर्थ काय?" प्सेल्दोनिमोवच्या आईला त्यांनी हा प्रश्न अनेकदा विचारला, पण प्रत्यक्षात त्यांच्या तोंडून काहीतरी वेगळेच शब्द बाहेर पडले असावेत, कारण त्यांनी खूप खुलासा करूनही तिला काहीही समजले नाही. अखेरीस पहाटेच्या सुमाराला झटके थांबले आणि ते झोपले. सुमारे एक तास त्यांना गाढ स्वप्न-

विरहित झोप लागली. जेव्हा त्यांना जाग आली तेव्हा ते पूर्ण शुद्धीवर होते, त्यांचे डोके विलक्षण ठणकत होते, त्यांच्या तोंडात भयानक चव होती आणि जीभ म्हणजे सुती कापडाचा तुकडा भासत होती. ते बिछान्यात उठून बसले, त्यांनी सभोवार पाहिले आणि विचार करायचा प्रयत्न केला. खिडक्यांच्या झडपांमधून पहाटेचा फिकट प्रकाश झिरपत खोलीत येत होता आणि भिंतीवर त्या प्रकाशाच्चा पट्टा सतत थरथरत होता. सकाळी साताचा सुमार असावा. पण आपण कुठे आहोत हे जेव्हा इवान इल्यिचना आठवले, रात्री घडलेल्या सर्व घटना जेव्हा त्यांना आठवल्या, जेवणाच्या टेबलापाशी घडलेले प्रसंग आणि भाषण करण्याचा त्यांचा फसलेला प्रयत्न जेव्हा त्यांना आठवला, त्या सर्व गोष्टींचे पुढे कोणते परिणाम घडतील, काय बोलले जाईल आणि काय अर्थ लावले जातील, ह्याबद्दलचे ठळक चित्र जेव्हा त्यांच्या मनःचक्षूंसमोर भयानकरीत्या उभे राहिले, त्यांच्या कनिष्ठाच्या वैवाहिक जीवनाच्या पहिल्या रात्रीच्या बिछान्यावर त्यांनी ओकून करून ठेवलेली ओंगळवाणी घाण जेव्हा त्यांनी पाहिली—तेव्हा त्यांच्या मनाला अत्यंत शरम वाटली, त्यांच्या काळजाला महाभयंकर वेदना झाल्या, त्यांनी किंचाळी फोडली व दोन्ही हातांनी स्वतःचा चेहरा झाकून अतीव निराशेने उशीवर देह झोकला. एक मिनिटानंतर ते ताडकन बिछान्यावरून उठले. त्यांचे कपडे स्वच्छ करून, व्यवस्थित घडचा घालून खुर्चीवर ठेवलेले असल्याचे त्यांनी पाहिले. त्यांनी झटकन कपडे उचलले व भोवती भेदरलेले कटाक्ष टाकीत भराभरा कपडे अंगात चढवायला आरंभ केला. दुसऱ्या खुर्चीवर त्यांचा केसाळ कोट व टोपी होती, टोपीत त्यांचे पिवळे हातमोजे खोवून ठेवलेले होते. कुणाच्याही नकळत चोरटेपणाने तेथून निघून जाण्याची त्यांची इच्छा होती, पण अचानक दार उघडले गेले आणि म्हातारी प्सेल्दोनिमोवा हातात मातीचा खुजा व तसराळे घेऊन आत आली. तिच्या खांद्यावर टॉवेल होता. तिने तसराळे खाली ठेवले आणि अधिक लांबड न लावता म्हणाली की, त्यांनी तोंड धुणे आवश्यक होते.

"साहेब... तोंड धुवा... तसं तोंड न धुता जाणं बरं नव्हे..."

त्या क्षणाला इवान इल्यिचना जाणवले की, ह्या जगात जिच्यासमोर ते सहजपणे वावरू शकतील आणि जिची त्यांना मुळीच भीती बाळगावी लागणार नाही अशी एकमेव व्यक्ती म्हणजे ही म्हातारी होती. त्यांनी तोंड धुतले. पुढे खूप काळानंतर, निराशेच्या क्षणांना त्यांना ह्या प्रसंगाची ठळकपणे आठवण व्हायची, मातीचा खुजा, अद्याप बर्फाच्या काही काडचा

तरंगणाऱ्या थंड पाण्याने भरलेले तसराळे, गुलाबी कागदात गुंडाळलेली साबणाची लांबोळकी वडी, तिच्यावर कोरलेली काही अक्षरे, पंधरा कोपेक किंमतीची, नवविवाहितांसाठी विकत घेतलेली, पण इवान इल्यिचना प्रथम वापरावी लागलेली... आणि सुती टॉवेल डाव्या खांद्यावर टाकून उभी राहिलेली ती म्हातारी... थंड पाण्याने त्यांना ताजेतवाने केले, त्यांनी तोंड-हात पुसून कोरडे केले आणि एकही शब्द न बोलता, त्यांची सेवा-शुश्रूषा करणाऱ्या बाईचे आभार न मानता, प्सेल्दोनिमोवच्या आईने त्यांच्यापुढे धरलेली त्यांची टोपी त्यांनी खेचून घेतली, केसाळ कोट खांद्यांभोवती लपेट-ला आणि कॉरीडॉरमधून, स्वयंपाकघरातून – जेथे मांजरी म्यॉव-म्यॉव करीत होती व स्वतःच्या अंथरुणातून उठून आत्यंतिक कुतूहलाने स्वयंपाकीण इवान इल्यिचकडे पहात होती – धावतच ते दारातून रस्त्यावर गेले आणि जवळून जाणाऱ्या गाडीवानाला त्यांनी हाक घातली. गोठलेल्या थंडीची ती सकाळ होती, सर्व घरांवर आणि इतर वस्तूंवर गोठलेल्या पिवळट धुक्याचे आवरण बसले होते. इवान इल्यिचनी केसाळ कोटाची कॉलर उंचावून गळा झाकला. त्यांना वाटले की, त्यांच्याकडे सगळे पहात होते, त्यांना सगळे ओळखत होते, सगळ्यांनी त्यांना ओळखले होते.

आठ दिवसपर्यंत त्यांनी स्वतःचे घर सोडले नाही आणि कचेरीत तोंड दाखविले नाही. ते आजारी होते, फार आजारी होते, पण त्यांचा आजार शारीरिक असण्यापेक्षा नैतिक जास्त होता. त्या आठ दिवसांमध्ये त्यांनी नरकयातना भोगल्या, त्यांच्या खात्यावर दुसऱ्या जगात त्या नक्की जमा झाल्या असतील. मठात जाऊन राहण्याचे विचारही काही वेळा त्यांच्या मनाला स्पर्शून गेले. आणि ते खरे होते! त्यांची कल्पनाशक्ती त्या दिशेला भरकटून आली. त्यांना खालच्या आवाजातील तळघरातील गाणे ऐकू आले, उघडी शवपेटी त्यांनी पाहिली, जंगलात अथवा गुंफेत एकाकी जीवन कंठ-ण्याचे चित्र त्यांनी नजरेसमोर आणले. पण भानावर येताच त्यांनी तात्काळ स्वतःशी कबुली दिली की, तो सर्व मूर्खपणा होता, अतिरेकीपणा होता आणि त्याची त्यांना लाज वाटली होती. मग त्यांच्या अपयशी अस्तित्वाच्या विचारापायी त्यांचा नैतिक छळ सुरू झाला. त्यानंतर त्यांच्या काळजात परत शरम उमटली, तिने काळजाला संपूर्ण व्यापून टाकले, भाजून काढले, त्याच्या जखमांवर मीठ चोळले. नजरेसमोरून जाणारी दृश्ये पाहून त्यांचा थरकाप झाला. जेव्हा कचेरीत ते जातील तेव्हा माणसे काय म्हणतील, त्यांच्याबद्दल त्यांना काय वाटेल, कोणत्या कुजबुजी त्यांचा वर्षभर, दहा

वर्षे, सबंध आयुष्यभर पाठलाग करतील? ही कहाणी पुढच्या पिढीला सांगण्यात येईल. काही क्षणी त्यांचा जीव एवढा घाबरा व्हायचा, की सेम्योन इवानीचपाशी जाऊन त्यांची क्षमा मागावी, त्यांच्याशी मैत्री परत जोडावी, अशी त्यांना इच्छा व्हायची. स्वतःचे समर्थन करण्याचा त्यांनी मुळीच प्रयत्न केला नाही, उलट ते स्वतःवर अखंड कोरडे ओढत होते. स्वतःच्या वर्तनाबद्दल त्यांना सबबी सापडत नव्हत्या आणि तशा सबबी शोधण्यास त्यांना शरम वाटली असती.

तात्काळ राजिनामा द्यायचा आणि एकांतवासात मानवजातीच्या कल्याणासाठी झटायचे, असाही एक विचार त्यांच्या मनात येऊन गेला. कोणत्याही परिस्थितीत ओळखीच्या सर्व माणसांना बदलून टाकणे आवश्यक होते व त्यांच्याबद्दलच्या सर्व आठवणी पुसल्या जातील अशा रीतीने ते काम करायला हवे होते. मग त्यांच्या डोक्यात विचार आला की, हासुद्धा मूर्खपणा होता आणि कनिष्ठांशी अधिक कठोरपणे वागून सर्व घडी व्यवस्थितपणे परत बसविता येईल. अशा क्षणांना त्यांना आशादायी वाटायचे आणि त्यांच्या वृत्ती उल्हसित बनू लागायच्या. पूर्ण आठ दिवस संशयात आणि मानसिक छळात काढल्यानंतर त्यांना जाणवले की, इतःपर अनिश्चितता सहन करणे त्यांना शक्य नव्हते आणि एका सुरेख सकाळी कचेरीत जाण्याचा त्यांनी निर्णय केला.

त्यापूर्वी, घरात निराश मनःस्थितीत बसून असताना, कचेरीत ते कोणत्या तऱ्हेने प्रवेश करतील ह्याबद्दल त्यांनी हजार वेळा कल्पना केल्या होत्या. घाबरल्या मनःस्थितीत त्यांची खात्री पटली होती की, त्यांच्याबद्दलची द्व्यर्थी कुजबूज त्यांना नक्की ऐकायला लागणार आहे, द्व्यर्थी मुद्रा पहायला मिळणार आहेत, दुष्टबुद्धी स्मिते दिसणार आहेत. पण ह्यांपैकी काहीच घडले नाही तेव्हा ते अत्यंत चकित झाले. त्यांचे आदरपूर्वक स्वागत झाले, त्यांच्यापुढे माणसे झुकून अभिवादन करीत होती. सगळे गंभीर होते, कामात गुंतलेले होते. जेव्हा त्यांनी त्यांच्या केबिनमध्ये प्रवेश केला, तेव्हा त्यांचे हृदय आनंदाने भरून आले होते.

तात्काळ ते कामांमध्ये बुडाले, काही अहवाल व खुलासे त्यांनी ऐकले, काही सूचना दिल्या. ह्या सकाळी ज्या चतुरपणे झटपट ते युक्तिवाद करीत होते, तसे यापूर्वी कधीही घडले नव्हते असे त्यांना जाणवले. त्यांच्याबद्दल लोक समाधानी आहेत, त्यांच्या गुणांची प्रशंसा होत आहे, त्यांचा आदर केला जात आहे, असे त्यांनी पाहिले. अत्यंत संवेदनाक्षम दिमाखालासुद्धा काही चूक आढळली नसती. सर्व सुरेख चालले होते.

अखेरीस आकीम पेत्रोविच कागदपत्र घेऊन उगवले. त्यांना पाहताच इवान इल्यिचच्या छातीत सुरा खुपसला गेल्याची भावना झाली, पण एक क्षणभरच. त्यांनी आकीम पेत्रोविचशी हातातील कामाबद्दल चर्चा केली, स्वतःची ऐट कायम राखली, काय केले पाहिजे ते त्यांना दाखविले आणि सर्व तपशीलवार खुलासा केला. पण त्यांना जाणवले की, आकीम पेत्रोविचवर दीर्घ काळ नजर स्थिर ठेवण्याचे ते टाळत होते, अथवा त्याहून योग्य सांगायचे तर, आकीम पेत्रोविच त्यांच्याकडे पहायला घाबरत होते. पण आता आकीम पेत्रोविच यांचे काम संपले होते व ते कागदपत्र गोळा करीत होते.

"आणखी एक विनंती आहे," शक्य तो कोरडा स्वर राखीत ते बोलू लागले, "रजिस्ट्रार प्सेल्दोनिमोवनं बदली करून मागितलीय... महामहीम सेम्योन इवानोविच शिपूलेन्को यांनी त्याला नोकरी द्यायचं वचन दिलंय. आपल्या अनुकूल साह्याची विनंती करतोय, महामहीम."

"अच्छा, तो बदली मागतोय," इवान इल्यिचना त्यांच्या काळजावरील प्रचंड बोजा एकदम दूर झाल्याचा भास झाला. त्यांनी आकीम पेत्रोविचकडे कटाक्ष टाकला आणि निमिषमात्र त्यांच्या नजरा एकमेकींना भिडल्या.

"ठीक आहे... माझ्या बाजूनं... मी प्रयत्न करीन," इवान इल्यिच उत्तरले. "माझी तयारी आहे."

जास्तीत जास्त लौकर तेथून निघून जायला आकीम पेत्रोविच अधीर होते. पण इवान इल्यिचना अचानक औदार्याचा झटका आला व अखेरचे बोलून टाकण्याचा त्यांनी निर्णय घेतला. पुन्हा एकदा त्यांना स्फूर्ती आली होती.

"त्याला सांगा," अर्थपूर्ण नजर आकीम पेत्रोविचवर खिळवून ते बोलू लागले, "प्सेल्दोनिमोवला सांगा, त्याच्यावर माझा मुळीच आकस नाही. आणि आकस बाळगण्याची माझी इच्छा नाही! .. उलट पूर्वीचं सारं विसरून जायची माझी तयारी आहे, सगळं सगळं विसरायची..."

पण आकीम पेत्रोविचचे विचित्र वर्तन पाहून इवान इल्यिच चकित झाले व त्यांनी एकदम स्वतःला आवरले. एरवी विचारी वागणारे आकीम पेत्रोविच अचानक काही कारणापायी त्यांना भयानक मूर्ख भासले. आदरपूर्वक त्यांचे बोलणे ऐकून घेण्याऐवजी आकीम पेत्रोविच एकदम महामूर्खासारखे लाजून लाल झाले, घाईघाईने वेडगळासारखे किंचित झुकून दाराच्या दिशेने मागे सरकू लागले. त्यांचा एकूण चेहरा जणू सांगत होता की, त्या

क्षणी धरती दुभंगून तिने त्यांना पोटात घेतले असते तर अधिक बरे झाले असते, अथवा स्वतःच्या खुर्चीपाशी लौकरात लौकर परतण्याची त्यांची तीव्र इच्छा दिसत होती. केबिनमध्ये एकटे राहिलेले इवान इल्यिच काहीशा अस्वस्थपणे खुर्चीतून उठले. त्यांनी आरशात पाहिले, पण स्वतःचा चेहरा त्यांना दिसला नाही.

"नाही, कठोरपणा, फक्त कठोरपणा आणि कठोरपणाच!" नकळतपणे ते स्वतःशी पुटपुटले आणि अचानक त्यांच्या चेहऱ्यावर लाली पसरली. त्यांच्या आठ दिवसांच्या आजारातील अत्यंत वाईट क्षणांना त्यांना जेवढी वाटली नसेल त्याहून जास्त शरम ह्या क्षणी त्यांना वाटली, त्याहून जास्त अवघड वाटले. "सोसलं नाही!" ते स्वतःशी म्हणाले आणि हतबलपणे धपकन खुर्चीत बसले.

बापुडी

कालपनिक कथा[52]

लेखकाचे मनोगत

माझ्या वाचकांची मी क्षमा मागतो की, नेहमीच्या 'रोजनिशी'ऐवजी ह्यावेळी मी एक लघु-कादंबरी सादर करीत आहे. पण ह्या लघु-कादंबरीने खरोखरीच माझा महिन्यातील बव्हंश काळ घेतला. ते काहीही असो, माझ्या वाचकांनी अवधान द्यावे अशी मी विनंती करतो.

आता प्रत्यक्ष कथेबद्दल. मी तिला काल्पनिक म्हटले असले, तरी वैयक्तिकरीत्या मला ती अत्यंत वास्तववादी वाटते. तिच्यात काल्पनिक घटक आहे, म्हणजे कथेच्या रचनेत आणि त्याबद्दलच थोडा खुलासा करणे मला आवश्यक वाटते.

परिस्थिती अशी आहे की, ना हे निवेदन ना ही टिपणे. अवघ्या काही तासांपूर्वी खिडकीतून उडी मारून जिने आत्महत्या केली आहे अशा बायकोच्या पतीचा तुम्ही विचार करा. तिचा मृत देह मेजावर ठेवलेला आहे. तो गोंधळलेला आहे आणि त्याच्या विचारांची घडी विस्कटून गेलेली आहे. तो घरातील खोल्यांमधून येरझाऱ्या घालतोय, जे काही घडून गेले आहे त्याचे आकलन करण्याचा प्रयत्न करतोय, "विचारांना एका जागी केंद्रित" करू पाहतोय. हा माणूस कट्टर फाजील चिंता करणारा आहे, स्वतःशी बडबडायची सवय असलेल्यांपैकी एक आहे. तर तो स्वतःशी बोलतोय, जे काही घडले त्याची उजळणी करतोय आणि त्याचे **आकलन करू पाहतोय**. बाह्यतः तो सुसंगत वाटला, तरी तर्कदृष्टचा आणि भावनादृष्टचा तो वारंवार स्वतःलाच खोडून काढतो. तो स्वतःचे समर्थन करतो आणि तिच्यावर आरोप ठेवतो, मग असंबद्ध खुलासे करू लागतो. त्यात विचाराच्या आणि काळजाच्या रांगडेपणाची सखोल भावनांशी मिसळण होते. हळू हळू तो प्रत्यक्ष घटनेचे **आकलन करून घेतो** आणि "विचारांना एका जागी केंद्रित" करतो. त्याच्या आठवणींची

मालिका अखेर त्याला अपरिहार्यपणे **सत्यापाशी** आणते आणि ते सत्य अदम्यपणे त्याच्या हृदयाचे व मनाचे उन्नयन करते. त्याच्या विस्कळीत आरंभापेक्षा त्याच्या निवेदनाच्या अखेरीचा सूर तुलनात्मकदृष्ट्या खूपच वेगळा बनतो. ह्या अभागी माणसाला अत्यंत स्पष्टपणे आणि ठामपणे सत्याची जाणीव होते, निदान स्वतःपुरती.

हा विषय. अर्थात कथेचे निवेदन काही तासांमध्ये घडते: खंड पडून आणि तुकड्या-तुकड्यांमध्ये. हा लेखनप्रकार तुटक आहे, कारण काहीवेळा तो स्वतःशी बोलतो, काहीवेळा अदृश्य श्रोत्याला उद्देशून बोलतो, कुणातरी न्यायाधीशाला उद्देशून बोलतो. वास्तव जीवनात नेहमी असेच घडते. जर एखाद्या स्टेनोग्राफरने त्याचे सर्व निवेदन ऐकून उतरवून घेतले असते, तर ते माझ्या लेखनापेक्षा जास्त खडबडीत आणि कमी सुबक वाटले असते, पण मानसिक क्रम मात्र कदाचित असाच झाला असता. तर ह्या फाजील चिंता करणाऱ्या स्टेनोग्राफरला (ज्याच्या टिपणांना मी आकार दिला आहे) माझ्या कथेत मी "विक्षिप्त" म्हटले आहे. साहित्यात अशा प्रकाराचा अवलंब पूर्वी करण्यात आलेला आहे: उदाहरणार्थ, विक्तर ह्यूगो यांनी 'फाशीची शिक्षा झालेल्याचा अखेरचा दिवस' ह्या त्यांच्या अप्रतीम कथेत ह्याच प्रकारच्या लेखनशैलीचा वापर केलेला आहे. आणि त्यांनी स्टेनोग्राफर चित्रित केला नसला, तरी मृत्यूची शिक्षा झालेला माणूस त्याच्या जीवनातील केवळ शेवटच्या दिवसाचीच नव्हे तर शेवटच्या तासाची, एवढेच नव्हे शेवटच्या क्षणांची टिपणे करू शकतो (आणि तेवढी त्याला सवड मिळते), असे दाखविले आहे. जर ही लोकविलक्षण परिस्थिती गृहित धरली नसती, तर ते लेखनच झाले नसते—त्यांच्या सर्व पुस्तकांमधील सर्वांत वास्तववादी आणि अत्यंत खरे!

भाग पहिला

१

मी कोण होतो आणि ती कोण होती

...अजून ती इथेच आहे, तोवर सगळे छान आहे, दर मिनिटाला तिच्यापाशी जाऊन पाहतो, पण उद्या तिला घेऊन जातील—मग मी एकटा

कसा राहू? सध्या ती दर्शनी दालनात मेजावर आहे, पत्त्यांच्या दोन मेजांना एकत्र जुळवून ठेवलेय, उद्या शवपेटी येईल, पांढरेशुभ्र जाड कापड, पण मुद्दा तो नव्हे... मी सारखा येरझाऱ्या घालतोय आणि ह्या सगळ्याचा स्पष्ट अर्थ लावू पाहतोय. एव्हाना सहा तास उलटले, मी समजावून घेण्याचा प्रयत्न करतोय, पण विचार एके ठिकाणी एकवटत नाहीत. मी सारखा फेऱ्या मारतोय... ते असे घडले. मी केवळ संगतवार सांगतो (संगत-वार!). सभ्य गृहस्थहो, मी लेखक मुळीच नाही, तुम्हाला हे दिसतेच आहे, पण जसे मला आकलन होतेय तसे मी सांगतो. सर्वांत भयानक बाब म्हणजे मला सारे समजतेय!

जर तुम्हाला माहीत करून घ्यायची इच्छा असेल, अथवा आरंभापासून सांगायचे, तर 'आवाज'[53] मध्ये नोकरी पाहिजे अशी जाहिरात द्यायला पैसे हवे होते म्हणून तिच्या वस्तू गहाण टाकायला ती माझ्याकडे आली होती. तिला गव्हर्नेसची नोकरी हवी होती, प्रवासाला तिची हरकत नव्हती, घरी शिकवण्या देण्याची तिची तयारी होती, इत्यादी. ती अगदी सुरुवात होती व अर्थातच इतरांपासून ती मला वेगळी भासली नाही. ती खूप कृश होती, तिचे केस सोनेरी होते, उंची मध्यम होती. माझ्याशी नेहमी अवघडून वागायची, जणू सतत गोंधळलेली (मला वाटते, सगळ्या परक्यांशी ती तशीच वागायची, आणि समजण्यासारखे आहे की, कुठलाही परका माणूस तिला सारखाच होता, म्हणजे गहाणाचा धंदा करणाऱ्याला केवळ माणूसच समजले तर). ज्या क्षणी तिला पैसे मिळत, त्या क्षणी ती पाठ फिरवून निघून जायची. कधी एक शब्द उच्चारायची नाही. दुसरी माणसे खूप वाद घालतात, घासाघीस करतात, पण ती मात्र मी देईन ते पैसे मुकाट स्वी-कारायची... मला वाटतेय, मी सगळा घोटाळा करतोय... होय, सर्व-प्रथम तिच्या वस्तू पाहून मी हैराण झालो. सोन्याचा मुलामा दिलेली चां-दीची कर्णभूषणे, एक फालतू लॉकेट – अगदी कवडीकिंमतीच्या वस्तू. तिला जाणीव होती की, त्या वस्तू कवडीमोलाच्या होत्या, पण तिची मुद्रा मला सांगत होती की, तिच्या दृष्टीने त्या वस्तू खूप मौल्यवान होत्या. पुढे मला समजले की, तिच्या आई-वडिलांनी खरोखरीच फक्त तेवढ्याच गोष्टी तिच्यासाठी त्यांच्या माघारी ठेवलेल्या होत्या. केवळ एकदाच मी तिच्या वस्तूंना कुत्सित हसलो. वस्तुतः असे मी कधी करीत नाही, माझ्या गिऱ्हाई-कांशी मी नेहमी सभ्यपणे वागतो: कमीत कमी शब्द बोलतो, नम्र राहतो, कठोर राहतो. "कठोर, कठोर आणि कठोर." पण एकदा अचानक ती काही

उरलेले तुकडे घेऊन आली (अक्षरशः उरलेले) एका ससाच्या कातड्याच्या जाकीटाचे – मला संयम राहिला नाही आणि मी चुकून काहीतरी कुत्सित बोलून गेलो. बापरे, केवढी ती शरमली! तिचे डोळे निळे, मोठ्ठे आणि स्वप्नाळू होते, पण त्यावेळी एकदम पेटून उठले! मात्र तिने एक शब्द उच्चारला नाही, ते "उरलेले तुकडे" उचलले व निघून गेली. तेव्हा प्रथम तिचे **विशेषपण** मला जाणवले, तिच्यात काहीतरी वेगळे आहे असे माझ्या ध्यानात आले. आणखी एक ठसा मला आठवतो, सर्वांत महत्त्वाचा ठसा, एकूण सगळ्याची गोळाबेरीज: ती वयाने फारच लहान होती, अत्यंत तरुण होती, अवघ्या चौदा वर्षांची दिसत होती. पण प्रत्यक्षात त्यावेळी तिचे वय सोळा होते, सोळा पुरी व्हायला तीन महिने कमी होते. मला हे सांगायचे नव्हते, एकूण गोळाबेरीज ह्यात नव्हती. दुसऱ्या दिवशी ती परत आली. नंतर मला समजले की, ती ते जाकीट घेऊन दोब्रोनरावोवकडे आणि मोसेरकडे गेली होती, पण ते दोघे सोन्याच्या वस्तूंविना दुसरे काही गहाण घेत नाहीत, त्यामुळे त्यांनी तिच्याशी बोलणेसुद्धा टाळले होते. याउलट एकदा मी तिच्याकडून नक्षी कोरलेला खडासुद्धा स्वीकारला होता (अगदी सामान्य दर्जाचा) आणि नंतर माझ्या कृतीचे मलाच आश्चर्य वाटले होते. मीसुद्धा सोन्याचांदीविना दुसरे काहीही गहाण घेत नाही, पण तिच्याकडून मी नक्षी कोरलेला खडा घेतला. तिच्याबद्दल मी दुसऱ्यांदा विचार केला होता, मला आठवते.

ह्यावेळी, म्हणजे मोसेरकडून परतल्यावर, ती माझ्यापाशी तृणमण्याचा सिगार-होल्डर घेऊन आली. ती वस्तू तशी छान होती, पण आमच्या दृष्टीने मुळीच उपयोगाची नव्हती, कारण आम्ही फक्त सोन्याच्या वस्तू गहाण ठेवून घेतो. आदल्या दिवशीच्या तिच्या **बंडा**नंतर आता ती माझ्याकडे परतली होती, म्हणून मी जरा कडक वागलो. माझे कडक वागणे म्हणजे कोरडेपणाने वागणे. पण तरीही, जेव्हा मी तिच्या हाती दोन रूबल ठेवले, तेव्हा काहीशा पिरपिऱ्या सुरात म्हणालो: "केवळ **तुमच्यासाठी** म्हणून मी हे करतोय. मोसेर असली वस्तू तुमच्याकडून कधीही स्वीकारायचा नाही." मी **तुमच्यासाठी** ह्या शब्दावर विशेष जोर दिला होता. मी चिडलो होतो. **तुमच्यासाठी** ह्या शब्दापायी ती परत लाजली, पण काहीही बोलली नाही. तिने पैसे माझ्या अंगावर परत फेकले नाहीत, उलट घेतले – ह्याला म्हणतात गरीबी! किती शरमली होती! तिचा अभिमान मी दुखावला होता ह्याची मला जाणीव होती. ती निघून गेल्यानंतर अचानक मी स्वतःला

प्रश्न केला : खरेच, तिच्यावरील ह्या विजयाची किंमत दोन रूबल आहे? ह्यॅ, ह्यॅ, ह्यॅ! तो प्रश्न मी स्वत:ला दोनदा विचारला असे मला आठवते: "खरेच तेवढी लायकी होती? खरेच तेवढी किंमत होती?" आणि हसून मी स्वत:ला होकारार्थी उत्तर दिले. मी तेव्हा मन:पूर्वक हसलो. मात्र त्यात दुष्टावा नव्हता. माझ्या मनात हेतू होता, माझी कृती हेतूपूर्वक होती: मी तिची कसोटी पहात होतो, कारण अचानक माझ्या मनात तिच्याविषयीचे विचार सुरू झाले होते. तिच्याबद्दल मी तिसऱ्यांदा **विशेष** विचार करीत होतो.

...तर अशी सुरुवात झाली. अर्थातच मी गुपचूपपणे तिच्याबद्दलची सर्व माहिती जाणून घेण्यास तात्काळ आरंभ केला आणि तिच्या आगमनाची विशेष अधीरतेने वाट पाहू लागलो. ती लौकरच माझ्यापाशी परत येणार असे माझे मन मला सांगत होते. जेव्हा ती आली, तेव्हा मी तिला अत्यंत नम्रपणे प्रसन्न संभाषणात गुंतविले. माझे संगोपन चांगल्या रीतीने घडलेले आहे आणि माझे वर्तन चांगले आहे. हं... तेव्हा माझ्या ध्यानात आले की, ती दयाळू आणि बापुडवाण्या स्वभावाची होती. अशा स्वभावाची माणसे विशेष प्रतिकार करू शकत नाहीत व जरी त्यांनी स्वत:चा अलिप्तपणा सोडला नाही, तरी संभाषण टाळणे त्यांना जमत नाही. ती तुटक उत्तरे देतात, पण उत्तर निश्चित देतात व जेवढे अधिक तुम्ही विचाराल, तेवढे अधिक ती बोलतात. महत्त्वाची बाब म्हणजे जर तुम्हाला खरोखर रस असेल, तर सतत रेटत रहायचे. अर्थातच त्या प्रसंगी तिने स्वत:बद्दल मला काहीही सांगितले नाही. 'आवाज'बद्दल व इतर सर्व गोष्टींबद्दल मला नंतर समजले. जाहिरातींसाठी त्यावेळी तिच्याजवळची अखेरची पुंजी ती वापरीत होती. आरंभी जाहिरातींमध्ये ती दिमाखदार शब्द वापरीत होती: "गव्हर्नेस उपलब्ध आहे, प्रवासाला हरकत नाही, पत्राद्वारे अटी कळवाव्यात." पण नंतर: "शिक्षिका, सोबतीण, घरव्यवस्था पाहणारी, आजाऱ्याची शुश्रूषा करणारी व शिवणकाम करणारी, अशी कोणतीही नोकरी करण्यास तयारी आहे" इ. इ. नेहमीचीच कथा! जाहिरातीमधील शब्दांच्या अर्थातच फेररचना घडत होत्या, पण शेवटी तिच्या निराशेचा कडेलोट झाला, तेव्हा जाहिरातीत म्हटले होते: "पगाराची अपेक्षा नाही, फक्त जेवणावारी." तरीही तिला नोकरी मिळाली नाही. तिची अखेरची चाचणी घेण्याचा मी निर्णय केला आणि त्या दिवशीच्या 'आवाज'चा अंक काढून मी तिचे एका जाहिरातीकडे लक्ष वेधले: "कोणतेही कौटुंबिक पाश नसलेली

तरुणी मुलांची गव्हर्नेस म्हणून काम करू इच्छिते, वयस्क विधुर अधिक श्रेयस्कर. घरच्या कामांची जबाबदारी घेईल."

"पाहिलंत, ही जाहिरात सकाळी प्रसिद्ध झाली आणि संध्याकाळपर्यंत बहुधा तिला जागा मिळाली. अशी जाहिरात देता आली पाहिजे!"

ती शरमली आणि तिचे डोळे परत पेटले. तात्काळ तोंड वळवून ती निघून गेली. मला तिचे वागणे खूप आवडले. एव्हाना मी आत्मविश्वासू आणि धीट झालो होतो: तिचे सिगार-होल्डर दुसरा कुणीही स्वीकारणार नव्हता. आणि तिच्याजवळचे सिगार-होल्डरही संपले होते. माझा कयास बरोबर होता: दोन दिवसांनंतर ती अत्यंत फिकट चेहऱ्याने आणि अस्वस्थ मनःस्थितीत परतली. तिच्या घरी काहीतरी गडबड झाली असावी असा मी तर्क केला आणि खरोखरीच तसे घडले होते. तिच्या घरात काय घडले होते ते मी थेटपणे सांगेन, पण प्रथम अचानक मी तिचा उपकारकर्ता कसा बनलो आणि तिची मर्जी कशी संपादन केली, त्याबद्दलची आठवण सांगतो. क्षणिक उर्मीत मी तसा वागलो. त्यादिवशी तिने तिची देवाची तसबीर गहाण टाकायला आणली होती (म्हणजे आणणे तिला भाग पडले होते)... आह्, ऐका! ऐका! आता खरा निवेदनाला आरंभ झाला, नाहीतर सगळा गोंधळ होता... वस्तुस्थिती अशी आहे की, आता मला तपशीलवार सर्व गोष्टी आठवायची इच्छा आहे. अगदी बारीक-सारीकसुद्धा. माझ्या विचारांना एकवटायचा मी प्रयत्न करतोय, पण ते जमत नाही. त्या सगळ्या चिल्लर गोष्टी, क्षुल्लक गोष्टी...

पवित्र मेरीची मुलाबरोबरची ती तसबीर होती, जुनी कौटुंबिक तसबीर होती. सोनेरी मुलामा चढवलेली चांदीची चौकट तिच्याभोवती होती. तिची किंमत सुमारे सहा रूबल होती. तिला त्या तसबिरीचे खूप मोल वाटत होते हे मला समजत होते, कारण चौकट न काढता संपूर्ण तसबीर जशीच्या तशी ती गहाण टाकू इच्छित होती. मी तिला म्हणालो: "तुम्ही चौकट माझ्यापाशी ठेवा आणि तसबीर घरी घेऊन जा, कारण तसबीर गहाण टाकणं प्रशस्त वाटत नाही."

"तुम्हाला तसं करायला बंदी आहे का?"

"नाही, बंदी वगैरे नाही, पण कदाचित तुम्हाला..."

"काढून टाका चौकट."

"मी चौकट काढून टाकत नाही, तिथं माझ्या तसबिरीच्या पेटीत ठेवतो," थोडा विचार करून मी म्हणालो, "दुसऱ्या तसबिरीबरोबर,

दिव्याखाली (मी धंदा सुरू केल्यापासून नेहमी देवाच्या तसबिरीसमोर एक दिवा तेवता ठेवला होता), आणि दहा रूबल घेऊन जा."

"मला दहा नकोत, पाच द्या, मी नक्की तसबीर परत घेऊन जाईन."

"दहा नकोत? तसबीर त्या किंमतीची आहे," परत तिचे डोळे चमकलेले पाहून मी पुढे म्हणालो. ती गप्प राहिली. मी तिला पाच रूबल दिले.

"कुणाशी तुसडं वागू नका," मी म्हणालो. "मीसुद्धा एकेकाळी अडचणीत होतो, अत्यंत वाईट, आणि आत्ता तुम्ही मला अशा धंद्यात गुंतलेला पाहताय त्याचं केवळ कारण जे काही मला भोगावं लागलं..."

"समाजावर सूड घेताय?" ह्या खवट शेऱ्याने तिने अचानक माझ्या बोलण्यात खंड पाडला. तिच्या बोलण्यात कोणतेही कपट नव्हते (म्हणजे तिचा रोख एकूण सर्वांवर होता, लोकांमधून मला एकट्याला तिने वगळलेले नव्हते, त्यामुळे त्या शब्दांचा अपमान वाटून घेण्याचे कारण नव्हते). "अस्सं!" माझ्या मनात विचार आला, "अशी आहेस काय तू! तुझ्या स्वभावाच्या नवनव्या छटा दिसू लागल्यात!"

"हे पहा," मी पटकन अर्धवट थट्टेने आणि अर्धवट गूढपणे म्हणालो, "वाईट वागण्याची इच्छा असलेल्या एका पूर्णाचा मी एक हिस्सा आहे, पण प्रत्यक्षात मात्र हातून भलं घडतं..."

तिने झटदिशी तिचे मोठे, कुतूहलाने भरलेले डोळे माझ्यावर रोखले. त्या डोळयांमधला भाव बालसदृश होता:

"जरा थांबा... कुणाचा हा विचार? कुठून आला तो? मी कुठंतरी ऐकलाय..."

"उगीच डोकं शिणवू नका. मेफीस्टोफेलेस ह्या शब्दांनी फाऊस्टला स्वतःची ओळख करून देतो. तुम्ही 'फाऊस्ट'[54] वाचलाय?"

"नाही... लक्षपूर्वक नाही."

"म्हणजे मुळीच वाचला नाही. पण वाचा. तुमच्या ओठांवर परत मला छद्मी हास्य दिसतंय. कृपया गैरसमज करून घेऊ नका की, मेफीस्टोफेलेसची भूमिका पत्करून मी माझ्या सावकारी पेशावर पांघरूण घालायचा प्रयत्न करतोय. सावकार हा मी नेहमी सावकारच राहणार. मला हे पक्के ठाऊक आहे."

"तुम्ही खरंच विचित्र आहात... माझा तसा मुळीच हेतू नव्हता..."

तिला म्हणायचे होते: "तुम्ही सुशिक्षित माणूस असाल अशी माझी

अपेक्षा नव्हती." तसे ती म्हणाली नाही, पण हा विचार तिला अभिप्रेत होता हे मला ठाऊक होते. मी तिला अत्यंत चकित केले होते.

"हे पहा," मी म्हणालो, "कोणत्याही रीतीनं माणूस सत्कर्म करू शकतो. अर्थात मी स्वत:बद्दल बोलत नाही. मी फक्त दुष्कर्म करतो, पण..."

'अर्थात कोणत्याही परिस्थितीतून सत्कर्म करता येतं," माझ्याकडे एक जलद आणि समजुतीचा कटाक्ष फेकून ती म्हणाली. "कोणत्याही परिस्थितीतून," अचानक ती पुढे म्हणाली. ते सर्व क्षण मला ठळक आठवतात! मला आणखी असेही म्हणायचे आहे की, आपल्या तरुण, आपल्या लाडक्या तरुण मंडळींना जेव्हा काहीतरी चतुर व समजुतदारपणाचे बोलायचे असते, तेव्हा त्यांच्या मुद्रा अत्यंत कळकळीने आणि भाबडेपणाने सांगत असतात: "आता मी तुम्हाला काहीतरी चतुर आणि समजुतदारपणाचं सांगतोय!" माझ्यासारख्या माणसांच्या अहंभावातून हे उमटत नाही. तुम्हाला दिसते की, त्यांना ते सर्व फार मौल्यवान वाटत असते, त्यांच्या मनात त्याबद्दल आदरभाव आणि विश्वास असतो व तुम्हालासुद्धा तेवढाच आदर वाटतोय, अशी त्यांची भ्रामक कल्पना होते. हाय, प्रामाणिकता! ह्यातूनच त्यांचा विजय होतो. तिच्यात ही प्रामाणिकता खूप लोभसवाणी वाटत होती!

आठवते, काहीही विसरलो नाही. जेव्हा ती गेली, तेव्हा माझ्या मनाचा तात्काळ निर्धार झाला होता. त्याच दिवशी माझ्या चौकशीचा शेवट करण्याचे व तिच्या जीवनातील उरलेल्या वा चालू सर्व गुपितांना शोधून काढण्याचे मी ठरविले. त्यांच्या घरी पूर्वी काम करणाऱ्या लूकेर्याला लाच चारून गतकाळातील सर्व रहस्यांना एव्हाना मी माहीत करून घेतले होते. ती रहस्ये एवढी भयानक धक्कादायी होती की, खुद्द तिचे भवितव्य तसेच धोक्यात असताना मेफीस्टोफेलेसच्या शब्दांना हसून त्यांच्याबद्दल ती कुतूहल कसे दाखवू शकत होती, हे मला समजले नाही. ह्यालाच तारुण्य म्हणतात! त्यावेळी अभिमानाने आणि आनंदाने तिच्याबद्दल मी नेमका असाच विचार केला, कारण त्यात मनाची भव्यता होती: "कदाचित मी विनाशाच्या टोकावर उभी असेन, पण ग्योतेचे महान शब्द तेजस्वी आहेत." तारुण्याला नेहमी किंचित का होईना अथवा चुकीच्या दिशेने का होईना, पण औदार्याची सोबत असते. मला ती अभिप्रेत आहे, ती एकटी! मुख्य म्हणजे एव्हाना तिला मी **माझी** मानू लागलो होतो आणि माझ्या सामर्थ्याबद्दल

मला संशय नव्हता. जेव्हा माणसाच्या मनात संशय उरत नाही, तेव्हाची भावना किती मधुर असते.

पण मला झाले तरी काय? जर मी असेच वागत राहिलो, तर माझे विचार एकवटणार केव्हा? लौकर, लौकर, हे सारे मूळ मुद्दा सोडून चाललेय, अरे देवा!

२

विवाहाचा प्रस्ताव

तिच्याबद्दलची मी शोधून काढलेली "गुपिते" एका शब्दात सांगतो: तिचे आई-वडील तीन वर्षांपूर्वी वारले होते व नालायक मावशांच्या ताब्यात ती होती. त्या मावशांना नालायक म्हणणे फार सौम्य ठरले असते. एक मावशी विधवा होती आणि तिला एकाहून एक लहान अशी सहा मुले होती; दुसरी अविवाहिता, म्हातारी आणि खाष्ट होती. दोघीही वाईट होत्या. तिचे वडील एक निव्वळ कारकून होते आणि त्यांचा दरबारी मान केवळ नावापुरता होता. थोडक्यात, सर्व परिस्थिती मला अनुकूल होती. त्यांच्या दृष्टीने मी उच्च जगातून आलो होतो: एका तेजस्वी पलटणीतील मी सेवा-निवृत्त कनिष्ठ कप्तान होतो, खानदानी कुळात जन्मलो होतो, माझा चरितार्थ कुणावर अवलंबून नव्हता. आणि माझ्या सावकारी पेढीबाबत तिच्या मावशांना केवळ आदरच वाटत होता. तिच्या मावशांनी तिला गेली तीन वर्षे गुलामीत ठेवले होते, तरीही तिने शाळांच्या परीक्षा कुठेतरी उत्तीर्ण केल्या होत्या. क्रूर छळातूनही सुटका करून तिने ती गोष्ट साध्य केली होती. स्वाभाविकच अधिक चांगल्या आणि उदात्त गोष्टींची तिला आस निर्माण झाली होती. मला तिच्याशी लग्न का करायचे होते? पण माझ्या-बद्दल आत्ता नको, मागाहून बोलू... आणि ते महत्त्वाचे नाही. तिच्या मावशांच्या मुलांना ती शिकवायची, त्यांचे कपडे शिवायची; शेवटी शेवटी तर केवळ त्यांची धुणीच नव्हे तर फरशाही धुवायची. तिची छाती किती कमकुवत! स्पष्ट सांगायचे तर तिला मारहाण व्हायची आणि दर घासा-गणिक तिचा उद्धार व्हायचा. अखेर तिला विकायचा त्यांचा इरादा होता. छी:! त्या गलिच्छ तपशीलाला मी उगाळीत नाही. नंतर तिने मला ती सर्व हकीकत सांगितली. त्यांच्या शेजारचा एक लठ्ठ दुकानदार तो सारा प्रकार एक वर्षभर पहात होता. तो साधासुधा दुकानदार नव्हता, तर दोन

किराणा मालाच्या दुकानांचा मालक होता. त्याने एव्हाना दोन बायका थडग्यात पाठविल्या होत्या व तिसरीच्या तो शोधात होता. तेवढ्यात त्याची हिच्यावर नजर पडली: "शांत स्वभावाची आहे, गरीबीत वाढलीय आणि माझ्या पोरक्या पोरांसाठी मी लग्न करतोय," त्याने विचार केला. त्याच्या मुलांचा सांभाळ करण्यासाठी खरोखरीच कुणाचीतरी गरज होती. त्याने सोयरीक जमवली, हिच्या मावशांशी लग्नाची बोलणी केली. त्याचे वय पन्नास होते. ही घाबरून गेली. तेव्हा ती माझ्याकडे वस्तू गहाण टाकायला येऊ लागली, 'आवाज' मध्ये जाहिरात द्यायला पैसे हवे होते म्हणून. तिने मावशांपाशी विनवणी केली की, विचार करायला तिला थोडा अवधी द्यावा, एक क्षण द्यावा. मावशांनी एक क्षण दिला, पण दुसरा नाकारला: "आम्हालाच खायला मिळत नाही, आणखी एका जादा तोंडाचा भार कुठं सांभाळणार!" मला हे सर्व आधीच समजले होते आणि त्या दिवशीच्या सकाळच्या संभाषणानंतर मी निर्णय मनाशी पक्का केला होता. संध्याकाळी दुकानदार तिला भेटायला गेला, पन्नास कोपेक पौंड किंमतीची टॉफी दुकानातून बरोबर घेऊन गेला. ती त्याच्यासमोर बसली होती. तेवढ्यात लूकेर्याला मी स्वयंपाकघरातून बोलावून घेतले आणि सांगितले की, तिच्या कानात कुजबुजून निरोप दे: "फाटकापाशी मी वाट पाहतोय, खूप तातडीचं काम आहे." मी स्वतःवर कमालीचा खूष होतो. एकूण त्या दिवसभर मी प्रसन्न मनःस्थितीत होतो.

फाटकापाशी, लूकेर्याच्या उपस्थितीत, मी तात्काळ तिला सांगितले: "मी सुखी होईन आणि मला सन्मान वाटेल, जर..." माझ्या अचानक निमंत्रणामुळे आधीच ती चकित झाली होती आणि आता विवाहाची मागणी घातल्यानंतर तिच्या आश्चर्यात अधिकच भर पडली. नंतर मी तिला सांगितले की, माझ्या वर्तनाबद्दल व फाटकापाशीच मी तिला मागणी घातली ह्याबद्दल तिने मुळीच आश्चर्य वाटून घेऊ नये. मी तिला सांगितले की, मी अत्यंत निर्भीड माणूस आहे आणि एकूण परिस्थितीची मला पूर्ण जाणीव आहे. मी खरोखरीच निर्भीड होतो, त्यात खोटे काही नव्हते. पण ते असो! माझे बोलणे सभ्यपणाचे तर होतेच, माझ्या खानदानी पालनपोषणाचा तो पुरावा होता, शिवाय त्यात अस्सलपणा होता हे महत्त्वाचे. ही गोष्ट मान्य करण्यात काय पाप आहे? मी स्वतःचा निवाडा करू इच्छितो आणि करतोय. वादी आणि प्रतिवादी म्हणून मी बोलले पाहिजे व तसे मी करतोय. हा मूर्खपणा आहे हे मला ठाऊक आहे, पण नंतर ही आठवण काढतानासुद्धा

मला आनंद झाला होता. मी थेट तिला सांगून टाकले, कोणतीही लाज न बाळगता बोलून टाकले की, पहिली गोष्ट म्हणजे माझ्यात विशेष गुण नाहीत, मी विशेष बुद्धिमान नाही, कदाचित मी विशेष दयाळूही नाही, अत्यंत सवंग अहंकारी आहे (मला तो शब्द आठवतो, मला वाटेत तो सुचला होता आणि खूप आवडला होता), आणि खूप खूप शक्यता आहे की, माझ्यात इतर दृष्टींनीसुद्धा अनेक अप्रिय गोष्टी असतील. विशिष्ट गर्विष्ठपणाने मी हे सारे बोललो – ह्या गोष्टी कशा रीतीने बोलल्या जातात हे आपणा सर्वांना माहीत आहे. माझ्यातील उणीवा सांगून टाकल्यानंतर माझ्यातील गुणांची यादी वाचण्याची अर्थातच मला चांगली सवय आहे: "पण त्या उणीवांची भरपाई करण्यास माझ्यापाशी अशा अशा गोष्टी आहेत." मला दिसत होते की, अजून ती फार घाबरलेली होती, पण मी माझा स्वर मुळीच खाली उतरवला नाही. उलट ती भ्यायलेली पाहून मी मुद्दामच आणखी आवाज चढवला. मी तिला स्पष्ट सांगून टाकले की, तिला खायला भरपूर मिळेल, पण छानछोकीचे कपडे, नाटके आणि नृत्यसमारंभ वगैरे थेर मुळीच चालणार नाहीत, निदान मी माझे उद्दिष्ट साध्य करीपर्यंत. माझ्या कडव्या बोलण्यात मी खूपच वाहवत गेलो. जास्तीत जास्त सहजपणे मी पुढे सांगून टाकले की, सावकारीचा धंदा जरी मी सध्या करीत असलो, तरी माझ्या उद्दिष्टप्राप्तीमधील हा एक टप्पा आहे, विशिष्ट परिस्थिती आहे... तसे बोलण्याचा मला खरेच हक्क होता: माझ्यापाशी खरोखरीच उद्दिष्ट होते आणि विशिष्ट परिस्थिती होती. जरा थांबा, सभ्य गृहस्थहो, सबंध आयुष्यभर इतर कुणाहीपेक्षा मला माझ्या सावकारी पेढीचा अत्यंत तिटकारा वाटत आला आहे आणि बुरखा घातलेली वाक्ये स्वत:शीच बोलणे जरी हास्यास्पद असले, तरी मी खरोखरीच "समाजावर सूड" घेत होतो, खरेच, खरेच, खरेच! म्हणून त्या सकाळचा "मी समाजावर सूड" घेत असल्याचा तिचा टोमणा योग्य नव्हता. म्हणजे जर मी तिला प्रांजलपणे म्हटले असते: "होय, मी समाजावर सूड घेतोय," तर ती त्या सकाळप्रमाणे खो खो हसली असती आणि माझे बोलणे खरेच ऐकायला हास्यास्पद वाटले असते. शिवाय मला आढळले की, सूचक बोलून आणि गूढ वाक्य पेरून मी तिच्या कल्पनाशक्तीला चालना देऊ शकत होतो. आणि एव्हाना मला कशाचीच भीती वाटत नव्हती: मला ठाऊक होते की, तो लठ्ठ दुकानदार माझ्यापेक्षा जास्त किळसवाणा होता आणि मी तिचा विमोचक होतो. मला हे चांगले माहीत होते. दुष्ट संधी माणूस विशेष चांगल्या जाणतो.

माझा तो दुष्टपणा होता? माणसाचा निवाडा कसा करायचा? तेव्हासुद्धा मी तिच्या प्रेमात नव्हतो?

जरा थांबा: त्यावेळी मी तिचा उपकारकर्ता होतो असे किंचितसुद्धा न भासविण्याची अर्थातच मी दक्षता घेतली होती. उलट **मीच** उपकृत होतो **तुम्ही** नव्हे असे मी तिला म्हटले होते. साक्षात शब्दांनी मी बोलून दाखविले होते. मला राहवले नव्हते आणि माझे बोलणे ऐकायला मूर्खपणाचे वाटले असावे, कारण तिच्या मुद्रेवरील भाव क्षणभर बदलल्याचे माझ्या ध्यानात आले. पण एकूण मी जिंकलो होतो. जरा थांबा, जर ही सगळी घाण आठवायचीच आहे, तर शेवटचा माझा हलकटपणाही आठवतो: मी तेथे उभा होतो तेव्हा डोक्यात एक विचार वळवळत होता: "मी उंच आहे, सुबक बांध्याचा आहे, सुसंस्कृत आहे आणि बढाई नव्हे, पण दिसायला वाईट नाही." असे विचार माझ्या मेंदूत नाचत होते. अर्थात फाटकापाशीच ती मला **हो** म्हणाली. पण... पण मला पुढे सांगितले पाहिजे: **हो** म्हणण्यापूर्वी ती खूप वेळ तेथे विचार करीत उभी राहिली. ती एवढी विचारात गढली होती की अखेर मी विचारायच्या बेतात होतो: "तर मग काय ठरलं?" आणि माझा खरेच संयम राहिला नाही व मी विचारलेच: "तर मग काय?"

"थांबा, मी विचार करतेय."

आणि तिचा चेहरा एवढा गंभीर होता, की तेव्हाच मला त्यावरील सर्व वाचणे शक्य होते! पण मी अपमानीत झालो होतो: "खरेच ती माझ्यात आणि त्या दुकानदारात तुलना करून निवड करतेय?" त्यावेळी अद्याप मला समजले नव्हते! तेव्हा मला अजून काहीही समजत नव्हते! आठवते, मी जेव्हा तेथून जाऊ लागलो तेव्हा लूकेर्या माझ्यापाठी धावत आली होती व मला थांबवून धापा टाकत म्हणाली होती: "देव तुम्हाला बक्षीस देईल, साहेब, आमच्या लाडक्या ताईसाहेबाला घेताय म्हणून, पण त्यांना मात्र असं बोलू नका, फार मानी आहेत."

मानी! मला मानी पोरी आवडतात. मानी विशेष चांगल्या असतात, जेव्हा... जेव्हा तुमची त्यांच्यावर सत्ता चालतेय याबद्दल मुळीच संदेह ग्हात नाही तेव्हा? किती दुष्ट, रांगडा माणूस आहे मी! किती आनंद लाभला ह्या भावनेपायी! **हो** म्हणण्यापूर्वी फाटकापाशी जेव्हा ती खूप विचार करीत उभी होती आणि मी बुचकळ्यात होतो, तेव्हा प्रत्यक्षात तिच्या मनात काय विचार येत असावा, तुम्हाला ठाऊक आहे? "जर तिथं

आणि इथं दुर्भाग्यच आहे, तर वाईटातल्या वाईटाचीच निवड करणं चांगलं नाही का, म्हणजे त्या लठ्ठ दुकानदाराची. दारू पिऊन झिंगला म्हणजे मला मारहाण करून लौकरात लौकर ठार करील!" काय? तुम्हाला काय वाटते, असा विचार तिच्या मनात आला असेल?

आताही समजत नाही, काहीही आता समजत नाही. मी नुकतेच म्हटले की, तिच्या मनात असा विचार येऊ शकला असता: "दोन दुर्भाग्यांमधून अधिक वाईटाची निवड करायची, म्हणजे लठ्ठ दुकानदाराची!" पण त्यावेळी तिच्या दृष्टीने अधिक वाईट कोण होता–मी अथवा दुकानदार? दुकानदार किंवा ग्योते उद्धृत करणारा सावकार? हा मार्मिक प्रश्न आहे. कसला प्रश्न? एवढे समजत नाही: उत्तर टेबलावर पडलेय आणि तू म्हणतोस प्रश्न! माझी फिकीर करू नका! मुद्दा माझ्याबद्दलचा नाही... खरे तर मुद्दा माझ्याबाबत होता अथवा नव्हता ह्याची आता मला काय पर्वा? ह्याचा मला मुळीच निर्णय करता येत नाही. त्यापेक्षा झोपावे. डोके ठणकतेय...

३

लोकांमधील सर्वांत उदात्त, पण माझा मात्र विश्वास नाही

मला झोप लागली नाही. डोक्यात ती शीर थाडथाड उडत असताना कशी लागणार झोप! ह्या सगळ्याचे आकलन करण्याची, ह्या घाणीला पूर्ण समजावून घेण्याची इच्छा आहे. घाण! त्यावेळी कसल्या घाणीतून मी तिला ओढून बाहेर काढले होते! माझ्या कृतीला तिने समजून घ्यायला हवे होते, तिचे मोल जाणायला पाहिजे होते! आणखी वेगवेगळे विचारही मला आवडत होते, उदाहरणार्थ, मी एकेचाळीस वर्षांचा होतो व ती अवघी सोळा वर्षांची होती. ही विषमता मला आकर्षक वाटत होती, फार मधुर भासत होती, फारच मधुर!

मला इंग्लिश पद्धतीने लग्न करायचे होते, म्हणजे आम्ही दोघे आणि दोन साक्षीदार, त्यांपैकी एक साक्षीदार लूकेर्या व तेथून थेट आगगाडी गाठायची, मॉस्कोची वाट धरायची (माझे तेथे काही काम होते), सुमारे पंधरवडाभर हॉटेलात रहायचे. तिने माझ्या बेताला आक्षेप घेतला. तिच्या मावशांच्या भेटी घेण्यास तिने मला भाग पाडले. लग्नाची मागणी घातल्या-

नंतर मुलीच्या पालकांना भेटावे लागते ती परंपरा मला पाळायला लावली. तिचे म्हणणे मी कबूल केले व मावशांना त्यांचा वाटा मिळाला. एवढेच नव्हे त्या थेरडयांना मी प्रत्येकी शंभर रूबल बक्षिसी दिली व आणखी पैसे नंतर देईन असे वचन दिले. मात्र ही बाब तिला अर्थातच सांगितली नाही. ह्या एकूण प्रकरणातील नीचपणाने तिला दुखावण्याची माझी इच्छा नव्हती. मावशा तात्काळ नरमल्या. नवरीच्या पोषाखाबाबत आमचा वाद झाला. तिच्यापाशी अक्षरशः काहीही नव्हते, पण ती कशाचीही अपेक्षा धरत नव्हती. अखेरीस मी तिला पटवू शकलो की, तिचा वधूचा पोषाख मीच करणे भाग होते, कारण दुसरा कोण करणार? माझ्याबद्दलचे पुराण नको. माझे काही विचार मात्र मी तिला सांगितले, निदान थोडीतरी तिला कल्पना यावी ह्या उद्देशाने. कदाचित माझी ती किंचित घाई झाली. मुख्य बाब म्हणजे आरंभापासून माझ्यावर तिने प्रेमाचा वर्षाव केला, संध्याकाळी मी घरी परतायचा तेव्हा अधीरपणे ती माझे स्वागत करायची, तिच्या लहानपणाबद्दल, तिच्या पालकांच्या घराबद्दल, तिच्या आई-बापाबद्दल खूप बडबड करायची (मधुर, निष्पाप बडबड!). पण तिच्या उत्साहावर मी तात्काळ थंडगार पाणी ओतले. माझ्या मनातील विचारापायी मी तसा वागलो. तिच्या उत्साहाला मी गप्प राहून प्रतिसाद दिला, अर्थात दिमाखदार मौनाने... तिच्या फार लौकर ध्यानात आले की, आम्ही भिन्न होतो आणि मी एक कोडे होतो. आणि मी कोडे बनून रहावा अशीच माझी सतत धडपड होती. माझे सारे मूर्ख वागणे त्यापायी घडत होते. सर्वप्रथम – कठोरपणा. तशा कठोरपणातच मी तिला घरात आणले. थोडक्यात, जरी मी तेव्हा समाधानी होतो, तरी एक पूर्ण व्यवस्था मी तयार केली. माझ्या बाजूने अगदी विनासायास तिने आकार घेतला. दुसऱ्या पद्धतीने वागणे तेव्हा मला शक्यही नव्हते, ती व्यवस्था मला निर्माण करणे भाग पडले, कारण एक असाधारण परिस्थिती... पण का बरे मी स्वतःची नालस्ती करतोय? व्यवस्था योग्य होती. नाही, माझे ऐका, जर माणसाचा न्याय करायचा असेल, तर परिस्थिती माहीत हवी... ऐका!

आरंभ कसा करावा ते मला समजत नाही, कारण हे सगळे फार अवघड आहे. जेव्हा माणूस स्वतःची कैफीयत मांडू लागतो, तेव्हा मामला कठीण बनतो. त्याचे असे आहे: तारुण्याला पैशाचा तिटकारा असतो, म्हणून मी तात्काळ पैसा केला. पैशावर मी भर दिला. मी एवढा जोर दिला की, ती अधिकाधिक गप्प होत गेली. ती तिचे टपोरे डोळे विस्फा-

रायची, ऐकायची, पहायची व गप्प व्हायची. तरुण माणसे उदार मनाची असतात, म्हणजे चांगली तरुण माणसे उदार मनाची आणि उतावीळ असतात, पण त्यांच्यात सहनशीलता नसते. त्यामुळे त्यांच्या अपेक्षा जर पूर्ण झाल्या नाहीत, तर तात्काळ ती तिटकारा करू लागतात. मला विशाल मन हवे होते, थेट तिच्या हृदयात विशालता रुजविण्याची माझी इच्छा होती, गहिरा दृष्टिकोन तिच्यात बिंबविण्याची माझी इच्छा होती, समजले? एक ग्राम्य उदाहरण देतो: माझ्या सावकारी पेढीबाबत तिच्यासारखीला मी कसा खुलासा करायचा? अर्थात मी मानी मौन धरले, म्हणजे मी मौनातून बोललो, अन्यथा पेढीबाबत काहीतरी सबबी सांगाव्या लागल्या असत्या. मौनामधून बोलण्यात मी पटाईत आहे. सारे आयुष्य गप्प राहून बोलण्यात मी घालविले आहे, केवळ स्वतःशी एकटे राहून मुकाटपणे आख्ख्या शोकांतिका मी जगलो आहे. मलाही दुःखाची ओळख आहे. सर्वांनी मला वाळीत टाकून दिले होते, माझा त्याग केला होता आणि सर्व मला विसरून गेले होते. आणि अगदी कुण्णाकुण्णाला त्याबाबत माहिती नाही. अचानक ह्या सोळा वर्षांच्या पोरटीने काही नीच माणसांकडून माझ्याबाबत निंदाजनक माहिती प्राप्त करून घेतली, माझ्याबद्दल सर्व ठाऊक झाले असा तिने समज करून घेतला, पण प्रत्यक्षात महत्त्वाच्या सर्व गोष्टी माझ्या एकट्याच्या छातीतच बंद करून ठेवलेल्या आहेत! मी गप्प राहिलो, अगदी कालपर्यंत तिच्याशी मी विशेष गप्प राहिलो – का गप्प राहिलो? अभिमानी माणूस म्हणून. तिने स्वतः शोधून काढावे, नीच माणसांकडून कुचाळक्या ऐकून नव्हे, माझ्या तोंडून ऐकून नव्हे, तर खुद्द तिने माझी **ओळख करून घ्यावी** व मला समजून घ्यावे, अशी माझी इच्छा होती. माझ्या घरात मी तिला आणत होतो, तेव्हा तिने माझ्याबद्दल पूर्ण आदर बाळगावा अशी माझी अपेक्षा होती. मी भोगलेल्या यातनांबाबत तिने भीतीयुक्त आदर बाळगावा अशी माझी रास्त मागणी होती. मी नेहमीच फार मानी वागत आलो आहे. मला एक तर सर्व काही पाहिजे असते अथवा काहीही नको असते. सुखाची अर्धी मापे मी नाकारली होती आणि संपूर्णाचा हव्यास धरला होता, म्हणूनच मला तसा दृष्टिकोन धारण करणे भाग पडले होते: "तुझी तू शोधून काढ आणि माझ्या लायकीला जाण!" तुम्ही मान्य कराल की, जर मी स्वतःहून खुलासे देत बसलो असतो, माझ्याबद्दल आदर बाळग अशा विनवण्या करत राहिलो असतो, तर ते भीक मागण्यासमान ठरले असते... पण कशाला... कशाला ह्याबाबत मी बोलतोय!

हा अगदी मूर्खपणा आहे साक्षात मूर्खपणा! तेव्हा मी तिला स्पष्टपणे आणि निष्ठुरपणे समजावले होते (निष्ठुरपणे ह्या शब्दावर मी जोर देतो), अवघ्या काही शब्दांमध्ये सांगितले होते की, तरुणांमधील मनाची विशालता मोहक आहे, पण कवडीमोल आहे. ती कवडीमोल का आहे? कारण ती सवंगपणे प्राप्त होते, जगण्याला आरंभ करण्यापूर्वीच त्यांना लाभते, "जीवनातील पहिले ठसे"[55] असे वर्णन करता येईल. पण प्रथम त्यांनी तिचा वापर केलेला पाहण्याची माझी इच्छा होती. सवंग मनाची विशालता नेहमी सोपी असते, जीव समर्पण करणेसुद्धा सवंगपणाचे आहे, कारण तरुण रक्ताला आणि जोमाला वाट मोकळी करून देण्याचा केवळ तो एक प्रकार आहे, काहीतरी देखणे करून दाखविण्याच्या मनस्वी आवेगापायी तसे घडते. त्यापेक्षा अवघड, मूकपणे, गुपचूप, कोणताही गाजावाजा न करता, खूप स्वार्थत्याग करून आणि गौरवाचा एक थेंबही न स्वीकारता तुमच्या मनाच्या विशालतेचा पराक्रम करून दाखवा. तुमच्या त्या विशुद्ध पराक्रमाला जगासमोर नीच स्वरूपात दाखविले जात असताना, प्रत्यक्षात तुमच्या प्रामाणिकतेला जगात तोड नसतानाही तुम्हाला नीच स्वरूपात दाखविले जात असताना पाहण्याची माझी इच्छा आहे. नाही, तुम्ही माघार घ्याल. पण मी सबंध आयुष्यभर केवळ असलाच पराक्रम करीत आलो आहे. प्रथम तिने माझ्याशी कडाक्याचा वाद घातला, मग हळू हळू ती कमी बोलू लागली, पुढे पूर्ण गप्प बसू लागली व माझे बोलणे ऐकताना स्वतःचे टप्पोरे डोळे खूप विस्फारून पाहू लागली... आणि अचानक मला तिच्या मुद्रेवर स्मित उमटलेले दिसले. अविश्वासू, मूक, वाईट स्मित. मी तिला माझ्या घरात आणले तेव्हा तिच्या मुद्रेवर तेच स्मित होते. दुसरीकडे कुठेही जाण्यास तिला जागा नव्हती हेही तेवढेच खरे...

४

केवळ योजनाच योजना

आमच्यापैकी कुणी तेव्हा प्रथम सुरुवात केली?

कुणीही नव्हे. पहिल्या पावलापासून ते सारे आपोआप सुरू झाले. मी म्हणालो की, अत्यंत कठोरपणे मी तिला माझ्या घरात आणले, पण पहिल्याच पावलाला प्रत्यक्षात मी मऊ बनलो होतो. लग्नापूर्वीच मी तिला

खुलासा केला होता की पेढीवर माझ्या जागी तिला बसावे लागेल, वस्तू गहाण घेऊन लोकांना पैसे देण्याचे काम करावे लागेल आणि तेव्हा ती काहीही बोलली नव्हती (ह्याची नोंद घ्या). एवढेच नव्हे तर प्रत्यक्षात तिने उत्साहाने ते काम हाताळले. अर्थात घर आणि घरातील फर्निचर पूर्वीचेच होते. दोन खोल्या होत्या: पुढच्या मोठ्या खोलीत आडोसा घालून पेढी बनविली होती आणि दुसरी खोलीही मोठी होती—आमचे शयनगृह आणि बसण्या-उठण्याची जागा. फर्निचर सामान्य प्रतीचे होते. तिच्या मावशांच्या घरचे सामानसुद्धा त्यापेक्षा अधिक चांगले होते. पेढीवर माझी देवाच्या तसबिरीची पेटी होती व तेथेच दिवा तेवत असायचा. दुसऱ्या खोलीत पुस्तकांचे कपाट होते, त्यात थोडी पुस्तके होती, एक पेटी होती जिच्या किल्ल्या माझ्यापाशी असत; शिवाय बिछाना, टेबल-खुर्च्या. लग्नापूर्वी मी तिला म्हटले होते की, खाण्यासाठी दिवसाला एक रूबल खर्च मला मंजूर होता: मी, ती आणि लूकेर्यासाठी. तिच्या मावशांकडून मी लूकेर्याला फूस लावून आमच्याकडे आणले होते. तीन वर्षांत तीस हजार साठविण्याचा माझा इरादा होता व त्यासाठी असे वागण्यावाचून दुसरा उपाय नव्हता. तिने काहीही आक्षेप घेतला नाही, पण मी स्वत:च तीस कोपेक भत्ता वाढविला. नाटकाबाबत तसेच. लग्नापूर्वी मी तिला म्हणालो होतो की, नाटके बघायला जाणे वगैरे छंद चालणार नाहीत, पण तरीही महिन्यातून एकदा मी तिला नाटकाला नेऊ लागलो होतो व चांगली मऊ आसनांची तिकीटे काढत होतो. तीनदा आम्ही नाटकांना गेलो आणि 'सुखाचा शोध' व 'गाणारे पक्षी' पाहिले बहुधा! (असो! ते महत्त्वाचे नाही!) मुकाटपणे आम्ही नाटकांना गेलो आणि मुकाट परतलो. पण आरंभापासून असे मौन आम्ही का स्वीकारले? प्रथम भांडणे होत नव्हती, तरीही आम्ही गप्प वावरत असू. मला वाटते, सुरवातीला माझ्याकडे चोरटा कटाक्ष टाकण्याची तिला सवय होती. ज्या क्षणी माझ्या ते ध्यानात आले, त्या क्षणी आमच्या मौनावर मी जास्त भर दिला. मौनाचा अतिरेक तिने नव्हे, मी केला हे खरे. एकदा-दोनदा माझ्या मिठीत पडून ती हमसाहमशी रडली. पण तिचे ते उमाळे विकारी, उन्मादवायूपायी फुटले होते आणि मला खंबीर सुख हवे होते, तिच्यापासून आदराने मिळायला हवे होते, म्हणून मी थंड प्रतिसाद दिला. माझे वागणे योग्य ठरले: त्या उमाळ्यांनंतर दुसऱ्याच दिवशी भांडण पेटायचे.

म्हणजे तशी भांडणे पुन्हा झाली नाहीत, पण परत मौन आणि तिच्या चेहऱ्यावर जास्त जास्त उर्मट भाव. त्याचा अर्थ होता "बंद आणि स्वा-

तंत्र्य", पण ते कसे करावे हे तिला उमजत नव्हते. तिच्या बापुडवाण्या चेहऱ्याचे हळूहळू मग्रूर मुद्रेत रूपांतर घडत होते. खरोखर, मी तिला किळसवाणा वाटू लागलो होतो. मी त्याचा अभ्यास केला. अर्थात तिच्या भावनांचे बांध फुटत तेव्हा निःसंशयपणे तिचा तोल जाऊ लागला होता. अन्यथा, ज्या घाणीतून व दारिद्र्यातून ती आली होती, फरशा धुण्यापासूनचे काबाडकष्ट तिने सोसले होते, त्यानंतर अचानक आमच्या गरीबीचा उपहास ती कसा करू शकली? वस्तुतः आमची गरीबी नव्हती, तर ते काटकसरीचे जगणे होते व जेथे गरज होती तेथे चैनसुद्धा होती – उदाहरणार्थ, चादरी व स्वच्छतेबाबत. नवऱ्याची स्वच्छता बायकोला आवडते अशी माझी पूर्वी कल्पना होती. ती गरीबीचा नव्हे, तर माझ्या कंजूसपणाचा उपहास करीत होती. "ध्येय आहे म्हणे, स्वतःचा कडवा स्वभाव दाखवतोय!" अचानक तिने नाटकांना जायला नकार दिला. तिच्या चेहऱ्यावरील तिटकारा अधिकाधिक वाढत गेला... आणि मी अधिकाधिक गप्प होत गेलो.

उगीच सबबी कशाला सांगायच्या? सारे मूळ त्या पेढीत होते. मला माहीत होते की, बाई, त्यातही सोळा वर्षांची मुलगी, पुरुषाच्या इच्छेपुढे मान तुकवणार नाही असे होणारच नाही. बायकांमध्ये अस्सलपणा नसतो, ती स्वयंसिद्ध बाब आहे. आतासुद्धा माझ्या दृष्टीने ती स्वयंसिद्ध बाब आहे. तेथे हॉलमध्ये ती पडली असली म्हणून काय झाले? सत्य ते सत्य, खुद्द मिलसुद्धा[56] त्याबाबत काही करू शकणार नाही! आणि प्रेमात असलेली स्त्री, होय, प्रेमात असलेली स्त्री, ती ज्याच्यावर प्रेम करते त्या पुरुषाच्या अवगुणांचेसुद्धा, त्याच्या गुन्ह्यांचेसुद्धा, समर्थन करील. त्याला स्वतःला त्याच्या गुन्ह्यांबाबत ज्या सबबी सुचणार नाहीत, अशा सबबी ती हुडकून काढील. ही मनाची विशालता असेल, पण ह्यात अस्सलता नाही. ह्या अस्सलतेच्या अभावापायी केवळ बाईचा नाश झाला. त्या टेबलाकडे तुम्ही माझे लक्ष वेधत असलात तरी काय झाले, परत विचारतो, म्हणून काय झाले? त्या टेबलावर अस्सलता आहे? ओह्-ओह्!

ऐका: तेव्हा तिच्या प्रेमाची मला खात्री होती. धावत माझ्यापाशी येऊन मला मिठी मारायची ना? म्हणजे ती माझ्यावर प्रेम करीत होती, निदान – माझ्यावर प्रेम करायची तिची इच्छा होती. होय, तसेच होते – प्रेम करायची तिची इच्छा होती, प्रेम करायला कुणालातरी ती शोधत होती. मुख्य म्हणजे तिने सबबी शोधाव्यात अशा गुन्ह्याचा कोणताही पुरावा इथे उपलब्ध नाही. तुम्ही म्हणता, सावकार, तर तसे सगळेच म्हणतात. मी साव-

कार आहे म्हणून काय झाले? सर्वांत विशाल मनाची माणसे सावकार का बनली, ह्यामागे निश्चित कारणे असावीत. सभ्य गृहस्थहो, काही कल्पना... जर काही कल्पना तुम्ही शब्दात मांडल्यात, तर त्या ऐकायला कमालीच्या मूर्ख भासतात. स्वतःलाच लाज वाटते. का? काही कारण नाही. कारण आपण सगळे नालायक आहोत आणि सत्य आपल्याला सोसत नाही, अथवा दुसरे कारण मला माहीत नाही. मी आत्ताच म्हणालो: "सर्वांत विशाल मनाचे लोक." ऐकायला विचित्र वाटते, पण तरी ते तसेच होते. हे सत्य आहे, अत्यंत खरे सत्य आहे. होय, तेव्हा काही सुरक्षितता प्राप्त करण्याचा आणि ही सावकारी पेढी उघडण्याचा **मला हक्क होता.** "तुम्ही मला बाजूला टाकलंत, तुम्ही – म्हणजे लोकांनी – तुमच्या तुच्छ मौनानं मला दूर हाकलून लावलंत. जेव्हा मनस्वी आवेगानं मी तुम्हाला आवाहन केलं, तेव्हा मला आयुष्यभर पुरेल एवढा माझा अपमान करून तुम्ही प्रतिसाद दिलात. म्हणून तुमच्यापासून दूर राहण्यासाठी स्वतःभोवती भिंत उभारण्याची माझी कृती योग्य आहे, तीस हजार रूबल साठवून माझे अखेरचे दिवस क्रिमियात कुठंतरी, दक्षिण किनाऱ्यावर डोंगरात आणि द्राक्षमळ्यात, व्यतीत करण्याचा मला हक्क आहे. ह्या तीस हजारांच्या साह्यानं विकत घेतलेल्या इस्टेटीवर राहण्याचा, तुमच्यावर कोणताही आकस न धरता तुमच्यापासून दूर जाण्याचा, मनात ध्येय बाळगून आणि मला अत्यंत प्रिय अशा स्त्रीबरोबर व कुटुंबाबरोबर – देवाची इच्छा असेल तर – राहण्याचा, खेड्यातील शेजाऱ्यापाजाऱ्यांना मदत करीत उरलेले जीवन व्यतीत करण्याचा मला हक्क आहे." आता मी स्वतःच स्वतःशी हे सारे बोलतोय म्हणून ठीक आहे, पण तेव्हा जर तिला मी हे ऐकविले असते, तर मूर्खपणाचे वाटले असते. म्हणून मी मानी मौन धरले होते, म्हणून मी गप्प बसून होतो. तिला समजले असते? सोळा वय, तारुण्य नुकते उमलत होते – माझ्या सबबी, माझ्या यातना तिला काय समजणार? सरळपणा, जगाच्या अनुभवाचा वारा नाही, यौवनातल्या खुळचट कल्पना, "उदात्त हृदयां"बाबत आंधळी मते, पण निर्णायक घटक ठरली सावकारी पेढी – वास्स (पेढीवर मी खलपुरुष म्हणून वागत होतो? मी कशी पेढी चालवत होतो आणि कुणालाही लुटत नव्हतो हे ती पहात नव्हती?). ह्या जगात सत्य किती भयानक आहे! ही लाडकी, ही बापुडी, ही स्वर्गीय सुंदरी – माझ्या आत्म्याला क्रूरपणे छळणारी एक जुलूमी होती. जर हे मी बोललो नाही, तर मी स्वतःवर अन्याय करणे ठरेल! मी तिच्यावर प्रेम करीत नव्हतो असे वाटते तुम्हाला? माझे ति-

च्यावर प्रेम नव्हते असे म्हणणारा कोण आहे? दैवाची आणि निसर्गाची ही दुष्ट उलटी गती आहे. आपण शापित आहोत, एकूण लोकांचे जीवनच शापित आहे (विशेषत: माझे). आता मला समजते की, कुठेतरी माझे चुकले. कुठेतरी काहीतरी बिनसले. सारे स्पष्ट होते, माझी योजना स्पष्ट होती, अगदी निरभ्र आकाशासारखी: "कठोर आणि मानी, कुणाच्याही नैतिक पाठिंब्याची अथवा सांत्वनाची गरज नसलेला, मुकाट यातना सोसणारा माणूस." खरेच असे होते. मी खोटे बोलत नव्हतो! "नंतर तिला दिसेल की, इथे मनाची विशालता होती, पण ती जाणून घेणे तिला जमले नाही– जेव्हाकेव्हा तिला उमजेल, तेव्हा दसपटींनी तिचे मोल करील व हात जोडून धुळीत कोसळेल." ही माझी योजना. पण मी इथे काहीतरी जमेत घेतले नाही अथवा तसे करायला विसरलो. काहीतरी करणे मला जमले नाही. पुरे, पुरे झाले! आता क्षमा कुणाची मागू? संपले म्हणजे संपले. माणसा, हिंमत बाळग, ताठ रहा! तू दोषी नव्हेस!..

ठीक आहे, मी खरे सांगीन, सत्याला सामोरे जायला मी भीत नाही; **ती** दोषी आहे, **ती** अपराधी आहे!..

५

बापुडी बंड करते

अचानक तिने स्वत:च्या मनानुसार कर्जे देण्याचा निर्णय केला व आमची भांडणे सुरू झाली. गहाण वस्तूंच्या किंमती तिने अधिक ठरविल्या आणि एक-दोनदा ह्या विषयावर माझ्याशी वादसुद्धा घातला. मी माझे म्हणणे सोडले नाही. तेवढ्यात ती कप्तानाची विधवा उगवली.

कप्तानाची विधवा, एक म्हातारी बाई, तिच्या नवऱ्याने तिला भेट म्हणून दिलेले लॉकेट–नेहमीच्या प्रकारातील भेटवस्तू–गहाण टाकायला आली. मी तिला तीस रूबल दिले. हुंदके देत, विव्हळत, तिने माझी विनवणी केली की, तिची वस्तू मी जपून ठेवावी; ठीक आहे, मी ठेवीन जपून. अचानक, पाच दिवसांनंतर, या लॉकेटच्या बदल्यात तिने एक कंकण आणले, ज्याची किंमत आठ रूबलसुद्धा नव्हती. अर्थात मी नकार दिला. माझ्या बायकोच्या डोळ्यांमध्ये म्हातारीने काहीतरी वाचले असावे, कारण जेव्हा मी पेढीवर नव्हतो तेव्हा ती परत आली व लॉकेटच्या बदल्यात कंकण ठेवून गेली.

त्या व्यवहाराबाबत मला त्याच दिवशी समजले, तेव्हा मी बायकोशी सभ्यपणे, पण ठाम आणि संयुक्तिकरीत्या बोललो. ती बिछान्यावर बसली होती, जमिनीकडे डोळे खिळवून पहात होती आणि उजव्या पायाने गालीचा खरवडत होती (तिची एक सवय); तिच्या ओठांवर दुष्ट स्मित खेळत होते. मग मी आवाज न चढविता शांतपणे सांगितले की, पैसे **माझे** आहेत, **माझा** दृष्टिकोन राखण्याचा मला हक्क आहे आणि जेव्हा तिला मी माझ्या घरी निमंत्रण दिले होते, तेव्हा तिच्यापासून काहीही लपवून ठेवले नव्हते.

अचानक ती ताडदिशी उठली—आणि तुम्हाला काय वाटते—माझ्या दिशेने थडाथडा लाथा झाडू लागली. ती जंगली पशूप्रमाणे बेफाम बनली होती, तिला उन्मादवायूचा झटका आला होता. त्या झटक्यात ती श्वापदासारखी वागत होती. आश्चर्याने मी अवाक् बनलो होतो. अशा तऱ्हेच्या भावनिक विस्फोटाची मी कधी अपेक्षा केली नव्हती. पण मनाचा हजरजबाबीपणा मी सोडला नाही. मी मुळीच जागचा हललो नाही आणि पुन्हा एकदा त्याच शांत स्वरात मी तिला स्पष्ट बजाविले की, इतःपर माझ्या धंद्यात लुडबूड करायला मी तिला मना केले होते. ती माझ्या तोंडावर हसली व घरातून निघून गेली.

मुद्दा असा की, घरातून निघून जाण्याचा तसा तिला हक्क नव्हता. माझ्याशिवाय कुठेही नाही, लग्नापूर्वी तशी मी अट घातली होती. सायंकाळी ती परतली: मी एका शब्दाने बोललो नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळच्या प्रहरीच ती बाहेर गेली, त्यापुढील दिवशीही निघून गेली. मी पेढी बंद केली व मावशांकडे निघालो. लग्नानंतर ताबडतोब मी तिच्या नातेवाईकांशी सर्व संबंध तोडून टाकले होते. ना त्यांना स्वतःकडे बोलावीत होतो, ना त्यांच्याकडे मी जात होतो. पण आता मला समजले की, ती त्यांच्याकडे गेलीच नव्हती. त्यांनी माझ्याकडून कुतूहलाने सर्व हकीकत ऐकून घेतली व नंतर त्या माझ्या तोंडावर कुत्सित हसल्या. "चांगली अद्दल घडली," त्या म्हणाल्या. पण त्यांच्या हसण्याची मी अपेक्षा केली होती. लहान्या मावशीला, प्रौढ कुमारिकेला, शंभर रूबलची लाच चारण्यात मी वेळ गमावला नाही व पंचवीस रूबल आगाऊ रक्कम म्हणून तात्काळ दिले. दोन दिवसांनंतर ती माझ्याकडे येऊन म्हणाली: "ह्या भानगडीत येफीमोविच नांवाचा एक लष्करी अधिकारी गुंतलाय. तुमच्या जुन्या रेजिमेंटमधला लेफ्टनंट आहे." मी थक्क झालो. ह्या येफीमोविचने माझ्या रेजिमेंटमध्ये माझे फार नुकसान केले होते आणि महिन्यापूर्वी माझ्या पेढीवर

एकदा नव्हे तर दोनदा ग्राहकाच्या मिषाने येण्याचे धाष्ट्र्य दाखविले होते. माझ्या बायकोबरोबर तो थट्टा-मस्करीत बोलत होता हे मला आठविले. मी तात्काळ त्याच्यापाशी गेलो होतो व त्याच्या-माझ्यात जे काही पूर्वी घडले होते ते ध्यानात घेता परत माझ्या पेढीवर त्याने पाऊल टाकू नये असे बजाविले होते. पण तसे काही असावे अशी तेव्हा मला अंधुकशीसुद्धा कल्पना नव्हती. तो फक्त निर्लज्ज होता अशी माझी समजूत झाली होती. पण आता तिची मावशी मला सांगत होती की, त्याच्याशी तिने एव्हाना संकेतभेट घेतली होती, हा सारा मामला यूलीया साम्सोनोव्ना नामक एका विधवेमार्फत चालला होता, ही बाई मावशांची जुनी मैत्रीण होती व एका कर्नलची विधवा होती. "तुमची बायको सध्या तिच्याकडं जात असते," मला सांगण्यात आले.

हा भाग मी संक्षिप्त करतो. मला एकूण तीनशे रूबल खर्च आला, पण अशी योजना आखण्यात आली की, दोन दिवसांनंतर माझ्या बायकोची जेव्हा येफीमोविचशी प्रथम एकांत-भेट घडणार होती, तेव्हा शेजारच्या खोलीत बसून मी त्यांचे सर्व संभाषण ऐकणार होतो. दरम्यान, त्यांच्या संकेतभेटीच्या आदल्या दिवशी, आमच्यात छोटाच, पण माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रसंग घडला.

ती संध्याकाळी घरी आली, बिछान्यावर बसली व पायाने गालीचा खरवडत तिने माझ्याकडे उपहासाने टक लावली. तिच्याकडे पाहताच अचानक माझ्या ध्यानात आले की, त्या सबंध महिनाभरात, अथवा अखेरच्या पंधरवड्यात, ती मुळीच थाऱ्यावर नव्हती. मी तर म्हणेन की, नेहमीपेक्षा तिचे अगदी विरोधी रूप दिसत होते: बंडखोर, आक्रमक, निर्लज्ज असे मी म्हणणार नाही पण धिंगाणा घालायला उतावीळ झालेल्या, तोल सुटलेल्या प्राण्यासारखी ती भासत होती. धुमाकूळ घालायला ती उत्सुक होती. पण तिचा बापुडवाणेपणा वाटेत आडवा येत होता. तिच्यासारखी माणसे जेव्हा बेफाम बनतात, जरी तिने तिच्या सर्व मर्यादा ओलांडल्या होत्या, तरी तेव्हा तुमच्या ध्यानात येते की, ती केवळ स्वतःवर बळजबरी करीत होती, स्वतःला आग्रह करीत होती, तिच्या पावित्र्याविरुद्ध आणि अब्रूविरुद्ध ती स्वतःच हरणारी लढाई खेळत होती. म्हणून बापुडी माणसे काहीवेळा स्वतःच्या मर्यादा एवढ्या ओलांडतात, की बघणाऱ्याचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसत नाही. नीतीभ्रष्टता ही जिची सवय आहे अशी बाई याउलट स्वतःच्या भावनांचा विस्फोट हमखास आवरून धरील, त्यात अधिक क्रूरपणा

असेल, पण वरून आव मात्र सभ्यपणाचा आणील, ज्यामागील हेतू तुमच्यावर अप्रतिहत वर्चस्व गाजविण्याचा असेल.

"द्वंद्व खेळायला तुम्ही घाबरलात म्हणून रेजिमेंटमधून तुमची हकालपट्टी करण्यात आली हे खरं आहे?" तिने अचानक मला विचारले. तिचे डोळे चमकत होते.

"खरं आहे. ऑफीसरांच्या कोर्टानं मला रेजिमेंट सोडून जायला सांगितलं, पण त्याआधीच मी राजीनामा दिला होता."

"भित्रे म्हणून तुम्हाला हाकललं?"

"होय, त्यांच्या निवाड्यात मला भित्रा ठरवण्यात आलं. ते द्वंद्व खेळायला मी नकार दिला तो मी भित्रा होतो म्हणून नव्हे, तर त्यांचा जुलमी न्याय मानायची माझी इच्छा नव्हती आणि माझा अपमान झाला नव्हता असं माझं मत असताना कुणाला द्वंद्वाचं आव्हान द्यायची माझी इच्छा नव्हती. तुम्हाला माहीत आहे," न राहवून मी म्हणालो, "तशा जुलूमाला धुडकावून लावायला आणि त्यानंतरचे परिणाम भोगायला जगातल्या कुठल्याही द्वंद्वापेक्षा अधिक धैर्य लागतं!"

मी ते शब्द आवरू शकलो नव्हतो आणि जणू मी स्वतःचे समर्थन करीत होतो असे भासले. माझा हा नवा अपमान व्हावा अशीच तिची इच्छा होती. ती दुष्टपणे हसली.

"आणि त्यानंतर तीन वर्षं तुम्ही पीटरबुर्गच्या रस्त्यांवरून भीक मागत फिरत होतात, बिलियर्डच्या टेबलांखाली रात्रीचे झोपत होतात, हे खरं आहे?"

"सेन्नाया चौकात आणि व्याझेम्स्की घरात[57] मी निवारा घेतला होता. होय, खरं आहे. रेजिमेंट सोडल्यानंतर मला खूप अपमान आणि मानहानी सोसावी लागली. पण नैतिक अपमान कधीही सहन करावा लागला नाही, कारण तेव्हाही माझ्या कृतींचा सर्वप्रथम मीच निषेध करायचा. माझ्या निर्धारशक्तीचं आणि मनाचं ते केवळ पतन होतं, पण त्याला माझी दारुण परिस्थिती कारणीभूत होती. आता तो भूतकाळ..."

"ओहो, आता तुम्हाला स्थान आहे–सावकार!"

माझ्या पेढीचा तो संदर्भ होता. पण प्रसंगाची सूत्रे मी चटकन माझ्या ताब्यात घेतली. माझ्याकडून अधिक खुलासे घेण्याची, माझा जास्त अपमान करण्याची तिची इच्छा मला दिसत होती, म्हणून ते सुख मी तिला लाभू दिले नाही. सुदैवाने त्याचवेळी एक गिऱ्हाईक आले आणि तिला सोडून मी

बाहेर पेढीवर गेलो. सुमारे तासाभरानंतर अचानक ती बाहेर जाण्याच्या पोषाखात माझ्यासमोर उगवली आणि म्हणाली :

"आणि ह्यापैकी काहीही तुम्ही मला लग्नाआधी सांगितलं नाही ना?"

मी उत्तर दिले नाही आणि ती निघून गेली.

दुसऱ्या दिवशी मी दारामागे उभा होतो आणि माझ्या नशिबाचा कोणता निर्णय लागतोय ते ऐकत होतो. माझ्या खिशात रिवॉल्वर होते. संकेतमीलनासाठी नटूनथटून ती टेबलापाशी बसली होती. येफीमोविच तिच्याभोवती गोंडा घोळत होता. आणि काय सांगू, मला जसे आधी वाटले होते तसेच घडले आणि तसेच घडणार असे मी गृहीत धरले होते (हे मान्य करण्यास मला अभिमान वाटतो), मात्र मी तशी कल्पना करीत होतो अथवा तसे गृहीत धरीत होतो ह्याची मला तेव्हा जाणीव नव्हती. मी समजण्याजोगा खुलासा करतोय अथवा नाही हे मला माहीत नाही.

ते असे घडले. सबंध तासभर मी त्यांचे संभाषण ऐकत होतो. एक अत्यंत उदात्त आणि विशुद्ध स्त्री व विषादी मनाचा समाजातील एक नीच घटक यांच्यामधील द्वंद्व सबंध तासभर मी ऐकत होतो. आश्चर्याने माझ्या मनात विचार येत होता : ह्या भाबड्या, दुबळ्या आणि अलिप्त मुलीला कुठून हे सारे माहीत झाले? अत्यंत चतुर लेखकालासुद्धा विनोदी नाटकातील असा खवचट टोमण्यांचा प्रसंग लिहिणे जमले नसते, असा भाबड्या हास्याचा खळखळाट निर्माण करता आला नसता, चांगल्याला वाईटाबद्दल वाटणारा सात्त्विक तिटकारा दाखवता आला नसता. किती बुद्धिमान बोलणे आणि हजरजबाबी उत्तरे, किती विनोदचातुर्य, किती खटा चोखंदळपणा! त्याचवेळी किती बालीश साधेपणा! त्याच्या प्रेमयाचनांना, त्याच्या हातवाऱ्यांना, त्याच्या प्रस्तावांना ती त्याच्या तोंडावर हसत होती. त्याच्या रांगड्या आक्रमणाला कोणताही प्रतिकार घडणार नाही अशा कल्पनेने तो आला होता आणि आता त्याची फटफजिती झाली होती. प्रथम मला वाटत होते की, ती निव्वळ नखरा करीत होती. "नीतिभ्रष्ट पण तीव्र बुद्धीच्या प्राण्याचा स्वतःची किंमत चढवून घेण्यासाठी चाललेला नखरा." पण नाही, सूर्याप्रमाणे सत्य तेजाने चमकत होते आणि संशयाला मुळीच जागा उरली नव्हती. माझ्याविषयीच्या अचानक निर्माण झालेल्या अविचारी तिटकाऱ्यापायीच केवळ तिने ही संकेतभेट ठरविली असावी – अजून ती अननुभवी होती – आणि प्रत्यक्ष क्षण उभा ठाकताच तिच्या डोळ्यांवरील बुरखा तात्काळ गळून पडला होता. तिला उपलब्ध होती त्या साधनांद्वारे ती माझा केवळ

अपमान करू पहात होती, पण तिच्या ह्या कृतीमधील घाणेरडेपणा तिला स्वतःलाच सहन झाला नाही. तिच्यासारख्या निष्कलंक आणि निष्पाप व्यक्तीला, आदर्शाला उराशी जोपासणारीला, येफीमोविच अगर तत्सम समाजकंटकाबद्दल आकर्षण वाटणे शक्य होते का? उलट त्याने फक्त स्वतःचे हसे करून घेतले. सारे सत्य तिच्या अंतरातून उमाळून उठले आणि उपहासामार्फत तिच्या काळजातील तिटकारा बाहेर फुटला. मी परत सांगतो, संभाषणाच्या अखेरी तो विदूषक पुरता चकित झाला होता, कपाळाला आठ्या घालून बसला होता, काहीही उत्तर देणे त्याला सुचत नव्हते. सूडाच्या नीच इच्छेपायी तो तिचा अपमान करील अशी मला भीतीसुद्धा वाटली. मी परत एकदा सांगतो: हा प्रसंग मी मुळीच चकित न होता ऐकला हे सांगण्यास मला अभिमान वाटतो. मला आधीच माहीत असलेली गोष्ट जणू मी पहात होतो. जणू मी तिला भेटायला तेथे गेलो होतो. कशावरही विश्वास न ठेवता, कोणतेही आरोप न करता मी तेथे गेलो होतो – जरी मी खिशात रिवॉल्वर बाळगले होते – आणि हे सत्य आहे. तिच्याबद्दल दुसऱ्या रीतीने मी विचार करू शकलो असतो का? मग का मी तिच्यावर प्रेम केले, का ती मला एवढी प्रिय वाटत होती, का मी तिच्याशी लग्न केले होते तेव्हा? अर्थात त्या प्रसंगाने माझी खात्री पटविली की, ती माझा अतोनात तिरस्कार करीत होती, पण त्याचबरोबर तिच्या विशुद्धतेबद्दल माझी खात्री पटली होती. एकदम दरवाजा उघडून मी त्या प्रसंगाची अचानक अखेर केली. येफीमोविच ताडदिशी उडी मारून उभा झाला. मी तिचा हात धरला आणि माझ्याबरोबर चलण्यास सांगितले. येफीमोविचने स्वतःचा तोल सावरला आणि एकदम तो खळाळून हसला:

"विवाहाच्या पवित्र बंधनांवर मी आक्रमण करणार नाही, घेऊन जा तिला, घेऊन जा! आणि ऐका," तो माझ्यावर ओरडला, "कोणताही सभ्य माणूस तुमच्याशी द्वंद्व खेळायला तयार होणार नाही हे खरं असलं, तरी तुमच्या स्त्रीबद्दलच्या आदराखातर मी सांगतो, मी आपल्या सेवेला सज्ज आहे... अर्थात तुम्ही धोका पत्करत असाल तर..."

"ऐकलंत?" मी तिला उंबरठ्यापाशी किंचित थांबवून म्हटले.

त्यानंतर घरापर्यंत मी वाटेत आणखी एकही शब्द उच्चारला नाही. तिचा हात धरून मी तिला नेत होतो आणि तिने कोणताही प्रतिकार केला नाही. उलट ती कमालीची प्रभावित झाली होती, पण फक्त घरापर्यंत. घरी आल्यानंतर ती खुर्चीवर बसली आणि तिने माझ्याकडे टक लावली.

तिचा चेहरा अत्यंत फिकुटला होता. जरी तिच्या ओठांना दुष्ट मुरड तात्काळ पडली होती, तरी तिची नजर मात्र गंभीर आणि कठोर बनली होती. मला वाटते, त्या पहिल्या क्षणांमध्ये तिचा खरोखरीच विश्वास बसला होता की, मी तिला रिवॉल्वरने ठार करणार होतो. पण एकही शब्द न बोलता मी ते खिशातून बाहेर काढले व टेबलावर ठेवले. ती माझ्याकडे व रिवॉल्वरकडे आलटूनपालटून पहात होती. (नोंद घ्या: हे रिवॉल्वर तिच्या माहितीचे होते. मी पेढी उघडली त्या दिवशीच ते विकत घेतलेले होते व त्यात काडतूसे भरलेली होती. मोसेरने बाळगले होते तसे भलेमोठे राखण करणारे कुत्रे अथवा बलिष्ठ पहारेकरी बाळगण्याच्या मी विरुद्ध होतो. माझ्या गिऱ्हाईकाला माझी स्वयंपाकीण दार उघडते. मी भरलेले रिवॉल्वर हाताशी ठेवतो, कारण आमच्या धंद्यात प्रसंगी स्वसंरक्षण करण्याची वेळ येते. ती प्रथम घरात आली, तेव्हा रिवॉल्वरबद्दल तिला फार कुतूहल होते. ते कसे चालवायचे ह्याची मी तिला माहिती दिली होती, एवढेच नव्हे तर एकदा तिला नेमबाजी करायला लावली होती. ही सारी नोंद घ्या.) तिच्या भेदरलेल्या नजरेकडे दुर्लक्ष करून मी तसाच अर्ध्या पोषाखात बिछान्यावर आडवा पडलो. मी पुरता गळून गेलो होतो. एव्हाना अकरा वाजले होते. एक तासभर ती तशीच स्तब्ध बसून राहिली, मग तिने मेणबत्तीला फुंकर मारून विझविली आणि पोषाख न उतरवता तशीच भिंतीजवळच्या दिवाणावर झोपली. पहिल्यांदाच ती माझ्यापाशी निजली नाही — हीसुद्धा नोंद घ्या...

६

भयानक आठवण

आता ती भयानक आठवण...

सकाळी मी जागा झालो, बहुधा सातानंतरचा सुमार होता आणि खोलीत एव्हाना संपूर्ण उजेड पसरला होता. मी तात्काळ जागा झालो होतो आणि एकदम डोळे उघडले. ती टेबलापाशी उभी होती आणि हातांमध्ये तिने रिवॉल्वर धरले होते. मी जागा होऊन पहात होतो हे तिच्या ध्यानात आले नव्हते. अचानक ती रिवॉल्वर हातात धरून माझ्या दिशेने चालू लागल्याचे मी पाहिले. मी पटकन डोळे मिटले आणि गाढ झोपल्याचे सोंग केले.

बिछान्यापर्यंत चालत येऊन ती थांबली. मी सर्व ऐकत होतो. स्मशानवत शांतता नांदत होती, पण ती शांतता मी ऐकत होतो. एका स्नायूची हालचाल घडली आणि इच्छा नसताना डोळे उघडणे मला भाग पडले. ती थेट माझ्या डोळ्यांमध्ये रोखून पहात होती आणि रिवॉल्वरची नळी एव्हाना माझ्या कानशीलापाशी होती. आमच्या नजरा एकमेकींना भिडल्या. ही नजरांची देवघेव एक सेकंदापेक्षाही कमी काळ घडली. काहीही घडले तरी चालेल, पण परत मुळीच हालचाल करायची नाही अथवा डोळे उघडायचे नाहीत, असा मी तत्क्षणी मनाचा ठाम निर्धार केला.

काहीवेळा असे घडते की, गाढ झोपलेला माणूस अचानक डोळे उघडतो, एवढेच नव्हे तर क्षणभर डोके वर उचलून खोलीभर नजर फिरवतो आणि नंतर परत उशीवर डोके टेकवून गाढ झोपी जातो, त्याला ह्या मधल्या जागृतीची आठवणसुद्धा रहात नाही.

आता तिच्या नजरेला नजर भिडवल्यानंतर आणि माझ्या कानशीलाशी रिवॉल्वर पाहिल्यानंतर ज्याअर्थी मी अचानक परत डोळे झाकले होते व गाढ झोपेत असल्याप्रमाणे निःस्तब्ध पडलो होतो, त्याअर्थी ती नक्की समजूत करून घेणार होती की, मी खरोखरीच झोपलो होतो व काही पाहिले नव्हते. शिवाय, जे काही मी पाहिले होते त्यानंतर, तशा क्षणी मी परत डोळे झाकणे एरवी अतर्क्य होते.

होय, ते अतर्क्य होते. तरीही, तिने सत्य जाणले असावे – त्याच ओझरत्या क्षणी हा विचार माझ्या मनात चमकून गेला. त्या ओझरत्या क्षणात माझ्या मनात विचारांचे आणि भावनांचे केवढे वादळ उमटून गेले. मानवी विचारांच्या विद्युत्‌वेगाला वंदन असो! तसे असेल (मला असे वाटले), जर तिने सत्य जाणले असेल आणि मी झोपलेला नव्हतो हे तिला माहीत असेल, तर मरणाच्या माझ्या सज्जतेला पाहून ती पराभूत होईल आणि आता कदाचित तिचा हात अडखळेल. ह्या नव्या, आश्चर्यकारक ज्ञानापायी कदाचित तिचा आधीचा निर्धार भंगून जाईल. असे म्हणतात की, खूप उंचीवरून खाली वाकून पाहताना माणूस अदम्यपणे स्वतःच्या पायाखालील विवराकडे खेचला जातो. माझा विश्वास आहे की, केवळ आधीच रिवॉल्वर उचललेले असते म्हणून अनेक खून अथवा आत्महत्या प्रत्यक्षात होतात. ते एक तसेच विवर आहे, ४५ अंश उताराचे, ज्याच्यावरून घसरत न जाणे अशक्य ठरते आणि काहीतरी अदम्य चाप ओढायला भाग पाडते. तरीही, मी सर्व काही पाहिले होते, मला माहीत होते, तरीही तिच्या हातून मृत्यूची

शांतपणे वाट पाहात होतो, ही जाणीव तिला कदाचित त्या उतारावरून घसरण्यापासून थोपवू शकली असती.

शांतता पुढे चालू राहिली आणि अचानक पोलादाचा थंड स्पर्श कानशीलापाशी, माझ्या केसांपाशी मला जाणवला. तुम्ही विचाराल: माझी सुटका होईल अशी पक्की खात्री होती मला? मी तुम्हाला ईश्वरसाक्ष उत्तर देतो: मला कसलीही आशा नव्हती, कदाचित शंभरात एक संधी होती. तर मग मृत्यूचा स्वीकार का करीत होतो? मी उलट विचारतो: ज्या व्यक्तीला मी अत्यंत प्रिय मानत होतो, त्याच व्यक्तीने माझ्यावर रिवॉल्वर रोखल्यानंतर माझ्या जीवनाला काय अर्थ होता? शिवाय, माझ्या अंतरंगातील सर्व शक्तीनिशी मला ठाऊक होते की, तो क्षण म्हणजे आमच्या दोघांमधील वरचढ कोण ठरतो ह्याचा निर्णायक लढा होता, जीवन-मरणाचे ते महाभयानक द्वंद्व होते, भित्रेपणाबद्दल ज्याच्या साथीदारांनी अगदी कालपरवा ज्याला हाकलून लावले होते, तोच भित्रा आज हे द्वंद्व खेळत होता. मला ते माहीत होते आणि तिलाही माहीत होते, म्हणजे मी झोपलेला नव्हतो ह्याची तिला जर जाणीव असेल तर!

कदाचित हे काहीच घडले नव्हते, कदाचित हे विचारही तेव्हा माझ्या डोक्यात नव्हते, पण तरीही हे सर्व असे असले पाहिजे, निदान अजाणता, कारण त्यानंतर माझ्या आयुष्यातील दर तासाला त्याबद्दल विचार करण्याशिवाय दुसरे मी काहीच केले नाही.

पण तुम्ही परत मला प्रश्न कराल: तिला गुन्ह्यापासून मी परावृत्त का केले नाही? हा प्रश्न नंतर मी हजार वेळा स्वतःला विचारला, दरवेळी त्या क्षणाची आठवण झाली म्हणजे माझ्या पाठीमधून थंडगार शहारा जातो. पण त्यावेळी मी निराशेच्या खोल गर्तेत बुडालो होतो. मी स्वतःच नष्ट होत होतो, तेव्हा दुसऱ्याला कुठून वाचवणार? त्यावेळी कुणाला वाचविण्याची माझी इच्छा होती अथवा नव्हती, हे तुम्हाला कसे माहीत? त्यावेळी मला काय वाटत होते हे कोण सांगू शकेल?

माझ्या संवेदना पूर्ण जाग्या होत्या. क्षण उलटले, मृत्युवत शांतता होती. ती अजूनही माझ्यापाशी उभी होती– अचानक आशेपायी माझा थरकाप झाला. मी चटकन डोळे उघडले. एव्हाना ती खोलीत नव्हती. मी बिछान्यावरून उठलो. मी जिंकलो होतो–ती कायमची हरली होती!

मी समोवारपाशी आलो. समोवार नेहमी आमच्या पहिल्या खोलीत असायचा. चहा नेहमी ती ओतून द्यायची. मी टेबलापाशी मुकाट बसलो

आणि तिच्याकडून चहाचा पेला घेतला. पाच मिनिटांनंतर मी तिच्यावर नजर टाकली. ती भयानक पांढरीफटक पडली होती, कालच्यापेक्षा जास्त आणि माझ्याकडे टक लावून पहात होती. आणि अचानक – अचानक, मी तिच्याकडे पाहतोय असे दिसताच, तिच्या फिकट ओठांवर फिकट स्मित उमटले व तिच्या डोळ्यांमध्ये भित्रा प्रश्न होता. "म्हणजे अजून तिच्या मनात संशय आहे: त्यानं पाहिलं अथवा नाही?" मी निर्विकारपणे नजर दुसरीकडे वळविली. चहापानानंतर मी पेढीला कुलूप घातले व बाजारात जाऊन लोखंडी पलंग आणि आडोशाचा पडदा विकत घेऊन आलो. घरी परतल्यानंतर पलंगाला हॉलमध्ये ठेवायला मी सांगितले व त्याच्याभोवती आडोसा लावला. हा पलंग तिच्यासाठी होता, पण त्याबद्दल मी अक्षराने बोललो नाही. तरी शब्दांविना तिला समजले की, मी "सर्व पाहिले होते, सर्व जाणले होते," आणि त्याबद्दल इतःपर संशय नव्हता. रात्री मी नेहमी-प्रमाणे रिवॉल्वर टेबलावर ठेवले. रात्री ती मुकाटपणे त्या नव्या पलंगावर निजली. आमचा विवाह मोडला होता, "ती पराभूत झाली होती, पण तिला क्षमा झाली नव्हती." रात्री ती बरळत होती आणि सकाळी तापाने फणफणली. सहा आठवडे ती आजारी होती.

भाग दुसरा

१

अभिमानाचे स्वप्न

लूकेर्याने आत्ताच मला सांगितले की, ती माझ्याबरोबर राहणार नाही आणि तिच्या मालकिणीचे दफन होताच ती निघून जाईल. मी गुडघे टेकवून पाच मिनिटे देवाची प्रार्थना करीत आहे, वस्तुतः एक तासभर प्रार्थना करण्याची माझी इच्छा होती, पण माझ्या मनात विचार दाटी करीत आहेत, सगळे आजारी विचार – आणि मनही आजारी... अशा स्थितीत काय प्रार्थना करायची... केवळ पाप! आश्चर्य म्हणजे मला झोपायची इच्छा नाही. माणसावर महासंकट कोसळते तेव्हा दुःखाच्या पहिल्या जोरदार उमाळ्यानंतर त्याला झोपायची इच्छा होत असते. मृत्यूची शिक्षा झालेली माणसे म्हणे शेवटच्या रात्री अत्यंत शांत झोपतात. तसेच असावे, हे स्वाभाविक

आहे, अन्यथा सहन करायची ताकद येणार नाही. मी दिवाणावर आडवा झालो, पण झोप लागली नाही...

सहा आठवडे ती आजारी होती तेव्हा आम्ही दिवस-रात्र तिची शुश्रूषा केली. लूकेर्याने, मी आणि पैसे देऊन ठेवलेल्या इस्पितळातील परिचारिकेने. खर्चाची मी तमा बाळगली नाही, उलट तिच्यासाठी पैसे खर्च करायला मला आनंदच वाटत होता. मी डॉ. श्रेदेरना बोलाविले आणि त्यांच्या व्हिजिटची दहा रूबल फी दिली. जेव्हा ती शुद्धीवर आली, तेव्हा मी तिच्या नजरेआड राहण्याची दक्षता घेतली. पण कशाला मी हे वर्णन करतोय? जेव्हा ती संपूर्ण बरी झाली, तेव्हा माझ्या खोलीत येऊन शांतपणे टेबलापाशी बसली. ते टेबलसुद्धा ह्यावेळी मी तिच्यासाठी विकत घेतलेले होते. होय, खरे आहे, आम्ही अगदी गप्प होतो. म्हणजे नंतर आम्ही बोलू लागलो, पण अगदी फुटकळ. मी मुद्दामच मितभाषी वागत होतो, पण मला आढळले की तीसुद्धा विशेष बोलावे न लागल्याबद्दल खूष होती. तिचे वागणे मला स्वाभाविक वाटले. "ती फार हबकली आहे आणि पुरती पराभूत बनलीय," माझ्या मनात विचार आला, "म्हणून तिला सावरायला आणि विसरून जायला संधी दिली पाहिजे." म्हणून आम्ही गप्प रहात होतो, पण भविष्यकाळाच्या तयारीसाठी मी प्रत्येक मिनिटाचा वापर करीत होतो. मला वाटले की, तीसुद्धा तेच करीत होती आणि त्यावेळी तिच्या मनात कोणते विचार येत असावेत ह्याबाबत तर्क करण्यात मला विलक्षण मजा वाटत होती.

आणखी सांगतो: ती आजारी होती तेव्हा माझ्या मनाने किती प्रचंड दुःख सोसले होते ह्याची अर्थातच कुणालाही माहिती नाही. मी मूकपणे दुःख करीत होतो, लूकेर्यालासुद्धा ऐकू जाऊ नये म्हणून हुंदके दाबून धरीत होतो. सर्व माहीत न होता ती मरेल अशी मी कल्पनासुद्धा करू शकत नव्हतो. जेव्हा ती धोक्यातून बाहेर पडली आणि तिची प्रकृती सुधारू लागली, तेव्हा मला आठवते की माझ्या मनाला पटकन परत शांतता लाभली. एवढेच नव्हे तर **आमचा भविष्यकाळ** जास्तीत जास्त **लांबणीवर टाकून** दरम्यानच्या काळात चालू घडामोडींवरच समाधान मानायचे मी ठरविले. खरेच, त्यावेळी मला काहीतरी विचित्र आणि विशेष झाले होते, दुसऱ्या शब्दात मला सांगता येणार नाही: मी तिच्यावर विजय मिळविला होता आणि केवळ ती जाणीवच मला पूर्ण समाधानी बनवीत होती. तर

अशा रीतीने सगळा हिवाळा सरला. तेवढा समाधानी मी पूर्वी कधीही नव्हतो आणि ही समाधानी अवस्था सबंध हिवाळाभर टिकून होती.

त्या दिवसापर्यंत, म्हणजे माझ्या बायकोवर महासंकट कोसळले त्या दिवसापर्यंत, माझ्या जीवनात एक भयानक घटना होती व दर दिवसाला, दर तासाला तिच्याखाली मी दडपून जात होतो – माझी बेअब्रू आणि रेजिमेंटमधून माझी हकालपट्टी. थोडक्यात सांगायचे तर जुलमी अन्यायाचा मी बळी ठरलो होतो. हे खरे आहे की, माझ्या अवघड स्वभावापायी माझ्या साथीदारांना मी आवडत नव्हतो अथवा मी त्यांना चमत्कारिक भासत होतो. काही वेळा असे घडते : जी गोष्ट तुम्हाला प्रेयस वाटते, जी तुम्ही उराशी जपता आणि जिच्याबद्दल आदर बाळगता, नेमकी तीच गोष्ट अकारण तुमच्या साथीदारांच्या टोळक्याच्या थट्टेचा विषय बनते. मी कुणालाही कधीही आवडलो नव्हतो, शाळेतसुद्धा. माझा सर्वत्र आणि नेहमी तिटकारा करण्यात आला आहे. लूकेर्यालासुद्धा मी आवडत नाही. माझ्याबद्दलच्या नावडीचे मूळ रेजिमेंटमध्ये घडलेल्या प्रसंगात असले, तरी त्याचा शेवट निःसंशयरीत्या केवळ अपघाती होता. मी ह्याचा उल्लेख करतोय कारण केवळ अपघातापायी, ढगांप्रमाणे विखरून जाऊ शकणाऱ्या दुर्दैवी परिस्थितींच्या गोळाबेरजेपायी, सर्वनाश घडण्याहून अधिक दुःखद आणि दुःसह दुसरे काहीही नाही. बुद्धिमान माणसाला हे अपमानास्पद वाटते. तो प्रसंग असा घडला होता.

नाटकाच्या दोन अंकांदरम्यानच्या विश्रांतीकाळात मी उपाहारगृहात गेलो होतो. तेवढ्यात अ नामक एक हुसार अचानक तेथे आला आणि सर्व ऑफीसरांना व लोकांना ऐकू जाईल एवढ्या मोठ्या आवाजात त्याच्या दोन मित्रांना सांगू लागला की, कॉरीडॉरमध्ये आमच्या रेजिमेंटचे कप्तान बेझूमत्सेव यांनी नुकताच दंगा केला आणि "बहुधा झिंगलेले" आहेत. संभाषण तेवढ्यावरच थांबले, शिवाय बातमी चुकीची होती, कारण कप्तान झिंगलेले नव्हते व दंग्याला दंगा म्हणणे योग्य ठरले नसते. हुसारांच्या दुसऱ्या गप्पा चालू झाल्या व तो विषय संपला. पण दुसऱ्या दिवशी ती बातमी आमच्या रेजिमेंटमध्ये पसरली आणि आमचे ऑफीसर तावडतोब म्हणू लागले की, कप्तान बेझूमत्सेवबद्दल तो अ हुसार टवाळीने बोलत होता तेव्हा आमच्या रेजिमेंटचा फक्त मी तेथे हजर होतो, त्याअर्थी त्या हुसारापाशी जाऊन त्याला तंबी देऊन मी गप्प बसवायला पाहिजे होते. पण कशासाठी? जर त्याने बेझूमत्सेववर दात धरला होता, तर त्यांची ती वैयक्तिक बाब होती,

मी कशाला स्वतःला त्यांच्यात गुंतवून घेऊ? ऑफीसरांचे म्हणणे पडले की, ती वैयक्तिक बाब नव्हती, सबंध रेजिमेंटचा तिच्याशी संबंध होता व ज्या-अर्थी मी रेजिमेंटचा एकमेव प्रतिनिधी तेथे हजर होतो, त्याअर्थी इतर ऑफी-सर व लोक ग्रह करून घेतील की, स्वतःच्या अथवा रेजिमेंटच्या प्रतिष्ठे-बाबत दक्ष नसलेल्या ऑफीसरांना आमची रेजिमेंट सहन करते. त्यांची वि-चारसरणी मला पटत नव्हती. मला सांगण्यात आले की, अ ला द्वंद्वाचे आव्हान देऊन मी अजूनही माझी अपमानाची भरपाई करू शकतो. मी तसे करण्यास नकार दिला व चिडलेला होतो म्हणून ताठ्यात नकार दिला. त्यानंतर तात्काळ मी राजीनामा दिला – अशी कहाणी. मी ताठ्याने बाहेर पडलो, पण मन चिरडले होते. माझी निर्धारशक्ती आणि युक्तिवादाची क्षमता यांना मी गमावून बसलो. तेवढ्यात माझ्या बहिणीच्या नवऱ्याने मॉस्कोत आमचे थोडेफार भांडवल होते ते उधळून टाकले. त्यात माझा वाटाही उधळला – अर्थात तो खूप लहान होता – आणि मी साक्षात निर्धन व बेघर बनलो. मी नागरी नोकरी पत्करू शकलो असतो, पण नाही पत्क-रली. रुबाबदार लष्करी गणवेषानंतर कुठेतरी रेलखात्यात काम करणे मला रुचत नव्हते. तेव्हा शरम तर शरम; नाचक्की तर नाचक्की; अधःपात तर पुरता अधःपात – माझी धारणा अशी होती. पुढील तीन वर्षांच्या माझ्या आठवणी काळ्याकुट्ट आहेत, त्यात व्याझेम्स्की भिकारीगृहाच्या आठवणींचा समावेश आहे. दीड वर्षापूर्वी माझी धर्माची आई, एक श्रीमंत म्हातारी, मॉस्कोत वारली. अनपेक्षितपणे तिने तिच्या मृत्युपत्रात इतरांबरोबर माझीही आठवण ठेवली होती आणि मला तीन हजार रूबल दिले होते. मी विचार केला व त्याचक्षणी निर्णय घेतला. सावकारी पेढी घालण्याचे मी ठरविले, म्हणजे माझ्या भूतकाळाबद्दल कुणाला सबबी सांगण्याची जरूरी नव्हती. पैसा, घर आणि जुन्या आठवणींपासून दूर – नवे जीवन – माझी अशी यो-जना होती. असे होते तरीसुद्धा, माझा दुःखद भूतकाळ आणि कधीही भरून न येणारी माझी मानहानी मला दर तासाला, दर मिनिटाला छळत होते. मग मी लग्न केले. तो योगायोग होता अथवा नाही, मला माहीत नाही. पण जेव्हा मी तिला माझ्या घरात आणले, तेव्हा मला वाटले होते की, माझ्या मित्राला आणले, कारण मला एका मित्राची खूप गरज भासत होती. मात्र मला स्पष्ट दिसत होते की, ह्या मित्राला तयार केले पाहिजे, आकार दिला पाहिजे आणि प्रथम त्याला पराभूतही केले पाहिजे. कोणत्याही प्रस्तावना न लावता त्या सोळा वर्षांच्या पूर्वग्रहदूषित मुलीला मी काही

खुलासा करू शकलो असतो का? उदाहरणार्थ, रिवॉल्वरचे ते भयानक संकट घडले नसते आणि सुदैवाने त्याने मला मदत केली नसती, तर मी तिला सिद्ध करू शकलो असतो का, की मी भित्रा नव्हतो आणि माझ्या रेजिमेंटने माझ्यावर भित्रेपणाचा आरोप लादून अन्याय केलाय? ते संकट योग्य वेळी आले. रिवॉल्वरची नळी कानशीलावर टेकलेली असताना मी दाखविलेला आत्मसंयम, म्हणजे माझ्या काळ्या भूतकाळावर मी घेतलेला सूड होता. आणि इतर कुणालाही त्याबद्दल कधी माहीत होणार नसले, तरी **तिला** माहीत होते आणि माझ्या दृष्टीने त्यात सर्वस्व साठविलेले होते, कारण खुद्द ती म्हणजेच माझे सर्वस्व होते, माझ्या भविष्याची सारी आशा माझ्या स्वप्नांमध्ये साठवलेली होती! माझ्यासाठी फक्त तिलाच मी तयार करीत होतो, दुसरी कोणतीही व्यक्ती मला नको होती—आणि आता तिला सर्व माहीत होते: निदान तिला माहीत होते की, माझ्या शत्रूंच्या छावणीत सामील होण्यात तिने अन्याय्य घाई केली होती. ह्या विचाराने मला आनंद झाला. इत:पर तिच्या दृष्टीने मी नीच नव्हतो, फार तर ती मला विचित्र समजली असती, पण जे काही घडले होते त्यानंतर हा विचारसुद्धा मला तेवढा वाईट वाटला नव्हता: विचित्रपणा हा दुर्गुण नव्हे, उलट तो गुणच आहे, कारण काहीवेळा बायकांना तो आवडतो. थोडक्यात, सगळ्या गुंतागुंतीचा उलगडा मी मुद्दामच लांबणीवर टाकला: जे काही घडले होते ते तूर्तास माझ्या मनाला शांतता देणारे होते आणि माझ्या स्वप्नांसाठी अमाप साहित्य पुरविणारे होते. माझी अडचण म्हणजे मी स्वप्नाळू आहे. माझ्यापाशी पुरेसे साहित्य होते आणि तिच्याबद्दल मी विचार केला की, ती **थांबू शकेल.**

कशाच्या तरी अपेक्षेत हिवाळा संपला. ती तिच्या टेबलापाशी बसलेली असायची तेव्हा तिच्याकडे चोरटे कटाक्ष टाकण्यात मला मजा वाटायची. दिवसा ती सुयांनी विणकाम करायची आणि संध्याकाळच्या वेळांना माझ्या पुस्तकाच्या कपाटातील एखादे पुस्तक काढून वाचायची. माझी पुस्तकांची निवडसुद्धा माझ्या पथ्यावर पडणारी होती. ती कुठेही बाहेर पडत नव्हती. जेवणानंतर तिन्हीसांजांपूर्वी मी दररोज तिला फिरायला बाहेर घेऊन जात होतो, पण पूर्वीप्रमाणे तोंड मिटून फिरत नव्हतो. आमचे संभाषण प्रसन्न भासविण्याचा मी मुद्दाम प्रयत्न करीत होतो, पण मी आधीच बोललो त्याप्रमाणे आम्हा दोघांपैकी कुणीही अतिरेकी उत्साह दाखवीत नव्हता. मी बुद्धिपुरस्सर तसे वागत होतो, पण तिला "सवड देणे" आवश्यक होते असे

मी समजत होतो. एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिच्याकडे चोरटे कटाक्ष टाकण्याचा आनंद मी लुटत असताना, हिवाळयाच्या अखेरीपर्यंत एकदाही माझ्या डोक्यात विचार आला नाही की, त्या सबंध काळात ती माझ्याकडे पहात असताना मी तिला मुळीच पकडले नव्हते. तिचा बुजरेपणा कारण असावा असे मला वाटले होते. शिवाय, तिच्या आजारानंतर ती अगदी बापुडवाणी दिसत होती. मी विचार केला की नाही, आणखी थोडी कळ काढावी आणि "ती स्वत:च अचानक माझ्यापाशी येईल..."

ह्या विचाराचे मला दुर्दम्य आकर्षण वाटत होते. आणखी भरीला सांगतो की, कधी कधी मी मुद्दामच माझ्या वृत्तीला आणि मनाला अशा टोकापर्यंत पेटवत न्यायचा की तिने माझ्यावर खूप अन्याय केलाय असे मला वाटू लागायचे. दर वेळी ही भावना काही काळपर्यंत टिकून रहायची. पण द्वेषाची भावना माझ्या मनात कायमचे मूळ धरू शकली नव्हती. तो केवळ मनाचा एक खेळ होता असेच मला भासायचे. आणि ती गुन्हेगार होती असे मला कधीच, अगदी कधीच वाटले नाही. तिला पलंग आणि आडोसा विकत घेऊन मी आमचे लग्न मोडले होते तेव्हासुद्धा. तिच्या गुन्ह्याचा मी छचोरपणे निवाडा केला होता म्हणून नव्हे; उलट अगदी आरंभापासून, पलंग विकत घेण्यापूर्वीसुद्धा, तिला पूर्णतया क्षमा करण्याचाच माझा इरादा होता. थोडक्यात, माझ्या विचित्रपणाचे कारण मी नैतिक मूल्यांचा कठोर न्यायाधीश होतो. ती एवढी पराभूत, लीन, चुरडून गेलेली भासायची, की काहीवेळा तिच्याबद्दलच्या करुणेने माझा ऊर दाटून यायचा. तरीसुद्धा तिची अवहेलना करणे मला मनापासून आवडत होते. आमच्यातील विषमतेची कल्पना मला आवडली होती.

त्या हिवाळ्यात हेतूपूर्वक अनेक चांगली कृत्ये करण्याची संधी मला मिळाली होती. दोन कर्जे मी माफ केली होती आणि एका गरीब बाईला गहाण वस्तूविना मी पैसे उसने दिले होते. त्याबद्दल माझ्या बायकोला मी काहीही बोललो नव्हतो आणि तसे जेव्हा मी केले होते तेव्हा तिला ते कधीतरी समजेल असा विचारसुद्धा माझ्या मनात नव्हता. पण ती गरीब बाई माझे आभार मानायला आली तेव्हा तिने माझ्यासमोर गुडघे टेकायचेच तेवढे बाकी ठेवले होते. त्यामुळे ती गोष्ट माझ्या बायकोला समजली. माझ्या बायकोला त्या बाईबद्दलची घटना मन:पूर्वक आवडली असावी असा मी स्वत:शी समज करून घेतला.

वसंताचा मोसम जवळ येत होता. एव्हाना एप्रिलचा मध्य उलटला

होता, खिडक्यांभोवतालच्या दुहेरी चौकटी बाजूला काढून टाकल्या होत्या आणि आमच्या मूक खोल्या सूर्याच्या किरणांनी उजळून निघत होत्या. पण माझ्या डोळ्यांसमोर अजूनही बुरखा टांगलेला होता आणि माझ्या विवेकाला त्याने आंधळे बनविले होते. तो मरणघातक, भयानक बुरखा! कसे घडले कुणास ठाऊक, पण अचानक तो बुरखा खाली पडला आणि तत्क्षणी मला सर्व दिसले, सर्व समजले. तो योगायोग होता, तो अंतिम दिवस होता, अथवा सूर्यकिरणाने माझ्या बधीर मेंदूला विचार करण्यास व समजून घेण्यास पेटविले होते? नाही, तो विचार नव्हता अथवा आकलनही नव्हते. ती एक मृतवत संवेदना परत जिवंत बनली होती, अचानक फडफडून उठली होती, माझ्या बधीर मेंदूला आणि माझ्या सैतानी अभिमानाला तिने उजळून काढले होते. तो जबरदस्त धक्का होता. ते अचानक आणि अनपेक्षित घडले. सूर्यास्तापूर्वी, सुमारे पाच वाजता ते घडले...

२

बुरखा अचानक पडला

आधी दोन शब्द सांगतो. महिन्यापूर्वी एक दिवस मला ती फार विचारात गढलेली दिसली. म्हणजे ती चिडीचूप बसली होती असे नव्हे, तर विचारात मग्न होती. हेसुद्धा अचानक माझ्या ध्यानात आले. ती मान खाली घालून शिवणकाम करीत होती आणि मी तिला न्याहाळत होतो हे तिला माहीत नव्हते. एकदम माझ्या ध्यानात आले की ती कमालीची कृश आणि हडकुळी बनली होती, तिचा चेहरा पांढुरका पडला होता, तिचे ओठ रक्तहीन दिसत होते – ह्या सर्व गोष्टी आणि तिची विचारमग्नता मिळून दिसणारा परिणाम मला एकदम धाबरवून गेला. त्याआधी तिचे किंचित कोरडे खोकणे मी ऐकले होते, विशेषतः रात्रीच्या वेळांना. मी तात्काळ उठलो आणि तिला काहीही न सांगता डॉ. श्रेदेरना बोलवायला गेलो.

श्रेदेर दुसऱ्या दिवशी आले. ती फार चकित झाली होती व श्रेदेरना आणि मला आळीपाळीने पहात होती.

"पण मी तर ठणठणीत आहे", अंधुक स्मित करीत ती म्हणाली.

श्रेदेरनी तिला विशेष तपासले नाही (ही डॉक्टरमंडळी काहीवेळा कमालीची निष्काळजी वागतात), मात्र दुसऱ्या खोलीत ते मला म्हणाले

की, तिच्या आजाराचा परिणाम अजून उरला होता आणि वसंतामध्ये कुठेतरी समुद्रकिनारी तिला घेऊन जाण्याची कल्पना वाईट ठरली नसती. जर समुद्रकिनारी जाणे शक्य नसेल, तर निदान शहराबाहेर दाचामध्ये जाऊन रहावे. थोडक्यात ते मला एवढेच म्हणाले की, तिला अशक्तपणा अथवा तत्सम काहीतरी होते. श्रेदेर निघून गेल्यानंतर अचानक ती गंभीर मुद्रेने मला म्हणाली :

"मी अगदी, अगदी छान टणठणीत आहे."

पण एवढे बोलताच एकदम तिचा चेहरा लाल बनला, अर्थातच लाजेपायी. बहुधा तिला लाज वाटली. अरेच्चा, आता ध्यानात आले माझ्या : तिला लाज वाटली की, अजूनही **तिचा नवरा** असलेला मी, जणू अद्याप खऱ्याखुऱ्या नवऱ्याप्रमाणे तिची काळजी वाहात होतो. पण तेव्हा मला ते समजले नाही आणि तिचा अपमान करून शरमिंदी व्हायला लावले. (बुरखा!)

तर त्यानंतर एक महिन्याने, एप्रिलमध्ये, झळझळीत ऊन पडलेल्या त्या दिवशी पाचाच्या सुमारास मी पेढीवर बसून हिशेब तपासत होतो. ती आमच्या खोलीत तिच्या टेबलापाशी बसून शिवणकाम करीत होती आणि अचानक तिचे मंद आवाजातील गुणगुणणे माझ्या कानांवर पडले. ह्या नवीन गोष्टीचा माझ्यावर जबरदस्त परिणाम झाला होता, पण त्याचा खुलासा करणे मला आजही शक्य होत नाही. तोवर तिचे गाणे क्वचितच माझ्या कानी पडले होते, कदाचित फक्त आरंभी, जेव्हा मी तिला प्रथम घरी आणले व मनोरंजनासाठी रिवॉल्वरने नेमबाजीचा सराव करीत होतो तेव्हा. त्यावेळी तिच्या आवाजात दमदारपणा आणि भिंगरी होती. मात्र तेवढे खरे नसले तरी त्या आवाजात गोडवा आणि निकोपपणा होता. आता गाणे अगदी क्षीण ऐकू येत होते, नव्हे, ते दुःखी गीत नव्हते (कुठलेतरी प्रेमगीत होते), पण तिच्या आवाजात आजारीपण आणि तुटकपण जाणवत होते, जणू तिचा आवाज त्या गीताशी जुळत नव्हता, जणू ते गीतच आजारी भासत होते. ती दबल्या आवाजात गात होती आणि वरच्या स्वरातील ओळीशी तिचा आवाज चिरकला. आधीच बिचारा क्षीण आवाज आणि अगदी केविलवाणेपणाने चिरकला. तिने खाकरून घसा स्वच्छ केला व ती परत मंदपणे गाणे गुणगुणू लागली...

माझ्या बेचैनीला लोक कदाचित हसतील, पण मी तेवढा अस्वस्थ का होतो हे कुणालाही कधी समजणार नाही. अद्याप मला तिची करुणा वाटत

नव्हती, माझी वेगळीच भावना होती. आरंभी, निदान आरंभी, मी बुचकळ्यात पडलो होतो आणि कमालीचा चकित झालो होतो, कारण ती भावना अपायकारी आणि सूडाची होती: "गातेय, आणि माझ्यादेखत! **माझा तिला विसर पडला काय?"**

भावनावेगापायी मी होतो तेथेच थांबलो, मग अचानक उठलो आणि टोपी घेऊन भ्रमिष्टासारखा बाहेर पडलो. मी का आणि कुठे चाललो होतो, मला समजत नव्हते. लूकेर्याने माझा ओव्हरकोट दिला.

"ती गाते?" नकळतपणे मी लूकेर्याला विचारले. तिला समजले नाही आणि ती माझ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने बघत राहिली. त्या काळात माझे वागणे कुणालाही न समजण्याजोगेच होते.

"ती पहिल्यांदाच गातेय?"

"नाही, तुम्ही घरात नसता तेव्हा कधी कधी गाते", लूकेर्या उत्तरली.

मला सर्व आठवते. मी जिना उतरलो, रस्त्यावर गेलो आणि पाय नेतील त्या दिशेने चालू लागलो. मी कोपऱ्यापर्यंत गेलो व शून्य नजरेने पाहू लागलो. लोक जात-येत होते, मला धक्के देत होते, पण मला कसलीच संवेदना नव्हती. मी घोडागाडीवाल्याला हाक मारली आणि पोलीस पुलापर्यंत न्यायला सांगितले, का ते मला माहीत नाही. मग अचानक मी विचार बदलला आणि त्याला वीस कोपेक बक्षिसी दिली.

"हे मी तुला त्रास दिल्याबद्दल," उगीचच हसत मी त्याला म्हणालो. माझ्या मनात अचानक कसलातरी अननुभूत आनंद उचंबळून येऊ लागला होता.

मी घराकडे परत जायला वळलो, भरभर पावले टाकू लागलो. ती गाण्याची तुटलेली क्षीण ओळ अचानक माझ्या काळजात झणझणली. माझा श्वास घुसमटला. डोळ्यांवरचा बुरखा खाली पडला! म्हणजे माझे अस्तित्व विसरून ती गायली होती—ही स्पष्ट जाणीव फार भयानक होती. काळजाने तिला जाणले. पण माझ्या मनात अत्यानंद दाटत होता आणि भीतीपेक्षा तो प्रबळ होता.

केवढा दैवदुर्विलास! सबंध हिवाळा हा अत्यानंद उराशी कवटाळूनच मी वावरलो होतो. दुसरी कुठली भावना असणे शक्यच नव्हते, पण सारा हिवाळा मी होतो तरी कुठे? माझ्या मनाशी मी एकरूप होतो? अधीरपणे मी धावत जिना चढून गेलो, पण त्यात भित्रेपणा होता अथवा नाही हे मी सांगू शकत नाही. मला एवढेच आठवते की, जणू मी नदीवरून तरंगत

जात असल्याप्रमाणे सबंध फरशी डोळयांसमोर हिंदकळत होती. मी खोलीत गेलो तेव्हा ती अजूनही खाली मान घालून शिवणकाम करीत बसली होती, पण आता गात नव्हती. तिने माझ्याकडे एक निर्विकार ओझरता कटाक्ष टाकला. खरे तर तो कटाक्ष नव्हताच, कुणी खोलीत प्रवेशल्यानंतर घडणारी स्वाभाविक आणि अर्थहीन प्रतिक्रिया होती.

मी थेट तिच्याजवळच्या खुर्चीवर जाऊन बसलो, श्रमिष्टासारखा. तिने चटकन माझ्याकडे घाबरून पाहिले. मी तिचा हात धरला, पण मी तिला काय म्हणालो ते आठवत नाही, म्हणजे मला काय म्हणायचे होते ते आठवत नाही, कारण तेव्हा मला धडपणे बोलताच येत नव्हते. माझा आवाज फाटला होता व माझा त्यावर ताबा रहात नव्हता. आणि खरे तर काय बोलायचे तेच मला माहीत नव्हते. नुसतीच धाप टाकली.

"आपण बोलूया... सांग मला काहीतरी!" मी अचानक बरळलो, पण माझे डोके थाऱ्यावर होते? तिचा परत थरकाप झाला आणि माझ्यापासून ती मागे सरली. भेदरून ती माझ्या चेहऱ्याकडे टक लावून पहात होती. एकदम तिच्या डोळयांमध्ये **कठोर आश्चर्य** उमटले. होय, आश्चर्य आणि **कठोर**. विस्फारल्या डोळयांनी ती माझ्याकडे पहात होती. तिचा कठोर भाव, तिचे कठोर आश्चर्य पाहून माझा पुरता चुराडा झाला. "म्हणजे तुला आणखी प्रेम हवे? प्रेम?" तिचे ते डोळे जणू मला विचारीत होते, पण अजून ती गप्पच होती. मी सर्व काही वाचले, सर्व. माझे सर्वांग गदगदून गेले आणि मी तिच्या पायांपाशी लोळण घेतली. होय, मी तिच्या पायांशी लोळण घेतली. ती चटकन उभी राहिली, पण मी सर्व ताकदीनिशी तिचे दोन्ही हात पकडले आणि तिला तेथे थोपविले.

माझी दारुण निराशा मला समजली होती, पूर्ण कळली होती! पण माझ्यावर विश्वास ठेवा, माझ्या काळजातील अत्यानंद एवढा असह्य उकळत होता, की मी मरणार असे मला वाटले. उन्मादात आणि हर्षभराने मी तिच्या पायांचे चुंबन घेतले. होय, अमाप आणि असीम हर्षाने! तरी त्याचवेळी माझ्या निराशेत आशेचा किरणसुद्धा नव्हता ह्याची लख्ख जाणीव असून! मी रडत होतो, काहीतरी सांगायचा प्रयत्न करीत होतो, पण शब्द उमटत नव्हते. अचानक तिच्या भीतीची आणि आश्चर्याची जागा काळजीच्या भावाने घेतली, तिच्या मुद्रेवर मोठे प्रश्नचिन्ह उमटले. आता ती विचित्र नजरेने माझ्याकडे पहात होती, त्या नजरेत काहीशी हिंस्र श्वापदी चमक होती, काहीतरी जाणून घ्यायला ती अधीर झाली होती आणि तिच्या

चेहऱ्यावर स्मित उमटले. मी तिच्या पायांचे चुंबन घेत होतो ह्याची तिला कमालीची लाज वाटली. तिने पटकन पाय मागे घेतले. तिची पावले ज्या जागी मघाशी होती त्या जागी फरशीचे मी चुंबन घेतले. तिने ते पाहिले व एकदम ती हसू लागली, कारण तिला शरम वाटली होती (शरमेपायी लोक हसतात हे तुम्हाला माहीत आहे). तिला उन्मादवायू चढत होता हे मी पाहिले. तिच्या हातांची थरथर सुरू झाली. पण मी तिकडे दुर्लक्ष केले आणि पुढे बरळत राहिलो की, मी तिच्यावर प्रेम करीत होतो, मी उठून उभा राहणार नव्हतो, "तुझ्या फ्रॉकचं मला चुंबन घेऊ दे,... सबंध आयुष्य मी तुझी अशी पूजा बांधीन..." मला माहीत नाही, आठवत नाही – अचानक तिला हुंदका फुटला आणि तिचे सर्वांग गदगदू लागले. अत्यंत भयानक उन्मादवायूचा झटका येत होता. मी तिला घाबरवून टाकले होते.

मी तिला तिच्या बिछान्यापाशी घेऊन गेलो. जेव्हा तिचा झटका ओसरला, तेव्हा कमालीच्या खचल्या मुद्रेने ती उठून बसली व माझे हात पकडून मला शांत होण्याची तिने विनवणी केली: "पुरे, स्वत:ला छळू नका, शांत व्हा!" आणि परत ती रडू लागली. ह्या सबंध संध्याकाळभर मी तिच्यापासून अजिबात दूर हललो नाही. मी तिला सांगत होतो की, समुद्रकिनारी बूलोनला[58] मी तिला विश्रांतीसाठी घेऊन जाईन, अवघ्या पंधरवडयाच्या आतच नेईन; तिचा दुबळा, कापरा आवाज मी संध्याकाळी ऐकला; मी पेढी बंद करणार आहे आणि दोब्रोनरावोवला विकून टाकणार आहे; सारी नव्याने सुरुवात करू आणि मुख्य म्हणजे बूलोनला जायचे, बूलोनला! ती ऐकत होती, पण अजूनही घाबरलेली होती. ती अधिकाधिक घाबरत गेली. पण माझ्या दृष्टीने ते महत्त्वाचे नव्हते, तर परत तिच्या पायांशी लोळण घ्यायची, तिचे पाय जेथे होते त्या जागी फरशीची चुंबने घेण्याची व तिची आराधना करण्याची मला दुर्दम्य इच्छा होत होती आणि "आणखी मला तुझ्यापासून काही काही नको," मी दर मिनिटाला पुन्हा पुन्हा असे म्हणत होतो, "मला उत्तर देऊ नको, माझ्याकडं पूर्ण दुर्लक्ष कर, फक्त एका कोपऱ्यात उभा रहायला आणि तुझ्याकडं बघत रहायला मला परवानगी दे, मला तुझी वस्तू बनवून टाक, तुझा कुत्रा बनवून टाक..." ती रडत होती.

"मला वाटलं होतं, तुम्ही मला अशीच राहू द्याल," नकळत तिच्या तोंडून हे शब्द निसटले. कदाचित ती हे बोलली ह्याचे तिला भानही नसेल. पण हे शब्द फार महत्त्वाचे आणि प्राणघातक होते. त्या संध्याकाळी त्यांचा

अर्थ अधिक कठोरपणे मला स्पष्ट झाला होता. जणू माझ्या काळजात सुरी खुपसली गेली होती. सर्व गोष्टींचा खुलासा मला झाला होता, पूर्ण खुलासा झाला होता, पण जोवर ती माझ्यापाशी होती, जोवर मी तिला पाहू शकत होतो, तोवर मला अदम्य आशा वाटत होती आणि मी भयानक आनंदी होतो. त्या संध्याकाळी मी तिला पुरते दमवून टाकले, मला ती जाणीव होती, पण तात्काळ मी सर्व परिस्थिती पालटून टाकीन हा एकच विचार माझ्या मनात सतत घोळत होता. सरतेशेवटी, रात्र पडली तेव्हा ती अगदीच गळून गेली आणि तिने झोपावे अशी मी विनंती केली. तिने ती विनंती मान्य केली व तात्काळ तिला गाढ झोप लागली. झोपेत ती बरळू लागेल अशी माझी अपेक्षा होती, तिचे बरळणे झालेही, पण अगदी किंचित. रात्री मी दर मिनिटाला जागा होत होतो, चोरपावलांनी हळूच येऊन तिला पहात होतो. त्या नतद्रष्ट पलंगावर पडलेल्या तिच्या आजारी देहाकडे पाहून वेदनेने मी माझे हात पिळले. अवघ्या तीन रूबलना मी तो लोखंडी पलंग आणला होता. मी तिच्यापाशी गुडघे टेकून बसलो, पण ती झोपलेली असताना तिच्या पायांचे चुंबन घेण्याचा मला धीर झाला नाही (तिच्या इच्छेविना!). देवाच्या तसबिरींसमोर प्रार्थना करण्यासाठी मी गुडघे टेकले, पण परत ताडकन उभा राहिलो. लूकेर्या माझ्यावर लक्ष ठेवून होती, अधूनमधून स्वयंपाकघरातून येऊन पहात होती. मी तिला जाऊन सांगितले की, आता स्वस्थ झोप, उद्यापासून "अगदी वेगळे" घडेल.

आणि ह्यावर माझा अगदी आंधळा, वेड्यासारखा, भयानक विश्वास होता. अत्यानंदात मी न्हाऊन निघालो होतो! मी केवळ उद्याच्या दिवसाची वाट पहात होतो. मुख्य म्हणजे, सगळी लक्षणे ठळक दिसत असूनही, कोण-त्याही संकटाची मी अपेक्षा करीत नव्हतो. जरी बुरखा गळून पडला होता, तरी विवेक अजून पुरता माझ्यापाशी परतला नव्हता; खूप खूप काळपर्यंत, अगदी आजपर्यंत तो परतला नव्हता, फक्त आजच परतला. पण याआधी तो परतणार कसा? ती जिवंत होती, ती माझ्यासमोर होती, मी तिच्या-शेजारी होतो. "उद्या ती जागी होईल, तेव्हा मी तिला सारं सांगून टाकीन आणि तिला सारं दिसेल." तेव्हा माझी तर्कपद्धती असे काम करीत होती आणि म्हणून मी अत्यानंदात होतो. बूलोनची सफर सर्वांत महत्त्वाची होती. का कुणास ठाऊक, बूलोन म्हणजे सर्व काही, असे मला वाटत होते. कस-ल्यातरी निर्णायक गोष्टीचा निकाल बूलोनमध्ये सामावला होता. "बूलोनला, बूलोनला!" मी वेड्याप्रमाणे सकाळ होण्याची प्रतीक्षा करीत होतो.

३

मला फारच समजते

तसे पाहिले तर ही घटना अवघ्या काही दिवसांपूर्वी घडली, पाच दिवसांपूर्वी, फक्त पाच दिवसांपूर्वी, गेल्या मंगळवारी! नाही, नाही, आणखी थोडा काळ, किंचित जर थांबली असती, तर मी काळोख पुसून काढला असता! मग ती शांत झाली नसती? दुसऱ्याच दिवशी माझे बोलणे ऐकताना तिच्या ओठांवर स्मित होते, अजून तिच्या मनात गोंधळ असूनही... मुख्य म्हणजे हे सगळे पाच दिवस तिच्या मुद्रेवर गोंधळाचा अथवा शरमेचा भाव सतत होता. घाबरतही होती, खूप घाबरत होती. मी हे नाकारणार नाही, वेडपट विसंगत विधाने करणार नाही: भीती होती, पण ती भिणार नाही तर काय करणार? कारण आम्ही केव्हाचे एकमेकांना परके बनलो होतो, एकमेकांची सवय सुटली होती आणि अचानक हे सगळे... पण तिच्या भीतीकडे मी दुर्लक्ष केले, कारण आमच्या नवजीवनाच्या कल्पनेने मी भारून गेलो होतो! खरे आहे, निर्विवाद खरे आहे की, मी चूक केली. कदाचित माझ्या हातून खूप चुका घडल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी जागे होताच (तो बुधवार होता) ताबडतोब मी एक चूक केली. मी अचानक तिला माझा मित्र बनवला. मी घाई केली, फार फार घाई केली, पण कबुलीजबाब देण्याची मला गरज होती, तसे करणे आवश्यक होते – ते नुसत्या कबुलीजबाबाहून काहीतरी अधिक होते! सगळे आयुष्यभर स्वतःपासून लपवून ठेवलेल्या गोष्टीसुद्धा मी तिला सांगून टाकल्या. मी मोकळेपणाने सांगितले की, सबंध हिवाळाभर मला तिच्या प्रेमाची खात्री होती. मी स्पष्ट केले की, सावकारी पेढी म्हणजे माझी निर्धारशक्ती आणि विवेकबुद्धी मी गमावल्याचे प्रतीक होती, स्वतःच्या निषेधाची व स्वतःच्या गौरवाची वैयक्तिक कल्पना होती. मी तिला खुलासा केला की, माझ्या अतिसंवेदनाशील स्वभावापायी त्या दिवशी नाटयगृहाच्या उपाहारगृहात मी भेकड वागलो होतो. जर मी अचानक पुढचे पाऊल टाकले तर तो मूर्खपणा ठरणार नाही ना, ह्या विचाराने मी अंगचोरपणा केला. द्वंद्वाची मला भीती वाटत नव्हती, पण मी मूर्ख ठरेन ह्याला मी भीत होतो. ही कबुली द्यायला नंतर फार उशीर झाला होता आणि म्हणून मी प्रत्येकाला यातना सोसायला लावल्या, तिलासुद्धा यातना सोसायला लावल्या व तिला यातना सोसायला लावण्यासाठी मी तिच्याशी लग्न केले. एकूण बहुतेक वेळ तापात

असल्याप्रमाणे मी बोलत होतो. तिने स्वतःहून माझे हात तिच्या हाती घेतले व विनविले: "तुम्ही अतिशयोक्ती करता आहात... तुम्ही स्वतःचा छळ करता आहात..." आणि परत आसवे वाहू लागली, परत झटका आला! मी असे काहीही बोलू नये आणि आठवणी सांगू नयेत अशी ती सतत विनंती करीत होती.

पण तिच्या विनंत्यांकडे मी मुळीच लक्ष दिले नाही: वसंताचा मोसम, बूलोन! तिथे सूर्य, आमचा नवा सूर्य! मी हेच बोलत होतो. मी सावकारी पेढी बंद केली आणि धंदा दोब्रोनरावोवकडे सोपविला. मग अचानक तिला विचारले की, आमच्यापाशी जे काही आहे ते सर्व गरीबांना वाटून टाकायचे, फक्त माझ्या धर्माच्या आईने दिलेले तीन हजाराचे मूळ भांडवल स्वतःपाशी ठेवायचे, बूलोनची सफर त्या पैशामधून करायची आणि परतल्यानंतर चरितार्थासाठी काम पत्करून नव्याने आयुष्याला सुरुवात करायची, ही कल्पना तिला आवडेल काय... आम्ही तसेच करायचे ठरविले, कारण ती काहीच बोलली नाही... फक्त तिने स्मित केले. कदाचित मला दुखवू नये म्हणून चतुरपणे ती फक्त स्मित करीत होती. मी तिला त्रास देत होतो हे मला दिसत होते; कृपया असे समजू नका की, तेवढे न समजण्याइतपत मी मूर्ख अथवा अहंकारी आहे. मी सर्व पाहिले, अगदी एकही क्षुल्लक तपशीलसुद्धा माझ्या नजरेतून निसटला नाही. मला सर्व उत्तम समजले होते. माझी निराशा स्पष्टपणे समोर दिसत होती.

मी तिला सर्व माझ्याबद्दल आणि तिच्याबद्दल सांगत होतो. आणि लूकेर्याबद्दलसुद्धा. मी रडलो होतो असे सांगितले... मी संभाषणाचे विषय बदलत होतो, काही गोष्टींची तिने आठवण काढू नये म्हणून प्रयत्न करीत होतो. एकदा-दोनदा तिचा चेहरा उजळला, मला आठवते, खरेच! मी पाहिले आणि तरीही मला काहीही दिसले नाही, असे तुम्ही का म्हणता? जर फक्त हे घडले नसते, तर सगळ्या गोष्टींचे पुनरुज्जीवन झाले असते. कारण परवा आमचे साहित्याबाबत बोलणे झाले, हिवाळ्यात तिने वाचलेल्या पुस्तकांबाबत बोलणे झाले, तेव्हा ती मला म्हणाली—ग्रॅनाडाच्या आर्चबिशपबरोबर झिल-ब्लासच्या प्रसंगाबद्दल ती बोलली आणि त्या आठवणीने हसली. तिचे हसणे खूप मधुर आणि निष्पाप होते, अगदी लग्नापूर्वीसारखे (एक निमिषमात्र!); मला खूप आनंद झाला! तिचे आर्चबिशपबाबतचे बोलणे ऐकून मी चांगलाच थक्क झालो होतो. म्हणजे त्या उत्तम साहित्यकृतीचा आनंद उपभोगण्याइतपत त्या हिवाळ्यात ती मनाने

शांत आणि सुखी होती. म्हणजे एव्हाना तिचे मन शांत होत चालले होते व मी तिला **तशीच** राहू देईन असा तिला विश्वास वाटू लागला होता. "मला वाटलं तुम्ही मला **तशीच** राहू द्याल"–त्या मंगळवारी ती मला असे म्हणाली होती! दहा वर्षांच्या मुलीसारखा विचार! आणि तिचा त्यावर विश्वास बसला होता, सर्व काही **तसेच** राहील असा तिला विश्वास वाटत होता: ती तिच्या टेबलापाशी, मी माझ्या व आम्ही दोघे वयाच्या साठीपर्यंत तसेच जगत राहणार. आणि अचानक मी तिच्यापाशी नवरा म्हणून गेलो, प्रेम हवे असलेला नवरा: केवढा माझा गैरसमज, केवढा आंधळेपणा!

आणखी चूक म्हणजे मी तिच्याकडे अत्यानंदाने टक लावून पहात होतो. मी माझी भावना आवरून धरायला पाहिजे होते, कारण माझ्या हर्षोत्फुल्लतेने तिला घाबरविले. तसे म्हटले तर मी संयम राखला होता, पुन्हा तिच्या पायांचे चुंबन घेतले नव्हते. आणि एकदाही मी असे दाखविले नाही, की... मी तिचा नवरा होतो– तसा विचारसुद्धा माझ्या मनात नव्हता. मी फक्त आराधना करीत होतो! पण गप्प बसून राहणे मला शक्य झाले नाही, अजिबात न बोलणे अशक्य होते! अचानक मी तिला सांगितले की, तिच्याबरोबरचे संभाषण मला खूप आवडले व माझ्यापेक्षा तिचे वाचन आणि शिक्षण जास्त होते असे माझे मत बनले होते. ती लाजून लालेलाल झाली आणि मी अतिशयोक्ती करतोय असे तिने मला बिचकत बिचकत सांगितले. आणि माझा साक्षात मूर्खपणा म्हणजे मी बरळलो की, त्या दिवशी त्या पशूबरोबर केलेले वाक्‌युद्ध मी दारामागून ऐकत होतो तेव्हा तिच्या निष्पापतेचे, तिच्या बुद्धिमत्तेचे, बालसदृश निरागसतेबरोबर मिश्रित झालेल्या तिच्या चतुर बोलण्याचे मला फार फार कौतुक वाटले होते. तिच्या सर्वांगाचा एक थरकाप झाला. मी अतिशयोक्ती करतोय असे ती परत पुटपुटली, पण अचानक तिच्या चेहऱ्यावर सावट येऊन गेले, तिने हातांच्या ओंजळीत चेहरा लपविला आणि ती हुंदके देऊ लागली. मला ते सहन होईना: मी परत तिच्यासमोर गुडघे टेकले, परत तिच्या पावलांची चुंबने घेऊ लागलो, परत तिला उन्मादवायूचा झटका आला, गेल्या मंगळवारसारखा! काल संध्याकाळी हे घडले आणि सकाळी...

सकाळी? अरे वेड्या, ती सकाळ आजची होती, थोड्या वेळापूर्वी, अगदी थोड्या वेळापूर्वी!

ऐका आणि समजून घ्यायचा प्रयत्न करा: थोड्या वेळापूर्वी आम्ही

समोवारपाशी चहा प्यायला बसलो (कालच्या झटक्यानंतर), तेव्हा तिचा शांतपणा पाहून मी चकित झालो. आणि काल संध्याकाळच्या प्रकाराबद्दल मी मात्र सबंध रात्र हुरहुरत जागून काढली होती. अचानक ती माझ्यापाशी आली, जवळ उभी राहिली, तिने हात जोडले (अगदी थोड्या वेळापूर्वी!) आणि मला म्हणू लागली की, ती गुन्हेगार आहे, तिला हे माहीत आहे, तिच्या गुन्ह्यापायी सबंध हिवाळाभर तिने मानसिक छळ सोसला, आत्तासुद्धा छळ होतोय... माझ्या मनाचा मोठेपणा तिला बहुमोल वाटतो... "मी तुमची विश्वासू पत्नी होईन, मी तुमचा आदर करीन..." मी ताडकन उठलो आणि तिला वेड्यासारखी मिठी मारली! मी तिची चुंबने घेतली, तिच्या चेहऱ्याची आणि ओठांची चुंबने घेतली. प्रदीर्घ विरहानंतर नवरा प्रथम चुंबने घेतो त्याप्रमाणे. आणि थोड्या वेळापूर्वी कशाला मी बाहेर गेलो, फक्त दोन तास... आमच्या परदेश प्रवासाच्या परवान्यांसाठी... देवा! फक्त पाच मिनिटे, अवघी पाच मिनिटे आधी मी परतलो असतो तर? आमच्या फाटकाशी लोकांची गर्दी... माझ्याकडे पाहणाऱ्या ह्या नजरा... अरे देवा!

लूकेर्या म्हणते (आता मी लूकेर्याला कधीही सोडून जाऊ देणार नाही, तिला सर्व माहीत आहे, कारण सगळा हिवाळा ती आमच्याबरोबर होती, ती मला सारे सांगील), ती म्हणते की मी गेल्यानंतर आणि माझ्या परतीच्या आधी सुमारे वीस मिनिटे, ती आमच्या खोलीत तिच्या मालकिणीला काहीतरी विचारायला—काय ते आठवत नाही—गेली आणि तिने पाहिले की, तिची देवाची तसबीर (पवित्र मेरीची) भिंतीवरून खाली काढली होती आणि टेबलासमोर उभी राहून तिची मालकीण जणू प्रार्थना करीत होती. "काय झालं बाईसाहेब?" "काही नाही लूकेर्या, जा... थांब लूकेर्या"—ती लूकेर्यापाशी आली व तिने तिचे चुंबन घेतले. "तुम्ही सुखी आहात, बाईसाहेब?" "होय लूकेर्या." "मालकांनी केव्हाच तुमची क्षमा मागायला पाहिजे होती... देवाची कृपा, तुमचा समझोता झाला..." "ठीक, लूकेर्या, जा आता, जा.." आणि तिने विचित्र स्मित केले. ते स्मित एवढे विचित्र होते की, दहा मिनिटांनंतर लूकेर्या परत एकदा तिला बघायला खोलीत गेली: "त्या भिंतीपाशी, अगदी खिडकीजवळ उभ्या होत्या. भिंतीला टेकवलेल्या त्यांच्या हातावर त्यांनी डोकं दाबून धरलं होतं आणि विचार करत उभ्या होत्या. त्या एवढ्या विचारात गुंतल्या होत्या की, पाठीमागं दारात येऊन मी त्यांना बघत होते हे त्यांच्या ध्यानातसुद्धा आलं

नव्हतं. त्या उभ्या राहून जणू गालातल्या गालात हसत होत्या, विचार करत होत्या. मी त्यांच्याकडं पाहिलं, हळूच मागं फिरले, स्वतःशी विचार करू लागले, तेवढ्यात खिडकी उघडल्याचा आवाज ऐकू आला. ताबड-तोब सांगायला मी गेले की, 'थंडी आहे बाईसाहेब, वारा बाधेल', पण बघते, तो त्या खिडकीत चढून ताठ उभ्या होत्या, त्यांची पाठ माझ्याकडे होती आणि त्यांनी हातात तसबीर धरली होती. माझ्या छातीत धस्स झालं आणि मी ओरडले: 'बाईसाहेब, बाईसाहेब!' त्यांनी माझा आवाज ऐकला, माझ्याकडं वळण्यासाठी काहीशी हालचाल केली, पण त्या वळल्या नाहीत. त्यांनी पाऊल पुढं टाकलं, तसबीर छातीशी आवळून धरली आणि खिडकीबाहेर उडी टाकली!"

मला एवढेच आठवते की, जेव्हा मी फाटकातून आत आलो तेव्हा तिचे शरीर अद्याप उबदार होते. मुख्य म्हणजे सगळे माझ्याकडे पहात होते. प्रथम ओरडत होते, पण एकदम गप्प झाले आणि त्यांनी मला वाट करून दिली... ती तिथे तसबीर धरून पडली होती. मला आठवते, जणू काळ्या धुक्यातून मी मुकाट तिच्यापाशी गेलो आणि खूप वेळ टक लावून तिला पहात राहिलो. सगळ्या माणसांनी माझ्याभोवती दाटी केली होती व ती मला काहीतरी सांगत होती. लूकेर्या तिथे होती, पण मला दिसली नाही. ती म्हणतेय की, ती माझ्याशी बोलली. फक्त तो व्यापारी आठवतो: मला सारखा ओरडून सांगत होता: "तिच्या तोंडातून मूठभर रक्त बाहेर पडलं, मूठभर!" आणि माझ्यासमोर फरसबंदीवर सांडलेले रक्त त्याने मला दाख-विले. मला वाटते, मी बोटाने रक्ताला स्पर्श केला, बोट रक्ताने माखले, मी बोटाकडे पाहिले (हे आठवते), पण तो ओरडतच होता: "मूठभर, मूठभर!"

"मूठभर म्हणजे काय?" मी बेंबीच्या देठापासून ओरडलो म्हणे, आणि हात उंचावून त्याच्या अंगावर धावून गेलो...

विलक्षण! विलक्षण! गैरसमज! अतर्क्य! अशक्य!

४

फक्त पाच मिनिटे उशीर झाला

असेच नव्हे का? हे अतर्क्य नाही? अशी गोष्ट घडणे शक्य आहे असे म्हणता येईल? कशाबद्दल, कशासाठी ही बाई मेली?

माझ्यावर विश्वास ठेवा, मला समजते. पण मरायची तिला काय गरज होती? हा प्रश्न उरतो. माझ्या प्रेमाची तिला भीती वाटली. त्या प्रेमाचा स्वीकार करावा अथवा नाही, असा तिने स्वतःला प्रामाणिकपणे प्रश्न विचारला, पण तो प्रश्न सहन करणे तिला शक्य झाले नाही आणि तिने मरण पत्करले. मला माहीत आहे, माहीत आहे, मी डोकेफोड करून काही उपयोग नाही. तिने फारच आश्वासने दिली, ती पाळणे शक्य नाही अशी तिला भीती वाटली. ते स्पष्ट आहे. इथे काही विचारही फार भयानक आहेत.

का आणि कशासाठी ती मेली? प्रश्न तसाच राहतो. हा प्रश्न माझ्या मेंदूवर सतत घण घालतोय. तिची इच्छा असती तर मी तिला **तशीच** राहू दिली असती; सर्व गोष्टी **तशाच** राहू दिल्या असत्या. पण मी तसे वागेन ह्यावर तिचा विश्वास बसला नाही. हे कारण होते! नाही, नाही, मी खोटे बोलतोय, ते कारण नव्हते. साधे कारण असे होते की, माझ्याबरोबर निखळ प्रामाणिकपणा आवश्यक होता, जर तिने माझ्यावर प्रेम केलेच असते, तर ते पूर्णांशाने करायला हवे होते; त्या दुकानदारावर केले असते तसे नव्हे. आणी त्या दुकानदाराला आवश्यक असलेले प्रेम देणे तिला शक्य नव्हते, कारण ती अत्यंत प्रामाणिक आणि शुद्ध होती. माझी फसवणूक करणे तिला शक्य झाले नाही. अर्धे प्रेम अथवा चतकोर प्रेम देऊन खऱ्या प्रेमाचे सोंग आणायचे व माझी फसवणूक करायची, हे तिने मान्य केले नाही. ती अतिप्रामाणिक होती. हे कारण होते! आणि एकदा तिच्या काळजात औदार्य रुजविण्याचा मी प्रयत्न केला होता, आठवते? किती वेडपट विचार.

ती माझा आदर करीत होती अथवा नव्हती हे जाणून घेण्याचे मला खूप कुतूहल आहे. ती माझा तिरस्कार करीत होती अथवा नाही हे मला माहीत नाही. ती माझा तिटकारा करीत होती हा विचार त्या सबंध हिवाळयात माझ्या मनाला एकदाही शिवला नाही हे आश्चर्य आहे. माझी अगदी उलट धारणा होती, तिने त्या **कठोर आश्चर्याच्या** नजरेने माझ्याकडे पाहण्याच्या क्षणापर्यंत. खरेच ती नजर **कठोर** होती. माझी ठाम खात्री झाली, कायमची! अरेरे, खुशाल माझा तिटकारा केला असता, अगदी सगळे आयुष्य, पण जिवंत राहिली असती तर बरे झाले असते! अगदी थोडचा वेळापूर्वी ती वावरत होती आणि बोलत होती. कशी तिने खिडकीतून उडी मारली, मला अजिबात समजत नाही. माझ्या आकलनापलीकडची ही गोष्ट आहे. आणि अवघ्या पाच मिनिटापूर्वी मला ती खरी वाटली असती? मी

लूकेर्याला बोलाविले. आता मी लूकेर्याला इथून जाऊ देणार नाही, कधीही नाही.

अजूनही आमच्यात समझोता झाला असता. हिवाळ्यात आम्ही एकमेकांपासून खूप दुरावलो होतो, पण परत आमची एकमेकांना सवय झाली असती? स्नेही बनून परत नव्याने आयुष्याला आरंभ करणे आम्हाला का शक्य झाले नाही? मी मोठ्या मनाचा आहे आणि तीसुद्धा – हाच एकत्र येण्याचा दुवा होता! आणखी थोडे शब्द, फार तर आणखी दोन दिवस आणि तिला सारे समजले असते.

मुख्यत: वाईट वाटते ह्याचे की, ही घटना केवळ योगायोगाने घडली – एक सामान्य, क्रूर आणि निरर्थक अपघात घडला. हेच वाईट! पाच मिनिटे, मी फक्त पाच मिनिटे उशीरा आलो! जर पाच मिनिटे आधी आलो असतो, तर तो क्षण एखाद्या ढगासारखा सर्रकन निघून गेला असता, परत तिच्या डोक्यात त्याने कधीही प्रवेश केला नसता. आणि तिची समजूत पटण्यात सर्व गोष्टींची परिणती घडली असती. पण आता परत रिकाम्या खोल्या आणि मी एकटा. कसलीही आणि कुणाचीही पर्वा न करता घड्याळाचा लंबक टिक टिक करतोय. कुणीही नाही – हेच दु:ख!

मी सारख्या येरझाऱ्या घालतोय. मला माहीत आहे, माहीत आहे, तुम्ही सांगू नका. माझ्या पाच मिनिटांच्या उशीराचा मी त्या अपघातावर ठपका ठेवतोय हे तुम्हाला हास्यास्पद वाटतेय? पण हे स्पष्ट आहे. विचार करा: प्रत्येकजण करतो त्याप्रमाणे तिने आत्महत्येआधी एक चिठीसुद्धा लिहून ठेवली नाही: "माझ्या मृत्यूबद्दल कुणालाही दोषी धरू नका!" तिच्या डोक्यात नक्की विचार आला असता की, तिच्या मरणाबाबत लूकेर्यावर आळ आला असता: "ती तिच्याबरोबर होती आणि तिनेच तिला ढकलले!" लूकेर्या निर्दोष असूनही तिला कोर्टात खेचण्यात आले असते. पण खाली आवारातील चार लोकांनी तिला खिडकीत तसबीर घेऊन उभी राहताना व खाली उडी मारताना पाहिले होते. हासुद्धा एक योगायोगच की, ते लोक तेथे होते व त्यांनी तो प्रसंग प्रत्यक्ष पाहिला. नाही, तो निव्वळ एक क्षण होता, हिशेबात न घेण्याचा क्षण. ऊर्मी आणि कल्पना! ती तेथे बसून प्रार्थना करीत होती म्हणून काय झाले? ती मरणापूर्वीची प्रार्थना होती असे समजण्यास काहीच कारण नव्हते. तो सबंध क्षण दहा मिनिटांपेक्षा जास्त टिकला नसावा. भिंतीशी उभी राहून, हातावर डोके टेकवून सस्मित मुद्रेने विचार करीत असताना त्या प्रत्येक मिनिटाला ती निर्धार पक्का करीत

असावी. ती कल्पना तिच्या मनात चमकली, एक प्रचंड वादळ घोंघावले आणि तिला ते सोसले नाही.

तुम्ही काहीही म्हणा, पण तो गैरसमज होता हे स्पष्ट आहे. माझ्या-बरोबर आणखी जगणे शक्य होते. रक्तक्षय होता? केवळ रक्तक्षय, जोम नष्ट होणे? हिवाळ्याने तिला क्षीण केले होते, हेच कारण...

फार उशीर केला!!!

शवपेटीत ती किती कृश दिसते, तिचे नाक किती धारदार भासते! तिच्या पापण्या तिच्या गालांवर छोटचा बाणांसारख्या वाटतात. आणि पडली तरी कशी–काही तुटले नाही, कशाचाही चुराडा झाला नाही. फक्त "मूठभर रक्त"! गोड पदार्थ खायच्या चमच्यात मावेल एवढे. अंतर्गत रक्तस्राव. एक विचित्र विचार: तिचे दफन केले नाही तर चालेल? कारण तिला घेऊन गेले तर... नाही, नाही, तिला घेऊन जायची परवानगी मी मुळीच देणार नाही. अर्थात मला जाणीव आहे की, तिला घेऊन जावे लाग-णार आहे. मी वेडा नाही किंवा भ्रमिष्ट नाही. उलट माझी विचारशक्ती पूर्वी कधीही एवढी तरल बनली नव्हती. अरेच्चा, पण असे कसे–घरात परत कुणीही नाही. परत दोन खोल्या आणि पेढीत मी एकटा! मी बरळ-तोय, खरेच बरळतोय! मी तिला फार यातना सोसायला लावल्या, हेच कारण!

तुमच्या कायद्यांची आता मला काय पर्वा? तुमचे रीतीरिवाज, तुमची नैतिक मूल्ये, तुमचे जग, तुमचा देश, तुमचा धर्म ह्यांचा मला आता काय उपयोग? खुशाल तुमचे न्यायाधीश माझा न्याय करोत, खुशाल मला कोर्टात नेवोत, तुमच्या सार्वजनिक कोर्टात नेवोत आणि मी सांगेन की, मी काहीही मान्य करीत नाही. न्यायाधीश ओरडतील: "चूप रहा, ऑफीसर!" तर मी त्यांच्यावर ओरडेन: "मी तुझी आज्ञा पाळीन असं बळ आता तुझ्या-पाशी कुठं आहे? मला अत्यंत प्रिय असं दुराग्रही अज्ञानानं का नष्ट केलं? आता तुमचे कायदे माझं काय भलं करतील? मी तुमच्यापासून वेगळा होतोय!" मला आता काहीच फरक पडत नाही!

आंधळी आहे, आंधळी! मेली आहे, ऐकू येत नाही! मी तुला राह-ण्यासाठी स्वर्ग बांधला असता हे तुला माहीत नाही. कारण माझ्या काळ-जात स्वर्ग आहे आणि त्यात मी तुला बसवले असते. मान्य करतो, तू मला तुझे प्रेम दिले नसतेस–हरकत नाही, काय करणार! सगळे **तसेच** राहिले असते, पुढे **तसेच** चालत राहिले असते. तू माझ्याशी मित्राप्रमाणे बोलत

राहिली असतीस. आपण संभाषणांचा आनंद लुटला असता, एकमेकांच्या नजरांमध्ये नजरा मिसळून मजेने हसलो असतो. असे जगलो असतो. जर तुझे दुसऱ्यावर प्रेम बसले असते – खुशाल, खुशाल! तू त्याच्याबरोबर हसत गेली असतीस आणि मी रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने पहात उभा राहिलो असतो... ह्यापैकी काहीही घडो, पण एकदा तरी तिने डोळे उघडावेत! एक क्षण तरी! आज सकाळी माझ्यासमोर उभी राहून तिने माझी विश्वासू पत्नी म्हणून राहण्याची शपथ घेताना जसे पाहिले होते, तसे एकदाच परत पाहिले तर! त्या एका कटाक्षात तिला सर्व समजले असते!

रितेपणा! निसर्ग! जगात लोक एकटे आहेत हेच वाईट! "ह्या मैदानात कुणी जिवंत माणूस आहे का?" रशियन परीकथेतील बाहुबली ओरडून विचारतोय. मी बाहुबली नाही, तरी तसेच ओरडून विचारतोय, पण कुणी प्रतिसाद देत नाही. सूर्य विश्वाला जीवन देतो असे म्हणतात. पण सूर्य उगवतो आणि पहा – तो मृत नाही? सर्व मृत आहे, सर्वत्र प्रेते पसरलीत. फक्त एकाकी माणसे आणि सभोवती – शांतता. जग असे आहे. "लोकहो, एकमेकांवर प्रेम करा" – कोण म्हणाले हे? कुणाची ही आज्ञा? घड्याळाचा लंबक निर्विकारपणे, भयाणपणे टिक टिक करतोय. रात्रीचे दोन वाजलेत. तिचे बूट जणू तिची वाट पहात पलंगापाशी उभे आहेत... नाही, गंभीरपणे विचारतो, जेव्हा उद्या तिला ते घेऊन जातील, तेव्हा मी पुढे काय करणार?

एका विचित्र वल्लीचे स्वप्न

काल्पनिक कथा[59]

१

मी एक विचित्र वल्ली आहे. आता मला ते वेडपट म्हणू लागलेत. जर पूर्वीप्रमाणेच त्यांच्या दृष्टीने मी वल्ली राहिलो नसतो, तर माझ्या दृष्टीने ही बढती ठरली असती. पण मला आता त्याचे वैषम्य वाटत नाही, आता ते सगळे मला लाडके वाटतात आणि जेव्हा ते मला हसतात, तेव्हा तर विशेषच प्रिय वाटतात. मीसुद्धा त्यांच्याबरोबर हसलो असतो, स्वत:ला नव्हे, तर मला ते आवडतात म्हणून, पण त्यांना पाहून मला दु:ख होते. दु:ख होण्याचे कारण त्यांना सत्य माहीत नाही आणि मला सत्य माहीत आहे. हाय, फक्त एकटयाला सत्य माहीत असणे किती जड जाते! पण त्यांना हे समजणार नाही. नाही, समजणार नाही.

पूर्वी मी विचित्र वल्ली भासायचा म्हणून मला दु:ख व्हायचे. भासायचा नव्हे, मी होतोच. मी नेहमीच वल्ली होतो आणि बहुधा माझ्या जन्मापासून मला हे माहीत आहे. कदाचित मी सात वर्षांचा होतो तेव्हापासून मी वल्ली असल्याचे मला माहीत होते. मग मी शाळेत शिकलो, नंतर विद्यापीठात शिकलो आणि काय–जेवढा जास्त शिकत गेलो, तेवढा मी वल्ली असल्याचे मला जास्त जाणवत गेले. माझ्या विद्यापीठीय शास्त्राचा मला शेवटी एवढेच सिद्ध करण्यासाठी आणि खुलासा करण्यासाठी उपयोग झाला,–जेवढा मी अधिक खोलवर गेलो–की मी वल्ली आहे. शास्त्राप्रमाणे जीवनाने मला तेच शिकवले. दर वर्षागणिक माझ्या वल्लीपणाची जाणीव हर प्रकारे वाढत व बळकट होत गेली. मला सगळे नेहमी हसत. पण त्यांच्यापैकी कुणालाही माहीत नव्हते आणि कुणीही तर्काने जाणले नव्हते, की जगातील सर्व लोकांमध्ये मलाच उत्तम माहीत होते किती वल्ली होतो मी आणि त्यांना हे माहीत नव्हते ही वस्तुस्थिती मला सगळयात जास्त दु:ख देत होती, पण

त्याबाबत दोष केवळ माझा एकट्याचाच होता. मी नेहमी एवढा गर्विष्ठ असायचा, की हे कबूल करण्याची कधीही, कुणापाशीही, कोणत्याही परि-स्थितीत माझी तयारी नव्हती. माझा गर्विष्ठपणा वर्षांबरोबर माझ्यात वाढत गेला आणि मी वल्ली होतो असे कुणापाशी कबूल केले असते, तर मला वाटते, त्याच सायंकाळी मी रिवॉल्वरने माझ्या डोक्याच्या चिंध्या केल्या असत्या. मी दुबळा होईन आणि मित्रांपाशी कबुली देईन ह्या भीतीपायी पौगंडावस्थेत माझे मनस्वी हाल झाले! मी प्रौढावस्थेत आलो तेव्हा दर वर्षागणिक माझ्या ह्या भयानक उणीवेची मला अधिकाधिक जाणीव झाली, पण तरीसुद्धा काही कारणासाठी मी ते थोडे शांतपणे स्वीकारले. मी परत म्हणतो – काही कारणासाठी, कारण आजतागायत त्याची नेमकी व्याख्या करण्यात मला यश आलेले नाही. कदाचित कशाबद्दल तरी माझ्या मनात वाढत गेलेली आत्यंतिक निराशा खुद्द माझ्यापेक्षा अनेक पटींनी मोठी होती. ते काहीतरी म्हणजे **काहीच फरक पडत नाही** अशी वाढती जाणीव. मला ह्याबद्दल फार पूर्वीपासून संशय येत होता, पण ठाम खात्री पटली अचानक, गेल्या वर्षी एके दिवशी. एकदम मला माहीत झाले की, जग अस्तित्वात आहे अथवा तेथे काहीच नाही, ह्याची मला **मुळीच पर्वा नव्हती**. माझ्या सर्वांगाने मला माहीत होऊ लागले आणि जाणवू लागले की, **मी तेथे असल्यापासून तेथे काहीच नाही**. आरंभी मला वाटत राहिले की, पूर्वी खूप काही असले पाहिजे, नंतर मला जाणवले की पूर्वीसुद्धा काहीही नव्हते आणि काही कारणास्तव तसे केवळ भासले होते. हळूहळू माझी खात्री पटली की, पुढेसुद्धा काहीही असणार नाही. तेव्हा अचानक लोकांबद्दल मला वैषम्य वाटेनासे झाले आणि इतःपर त्यांची दखल घेईनासा झालो. अत्यंत क्षुल्लक बाबींमध्ये ते खरे होते: उदाहरणार्थ, रस्त्यावरून चालताना मी सरळ लोकांवर आदळायचा. मी विचारात गुंतलेला असायचा म्हणून नव्हे, कारण विचार करण्यासारखे काही नव्हतेच, तेव्हा मी विचार करणेच सोडून दिले होते. मला पर्वा नव्हती. ना मी समस्या सोडवीत होतो. नाही, एकही नाही आणि तरीही भरपूर समस्या होत्या. पण आता मला **पर्वा नव्हती** आणि समस्या मागे पडल्या.

आणि त्यानंतर मला सत्य समजले. गेल्या नोव्हेंबरात, बरोब्बर तीन नोव्हेंबरला, मला सत्य समजले आणि तेव्हापासून माझ्या आयुष्यातील प्रत्येक क्षण मला आठवतो. ते घडले एका विषण्ण, अत्यंत विषण्ण रात्री. मी घरी चालत येत होतो, रात्रीचे दहा वाजून गेले होते व त्याहून कोणतीही वेळ

अधिक विषण्ण असू शकणार नाही असा मनात विचार आल्याचे मला आठवते. शारीरिकदृष्ट्यासुद्धा. सबंध दिवस पाऊस पडत होता, अत्यंत थंड आणि अत्यंत विषण्ण पाऊस होता, मला आठवते की तो अत्यंत भयानक पाऊस होता, लोकांशी उघड शत्रुत्व धरणारा होता आणि दहा वाजल्यानंतर अचानक तो थांबला व भयानक दमटपणा हवेत दाटला. प्रत्यक्ष पाऊस पडत होता तेव्हापेक्षा अधिक थंड आणि दमट. प्रत्येक गोष्टीतून वाफ निघत होती, प्रत्येक फरसबंदी दगडामधून, जर खोलवर आणि अंधाऱ्या पोकळ्यांमध्ये पाहिलेत तर प्रत्येक गल्लीमधून. अचानक मी मनाशी कल्पना केली की, जर गॅसचे सगळे दिवे विझले, तर वातावरण उल्हसित होईल, कारण गॅसच्या दिव्याच्या उजेडामुळे दिसणाऱ्या सर्व गोष्टी पाहून मन जास्तच खिन्न बनत होते. दिवसभरात मी काही खाल्ले नव्हते आणि दुपारनंतर एका इंजिनीअरपाशी बसलो होतो व त्याचे आणखी दोन मित्र तेथे होते. सबंध सायंकाळभर मी काहीही बोललो नव्हतो व मला वाटते, मी त्यांना कंटाळा आणला होता. त्यांची कसल्यातरी सनसनाटी विषयावर चर्चा चालली होती आणि साक्षात त्यांचा संयम सुटला होता. मला दिसत होते की, त्यांना पर्वा नव्हती, पण अगदी सहज त्यांचा संयम सुटला. मी एकदम त्यांना म्हणालो: "सभ्य गृहस्थहो, मी सांगतो, तुम्हाला काही पर्वा नाही." त्यांनी अपमान वाटून घेतला नाही, ते मला फक्त हसले. कारण माझ्या बोलण्यात डंख नव्हता, केवळ मला पर्वा नव्हती म्हणून मी तसे बोललो. मला पर्वा नव्हती हे त्यांना दिसले व म्हणून त्यांना हसू आले.

घरी चालत येताना माझ्या मनात गॅसच्या दिव्याचा विचार आला आणि मी आकाशाकडे नजर टाकली. आकाश कमालीचे काळोखे होते, तरी फाटकेतुटके ढग आणि त्यांच्यामधील अगाध काळे खड्डे मी स्पष्ट ओळखू शकत होतो. अचानक एका खड्ड्यात एक छोटा तारा लुकलुकताना मला दिसला व मी थांबून त्याच्याकडे टक लावून पाहू लागलो. कारण त्या छोट्या ताऱ्याने माझ्या मनात कल्पना दिली: त्या रात्री मी आत्महत्या करीन. पूर्ण दोन महिन्यांपूर्वी तसे करण्याचा मी निर्धार केला होता आणि जरी मी गरीब आहे तरी एक सुरेख रिवॉल्वर विकत घेतले आणि त्याच दिवशी ते ठासले. पण तरीही दोन महिने उलटून गेले होते व माझ्या लिहिण्याच्या डेस्कच्या कप्प्यात अजून ते तसेच पडून होते. पर्वा न करण्याची माझी भावना त्यावेळी फारच तीव्र होती, त्यामुळे ती भावना थोडी कमी तीव्र असतानाचा क्षण निवडून आत्महत्या करावी असे मी ठरविले, का—मला

माहीत नाही. आणि दोन महिने रोज रात्री मी आत्महत्या करण्याच्या इराद्याने घरी जात होतो. योग्य क्षणाची मी वाट पहात होतो. आता ह्या ताऱ्याने मला कल्पना दिली आणि मी निर्धार केला की, **हीच ती** रात्र असली पाहिजे. छोटचा ताऱ्याने मला ही कल्पना का दिली, माहीत नाही.

आकाशाकडे टक लावून पहात तेथे मी उभा होतो, तेवढ्यात अचानक एका छोटचा मुलीने माझ्या हाताचा कोपर धरला. रस्ता एव्हाना निर्मनुष्य बनला होता आणि आजूबाजूला चिटपाखरू नव्हते. थोडचा अंतरावर एक द्रोश्की उभी होती व गाडीवान तिच्यात डुलकी घेत होता. मुलगी सुमारे आठ वर्षांची असावी. त्या कडाक्याच्या थंडीत तिच्या अंगावर फक्त साधा सुती फ्रॉक होता व डोक्यावर रुमाल होता. ती चिप्प भिजली होती, पण तिचे ओले फाटके बूट विशेष माझ्या ध्यानात आले. आत्तासुद्धा मला ते आठवतात. माझ्या नजरेत ते ठळकपणे भरले. एकदम माझ्या कोपराला हिसका मारून ती ओरडू लागली. ती रडत नव्हती, पण तुटक शब्द ओरडत होती. जणू ताप भरल्याप्रमाणे ती थरथर कापत असल्यामुळे स्पष्ट शब्दोच्चार करणे तिला अशक्य ठरले होते. तिला कशाची तरी भीती बसली होती व आकांताने ती किंचाळली: "आई! आई!" मी तिच्याकडे अर्धवट वळून पाहिले, पण एकही शब्द बोललो नाही आणि माझ्या वाटेने पुढे चालू लागलो. ती माझ्यापाठी धावत होती, माझ्या कोटाला खेचत होती आणि मुले कमालीची घाबरली म्हणजे त्यांच्या आवाजात जी निराशा उमटते, ती तिच्या आवाजातून उमटत होती. हा ध्वनी मला ठाऊक आहे. तिचे शब्द असंबद्ध उमटत असले तरी मला समजले होते की, तिची आई कुठेतरी मरणाच्या पंथाला लागली होती अथवा दुसरे काही संकट त्यांच्यावर अचानक कोसळले होते व तिच्या आईला मदत करायला कुणालातरी अथवा काही-तरी शोधायला ती रस्त्यावर धावली होती. पण मी तिच्याबरोबर गेलो नाही. उलट, तिला हाकलून लावण्याचा विचार अचानक माझ्या मनात आला. प्रथम मी तिला पोलीसाकडे जायला सांगितले. पण ती काकुळतीने हात जोडून हुंदके देत, धापा टाकत माझ्या एका बाजूने धावू लागली. माझा पिच्छा ती सोडेना. तेव्हा मी पाय आपटून तिच्यावर खेकसलो. ती एवढेच ओरडली: "साहेब, साहेब!.." अचानक मला सोडून ती रस्त्यापलिकडे धावली. तेथे कुणीतरी रस्त्यावरून माणूस जात होता आणि बहुधा मला सोडून आता ती त्याच्यामागे धावली होती.

मी माझ्या पाचव्या मजल्यापर्यंत जिने चढून गेलो. मी भाडचाच्या घरात

राहतो. माझी खोली भिकार आणि लहान आहे, खिडकी पोटमाळ्यावर अर्ध-गोल आहे. मेणकापडी आच्छादनाचा एक दिवाण, पुस्तके रचून ठेवलेले टेबल, दोन खुर्च्या आणि एक खूप खूप जुनी, पण वॉल्टेर धाटणीची आराम-खुर्ची. मी बसलो, मेणबत्ती पेटवली आणि विचाराच्या आधीन झालो. माझ्या शेजारची खोली म्हणजे साक्षात पागलखाना आहे. परवापासून धिंगाणा चाललाय. तेथे राहणारा माणूस नोकरीतून मुक्त केलेला कप्तान आहे आणि त्याच्याकडे सहा स्त्र्यूत्स्की[60] आलेत – जीवनसागरात भरकटणारे. वोदका प्यायले आणि जुन्या पत्त्यांनी जुगार खेळले. काल रात्री मारामारी झाली आणि त्यांच्यापैकी दोघांनी एकमेकांच्या बराच वेळपर्यंत झिंज्या उपटल्या. घरमालकीण त्यांच्याविरुद्ध पोलीसांकडे तक्रार करणार होती, पण ती कप्तानाला फार घाबरते. आणखी एकमेव भाडेकरू म्हणजे एक हडकुळी छोटी बाई आहे. ती लष्करी अधिकाऱ्याची बायको आहे आणि तिला तीन लहान मुले आहेत. आमच्या शहरात ती नवीन आहेत आणि आल्या दिवसापासून मुले आजारी आहेत. बाई आणि तिची मुले कप्तानाला फार भिऊन राहतात. रात्र रात्र भीतीने थरथर कापत देवाची प्रार्थना करतात. सर्वांत लहान मुलाला तर भीतीपायी एकदा फेफरे आले. मला वस्तुस्थिती माहीत आहे की, हा कप्तान काहीवेळा नेवस्कीवर लोकांना अडवून त्यांच्यापाशी भीक मागतो. त्याला नोकरीत घेत नाहीत, पण आश्चर्य म्हणजे (म्हणून तर मी हे सर्व सांगतोय), तो आमच्याइथे राहतोय तेव्हापासून एवढ्या साऱ्या महिन्यांमध्ये एकदाही माझ्या मनात त्याच्याबद्दल तिटकारा निर्माण झालेला नाही. अर्थात आरंभापासूनच त्याची संगत मी टाळली, पण आमची प्रथम भेट झाली तेव्हाच त्याला मी कंटाळवाणा वाटलो आणि त्यांच्या खोलीत ते कितीही मोठ्यांदा ओरडले व त्यांची संख्या कितीही असली – तरी मी कधीच पर्वा केली नाही. मी सबंध रात्र बसून असतो, पण खरे सांगतो, मला कधीही त्यांचा आवाज ऐकू येत नाही, एवढा त्यांचा मला विसर पडतो. रोज रात्री मी झोपत नाही – थेट पहाटेपर्यंत. असे वर्षभर चाललेय. आरामखुर्चीत बसून काहीही न करता मी रात्र घालवतो. वाचन मी फक्त दिवसा करतो. मी बसून राहतो, पण विचारसुद्धा करत नाही. माझे विचार अंधुक आणि भटके असतात. त्यांना मी भटकू देतो. माझी मेणबत्ती रोज रात्री जळून संपते. तर मी शांतपणे खुर्चीत बसलो, कप्प्यामधून रिवॉल्वर बाहेर काढले आणि समोर टेबलावर ठेवले. ते ठेवत असताना मी स्वतःला प्रश्न केल्याचे आठवते: "नक्की ना?" आणि पूर्ण ठाम-

पणे स्वतःला उत्तर दिले: "नक्की!" म्हणजे स्वतःवर गोळी झाडीन. त्या रात्री मी नक्की आत्महत्या करणार हे मला ठाऊक होते, पण ती करण्यापूर्वी तसा मी किती वेळपर्यंत बसून राहीन ते माहीत नव्हते. आणि मी खरेच गोळी झाडून घेतली असती, जर ती लहान मुलगी नसती.

२

पाहिलेत का: मला जरी कशाचीच पर्वा नव्हती, तरी उदाहरणादाखल सांगायचे म्हणजे मला वेदना जाणवत होती. कुणी माझ्यावर प्रहार केला, तर मला वेदना जाणवली असती. मानसिक बाबतीत तसेच. जर काही करुणास्पद घडले तर मला वाईट वाटत होते. पर्वा वाटेनाशी होण्याच्या आधी आयुष्यात वाटायचे त्याप्रमाणे. त्या रात्री थोड्या वेळापूर्वी मला वाईट वाटले होते. त्या लहान मुलीला मी मदत करू शकलो असतो. का मदत केली नाही मी तिला? कारण माझ्या मनात तेव्हा एक विचार आला होता: जेव्हा ती माझा हात खेचून ओरडत होती, तेव्हा अचानक माझ्यासमोर एक प्रश्न उभा राहिला होता आणि तो प्रश्न मी सोडवू शकत नव्हतो. प्रश्न निरर्थक होता, पण त्याचा मला राग आला होता. राग येण्याचे कारण, जर त्या रात्री मी आत्महत्या करण्याचे ठरविले होते, तर त्याचा अर्थ मला यापूर्वी जगात कधीही नव्हे एवढ्या तीव्र प्रमाणात कशाचीही पर्वा वाटायला नको होती. मग अचानक मला का जाणवले की, मी बेफिकीर नाही आणि त्या लहान मुलीचा मला कळवळा आला? मला आठवते की, तिची मला फार दया आली होती. अगदी विचित्र वेदना मी अनुभवली होती व माझ्या त्या परिस्थितीत तसे वाटणे अगदी असंभवनीय होते. एवढे खरे, त्या वेळच्या माझ्या क्षणिक भावनेचे याहून चांगले वर्णन करणे मला जमत नाही, पण ती भावना मी घरी टेबलापाशी येऊन बसेपर्यंत मनात टिकली होती आणि फार दिवसात जाणवला नव्हता असा क्षोभ मला जाणवला. एकापाठोपाठ एक युक्तिवाद मनात उमटत होते. स्पष्टपणे जाणवले की, जर ती माणूस आहे आणि अजून शून्य नाही, अद्याप माझे शून्यात रूपांतर घडले नाही, तर मी जिवंत आहे आणि त्या अनुषंगाने यातना भोगण्यास, चिडण्याग व स्वतःच्या वर्तनाबद्दल शरम वाटून घेण्यास समर्थ आहे. असो. पण उदाहरणार्थ, जर आणखी दोन तासांनंतर

मी आत्महत्या करणार असलो, तर त्या मुलीची मला काय पर्वा, मला तिच्याबद्दल लाज वाटायचे कारण काय आणि एकूण जगाशी माझा संबंधच काय? मी शून्य होणार, संपूर्ण शून्य. आता मी **पूर्णतया** अस्तित्वात राहणार नाही, म्हणजे काहीच अस्तित्वात राहणार नाही, त्या लहान मुलीबद्दल अनुकंपेची किंचितही भावना उरणार नाही, माझ्या नीच वर्तनाबद्दल शरमेची भावनाही उरणार नाही, हे समजायला नको काय? म्हणून तर त्या बापड्या मुलीसमोर पाय आपटून मी खेकसलो, कारण मला सांगायचे होते की, "मला अनुकंपा तर वाटत नाहीच आणि जर मी अमानुष नीच वागत असेन, तर आता मी तसे वागू शकतो, कारण दोन तासांनंतर सर्व विझून जाणार आहे." म्हणून मी खेकसलो ह्यावर तुमचा विश्वास बसतो? याबाबत आता माझी पूर्ण खात्री पटलीय. स्पष्ट उमजलेय की, आयुष्य आणि जग आता माझ्यावर अवलंबून आहेत. असेही म्हणायला हरकत नाही, की जग केवळ माझ्या एकट्यासाठी बनविलेले आहे. मी गोळी झाडून घेतली तर जग असणार नाही, निदानपक्षी माझ्यापुरते. मग त्याबद्दल तर बोलायलाच नको की, माझ्यानंतर खरोखरीच कुणाला काही असणार नाही आणि ज्या क्षणी माझी जाणीव विझून जाईल, त्या क्षणी त्या जाणीवेचा एक गुणधर्म असलेले सबंध जगही तात्काळ मृगजळाप्रमाणे अदृश्य होईल, कारण आपले हे सर्व जग व माणसे केवळ माझा एक भाग आहेत, मीच आहेत. मला आठवते की, तेथे बसून मी युक्तिवाद लढवत होतो तेव्हा मनात दाटणाऱ्या ह्या सर्व नव्या प्रश्नांना मी वेगळेच वळण दिले होते व अगदी नवीनच विचार मनात जन्मले होते. उदाहरणार्थ असा एक विचित्र विचार मनात आला: समजा, मी चंद्रावर अथवा मंगळावर रहात असतो व कल्पिता येण्यासारखी अत्यंत नीच कृत्ये माझ्या हातून घडली असती, ज्यांच्याबद्दल केवळ भयानक स्वप्नात अपमान आणि मानहानी मला भोगावी लागली असती व त्यानंतर मी पृथ्वीवर आलो असतो तरी दुसऱ्या ग्रहावर माझ्या हातून घडलेल्या अपराधांची जाणीव बोचत राहिली असती, कोणत्याही परिस्थितीत माघारीचा रस्ता नाही हे समजले असते, तेव्हा ह्या पृथ्वीवरून चंद्राला पाहताना मला **पर्वा** वाटली असती अथवा नाही? माझ्या दुष्कर्माबद्दल मला शरम वाटली असती अथवा नाही? हे सर्व प्रश्न निरर्थक आणि **खोटे** होते, कारण रिवॉल्वर एव्हाना माझ्यासमोर पडले होते आणि मला सर्वांगाने जाणवत होते की, **ते** घडणार, पण तरीही त्या प्रश्नांनी मला उत्तेजित केले व मी भडकलो. काहीतरी उकल करण्यापूर्वी आता मी मरू

शकत नव्हतो. थोडक्यात, त्या छोटया मुलीने माझे आयुष्य वाचवले, कारण उकल न झालेल्या प्रश्नांपायी माझी आत्महत्या लांबणीवर पडली. दरम्यान, कप्तानाकडील गोंगाटही शमत चालला होता. त्यांचा पत्त्यांचा डाव संपला होता आणि कुरकुरत, एकमेकांना पेंगुळल्या आवाजात शिव्या घालत ते झोपण्याच्या तयारीत होते. तेव्हा अचानक मला टेबलासमोर खुर्चीतच झोप लागली, यापूर्वी माझ्या बाबतीत असे कधीही घडले नव्हते. नकळत मी गाढ झोपलो. आपणा सर्वांना माहीत आहे की, स्वप्ने अत्यंत चमत्कारिक असतात. एखादे स्वप्न भयानक ठळक दिसते, प्रत्येक तपशील कोरीवपणे दिसतो, तर दुसरे स्थळ-काळाच्या अंतरातून तुम्हाला एवढ्या वेगाने नेते की, भ्रमण तुमच्या ध्यानातच येत नाही. माझे मत आहे की, तर्कामुळे नव्हे तर इच्छेमुळे स्वप्ने पडतात; मन नव्हे तर हृदय कारणीभूत असते. पण तरीही माझ्या स्वप्नांमध्ये माझी तर्कशक्ती काहीवेळा किती विलक्षण खेळ करते! झोपेत माझ्या तर्कशक्तीवर अचंबा वाटणाऱ्या गोष्टी घडतात. उदाहरण देतो: माझा भाऊ पाच वर्षांपूर्वी वारला. काहीवेळा तो माझ्या स्वप्नात येतो: माझ्या सर्व कारभारांमध्ये तो क्रियाशील भाग घेतो, आम्हाला एकमेकांचा लळा आहे, तरी माझ्या संपूर्ण स्वप्नक्रमात मला पूर्ण जाणीव असते की, माझा भाऊ फार पूर्वीच वारलाय, त्याचे दफन झालेय. मग तो मृत असूनही अजून माझ्याशेजारी आहे, माझ्या कामांची चिंता करतोय, याबद्दल मला आश्चर्य का वाटत नाही? माझी तर्कशक्ती स्वेच्छेने ह्या सर्व गोष्टींशी का समझोता करते? असो. माझ्या स्वप्नाकडे परतू. होय, तेव्हा मला हे स्वप्न पडले, तीन नोव्हेंबरला! ते आता माझी चेष्टा करतात की, ते फक्त स्वप्नच होते. पण जर ह्या स्वप्नाने मला सत्य दाखविले, तर ते स्वप्न होते अथवा नव्हते, हे महत्त्वाचे थोडेच. कारण एकदा सत्य जाणले, त्याला पाहिले, सत्याशिवाय दुसरे काहीही असू शकत नाही हे समजल्यानंतर तुम्ही झोपलात अगर जगता आहात हे महत्त्वाचे नाही. ठीक आहे, स्वप्न मानू, पण हे आयुष्य, ज्याची तुम्ही एवढी वाखाणणी करता, ते मी आत्महत्या करून विझवून टाकू पहात होतो, पण माझ्या स्वप्नाने— माझ्या स्वप्नाने मला नव्या, थोर, पुनरुज्जीवित, जोमदार जीवनाचा लाभ करून दिला!

ऐका.

३

मी सांगितले की, नकळत मला झोप लागली आणि त्याच विषयांवर विचार करणे चालू असताना. अचानक मला स्वप्न पडले की, मी रिवॉल्वर उचलले आणि बसल्या बसल्याच स्वतःच्या हृदयावर टेकवले—हृदयावर, डोक्याशी नव्हे. पण पूर्वी तर मी पक्के ठरवले होते की, उजव्या कानशीलापाशी डोक्यावर गोळी झाडायची. तर रिवॉल्वर छातीवर टेकवून मी सेकंद-दोन सेकंद थांबलो आणि अचानक माझी मेणबत्ती, माझ्यासमोरील टेबल व भिंत गदगदा हलू लागली. मी घाईघाईने चाप ओढला.

स्वप्नात तुम्ही कधी कधी खूप उंचीवरून खाली पडता, किंवा तुम्हाला सुरा खुपसतात अथवा बेदम मारहाण करतात, पण तुम्हाला वेदना कधीही जाणवत नाहीत. फक्त चुकून दचकून पलंगाच्या दांड्याला आपटलात तर वेदना जाणवते आणि त्या वेदनेपायीच जाग येते. माझ्या स्वप्नात तसेच घडले: मला वेदना जाणवली नाही, पण गोळीबाराच्या आवाजासरशी माझे सर्वांग हादरले आणि एकदम सर्व गोष्टी अदृश्य झाल्या व सभोवार भयानक अंधार दाटला. मी आंधळा आणि मुका बनलो होतो. कुठल्यातरी कठीण वस्तूवर ताठ उताणा पडलो होतो, मला काहीही दिसत नव्हते व अजिबात हालचाल करता येत नव्हती. माझ्याभोवती ओरडण्याचे आवाज आणि पावलांचा दणदणाट ऐकू येत होता; कप्तानाची गुरगुर आणि मालकिणीचे कर्कश्य ओरडणे—मग परत एकदम अंधार. आता ते मला झाकण खिळ्यांनी ठोकलेल्या शवपेटीत घालून नेत होते. शवपेटी हिंदकळताना मला जाणवत होती आणि त्याबद्दल मी विचार करत होतो आणि प्रथमच मी ह्या विचाराने थक्क झालो की, मी तर मेलो आहे, संपूर्ण मेलोय, मला हे माहीत आहे आणि त्याबद्दल मुळीच शंका नाही, मला दिसत नाही, हालचाल करता येत नाही, पण जाणीव होतेय आणि विचार करतोय. लौकरच ह्या परिस्थितीशी जुळवून घेतले. स्वप्नांमध्ये आपण वाद न घालता गोष्टी स्वीकारतो.

आता ते मला जमिनीत पुरत होते. सगळे निघून गेले आणि एकटा मी राहिलो. संपूर्ण एकटा. मला हालचाल करता येत नव्हती. आपल्याला जमिनीत पुरतील तेव्हा काय वाटेल ह्याबद्दल जेव्हा जेव्हा मी कल्पना करायचा, तेव्हा मला एक संवेदना जाणवायची: ओलसरपणा आणि थंडी. आताही मला तीच संवेदना जाणवत होती, खूप थंडी वाजत होती. विशे-

षत: पायांच्या बोटांची टोके बधीर झाली होती. दुसरे काहीही जाणवत नव्हते.

मी पडून होतो आणि आश्चर्य म्हणजे कसलीही अपेक्षा करत नव्हतो. मेलेल्याने कशाचीही अपेक्षा करायची नसते हे मी मुकाट कबूल केले होते. पण ओलसर दमटपणा जाणवत होता. किती काळ उलटला कोण जाणे—एक तास अथवा काही दिवस, किंवा अनेक दिवस. पण अचानक शवपेटीच्या झाकणातून झिरपून आलेल्या पाण्याचा एक थेंब माझ्या डाव्या बंद डोळ्यावर टपकला. एक मिनिटानंतर आणखी एक थेंब, आणखी एक मिनिट उलटले आणि तिसरा थेंब. तर दर मिनिटाच्या अंतराने थेंब टपकणे सुरू झाले. माझ्या काळजात संताप दाटला आणि अचानक त्यात मला शारीरिक वेदना जाणवली. "ही माझी जखम" मनात विचार आला, "माझा बार, तेथे गोळी आहे..." आणि थेंब दर मिनिटाला माझ्या बंद डोळ्यावर टपकत होता. एकदम मी बोललो, आवाजाने नव्हे, कारण मी निपचित पडलो होतो, तर माझ्या सर्वांगाने त्या सर्वसत्ताधीशाला माझ्यावर कोसळणाऱ्या आपत्तींचे मी कथन केले:

"तू कुणीही असो, जर तू असलास आणि जर सध्यापेक्षा अधिक शहाणी व्यवस्था अस्तित्वात असेल, तर इथेही आता यातना सोस. जर माझ्या अविचारी आत्महत्येबद्दल तू माझ्यावर सूड उगवत असशील, आगामी जीवन ओंगळवाणे आणि विचित्रपणाचे देत असशील, तर समजून घे की, कुठल्याही छळांची माझ्या मूक तिरस्काराशी तुलना होऊ शकणार नाही, दशलक्षावधी वर्षे हौतात्म्याचा छळ भोगावा लागला तरी बेहत्तर!"

मी असे बोललो व गप्प झालो. संपूर्ण एक मिनिटपर्यंत प्रगाढ शांततेचे साम्राज्य नांदले आणि आणखी एक थेंब टपकला. पण असीम आणि गाढ श्रद्धा माझ्या मनात होती की, आता सारे वेगळे होईल. आणि एकदम माझे थडगे उघडले. म्हणजे ते उघडे होते आणि खणलेले होते अथवा नाही, मला माहीत नाही, पण एका काळसर अनोळखी व्यक्तीने मला वरती उचलले व आम्ही अंतराळात उडालो. अचानक मला दिसू लागले. गडद काळोखी रात्र होती आणि असा अंधार कधीही मी पाहिला नव्हता! एव्हाना जमिनीपासून आम्ही खूप दूरवर अंतराळात गेलो होतो. ज्याने मला उचलून आणले होते, त्याला मी एका शब्दाने पृच्छा केली नाही. मी वाट पहात होतो आणि मला अभिमान वाटत होता. मी स्वत:ची खात्री पटवली की, मला भीती वाटत नाही आणि मी भीत नाही ह्या विचारापायी कौतुकमिश्रित

आश्चर्याने थक्क झालो होतो. आम्ही किती वेळपर्यंत उडत होतो मला आठवत नाही आणि कल्पनाही करवत नाही : नेहमी स्वप्नात तुम्ही स्थळ-काळाचे उल्लंघन करता, जीवनाच्या आणि तर्कशक्तीच्या सर्व नियमांना डावलता व तुमच्या हृदयाच्या इच्छेनुसारच केवळ थांबता, त्याप्रमाणे सर्व घडत होते. मला आठवते, त्या अंधारात अचानक मी एक छोटा तारा पाहिला. "हा व्याध?" कसलाही प्रश्न विचारायची इच्छा नसूनही न राहवून मी विचारले. "नाही, हा तोच तारा, जो तू घरी परतत असताना ढगांमधून पाहिलास," मला उचलून नेणारी व्यक्ती उत्तरली. ती व्यक्ती माणसासदृश होती. आश्चर्य म्हणजे ती व्यक्ती मला आवडली नव्हती, उलट तिच्याबद्दल आत्यंतिक तिरस्कार वाटला होता. मी संपूण अस्तित्वहीनता अपेक्षिली होती व म्हणून स्वतःच्या काळजावर रिवॉल्वर झाडले होते. पण आता मी त्या व्यक्तीच्या ताब्यात होतो, अर्थात माणसाच्या नव्हे, पण तरीही **कुणाच्या तरी** ताब्यात होतोच. "म्हणजे थडग्यापलिकडे जीवन आहे!" मी स्वप्नांमधल्या विचित्र चंचलतेने विचार केला, पण माझ्या वृत्तीचा आशय काळजात खोल तसाच राहिला होता. "जर परत **जगावेच** लागणार असेल," मी विचार केला, "आणि टाळता न येणाऱ्या कुणाच्या तरी इच्छेपायी जगायचे असेल, तर कुणी मला मारावे आणि माझा अपमान करावा अशी माझी इच्छा नाही!" "तुला माहीत आहे, तुझी मला भीती वाटते आणि म्हणून तुझा मी तिटकारा करतो," अचानक मी त्या व्यक्तीला म्हणालो. एकप्रकारे कबुली देणारे ते शब्द मला मनात आवरून धरता आले नव्हते आणि ते बोलून टाकल्यानंतर माझ्या काळजाला अपमानाची टाचणी टोचल्याची वेदना झोंबली होती. त्या व्यक्तीने माझ्या प्रश्नाला उत्तर दिले नाही, पण एकदम मला जाणवले की, माझा तिटकारा होत नाही, मला कुणी हसत नाही, कुणी माझी कीव करत नाही. आमच्या अंतराळातील उड्डाणामागे हेतू होता, तो गुप्त आणि गूढ होता, फक्त माझ्याशीच त्याचा संबंध होता. माझ्या काळजात भीती दाटली. माझ्या मूक साथीदाराने काहीतरी गुपचूप पण वेदनादायी असे माझ्यात प्रक्षेपित केल्याचे मला जाणवले. मला ती बोचरी वेदना जाणवली. आम्ही काळोख्या आणि अपरिचित पोकळीतून उडत होतो. माझ्या डोळ्यांना परिचित नक्षत्रगण इतःपर दिसत नव्हते. आकाशाच्या अफाट विस्तारामधील काही ताऱ्यांचे प्रकाशकिरण पृथ्वीपर्यंत पोहोचण्यास हजारो आणि दशलक्षावधी वर्षे लागतात हे मला ठाऊक

होते. कदाचित आम्ही एव्हाना त्या प्रदेशांमधून उडत होतो. कसल्यातरी अज्ञात गोष्टीची मी वाट पहात होतो. माझ्या विदीर्ण हृदयाला भयानक वेदनेने घेरलेले होते. तेवढ्यात एका परिचित आणि हेलावणाऱ्या भावनेने मला हादरवले: मी अचानक आपला सूर्य पाहिला! मला ठाऊक होते की, हा **आपला** सूर्य असू शकणार नाही, **आपल्या** पृथ्वीवरचा सूर्य असणार नाही, आपल्या सूर्यापासून आपण अगणित दूर अंतरावर आहोत, पण माझे सर्वांग मला सांगत होते की, हा अगदी आपल्या सूर्यासारखाच सूर्य होता, त्याची प्रतिकृती होता, त्याचा जुळा भाऊ होता. माझ्या मनात मधुर आणि हेलावणारी आनंदभावना उचंबळू लागली. ह्या परिचित प्रकाशउगमामुळे, मला जीवन देणाऱ्या ह्या प्रकाशामुळे, माझ्या काळजात प्रतिध्वनी उमटवला, माझ्या काळजाचे पुनरुज्जीवन घडवले आणि माझ्या दफनानंतर प्रथमच मला जीवन जाणवले, पूर्वीप्रमाणे असलेले जीवन.

"जर हा सूर्य आहे, आपल्या सूर्यासारखाच सूर्य आहे," मी ओरडलो, "तर मग पृथ्वी कुठे?" माझ्या साथीदाराने अंधारात चमकत्या पाचूप्रमाणे लखलखणाऱ्या एका छोटया ताऱ्याकडे बोट दाखविले. आम्ही थेट त्याच्याकडेच उडत होतो.

"विश्वात खरोखर अशा प्रतिकृती आहेत, असा खरोखरीच निसर्गाचा नियम आहे? आणि तो तारा जर आपली पृथ्वी असेल, तर आपल्या पृथ्वीप्रमाणेच... अगदी आपल्यासारखीच भिकार आणि दरिद्री, पण तरीही सदैव प्रिय वाटणारी आणि अत्यंत कृतघ्न मुलांमध्येसुद्धा स्वतःबद्दल प्रेम उत्पन्न करणारी तशीच ही पृथ्वी असेल?" मी ओरडून विचारले. ज्या पृथ्वीचा मी त्याग करून आलो होतो, तिच्याबद्दलच्या उन्मादी, असीम प्रेमापायी मी थरथरत होतो. जिचा मी अपमान केला होता त्या बापुड्या लहान मुलीचा चेहरा माझ्यासमोर चमकून गेला.

"सगळं पाहशील," माझा सहकारी उत्तरला. त्याच्या शब्दांमध्ये विशिष्ट खिन्नता होती. आम्ही वेगाने ग्रहापर्यंत पोहोचत होतो. माझ्या डोळ्यांसमोर त्याचा आकार मोठा होत गेला. त्याच्यावरील महासागर, युरोपची रूपरेषा मी ओळखू शकत होतो. अचानक माझ्या काळजात महान आणि पवित्र मत्सरभावना उमटली: "अशी प्रतिकृती कशी असू शकेल आणि कशासाठी? जिला मी सोडून आलोय त्या पृथ्वीवर माझे प्रेम आहे आणि फक्त तिच्यावरच मी प्रेम करू शकतो, माझ्या कृतघ्नपणापायी काळजात गोळी झाडून मी आत्महत्या केल्यानंतर माझ्या रक्ताने माखलेल्या पृथ्वीवर. त्या

पृथ्वीवर प्रेम करायचा मी कधीही थांबणार नाही आणि तिच्याशी माझा विरह घडला त्या रात्री तर पूर्वीपेक्षाही ती पृथ्वी अधिक प्रिय ठरली असावी. ह्या नव्या पृथ्वीवर यातना आहेत? आमच्या पृथ्वीवर आम्ही केवळ यातना भोगूनच आणि फक्त यातनांमार्फतच खरे प्रेम करू शकतो. दुसऱ्या रीतीने आम्ही प्रेम करूच शकत नाही आणि दुसरे प्रेम आम्हाला ठाऊक नाही. जर मला प्रेमात पडायचे असेल, तर यातना स्वीकारल्या पाहिजेत. त्याच पृथ्वीचे ह्या क्षणाला चुंबन घेऊन ढसढसा रडायची माझी इच्छा आहे, दुसऱ्या कुठल्याही जीवनाचा स्वीकार मी करणार नाही!"

पण माझा साथीदार एव्हाना मला सोडून गेला होता. कसे घडले माहीत नाही, पण ह्या दुसऱ्या पृथ्वीवर स्वर्गासमान दिवसाच्या सुरेख प्रकाशात मी उभा असल्याचे अचानक मला आढळून आले. आपल्या पृथ्वीवर ग्रीक द्वीपकल्पसमूहासमान[61] एका बेटावर अथवा द्वीपकल्पसमूहानजीकच असलेल्या मुख्य भूमीच्या किनाऱ्यावर मी उभा होतो असे मला भासले. सगळ्या गोष्टी आपल्या पृथ्वीप्रमाणेच होत्या, पण त्यांच्यावर सणाची चमक होती. सरतेशेवटी साध्य केलेल्या थोर, पवित्र दिग्विजयाची चमक होती. सौम्य, पाचूच्या रंगाचा समुद्र किनाऱ्यांशी लडिवाळपणे लपेटत होता. त्याचे गोंजारणे स्पष्ट, उघड, सुजाण होते. उंच सुंदर वृक्ष दिमाखात डोलत होते. त्यांची असंख्य कोवळी पाने माझे स्वागत करीत होती, माझी त्याबद्दल खात्री आहे, सौम्य आणि शांत सळसळीने माझे स्वागत करीत होती, जणू प्रेमाचे शब्द माझ्याशी कुजबुजत होती. कुरण चकचकीत, सुगंधी फुलांनी पेटले होते. पक्ष्यांचे कळप फडफडत होते, माझ्या खांद्यांवर आणि हातांवर निर्भयपणे बसत होते, त्यांच्या मधुर, थरथरत्या पंखांचे माझ्यावर मजेदार आघात करीत होते. सरतेशेवटी ह्या आनंदभूमीच्या माणसांना मी पाहिले आणि त्यांच्याशी माझी ओळख झाली. ती माणसे स्वतःच माझ्यापाशी आली, त्यांनी मला गराडा घातला, माझी चुंबने घेतली. सूर्यपुत्र, त्यांच्या सूर्याची मुले – किती सुंदर! आपल्या पृथ्वीवर असे मानवी सौंदर्य मी कधीही पाहिले नव्हते. कदाचित आपल्या अत्यंत लहान मुलांमध्ये ह्या सौंदर्याचे दूरत्वाने अंधुक प्रतिबिंब पहायला मिळते. ह्या सुखी माणसांच्या डोळयांमध्ये नितळ चमक होती. त्यांच्या चेहऱ्यांवर विद्वत्तेचे आणि बुद्धिमत्तेचे पावित्र्य चमकत होते, तरीही त्यांच्या मुद्रा आनंदी होत्या. त्यांच्या शब्दांमधून आणि आवाजांमधून बालसुलभ आनंद उमटत होता. ज्या क्षणी मी त्यांचे चेहरे पाहिले, त्या क्षणीच मला सारे सारे उमजून चुकले! ही पृथ्वी पापाने

बरबटलेली नव्हती, इथे निष्पाप माणसांची वस्ती होती. ती अशा प्रकारच्या नंदनवनात रहात होती, जेथे आपले पूर्वज त्यांना पाप माहीत होण्यापूर्वी रहात होते असे अखिल मानवजातीच्या पुराणकथा वर्णन करतात. फक्त एकच फरक म्हणजे ही सबंध पृथ्वी एक मोठे नंदनवन होती. त्या लोकांनी हसत हसत मला आलिंगने दिली, कुरवाळले. ते मला स्वतःकडे घेऊन गेले, ते सगळे मला शांत करू इच्छित होते. कमाल म्हणजे त्यांनी मला काहीही प्रश्न विचारले नाहीत, वस्तुतः त्यांना सर्व माहीत होते असे वाटले. माझ्या चेहऱ्यावरील यातनेच्या खुणा पुसून टाकायची त्यांना घाई झाली होती.

४

मी परत म्हणतो: खुशाल हे स्वप्न असू दे! पण त्या सुंदर आणि निष्पाप लोकांनी माझ्यावर प्रेम केल्याची संवेदना माझ्यापाशी सदैव राहील. आत्तासुद्धा वरून ते माझ्यावर प्रेमाचा वर्षाव करीत असल्याचे मला जाणवतेय. मी त्यांना खुद्द माझ्या डोळ्यांनी पाहिलेय, त्यांच्याशी माझी ओळख झालीय आणि माझी खात्री पटलीय. मी त्यांच्यावर प्रेम केले आणि नंतर त्यांच्यासाठी यातना भोगल्या. अनेक बाबतीत त्यांना मी समजून घेऊ शकणार नाही हे अगदी आरंभीच मला कळून चुकले होते. माझ्यासारख्या सेंट पीटरबुर्गमधल्या आधुनिक रशियन पुरोगामी आणि भिकार नागरिकाला अगम्य भासत होते की, त्यांना एवढे माहीत असूनही त्यांच्यापाशी आपले शास्त्र नव्हते. पण लौकरच मला कळले की, इतर अवगाहनांमार्फत त्यांचे ज्ञान समृद्ध बनत होते आणि त्यांच्या महत्त्वाकांक्षा आपल्यापेक्षा अगदी वेगळ्या होत्या. त्यांना कसलीही इच्छा-वांच्छा नव्हती, ते तृप्त होते. आपण जीवनाचे सखोल अवगाहन करण्याचा प्रयत्न करीत राहतो, त्याप्रमाणे त्यांची धडपड चालू नव्हती, कारण ते पूर्ण जीवन जगत होते. आपल्या शास्त्रापेक्षा त्यांचे ज्ञान अधिक सखोल आणि वरचे होते. कारण आपले शास्त्र जीवनाचा अर्थ शोधून काढण्याची धडपड करते. कसे जगावे हे इतरांना शिकविण्यासाठी खुद्द शास्त्रच जीवनाचा थांग लावण्याचा प्रयत्न करते. उलट, शास्त्राच्या मदतीविना त्यांना जगायचे कसे ते माहीत आहे. मी ते पाहिले, पण त्यांच्या ज्ञानाचे मला आकलन झाले नाही. त्यांनी त्यांची झाडे मला दाखविली, पण त्यांच्याकडे ते एवढ्या प्रेमाने टक लावून का पहात होते हे मला समजले नाही. जणू ते त्या झाडांना माणसे समजून त्यांच्याशी संवाद

करीत होते. ते खरेच त्या झाडांशी बोलत होते असे मी तुम्हाला सांगितले तर माझी चूक होणार नाही. होय, त्यांना समान भाषा गवसलीय आणि झाडांना त्या लोकांचे बोलणे समजते अशी माझी खात्री पटलीय. सबंध निसर्गाशी वागण्याची त्यांची अशीच रीत होती—त्यांच्याशी गुण्यागोविंदाने राहणारे पशू त्यांच्यावर कधीही हल्ला करीत नव्हते, त्यांच्यावर प्रेम करीत होते, लोक त्यांच्यावर करीत असलेल्या प्रेमावर ते लुब्ध होते. त्या लोकांनी ताऱ्यांकडे बोटे दाखवून त्यांच्याबद्दल मला काही सांगितले, पण मला त्यांचे ते बोलणे समजले नाही. त्या आकाशस्थ गोलांशी त्यांचा सजीव संबंध होता, केवळ मानसिक नव्हता, एवढी मात्र माझी खात्री पटली. त्यांचे बोलणे मला समजावे असा त्या लोकांनी मुळीच आग्रह धरला नाही. ते माझ्याशी सर्वथा प्रेमानेच वागले, पण माझे बोलणे त्यांना समजायचे नाही असे माझ्या ध्यानात आल्यानंतर आपल्या पृथ्वीबद्दल मी काहीच बोललो नाही. त्यांच्या पृथ्वीचे मी चुंबन घेतले व शब्दांविना त्यांचे कौतुक केले. त्यांनी ते पाहिले तेव्हा माझ्या कौतुकाची लाज वाटून न घेता त्यांनी मला त्यांचे कौतुक करू दिले, कारण त्यांचे स्वतःचे प्रेम फार थोर होते. माझे डोळे अश्रूंनी डबडबून गेल्यानंतर जेव्हा काहीवेळा मी त्यांच्या चरणांची चुंबने घेतली, माझ्या भावनेला त्यांच्या असीम प्रेमाचा प्रतिसाद मिळणार अशा खात्रीने माझे अंतःकरण जेव्हा आनंदाने उचंबळून आले, तेव्हा त्यांना माझ्याबद्दल करुणा वाटली नाही. काहीवेळा मी स्वतःला आश्चर्याने प्रश्न केले: माझ्यासारख्याचा त्यांनी एकदाही पाणउतारा केला नाही, माझ्यासारख्याच्या मत्सरभावना अगर हेव्याच्या भावना त्यांनी जाग्या केल्या नाही, हे कसे काय? मी परत परत स्वतःला विचारले, माझ्यासारख्या वाचाळ आणि खोटारड्या माणसाने माझ्या प्राप्त ज्ञानाबद्दल—ज्याचा त्यांना मुळीच गंध नव्हता—फुशारक्या मारून त्यांच्यापुढे भाव खाण्याचा प्रयत्न केला नाही हे केवळ मी त्यांच्यावर प्रेम करतो म्हणून घडले? ते मुलांप्रमाणे स्वच्छंदी आणि खोडकर होते. त्यांच्या सुरेख रानावनांमधून त्यांची सुंदर गाणी गात ते भटकत होते, हलका आहार खात होते—त्यांच्या झाडांची फळे, त्यांच्या रानांमधला मध आणि त्यांच्यावर भक्ती करणाऱ्या पशूंचे दूध. अन्न-वस्त्रासाठी ते विशेष कष्ट करीत नव्हते. ते विषयसुख भोगत होते आणि त्यांना मुले जन्मत होती, पण क्रूर विषयलोलुपतेची एकही खूण त्यांच्यात मला आढळली नाही. आपल्या पृथ्वीवर एकजात सगळे त्या विषयलोलुपतेचे बळी ठरतात आणि आपल्या पृथ्वीवरील सर्व पापांचे मूळ तिच्यात सापडते. नव-

जात अर्भकांना ते त्यांच्या भाग्याचे नवे वाटकरी मानत व त्यांचे स्वागत करत. त्यांच्यात भांडणे नव्हती, मत्सर नव्हता. ह्या शब्दांचा अर्थसुद्धा त्यांना ठाऊक नव्हता. त्यांची मुले सर्वांची मुले होती, कारण त्यांचे एकच एक मोठे कुटुंब होते. आजार तेथे क्वचित होता, पण मृत्यू तेथे होता. त्यांचे म्हातारे लोक शांतपणे मरत. जणू ते झोपल्यासारखे भासत, ज्यांचा त्यांनी निरोप घेतला त्यांना आशीर्वाद देत हसतमुखाने जात, त्यांना निरोप देणाऱ्यांची नितळ स्मिते स्वत:बरोबर गोळा करून नेत. तेव्हा दु:खाचा अगर अश्रूंचा लवलेश मला आढळला नाही. फक्त प्रेम द्विगुणित होऊन त्याचे उन्मादात रूपांतर व्हायचे, पण तो उन्माद पवित्र, विचारी आणि परिपूर्ण होता. जणू त्यांच्या पूर्वजांशी त्यांच्या मरणानंतरही ते संपर्क ठेवत होते, मृत्यूने त्यांचे ऐहिक बंध तोडले नव्हते. चिरंतन जीवनावर त्यांचा विश्वास आहे का असे मी त्यांना विचारले तेव्हा त्यांना काही समजले नाही, कारण त्यावर त्यांची नितांत श्रद्धा असल्यामुळे तो प्रश्नच त्यांच्या मनात उद्भवत नव्हता. त्यांची मंदिरे नव्हती, पण विश्वाच्या एकत्वाशी त्यांचे महत्त्वाचे, निकट आणि सतत साहचर्य होते. त्यांचा धर्मसंप्रदाय नव्हता, पण त्याऐवजी अविचल ज्ञान त्यांना होते की, ऐहिक सुखाचा अंतिम टोकापर्यंत त्याच्या ऐहिक रूपात उपभोग घेतल्यानंतर ते सर्व – जिवंत आणि मृत – विश्वाच्या एकत्वाशी अधिक जवळ येतील. त्या दिवसाची ते उत्सुकतेने वाट पहात, पण त्यात अधीरता अथवा हाव नव्हती. जणू त्याची चव त्यांनी आधीच अंत:करणात घेतली होती, एकमेकांना सांगितली होती. रात्री झोपण्यापूर्वी ते गाणी म्हणत, त्यांचे आवाज सुरेलपणे एकमेकात मिसळून जात. उलटलेल्या दिवसाने त्यांना दिलेल्या अनुभवांबाबत त्यांची गाणी असत, त्या दिवसाभोवती ते तेजोवलय निर्माण करीत आणि त्याला निरोप देत. निसर्ग, पृथ्वी, समुद्र आणि रानांना त्यांनी गौरवस्थान दिले होते. एकमेकांबद्दल गाणी रचण्याची, लहान मुलांप्रमाणे एकमेकांची स्तुती करण्याची त्यांना आवड होती. त्यांची गाणी अत्यंत साधी होती, पण ती काळजातून उमटत आणि दुसऱ्यांची हृदये हेलावून टाकत. केवळ गाणीच कशाला? त्यांची साक्षात आयुष्येच एकमेकांची स्तुती करण्यात व्यतीत होत. ही एक प्रकारची एकमेकांबद्दलची प्रीती होती, सार्वत्रिक आणि संपूर्ण. मात्र त्यांची काही उत्सवी आणि उन्मादित गाणी मला मुळीच समजली नाहीत. शब्द समजले तरी त्यांच्यामागील पूर्ण अर्थ उमजायचा नाही. माझ्या बुद्धीच्या तो आवाक्यापलिकडचे राहिला, तरी अंत:प्रेरणेने माझे हृदय त्याला जास्त जास्त

प्रतिसाद देऊ लागले. फार फार पूर्वीच मी हे सर्व आधी मनाने अनुभवले होते असे मी वारंवार त्यांना सांगत होतो. ह्या सर्व सुख-वैभवाची वेदना-दायी आस लावणारी तार फार पूर्वीच आमच्या ग्रहावर असताना माझ्या अंतरात छेडली गेली होती, काहीवेळा असह्य दुःखात तिचे रूपांतर घडले होते. माझ्या काळजाच्या स्वप्नांमध्ये आणि माझ्या मनाच्या भासांमध्ये त्या सर्वांना व त्यांच्या वैभवाला मी आधीच पाहिले होते. आमच्या पृथ्वीवर सूर्यास्त पाहताना अनेकदा माझे डोळे पाणावले होते... आमच्या पृथ्वीवर लोकांविषयी मला वाटणाऱ्या तिटकाऱ्याबद्दल मी नेहमी खंत करायचा. त्यांच्यावर प्रेम न करता त्यांचा द्वेष न करणे मला का जमत नव्हते, त्यांना क्षमा करणे का जमत नव्हते, त्यांच्याबद्दलच्या माझ्या प्रेमात खिन्नता का होती? त्यांचा तिरस्कार न करता त्यांच्यावर मी प्रेम का करू शकत नव्हतो? ते लोक माझे बोलणे ऐकत होते, पण माझे बोलणे त्यांना आकलन न झाल्याचे मला दिसत होते. तरीही त्यांना ते सांगून टाकल्याचे मला दुःख वाटत नव्हते, कारण मी ज्यांना टाकून आलो होतो, त्यांच्याबद्दल मला वाटणारी ओढ त्यांना समजत होती. जेव्हा त्यांची लाडकी प्रेमळ नजर माझ्यावर पडली, त्यांच्याबरोबर माझेही काळीज त्यांच्यासारखेच निष्पाप आणि सत्यप्रिय बनलेय असे जेव्हा मला जाणवले, तेव्हा माझे समाधान झाले व त्यांचे बोलणे मला समजत नव्हते ह्याचा खेद वाटेनासा झाला. जीवनाच्या संपृक्ततेमुळे मी अवाक बनलो होतो आणि केवळ मूकपणे त्यांची पूजा करीत होतो.

आत्ता प्रत्येकजण माझ्या तोंडावर हसतोय आणि म्हणतोय की, आत्ता मी सांगत असलेला सर्व तपशील स्वप्नात दिसणे कधीही शक्य नाही, माझ्या स्वप्नात मी केवळ माझ्या संभ्रमावस्थेत माझ्या काळजात आकार घेतलेली काही संवेदना पाहिली व अनुभवली असावी आणि हा सारा तपशील जाग आल्यानंतर मी रचला असावा. तसे घडणे शक्य आहे असे जेव्हा मी त्यांच्या-समोर कबूल केले — देवा, काय ते चक्क माझ्यासमोर मला हसले, माझी त्यांनी भरपूर टिंगल केली! अर्थात, माझ्या स्वप्नाच्या केवळ संवेदनेने मी भारावून गेलो होतो आणि माझ्या घायाळ, रक्तस्राव होणाऱ्या काळजात तेवढीच एक संवेदना उरली होती. पण प्रत्यक्ष प्रतिमा आणि आकार, म्हणजे ज्यांना मी खरेच स्वप्नात पाहिले होते, त्यांचा एवढा सुरेख, मोहक सुमेळ जमला होता आणि त्या एवढ्या खऱ्या होत्या, की जागा झाल्यानंतर त्यांचे वर्णन करण्यास आपले दुबळे शब्द अर्थातच मला अपुरे ठरले आणि

माझ्या मनात त्या प्रतिमा अंधुक होणे स्वाभाविक होते. म्हणून नंतर नकळतपणे मी खरोखरीच तो तपशील रचला असावा, अर्थातच त्याला विकृत बनवले असावे, कारण त्यांना अभिव्यक्ती देण्यास मी फार उतावळा बनलो होतो. पण हे सगळे घडले ह्याबाबत माझ्यावर विश्वास कसा ठेवत नाहीत? कदाचित याहून हजार पटींनी जास्त चांगले घडले, मी सांगतोय त्यापेक्षा तेजस्वी आणि आनंदी. ते स्वप्न होते हे मान्य, पण त्यात हे सर्व असलेच पाहिजे. मी तुम्हाला एक गुपित सांगतो: ते स्वप्न नसेलसुद्धा! कारण पुढे काहीतरी घडले, भयानक सत्य घडले, जे कधी कुणाच्या स्वप्नातसुद्धा येणे शक्य नाही. माझ्या हृदयाने त्या स्वप्नाला आकार दिला असे मान्य केले, तरी त्यानंतरची भीतीदायक वास्तवता केवळ माझे हृदय जन्माला घालण्यास समर्थ होते का? मी स्वतः हे सर्व कसे रचणार अथवा माझे हृदय कसे सांगणार? माझे उथळ हृदय आणि माझे चंचल, नतद्रष्ट मन अशा सत्याच्या जाणीवा अनुभवण्याच्या उच्च पातळयांवर चढणे शक्य आहे म्हणता? तुम्हीच निर्णय करा: आत्तापर्यंत मी लपवून ठेवले होते, पण आता हे सत्यसुद्धा मी उघड करतो. त्याचे असे आहे—की मी... त्या सर्वांना भ्रष्ट केले!

५

होय, होय, त्या सर्वांना भ्रष्ट करण्यात अखेर झाली! ते कसे घडू शकले मला माहीत नाही, पण तसे घडले हे मात्र मला पक्के आठवते. माझ्या स्वप्नाने हजारो वर्षांची झेप घेतली आणि त्याचा एक संपूर्ण ठसा तेवढा माझ्यापाशी ठेवला. त्यांच्या अधःपाताला मी कारणीभूत होतो एवढेच मला ठाऊक आहे. विषारी जटिलकेशरोगाप्रमाणे, सबंध राज्यांना ग्रासून टाकणाऱ्या प्लेगप्रमाणे, त्या संपूर्ण सुखी पृथ्वीला मी संसर्गाने ग्रासून टाकले. माझ्या आगमनापूर्वी तेथे पाप कधी घडले नव्हते. ते खोटे बोलायला शिकले, खोटे त्यांना आवडू लागले, खोटयातील सौंदर्य त्यांना समजू लागले. कदाचित त्याचा आरंभ अगदी **निष्पापपणे**, हसतखेळत, नखरे करीत, प्रेमाच्या खेळांमधून झाला, अथवा खरोखरीच खोटेपणाचा अणु त्यांच्या काळजांमधून झिरपत गेला, त्यांना तो आवडला. त्यानंतर लौकरच विषयवासना जन्मली, तिच्यातून मत्सराचा उगम झाला आणि मत्सरातून क्रौर्य उत्पन्न झाले... मला माहीत नाही, मला आठवत नाही, पण लौकरच, अगदी लौकरच प्रथम रक्तसिंचन घडले. ते चकित झाले, घाबरले व अलग होऊन भिन्न

दिशांना जाऊ लागले. त्यांनी युनियना स्थापन केल्या, पण त्या एकमेकीं-विरुद्ध होत्या. आरोप–प्रत्यारोप घडू लागले. त्यांना शरम ठाऊक झाली व तिचे त्यांनी गुणात रूपांतर केले. सन्मानाचा अर्थ त्यांना उमगला व प्रत्येक युनियन स्वतःचा बावटा फडकवू लागली. त्यांच्या पशूंशी ते क्रूर वागू लागले आणि पशू जंगलात माघारी गेले, वैरी बनले. वाटणीसाठी, सार्वभौमत्वा-साठी, वैयक्तिक महत्तेसाठी, तुझ्या-माझ्यासाठी संघर्ष सुरू झाला. आता त्यांच्या भाषा वेगवेगळ्या बनल्या. दुःखाची त्यांनी चव घेतली व दुःख त्यांना आवडू लागले, यातनांची त्यांना तहान लागली व केवळ यातनांमधू-नच सत्यप्राप्ती होईल असे ते म्हणू लागले. मग शास्त्राची ओळख करून देण्यात आली. ते दुष्ट बनले तेव्हा बांधिलकी व मानवतेसंबंधी बोलू लागले, त्या संकल्पना त्यांना समजल्या. जेव्हा ते गुन्हेगार बनले, तेव्हा त्यांनी न्या-याच्या कल्पना शोधून काढल्या आणि न्याय राखण्यासाठी कायद्याची असंख्य कलमे त्यांनी स्वतःला नेमून घेतली व त्या कलमांना सुरक्षितता लाभावी म्हणून गिलोटीन उभारले. त्यांनी जे गमावले होते त्याबद्दल त्यांना केवळ अंधुक आठवण राहिली. कोणे एके काळी ते सुखी आणि निष्पाप होते ह्या-वर विश्वास ठेवण्यास त्यांनी नकार दिला. कधी काळी ते सुखी होते असा नुसता विचारसुद्धा त्यांना हसू आणत होता आणि त्याला ते स्वप्न म्हणत. त्याला ते प्रतिमांमध्ये आणि आकारांमध्ये मांडू शकत नव्हते. पण आश्चर्य आणि चमत्कार म्हणजे, त्यांच्या पूर्वीच्या सुखाला परीकथा असे संबोधून जरी त्यांची त्यावरील श्रद्धा नाहीशी झाली होती, तरी परत निष्पाप आणि सुखी होण्याची त्यांना तीव्र आस लागली होती. मुलांप्रमाणे ते स्वतःच्या हृदयेच्छेच्या आहारी गेले, त्या इच्छेला त्यांनी देवस्वरूप दिले, त्यांनी असंख्य देवालये स्थापन केली, त्यांच्या स्वतःच्या कल्पनेची किंवा खरे म्हणजे "इच्छे"ची ते प्रार्थना करू लागले; ती कधीही प्रत्यक्षात उतरणार नाही अथवा तिची पूर्ती होणार नाही ह्याची त्यांना पूर्ण जाणीव होती, तरीसुद्धा तिची ते साश्रुनयनांनी आराधना करीत होते. असे असले तरीसुद्धा, त्यांनी गमावलेले निष्पापतेचे आणि सुखाचे साम्राज्य जर पुन्हा स्थापित करणे शक्य असते, अथवा कुणी त्यांना त्याची केवळ एक झलक दाखवू शकला असता व त्यांना तिकडे परत जायची इच्छा आहे का असे त्याने विचारले असते, तर त्यांनी कदाचित नकार दिला असता. त्यांनी मला सांगितले: "आम्ही फसवे, दुष्ट आणि अन्यायी राहू, पण आम्हाला ते **माहीत आहे**, आम्ही त्यासाठी अश्रू ढाळतो व स्वतःचा छळ करून घेतो, पण आमचा न्याय

करायला जो दयाळू न्यायाधीश बसेल, ज्याचे नाव आम्हाला माहीत नाही, तो जी शिक्षा आम्हाला देईल त्यापेक्षा जास्त कठोर शिक्षा आम्ही स्वतःला करून घेत असतो. आमच्यापाशी शास्त्र आहे, त्याच्यामार्फत आम्ही परत सत्याचा शोध घेऊ आणि ह्यावेळी त्याचे आकलन जाणीवपूर्वक करू. भावने-पेक्षा ज्ञान श्रेष्ठ आहे, जीवनाची जाणीव जीवनापेक्षा श्रेष्ठ आहे. शास्त्र आम्हाला शहाणपणा देईल, शहाणपणा कायदे निर्णित करील व सुखाच्या कायद्यांचे ज्ञान सुखापेक्षा श्रेष्ठ आहे." त्यांनी मला असे सांगितले आणि असे सांगून झाल्यानंतर प्रत्येकजण स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजत होता. दुसऱ्या रीतीने वागणे त्याला शक्यच नव्हते. प्रत्येकाने स्वतःच्या अहंकाराची मत्सरपूर्वक जपणूक केली व इतरांच्या अहंकाराचा अपमान करण्यासाठी आणि त्याला कमी लेखण्यासाठी सर्व प्रयत्न खर्ची घातले. त्याचे ते जी-वितकार्य बनले. त्यानंतर गुलामगिरी आली. स्वेच्छेची गुलामगिरीसुद्धा अस्तित्वात होती. दुबळे बलिष्ठांच्या आधीन एवढ्याचसाठी झाले, की त्यां-च्याहून दुबळ्या असलेल्यांना चिरडून टाकता यावे. त्या माणसांच्या मग्रूरी-बद्दल, त्यांनी गमावलेल्या मोजमापाच्या, सुमेळाच्या, शरमेच्या जाणीवेबद्दल प्रामाणिक लोक डोळ्यात पाणी आणून त्यांना सांगत. पण प्रामाणिकांची टवाळी होई, त्यांच्यावर दगड फेकले जात. देवालयांच्या उंबरठ्यांवर पवित्र रक्त सांडले. प्रत्येकाला परत उत्तम रीतीने जुटीत कसे आणावे, पण त्याच-वेळी प्रत्येकजण इतरांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ कसा समजत राहावा, त्याच वेळी इतरांच्या वाटेत तो कसा आडवा येऊ नये व त्यायोगे बाह्यतः सगळेजण गुण्यागोविंदाने कसे जगावेत, ह्याबाबत काही लोक विचार करायला पुढे सरसावले. ह्या विचारापायी मोठी युद्धे झाली. पण युद्धात गुंतूनही लढ-वय्यांची ठाम धारणा होती की, शास्त्र, शहाणपणा आणि आत्मरक्षणाची अंतःप्रेरणा पुढे कधी ना कधी मानवजातीला एका सुसंवादी व सुजाण समा-जात एकत्र यायला भाग पाडतील. दरम्यान, ह्या प्रक्रियेला वेगाने चालना मिळावी म्हणून, ह्या विचाराच्या विजयात अडथळा आणला जाऊ नये म्हणून, ह्या विचारावर श्रद्धा न बाळगणाऱ्यांना आणि "शहाण्या नसले-ल्यांना" लौकरात लौकर नष्ट करण्याचे प्रयत्न "शहाण्यांनी" सुरू केले. पण आत्मरक्षणाची अंतःप्रेरणा लौकरच दुबळी बनू लागली व मग्रूरीच्या आणि विषयसुखाच्या आहारी गेलेले लोक थेट मागणी करू लागले: सर्व अथवा काहीच नाही. सर्व प्राप्त करण्यासाठी त्यांनी गुन्ह्याचा अवलंब केला आणि त्यात अपयश आल्यास ते आत्महत्या करू लागले. बिनअस्तित्वात चिरंतन

शांतता लाभावी म्हणून बिगर-अस्तित्वाच्या आणि आत्मनाशाच्या संप्रदायाचे धर्म पुढे निर्माण करण्यात आले. निरर्थक कष्टांमुळे माणसे अखेर थकली व त्यांच्या मुद्रांवर यातनांचे सावट पडले. आणि त्यांनी घोषित केले की, यातना म्हणजेच सौंदर्य, कारण केवळ यातनेतच विचार सामावलाय. त्यांच्या गीतांमधून ते यातनांची वाखाणणी करू लागले. मी हातवारे करीत, त्यांच्यासाठी अश्रू ढाळीत त्यांच्यामधून फिरत होतो. पूर्वी जेव्हा त्यांच्या चेहऱ्यांवर यातनांचे सावट नव्हते, ते निष्पाप व सुंदर होते, तेव्हा माझे त्यांच्यावर जेवढे प्रेम होते त्यापेक्षा जास्त प्रेम बहुधा आता मी त्यांच्यावर करीत होतो. त्यांची स्वर्गतुल्य पृथ्वी त्यांनी भ्रष्ट केल्यानंतर पूर्वीपेक्षा ती मला अधिक आवडू लागली, त्याचे एकमेव कारण म्हणजे तेथे दु:ख आले. हाय, मला दु:ख आणि शोक नेहमीच आवडत आले आहेत, पण केवळ माझ्या स्वत:साठी, एकटचा माझ्यासाठी. त्यांच्याबद्दल मात्र मी करुणेने रडलो. स्वत:चा निषेध करीत, शिव्या घालीत आणि तिटकारा करीत त्यांच्यासमोर मी निराशेने हात पसरले. मी ते सगळे केले, मी एकटचाने केले, असे मी त्यांना सांगितले. हा भ्रष्टाचाराचा, विषमतेचा आणि फसवणुकीचा जंतु मी त्यांच्यापाशी आणला होता. मला क्रूसावर फाशी द्या, अशी मी त्यांची विनवणी केली. क्रूस कसा बनवायचा हे मी त्यांना शिकविले. आत्महत्या करणे मला शक्य नव्हते, तेवढे माझ्या अंगी बळ नव्हते, पण त्यांच्या हातून माझा छळ व्हावा अशी माझी इच्छा होती. यातना भोगायला मी आसावलो होतो, त्या यातनांपायी माझे रक्त थेंबाथेबाने गळून जावे असे मला वाटत होते. पण ते मला केवळ हसले आणि भाबडा मूर्ख म्हणू लागले. ते माझे समर्थन करू लागले, त्यांच्या लायकीनुसार त्यांना नशीब लाभले असे म्हणू लागले, आता जे काही त्यांच्यापाशी आहे त्याहून दुसरे असणे शक्य नाही असे म्हणू लागले. शेवटी त्यांनी जाहीर केले की, मी त्यांच्या दृष्टीने धोकेबाज बनत चाललो होतो आणि जर मी तोंड बंद ठेवले नाही, तर ते मला वेडयांच्या इस्पितळात कोंडून ठेवतील. त्यासरशी माझ्या अंत:करणाला दु:खाने एवढचा जोरात झपाटले, की मला श्वास घेता येईना, मी घुसमटून मरतोय असे मला वाटू लागले आणि नंतर... तेव्हा मला जाग आली.

एव्हाना सकाळ झाली होती, पण अजून पुरते उजाडले नव्हते, पाच वाजून गेले होते. मी खुर्चीतच जागा झालो, माझी मेणबत्ती संपूर्ण जळून

गेली होती, कप्तानाकडे सगळे झोपलेले होते आणि आमच्या घरात सभोवार आगळी शांतता नांदत होती. सगळ्यात प्रथम मी आश्चर्याने ताडकन खुर्चीमधून उठलो. असे यापूर्वी कधी घडले नव्हते. उदाहरणार्थ, आरामखुर्चीत झोप लागण्यासारख्या क्षुल्लक गोष्टीसुद्धा कधी घडल्या नव्हत्या. मी भानावर येत असताना अचानक माझे भरलेले रिवॉल्वर माझ्यासमोर टेबलावर पडलेले मला दिसले. मी पटकन त्याला दूर लोटले. आता मला जीवन हवे होते, जीवन! मी हात उचलले आणि चिरंतन सत्याला हाक घातली. नाही, हाक घातली नाही, रडलो. माझ्या सर्वांगामधून अत्यानंद भरून राहिला होता, अमाप अत्यानंद. होय, मला जगायची इच्छा होती आणि प्रवचन द्यायचे होते. प्रवचनाचा निर्णय माझा त्याच क्षणाला झाला होता आणि अर्थात सबंध आयुष्यभरासाठी. मी प्रवचन द्यायला जाणार होतो, प्रवचन द्यायची माझी इच्छा होती – कशाबद्दल प्रवचन देणार होतो? सत्याबद्दल. मी ते पाहिले होते, माझ्या डोळ्यांनी पाहिले होते, त्याच्या सर्व वैभवासकट पाहिले होते.

तेव्हापासून मी प्रवचन देतोय! शिवाय, सर्वांवर प्रेम करतो, मला जे हसतात त्यांच्यावर इतरांपेक्षा जास्त प्रेम करतो. त्याचे कारण – मला माहीत नाही आणि मी खुलासा करू शकत नाही, पण तसेच घडत राहो. ते म्हणतात की माझी पडझड होतेय, पण माझी एवढी वाईट पडझड चालू असेल तर मी पुढे कसा जाणार? माझी पडझड होतेय हे अगदी पूर्ण खरे आहे आणि मी पुढे जाईन तशी माझी पडझड अधिक वाईट होणार आहे. उत्तम प्रवचन कसे द्यावे, म्हणजे कोणत्या शब्दांनी आणि कोणत्या कृत्यांनी करावे – कारण ही फार अवघड कामगिरी आहे – हे व्यवस्थित शिकण्यापूर्वी माझी पडझड होणार आहे आणि एकाहून जास्त वेळा माझी वाट चुकणार आहे ह्यात काही संशय नाही. दिवसाच्या उजेडाइतके आत्ताच मला ते स्पष्ट माहीत आहे. पण ऐका, आपल्यापैकी कुणाची पडझड होत नाही? तरीही प्रत्येकजण त्याच दिशेने जात असतो, निदान सर्वांची तिकडे जाण्याची धडपड चालू असते – अगदी शहाण्यापासून अखेरच्या दरोडेखोरापर्यंत – फक्त सगळे वेगवेगळ्या वाटा धरतात. हे जुने सत्य आहे, पण त्यात काहीतरी नवे आहे पहा. माझी फार पडझड होणार नाही. कारण मी सत्य पाहिलेय, मला माहीत आहे की, ह्या पृथ्वीवर राहण्याची क्षमता न गमावता माणसे सुंदर आणि सुखी बनू शकतात. दुष्टपणा माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे ह्यावर मी विश्वास ठेवू शकत नाही आणि विश्वास ठेवणार

नाही. तरीही, माझ्या ह्या ठाम धारणेचे सर्वांना हसू येते. पण कसा मी विश्वास ठेवणार नाही: मी सत्य पाहिलेय, माझ्या कल्पनाशक्तीचा अथवा माझ्या मनाचा तो केवळ खेळ नव्हता. त्या **सजीव प्रतिमेने** माझ्या आत्म्या-चा कायम ताबा घेतला आहे. एवढ्या पूर्णत्वाने त्या सत्याला मी पाहिलेय, की लोकांमध्ये ते रहात नाही ह्यावर विश्वास ठेवण्यास मी नकार देतो. तर मी वाट कशी चुकणार? अर्थात, एक-दोनदा मी भरकटत जाईन, काहीवेळा दुसऱ्यांचे शब्द कदाचित वापरीन, पण फार काळ नव्हे. जे मी पाहिले त्याची जिवंत प्रतिमा माझ्यापाशी सदैव राहील, ती मला नेहमी दुरुस्त करील आणि सरळ मार्गावर ठेवील. मी जोमाने आणि ताकदीने पूर्ण मुसमुसलोय. मी प्रवचन देणार, हजार वर्षेपर्यंतसुद्धा. त्या सर्वांना मी भ्रष्ट केले ही वस्तुस्थिती लपवून ठेवा-यची प्रथम माझी इच्छा होती, पण ती माझी चूक ठरली असती — एव्हाना पहिली चूक! सत्य माझ्या कानात कुजबुजले की, मी **खोटे बोलतोय.** सत्याने मला वाचवले आणि योग्य मार्ग दाखवला. पण पृथ्वीवर स्वर्ग कसा निर्माण करायचा मला माहीत नाही, कारण शब्दांमध्ये ते कसे मांडायचे मला ठाऊक नाही. माझ्या स्वप्नानंतर मी शब्द गमावले. निदान सर्वांत महत्त्वाचे, अत्यंत जरूरीचे. असो. मी जाईन आणि न थकता सगळे बोलीन, कारण माझ्या डोळ्यांनी मी पाहिलेय, मात्र त्याचे वर्णन मला करता येत नाही. मला हसणाऱ्यांना हे समजत नाही. ते म्हणतात: "ते निव्वळ स्वप्न होते, बरळणे होते, आभास होते." हात्! हा काय शहाणपणा? पण त्यांना खूप गर्व आहे! स्वप्न? स्वप्न म्हणजे काय? आपले जीवन म्हणजे स्वप्न नाही? त्यापुढे सांगतो: ते कधीही खरे होऊ नये, स्वर्ग कधीही निर्माण होऊ नये (निदान एवढे मला समजते!), तरीही मी जाऊन प्रवचन देईन. तरीसुद्धा ते करणे अगदी सोपे आहे: अवघ्या एका दिवसात, **एका तासात**, सगळे घडविता येईल! सर्वांत महत्त्वाचे — स्वतःवर प्रेम करतोस तसे इतरांवर प्रेम कर. हेच सर्वांत महत्त्वाचे. बस्स. आणखी काहीही नको. तात्काळ कसे करायचे ते उमजेल. हे जुने सत्य आहे, अब्जावधी वेळांना त्याचा पुनरुच्चार झालाय आणि ते वाचले गेलेय, पण तरीही त्याने अजून मूळ धरलेले नाही. "जीवनाची जाणीव जीवनापेक्षा श्रेष्ठ आहे, सुखाच्या काय-द्यांचे ज्ञान सुखापेक्षा श्रेष्ठ आहे" — ह्याविरुद्ध आपण लढले पाहिजे! आणि मी लढेन. जर सर्वांची तशी इच्छा असेल, तर तात्काळ ते करता येईल.

त्या छोट्या मुलीला मी शोधून काढले... मी माझ्या वाटेने जाईन! नक्की जाईन!

टीपा

[1]ही लघुकादंबरी सर्वप्रथम १८४६ साली लेखक निकोलाय नेक्रासोव यांच्या 'पीटरबुर्गचा संग्रह' मध्ये प्रसिद्ध झाली. १८४७ मध्ये, लेखकाच्या अनेक दुरुस्त्यांसह, कादंबरी स्वतंत्रपणे प्रकाशित झाली. 'दरिद्री माणसे' दस्तोयेवस्कींच्या जीवनकाळात आणखी दोनदा प्रसिद्ध झाली: १८६० मध्ये (संग्रह, खंड १) आणि १८६५ मध्ये (संपूर्ण संग्रह, खंड २ व स्वतंत्र आवृत्ती). ह्या आवृत्त्यांमध्ये विशेष दुरुस्त्या नव्हत्या.

दस्तोयेवस्कींचे समकालीन, सुप्रसिद्ध रशियन टीकाकार विस्सारीओन बेलीन्स्की, यांच्यापाशी नेक्रासोव यांनी १८४५ च्या मे महिन्यात 'दरिद्री माणसे' हस्तलिखित स्वरूपात प्रथम वाचायला दिले होते, तेव्हा बेलीन्स्कींनी लेखनाची खूप वाखाणणी केली. पीटरबुर्गच्या साहित्यिक-वर्तुळांमध्ये नव्या गुणी लेखकाच्या आगमनाची वार्ता झपाट्याने पसरली. ह्या लघुकादंबरीच्या प्रकाशनानंतर दस्तोयेवस्कींना अमाप यश लाभले. "श्री. दस्तोयेवस्कींना लाभले तसे त्वरित यश रशियन साहित्यात अभूतपूर्व आहे", असे बेलीन्स्कींनी '१८४६ मधील रशियन साहित्याचा आढावा' ह्या लेखात लिहिले होते.—पान ५

[2]हा उतारा रशियन लेखक व्लादीमिर ओदोयेवस्की (१८०४-१८६९) यांच्या 'जिवंत प्रेत' (१८३९) मधून घेतलाय.—पान ६

[3]महान रशियन कवी मिखायल लेर्मोन्तोव (१८१४-१८४१) यांच्या 'इच्छा' कवितेमधील चुकीचा उतारा. मूळ ओळी अशा आहेत:

"आत्ताच माझ्या डोक्यावरून उडून गेलेला
पक्षी, स्तेपमधला कावळा मी का होत नाही?"—पान ८

[4] बॅरन ब्राम्बेऊस – ओ. इ. सेन्कोवस्कींचे टोपणनाव (१८००-१८५८), टीकाकार आणि कादंबरीकार, 'वाचन-ग्रंथालय' नियतकालिकाचे संपादक. – पान ९

[5] बँक-नोटा – रशियात १७६९ साली कागदी चलन सुरू झाले; १८४३ मध्ये बँक-नोटा आल्या. १८३० नंतर, एक रूबलच्या बँक-नोटेला अधिकृतरीत्या २७ चांदीचे कोपेक बदलून मिळत. – पान ९

[6] थेरेसा आणि फाल्दोनी: १८ व्या शतकाच्या उत्तरार्धातील व १९ व्या शतकाच्या आरंभीच्या काळातील लोकप्रिय भावनाप्रधान कादंबरीतील दुर्दैवी नायक-प्रेमिकांची नावे. फ्रेंच लेखक एन्. दे. लेओनार (१७४४-१७९३); रशियन अनुवाद मि. काचेनोवस्की, १८०४ व १८१६. – पान १९

[7] लोमोन्दचे व्याकरण – फ्रेंच व्याकरणाचे पुस्तक. लोमोन्द यांनी रचले व लेतेलये यांनी दुरुस्त्या करून पुरवणी जोडली. १८३१. त्याआधी अनेक रशियन आवृत्त्या निघाल्या. – पान २७

[8] झापोल्स्कीचे... कितीतरी पटींनी चांगले – पुस्तकाचा संदर्भ. 'मुळाक्षरांसकट, व्युत्पत्तींसह, वाक्यरचनेच्या नियमांसह नवे क्रमिक पुस्तक.' संपादन – वि. झापोल्स्की, १८१७. दुसरी आवृत्ती – १८२४. – पान २७

[9] महान रशियन कवी अ. पूष्कीन १७९९-१८३७ यांच्या मरणोत्तर प्रसिद्ध झालेल्या संग्रहांचा संदर्भ. पीटरबुर्गमध्ये १८३८ ते १८४१ दरम्यान अकरा खंड प्रसिद्ध झाले. – पान ४४

[10] मकार देवूष्कीन कौतुक करीत असलेल्या राताझ्यायेव नामक सामान्य लेखकाच्या लेखनातील उतारे – एक कडवट साहित्यिक विडंबन. 'इटालीचे तीव्र मनोविकार'मार्फत रशियन लेखक अलेक्सान्द्र बेस्तूझ्येव-मार्लीन्स्की (१७९७-१८३७) यांच्या शैलीचे विडंबन केले आहे. १८३० ते १८४९ ह्या काळात त्यांच्या रोमांचवादी कथा खूप लोकप्रिय होत्या. मार्लीन्स्कींच्या अतिरंजित आणि अतिअलंकारिक शैलीचे टीकाकार विस्सारीओन बेलीन्स्कींनी वाभाडे काढले. त्यानंतर मार्लीन्स्कींची लोकप्रियता झपाट्याने ओसरली. १८४० नंतरच्या काळातील कालबाह्य रोमांचवादाच्या नकलेविरुद्धचा लढा

म्हणजे रशियन साहित्यात वास्तववाद आणण्याच्या लढ्याचा अंगभूत भाग होता. —पान ६२

[11] 'येर्माक आणि जूलेखा' — रोमांचवादी ऐतिहासिक कादंबऱ्यांचे विडंबन. अघटित प्रसंग, अचाट व्यक्तिरेखा आणि शब्दावडंबरपूर्ण शैली, ही अशा कादंबऱ्यांची वैशिष्ट्ये होती. —पान ६३

[12] येर्माक (मृत्यू १५८४) — कझाक आतामान. १६ व्या शतकात इतर रशियन साहसी प्रवाशांसह सैबेरियातील नव्या प्रदेशांचा शोध लावण्यात महत्त्वाची कामगिरी. —पान ६३

[13] महाभयंकर इवान (१५३०-१५८४) — अखिल रशियाचा १५३३ पासून ग्रँड ड्यूक. १५४७ पासून रशियन झार. —पान ६३

[14] रशियन लेखक नि. गोगोल (१८०९-१८५२) यांच्या मूळ विचारांचा मतितार्थ समजून न घेता केवळ त्यांच्या लेखनशैलीची वर वर नक्कल करून लोकांना हसवू पाहणाऱ्यांचे विडंबन. —पान ६४

[15] पोल-दे-कोक (१७९३-१८७१) — फ्रेंच लेखक, दैनंदिन जीवनाचे चित्रण; १८४० नंतरचे रशियन प्रतिगामी टीकाकार त्याच्या पुस्तकांना अयोग्य, "घाणेरडी" समजत. —पान ६५

[16] 'बेल्कीनच्या कथा' — अ. से. पूष्कीन यांचा कथा-संग्रह. १८४६ पर्यंत तीनदा प्रकाशन: १८३१, १८३४ आणि १८३८. —पान ६७

[17] 'माणसाचे चित्र, सर्व सुशिक्षित वर्गांसाठी आत्मज्ञान करून घेण्याच्या वस्तूंविषयीच्या नीतिपर वाचनाचा अनुभव, लेखक — अ. गालीच,' १८३४. अ. गालीच (१७८३-१८४८), पूष्कीन यांचे अध्यापक, मानसशास्त्रज्ञ आणि तत्त्वज्ञ-आदर्शवादी. —पान ७२

[18] 'घंटेवर वेगवेगळे नाद काढणारा मुलगा...' फ्रेंच लेखक द्यूक्रे-द्यूमिनिल (१७६१-१८१९) यांच्या कथेचा रशियन अनुवाद (१८०९).

गरीबीत राहणाऱ्या दुर्दैवी मुलाची कहाणी. पण अखेर आनंददायी: त्या मुलाला श्रीमंत नातेवाईक भेटतो व भटक्या वादकामधून त्याचे प्रतिष्ठित उमरावात रूपांतर होते.—पान ७२

[19] 'इविकचे सारस...' शिल्लेरचा पोवाडा. (१७९७). नामवंत रशियन कवी वासिली झूकोवस्की यांनी अनुवाद केला. (१७८३-१८५२). —पान ७२

[20] १८४३ च्या आरंभी नि. गोगोल यांच्या प्रसिद्ध झालेल्या 'संग्रहां'-च्या तिसऱ्या खंडाचा संदर्भ. 'ओव्हरकोट' ही गोगोल यांची कथा त्यात प्रथम प्रकाशित झाली.—पान ७४

[21] लव्हलेस—स्त्रियांना फूस लावणारा 'क्लारीस हार्लो' (१७४७-१७४८) ह्या कादंबरीचा नायक. इंग्रज लेखक एस्. रिचर्डसन (१६८९-१७६१)—रशियात १८ व्या आणि १९ व्या शतकाच्या आरंभी लोकप्रियता.—पान १०१

[22] १८२५ ते १८६४ दरम्यान पीटरबुर्गमधून प्रसिद्ध होणाऱ्या, फ्यो. बूल्गारीन व नि. ग्रेच यांच्या 'उत्तरेची मधमाशी' नामक प्रतिगामी वृत्तपत्राचा संदर्भ.—पान १२४

[23] ही कथा प्रथम 'अतेचेस्त्विन्नियें झापिस्की' ('पितृभूमीची टिपणे') अंक १२ मध्ये १८४८ साली प्रसिद्ध झाली. नंतर दस्तोयेवस्कींच्या सर्व पुढील संग्रहांमध्ये तिचा समावेश झाला.

स्वप्नाळू—दस्तोयेवस्कींची एक आवडती व्यक्तिरेखा. कथेच्या शीर्षकात व 'रात्रीं'च्या विभागणीत दस्तोयेवस्कींनी रोमांचवादी परंपरा पाळली आहे. पण रोमांचवादी विषयाची निवडीच्या विषयाशी सरमिसळ झाली असली, तरी दस्तोयेवस्कींच्या नायकाला स्वप्नाळूपणापायी फार हाल सोसावे लागलेत. "आपल्या सर्व स्वप्नाळू वर्षांना" तो वास्तव आयुष्याच्या एका दिवसासाठी द्यायला तयार आहे.—पान १४३

[24] श्रेष्ठ रशियन लेखक इवान तुर्गेनेव (१८१८-१८८३) यांच्या 'फूल'

(१८४३) कवितेमधील चुकीचा उतारा. मूळ ओळी अशा: "तुझ्या काळ-जापाशी, एक क्षण घालवायला, ते निर्मिले असावे."—पान १४४

[25] ... पिवळा रंग. 'नभाखालील साम्राज्य'—चीनचे प्राचीन नाव. १९१२ पर्यंत त्याच्या पिवळ्या ध्वजेवर सर्पराक्षस असायचा.—पान १४६

[26] "कल्पनेची देवता..." वि. अ. झूकोवस्की यांच्या 'माझी देवता' (१८०९) कवितेचा संदर्भ. ग्योते यांच्या «Meine Göttin» (१७८०) चा स्वैर अनुवाद. कवी तिच्यात "झ्यूसच्या आवडत्या कल्पनादेवतेचे गुण-गान करतो."—पान ९६३

[27] अर्न्स्ट थीओडोर आमादेय हॉफमान (१७७६-१८२२)—जर्मन लेखक, रोमांचवादी, अद्भुत कथालेखक.—पान १६५

[28] बार्थोलोम्यूची रात्र—२४ ऑगस्ट १५७२ च्या रात्री, (कॅथलिकांच्या संत बार्थोलोम्यू दिनाच्या वेळी), पॅरिसमध्ये कॅथलिकांनी प्रोटेस्टंटपंथीयांची महाभयानक सार्वत्रिक कत्तल केली.—पान १६५

[29] डायना वेर्नोन—इंग्रज लेखक वॉल्टर स्कॉट (१७७१-१८३२) यांच्या 'रॉब रॉय' (१८१७) कादंबरीची नायिका. तिच्या व्यक्तिरेखेत स्वप्नाळू-पणाचे धैर्य आणि ठामपणाशी मिश्रण घडले होते.—पान १६५

[30] दीड महिन्याच्या वेढ्यानंतर आणि घनघोर लढायांनंतर १५५२ च्या ऑक्टोबरात कझान काबीज करण्यात आले होते. एक लाख रशियन सैनि-कांचे नेतृत्व झार महाभयंकर इवानने केले होते.—पान १६५

[31] क्लारा मोवब्राय—वॉल्टर स्कॉट यांच्या 'सेंट रोमानचे पाणी' (१८२३) कादंबरीची नायिका.—पान १६५

[32] एफीया डेन्स—वॉल्टर स्कॉट यांच्या 'एडिंगबर्गचा मनोरा' (१८१८) कादंबरीची नायिका.—पान ९६५

[33] यान हूस (१३६९-१४१५) – महान चेक देशभक्त. प्राग विद्यापीठाचे रेक्टर, श्रेष्ठ सुधारक, कॅथलिक चर्च व चेकियावरील जर्मन सत्तेविरुद्ध जनतेच्या चळवळीचे प्रेरक. कॉन्स्तान्झामधील कॅथलिक चर्चच्या मंडळाने त्यांना पाखंडी ठरविले व जिवंत जाळण्याची शिक्षा फर्मावली. – पान १६५

[34] प्रीलेट – कॅथलिक चर्चमधील उच्च अधिकाऱ्यांची पदवी. – पान १६५

[35] 'रॉबर्ट-सैतान' (१८२४) – सुप्रसिद्ध संगीतकार, पियानोवादक, वाद्यवृंदचालक जाकोमो मेयबेर (१७९१-१८६४) यांचा ऑपेरा. – पान १६५

[36] बेरेझिना ही द्नीप्रची उजवीकडील उपनदी. १८१२ च्या नोव्हेंबरात, पितृभूमीरक्षक युद्धाच्या दरम्यान, मॉस्कोहून माघार घेणाऱ्या नेपोलियनच्या सेना बेरेझिना नदी ओलांडत असता, त्यांचा रशियन फौजांनी अंतिम पाडाव केला. नेपोलियन कसाबसा निसटला, अथवा तो रशियनांचा कैदी बनला असता. – पान १६५

[37] हा संदर्भ बहुधा येकातेरीना रोमानोवना वोरोन्त्सोवा-दाश्कोवा (१७४३-१८१०) यांचा असावा. पीटरबुर्गच्या विज्ञान प्रबोधिनीच्या संचालिका व रशियन प्रबोधिनीच्या अध्यक्षा. – पान १६५

[38] दान्तोन जॉर्ज जॅक (१७५९-१७९४) – १७८९ मधील महान फ्रेंच क्रांतीचे एक प्रणेते. रोबेस्पीयरच्या पाठराख्यांनी प्रजासत्ताकाविरुद्ध कट केल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवला. क्रांतिन्यायालयाने वधाची शिक्षा दिली. – पान १६५

[39] क्लेओपात्रा (ख्रि. पू. ६९-३०) – असाधारण सौंदर्यवती म्हणून प्रसिद्ध पावलेली इजिप्तची राणी. "क्लेओपात्रा आणि तिचे प्रियकर..." अ. पूष्कीन यांच्या 'इजिप्तच्या रात्री' कथेतील (१८३५) उतारा. एका इटालियन शीघ्रकवीला दिलेला विषय. – पान १६५

[40] 'कलोम्नामधील घर' – पूष्कीनची कविता. – पान १६६

[41] लेर्मोन्तोव (१८१४-१८४१) यांची ह्याच शीर्षकाची कविता.

हायने यांच्या (१७९७-१८५६) «Sie liebten Sich beide» कवितेचा स्वैर अनुवाद. —पान १६७

[42] 'सेविलचा न्हावी' — इटलीचे संगीतकार जाकोमो आन्तोनिओ रोस्सिनी (१७९२-१८६८) यांचा ऑपेरा. रशियात खूप लोकप्रिय झाला. —पान १७७

[43] ही कथा बहुधा दस्तोयेवस्कींनी परदेशाहून परत आल्यानंतर १८६२ च्या शरदात लिहिली असावी. 'व्रेम्या' नियतकालिकाच्या ११ व्या अंकात १८६२ मध्ये ती प्रथम प्रसिद्ध झाली.

भूदास पद्धती रद्द झाल्याच्या १८६१ संबंधात त्या काळात रशियन वृत्तपत्रीय लेखांमधून जोरजोराने चर्चिल्या जाणाऱ्या समस्यांना दस्तोयेवस्कींनी प्रस्तुत कथेत स्पर्श केला आहे. कथेची कलात्मक वैचारिक रचना आणि तिचे शीर्षक अचूकपणे त्या युगातील रशियन जीवनाचे दर्शन घडवितात. थोर औपरोधिक लेखक मिखायल साल्तीकोव-श्चेद्रिन यांनी त्याला "गोंधळाचे युग" म्हटले होते. —पान २०७

[44] रशियन चित्रकार कॉ. ब्र्यूल्लोव यांच्या 'पॉम्पीचा अखेरचा दिवस' (१८३३) ह्या चित्राचा उल्लेख कथानायक लाक्षणिक अर्थाने करतो. ज्वालामुखीच्या अचानक उद्रेकापायी नाश पावलेल्या त्या प्राचीन शहरातील भेदरलेल्या नागरिकांची चित्रे त्यात रेखाटली आहेत. —पान २२१

[45] हरून-अल्-रशीद — न्यायी हरून, खलीफा; बगदादमधून रात्रीच्या वेळी तो वेषांतर करून फिरत असे अशी दंतकथा आहे. अशा भ्रमंतीमधून त्याला स्वतःच्या नागरिकांच्या जीवनाचा परिचय घडायचा. त्याच्या मृत्यू-नंतर (इ. स. ८०९) अनेक गीतांचा व 'अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक कथां'चा तो नायक बनला. —पान २२७

[46] 'गोलोवेश्का' — म्हणजे 'ईस्का'. हास्यचित्रांसहित औपरोधिक नियत-कालिक (१८५९-१८६४). नि. स्तेपानोव व वि. कूरोचकिन संपादक-प्रकाशक. —पान २३४

[47] ह्या लोकनृत्याचे इ. तुर्गेनेव यांनी 'जुनी व्यक्तिचित्रे' (१८८१)

मध्ये वर्णन केलेय. "इवानने झकास नाच केला, विशेषत: 'रीब्का.' नाचाचा सूर कोरसकडून घुमायचा, तो वर्तुळाच्या मध्यभागी यायचा व गोल फिरायला, उड्या मारायला, पाय आपटायला आरंभ करायचा, मग अचानक स्वत:ला जमिनीवर झोकून द्यायचा आणि पाण्यातून नुकत्याच बाहेर काढलेल्या तडफडणाऱ्या माशाच्या हालचाली दाखवायचा..." —पान २३७

[48] 'पीटरबुर्गचे बातमीपत्र' — 'अकादेमिचिस्कीये वेदोमस्ती' — दैनिक वृत्तपत्र. १७२८ पासून विज्ञान प्रबोधिनीमार्फत प्रकाशन. —पान २४०

[49] फोकीन — त्या काळात पीटरबुर्गमध्ये खूप लोकप्रिय असलेल्या "कॅनकॅनच्या नायकां" मधील एकजण अभिप्रेत असावा. —पान २४२

[50] मॅथ्यूच्या गॉस्पेलमध्ये म्हटलेय: "पित्त मिसळलेला शिरक्याचा प्याला त्याला पिण्यासाठी देण्याला आला" (प्रकरण २७, पान ३४.) —पान २५७

[51] बाजारपेठेत वधाची शिक्षा — बाजारपेठेतील चौकात अथवा सार्वजनिक स्थळी फटके मारणे. अशा वधाची शिक्षा रशियात १८४५ पासून रद्द करण्यात आली. —पान २६३

[52] कथेच्या आरंभी दस्तोयेवस्कींनी म्हटल्याप्रमाणे, "जवळजवळ महिनाभर ती लिहिण्यात ते गुंतले होते." त्यांनी १८७६ नोव्हेंबरात ही कथा लिहिली. 'लेखकाची रोजनिशी'च्या नोव्हेंबर १८७६ च्या अंकात ती प्रसिद्ध झाली.

यापूर्वीच, १८६९ साली, कौटुंबिक संघर्षाच्या आणि विवाहित जोडप्याच्या विभक्तपणाविषयीच्या कथेचा आराखडा दस्तोयेवस्कींनी बनविला होता. 'बापुडी' मध्ये अनेक हेतू एव्हाना अभिप्रेत होते. पण १८७६ च्या शरदात मॉस्कोतील एका शिंपीणीच्या, मारीया बोरीसोवाच्या, आत्महत्येविषयी पीटरबुर्गच्या वृत्तपत्रात एक लेख आला आणि दस्तोयेवस्कींनी त्वरेने ही कथा लिहिली.

टीकाकारांनी सहृदयतेने कथेचे स्वागत केले. दस्तोयेवस्कींच्या "विशिष्ट प्रकारच्या गुणवत्तेला पूर्णत: योग्य" कथा होती असे मान्य करण्यात आले. टीकाकार म्हणाले होते: "गुंतागुंतीच्या आणि शोकजनक भावनांचे चित्रण

करण्यात त्यांचा हातखंडा आहे. आत्महत्या करणाऱ्या स्त्रीच्या नवऱ्याच्या वतीने प्रामाणिकपणे कथा सांगण्याची शैली प्रभावी आहे." — पान २६९

[53] 'गोलस' ('आवाज') — १८६३ ते १८८४ पर्यंत अ. क्रायेवस्कीं-च्या संपादनाखाली पीटरबुर्गमधून प्रकाशित होणारे उदारमतवादी प्रवृत्तीचे "राजकीय आणि साहित्यिक" दैनिक. या वृत्तपत्राने दस्तोयेवस्कींच्या का-र्यात खूप रस घेतला आणि त्यांच्याबद्दल काही टीकात्मक लेख छापले. — पान २७२

[54] ग्योते यांच्या 'फाऊस्त'च्या तिसऱ्या दृश्यात मेफीस्तोफेलीस म्हणतो :

"मी अशा ताकदीचा भाग आहे —
जी वाईट इच्छिते, पण भले करते..." — पान २७६

[55] पूष्कीनच्या 'राक्षस' मधून (१८२३):

"ते दिवस, जेव्हा मला सारेच
नवे नवे वाटत होते..." — पान २८५

[56] जॉन स्टुअर्ट मिल (१८०६-१८७३) — इंग्रज तत्त्वज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञ. — पान २८७

[57] व्याझेम्स्कीचे घर — पीटरबुर्गमधील दलित वर्गाचे गल्लीबोळातील "मनोरंजन" घर. तेथील दारूचे गुत्ते, अड्डे याबद्दल कुप्रसिद्ध. — पान २९२

[58] बूलोन-स्यूर-मेर — फ्रेंच बंदर, समुद्रकाठचे प्रेक्षणीय स्थळ. इंग्लंडला जाता-येताना १८६२ च्या जून-जुलैत दस्तोयेवस्कींनी या ठिकाणी मुक्काम केला होता. म्हणून त्याचा प्रस्तुत कथेत उल्लेख. — पान ३०८

[59] 'लेखकाची रोजनिशी'च्या १८७७ एप्रिलच्या अंकात ही कथा प्रसिद्ध झाली. दस्तोयेवस्कींच्या आयुष्यक्रमात परत प्रसिद्ध झाली नाही. 'सुवर्ण युगा'च्या विषयाचे, मानवजातीच्या सुखी भवितव्याचे, दस्तोयेवस्कींना अनेक वर्षेपर्यंत वेड होते. त्या विषयाला या तत्त्वज्ञानपर कथेत 'दुसऱ्या भूमी'-च्या लोकांच्या जीवनाच्या प्रतीकामधून वाट मिळाली आहे. १७ व्या शत-कातील फ्रेंच चित्रकार क्लॉड लॉरीने यांच्या पौराणिक चित्रांमधून मानवजा-

तीचे सुखी भवितव्य पाहण्याची दस्तोयेवस्कींना स्फूर्ती मिळाली. १८६७ मध्ये द्रेस्देन येथील चित्रसज्जात दस्तोयेवस्कींवर त्या चित्रांचा फार प्रभाव पडला. – पान ३१९

[60] पीटरबुर्गमधील ह्या शब्दाचा प्रचलित अर्थ – "उथळ, भिकार, कुचकामी माणूस." अशा लोकांविषयी तिरस्कार व्यक्त करायला लेखक हा शब्द वापरीत – "दारुडा, सडलेला आणि पथभ्रष्ट माणूस." – पान ३२४

[61] "ग्रीक द्वीपकल्पसमूह" – उबदार हवा आणि समशीतोष्ण कटिबंधातील वनस्पतींचा एजीअन सागरातील बेटांचा समूह. दस्तोयेवस्कींनी त्यांचे वर्णन "लडिवाळ पाचूच्या समुद्रापासची सुखी भूमी" असे केले होते. – पान ३३२

माननीय वाचक!

प्रस्तुत पुस्तकाबाबतची आपली मते आणि सूचना जाणून घेण्यास आम्हाला आनंद वाटेल.

रशियन आणि सोविएत साहित्याचे तुमच्या मातृभाषेतील अनुवाद आमच्या लोकांच्या संस्कृतीची व जीवनाची सखोल ओळख करून घेण्यास आपल्याला मदत करतील अशी आशा आहे.

आमचा पत्ता: 'रादुगा' प्रकाशन, १७ झूबोवस्की बुलवार, मॉस्को ११९८५९, सोविएत संघ.

लेखकाचा जीवनविषयक दृष्टिकोनाचे नेमके सार त्यांच्यात साठवलेले आहे. प्रस्तुत कथासंग्रहात तरुण लेखकाच्या पहिल्याच कथेचा – ' दरिद्री माणसे ' – समावेश आहे. ह्या कथेने वाचकांची मने त्याकाळी तात्काळ काबीज केली होती. ' श्वेतरात्री ' ही एक अत्यंत काव्यमय कहाणी. आणि पुढे परिपक्व बनलेल्या लेखकाच्या हातून ' एक ओंगळ घटना ' ' बापुडी ' व ' एका विचित्र वल्लीचे स्वप्न ' ह्या कथा उतरल्या. दस्तोयेवस्कींच्या एकूण लेखनप्रवासातील महत्त्वाच्या टप्प्यांवरील कथांना एकत्र गुंफणारा हा संग्रह त्या थोर लेखकाच्या प्रतिभेच्या भिन्न पैलूंचे दर्शन घडवतो.

“सखोल चिंतन आणि नैतिक मूल्यांच्या व्यापक प्रश्नांचे विवेचन करणारा हा लेखक आपल्या दृष्टीने पूर्णतया आगळा ठरतो. सद्य:कालीन समाजाला ज्यांच्याबद्दल आस्था वाटते अशा गोष्टींचाच तो केवळ विचार करीत नाही, तर त्याहीपुढे जाऊन, तावडतोबीच्या नव्हे तर मानवजातीच्या अतिदूरच्या शोधांचे ध्येय पुढे ठेवणाऱ्या पूर्वदृष्टीच्या आणि पूर्वजाणीवेच्या प्रांतात प्रवेश करतो.”

मिखायल साल्तीकोव-श्चेद्रिन

“...तुम्ही म्हणता की, दस्तोयेवस्कीने सर्व माणसे आपल्यासारखीच समजून स्वत:च्या नायकांमार्फत स्वत:चे चित्रण केले! त्याचा परिणाम म्हणजे ह्या वेचक व्यक्तिरेखांमधून त्याच्याशी सगेपण राखणाऱ्या केवळ आम्हा लोकांनाच नव्हे तर परदेशी लोकांनाही स्वत:ची, स्वत:च्या आत्म्याची ओळख पटते.”

ल्येव तल्स्तोय